Peer reviewed Journal Impact Factor:7.265 ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

*Multidisciplinary International Level Referred Journal*

**December-2021 Volume-12 Issue-23**

## *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*


| Chief Editor | Editor |
|---|---|
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

Executive Editor
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**




**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

***A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal***

***December-2021 Volume-12 Issue-23***

*On*

# *Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

| **Chief Editor** | **Editor** |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

EDITORIAL BOARD

| | | |
| --- | --- | --- |
| **Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]**<br>**Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]**<br>**Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]**<br>**Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]**<br>**Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]** | **guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam**<br>**Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]**<br>**Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]**<br>**Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]**<br>**Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]** | **Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]**<br>**Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]**<br>**Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]**<br>**Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]**<br>**Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]** |

**Published by-** Mr. Shashikant Jadhawar, I/C, Principal, Chhatrapati Shivaji Mahavidyalaya, Kalamb, Dist. Osmanabad (MS) India

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

## CONTENTS


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| **1** | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणाविषयक विचार<br>**प्रा. डॉ. देविदास मल्हारी शेटे** | 1-4 |
| 2 | डॉ. भीमराव अम्बेडकर के विचारो की वर्तमान समय में प्रसांगिकता<br>**सरताज सिंह** | 5-9 |
| 3 | छत्रपति शाहू महराज का सामाजिक कार्य \|<br>**प्रा. जाधव जे. बी.** | 10-13 |
| 4 | **डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे दलित कवितेवरील प्रभाव**<br>**साईप्रसाद मधुकर पंडीत** | 14-17 |
| 5 | महात्मा जोतीराव फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान<br>**व्हसमने सुरेखा बसाप्पा** | 18-20 |
| 6 | जलव्यवस्थापन : शिवकाल ते वर्तमान संदर्भ<br>**प्रा.डॉ. पी.आर. वाणी** | 21-24 |
| 7 | राजश्री शाहू महाराजांचे :- शेती विषयक कार्य<br>**लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव** | 25-27 |
| 8 | राजश्री छत्रपती शाहू महाराज एक थोर विचारवंत'<br>**श्रीमती नाटकर संगीता शेषराव** | 28-33 |
| 9 | महात्मा जोतीराव फुले यांचे शेती विषयक विचार<br>**प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे** | 34-36 |
| 10 | महात्मा ज्योतीराव फुले आणि स्त्रीशिक्षण : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने** | 37-39 |
| 11 | राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक विचार- एक अभ्यास<br>**डॉ. एन. व्ही. होदलूरकर** | 40-45 |
| 12 | डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा परामर्श<br>**डॉ.जाधव मीनाक्षी भास्कर** | 46-49 |
| 13 | राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य<br>**प्रा.डॉ. श्रद्धानंद बा. माने, डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे** | 50-52 |
| 14 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार : एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. अनंत नरवडे** | 53-56 |
| 15 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'नदी जोड' संकल्पना व जलनिती आणि आजचे वास्तव् एक भौगोलिक दृष्टिकोन<br>**प्रा. कळसकर मनिषा पद्यमाकर** | 57-61 |
| 16 | महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचारांचे विश्लेषनात्मक अध्यन<br>**Dr. Subhash Taterao Pandit** | 62-65 |

| | | |
|---|---|---|
| 17 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दलित कवितेवरील प्रभाव<br>**प्रा.दुर्गा शरद भिसे.** | 66-70 |
| **18** | सशक्त समाज निर्मितीसाठी राजर्षी शाहू महारांजाचे कार्य<br>**प्रा.डॉ.पडवळ व्ही.के.** | 71-73 |
| **19** | महिला सक्षमीकरण या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य :१४ एप्रिल १८९१ — १९५६<br>**प्रा.गुट्टे शिवकांता वैजनाथ** | 74-76 |
| **20** | राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे** | 77-78 |
| 21 | महात्मा फुले,छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार:<br>**प्रा.कविता किसनराव काटे** | 79-84 |
| 22 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सबलीकरण विषयक दृष्टिकोन - एक नवा दृष्टिक्षेप<br>**डॉ. संतोष बाबरे** | 85-88 |
| 23 | महात्मा ज्योतिबा फुले : स्त्रियांचे उद्धारक<br>**डॉ. वर्षा तात्यासाहेब सरवदे** | 89-91 |
| 24 | महात्मा ज्योतिबा फुले समाज क्रांतीचे जनक<br>डॉ. नामानंद गौतम साठे | 92-94 |
| 25 | **डॉ.बाबासाहेब दलित आंबेडकरांचे साहित्याला योगदान**<br>दर्शना आर .चावडा | 95-97 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही . एक चिंतन<br>**प्रा. बैनवाड स्वाती प्रकाशराव** | 98-99 |
| 27 | महात्मा ज्योतिबा फुले - सत्यशोधक चळवळ एक सामाजिक क्रांती<br>**डॉ सुभाष लक्ष्मण म्हात्रे** | 100-102 |
| 28 | महात्मा फुलेंचे शेतीविषयक विचार<br>**डॉ. आढाव अनिता सदाशिव** | 103-107 |
| 29 | समाजक्रांतीचे जनक : महात्मा ज्योतिराव फुले<br>**डॉ के एस खैरनार** | 108-110 |
| 30 | भारतीय संविधाना समोरील आव्हाने व उपाय<br>**डॉ कुंदा बाळासाहेब कवडे** | 111-116 |
| 31 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार<br>**डॉ.भागवत पांडुरंग ठाकूर** | 117-119 |
| 32 | महार वतन आणि अस्पृश्यांची गुलामगिरी<br>**डॉ .जनार्दन श्रीकांत जाधव** | 120-124 |
| 33 | विचारवंत आणि सुधारक छत्रपती शाहू महाराज<br>**डॉ खाडप संजय बाबुराव** | 125-127 |
| 34 | महात्मा फुले : वाङ्मय आणि कार्य<br>**प्रा डॉ देशमुख बिभीषण** | 128-131 |

| | | |
|---|---|---|
| 35 | विचारवंत आणि सुधारक छत्रपती राजर्षी शाहू महाराज<br>**डॉ.एस.डी. सावंत** | 132-133 |
| 36 | डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रनिर्माणातील एक अभुतपूर्व कार्य— हिंदू कोड बील<br>**प्रा.डॉ. श्रीमती सुनिता कुरुडे** | 134-136 |
| 37 | आंबेडकरवादी विचारधारा दलित विमर्श के संदर्भ में<br>**डॉ दळवे सूर्यकांत माधवराव** | 137-138 |
| 38 | राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार<br>**गोविंद रामराव काळे , प्रा डॉ दीपक एम भारती** | 139-143 |
| 39 | महात्मा फुले यांच्या अखंड मधील पुरोगामी विचार<br>**डॉ लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव** | 144-147 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान<br>**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे** | 148-152 |
| 41 | **महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य**<br>**प्रा डॉ एच टी सातपुते** | 153-155 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार व कार्य : एक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा.डॉ. सुभाष दत्तू हुलपल्ले** | 156-158 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी साहित्याला योगदान<br>**श्री. दयानंद मनोहरराव राठोड** | 159-161 |
| 44 | महात्मा फुले यांचे आर्थिक विचार<br>**डॉ.पांडुरंग नामदेव डापके** | 162-165 |
| 45 | मानव प्रजातियोंका वर्गिकरण के आधार का भौगोलिक विवेचन<br>**डॉ. शेख ए.आय** | 166-167 |
| 46 | उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूप :एक अभ्यास(इ.स.१९९१ते २०११)<br>**प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ** | 168-172 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानवाद<br>**प्रा. अभिमान अरुण ढाणे** | 173-175 |
| 48 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार : एक अभ्यास<br>**प्रा.डॉ.मैंद बालासाहेब वैजनाथ** | 176-180 |
| 49 | महात्मा ज्योतिबा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टीकोन<br>**प्रा. डॉ. महावीर गायकवाड** | 181-183 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे कृषीसंबंधी विचार तथा धोरण.<br>**श्री. शरद बाबुलाल खंडारे** | 184-187 |
| 51 | विचारवंत आणि सुधारक छ. शाहू महाराज<br>**प्रा.विनोद नामदेव साळुंखे** | 188-189 |
| 52 | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यतानिवारण विषयक कार्य<br>**प्रा. डॉ. चौधरी दत्तत्रय मल्हारी** | 190-191 |
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लेखन<br>**प्रा.तुषार भोसले** | 192-194 |

| | | |
|---|---|---|
| 54 | हिन्दी कथा—साहित्य में अम्बेडकर का प्रभाव<br>**डॉ. दत्ता साकोळे** | 195-197 |
| 55 | फुले दांपत्यांची प्रेरणा – सगुणाबाई क्षीरसागर<br>**डॉ दत्तात्रय पांडुरंग खराडे** | 198-201 |

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महिला सक्षमीकरणाविषयक विचार

**प्रा. डॉ.देविदास मल्हारी शेटे**
मराठी विभाग प्रमुख सावित्रीबाई कला महाविद्यालय पिंपळगाव पिसा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.

**प्रस्तावना:-**
डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि कार्य या देशातील शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रियांच्या चळवळीसाठी सदैव प्रेरणादायी आहे. त्यांचे विचार भारतीय समाजव्यवस्थेची पुनर्रचना करनारे आहेत. महिलांच्याच्या बाबतीत त्यांनी मांडलेले विचार आणि हिंदू कोडबिलातील त्यांनी सुचविलेल्या तरतुदी यातून त्यांचा महिलाविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो. महात्मा ज्योतिबा फुलेंनी स्त्रियांच्या नवजीवन बाकांधानीचा पहिला प्रयोग सुरु केला ही गोष्ट सर्वमान्य आहे. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्याच प्रमाणे स्त्रियांचे प्रश्न सामाजिक पुनर्च्रनेसाठी आवश्यक समजून उचलून धरले हे पण महत्त्वाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आधुनिक भारताचे निर्माते आहेत. त्यांनी केवळ अस्पृश्यांसाठी कार्य केले नाही तर भारताचा सर्वांगिण विकास व सामाजिक विकास हा यामागील मूळ हेतू होता .जोपर्यंत देशात सामाजिक विकासाचे चक्र गतीमान होणार नाही, तोपर्यंत देश विकसित होणार नाही. देशातील प्रत्येक नागरिक हा देशाच्या अर्थव्यवस्थेच्या चक्राला गतीमान करणारे साधन आहे. त्याचा वापर केला गेला पाहिजे.मानवी साधन सामग्रीचा वापर सुयोग्य पध्दतीने करावयाचा असेल तर जात आणि धर्माच्या साखळ दंडानी जखडून ठेवलेल्या मानवी साधन सामग्रीला मुक्त केले पाहिजे, धार्मिक-सांस्कृतिक साखळ दंड उद्‌ध्वस्त केले पाहिजे. कायद्यापुढील समानतेच्या सुत्रांची काटेकोर अंमलबजावणी करुन देशाच्या समृध्दतेला गती दिली गेली पाहिजे. सामाजिक समतेबरोबरच संधीची समानता निर्माण केली पाहिजे. केवळ गुणवत्ता असून चालत नाही, संधीची समानताही आणावी लागेल. असा आग्रह धरुन केवळ देशाचा विचार करणाऱ्या आधुनिक नेत्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर अग्रणी होते.

प्राचीन संस्कृतीत स्त्रीला आदिशक्ती, आदितत्व मानले जात होते. मानवी जीवनाचे सातत्य राखणारी स्त्री ही पृथ्वीप्रमाणे सहनशील आणि नदीप्रमाणे सौम्य वाटत होती. समाजाने तिला आदिशक्ती समजून तिचा गौरव केला. पण हळूहळू काळ पालटला. पुरुष सत्ताधारक बनल्यामुळे हिंसक आणि आक्रमक बनला.स्वतः स्वामी होऊन त्याने तिला गुलाम केले.तिला भोग्य केले.चातुर्वर्ण्यासारख्या अनर्थकारी समाजरचना पद्धतीमुळे स्त्रीचे स्थान पार रसातळाला गेले.ज्यानी कधी सूर्योदय पाहिलाच नाही अशा अंधाराची भीती ही वाटत नाही आणि अंधारात राहिल्याची खंत ही जाणवत नाही.भारतीय स्त्रियांच्या नशिबी अशा अंधाराचं जाळ पसरलेलं असताना महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्रीला घराबाहेर काढले, तिला शिक्षण दिले.तसेच ती स्वावलंबी बनावी तिच्या पायावर उभी राहावी म्हणून प्रयत्न केले, त्याच्यानंतरची पुढची पायरी म्हणजे डॉ.आंबेडकर यांनी तिचे कायदेशीर हक्क मिळवून ती स्वावलंबी बनावी तिच्या पायावर उभी राहावी म्हणून प्रयत्न केले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांच्या बाबतीत असलेले हे योगदान प्रकर्षाने जाणवते. सगळं शिक्षण एकीकडे आणि कायद्याचं शिक्षण एकीकडे राहातं, सगळे मुलभूत हक्क एका तराजूमध्ये आणि त्या मुलभूत हक्कांना कायद्याच्या कक्षेत आणून त्याचे पालन करायला सर्व समाजाला भाग पडले

“समाजातील स्त्रीची कितपत प्रगती झाली आहे त्यावरून मी त्या संपूर्ण समाजाच्या प्रगतीचा आलेख ठरवतो” हे बाबासाहेबांचे वाक्य त्यांच्या मनात स्त्रियांबाबत असलेला आदर स्पष्ट करण्यास पुरेसे आहे. १९२८ साली भारतातील महिला कामगारांसाठी मॅटर्निटी बेनिफिट बिल पहिल्यांदा सभेसमोर चर्चेसाठी आणणारे आणि स्त्रियांना बाळंतपणासाठी हक्काची वैद्यकीय राजा मिळाली पाहिजे म्हणून आग्रही असणारे बाबासाहेब हे पहिले सदस्य. त्यांच्या प्रयत्नांमुळे मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट अस्तित्वात आला. नुकतीच २०१७ साली या मॅटर्निटी बेनिफिट ॲक्ट अंतर्गत असलेली १२ आठवड्यांची सुट्टी वाढवून ती मोदी गव्हर्नमेंट ने २६ आठवड्यांची केली. अनेक स्त्रिया ज्या या मॅटर्निटी बेनिफिट च्या लाभार्थी ठरल्या, ठरत आहेत त्या कितीजणींना हे ठावूक आहे की त्याचा पाया बाबासाहेबांनी १९२८ साली घातला होता. १९४२ ते १९४६ मध्ये लेबर मिनिस्टर म्हणून काम करत असताना “Equal pay for

equal work irrespective of sex" ही क्रांतीकारी कल्पना राबवण्याचे श्रेय सुद्धा बाबासाहेबांनाच जाते. याचं प्रतिबिंब सुद्धा आपल्या संविधानात राज्याने पाळावयाची मार्गदर्शक तत्वे मधील आर्टिकल ३९(ड) मध्ये पडलेलं दिसून येईल जिथे राज्यात स्त्री आणि पुरुष यांनी केलेल्या कामाला समान मोबदला मिळावा असे नमूद केलेले आहे. भारतीय स्त्री पुरुषांना असलेला मतदानाचा अधिकार हा मुद्दा कधीकाळी वादाचा आणि अतिसंवेदनशील असू शकतो यावर कदाचित आज विश्वास बसणार नाही. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे कट्टर समर्थक होते. त्यांच्यावर महात्मा गौतम बुद्धाच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रचंड प्रभाव होता. बाबासाहेबांच्या मते बुद्ध हेच स्त्री स्वातंत्र्याचे आद्य पुरस्कर्ते होत. बुद्धाने समानतेचा उपदेश दिला आणि तो अमलातही आणला. स्त्रियांना धर्मदीक्षेचा अधिकार देणारा बौद्ध धम्म हा मानवी इतिहासातला पहिला धर्म होय. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि अभ्यासक डॉक्टर रूपा कुलकर्णी-बोधी यांच्या मते, 'भारतीय स्त्रीमुक्तीची खरी वैचारिक बैठक भगवान बुद्धाच्या भक्कम अशा समतावादी तत्त्वज्ञानाच्या पायावर उभी आहे, बाहेरून आयात केलेल्या एखाद्या जेंडर बेस्ड विचारावर नाही! आणि कायद्याएवढेच बाबासाहेबांचे महत्त्वाचे योगदान म्हणजे त्यांनी दिलेली ही शुद्ध भारतीय बैठक!'

बाबासाहेबांच्या मते कोणत्याही समाजाचे मूल्यमापन त्या समाजातल्या स्त्रियांची परिस्थिती कशी आहे, यावरून करता येते.समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रित करणे आवश्यक असल्याची त्यांची आग्रही भूमिका होती. ही समग्र प्रगती केवळ पुरुषांचीच नव्हे, तर स्त्रियांचीदेखील होणे गरजेचे आहे, हे भान त्यांना विद्यार्थिदशेतच आले होते. ते स्त्री शिक्षणाचे कट्टर पुरस्कर्ते होते. प्रत्येकाने आपल्या घरातल्या मुलीला शिक्षणाची संधी दिली तर हा विचार समाजात सर्वत्र पसरेल. समाजाची प्रगती होण्यासाठी शिक्षणाचा प्रसार व्हायला हवा, असे त्यांचे ठाम मत होते. शिक्षणामुळे मुली बिघडतात, हा विचार सर्वांनी मनातून काढून टाकला पाहिजे. आईवडिलांनी बालपणापासूनच मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. भारतीय समाज व्यवस्थेत घट्ट रुजलेली विषमता नष्ट करण्यासाठी झटणाऱ्या बाबासाहेबांना स्त्रियांवर होणारे अन्याय- अत्याचार अस्वस्थ करत होते. पितृसत्ताक संस्कृतीचा पगडाही लक्षात येत होता. स्त्रियांचे त्यांच्या मनाविरुद्ध झालेले विवाह आणि लादली जाणारी बाळंतपणे याचाही परिणाम दिसत होता. ही परिस्थिती बदलण्याचे एकमेव प्रभावी साधन म्हणजे शिक्षण, यावर त्यांचा ठाम विश्वास होता. हा विचार समाजात रुजण्यासाठी त्यांनी आपल्या लेखांतून-व्याख्यानांतून पोटतिडकीने मांडणी केली.

बाबासाहेबांनी १९४७ मध्ये कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव लोकसभेत मांडला. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी काही परस्परपूरक पुरोगामी तत्त्वे समाविष्ट करण्याचे त्यांचे हे क्रांतिकारी पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नसंबंधातली स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांना काडीमोड घेण्याचा अधिकार, वारसाहक्काचे लाभ स्त्रियांनाही देण्याची तरतूद या तत्त्वांचा यात समावेश होता. बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायाचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाच्या वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक होते. दुर्दैवाने या विधेयकाला लोकसभेत प्रचंड विरोध झाला. या विधेयकाला प्रारंभी पंडित नेहरूंचा पाठिंबा होता; पण काँग्रेसमधल्या सनातनी मंडळींचा टोकाचा विरोध आणि येऊ घातलेल्या निवडणुकांमुळे नेहरूंना प्रतिगामी शक्तींसमोर हार पत्करावी लागली. बाबासाहेबांना याचा खूप त्रास झाला. शेवटी या मुद्द्यावरून त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा त्याग केला. हिंदू कोड बिलाचे काम संविधान निर्मितीएवढेच महत्त्वाचे होते, असे ते सांगत बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जून सहभागी करून घेतले. १९२७ चा महाडचा चवदार तळयाचा सत्याग्रह, १९३० चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह व १९४२ च्या नागपुरातल्या महिला परिषदेत स्त्रिया मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. संविधानात आर्थिक प्रश्नांवर समान अधिकाराची तत्त्वे समाविष्ट करून अपेक्षित परिणाम होणार नाही, तर त्यासाठी हिंदू संहितेमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे, असे त्यांचे मत होते. जातीय अन्याय आणि स्त्रियांवर होणारे अन्याय यांमागची मूळ कारणे एकमेकांमध्ये गुंतलेली आहेत, याविषयी बाबासाहेब ठाम होते. घटनेला समांतर अशी परिपूर्ण हिंदू संहिता असावी, अशी त्यांची इच्छा होती; पण तसे होऊ शकले नाही. ज्या मतदानाच्या अधिकारासाठी युरोपमधल्या स्त्रियांना संघर्ष करावा लागला तो अधिकार भारतीय स्त्रियांना न मागताच बाबासाहेबांनी दिला. त्यांनी कुटुंबाचे योग्य नियोजन स्त्रियांशीच निगडित असल्याची स्पष्ट भूमिका घेतलेली दिसते.

स्त्रियांना जे कायदेमंडळ अधिकार देत नाही त्या कायदेमंडळातील पद लाथाडून स्वत:च्या तत्वांसाठी स्वत:च्या पदाचा राजीनामा देण्याचा तत्वानिष्ठ्पणा दाखवणाऱ्या अत्यंत दुर्मिळ लोकात बाबासाहेबांचा समावेश करावा लागेल.

या घटनेनंतर तब्बल ४ वर्षानी १९५५-५६ साली नेहरूंच्या नेतृत्वाखालील कायदेमंडळाने

१. हिंदू विवाह कायदा.

२. हिंदू वारसाहक्क कायदा

३. हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा

४. हिंदू दत्तकविधान व पोटगीविषयक कायदा

असे चार कायदे संमत केले ज्याच्यामध्ये बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलातील तरतुदींचा सामावेश केला गेला. कुणी कबुल करो अथवा नाकबूल या कायद्यांपासून हिंदू समाजामध्ये आमुलाग्र परिवर्तन झालेले आहे. स्त्रियांना खऱ्या अर्थाने मुक्त करणारा, तिच्या पंखाना बळ देणारा कायदा म्हणून या कायद्यांकडे पाहता येईल. यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संविधानातील आर्टिकल १४, १५, १७, १८, १९, २१ नुसार स्त्रियांना हक्क मिळवून देणारे अनेक कायदे पास करण्यात आलेले आहेत. अजूनही होत आहेत. आजची स्त्री सुशिक्षित आहे, स्वतंत्र आहे, कमावती आहे याचे श्रेय फुले दांपत्याना जसे जाते तसेच आजची स्त्री स्वत:च्या हक्काबद्दल सजग आहे, जागरूक आहे, तिला तिचे अधिकार ठावूक आहेत, तिच्या हक्कांसाठी तिला लढता येते, तिला सामाजिक, राजकीय stand घेता येतो, तिच्याविरुद्ध झालेल्या अन्यायाविरुद्ध तिला दाद मागता येते या अनेक गोष्टींचे श्रेय आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते.

हक्काचा संकोच करता येणार डॉ.बाबासाहेबांनी महिलांसाठी संविधानात केलेल्या तरतुदी महत्त्वपूर्ण कायदे व योजना: यामध्ये

१) कायद्याने समानता व समान संरक्षण २) केवळ धर्म, वंश ,जात, लिंग यावरून सार्वजनिक स्थाने व जागा यांचा वापर करण्यास कुठल्याही भारतीय नागरिकाला उत्तर भारतीय नागरि काशी असा भेदभाव करता येणार नाही. ३) राज्य शासन महिला व बालकांसाठी विशेष तरतुदी करू शकते. ४) सेवा योजना, पदनियुक्ती, नोकरी यामध्ये धर्म, वंश, जात, लिंग यावरून भेदभाव करता येणार नाही. महिला व मुलींना समान संधी. ५) महिला व पुरुषांना बरोबर असलेली अस्पृश्यता नष्ट करण्यात आलेली आहे. ६) भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, संघटना बनवण्याचे स्वातंत्र्य, भारताच्या कुठल्याही क्षेत्रात मुक्तपणे संचार करण्याचे राहण्याचे व स्थानिक होण्याचे स्वातंत्र्य, कोणताही पेशा आचरण्याचे, कोणताही व्यवसाय व्यापार किंवा धंदा चालविण्याचा हक्क असेल.७) कायद्याच्या प्रक्रियेशिवाय व्यक्तीच्या जीवित व स्वातंत्र्याच्या नाही. ८) ६ ते १४ वर्षातील मुलांना शिक्षणाचा अधिकार.९) शोषणाविरुद्ध अधिकार, मानवाचा व्यापारी अथवा वेठबिगारीस प्रतिबंध.१०) सद्सद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण आचरण व प्रचार.११) धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याची स्वातंत्र्य.१२) स्त्री पुरुष दोघांना समान वेतन. १३) कामाच्या ठिकाणी न्याय व सुरक्षितता आणि प्रसूती सहाय्य देण्याची सोय.१४) स्त्रियांच्या प्रतिमेला हानी पोचविणाऱ्या प्रथा बंद करणे.

१५ ) निवडणूक लढविण्याचा अधिकार

१६) शासन प्रशासनात कोणतेही पद भूषविणारेचा अधिकार

१७) संपत्ती विकत घेण्याचा बाळगण्याचा वडील आणि पतीच्या संपत्तीत वाटा

या संविधानातील तरतुदीच्या अंमलबजावणी करता विविध कायदे यांची तरतूद त्यांनी संविधानात केली.यामध्ये

१) विवाह संबंधी कायदे:हिंदू विवाह कायदा, हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा , आनंद विवाह कायदा , आर्य विवाह कायदा, मुस्लिम विवाह कायदा, मुस्लिम स्त्री घटस्फोट हक्क व संरक्षण कायदा , ख्रिस्ती विवाह कायदा , विशेष विवाह कायदा , धर्मांतरित व्यक्ती विवाह कायदा,हिंदू दत्तक व निर्वाह कायदा.

२) मालमत्ता संबंधी कायदे:हिंदू उत्तराधिकारी कायदा विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा हिंदू वारसा हक्क मालमत्तेत समान वाटप कायदा, ख्रिश्चन, पारसी, मुस्लिम स्त्रियांना त्यांच्या मालमत्तेत व वारसा हक्कात स्थान.

३) फौजदारी कायदे:महिलांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंधक कायदा, अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक कायदा, वैद्यकीय गर्भपात कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, बालविवाह निर्बंध कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, महाराष्ट्र नरबळी अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा, गर्भधारणा पूर्ण आणि जन्मपूर्व निदान तंत्र कायदा,मानवी मैला वाहतूक प्रतिबंध कायदा.

४) कामगार स्त्रियांचे अधिकाराविषयी: ,मातृत्व लाभ संबंधीचा कायदा, कारखाने कायदा किंवा वेतन कायदा, वेठबिगार प्रथा प्रतिबंधक कायदा, कामगारांसाठी नुकसान भरपाई कायदा, समान वेतन कायदा, नोकरीच्या ठिकाणी लैंगिक छळापासून महिलांचे संरक्षण विधेयक. यामध्ये शासनाच्या ५५ पेक्षा अधिक योजना आहेत.

याशिवाय महिला शिक्षण आणि कुटुंब नियोजनआणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने कुटुंब नियोजन विचार अतिशय प्रकर्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहेत तसेच मानवी हक्कापासून वंचित असलेल्या महिलांना घटनात्मक आणि कायदे बनविण्याचे अधिकार प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आहे.

महिला स्वावलंबनच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक स्वायत्तता असेल तर महिला स्वावलंबी होऊ शकते महिलेचा आत्मविश्वास वाढतो आत्मबल वाढते आणि साधक-बाधक विचार करण्यास महिला प्रवृत्त होतात आणि यामुळे कुटुंबाच्या प्रगती बरोबर देशाच्या प्रगतीचा मार्ग खुला होतो असा दृष्टिकोन बाबासाहेबांचा होता.थोडक्यात महिलांनी शिक्षित व्हावे स्त्री- पुरुष समानता यावी स्त्रियांना समान न्याय व समतेची वागणूक मिळावी तिला स्वाभिमानाने व सन्मानाने जगता यावे यासाठी डॉ. आंबेडकरांनी घटनेत महिलांना अनेक अधिकार बहाल केले आहेत. स्त्रियांना माणूस म्हणून वागणूक दिली जावी हाच मूळ उद्देश हिंदू कोड बिलाचा होता हे बिल एक वादळ निर्माण करून गेले अज्ञानामुळे महिलांनीच याला विरोध केला हा इतिहास आहे. बाबासाहेबांना यासाठी खूप मानसिक यातनतून जावे लागले. समाजव्यवस्थेतील बदल घडवून आणण्याचे तसेच पुरुष प्रवृत्तीला सरळ करण्याचे सामर्थ्य व अन्याय निवारण याकरता आज 'महिला हिंसाचार विरुद्ध कायदा' २००५, 'राष्ट्रीय व राज्य महिला आयोग' उदयास आलेले आहे. महिलांना वारसाहक्क, पोटगी, घटस्फोट, दत्तक पालकत्व हे सर्व फक्त हिंदू कोड बिलातून घटनेत आलेले आहे. नवे पंचायत राज ७३ वे संशोधन हेही हिंदू कोड बिलाचे व घटनेते महिलांना दिलेल्या अधिकाराचे वास्तव रूप आहे. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्यामुळे आज कितीतरी महिलांची आर्थिक, सामाजिक, वैचारिक, राजकीय परिवर्तन झाले.भारतीय महिला अंतराळात गेली, वैमानिक,मंत्री, वकील, डॉक्टर झाली. दलित, आदिवासी ओबीसी अशा सर्व महिलांना त्यांनी घटनेत अधिकार दिले. म्हणूनच त्या प्रत्येक पदावर विराजमान आहेत.त्यांना आज मान आहे. महिलांच्या सहभागाशिवाय आज काहीच होत नाही. प्रत्येक कामगार महिलांचा वाटा लाखमोलाचा असतो, नव्हे कायद्यात अशी तरतूद आहे.डॉ.बाबासाहेबांच्या या सर्व प्रयत्नांमुळे आज आपल्याला सर्वच क्षेत्रात महिलांनी नेत्रदीपक प्रगती केल्याचे आढळून येते. सरपंच पदापासून तर राष्ट्रपती पदापर्यंत तसेच कुटुंबाच्या व्यवस्थापनापासून तर नामांकित कंपनीच्या व्यवस्थापनाची सूत्रे आज महिलांच्या हातात आहे. महिलांच्या या सक्षमीकरणासाठी डॉ.बाबासाहेबांचे योगदान अतिशय महत्त्वपूर्ण ठरले आहे.

स्त्रियांनी आपले हक्क मिळवण्यासाठी पुढे यायला हवे, हा विचार आंबेडकरांनी मांडला. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. त्यासाठी ती बाबासाहेबांची सदैव ऋणी असायला हवी. पण दुर्दैवाने बहुजन समाजातल्या स्त्रिया बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत की याबाबत जाणून घ्यायला तयार नाहीत हे सांगणे कठीण वाटते. काही अभ्यासक व चळवळीतल्या उच्चवर्णीय आणि दलित स्त्रियांनीच बाबासाहेबांच्या योगदानाची दखल घेतली असल्याचे दिसून येते. बाबासाहेबांनी केवळ दलित स्त्रियांचा विचार केलेला नसून समस्त स्त्रीवर्गाचे प्रश्न ऐरणीवर आणले.हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून सर्व स्त्रियांचे कल्याण होणार होते. हिंदू कोड बिलात सुचवलेल्या उपाययोजना पुढे कायद्याच्या रूपाने अमलात आल्या त्याचा लाभ सर्वास झाला यात शंका नाही.


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताला महासत्ता बनवण्यासाठी वैचारिक योगदान- डॉ. डी. डी. पाटील, प्रा.एम.बी. हांडे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड- १८ भाग -१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र.

३) मीनाक्षी मून- फुले ,आंबेडकरी स्त्रीचळवळ.

४) "भारतीय संविधान" देशमुख बी.टी.पिंपळापुर प्रकाशन नागपूर, 2000

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर-धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई 2002

# डॉ. भीम राव अम्बेडकर के विचारो की वर्तमान समय में प्रसांगिकता

**सरताज सिंह**
छात्र- एम.ए- द्वितीय वर्ष, राजनीति विज्ञान विभाग, पंजाब यूनिवर्सिटी, चंडीगढ़
ईमेल- singhsartaj485@gmail.com

**शोध पत्र का सार-:**
इस शोध पत्र में भारतीय संविधान के मुख्य निर्माता डॉ. बी आर अम्बेडकर के मुख्य विचारो का का पूर्ण रूप से वर्णन किया है। डॉ. बी आर अम्बेडकर हमेशा से समाज कल्याण की बात करते थे। इसके साथ ही उन्होंने समाज में दलित वर्ग के उत्थान के लिए काफी ज्यादा कार्य किया ताकि आने वाले समय के अंदर समाज में समानता स्थापित हो सके। डॉ. बी आर अम्बेडकर के द्वारा समाज के हर वर्ग के विकास पर बल दिया ताकि देश के अंदर सभी नागरिको का एक समान विकास हो पाए। इन्होने समाज में महिलाओ को आगे लाने के लिए भी अपना पक्ष व विचारधारा समाज के समक्ष रखी। ताकि आने वाले समय के अंदर समाज में महिलाओ को पुरुषो के समान दर्जा मिल सके और महिलाए सशक्त होकर भारत के विकास में अपना योगदान दे सके। डॉ. बी.आर अम्बेडकर के द्वारा यह अनुभव किया कि समाज में मजदूर वर्ग का काफी ज्यादा शोषण हो रहा है। इसलिए उन्होंने मजदूर वर्ग के हितो में भी कार्य करने का प्रयास किया ताकि भारत में किसी भी मजदूर का शोषण न हो सके। इस तरह से डॉ. बी.आर अम्बेडकर की सोच काफी ज्यादा सकारात्मक व विकास वाली थी। जिस कारण से उन्होंने भारत के संविधान निर्माण के समय पूरे भारत के समाज के हितो को ध्यान में रखते हुए कानूनों का निर्माण किया ताकि भारत का निरंतर व एक समान विकास हो सके। इस शोध पत्र में मैंने डॉ. बी आर अम्बेडकर के मुख्य विचारो की वर्तमान समय में प्रसांगिकता को बताने का प्रयास किया है।

**कुंजी शब्द-:** सामाजिक समानता, महिला सशक्तिकरण, शिक्षा, मौलिक अधिकार व कर्तव्य, श्रमिक वर्ग

**"मैं उस धर्म को पसंद करता हूँ जो स्वतंत्रता, समानता और भाईचारे की भावना सिखाता है"**

**-डॉ. भीम राव अम्बेडकर**

हम सभी एक लोकतांत्रिक देश में रहते है। लोकतांत्रिक देश में सारे कानून संविधान के द्वारा दिए गए दिशा निर्देशों के आधार पर लागू किए जाते है। इसी कारण से भारत का लोकतंत्र संसार में सफल है। क्योंकि यहाँ पर सरकारों के द्वारा भारतीय संविधान के अनुसार कार्य किया जाता है। इस महान व विस्तृत संविधान का निर्माण डॉ. भीम राव अम्बेडकर के द्वारा किया गया था। डॉ. भीम राव अम्बेडकर का जन्म 14 अप्रैल 1891 में एक साधारण परिवार में हुआ था। अम्बेडकर जी ने बचपन से लेकर जब से शिक्षा प्राप्त करनी शुरू की थी तब से कई सामाजिक बुराइयों जैसे समाज में ऊँच- नीच, छुआछूत आदि सामाजिक बुराइयों का सामना किया था और काफी ज्यादा संघर्ष करने के बाद उन्होने शिक्षा प्राप्त की थी। 29 अगस्त 1947 को एक अधिकारिक पत्र जारी करके अम्बेडकर जी को संविधान सभा की प्रारूप समिति का अध्यक्ष बनाया गया और डॉ. भीम राव अम्बेडकर ने भी भारतीय संविधान के निर्माण में अपना महत्वपूर्ण योगदान दिया था। इस तरह से अम्बेडकर ने भारत के संविधान निर्माता के रूप समाज के हर वर्ग के उत्थान के लिए कानूनों का निर्माण किया। आज वर्तमान समय में अम्बेडकर के विचारो की पूर्ण रूप से प्रसांगिकता बनी हुई है।

**राजनीतिक विचार -:**

भारतीय संविधान के निर्माण में सबसे महत्वपूर्ण व प्रमुख योगदान डॉ. बी. आर अम्बेडकर का माना जाता है। इन्हें हिंदुस्तान में "आधुनिक भारत का निर्माता" भी कहा जाता है। इनकी राजनीतिक विचारधारा आज भी भारतीय राजनीति में प्रसांगिक है। अम्बेडकर जी एक इस तरह की राजनीतिक

व्यवस्था के पक्ष में थे जिसमे पूरे देश में सभी नागरिको को समान रूप से राजनीतिक अवसर प्रदान किए जाए। किसी भी व्यक्ति के साथ जाति, धर्म व लिंग के आधार पर भेदभाव न हो पाए। अम्बेडकर जी का विचार था कि जब तक देश में से आर्थिक व सामाजिक विषमता कम नहीं होगी तब तक भारत विशव शक्ति नहीं बन पायेगा और भारतीय लोकतांत्रिक व्यवस्था भी सफल नहीं हो पाएगी। उनका विचार था कि राजनीति में हमे जो व्यक्ति हमे सबसे श्रेष्ठ लगता है उसे ही वोट देकर चुनना चाहिए। क्योंकि जनता के पास वोट का अधिकार है जिसका इस्तेमाल करके जनता अच्छे व नेक नेताओ को चुनकर राजनीति में ला सकती है जो समाज के हितो को ध्यान में रखते हुए ही देश का विकास करेगे। अम्बेडकर जी समाज में नैतिकता की भावना और साथ में सामाजिकता को लाने की बात करते है और ये दोनों तभी आएगी जब राजनीति में अच्छे नेता आएगे और देश का विकास करने में अपना योगदान देगे। परन्तु वर्तमान समय कि राजनीति में नेताओ के द्वारा देशभक्ति, नैतिकता व सामाजिकता के बड़े- बड़े भाषण दिए जाते है और जब वे चुनाव जीत जाते है तो इन बातो पर बिलकुल भी ध्यान नहीं देते है और भ्रष्टाचार करने लगते है। इसलिए अम्बेडकर जी का विचार है कि अच्छे नेताओ को चुनकर राजनीति में लाना चाहिए तभी देश का लोकतंत्र सफल सिद्ध हो पाएगा और देश का विकास हो पाएगा।

**समाज में समानता के प्रति विचार-:**

डॉ. बी. आर अम्बेडकर ने समानता पर काफी ज्यादा बल दिया है। क्योंकि उन्होने अपने जीवन में असमानता को झेला हुआ था।उन्हें समाज में छोटी जाति का मानकर भेदभाव किया जाता था। इसी कारण से संविधान में भी उन्होने समानता पर काफी ज्यादा ध्यान दिया। भारतीय संविधान के "अनुछेद 14 से 18" तक सभी नागरिको को समानता का मौलिक अधिकार दिया गया है। अम्बेडकर जी का विचार था कि समानता का अधिकार सभी को प्राप्त होना चाहिए। किसी भी व्यक्ति के साथ धर्म व जाति के आधार पर भेदभाव नहीं होना चाहिए। क्योंकि देश के सभी नागरिको को अपने विकास के लिए समान अवसर देना हर देश की नैतिक जिम्मेदारी है। अम्बेडकर का मानना है कि आज हम आधुनिकता की और बढ़ते जा रहे है परन्तु आज भी हमारी मानसिकता में जाति, धर्म, ऊँच-नीच व छुआछूत जैसी बुराइया शामिल है। जिस कारण से हम स्वयं को उच्च जाति का समझकर दूसरो को नीच समझने का प्रयास करते है। आज जरूरत इस बात की है कि इस सोच को बदला जाए। क्योंकि हम सभी 21 वी सदी में रहते है। आज हमे इन सब बातो को नकारते हुए सभी को एक समान समझना होगा। तभी देश कि जनता का आपस में प्यार बढ़ेगा और भारत में शांति की व्यवस्था बनी रहेगी। क्योंकि जिस तरह से फसल खेत से व फल पेड़ से होता है। उसी तरह इंसान जन्म से महान नहीं होता है। वह अपनी अच्छी और ऊँची सोच से महान बनता है। हमे इसी सोच को देखना चाहिए। हमे जाति- पाति में ध्यान नहीं देना चाहिए। यह सब सामाजिक बुराइया है जो आज भारतीय समाज में फैली हुई है। आज हमे जरूरत है अम्बेडकर जी के द्वारा बताए गए मार्ग पर चलने की। उनकी विचारधारा को हमे अपने जीवन में आदर्श के रूप में अपनाना चाहिए। ताकि इनकी समानता की विचारधारा सफल हो सके और समाज में जो सभी वर्ग है विशेषकर जो दबे- कुचले वर्ग है जिनमे योग्यता है कुछ करने की उन्हे आगे लाया जा सके।

**आर्थिक विचार-:**

डॉ. बी. आर अम्बेडकर ने आर्थिक व्यवस्था के बारे में यह जानकारी दी है कि भारत में आर्थिक विकास इस तरह से हो रहा है कि यहाँ पर एक तरफ अमीर व्यक्ति तो और अमीर होता चला जा रहा है और दूसरी तरफ गरीब व्यक्ति के पास दो समय का खाना खाने के लिए भी पैसे नहीं है। यह आर्थिक विषमता तभी दूर हो पाएगी जब देश में नीतिया इस तरह की बनेगी जिसमे समाज के हर वर्ग को आगे लाने का प्रयास किया गया हो। अम्बेडकर ने अपनी महत्वपूर्ण पुस्तक "रूपये की समस्या, उदभव और समाधान" में भी भारतीय अर्थव्यस्था को मजबूत करके आगे लाने का वर्णन किया है अम्बेडकर जी के द्वारा सन 1918 में भारतीय कृषि व्यवस्था पर अपना एक शोध पत्र प्रस्तुत किया था। इस शोष पत्र का नाम "Small Holdings in Indian and their Remedies" था। इसमे उन्होने छोटे किसानो की बुरी दशा का वर्णन किया है। वे कहते है कि किसान देश की अर्थव्यस्था की रीढ़ की हड्डी के समान है। इसलिए देश का आर्थिक विकास तभी होगा जब किसान खुशहाल होगा। इसके साथ ही उन्होने एक अन्य शोध पत्र में भी

भारतीय वित्त के विकास का वर्णन किया है। अम्बेडकर का विचार है कि भारत कि आर्थिक दशा को मजबूत करने के लिए सरकारी वित्त व्यवस्था को स्वतंत्रता देनी चाहिए और सभी वर्गों किसानो, मजदूरो,व्यापारियों व नागरिको के हितो के सर्वे के आधार पर आर्थिक नीतियों का निर्माण करना चाहिए और साथ ही जनता को भी अपना कर्तव्य समझते हुए देश के विकास के लिए समय पर टैक्स भरना चाहिए। तभी अम्बेडकर की आर्थिक विचारधारा से भारत विशव में आर्थिक रूप से आत्म-निर्भर बन पाएगा।

**सामाजिक विचार-:**

डॉ. बी. आर अम्बेडकर ने अपना सारा जीवन भारत में सामाजिक सुधार व बुराइयों को खत्म करने पर लगाया है। अम्बेडकर के द्वारा प्राचीन धर्म- ग्रंथो का अध्यन किया गया था और इसके बाद उन्होने अपने विचारो में यह जानकारी दी है कि समाज में जो वर्ण व्यवस्था प्राचीन समय से चल रही थी उसको आज भी समाज के लोग मान रहे है। वे कहते है कि जाति व्यवस्था को लेकर जो संघर्ष भारत में फैला हुआ है इस तरह का संघर्ष विशव के किसी भी देश में नहीं है। अम्बेडकर के द्वारा इसी सामाजिक विषमता वर्ण-व्यवस्था को देखते हुए संविधान में आरक्षण की व्यवस्था को लागू किया गया। भले ही आज इसका काफी विरोध होता है। परन्तु समाज में गरीबो को नौकरीया दिलाने व अन्य कार्यो के लिए आरक्षण काफी जरूरी भी था। इसलिए आज समाज की जनता को इस बात को ध्यान में रखना चाहिए कि समाज के सभी नागरिक एक समान है और सभी के पास समान अधिकार है जो भारत के संविधान ने नागरिको को दिए हुए है। इसी नई सोच के साथ एक नए भारत जोकि अम्बेडकर के विचारो का भारत होगा इसका निर्माण किया जा सकता है।

**महिलाओं के उत्थान के प्रति विचार-:**

डॉ. बी. आर अम्बेडकर ने प्राचीन भारत में महिलाओ की बुरी दशा को देखा हुआ था। क्योंकि उस समय महिलाओ को घर कि चारदीवारी तक ही सिमित रखा जाता था और न ही महिलाओ को अपनी आवाज उठाने का अवसर दिया जाता था। उन्हें शिक्षा से भी वंचित रखा जाता था। अम्बेडकर का विचार है कि महिलाओ के अच्छे जीवन के लिए शिक्षा काफी ज्यादा महत्वपूर्ण है। वे महिला व पुरुष को हमेशा एक समान मानते थे। इस कारण से जब वे भारत के कानून मंत्री थे तब उस समय उन्होने संसद में "हिन्दू कोड बिल" प्रस्तुत किया था और महिलाओ को न्याय दिलाने के लिए इस बिल में उन्होने कई महत्वपूर्ण बातो को इसमें शामिल किया। परन्तु इस बिल को संसद में पारित होने से रोका गया। इसी समय अम्बेडकर ने अपने पद से इस्तीफा दे दिया। इस बिल में विवाह और आर्थिक व्यवस्था के कानूनों में लिंग की समानता की बात कही गयी थी जोकि आज भी समाज में लागू नहीं हो पाई। आज भी भारत में महिलाओ के साथ भेदभाव, यौन शोषण , पुरुषो की तुलना में महिलाओ को कम वेतन व परिवार और सम्पति में अधिकार नहीं दिया गया है। जोकि महिलाओ के साथ अन्याय है। हमे आज जरूरत है महिलाओ को आगे लाने की। क्योंकि भारत तब तक विशव में पूर्ण रूप से विकसित नहीं हो पाएगा जब तक भारतीय महिलाओ को आगे बढकर कार्य नहीं करने दिया जाएगा। हमे नई सोच के साथ वर्तमान समय में जरूरत इस बात की है कि हम अम्बेडकर के द्वारा बताए गए मार्ग पर चलकर महिलाओ को समाज आगे लाने का प्रयास करे। तभी महिलाओ के साथ पूर्ण रूप से न्याय हो पाएगा।

**शिक्षा के प्रति अम्बेडकर** के **विचार-:**

डॉ . भीम राव अम्बेडकर पढ़ाई के महत्व को अच्छी तरह से समझते थे। क्योंकि उन्होने जिस समय शिक्षा ग्रहण की थी। उस समय उनके साथ काफी ज्यादा भेदभाव होता था। उन्हें छोटी जाति का होने के कारण कक्षा के दरवाजे के बाहर खड़े होकर शिक्षा ग्रहण करनी पड़ती थी। इस कारण से उन्हें शिक्षा ग्रहण करने के लिए काफी संघर्ष करना पड़ा था। परन्तु इसके बावजूद अम्बेडकर का ये विश्वास था कि शिक्षा के द्वारा किसी भी व्यक्ति की सोच को बदला व विकसित किया जा सकता है। उनका विचार था कि व्यक्ति के दिमाग में ही यह बाते है कि वह उच्च जाति का है या दूसरा व्यक्ति छोटी जाति से सम्बंधित है। यह सब बुरी बाते हमारे दिमाग में भरी हुई होती है। परन्तु शिक्षा ग्रहण करने के बाद व्यक्ति सभी को एक समान मानने लगता है। क्योंकि शिक्षा से उसके दिमाग का विकास होता है और समाज के प्रति उसका सोचने का दृष्टिकोण बदल जाता है। अम्बेडकर एक इस तरह के समाज का निर्माण करना चाहते है। जहा पर सभी

नागरिक पढ़े- लिखे हो सभी लोगो में जनकल्याण की भावना हो और समाज में किसी भी व्यक्ति के साथ भेदभाव न हो। इस तरह से अम्बेडकर ने शिक्षा के महत्व पर काफी ज्यादा जोर दिया है। उनका विचार है कि शिक्षा से व्यक्ति का मानसिक विकास तो होता ही है इसके साथ उसके अच्छे चरित्र का निर्माण भी होता है। आज भी ये विचार भारत कि शिक्षा व्यवस्था के लिए आदर्श है। भारतीय संविधान के अनुछेद- 21 A में शिक्षा के अधिकार का स्पष्ट रूप से वर्णन किया गया है।

**अधिकारों व कर्तव्यों के प्रति अम्बेडकर के विचार-:**

डॉ. भीम राव अम्बेडकर अधिकारों व कर्तव्यों दोनों को काफी ज्यादा महत्व देते है। उनका मानना है कि ये दोनों आपस में एक दूसरे के साथ जुड़े हुए है। उनका विचार है कि देश के सभी नागरिको को जो भारत के संविधान के द्वारा अनुछेद 12-35 तक जो मौलिक अधिकार दिए गये है। उनका लाभ लेना चाहिए। क्योंकि वे हमारे अधिकार है और कोई व्यक्ति उन अधिकारों को हमसे छीन नहीं सकता है। परन्तु हमे अपने अधिकारों का प्रयोग एक सीमा तक करना चाहिए। हमे अपने अधिकारों का गलत इस्तेमाल नहीं करना चाहिए। क्योंकि इससे देश के सम्मान को नुकसान हो सकता है। इस तरह से हमारे देश के प्रति कुछ महत्वपूर्ण कर्तव्य भी बनते है। क्योंकि अकसर हम बात अपने अधिकारों की करते है। परन्तु जब कर्तव्यों कि बात आती है तो हम उन्हे पूरा करने में पीछे हटने लगते है। भारत के संविधान के अंदर भाग-4 A में 11 मौलिक कर्तव्यों का वर्णन किया गया है। हमे उनका सम्मान करते हुए पालन करना चाहिए। मौलिक अधिकार व कर्तव्य परिवर्तनशील है। संविधान के अनुछेद 368 के अंतर्गत संसद बिल पास करके इसमें बदलाव कर सकती है। आज के समय में भी बी. आर अम्बेडकर के द्वारा बनाए गए अधिकारों और कर्तव्यों की पूर्ण रूप से प्रसांगिकता है। अगर हमे इस तरह लगे कि हमारे मौलिक अधिकारों का हनन हो रहा है या उलंघन हो रहा है तो हम न्यायालय की शरण ले सकते है। इस तरह से डॉ. बी.आर अम्बेडकर ने अधिकारों व कर्तव्यों की जानकरी भारतीय संविधान में बड़े ही स्पष्ट रूप से दी है। उन्होने ये अधिकार भारत के सभी नागरिको को प्रदान किए है किसी के साथ इसमें जाति- धर्म के आधार पर भेदभाव नहीं होता है।

**मजदूर वर्ग के कल्याण के लिए विचार-:**

डॉ. भीम राव अम्बेडकर ने समाज के सभी वर्गों के कल्याण का प्रयास किया है। प्राचीन समय में मजदूरो को 12 से 14 घंटे तक काम करना होता था। अम्बेडकर जी के द्वारा कार्य करने के घंटो की सीमा कम करवा दी गयी। अब मजदूरो को सिर्फ 8 घंटे ही कार्य करना पड़ता है। अम्बेडकर के द्वारा मजदूरो के लिए इंडियन ट्रेड यूनियन एक्ट, औद्योगिक विवाद एक्ट बनवाया गया था। ताकि मजदूरो के साथ शोषण न हो पाए। इन्होने संविधान के अंदर अनुछेद 23 व 24 में शोषण के विरुद्ध अधिकार को शामिल किया है। ताकि किसी भी मजदूर या कर्मचारी का शोषण न हो पाए। इससे यह सिद्ध हो जाता है कि भीम राव अम्बेडकर के द्वारा समाज के हर वर्ग के कल्याण के लिए कार्य किए गए है। ताकि समाज में सभी वर्गों का विकास समान रूप से हो सके। भेदभाव को समाप्त करने का इन्होने काफी ज्यादा प्रयास किया है। आज के समय में भी मजदूर वर्ग के लोग अम्बेडकर को अपना आदर्श मानते है। इस तरह से अम्बेडकर के द्वारा समाज के हर वर्ग के कल्याण पर जोर दिया गया है।

**निष्कर्ष-:**

अंत में निष्कर्ष के रूप में यह कहा जा सकता है कि भारत के महान व्यक्तित्व व संविधान निर्माता डॉ भीम राव अम्बेडकर के द्वारा जो हमे विचारधाराए बताई गई है हमे इनका पालन करना चाहिए। हमे गुरु ग्रंथ साहिब जी में दिए गए उपदेश "(अवल अल्लाह नूर उपाया, कुदरत के सब बन्दे)" अथार्थ ईश्वर के द्वारा सभी एक जैसे नागरिको को धरती पर भेजा गया है। इसलिए हमे किसी भी व्यक्ति के साथ जाति के आधार पर भेदभाव नहीं करना चाहिए। क्योंकि इंसान एक ही है। जिसको ईश्वर ने बनाया है यह तो हमारी सोच है कि वह बड़ी जाति से है और वह छोटी जाति से है। इस तरह की बातो को हमे नकारना चाहिए और सभी के साथ मिल जुल कर रहना चाहिए। हमे अम्बेडकर के बताए गए मार्ग पर चलकर भारत से जाति व्यवस्था को खत्म कर सकते है और इस वर्ष अम्बेडकर जी की 130 वी जयंती हम मना रहा है। इस अवसर पर हमे यह प्रण लेना चाहिए कि हम भारत के सभी नागरिको को समान दृष्टिकोण से देखेगे। किसी के साथ भी जाति के आधार पर भेदभाव नहीं करेगे और साथ ही अन्य लोगो को भी ऐसा करने के लिए जागरूक

करेगे। तभी एक नए व सशक्त भारत का निर्माण हो पाएगा और भारत विशव शक्ति के रूप में उभर कर सामने आएगा।

**संदर्भ-:**


1. वर्षा के व डी. वेजहाववेथान, शोध पत्र, इंटरनेशनल जर्नल आफ प्योर एंड एप्लाइड मैथमेटिक्स, Vol 120 (No. 5), 2018, “A STUDY ON VIEW OF DR.BABASAHEB AMBEDKAR IN FORMATION OF MODERN INDIA” https://acadpubl.eu/hub/2018-120-5/5/418.pdf
2. अशरफ व संतोषी, शोध पत्र, इंटरनेशनल जर्नल ऑफ़ ह्यूमैनिटीस एंड सोशल साइंस इनोवेशन, Vol 4,
1. (Issue 1), जनवरी 2015, “Social and Political Ideas of Ambedkar”
2. http://www.ijhssi.org/papers/v4(1)/Version-1/B041010305.pdf
3. जेफ़रलोट, वर्किंग पेपर सीरीज, इंडियन इंस्टिट्यूट ऑफ़ दलित स्टडीज, Vol 3, (No. 4), 2009,
4. “Dr. Ambedkar Strategies Against Untouchbility And The Caste System”
5. http://www.dalitstudies.org.in/wp/0904.pdf
3. डॉ. अनीता, शोध पत्र, इंटरनेशनल जर्नल ऑफ़ इनोवेटिव साइंस एंड रिसर्च टेक्नोलॉजी, Vol 2,
6. (Issue 8), अगस्त, 2017, “Dr. Ambedkar’s View and Its Relevance in Present India”
7. https://ijisrt.com/wp-content/uploads/2017/08/Dr.-Ambedkar’s-View-and-Its-Relevance-in-Present-India-1.pdf
4. परमिंदर कौर, शोध पत्र, इंटरनेशनल जर्नल ऑफ़ रिसर्च एंड ऐनालिटीकल रिव्यु, Vol-5 , Issue-4,
8. अक्तूबर- दिसम्बर 2018, “Dr. Ambedkar and Socio-Economic Democracy”
9. http://ijrar.com/upload_issue/ijrar_issue_20542430.pdf
5. साहादेव, रमेश, रामचंद्रा व वेंकटएश्वर्लू, शोध पत्र, इंटरनेशनल रिसर्च जर्नल ऑफ़ सोशल साइंस, Vol-4(11, नवम्बर 2015, “The Role of Dr. B. R. Ambedkar in Modern India-A study”
10. http://www.isca.in/IJSS/Archive/v4/i11/4.ISCA-IRJSS-2015-253.pdf
11. 7.एस.के हबीब, शोध पत्र, IJTSRD,Vol- 2,(2018), “Dr. B.R Ambedkaras a Visionary Educationist”
12. https://www.ijtsrd.com/papers/ijtsrd10714.pdf

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# छत्रपति शाहू महराज का सामाजिक कार्य |

**प्रा. जाधव जे. बी.**
हिंदी विभागध्यक्ष, छत्रपति शिवाजी महाविद्यालय, कलम जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना :-**

छत्रपति शाहू महाराज सच्चे प्रजातंत्रवादी, समाजसुधारक, विचारक, समाजसेवी तथा दलित और शोषक वर्ग के उद्धारक थे | दलितों की दशा में बदलाव लाने के लिए उन्होने अनेक प्रथाओं का अंत करने का प्रयास किया | विशेषकर छत्रपति शाहू महाराज ने युगो से चली "बलुतदारी" प्रथा का अंत किया। बलूतेदारी प्रथा के साथ उन्होने कानून बनाकर राज्यं की पुरानी प्रथा 'वतनदारी' का अंत किया तथा भूमि सुधार लागू कर दलितो को भू-स्वामी बनने का हक्क् दिया । छत्रपति शाहू महाराज ने सन 1902 में आरक्षण की व्यवस्था अपने कोल्हापूर के अंतर्गत शासन-प्रशासन के 50 प्रतिशत पद पिछडी जातियों के लिए आरक्षित कर दिये । उन्होने दलित वर्ग के बच्चों को मुफ्त शिक्षा प्रदान करने की प्रक्रिया शुरु की । गरीब छात्रों को शरण प्रदान करने के आदेश दिए। छत्रपति शाहू महाराज के शासन के दौरान 'बालविवाह' पर प्रतिबंध लगाया गया। शाहू महाराज ने अंतरजातिय विवाह और विधवा पुनर्विवाह के पक्ष में समर्थन किया।

छत्रपति शाहू महाराज समाज के सभी स्तरो के बीच समानता का एक मजबूत समर्थक था, और ब्राम्हण को कोई विशेष दर्जा देने से इनकार कर दिया। उन्होने ब्राम्हण को रॉयल धार्मिक सलाहकारो के पद से हटा दिया। और जब उन्होने गैर ब्राम्हणो के लिए धार्मिक संस्कार करने से इंकार कर दिया। उन्होनें पद में एक युवा मराठा विद्वान नियुक्त् किया। छत्रपित शाहू महारज ने जाति अलगाव और अस्पृश्यता की अवधारणा को खत्म करने के लिए सरकारी नौकरियों में आरक्षण प्रणाली शुरु की। उन्होने समाज के हर सदस्य़ के बराबर और अछूतो की कुएं और तालाबों के साथ-साथ स्कूलो और अस्पतालों जैसे जगाहो का समान उपयोग के लिए समानता प्रदान करने का काम छत्रपति शाहू महाराज ने किया। उस समय ऐसा करने वाले वे पहले समाजशास्त्री और मानवतावादी सच्चे अर्थो में छत्रपति राजर्षि थे। राजर्षि शाहू महाराज मराठा के भोसले राजवंश के (26जून,1874 – 6 मई 1922) राजा उनका शासनकाल (1894- 1922) उन्हे एक वास्त्विक लोकतांत्रिक और सामाजिक सुधारक माना जाता है। कोल्हापूर की रियासत राज्य् के पहले महाराज, वह महाराष्ट्र के इतिहास में एक अमूल्य् मणि था। सामाजिक सुधारक ज्योतिराव फुले से शाहू महाराज प्रभावित थे।

**छत्रपति शाहू महाराज के वेदोकता विवाद और कार्य :-**

शाहू महाराज समाज के सभी वर्गो मे समानता के पक्षधर थे, और ब्राम्हणों को कोई विशेष दर्जा देने से इनकार करते थे। उन्होने ब्राम्हण् को रॉयल धार्मिक सलाह्कारों के पद से हटा दिया जब उन्होने गैर-ब्राम्हणों के लिए धार्मिक संस्कार करने से इनकार कर दिया। शाहू महाराज ने एक युवा मराठा विद्वान को इस पद पर नियुक्त् किया और उन्हे 'क्षत्र जगदगुरु' (क्षत्रियों का विश्व् शिक्षक) की उपाधि प्रदान की। इस घटना ने शाहू महाराज के गैर-ब्राम्हणों को वेदों को पढने और सुनने के प्रोत्साहन के कारण महाराष्ट्र में वेदोक्त् विवाद को जन्म् दिया। इस विवाद ने समाज के कुलीन वर्ग के विरोध और उनके शासन के लिए शातिर विरोध का तुफान लाया। उनका मानना था कि राज्य् के विकास के लिए सभी वर्ग के लोगो की सहभागिता समान रुप से जरुरी है। इस कारण उन्होने आपने शासन में सभी ब्राम्हणो को हटाकर बहुजन समाज को स्थान दिलाने का काम किया।

**बलुतेदारी तथा वतनदारी प्रथा को बंद किया :-**

छत्रपति शाहू महाराज का प्रारंभिक शिक्षा के बाद आगे की पढाई रजवाडे में एक अँग्रेजी शिक्षक 'स्टुअर्ट मिटफर्ड फ्रेजर' ने दी थी। अंग्रजी शिक्षा का प्रभाव शाहू महाराज के दिलो दिमाग पर गहराई से पडा था। वैज्ञानिक सोच को वह मानते थे बल्कि इसे बढावा देने का हर प्रयास करते थे। पुरानी प्रथा, परम्परा अथवा काल्प्निक बातों को वे महत्त्व् नही देते थे।

दलितों की दशा में बदलाव लाने के लिए उन्होने 1917 मे 'बलूतदारी प्रथा' का अंत किया, जिसके तहत एक अछूत को थोडी सी जमीन देकर बदलें में उससे और उसके परिवार वालो से मुफ्त सेवाएं ली जाती थी । छत्रपति शाहू महाराज ने 1918 में कानून बनाकर राज्य् की एक और पुरानी प्रथा 'वतनदारी' का अंत किया तथा भूमि सुधार लागू कर दलितो को भू-स्वामी बनने का हक्क् दिलाया। इस अदेश से दलितो की आर्थिक गुलामी काफी हद तक दूर हो गई।

**आरक्षण की व्यवस्था :-**

छत्रपति शाहू महाराज ने 1894 में जब राज्य् की बागडोंर सम्भली थी उस समय कोल्हापूर के सामान्य् प्रशासन में कुल 71 पदो में से 60 पर ब्राम्हण् अधिकारी नियुक्त् थे। इसी प्रकार लिपिकीय पद के 500 पदों में से मात्र 10 पद गैर ब्राम्हण् थे। शाहू महाराज द्वारा पिछडी जातियों को अवसर उपलब्ध् कराने के लिए सन 1902 में शाहू महाराज जब इंग्लॅण्ड् गए थे । उन्होने वही से एक आदेश जारी कर कोल्हापूर शासन के अंतर्गत शासन –प्रशासन के 50 प्रतिशत पद पिछडी जातियों के लिए अरक्षित कर दिये। शाहू महाराज की ये सोच थी की शासन स्वयं शक्तीशाली बन जाएगा यदि समाज के सभी वर्ग के लोगों की हिस्सेदारी सुनिश्चित हो। इस उद्देश की प्राप्ति के लिए 1902 में शाहूजी ने अतिशूद्र व पिछडे वर्ग के लिए 50 प्रतिशत का आरक्षण सरकारी नोकरियों में दिया । उन्होने कोल्हापूर में शुद्रो के शिक्षा संस्थाओं शृंखला खडी कर दी। अछूतों की शिक्षा के

प्रसार के लिए कमेटी का गठन किया। शिक्षा को प्रोत्साहन देने के लिए छात्रवृत्ति व पुरस्कार की व्यवस्था भी करवाई।

यह एक ऐसा फैसला था जिसने आगे चलकर आरक्षण की संवैधानिक व्यवस्था करने की राह दिखाई उन्होने अपने शासन क्षेत्र में सार्वजनिक स्थानो पर किसी भी तरह के छूआछूत पर कानून रोक लगा दी थी।

**देवदासी, सती प्रथा, को बंद किया :-**

छत्रपति शाहू महाराज ने देवदासी प्रथा, सती प्रथा तथा बंधूआ मजदूर प्रथा का कडा विरोध किया। भगवान के नाम पर लडकी को देवदासी बनाना इस कुप्रथा को नष्ट करने के लिए कानून बनाया। उस समय समाज में बालअवस्था में लडकी को देवी के नाम पर छोडकर उसे देवदासी , जोगिणी, मुरळी इस तरह के स्त्रियों के पतित अलग वर्ग का निर्माण किया गया था। उन पतित नारीयो को अपने पिता के वारसा से कुछ भी हक्क् नही मिलता था। उने भगवान के नाम पर छोडणे के कारण उसे कुछ पूर्व परंमपरा से चले आ रहे बंधन तथा कुछ हक्क् थे, किंतू उनकी अवस्था उत्यंत दयनिय थी। उने समाज में कोई विशेष स्थान नही था। इस तर की परंमपरा को उखडकर फेकने के लिए शाहू महाराज ने कानून बनाया और इस व्यवस्था को मिटाने का काम किया।

**विधवा विवाह को मान्यता और नारी शिक्षा को महत्व् दिया :-**

नारी जीवन में सबसे पिडीत और दयनिय स्थिती अगर किसकी थी तो वह थी विधवा नारी की, समाज का उसकी ओर देखने का नजरिया बहुत ही धृणास्पद् था। समाज के साथ – साथ उनेक परिवार का नजरिया भी उनकी और देखने का तिरस्कृत था। कुछ परिवार तो विधवा को गुन्हेगार के जैसा बर्ताव किया करते थे। विशेष रुप से बालविधवा की अवस्था तो बहुत ही सोचनिय थी। उनका कष्ट् अगर दूर करना है तो उसके लिए एक ही मार्ग था और वह था विधवा पुनर्विवाह का कानून बनाया। इस तरह कानून के तहत विधवा पूनर्विवाह होने का मार्ग खुला हो गया।

शाहू महराज समाज के सभी वर्गो में समानता के पक्षघर थें उन्होने दलित पिछडे वर्ग के साथ नारी शिक्षा पर भी जोर दिया। उस समय के ब्राम्हणो ने धर्मनियम के अनुसार नारी को शिक्षा का अधिकार को नकारा था। इस कारण उस समय कि नारीया अज्ञान को चिरकर उने शिक्षा की अवश्यकता थी। इस कारण शाहू महाराज ने नारी शिक्षा को महत्त्व् दिया ।

छत्रपति शाहू महाराज ने 21 स्पतेंबर 1917 को अपने राज्य् में कानून बनाकर प्राथमिक शिक्षा बंधनकारक कर दी। उसी तरह अक्तूंबर 1919 को नारी शिक्षा को छात्रवास के साथ मुफ्त में किया। और राजाराम महाविद्यालय में शिक्षा लेनेवाली सभी लडकियों को उच्च् शिक्षा मुफ्त में देणे का निर्णय लिया। रखमाबाई केळवकर इनको स्त्री शिक्षा अधिकारी का पद देकर उनकी सहाय्यता से नारी शिक्षा को गति देणे का काम शाहू महाराज ने किया। इस तरह छत्रपति शाहू महाराज एक

भारतीय समाजसुधारक, विचारक, समाजसेवी तथा क्रांतीकारी राजे थे। शाहू महाराज ने गैर-ब्राम्हणों को वेदो को पढने और सुनने के प्रोत्साहन के कारण समाज के कुलीन वर्ग ने उनका विरोध किया। फिर भी उन्होने राज्य् का विकास करने के लिए सभी वर्ग की सहभागिता समान रुप से जरुरी है। इसलिए उन्होने प्रशासन के 50 प्रतिशत पद पिछडी जातियों के लिए अरक्षित कर दिये। उन्होने उस समय की कुछ क्रुप्रथाओ का विरोध कर उने नष्ट् करने का प्रयास किया। जैसे 'बलुतदारी प्रथा, वतनदारी प्रथा, देवदासी प्रथा आदि प्रथा को नष्ट् करने के लिए कानून बनाये। शाहू महाराज ने विधवा विवाह को मान्यता देने का तथा नारी को शिक्षा देने का काम भी किया। छत्रपति शाहू महाराज ने आपने कार्य से अनेक लोगों को प्रभावित किया।

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


1) डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू महाराज स्मृतीग्रंथ
2) राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य् शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई
3) राजर्षी शाहू छत्रपतीचे निवडक आदेश 1989 – पाटील शामराव, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
4) छत्रपती शाहू महाराज – डॉ. मा. गो. माळी
5) करवीर नरेश शाहू छत्रपती – प्रा. बी. ए. कांबळे
6) राजर्षी शाहू महाराज – प्रा. नागोराव कुंभार, प्रबोधन प्रकाशन लातूर, 1992

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दलित कवितेवरील प्रभाव

**साईप्रसाद मधुकर पंडीत**
संशोधक विद्यार्थी दयानंद कला महाविद्यालय,लातूर.
Email : panditsaiprasad@gmail.com

**सारांश :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणजेच एक तत्वज्ञान, स्फुर्तीचा जीवंत झरा अशा महान महानायकाच्या कार्याचा, त्यांचा विचारांचा, तत्वज्ञानाचा प्रभाव हा साहित्यावर निश्चितपणे जाणवणारच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा प्रभाव मराठी काव्यगीतांवर देखील आपणास पहावयास मिळेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी तत्वज्ञान मराठी गीत काव्यातून आपणास अनुभवावयास मिळतात. दलित या शब्दालाच मूलत: डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विरोध होता. या जनतेस दलित का म्हणावे, त्यांनाही या समाजात स्थान आहे. तेही सर्वाप्रमाणेच या दलिताच्या उध्दाराचे जे महान कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले त्याचे वर्णन, थोरवी, दलित उध्दाराचे कार्य या मराठी काव्यातून आपणास पहावयास मिळेल. वामनदादा सारख्या लोककविंनी या त्यांच्या महानकार्याचा परिचयच त्यांच्या काव्यातून जीवंतपणे मांडला आहे.

दलित काव्यातून व्यक्त होणाऱ्या उत्कट भावना त्या समाजाच्या समाजजीवनावर प्रकाश टाकतात. त्यांच्या आत्मसंमानाची चालू असलेली होरपळ, धडपड यातून पहावयास मिळते. मानवाने मानवाशी मानवतेने वागावे ही एकमात्र सार्वत्रीक जाणीव दिसते. न्याय हक्कासाठी पेटून उठावे मानवतेचा धर्म स्विकारावा, आपल्या दु:खावर शोक व्यक्त करीत बसण्यापेक्षा पेटून उठावे आणि संघर्ष करावा. या संघर्षाचे बळही आपणास या दलित काव्यात दिसून येईल. या दलित उध्दारासाठी असलेली धडपड आणि जाणिवा या काव्याच्या रूपाने आपणास दिसून येतील. विषमतेचा स्विकार करणाऱ्या विरूध्द समानतेच्या न्याय हक्काचे बंड केल्या शिवाय आपणास आपले हक्क बहाल होणार नाहीत याची जाणिव करून देणारे क्रांतीकारी विचार या काव्यातून अनुभवता येतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्यही या काव्याच्या माध्यमातून प्रकटताना दिसते. अन्यायाला कवटाळून आता बसायचे नाही. आज आपले विश्व आपल्यालाच घडवावे लागणार आहे. ही अन्यायकारी व्यवस्था बदलविण्यासाठी कोणी येणार नाही, आपल्यालाच अन्यायाविरूध्द लढा दिला पाहिजे असा विचार या काव्यातून जनमाणसापर्यंत पोहचताना दिसतो. या शोधनिबंधाच्या माध्यमातून दलित कवितेतील जाणिवा, भावना, समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. याच्या माध्यमातून काव्यावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा प्रभाव अभ्यासला आहे. दलित उध्दारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कसे प्रेरणादायी ठरले याचा अभ्यास केलेला आहे. या काव्यावर असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रभाव आपणास अनुभवता येतो.

**प्रमुख शब्द :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित, कविता, प्रभाव.

**प्रस्तावना :** मराठी काव्यामध्ये अनेक महत्त्वपूर्ण विषयाचा अंतर्भाव जाणवतो. समाजाच्या उध्दारासाठी कार्य करणारे अनेक समाज सुधारक हे आपला प्रभाव कायमस्वरूपी जनमनावर पाडत असतात. दलित उध्दाराच्या महान कार्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अतुलनिय असेच आहे. या कार्याचा प्रभाव मराठी काव्यावरही आपणास जाणवतो. काव्याच्या

माध्यमातून प्रकटणारे क्रांतीकारी विचार जनमानसामध्ये उत्साह पेरून जातात. याच विचारांवर अनेक चळवळी उभारल्यागेल्या, अनेकांना प्रेरणा मिळत गेली आणि मिळते आहे.

अनेक वर्षापासून असलेले गुलामगीरीचे जोखड फेकुन देवुन आपला समाज बदलन्याची ऊर्जा या काव्यातून मिळते. या समाजाचे चित्रण, त्यांच्या व्यथा आणि यातून बाहेर पडण्याचा मार्गही काव्यरूपाने आपणास अनुभवावयास मिळतो. या शोधनिबंधाची व्याप्ती ही काही निवडक काव्याशी निगडीत आहे आणि त्यावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा प्रभाव अभ्यासने हे या शोध निबंधाची व्याप्ती आणि मर्यादा आहे. या शोध निबंधाच्या माध्यमातून दलित कविते वरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा, तत्त्वज्ञानाचा प्रभाव अभ्यासने हा या शोधनिबंधाचा उददेश आहे. दलित साहित्यातील काव्यातून आंबेडकरी तत्त्वज्ञान कसे उमगते याचा अभ्यास करणे हा या शोधनिबंधाचा उददेश आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दलित कवितेवरील प्रभाव :

असहाय वेदनांच्या गर्तेत अडकलेला हा समाज दिशाहिन असा झाला होता. याच्या मुक्तीचा मार्ग मिळेनासा झाला होता. तारण्या या सर्व दिन दलिता मग डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे विचार आणि तत्त्वज्ञान या शिवाय दूसरा उपाय नाही असे म्हणावे लागेल. किडया, मुंग्या प्रमाणे जगण्यापेक्षा स्वत: संघर्ष कर, जग जर बदलाचे असेल तर उठ जागा हो असे सांगताना आण्णाभाऊनी हे आवहान केले.

**''जग बदल घालून घाव, सांगून गेले मला भीमराव**
**गुलामगीरीच्या या चिखळात रूतून बसला का ऐरावत**
**अंग झाडूनी निघ बाहेरी, घे बिनीवरती घाव''**

**(आण्णाभाऊ साठे)**

हे गुलामीचे, अमानुषतेचे जगने तू सोड, याच परंपरेच्या चक्रातून न अडकता स्वत: जागा हो आणि स्वत:चे जग निर्माण कर मानव मुक्तीच्या या लढयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार फारच उपयुक्त ठरले. त्यांच्या कार्याची उत्स्फूर्त प्रेरणा काव्यातून जनमाणसात पोहचू लागली. त्यांची शिकवन ही वर्षानुवर्षे यातनेच्या गर्तेत अडकलेल्या दलिताच्या आयुष्याचा कायापालट करणारी आहे. त्यांचे जोतिर्गमय मार्गदर्शन आणि दिलेली शिकवन ही या समाजाच्या उथ्थानाचे कारक ठरली याचेच रूप मराठी काव्यातूनही पहावयास मिळते. लक्ष्मण केदार म्हणतात,

**''करून करणी दिपावली धरणी**
**भयाण रात होती जेंव्हा**
**अंधाऱ्या वस्तीत माझ्या भीमानं लावलाय दिवा.''**

दलितांच्या उध्दारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अपार कष्ट सहन केले. अस्पृश्य जनता म्हणजे माझी मुल बाळं असा भाव त्यांनी त्यांच्या अंतकरणात जपला. दलित उध्दारासाठी या समाज व्यवस्थेतील अनिष्ट प्रथांना कडाडून विरोध केला. दलित समाजात त्यांच्याच न्याय हक्कासाठी प्रबोधन केले. ते समाजाशी झगडले. सर्व जे का उपेक्षीत ते ते माझे असे उदार अंतकरणाने त्यांनी दलितांना आपलेसे केले. आहोरात्र ते या समाजासाठी झटले. त्यांच्या कार्याचे पडसात मराठी काव्यात दिसते. अमृतबुवा वावस्कर या आंबेडकरांच्या समर्पक वृत्तीस पूढील प्रमाणे म्हणतात,

**''माझ्या भिमाने केला ग बाई । दलितांचा उध्दार**

**अन कोटी दलित जन । हाच सोन्याचा संसार.''**

दलित उध्दारासाठी कायमच डॉ.बाबासाहेब आंबेडकर तत्पर असत त्यांच्या कार्याची प्रेरणा अगदी तळागळा पर्यंत या काव्य गीताच्या माध्यमातून पोहचत गेली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना याची जाणीव होती. हरिहर सोनुले यांचे सारखे कविही या प्रेरणेसाठी त्यांच्या काव्यातून जिवंत भाव प्रकट करतात. आपल्या बंधनात अडकलेल्या समाजाला बाहेर काढण्यासाठी आता रणांगणा प्रमाणे या समरात आपणा सर्वांना सामील व्हावे लागेल असे येथे सांगीतले गेले.

**''जनतेच्या जनार्दना चल रणांगणा**

**सज्ज सवे दलित सेना वैऱ्याच्या कर्दना''**

आपले विचार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सर्वापर्यंत पोहचविण्यास या काव्याचा मोठा आधार झाला. अगदी तळा गळात ही भीमगीत गायली जावू लागली. जनतेच्या हिताचा विचारच आहोरात्र करत असणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनेक अनिष्ट रूढी परंपरावर आवाज उठवून न्याय मिळवून देण्यास प्रयत्नशिल होते. त्यांचा वसा, त्यांची शिकवण सामान्य दिन दलितांनी आचरणात आणून आपला उध्दार करावा अशी शिकवनही या दलित कवितेतून मिळते. याच बरोबर भीमाचे महत्त्व ही साऱ्यांनच पटले याचेही चित्रण या काव्यातून आपणास दिसते. गटातटाच्या नादी न लागता समाज सुधारणा कश्या होतील याचा ध्यास घ्या असा संदेश त्यांनी दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दलित उध्दारासाठी असलेले महत्त्व लोककवी पाटणकर यांनी त्यांच्या काव्यातून व्यक्त केले.

**''भीमराया सारखा मला विव्दान पाहिजे**

**हल्लीच्या या जगी असा गुणवान पाहिजे**

**जनतेचा वाली कोणी नसे ऐका बंधुनो**

**दुसऱ्याचे शील राखण्या शीलवान पाहिजे.''**

अश्या स्वरूपात त्यांच्या कार्याचा गौरव या काव्यातून आपणास पहावयास मिळेल. अनेक दिवसांच्या प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर दलितांचा कैवारी आता भेटला आहे. यामूळे अनेक लोक मानवतेच्या शोधात असलेल्या जनतेस मानवतेची शिकवन प्राप्त झाली. जोखड मोकळी करण्यात या भीमाचे पुण्य कामी आले. असे भाव काव्यातून दिसून येतात. हे गुलामीचे जीवन आता संपले आहे. मोकळे झाले आहे. आभाळ अश्या कृतज्ञेच्या भावना जनमानसात दिसू लागल्या याचेच समर्पक वर्णन लोककवि वामनदादा कर्डक करतात. प्रत्येक घरात ज्ञानज्योत लावण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आणी सर्वांचे आयूष्य मोकळा श्वास घेवू लागले.

**''उध्दरली कोटी कुळे**

**भीमा तुझ्या जन्मामुळे**

**जखडबंद पायातील साखळदंड**

**तडातड तुटले तु ठोकताच दंड**

**झाले गुलाम मोकळे**

**भीमा तुझ्या जन्मामुळे''**

**(वामनदादा कर्डक)**

अशा समाजाच्या उध्दाराचे कार्य दलित कवितेतून आपणास अनुभवण्यास मिळतात. या काव्य गितांमधून, समाजाचे झालेले विचार परिवर्तन, त्यांना मिळालेली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवन यांचे दर्शन घडते.

**निष्कर्ष :** या शोधनिबंधातून असे निष्कर्ष समोर येतात की, दलित सुधारणेचा पाया डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापला, त्यांच्या कार्याचा प्रभाव हा दलित काव्य गितावर पडलेला जाणवतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे या काव्यातून प्रतित होताना दिसतात. दलित काव्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाचा प्रभाव जाणवतो.

## संदर्भ सूची :

१) अंबेडकरी महागीतकार वामनदादा कर्डक डॉ.यशवंत मनोहर, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर.

२) वामनदादांच्या गीतातील भीमदर्शन सुगावा प्रकाशन, पुणे. उत्तम कांबळे.

३) दलित कविता – विकिपीडिया

# "महात्मा जोतीराव फुले यांचे मराठी साहित्यातील योगदान"

**व्हसमने सुरेखा बसाप्पा**
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी सांळुखे महाविद्यालय, मिरज संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ईमेल आयडी – herwadesurekha1010@gmail.com

**महात्मा जोतीराव फुले यांचे वैयक्तिक जीवन :-**

महात्मा जोतीराव फुले यांचे पूर्ण नाव जोतीराव गोविंदराव फुले. ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे येथे झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात यांचे वडील आणि चुलते फुले पुरविण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोऱ्हे हे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांचे मुल गाव कटगुण आहे.महात्मा फुले हे मराठीतील लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी केली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. महात्मा फुलेंवर थोमास पेन यांच्या 'The Right Of Man' या पुस्तकाचा प्रभाव होता.

**महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक कार्य :-**

१)ऑगस्ट १९४८ मध्ये पुणे येथे बुधवार पेठेत भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली.
२) १७ सप्टेंबर १८५१ रोजी रस्तापेठेत मुलींची दुसरी शाळा सुरु केली.
3) १८५२ मध्ये दलितांसाठी पहिली शाळा सुरु केली.
४) १८५५  मध्ये रात्रीची शाळा सुरु केली.
५)१८६८ मध्ये स्वत:च्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला करुन परंपरागत रूढीना धक्का दिला.
६) १८७७ मध्ये कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पुण्यातून दीनबंधू वृत्तपत्र सुरु केले.
७) २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
८) जनतेने त्यांना १८८८ साली महात्मा ही पदवी दिली.

**तृतीय रत्न :-**

हे नाटक जोतीरांवानी इ. सन १८८५ मध्ये लिहिले आहे. हे त्यांचे पहिले लेखन. अंधश्रद्धेविरुद्ध तसेच अज्ञानाचा गैरफायदा घेऊन भोळया शूद्रास धूर्त आर्यभठाने ठकविण्याविरूध्द  पहिला कठोर प्रहार या नाटकात केलेला आहे. समाजातील कनिष्ठ अशा अज्ञानी वर्गावर धर्माचा किती मोठा पगडा बसलेला होता. याची जाणीव जोतीरावांनी या नाटकाच्या माध्यमातून दिली. या नाटकात एका कुणबी समाजातील गरोदर बाई, तिचा नवरा, जोशी, विदुषक व पाद्री ही महत्त्वाची पात्रे असून त्यांचे  जोतीरावांनी तत्कालीन शुद्रादी अतिशूद्र व स्त्रिया यांचे मानसिक गुलामगिरीचे यथायोग्य चित्र रेखाटलेले आहे. या  नाटकाच्या माध्यमातून त्याकाळचे भट, जोशी लोक अज्ञानी, अक्षरशुन्य, कुणबी शेतकऱ्यावर किती धार्मिक जुलूम करीत, त्यांचे अज्ञानाचा व अंधश्रद्धेचा गैरफायदा घेवून त्यांची कशी पिळवणूक होत होती, याचे विदारक सत्य या नाटकात कथित केले आहे.

**छ. शिवाजी महाराजांचा पोवाडा :-**

इंगजी राजवटीतील जोतीराव हे छ. शिवरायांचा पोवाडा मराठी भाषेतून रचणारे पहिले पोवाडेकार होय. या पोवाड्याची रचना जोतीरावंनी केली. कुणबी, माळी, महार, मांग वैगरे समाजातील कनिष्ठ जातीच्या लोकांना हा पोवाडा समजावा म्हणून त्यांनी त्यांचेच सोप्या भाषेत हा पोवाडा लिहिला आहे. हा पोवाडा लिहिण्यासाठी त्यांचे मित्र भंडारकर, रेव्हरंड बाबा पदमनजी व गंगाधर शास्त्री यांनी जोतीरावांस मदत केली आहे. या पोवाड्यात जोतीरावांनी 'जनतेची प्रतिनिधी व तिचे मुक्तिदाते' असा गौरव छ. शिवाजी महाराजांचा केला आहे.

राजा छ. शिवाजी महाराजांचे कार्यकर्तृत्त्वावर व जीवनावर एवढा मोठा  विस्तृत पोवाडा कोणत्याही भाषेत झालेला नाही. जोतीरावांसारख्या एका कनिष्ठ जातीतल्या शूद्राने त्याकाळची एकूण परिस्थिती लक्ष्यात घेऊन छ. शिवाजी महाराजावर वास्तववादी पोवाडा रचला ही मराठी साहित्यातील एक आश्चर्याची बाब आहे जोतीरावांचे या महान कार्याबद्दल देशातील सर्व शिवप्रेमी त्यांचे कायमचे ऋणी राहतील.

**ब्राह्मणाचे कसब :-**

जोतीरावांनी 'ब्राह्मणाचे कसब' या नावाचा काव्यसंग्रह सन १८६९ साली लिहिला. या काव्यसंग्रहात धर्मांचे नावाखाली चतुर ब्राह्मण अज्ञानी व अक्षरशुन्य शुद्रांची कशी फसवणूक करतात. याचा चांगला उहाफोह केलेला आहे.

या काव्यसंग्रहाने त्याकाळी सनातन्यांमध्ये चांगलीच खळबळ उडवून दिली होती. धर्मभोळया व अज्ञानी लोकांना भटाच्या बंधनातून सोडवावे म्हणून जोतीरावांनी हे काव्य लिहण्याचा प्रामाणिकपणाने प्रयत्न केला आहे. मानवजातीच्या मुक्तीचे हेतू साध्य करण्यासाठी जोतीरावांनी हे काव्य लिहिले. या काव्यसंग्रहात अज्ञानी, अक्षरशुन्य व अंधश्रध्देवर विश्वास ठेवणाऱ्या, देवभोळया शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची भटभिक्षुक आपल्या धर्माच्या नावाखाली कशी आर्थिक पिळवणूक करतात. याचे उद्बोदक चित्र या काव्यात रेखाटले आहे. या काव्यसंग्रहात जोतीराव भटांचे स्वार्थी वृत्तीवर व त्यांचे वागण्यावर टिका करतात. ते म्हणतात की "ब्राह्मण पवित्र जानवे घालतात, परंतु त्यांचा स्वभाव बदलत नाही. जोतीराव आपल्या काव्यात म्हणतात की, 'जो ब्राह्मण चांडाळाला भिक्षा घालीत नाही. त्याला शूद्राकडून भिक्षा घेण्याचा अधिकार धर्म कसा देतो?' शूद्र अज्ञानी शेतकऱ्यांना चतुर ब्राह्मण कसा नागवितो. याची व्यवहारातील अनेक उदाहरणे जोतीरावांनी दिली आहेत.१

**गुलामगिरी :-**

हा ग्रंथ लिहिण्याचा जोतीरावांचा मुख्य उद्देश असा आहे की, 'आज शेकडो वर्षे शूद्रादी अतिशूद्र ब्राह्मण लोकांचे राज्य झाल्यापासून सतत दु:ख सोशीत आहेत. व नाना प्रकारच्या यातनेत आणि संकटात दिवस काढीत आहेत. तर या गोष्टीकडे त्या सर्वांचे लक्ष लागून त्यांनी त्याजविषयी नीट विचार करणे व येथून पुढे भट ब्राह्मण लोकांचे अन्यायी जुलूमापासून आपली सुटका कशी करून घेणे हाच काय तो आहे' [२]

'गुलामगिरी ग्रंथाचा प्रारंभ ज्यादिवशी मनुष्य गुलाम होतो त्यादिवशी त्याचा अर्धसद्‌गुण जातो' या होमरच्या अर्धवचनाने झालेला आहे. या ग्रंथात जोतीरावांनी अनिष्ठ रूढी, परंपरा या अन्यायी धार्मीक कल्पनांनी बुरसटलेल्या जुन्या पारंपारिक सामाजिक मूल्यांना तिलांजली देऊन चांगल्या शिक्षणावर आधारलेल्या व ज्ञानाची कास धरलेल्या नवीन मूल्यांचा स्वीकार केलेला आहे. व या नविन मूल्यांच्या आधारे त्यांना समतेवर आधारलेला नविन मानवतावादी समाज निर्माण करावयाचा आहे. 'गुलामगिरी' मग ती सामजिक, आर्थिक व धार्मीक किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची असो, त्या गुलामगिरीबद्दल जोतीरावाच्या मनात अत्यंत तिटकारा होता म्हणूनच ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जोतीरांवानी विद्येचा, ज्ञानाचा, चांगल्या शिक्षणप्रसाराचा पुरस्कार केला. या ग्रंथातील मराठी भाषा रांगडी अशी आहे. ही भाषा आक्रमक व तिखट वाटते. मराठीत अशी रांगडी भाषा त्यांनी कनिष्ठ वर्गांना आपल्या गुलामगिरीची जाणीव व्हावी. त्यांनी त्या जाणीवेमुळे समजलेल्या अन्यायाविरूध्द पेटून उठावे, बंड करावे यासाठी अशी तिखट भाषा त्यांनी वापरली.

**शेतकऱ्यांचा आसूड :-**

शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहचण्याची धर्म व राज्यसंबधी अनेक कारणे आहेत. त्यापैकी थोड्या बहूतांचे विवेचन करण्याच्या हेतूने इ.सन.१८८३ साली हा ग्रंथ रचिला. या ग्रंथात जोतीरावांनी आपल्या विचाराचा एक सुबोध व सुंदर सूत्रबध्द सारांश सांगितला आहे.

'विद्येविना मति गेली, मति विना नीती गेली।
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले।
वित्त विना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले'॥[३]

त्यांनी हा निष्कर्ष 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाच्या प्रसंगी सांगितला आहे. तत्कालिन समाजातील जातीभेद अनिष्ठ प्रथा तसेच समाजातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी याविरूध्दची प्रतिक्रिया जोतीराव फुले यांच्या साहित्यातून उमटलेली होती. त्याकाळच्या समाजाला प्रबोधनाची व सामाजिक परिवर्तनाची वाट दाखणयासाठी त्यानीं लिहिलेले ग्रंथ हे मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीमध्ये जोतीराव फुले यांचे योगदान आहे. त्यांचे कार्य समाजाला प्रेरणादायी असल्याचे सर्वमान्य आहे.

**अंखड :-**

महाराष्ट्राच्या बहूजनात संताचे अभंग व जोतीरावांचे अंखड यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. जोतीरावांनी पद्य काव्याची रचना केली त्यास 'अंखड' असे म्हणतात. अभंगात संतानी परमेश्वाराची भक्ती सांगितली आहे. तर जोतीरावांनी अंखडातून मानवाची मुक्ती सांगितलेली आहे. महाराष्ट्रात संताचे अभंगातील भक्तीने व जोतीरावांच्या अंखडातील मुक्तीने समता प्रस्थापित झालेली आहे. जोतीरावांनी अनेक अंखड लिहिले आहेत. या अंखडातून त्यांनी समतेचा व मानवाच्या कल्याणाचा सद्विचार मांडला आहे. समता, मानवता, सदाचार, विवेक, न्यायप्रियता, सहिष्णुता व नीतीचा विचार प्रखरपणे मांडला. या अखंडातून त्यांनी समाजातील वाईट चालीरीतीवर, अंधश्रध्देवर, अन्यायी जातीव्यवस्थेवर कठोरपणे प्रहार केलेले आहेत. जोतीरावांचे काव्यात सामाजिक आशय अत्यंत मोलाचा आहे. मानवमुक्तीच्या अंतिम ध्येयासाठी जोतीरावांनी तत्कालीन समाज व्यवस्थेवर कठोर प्रहार आपल्या काव्यात करतात. उदा.

'मानवी नीती हीच धर्मनिती। बाकीची कुनीती जोती म्हणे ॥

अशाप्रकारे त्यांच्या काव्यात पावलोपावली सहृदय वाचकाला अस्वस्थ करणारे व समाजपरिवर्तनाच्या जाणीवा देणारे आहे. त्यांच्या काव्यात कडवटपणा वाटतो. तो समाजाच्या हिताचा असून त्यांचाच एक पट्टशिष्य शिक्षणशास्त्रज्ञ महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी या काव्याचे 'रानफळ' असे सेवार्थाने योग्य असे रसधार नामाभिधान केलेल आहे.

७) सत्सार :-

जोतीरावांनी इ.सन १८८५ मध्ये सत्सार या लहान पुस्तिकेचा पहिला अंक प्रसिध्द केला आहे. पहिल्या अंकात त्यांनी ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज याची भूमिका, आर्यभटाची धर्मकल्पना व भिन्न जातीतल्या स्त्री-पुरूषांच्या संबधातून जन्मलेल्या संततीचे सामाजिक स्थान या विषयावर विचार मांडलेले आहेत.

**अस्पृष्यांची कैफायत :-**

या पुस्तिकेत जोतीरावांनी अस्पृष्यांच्या दारूण अवस्थेचे व हीन जीवनाचे वास्तववादी वर्णन केलेले आहे. या पुस्तिकेत त्यांच्यावर होणाऱ्या धार्मिक व सामाजिक जुलूमांचे हृदयभेदी, करूण असे चित्र त्यांनी उभे केले आहे. या ग्रंथात जोतीराव त्यांच्या आर्थिक हलाखीचे चित्रही उभे करण्यास विसरले नाहीत. या पुस्तिकेत एक महार व एक मांग हे अतिशूद्र वर्गातील लोक हिंदूस्थानात दौऱ्यावर आलेल्या इंग्लडची महाराणी 'व्हिक्टोरिया' आपल्या वस्तीत येण्याचा आग्रह करीत आहेत. अशी कल्पना केली आहे. जोतीराव अस्पृष्यांची कैफायत मांडताना ते आपल्या अस्पृष्य बांधवाना इतर हिंदू धर्मियांप्रमाणे प्रवेश द्यावा अशी कळकळीची विनंती करतात.

**सार्वजनिक सत्यधर्म :-**

भेदाभेदाच्या विचारावर आधारलेल्या समाजसंस्था व धार्मिक चौकट नष्ट करून त्या जागी मानवतेच्या मूलभूत तत्त्वावर व समतेच्या विचारावर आधारलेल्या, निर्माण करावयाच्या सामाजिक संस्था व धार्मीक कल्पना ज्या तत्त्वार असल्या पाहिजेत. ती सर्व तत्त्वे जोतीरावांनी 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथात विशद करूण मांडली आहेत. सत्याचा नेहमी आग्रह धरणारे जोतीराव या ग्रंथाची सुरवातही 'सत्यमेव जयते' या ब्रिदवाक्याने करतात. ही तत्त्वे म्हणजे आधुनिक मानव स्वातंत्र्य, समता, व विश्वबंधुत्व होत. जोतीरावांच्या विश्वबंधुत्व व विश्वकुटुंबत्व सार्वजनिक सत्यधर्म जोतीरावांचा हा ग्रंथ त्यांच्या मानवविषयक आदर्श संकल्पनेचे समग्र दर्शन घडवितो. सद्‌गुणांची जोपासना करणे हेच सत्यधर्माचे मुख्य उद्दिष्ठ जोतीरावांनी सांगितले आहे.

अशाप्रकारे जोतीरावांनी 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून जुन्या समाजरचनेवर व जुन्या कृत्रिम अन्यायी धर्मकल्पनेवर भेदाभेदाच्या कुनितीवर घाणाघाती हल्ला केला आहे तर सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहून त्यांनी मानवतेच्या महान तत्त्वज्ञान मंदिरावर विधायक व कल्याणदायक कळस चढविला आहे.

**समारोप :-**

महात्मा जोतीराव फुले यांचे लिखान हे सोप्या मराठमोळया भाषेत अभिनव समाजक्रांतीकारक विचारांची मांडणी करणारे आहे. त्यांचे लिखान शूद्रादि, अतिशूद्र व स्त्रिया, शेतकरी व कष्टकरी या वर्गास सर्व प्रकारच्या शोषणातून मुक्त करणारे, त्यांच्या हक्कांची जाणीव देणारे व माणसाला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार देणारे आहे. तसेच ते राज्यकर्त्यांनाही हालवून जागे करणारे आहे. सामाजिक परिवर्तनाची, मानवी कल्याणाची व आधुनिकीकरणाची निकड जनसामान्यांच्या साध्या बोलीभाषेत आपल्या लिखाणात त्या काळच्या सामाजिक समस्या व सामाजिक परिवर्तनाच्या दिशा स्पष्टपणे मांडल्या आहेत. शूद्रातिशूद्र , स्त्रिया, शेतकरी व कष्टकरी या वर्गाच्या जागृतीसाठी व त्यांच्या उध्दारासाठी जोतीराव फुले यांच्या लेखनाचा आटापिटा होता. त्यांचे लिखान पददलितांच्या न्यायासाठी केलेला आक्रोश होता.

अशाप्रकारे म. जोतीराव फुलेंचे लिखान जरी ओबडधोबड व रांगड्या भाषेतील असले तरी समाजाला जागृत करणारे, त्यांचा उध्दार करणारे व त्यांच्यात हक्काची जाणीव करणारे आहे.

**संदर्भसूची :-**

१. महात्मा फुले- ब्राह्मणाचे कसब
२. महात्मा फुले- गुलामगिरी, प्रस्तावना,
३. महात्मा फुले- शेतकऱ्यांचा आसूड १४ जुलै १८८३
४. ग. बा. सरदार, महात्मा फुले- व्यक्तित्व आणि विचार
५. पी. बी. सांवत, महात्मा फुले गौरव ग्रंथ
६. संपा. य. दि. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्मय
७. ॲड, रामजनार्दन कांडगे, महात्मा जोतीराव फुले व्यक्ति व कार्य मार्च २००४, राजश्री प्रकाशन

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# जलव्यवस्थापन : शिवकाल ते वर्तमान संदर्भ

**प्रा. डॉ. पी. आर. वाणी**
सहा. प्राध्यापक, भूगोल विभाग,कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

**प्रस्तावना:-**

**!! पाणी वाचवा, देश वाचवा**

**निसर्ग वाचवा, पृथ्वी वाचवा !!**

पाणी म्हणजे जीवन, मानवाला जीवन जगण्याच्या धडपडीत प्रत्येक क्षणाला पाण्याची गरज भासते. पाण्यासाठी असणारी मागणी व त्याची असणारी उपलब्धता याचा मेळ बसत नसल्याने उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज बनली आहे. त्यासाठी पाणी वापराचे नियोजन व व्यवस्थापन आवश्यक आहे. चालू शतकात जगाची लोकसंख्या तिप्पटीने वाढेल व या वाढत्या लोकसंख्येची पाण्याची गरज सहापट वाढेल. जागतिक बँकेच्या अहवालानुसार गोड्या पाण्याची टंचाई भविष्यात भारत व जगातील इतर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा अडथळा ठरु शकतो.

पाणी ही एक महत्त्वाची नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. आज मानवाला प्रत्येक क्षेत्रात विकासासाठी गोड्या पाण्याची गरज आहे. घरगुती, कृषी, उद्योग, ऊर्जा, वाहतूक व सेवा या सर्वच क्षेत्राच्या विकासासाठी गोड्या पाण्याची नितांत गरज आहे. म्हणूनच पाण्याला राष्ट्रीय संपत्ती असे गणले जाते.

मानव जीवन जगताना पावलोपावली प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याचा उपयोग करतो. पाणी ही बहुउपयोगी अशी नैसर्गिक साधनसंपत्ती असून तिचा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापर होतो व अपव्यय ही होतो. हा अपव्यय टाळण्यासाठी विविध क्षेत्रात पाण्याचा काटकसरीने वापर करुन या जलस्त्रोताचे कसे संवर्धन करता येईल या करिता पृथ्वीवरील गोड्या पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन वाढत्या लोकसंख्येची वाढती पाण्याची गरज पूर्ण करण्याकरिता जनसामान्यात पाण्याविषयी जलसाक्षरता वाढवून जलक्रांतीच्या दिशेने सर्वजणांची व मानव जातीची वाटचाल होणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्रात पाण्याचा सर्वात जास्त वापर होतो. म्हणून जलसिंचन व्यवस्थेत पाणी वापराचे योग्य नियोजन व व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. भारतात व महाराष्ट्राला तर याची नितांत गरज आहे. पाण्याच्या अतिवापराने शेती संकटात येऊ नये, त्यातून अन्नाचा व पाण्याचा प्रश्न गंभीर रुप धारण करु नये यासाठी त्याचे जतन व संवर्धन करणे आवश्यक आहे. तसेच पाण्याच्या अतिवापरामुळे त्याची टंचाई ही धोकादायक पातळीला जाऊन पोहचली आहे. याकरिता काळाचे पाऊले ओळखून भविष्यातील पाण्याचे जाणवणारे दुर्भिक्ष्य आताच ओळखून त्याचे जतन व संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. पाण्याची उपलब्धता आणि वारंवार येणारी दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवकाळापासून राज्यात काही भागात दरवर्षी प्रचंड पाऊस होतअसला तरी उन्हाळ्यात ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. जलस्त्रोताचे बळकटीकरण आणि पावसाचे पाणी आडवून अशा परिस्थितीवर मात करता येऊ शकेल, त्या अनुषंगाने ग्रामीण भागातील जलभूमी व इतर नैसर्गिक साधन संपत्ती मध्ये स्थायी स्वरूपात सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. शिवकालीन व सद्यस्थितीच्या जलव्यवस्थापनाचा आढावा घेणे.

२. पाणी समस्येवर मात करुन जलव्यवस्थापनाकरिता उपाय योजना सूचविणे.

३. पाण्याचा अपव्यय कमी करणे.

४. जलप्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना करणे व पाण्याचे संरक्षण करणे,

**संशोधन पद्धती :-**प्रस्तुत अभ्यास प्रामुख्याने द्वितीयक सामग्रीवर आधारित आहे. अभ्यासासाठी शिवकालीन व सद्यःस्थितीतील पर्जन्याच्या आकडेवारी, सामाजिक व आर्थिक समालोचन, जलसंपदा विभाग, अॅग्रोवन, इंटरनेट इत्यादीच्या आधारे साहित्य सामग्री प्राप्त करून आगमन पद्धतीतील विश्लेषण पद्धतीच्या साह्याने वर्गीकरण व विश्लेषण करुन अध्ययन सुलभ करण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय अभ्यासासाठी संबंधीत असलेले इतर माहिती

जिल्हा सांख्यिकीय कार्यालये, विविध शासकीय अहवाल, प्रकाशने, संशोधन संस्था इत्यादी स्त्रोतामधून प्राप्त करण्यात आली आहे.

**शिवकालीन पर्जन्यमान व जलव्यवस्थापन :-**

शिवकालामध्ये इ.स. १६४७ ते १६८० या ३४ वर्षाच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. अभिनवता, कल्पकता, नियोजन आणि नियोजित कृती आराखड्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचा आलेख सर्वोच्च स्थानी घेऊन जाण्यास महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीने फार मोठा हातभार लावलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी उंच उंच डोंगर, भितीदायक दऱ्याखोऱ्या, घनदाट अरण्ये आणि अरुंद रस्ते यांनी व्यापलेल्या घाटमाथ्याच्या प्रदेशात हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. आजच्या परिभाषेत सांगायचे झालेचं तर पुणे, सुपे, सांगली, सातारा, चाकण, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर ह्या परिसरावर छत्रपती शिवाजी महाराजांनी आपले प्रभूत्त्व निर्माण केले. विंध, सातपुडा, सह्याद्री आणि बालाघाटच्या पर्वतरांगा व नर्मदा, तापी, भिमा ह्या नद्यांचे अस्तित्त्व हिंदवी स्वराज्यात असले तरी स्वराज्याची अर्थव्यवस्था कृषी व व्यापार ह्या दोनच घटकांवर अवलंबून होती आणि स्वराज्याची कृषी व्यवस्था पूर्णतः पर्जन्यमानावर अवलंबून होती. छोट्या छोट्या नद्या हे हिंदवी स्वराज्याचे भौगोलिक वैशिष्ट्ये होती. पाऊस पडला तर नद्या प्रवाहित असतात आणि पावसामध्ये खंड पडला तर ताबडतोब ह्या नद्या कोरडे पडत असतं. महाराष्ट्रात आणि तत्कालीन शिवकालीन स्वराज्यामध्ये दोन प्रकारचे दुष्काळ पडत होते. पर्जन्यमान न झाल्यामुळे पडणाऱ्या दुष्काळाला कोरडा दुष्काळ तर अति पर्जन्यमान झाल्यामुळे ओला दुष्काळ असे म्हणतं. शिवपूर्व काळामध्ये सर्वात मोटा कोरडा दुष्काळ १६३० साली पडलेला होता. या दुष्काळाची भिषणता फार मोठी होती. ह्याची नोंद इतिहासकाराने इतिहासामध्ये केलेली आहे.

१६५० मध्ये पडलेला दुष्काळ संपूर्ण देशभर होता. त्यामुळे भारतातील सर्वचं प्रांत प्रभावित झालेले होते. तसेच १६७० च्या हिंदवी स्वराज्याच्या काही भागांवर अवृष्टीचे संकट कोसळल्यामुळे कोरडा दुष्काळ पडलेला होता. त्याचबरोबर हिंदवी स्वराज्यामध्ये १६७३, १६८२ आणि १९८३ ह्या वर्षी मात्र ओला दुष्काळ पडल्याच्या नोंदी ऐतिहासिक कागदपत्रात आढळतात. शिवकाळात हिंदवी स्वराज्यामध्ये कोकण आणि घाटमाथा असे दोन्ही भौगोलिक क्षेत्र समाविष्ट होत असल्यामुळे कोकण अतिवृष्टी तर घाटमाथ्यावर कोरडा दुष्काळ असे दोन्ही संकटे कायम असायची. या आस्मानी (पर्जन्यमान) संकटाचे निवारण करण्यासाठी काही अत्यंत प्रभावी उपाययोजना राबविल्या यात- शिवकालखंडात ऊस, चिंच, भाजीपाला, हळद, तांदूळ, नाचणी, ज्वारी वगैरे नगदी पिके होती. यावरची कर आकारणी एकाच पद्धतीने होती. शिवरायांनी ही पद्धत बंद करुन रयतवारी पद्धत आणली. यामध्ये वतनाऐवजी अधिकाऱ्यांना रोख पगार दिला जाऊ लागला. जमिनीचा सारा घेताना वाड्यावर बसून आणेवारी ठरविण्यापेक्षा "नजर पाहणी" ची पद्धत सुरु केली त्यामुळे दुष्काळात उत्पन्न कमी झाले तर सारा कमी झाला आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळत असे.पर्जन्यमान कमी झाल्याने दुष्काळ पडल्यानंतर पाण्यामुळे दुष्काळ होऊ नये म्हणून छोटे छोटे तलाव, बांध बांधणे, कोकणात लाल मातीमुळे बांध टिकावा म्हणून त्यात फांद्या, गवत घालून मजबुती केली जायची. याच बंधाऱ्या शेजारी विहीरी खोदून मोटाने पाणी दिले जायचे. त्यामुळे सिंचन व्यवस्था मोटस्थळ व पाटस्थळ अशा दोन पद्धतीने केली जायची. शिवकालामध्ये छत्रपती शिवाजी महाराज पाण्यासाठी किती जागरुक होते हे त्यांच्या रायगडावरील वाड्यात सापडलेल्या हौदावरुन दिसून येते. प्रजेचे हित जपणारा राजा कसा असावा याचे आदर्श उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. नद्यांना फक्त पावसाळयातचं पाणी असेल तर पुढील आठ महिने पाणी वापरण्यासाठी नदीवर मोठे मोठे बांध घालावा व बारमाही वाहणाऱ्या नदीवर ठिक-ठिकाणी लहान लहान बांध घालावेत असा महाराजांचा दूरगामी दृष्टीकोन होता. धरणात आडवलेले पाणी कालव्याद्वारे शेतीला पूरविले जाई. मोठ्या धरणाचे पाणी कालव्याद्वारे दूरपर्यंत नेले जाई. नदीच्या पूराचे पाणी पाट काढून खोदलेल्या तलावात सोडले जाई नंतर तलावातून हे पाणी वाटप केले जाई. प्रजेकडून केल्या जाणाऱ्या पाटबंधारे विषयक कामांचा शासनाकडून प्रोत्साहन दिले जात असे. नवीन तळे किंवा विहीर बांधली तर संबंधितास पाच वर्षापर्यंतचा शेतसारा कर माफी देण्यात येत असे.

**विद्यमान परिस्थितीतील जलव्यवस्थापन व उपाय योजना :-** गेली अनेक वर्ष महाराष्ट्रात दुष्काळ पडतो आहे. यावर कायमची उपाययोजना करण्याऐवजी दरवर्षी थातूरमातूर उपाययोजना करुन कोट्यावधी रुपये खर्च केले जातात. हे सर्व पैसे टँकर्स माफिया, चारा माफीचा तसेच पाणी पुरवठा योजनेच्या नावावर खर्च केले जातात पण उपयोगिता शुन्य. राज्यकर्त्यांनी खरोखरच मनावर घेतले तर मात्र ह्या दुष्काळाच्या झळा सोसाव्या लागणार नाहीत. सध्याच्या

परिस्थितीत सर्वांनी स्वार्थरहित वृत्तीने व एकजुटीने काम केले तर दुष्काळ आणि पाणी संकटावर मात करणे अवघड नाही.

**जलयुक्त शिवार :-** सद्यस्थितीला राज्यात सतत या ना त्या कारणांनी उद्भवणारी पाणी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन सर्वांसाठी पाणी, टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत "जलयुक्त शिवार" अभियान राज्य शासनाने हाती घेतले आहे. हा टंचाईमुक्त महाराष्ट्र करण्याचा केलेला निर्धार खऱ्या अर्थाने क्रांतीकारकचं आहे. अपूऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होतो. राज्यात गेल्या चार दशकात पाण्याच्या पुरेशा उपलब्धते अभावी कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झालेली दिसून येते. निसर्गाच्या लहरीपणामुळे २०१४-१५ मधे भूजलपातळी २ मीटरपेक्षा जास्त घट झालेल्या १८८ तालुक्यात २ हजार २३४ गावे तसेच शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर केलेल्या २२ जिल्ह्यातील १९ हजार ५९ गावांमध्ये हे अभियान प्राधान्याने राबविण्यात येत आहे. भविष्यात राज्याच्या उर्वरित भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी उपाययोजना करण्यावरही भर दिला जात आहे. जलयुक्त शिवार अभियान नियोजनबंध आराखडा तयार करुन प्रभावीपणे राबविल्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे निर्माण होईल.

**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम :-** ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम हा महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय २७ जुलै २००० रोजी निर्गमित केलेला आहे. महाराष्ट्राने आजवर अनेक दुष्काळ पाहिले पण १९७२ च्या दुष्काळात मात्र पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष फारच जाणवले तेव्हापासून आजवर पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष कमी करणे, तसेच स्वच्छ व शुद्ध पाणी पुरविण्यासाठी भरपूर योजना शासनामार्फत करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक ग्रामपंचायती अंतर्गत सरासरी ३ ते ४ पेयजलाच्या व्यवस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. विविध योजनांमार्फत भरपूर व्यवस्था निर्माण करुनही त्यात लोकसहभागाचा अभाव राहिल्याने प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या अखेर पिण्याच्या पाण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतात.

**त्रिसूत्री योजना :-** २८ सप्टेंबर २००० राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी साधी विहीर, विंधण विहीर किंवा नळ पाणी पुरवठा यापैकी किमान खर्चाची व स्थानिक परिस्थितीशी अनुरुप योजना घेऊन उपाययोजना करण्यात येतात. यांप्रमाणे कार्यवाही करुन देखील राज्याच्या काही भागामध्ये प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती, अनियमित व अपूरे पर्जन्यमान व इत्यादी अनुषंगिक बाबींमुळे दरवर्षी पिण्याच्या पाण्याची टंचाई उद्भवते.

**शिवकालीन पाणी साठवण योजना:-** फेब्रुवारी २००२ पासून शिवकालीन पाणी साठवण योजनेअंतर्गत पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताच्या परिसरात कृत्रिम भूजल पूर्नभरणासाठी उपाययोजना करुन स्त्रोत बळकट करण्यावर भर देणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन पाणी पुरवठा योजनांमधून सातत्यपूर्ण पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांच्या बळकटीकरणाच्या पारंपारिक व अपारंपारिक उपाय योजनांचा घराच्या /इमारतीच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी संकलनाच्या उपाय योजनांचा, डोंगरी भागात खडकातील टाक्या बांधून पावसाचे पाणी साठविण्यासारख्या उपाय योजना करणे.

**शिवकालीन पाणी साठवण सुधार निर्णय :-** शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या अंमलबजावणीस आता ८ वर्षापेक्षा अधिक कालावधी पूर्ण झालेला आहे. मात्र शिवकालीन पाणी साठवण योजनेमुळे अस्तित्त्वातील पाणी साठवण योजनेच्या स्त्रोतांचे बळकटीकरण मोठ्या प्रमाणात झाले नाही. त्यामुळे टँकर पूर्णपणे बंद झालेले नाहीत. या करिता शासनाने शिवकालीन योजना वार्षिक कार्य आराखड्याची संकल्पना अंमलात आणण्याचा सुधारित मार्गदर्शक सूचना १० जून २००८ मध्ये घेतला.

**राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम :-** एप्रिल २००९ मध्ये महाराष्ट्रातील शिवकालीन पाणी साठवण योजनेच्या धर्तीवर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाची सुरुवात केली आहे. या कार्यक्रमातंर्गत देखील भूजलामधील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत संरक्षित करण्यासाठी पारंपारिक व अपारंपारिक उपाययोजना करण्यात येत आहेत.

**झऱ्यावर आधारित ग्रामीण लघू नळ पाणी पुरवठा योजना :-** २० फेब्रुवारी २०१० च्या शासन निर्णयाने कोकणात मोठ्या प्रमाणावर बारमाही झरे वाहताना दिसतात. झरे म्हणजे भूजल आहे. तेव्हा या शुद्ध भूजलाचा उपयोग पिण्याच्या पाण्यासाठी करण्यासाठी झऱ्यावर आधारित ग्रामीण लघू नळ पाणी पुरवठा योजना.

**दुहेरी पंपावर आधारित लघू नळ पाणी पुरवठा योजना**

**र्वकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम**

सर्वकष पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविण्यास सिंचनाबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आपोआपच सुटतो तरीही पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत बळकटीकरण करण्याकरिता वेगवेगळया उपाययोजना करणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष व शिफारशी:-**

१. शिवकालामध्ये आजच्याप्रमाणेच पर्जन्यमानाची बिकट परिस्थिती असल्याचे पहावयास मिळते. शिवकाळातील जनतेला मोठ मोठ्या दुष्काळजन्य परिस्थितीचा सामना करावा लागल्याचे ऐतिहासिक संदर्भ ग्रंथातील व बखरीतील नोंदीवरुन दिसते.

२. सद्यःस्थितीला जलव्यवस्थापनाच्या संदर्भात भरीव असे कार्य शासन पातळीवरुन होत असले तरी त्यात लोकसहभागाच्या अभावामुळे जलव्यवस्थापनाच्या कार्यास बळकटीकरण करणे अशक्य आहे.

३. शिवकालीन जलसाठवण योजना प्रभावीपणे राबविण्यास शासनास अपयश आलेले दिसते.

४. महाराष्ट्रातील आणि मराठवाड्यातील बहुतांश नद्या ह्या हंगामी स्वरुपाच्या असल्याने त्या उन्हाळयात कोरड्या पडतात. तेव्हा पाण्याचा फार मोठा प्रश्न उद्भवतो. त्यावर कायम स्वरुपी मात करण्यासाठी महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात नद्या जोडणी योजना लवकर अंमलात आणावी व प्रत्येक छोट्या मोठ्या नद्यांवर छोटे मोठे पाझर तलाव / बंधारे उभारावेत जेणेकरुन भविष्यात पाणी टंचाईवर मात करता येईल.

५. महाराष्ट्राबरोबरचं संपूर्ण मराठवाड्यात जलशिवार योजना व जलसंधारण, नदी खोलीकरण, रुंदीकरण, छोटे छोटे पाझर तलाव व कोल्हापूरी प्रकारचे बंधारे घेणे आवश्यक आहेत.

६. महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन भविष्यात राज्याच्या उर्वरीत भागात पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून प्रयत्न करावेत.

७. अपूऱ्या आणि अनियमित पावसामुळे राज्यात टंचाई परिस्थिती निर्माण झाल्याने कृषी क्षेत्रावर त्याचा विपरित परिणाम होतो. निसर्गाच्या ह्या लहरीपणावर अवलंबून असणारी ही परिस्थिती बदलण्यासाठी जलयुक्त शिवार, जलस्वराज, रेन वॉटर व हारवेस्टींग सारखे उपक्रम हाती घ्यावेत.

८. राज्यात सतत उद्भवणारी पाणी टंचाई परिस्थिती विचारात घेऊन सर्वांसाठी पाणी अभियान राबवून, लोकांचा सहभाग त्यात वाढवणे व पावसाचे पडणारे पाणी गावांच्या शिवारातच अडवून भूगर्भात मुरवून पाणी पातळीत वाढ करणे.

९. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी भूजलावर आधारित असलेल्या स्त्रोतांचे प्रमाण सर्वाधिक आहे. आज मितीस ग्रामीण भागातील ८५ टक्के योजना भूजलावर आधारित आहेत. परंतु भूजलाच्या अतिउपशामुळे आणि भूजलाचे योग्य प्रमाणात पूर्नभरण न झाल्याने पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत कोरडे पडत आहेत. त्याकरिता भूजलाचे पूर्नभरण करणे, छतावरील पावसाचे पाणी वाहून न जाऊ देता ते जमिनीत कसे मुरविता येईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

१०. महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणात पारंपारिक पद्धतीच्या जलसिंचन साधनाचा अवलंब केला जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जलसाठ्याचा उपसा होतो. ते थांबवण्यासाठी नवनवीन जलसिंचन साधनाचा आणि पद्धतीचा अवलंब करणे काळाची गरज ठरेल.

**संदर्भग्रंथ :-**

१. सेतू माधवराव पगडी- छत्रपती शिवाजी महाराज- पृ.५
२. कित्ता- पृ.५
३. जोशी शं.ना. - शिवकालीन पत्रासार संग्रह, खंड २ - पृ.३६९
४. बेंद्रे वा.सी. - श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र - पृ. २३२
५. Highlights and Discrepancies of Maharashtra Mansoon-2015
६. https://sandip.files.wordpress.com
७. www.loksatta.com/30Aug2016

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजश्री शाहू महाराजांचे :- शेती विषयक कार्य

**लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव**
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब, ता. कळंब, जी. उस्मानाबाद.
Emil ID haribhaupawde123@gmail.com

**प्रस्तावना :-**

भारतात स्वातंत्र्यप्राप्ती पूर्वी अनेक लहान-मोठे संस्थानिक होते. यापैकी कोल्हापूरचे एक महाराष्ट्रातील संस्थान होते. या संस्थानाला 1894 साली शाहू महाराजांच्या रूपाने एक राजकीय नेतृत्व लाभले महाराजांनी आपल्या 1894 ते 1922 या राजकीय नेतृत्वाच्या कालखंडात शेतीविषयक अनेक कार्य केले.संस्थानातील सामान्य जनता हि मोठ्या प्रमाणात शेतीवरच अवलंबून आहे.हे महाराजांनी ओळखले होते जर या दारिद्र्यात खितपत पडलेल्या जनतेला बाहेर काढायचे असेल तर त्यांच्या शेतीविषयक सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.असे त्यांना वाटत असे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही शेतीव्यवसाय हा सतत तोट्यातच चाललेला आहे ,सततची नापिकी ,कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ अशा सतत कोणत्या ना कोणत्या दुष्काळाच्या झळा सामान्य जनतेला बसत असतात.यामुळे शेतकरी आत्महत्या सारखा मार्ग अवलंबत आहे. अशा कठीण परिस्थितीत व जनतेला शेती कडे आकर्षित करावयाचे असेल ,तर राजश्री शाहू महाराजांचा शेती विषयक कर्याची माहिती करून घेणे गरजेचे आहे .असा अंदाज बांधून प्रस्तुत शोधनिबंधात राजश्री शाहू महाराजांच्या अनेक कार्य पैकी एक महत्त्वपूर्ण असणाऱ्या शेती विषयक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:-**

1) राजश्री शाहू महाराजांचे सिंचन विषयक कार्याचा आढावा घेणे. 2 )राजश्री शाहू महाराजांच्या नव पीक लागवडीच्या प्रयोगाची तपासणी करणे.

3)शाहू महाराजांच्या शेतीविषयाला आधुनिकतेची जोड कशा प्रकारे दिली होती हे पाहणे.

4) शेती विषयक मदत करताना कोणत्याही परताव्याची अपेक्षा न धरणाऱ्या शाहू महाराजांचा शेती विषयीची असणारी तळमळ पाहणे.

**गृहितके:-**

1) शाहूं महाराजांनी शेती सिंचनासाठी विशेष प्रयत्न केले होते .

2) शाहूं महाराजांनीशेतीत नव पीक लागवडीला प्रोत्साहन दिले होते.

3) शेती पिकाच्या संरक्षणासाठी शाहू महाराजांनी खबरदारी घेतली होती .

4)शाहुंनी शेतीतील नव अवजारे व बी-बियाणे औषधी यांचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले होते.

**राजश्री शाहू महाराजांचे शेती विषयक कार्य:**

छत्रपती शाहू महाराज हे कृतिशील सुधारक होते राज्य रोहन प्रसंगी सामान्य जनतेला दिलेल्या वचनपूर्ती प्रमाणे ,आपल्या राज्याचा मुख्य घटक असलेल्या शेती व शेतकरी वर्गाकडे त्यांनी विशेष असे, लक्ष पुरविले शेतीसाठी प्रमुख घटक असणाऱ्या पाण्यासाठी त्यांनी लक्ष दिले शेतीला मुबलक रित्या पाणीपुरवठा व्हावा, सिंचनासाठी पाण्याचा तुटवडा होणार नाही, यासाठी राज्यात अनेक लहान मोठ्या तलावाची नव्याने बांधणी केली राज्यात असणाऱ्या जुन्या तलावांच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले .कच्च्या व पक्क्या विहिरीची निर्मिती करून पाण्याची साठवणूक करण्यासाठी अनेक सुविधा तयार केल्या, याचबरोबर ज्या भागात वारंवार दुष्काळ पडतो अशा दुष्काळग्रस्त भागात कायमस्वरूपी मदत व्हवी यासाठी त्यांनी आपल्या राज्यातील सन 1902 मध्ये महत्त्वपूर्ण असे पाटबंधारे धोरण जाहीर केले. पाटबंधारे खाते निर्माण करून त्यावर खास इरिगेशनच ऑफिसर ची नेमणूक केली. एवढ्यावर न थांबता महाराजांनी आपल्या राज्यात जल धोरण आखण्यासाठी प्रत्येक गाव गावची जलव्यवस्थापणाच्या व पाठबंधारे निर्मितीच्या

दृष्टीने तपशिलवार व बारकाईने पाहणी करण्यात आली. १ अशाप्रकारे राजश्री ने शेतीसाठी पाण्याचे महत्त्व ओळखून पाण्याकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसून येते.

शेतीसाठी पाणीपुरवठा बरोबरच शाहू महाराजांनी परंपरागत शेती व्यतिरिक्त शेतात नवीन पीक लागवड व्हावी याकडेही लक्ष देण्यास सुरुवात केली. या नव-पीक लागवडीमध्ये लक्षणीय प्रयोग म्हणजे कॉफी व चाहा लागवडी होय. दक्षिण भारतात व संस्थानातील असणारा डोंगराळ भाग ,तेथील भूमी व हवामान परिस्थिती पाहून महाराजांनी प्रारंभिक कॉफीच्या एक हजार झाडांच्या रूपा ची लागवड मैसुरी पद्धतीने आपल्या राज्यात केली.पुढे नंतरच्या काळात कॉफीच्या उत्पादनात अत्यंत गतीने वाढत गेले .याशिवाय विविध नव लागवडीचे प्रयोग करताना यापासून उत्पादना बरोबरच आपल्या राज्यातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध व्हाव्यात असा त्यांचा एक दृष्टिकोन होता. रेशीम वेल दोडे, कोको,रबर ,ताग ,अंबाडी लाख ,शिंगाडा , टपीओका, काबोडिया, कापूर इत्यादी अनेक रोखं उत्पादन देणाऱ्या पिकांच्या बाबतीत ही त्यांनी आपल्या राज्यात आणि अनेक नव प्रयोग करून त्याची लागवड वाढविली. या झाडांची रोपे जास्तीत जास्त तयार व्हावीत म्हणून अनेक बागा राज्यात जोपासल्या गेल्या. या बागांमध्ये हिरडा, जांभूळ, काजू ,साग ,आंबा,मोह, फणस इत्यादी झाडांची वाण तयार करण्यात येत होते .याच बरोबर निलगिरी होऊन औषध वनस्पती, बंगलोरहून रबर आणि कोको सऱ्हनपूरच्या बॉटनिकल गार्डन मधून मोलेवान प्रतीचे लाकूड ,कांग्रा व्हॅली मधून चहाची बी आणून त्यांची मोठ्या प्रमाणात .2आपल्या राज्यात लागवड करण्याचे प्रयत्न शाहू महाराजांनी केले. ते नव पिकाच्या लागवडी क्षेत्राची वाढ करूनच थांबले नाही,तर त्यांनी शेती चांगल्या प्रमाणात पिकली आणि या पिकलेल्या पिकाचे संरक्षण चांगल्या प्रकारे झाले नाहीतर ,शेतीतील पिकलेले हे पीक हाताला आलेले असतानाही ते शेतकऱ्याला गमावून बसावे लागते, हे ओळखून राजश्री शाहू महाराजांनी या शेतात पिकलेल्या पिकाच्या संरक्षणासाठी ही अनेक उपाय योजना केल्या, होत्या पिकांची नासाडी करणाऱ्या पशूंना ठार मारण्यासाठी त्यांनी खेड्यातील अधिकाऱ्यांना हुकूम करून ,त्यांना शेतीची नासाडी करणाऱ्या डुकरांना लोकांच्या मदतीने ठार मारण्यास सांगितले, संस्थानातून त्यांना बंदुकी देण्यात आले .आणि या शस्त्रास्त्रांची जबाबदारी पाटलांवर सोपविण्यात आली ,दुष्काळाचा सामना करण्यासाठी तसेच शेतीमालाची साठवणूक करण्यासाठी शाहू महाराजांनी सहकारी कोठार निर्मितीस प्रोत्साहन दिले .3 अशाप्रकारे शाहू महाराजांनी वेगवेगळ्या नवपीक लागवडीबरोबरच त्यांच्या संरक्षणासाठीच्या उपाय योजना कडे ही,विशेष लक्ष देऊन उत्पादन झालेल्या उत्पादनाची योग्य प्रकारे साठवणूक करता येईल याकडेही स्वतः जातीने लक्ष दिल्याचे दिसून येते. राजश्री शाहू महाराजानी शेतीसाठी लागणारे सुधारित अवजारे, बी-बियाणे ,रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीच्या पद्धती, यांचे ज्ञान व प्रशिक्षण देण्यासाठी खास आशा शेती अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या होत्या, शेतकरी वर्गास आधुनिक शेतीची गोडी लागावी म्हणून ,संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव,ज्योतिबा यात्रा अशा प्रसंगी 'शेतकी प्रदर्शने 'भरविली जाऊ लागली ,अशा शेतकी प्रदर्शनातून आधुनिक शेतीची साधने, उत्कृष्ट उत्पादनाच्या धान्याचे नमुने ,माहितीपत्रके आदींची मांडणी केलेली असे त्याचबरोबर उत्तम पैदाशीच्या जनावरांचे प्रदर्शन भरविले जाईल. काही प्रसंगी या शेतकी प्रदर्शना बरोबर आपल्या प्रजे मध्ये विशेष शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने अशा प्रदर्शनाकडे आकर्षिला जावा म्हणून ,त्या सोबत कुस्त्यांच्या दंगलीत ,मर्दानी खेळांचे सामने, हत्तीच्या झुंजी यासारख्या करमणुकीचे कार्यक्रम आयोजित केले जात. 4 महाराजांनी शेतीसाठी आधुनिक पद्धतीची गरज ओळखून त्याची सांगड शेतीव्यवसायाला घालण्याचा सतत प्रयत्न केला होता. याचे एक उदाहरण पुढील प्रमाणे ,जगात पहिले महायुद्ध सुरू झाल्याने त्याचा परिणाम व्यापार- कारखानदारी व कृषी या क्षेत्रावरही दिसून येऊ लागला. सहाजिकच युद्धाची झळ जगाबरोबर भारतातील उद्योगधंदे- कारखाने व कृषी यांनाही बसू लागली. या काळात देशात उभे असणारे उद्योग -कारखाने बंद पडण्याच्या उंबरठ्यावर येऊन थांबली होती.याचे कारण म्हणजे भारत देशा अंतर्गत चालणाऱ्या या उद्योगधंद्यासाठी व कारखान्यासाठी लागणारा कच्चामाल हा ब्रिटिशांच्या कृपा दृष्टी वर व मदतीवर अवलंबून होता.पण ब्रिटिश पहिल्या महायुद्धात गुंतल्यामुळे ही आयात थांबली ,याचा परिणाम इतर उद्योग धंदा बरोबर, सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील किर्लोस्करवाडी या ठिकाणी किर्लोस्करांनी जो शेतीसाठी नांगर लागतो, त्या नांगराचे फाळ तयार करण्यासाठी एक कारखाना उभा

केला होता. पण सन 1916 दरम्यान फळ निर्मितीसाठी जे लोखंड लागत होते. त्याची इंग्लंडहून जी आयात येत होती, ती पूर्णपणे थांबली होती. त्यामुळे कारखाना बंद पडण्याच्या मार्गावर आला, यावेळी किर्लोस्कर कारखान्यातील शंकररावांनी कोल्हापूरच्या टेक्निकल स्कूलचे सुप्रीटेडन यस. व्ही. काटे यांच्याशी संपर्क साधून कोल्हापूर संस्थानातील किल्ल्यावर ज्या जुना तोफा गंजत पडल्या होत्या, त्या मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला .त्यासाठी म्हणून ही सर्व मंडळी राजश्री शाहू महाराजांना भेटण्यासाठी नवीन राजवाड्यावर आली "किर्लोस्ककरणकडची माणसे आली आहेत"बापूसाहेबांनी महाराजांना परिचय करून दिला "काय काम काढले?" महाराजानी प्रतिप्रश्न केला . आपल्या किल्ल्या वरील तोफा हवे आहेत," ते आणि कशासाठी" शंकरराव कडे पाहतच महाराज उद्गारले, युद्ध सुरू झाल्यामुळे लोखंड मिळत नाही म्हणून नांगर बनविण्यासाठी त्यांना तोफा हव्यात ,'असं होय',शेतकऱ्यांच्या उपयोगी जर त्या तोफा पडत असतील तर त्यांना द्या 5 या प्रसंगावरून लक्षात येते की शेतीसाठी सहाय्य करण्यासाठी शाहू महाराज सदैव तत्पर होते, वेळ प्रसंगी कोणत्याही परताव्याची अपेक्षा न करता शेती उपयोगी फाळ बनवणाऱ्या किर्लोस्कर यांना तोफा त्यांनी देऊन टाकल्या. छत्रपती राजश्री शाहू महाराजांनी संस्थानातील जनतेचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून, शेती ,उद्योगधंदे व व्यापार याकडे विशेष लक्ष दिले, त्याच बरोबर आपल्या संस्थानातील शेती ला नियमित व मुबलक पाणीपुरवठा व्हावा ,म्हणून राधानगरी धरणाची योजना राबवली होती .कोल्हापूर येथे गुळाची बाजारपेठ सुरू केली. सन 1897 मध्ये कोल्हापूर संस्थानात भयंकर दुष्काळ पडला होता दुष्काळात गरीब शेतकऱ्यांना स्वतःची जनावरे सांभाळण्यासाठी सरकारी तिजोरीतून खर्चाची तरतूद करून व्यवस्था लावण्यात आली होती. महाराजानी सामान्य शेतकऱ्यांची सावकारी जाचातून मुक्तता करण्यासाठी अनेक योजना आखल्या होत्या. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे गहाण होत्या, त्यांना कर्ज उपलब्ध करून दिले व जमिनी सोडवण्यास मदत केली. 6 शाहू महाराजांनी राज्यातील शेतकर्याना मदत करण्यासाठी कधी मागे पुढे पाहिले नाही.

**सारांश :**

छत्रपती शाहू महाराज हे एक कर्ते सुधारक होते. त्यांनी आपल्या संस्थानातील शेतीविषयक अनेक सुधारणा घडवून आणण्यासाठी सर्वत्वपरीने प्रयत्न केले .यामध्ये शेतीसाठी पाण्याचे महत्त्व ओळखून त्यांनी शेतीला मुबलक व नियमित पाणी मिळावे ,यासाठी जुन्या तलावांची ,विहिरींची दुरुस्ती केली .नवीन विहिरी, तलाव खोदले शेतीचे उत्पादन  वाढविले यासाठी नवनवीन उत्पादन देणारे पीकांची लागवड करण्यास प्रोत्साहन दिले .पीकांचे संरक्षण व जतन व्हावे यासाठी सतत दक्ष राहिले ,या उत्पादनाच्या साठवणीसाठी धान्य कोठार निर्मिली. शेतीला आधुनिकतेची जोड मिळावी यासाठी विशेष प्रयत्न केले एकंदरीत राजश्री शाहू महाराजांनी शेतीचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सतत प्रयत्न केले व त्यासाठी आपल्या संस्थानाच्या तिजोरीत सतत खुली ठेवली.

**संदर्भसूची :**

1. संपादक प्रा. आर.डी राठोड ; राजश्री शाहू महाराज:सामाजिक सुधारणा व सद्यस्थिती अरुणा प्रकाशन, लातूर, 2017.[पृष्ठ क्र. 277]
2. संपादकप्रा.डॉक्टरअशोकनाईकवाडे; राजश्रीछत्रपतीशाहूमहाराज विद्याभारती प्रकाशन, लातूर. 2012 [पृष्ठ क्रमांक 84 ]
3. संपादकडॉ. आर.एन.करपे ; राजश्री शाहू महाराज आणि वर्तमान काळातील संदर्भ चिन्मयप्रकाशन,औरंगाबाद.2012 [पृष्ठ क्रमांक 141]
4. डॉ.जयसिंगरावपवार; राजश्रीशाहूछत्रपतीजीवनवकार्यमहाराष्ट्रइतिहासप्रबोधनी,कोल्हापूर.2012 [पृष्ठ क्रमांक 143]
5. नानासाहेबसाळुंखे; शाहूच्याआठवणीवृषालीप्रकाशन,कोल्हापुर.2008 [पृष्ठ क्रमांक111]
6. अरुणनवले;भारतीयक्रांतिकारकआणिसमाजसुधारक साकेत प्रकाशन, पुणे' 2019 [पृष्ठ क्रमांक 175]

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजश्री छत्रपती शाहू महाराज एक थोर विचारवंत

**श्रीमती नाटकर संगीता शेषराव**
ग्रंथपाल संत रामदास महाविद्यालय घनसावंगी जि- जालना.
natkarsangita 7@gmail.com

**प्रस्तावना-**

समाजाच्या दु:खांशी नातं सांगणाऱ्यांना, शतकांची कुंपणं अडवत नाहीत. ते शब्द कुरवाळीत नाहीत अन् खाजगी व्यथाही गोंजारत नाहीत! सभोवतीच्या दुःखांना आव्हान देत येतात. या समाजातल्या दु:खभरल्या रात्री अन् अंधारलेली मने उजळून लख्ख करतात. अशी ही परमेश्वराप्रमाणे पूजनीय व्यक्तिमत्त्व म्हणजेच आपले समाजसुधारक होत. असाच एक वंदनीय समाजसुधारक मराठी मातीत जन्मलेला आहे, जो आज महाराष्ट्राचंच नव्हे तर जगाचं भूषण ठरला आहे आणि तो म्हणजे राजश्रीशाहूमहाराज आधुनिक भारताच्या स्थापनेपूर्वी भारतात संस्थानिकांची राजवट होती पुढे भारतात ब्रिटिश राजवट इसवी सन सोळाशे पासून सुरू झाली तेव्हा भारतीय संस्थानिक ब्रिटिश राजवटीची एकनिष्ठ राहू लागले इसवीसन अठराशे सत्तावन मध्ये भारतात स्वातंत्र्ययुद्धाचा पहिला उठाव झाला या उठावात भारतीय संस्थानिक अलिप्त राहिले त्यांचे प्रमुख कारण म्हणजे ब्रिटिशांनी संस्थानिकांच्या राज्यकारभारावर देखरेख करण्यासाठी राजकीय निरीक्षक नेमली त्यामुळे संस्थानिकांनी उठावा सहकार्य केले नाही. अशा कठीण परिस्थितीतही महाराष्ट्राचे बडोद्याचे गायकवाड व कोल्हापूरचे राजश्री छत्रपती शाहू महाराज या संस्थानिकांनी सामाजिक सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू ठेवले होते येथे आपण राजश्री शाहू महाराज यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा व चरित्राचा अभ्यास करूया अल्पसा परिचय महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहासात राजश्री छत्रपती शाहू महाराजांचे कार्य अग्रगण्य होते ते बहुजन समाजाचे थोर नेते होते शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग बहुजन हितासाठी केला म्हणून असते राज्यामध्ये ऋषी ऋषी मध्ये राजे म्हणून ओळखले जातात शाहू महाराजांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात 26 जुलै 1874 मध्ये झाला वडील जयसिंग बाबासाहेब घाडगे होते त्यामुळे मूळ नाव यशवंतराव होते कोल्हापूरच्या चौथ्या शिवाजीचा दुःखद अंत झाला तेव्हा कोल्हापूरच्या गादीचा वारस असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा राणी आनंदीबाई यांनी यशवंतरावांना सन 1874 मध्ये दत्तक घेतली व त्यांचे नाव शाहू छत्रपती असे ठेवले या राजकुमाराच्या शिक्षणाची उत्कृष्ट सोय व्हावी म्हणून ब्रिटिश शिक्षक यांची नेमणूक केली उच्च शिक्षण इंग्लंडमध्ये घेतली विदेश आवरून परत आल्यावर इसवीसन 1894 मध्ये त्यांनी कोल्हापूरच्या गांधी चे सूत्रे हातात घेतली सुमारे 28 वर्ष त्यांनी उत्कृष्ट राज्यकारभार केला .या त्याच्यांकाळातील विविधकामामुळे ते प्रत्येक भारतीयांच्या मनात आज ही ठाणमांडून आहेत.

**उद्दिष्टे-**

१) छत्रपती राजश्री शाहूमहाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकणे
2) छत्रपती राजश्री शाहूमहाराजांच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकणे
3) छत्रपती राजश्री शाहूमहाराजांच्या सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे
४) छत्रपती राजश्री शाहूमहाराजांचा इतिहास नवपिढीला ओळख करून देणे

**विश्लेषण-**

समाज आधाराचेमोठे कार्य केले म्हणून शाहूमहाराज लोक राजी झाले रयतेची कल्याण करणे हे राजाचे कर्तव्य आहे असे त्यांचे मत होते शाहू महाराजांनी देशात व विदेशात भरपूर प्रवास केला समाजजीवनाचे बारकाईने निरीक्षण केले आलेल्या अनुभवाचा उपयोग राजाने रयतेच्या हितासाठी केला आपल्या राज्यात जन हिताचे अनेक कायदे केले विविध योजना आखून प्रजेचे कल्याण केले सुखमणि सुखमणि राजा प्रजेच्या सुखातच राज्याचे सुख आहे हे धोरण अमलात आणली याशिवाय तळागाळातल्या जनतेसाठी संगीत वाद्य शिकार कुस्ती फड यांना उत्तेजन दिले त्यामुळे कोल्हापूर हे खऱ्या अर्थाने कला पूर्ण झालेले आपणास दिसून येते येते मध्ये अनेक गुणी कारागिरांना उत्तेजन दिले त्यामुळे सामान्य जनतेमध्ये राजाविषयी जिव्हाळा व प्रेम निर्माण झाली समाजाच्या उद्धारासाठी समाजाच्या नेतृत्वाची धुरा त्यांनी समर्थपणे वाहिली महात्मा फुले यांचा खरा वारसा त्यांनी महाराष्ट्रात चालू ठेवला ब्राह्मणेतर चळवळीला पुन्हा नवचैतन्य प्राप्त करुन दिली ब्राम्हणेतर चळवळीचे नेतृत्व खंबीरपणे केले या चळवळीच्या पाठीमागचा छत्रपतींचा प्रमुख हेतू सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा होता समाजातील सामाजिक विषमता नष्ट करण्यावर त्यांनी अखेर प्रयत्न अखेरपर्यंत भर दिला सन इसवी सन 1897 च्या दुष्काळात त्यांनी स्वस्त दराची दुकाने राज्यातून जनतेला धान्य उपलब्ध करून दिले जनावरांसाठी शासकीय करणे उपलब्ध करून दिली बिगर ब्राह्मण वर्गासाठी नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या इसवी सन 1906 मध्ये शाहू मिल सुरू केली कल्याणासाठी सहकारी कायदा करण्यात कायदा राज्यात सुरू केला प्रजेने शिकून शहाणे व्हावे म्हणून राज्यात प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू केला शिक्षण सक्तीचे व मोफत केले यावरून शिक्षणाविषयी त्यांची दूरदृष्टी लक्षात येते याशिवाय प्रजेसाठी त्यांनी केलेल्या सुधारणा पुढीलप्रमाणे शैक्षणिक कार्यशिक्षणाशिवाय बहुजन समाजाला तरणोपाय नाही हे महात्मा फुले यांनी ओळखले होते या धोरणाचा स्वीकार शाहू महाराजांनी केला बहुजन समाजाला मानाचे स्थान मिळवण्यासाठी शिक्षण एक महत्त्वाचे साधन आहे तसेच समाजातील वर्ण व्यवस्था नष्ट करण्याचे शिक्षण एक साधन आहे हे ओळखून शाहू महाराजांनी आपल्या सत्तेचा उपयोग शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी केला शिक्षण क्षेत्रात वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी कमी करण्यासाठी बहुजन समाजाला शिक्षण प्रसाराचे महत्त्व पटवून दिले शिक्षण गरिबांच्या झोपडीपर्यंत पोहोचविण्याचे भगीरथ प्रयत्न केले खेड्यातील विद्यार्थ्याला शहरात शिक्षण घेता यावे म्हणून सर्व धर्मियांच्या मुलांसाठी वेगवेगळी वसतिगृहे सुरू केली अस्पृश्यांच्या मुलांसाठी उच्च शिक्षण मोफत देण्याची सोय उपलब्ध करून दिली त्यामुळे तरुण आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी लंबी बनण्यास मदत झाली शिक्षणाबरोबर धंदे विषयाची सोय केली यामुळे होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना समर्थ जीवन जगण्यास मदत झाली पुणे नागपूर अहमदनगर इत्यादी ठिकाणी सुरू असलेल्या शिक्षण संस्थांना त्यांनी उदार अंतःकरणाने मोठ्या देणग्या दिल्या हुशार विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देऊन त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले अशा प्रकारच्या शैक्षणिक सवलती केवळ आपल्या राज्यातीलच नव्हे तर राज्याबाहेरील विद्यार्थ्यांना देखील त्यांनी उपलब्ध करून दिल्या बहुजन समाजाला प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून इसवी सन 1916 मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत. याशिवाय अस्पृश्योद्धाराचे संबंधीचा काय दाबलं विवाह नोंदणी कायदा इत्यादी पुरोगामी कायदे करून त्यांनी राज्यात अंमलबजावणी केली शाहू महाराज कलाप्रेमी राजे होते त्यांनी साहित्य संगीत नाटक चित्रपट कुस्ती इत्यादी क्षेत्रात अनेक कलाप्रेमी मंडळी यांना प्रोत्साहन दिले खासबाग मैदान त्यांनी बांधलेले अनेक महिलांना त्यांनी आपल्या दरबारी ठेवून राजाश्रय दिला त्यामुळेच कोल्हापूरचा मल्लांचे केंद्र व मल्लाविद्या यांचे तीर्थक्षेत्र म्हणून आहे.छत्रपतींनी पुरुषांच्या

बरोबरीने स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले शिक्षण घेणाऱ्या मुलींना फी माफी व शिष्यवृत्या चालू केल्या त्यामुळे स्त्रियांची प्रगती होण्यास मदत झाली

**सामाजिक सुधारणा कार्य-**

हिंदू धर्मात सामाजिक विषमता मोठ्या प्रमाणात होती जाती व पोटजाती मुळे सामाजिक ऐक्य राहिले नव्हते याचा राष्ट्रीय ऐक्याला मोठा परिणाम होत होता तेव्हा शाहूराजांनी समाजातील जाति प्रथेचे उच्चाटन करण्याचे कार्य हाती घेतले सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांनी सतत संघर्ष केला. समाजातील जातिभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विविध मार्गांचा अवलंब केला जातीयतेचे उच्चाटन करण्यासाठी स्वतःच्या कृतीने उदाहरण घालून दिले जातीयतेची कृतीम बंधने तोडून टाकण्यासाठी अनेक व्याख्याने दिली तसेच ठिकाणी सामाजिक विषमतेविरुद्ध परिषदा आयोजित केलेल्या सार्वजनिक ठिकाणी सर्वांसाठी खुली केली एका महान माणसाला हॉटेल उघडून दिली राजे असून ते सर्वांच्या बरोबर हॉटेलमध्ये चहा घेत यावरून त्यांचे अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य लक्षात येते समाजाचा उद्धार बरोबरच रयतेच्या कल्याणासाठी सामाजिक तलाव शाळा विहिरी दवाखाने सुरू केले आपल्या राज्यात माणगाव येथे इसवी सन 1920 मध्ये सर्व धर्मातील लोकांची परिषद भरवून अस्पृश्य बंधुना डॉक्टर आंबेडकर यांचे नेतृत्व स्वीकारण्यास सांगितले .इतर सुधारणा राजर्षी शाहूंनी आपल्या संस्थानात रयतेचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून विविध सुधारणा केल्या राज्यात शेती उद्योगधंदे व्यापार कला इत्यादी बाबतीत प्रगती केली राधानगरी धरण पंचगंगेला बांधून शेतातील पाणीपुरवठ्याची सोय केली दुष्काळात शेतकऱ्यांना धान्य व जनावरांना कुरणी व चारा देऊन मदत केली शाहू मी सुरू करून मजुरांना नोकऱ्या दिल्या सहकाराचा पाया घालून जनतेचा विकास केला अशा प्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी अल्प काळात राज्यात विविध सुधारणा राबविल्या त्यामुळे तिची सर्व दुसरे प्रगती झाली जनता त्यांना राजे शिवछत्रपती म्हणून संबोधू लागले यावरून जनतेच्या राजाच्या कार्याची कल्पना येते पुढे कार्य आणि सामाजिक क्रांतीचा एक प्रकारे चालना मिळाली महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सामाजिक क्रांतीचा वारसा अर्थाने शाहू महाराजांनी पुढे चालू ठेवला राज्याच्या सामाजिक कार्यामुळे बहुजन समाजाची प्रगती झाली महाराष्ट्रात सामाजिक व राजकीय चळवळी पुढे निघाला त्यांचा पाया घालण्याचे श्रेय छत्रपती शाहू महाराजांनाच द्यावे लागते.

**शैक्षणिक कार्य-**

छत्रपतीशाहूमहाराजांनी खेड्यापाड्यात प्राथमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून 1920 ला गाव तिथे शाळा ही संकल्पना राबविली त्यानुसार प्रत्येक गावातील देवळात चावडीवर धर्मशाळेत शाळा सुरू केल्या. 25 जुलै 1917 रोजी त्यांनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शाळा शिक्षणाचा आदेश काढला त्यासाठी एक लाख रुपये मंजूर करून तसेच एक स्वतंत्र खाते सुरू केले होते. पालकांना दंड आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची सक्ती आई-वडिलांवर केली होती आपली मुले शाळेत न पाठविल्यास पालकांना प्रतिमहिना एक रुपया दंड आकारला जाईल असा लेखी हुकुम काढला त्यामुळे पालक आपल्या मुलांना नियमित शाळेत पाठवू लागले. खाजगी शिक्षण संस्थांच्या प्राथमिक शाळांना देखील आर्थिक साह्य दिले होते दर वर्षी तीन हजार रुपये आणि 30 विद्यार्थ्यांना भोजन खर्च म्हणून दोन हजार रुपये दरवर्षी देण्याची तरतूद केली होती. शाळा-कॉलेजमध्ये जातीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला तर तो

कायद्याने गुन्हा मानण्यात येईल तसेच भेदभाव करणाऱ्या अधिकाऱ्याला नोकरीतून काढून टाकण्यात येईल असा सक्त होतो महाराजांनी काढला होता यामुळे शाळा-महाविद्यालयात भेदभाव पाळणाऱ्या अधिकाऱ्यांवर वचक निर्माण झाली. देवळात दान दक्षिणा च्या रूपाने जो पैसा गोळा होईल तो शाळेसाठी खर्च केला जाईल. एखादा विद्यार्थी शाळेत येत नसेल तर शिक्षकांनी त्या मुलाच्या घरी जाऊन त्याबाबत चौकशी करावी तसेच पालकांनी आपल्या मुलाला दररोज शाळेत पाठविण्याबाबत जागरूक असावे असे महाराजांना वाटत होती. शिक्षण कराची आकारणी महाराज आणि शहरातील सर्व श्रीमंत व्यापारी सावकार वकील डॉक्टर्स यांच्यावर शिक्षण कर आकारला गावात हा कर कुटुंबामागे आणण्यापासून ते एक रुपया पर्यंत द्यावा लागेल. प्राथमिक शिक्षणाची संपूर्ण व्यवस्था करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी तज्ञांची एक उच्चाधिकार समिती नेमली होती या समितीला आपला अहवाल द्यावा असे लागत असेल. दलित आणि अस्पृश्य विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षण घेता यावे म्हणून शिष्यवृत्तीची तरतूद केली होती त्यांना पाट्या पेन्सिल पुस्तके मोफत देण्यासाठी अडीच हजार रुपये मंजूर केली होती शाळांमधील अस्पृश्य भाव नष्ट केला. महाराजांनी पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षणात समान स्थान द्यावे याकडे लक्ष केंद्रित केले होते मुलांच्या शाळेत मुली उत्तीर्ण झाल्यास शिक्षकांना इनाम बक्षीस म्हणून 512 रुपये मंजूर केले होते म्हणजेच महाराज आणि मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले होते. खेड्यातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून महाराजांनी जातवार वस्तीगृह कायदा केला त्यानुसार मराठा वस्तीगृह लिंगायत वस्तीगृह जैन वस्तीग्रह मुस्लिम वस्तीग्रह वस्तीग्रह निर्माण केली. दिल्ली दरबार पाटील शाळा शाहू महाराजांनी खेडेगावातील पाटील लोकांना कार्यक्षम करण्याच्या पद्धतीचे शिक्षण देणारी दिल्ली दरबार पाटील कार्यशाळा 15 मे 1912 रोजी सुरु केली. 1919 मध्ये महाराजांनी वैद्यकीय शिक्षण देण्यासाठी श्री शिवाजी वैद्यकीय विद्यालयाची स्थापना केली होती समाजात पसरलेल्या वाईट चालीरिती तोडण्याचे काम या विद्यालयातून होऊ लागले. आरक्षणाची तरतूद/शाहू महाराजांनी सरकारी नोकरीतील उच्च वर्गाच्या मक्तेदारीला आव्हान म्हणून अस्पृश्य आणि मागास जातीची नोकऱ्यांमध्ये 50 टक्के आरक्षण ठेवले त्यामुळे गरीब अस्पृश्य आणि मागास जातीच्या लोकांना नोकऱ्यांमध्ये प्रतिनिधी मिळू लागले. बहुजन समाजातील मुलांच्या उच्च शिक्षणासाठी त्यांनी काही विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी पाठविले होते मुलांनी उच्च शिक्षण घेऊन देशाच्या विकासात हातभार लावावा हा त्यामागील दूरदृष्टी होती त्यात अमेरिकेत शिक्षणासाठी जाणाऱ्या दादू कोळसे हनुमंत पाटील बळी जाधव या विद्यार्थ्यांना खर्चासाठी प्रत्येकी 27 रुपये बिनव्याजी मंजूर केले. महाराज आपल्या संस्थांच्या उत्पन्नातून दरवर्षी एक लाख रुपये प्राथमिक शिक्षणावर खर्च करीत होते त्या वेळी प्राथमिक शिक्षकांचा पगार प्रतिमहा 12 रुपये इतका होता. दरवर्षी शाळांची प्रगती किती झाली यासाठी दरमहा शाळा तपासणी करून त्यांचा अहवाल पाठवण्यासाठी मामलेदार त्यांच्यावर जबाबदारी सोपविली होती तसेच गाव पाटलांनी सुद्धा दिवसातून एकदा शाळा तपासून मुलांचा आकडा विजिट बुक मध्ये नमूद करावा व त्यावर स्वाक्षरी करावी अशी सक्ती केली होती त्यामुळे शिक्षकांच्या सहकार्याचे मूल्यमापन व विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती समजून घेता येत होती. शाळेत शिक्षकांची नेमणूक करताना किमान इंग्रजीचे ज्ञान असावे तसेच निवडणुकीपूर्वी त्याला एका परीक्षेला बसून उत्तीर्ण व्हावे लागेल. महाराजांनी ग्रंथालयाला अनुदान देण्याची पद्धत सुरू केली गरीब मुलांना ग्रंथ

पुरवण्यासाठी पुस्तक पेढी योजना सुरू केली. महाराजांनी मुलांना लष्करी शिक्षण देण्यासाठी इफट्री स्कूल सुरू केली. तांत्रिक शिक्षण देण्यासाठी टेक्निकल इन्स्टिट्यूट ची वाढ केली. शिक्षक प्रशिक्षण केंद्र. .. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासातील एक महत्त्वाचा घटक असतो म्हणून महाराजांनी 1922 आली शिक्षकांना खास प्रशिक्षण देण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण केंद्र सुरू केले. प्रत्येक गावात शाळा काढून 1912 वतनदार शिक्षक योजना सुरु केली परंतु त्यातील अडचण लक्षात घेऊन 1917 झाली त्याऐवजी पगारी शिक्षक योजना अमलात आणली. कोल्हापुरातल्या मॅट्रिकच्या परीक्षेचे केंद्र 1919 ते 20 स*** स्वप्रयत्नाने आणि स्वखर्चाने सुरू केले. अस्पृश्य मुलांना सर्वांगाच्या शाळेत प्रवेश अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असतात त्या सर्व बंद करून अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळांतून व इतर लोकांच्या मुलाप्रमाणे दाखल करून घेण्यात यावे व सरकारी शाळांमधून शिवाशिव पाहता सर्व जातीच्या व धर्माच्या मुलास एकत्र बसवण्यात यावे असा आदेश दिनांक 30 सप्टेंबर 1919 ला काठाला. वैद्यकीय शिक्षणात शिष्यवृत्ती देण्यास मंजुरी देणारा आदेश मार्च 1912 ला काढला.  शेतकी शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या रामचंद्र शेवळे कोल्हापूर या विद्यार्थ्यास पंधराशे रुपये बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले व परतफेड करिता सहा वर्षाची मुदत देणारा आदेश 10 मे 1914 रोजी काढला. ब्राम्हण विद्यार्थी वसतिगृह स्थापन करण्यास जागा उपलब्ध करून देऊन एक हजार रुपयाची मदत देण्याचा आदेश ऑक्टोबर 1915 रोजी काढला. पुणे येथील नूतन मराठी विद्यालय आला दोन हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. श्री स्वामी जगद्गुरु संस्कृत कॉलेज स्थापन करण्यास मंजुरी देण्याचा आदेश 1927 रोजी काढून मंजुरी दिली सोबतच सार्वजनिक सुट्टी जाहीर करणारा कायदा आदेशही काढला होता. विद्यार्थ्यांना मैदानी खेळ शिकविण्यास उत्तेजन देणारा कायदा मंजूर केला. हिंगणी येथील महिला आश्रमास मदत म्हणून पाचशे रुपये देण्याचा आदेश काढला.  इथं जातीप्रमाणे मुसलमान लोक ही सुशिक्षित होणे आवश्यक आहे तसेच त्यांच्या संस्थेला पैशाची मदत झाल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणार नाही म्हणून मुसलमान वस्ती ग्रहाला दरवर्षी पाचशे रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.  याशिवाय वाचनालयास मदत म्हणून पुस्तके विकत घेण्यास परवानगी दिली दत्तात्रय पारसनीस यांना शिवचरित्र लेखनासाठी आर्थिक मदत प्राध्यापक डोंगरे यांची दोन पुस्तके शाळा व वाचनालय या करिता मंजूर केली कुटुंबातील नोकरी करत असलेले वडील मृत्यू पावले आणि त्यांच्या लहान मुला मुलगा शिकत असल्यास त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत वडिलांना मिळत असलेला पूर्ण पगार देण्याची व्यवस्था कारकुनांना घरी कागद नेण्यास बंदी लोकांनी कार्यालयात वेळेवर यावे म्हणून सक्त नियमावली अस्पृश्यांच्या शिक्षणाची सोय असल्यास त्यांना बढती देण्याचे आदेश विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके पाटी-पेन्सिल करण्यास मंजुरी देणारा आदेश.जनतेच्या सर्वांगीण प्रगतीचा शिक्षण हाच पाया समजून अपेक्षित सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणे हा त्यांच्या शिक्षण विषयक धोरणाचा आणि कार्याचा उद्देश होता समाजाच्या सर्व स्तरातील लोक आत शैक्षणिक समानता प्रस्थापित करण्यासाठी छत्रपती शाहू महाराज यांनी क्रांतिकारी शैक्षणिक धोरण आखून त्यांची काटेकोर अंमलबजावणी केली. त्याकाळी कोल्हापूर हे विद्येचे माहेरघर होते वसतिगृहाच्या सोयीमुळे महाराष्ट्रातून ठीक ठिकाणी मागासलेल्या वर्गाची मुले कोल्हापुरात येऊन शिकत असत त्यामुळे कोल्हापूर हे शिक्षणाचे एक प्रभावी शैक्षणिक केंद्र

बनले होते.बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यास छत्रपती शाहू महाराजांनी आपली संपूर्ण हयात खर्ची घातली त्यासाठी त्यांना क्रांतिकारी कठोर निर्णय घ्यावे लागले .

**समारोप-**

अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालून सामाजिक स्वास्थ्य व कल्याण यांसाठी केलेले उपाय व बदल. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजात बुद्धिपुरस्सर समाज हितकारक केलेले बदल होत. सामाजिक सुधारणांचा मूळ हेतू लोकांचे प्राकृतिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक व भावनात्मक स्वास्थ्य अबाधित राखणे हा असतो. या संज्ञेची व्याप्ती वा कृतिकक्षा कालानुसार व सामाजिक कायद्यानुसार बदलत असते. उदा., कुटुंबनियोजन, सामाजिक सुरक्षा,दारिद्र्यविमोचन यांसारख्या कार्यक्रमांमुळे तिच्या कृतिकक्षेत फेरफार झालेले आढळतात. शिवाय देशपरत्वे सामाजिक सुधारणांत भिन्नत्व आढळते. समाजात सतत काहीना काही बदल नेहमी घडत असतात. सुधारणा आणि संस्कृती या माणसांच्या अभिव्यक्तीतून निर्माण झालेल्या मानवनिर्मित परंपरा व चालीरीती होत. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजाची सर्वांगीण सुधारणा होय. उदा., भारताच्या घटनाकारांनी सामाजिक सुधारणांमध्ये सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय आदी बाबींचा अंतर्भाव केला आहे.महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकरलोकहितवादी, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे, भीमराव आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंडिता रमाबाई, रघुनाथ धोंडो कर्वे इत्यादींनी समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले; अनिष्ट सामाजिक रुढींविरुद्ध लढा दिला. सामाजिक सुधारणा योग्य वेळी सर्वांच्या प्रयत्नाने अंमलात आणल्या गेल्या, तरच समाजाला योग्य दिशेने वाटचाल करण्यास मदत होईल. या सुधारणा अपेक्षेनुसार घडून येतातच असे नाही. त्यांमध्ये अनेक अडथळे येतात. हे अडथळे धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक व मानवी स्वरूपाचे असतात. याचा साकल्याने विचार करून, समाजहित डोळ्यासमोर ठेवून व सामाजिक नीतिमूल्यांची बूज राखून सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा केला पाहिजे. केवळ कायदे करून समाजसुधारणा होत नाही. कायद्याला सूज्ञ समाजाची संमती अपरिहार्य असते.तरीपणकाहीसमाजसुधारकएकध्यासघेऊननिश्चितसामाजिकपरिवर्तनकरतअसतात.

**संदर्भ-**

१) रामचंद्रपाटील(२०१७) 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास'मुबंई, दीपस्तंभ प्रकाशन प्रकाशित

२) डॉ सुवर्णा नाईक निंबाळकर (२०१४) 'समाज क्रांतिकारक राजश्री शाहूमहाराज 'पुणे, संस्कृती प्रकाशन प्रकाशित

३) रमाकांतदेशपांडे(२०२१) 'राजर्षी छत्रपति शाहू महाराज यांच्या ५१ गोष्टी'मुबंई, मनोरमा प्रकाशन प्रकाशित

४) श्रीरामग. पचिंद्रे(२०१७) 'शाहू'नागपूर अनुबंध प्रकाशन प्रकाशित

५) डॉ. जयसिंगरावपवार(२०२१) 'समाज क्रांतिकारकराज श्री शाहूछत्रपती पुणे मेहता प्रकाशन प्रकाशित

६) डॉ. रमेशजाधव(२०१७) 'लोकमान्य शाहूछत्रपती 'जयपूर राजकमल प्रकाशन प्राव्हेट लिमिटेड प्रकाशन प्रकाशित

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा जोतीराव फुले यांचे शेती विषयक विचार

**प्रा. प्रकाश साहेबराव काळवणे**
समाजशास्त्र विभाग महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रास्ताविक :**

सव्वाशे वर्षापूर्वी इंग्रज राजवटीत महात्मा जोतीराव फुले यांनी मांडलेल्या प्रश्नांची धग आजही कायम आहे. किंबहुना सद्य:स्थितीत शेतकरी आत्महत्यांनी या प्रश्नाचे गांभीर्य अधिक वाढविले आहे.महात्मा फुले यांनी इंग्रज काळात शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे प्रतिनिधित्व केले होते.शेतकऱ्यांचा असूढ,गुलामगिरी पुस्तकातून त्यांनी सरकार,नोकरशाही,सामाजिक वर्ग यांचा शेतकऱ्याप्रती असलेल्या दृष्टीकोनावर प्रखर हल्ला चढविला होता. शेती आणि शेतकऱ्यासंबंधी विषयात शेतकऱ्यांच्या प्रतिनिधित्वाचा आग्रह धरला होता. शेतकऱ्यांना बिनव्याजी पतपुरवठा, कर सवलत,सिंचनासाठी व्यवस्था,बाजार व्यवस्थेत संरक्षण,कृषी शिक्षणाची आवश्यकता आदी विषय समकालीन व्यवस्थेला पटवून देण्याचा प्रयत्न केला. सरकार,नोकरशाही,सावकारी आणि बाजार व्यवस्थेत शेतकऱ्यांची होणारी लुट थांबविण्याचे मुद्दे वारंवार उपस्थित केले.

## उद्दिष्टे :

1. महात्मा फुले यांच्या शेतकरी विषक विचारांचा अभ्यास करणे.
2. शेतकऱ्यांच्या दारिद्याची कारणे स्पष्ट करणे.
3. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारणेसाठी सांगितलेल्या उपायावर चर्चा करणे.

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखला जातो.कारण देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शेती क्षेत्राचे स्थान महत्वाचे आहे.भारतीय उद्योगांना लागणारा कच्चा माल शेतीमधूनच पुरविला जातो.म्हणून भारताच्या विकासात शेतीचे स्थान सर्वश्रेष्ठ असल्याचे दिसून येते.असे असूनही या क्षेत्राच्या समस्या अनेक वर्षापासून सुटताना दिसत नाही.शेतीचे महत्व असाधारण असताना शेतीची तत्कालीन सरकारने कायम उपेक्षा केली असे फुले यांचे मत होते.त्याचा परिणाम म्हणजे शेती मागासलेली राहिली व शेतीत काम करणाऱ्या शेतकरी वर्गास दारिद्र्यात जीवन व्यतीत करणे भाग पडले, असे महात्मा फुले यांचे मत होते. 'शेतकऱ्यांचा असूड' हे पुस्तक येण्यापूर्वी व त्या काळात महात्मा फुले यांच्या व्यतिरिक्त कोणीही शेती व शेतकरी संदर्भात फारसे चिंतन,लिखाण केल्याचे दिसत नाही. 'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकाच्या माध्यमातून प्रथमच या विषयावर सखोल,सूक्ष्म विचार करून त्यांच्या उन्नतीचे मार्ग सांगितले आहे.कृषिप्रधान देशामध्ये शेतकरी वर्गाची हलाखीची स्थिति हि एक शोकांतिका आहे. त्यामुळे शेती,शेतकरी व शेतमजूर यांच्या बाबतीत विचार अत्यंत मोलाचे आहेत. महात्मा फुले यांच्या मते, शेतकरी हा प्रतिष्ठीत मानला गेला पाहिजे, कारण तो राब-राब राबतो, अहोरात्र कष्ठ करतो. कृषिप्रधान केवळ नावालाच असून चालणार नाही, शेतकरी व शेतमजूर यांची संख्या अधिक आहे, विकासात्मक योजना आवश्यक आहे. म.फुले यांच्या मते, शेतकरी व तत्सम घटकांचा विकास झाल्याशिवाय समाज विकसित होणार नाही. शेतकऱ्यांचा असूड प्रयोजन करतांना म.फुले म्हणतात. 'शुद्र शेतकरी सद्य:इतक्या दैन्यवस्थेत आहेत कि त्यांची बाजू मांडल्याशिवाय त्यांना न्याय मिळणार नाही'.

### शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे :

**सावकारी शोषण –** तत्कालीन ब्रिटीश सरकारने जमीन महसुलात अतिरिक्त वाढ केली होती. संपूर्ण शेतमालाची विक्री करुनसुद्धा शेतसारा भरणे शेतकऱ्यांना शक्य होत नसे.त्यामुळे शेतकरी शेतसारा भरण्यासाठी पैसे नसतील तर कर्ज काढून शेतसारा भरत होता. त्यातून सावकारशाही अस्तित्वात आली.

**इंग्रज सरकारची धोरणे** - महात्मा फुले यांच्या मते, इंग्रजांनी जी भारतातील अनेक संस्थाने खालसा केली. इंग्रजांनी जंगले आपल्या ताब्यात घेतली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेची साधने बंद झाली. इंग्रजांनी विदेशी मालाची आवक वाढविल्यामुळे इथल्या कारागीरावर बेकारीचे दिवस आले. याचाही भर शेतीवर पडला. म्हणजे शेतीवर अवलंबून राहणाऱ्याची संख्या वाढली परिणामी शेतकरी आर्थिक कंगाल झाला.

**जमिनीचे तुकडीकरण** - जमिनीचे लहान तुकडे फक्त कुटुंब वाटपामुळे पडले. ती जमीन जमीन मालकाकडे बैल, नांगर नसल्यामुळे ज्या मोठ्या शेतकऱ्याकडे या बाबी होत्या त्यांच्याकडे गेल्या. त्यांना जमीन विकण्यात आली किंवा कसण्यासाठी देण्यात आली, त्यामुळे लहान शेतकरी भूमिहीन झाले.

**शेतकऱ्यांचे विविध मार्गाने होणारे शोषण** - शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला कारणीभूत असणारा घटक म्हणजे त्यांचे विविध मार्गाने होणारे शोषण होय. हे शोषण शेतकऱ्यांचा अडचणीचा फायदा घेऊन किंवा काही वेळा अज्ञानाचा फायदा घेऊन केले जात असे तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या जन्मापासून मृत्यपर्यंत कोणता ना कोणता धार्मिक विधि करावा लागत असे. त्यातून अडाणी शेतकरी लुबाडला जाई. भारतीय शेतकरी उत्पन्न कमी असूनही खर्च जास्त करीत असत. त्यातून त्यांना सावकाराकडून कर्ज घेतल्याशिवाय पर्याय उरत नसे.सावकाराचे व्याजदर जाचक असे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दुरवस्था होण्याचे हे एक कारण होते.

**ब्रिटीश नोकरशाहीकडून झालेले शोषण** - ब्रिटीश कर्मचारी व अधिकारी मांसाहारी असल्याने शेती उपयोगी पशुधनाची हत्या करत होते. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असे. गायी व बैल यांचा पुरवठा कमी होत होता, म्हणून फुलेंनी त्यांना ॥ ग्राम राक्षस ॥ कलम कसाई ॥ अशी विशेषणे वापरली आहेत.

**धार्मिक शोषण** – म.फुले यांनी "शेतकऱ्यांचा असूड" आणि "ब्राम्हणांचे कसब" या ग्रंथात भटभिक्षुकाकडून शेतकऱ्यांचे शोषण कसे होते याचे चित्रण केले आहे. म. फुले म्हणतात की, शेतकऱ्यांच्या ज्या अंधश्रध्दा आहे, देवभोळेपणा आहे, त्याचा फायदा या पुरोहितांनी घेऊन शेतकऱ्यांना व्रत, विधी, पूजापाठाचे शुल्क कायम त्यांच्या पाठीमागे लावले. हे पुरोहित वस्तू आणि पैशाच्या स्वरूपामध्ये शेतकऱ्यांकडून लुबाडतात.याशिवाय भारतात पडणारे दुष्काळ आणि जनावरांचे साथीचे आजार यामध्ये अनेक गुरांचा मृत्यु होत असे.

**शेतकऱ्यांच्या समस्येवर महात्मा जोतीराव फुले यांनी सुचविलेल्या उपाययोजना :**

1. शेतीविषयी जोतीबा फुले यांनी दिलेला संदेश आजही आपणास उपयोगी आहे. त्यांनी १०० वर्षापूर्वी "पाणी आडवा-पाणी जिरवा" ही संकल्पना सांगितली होती. ती आजही आपणास उपयोगी पडते.
2. मालाला योग्य भाव मिळावा त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या अडचणी, त्यांचा होणारा अनावश्यक खर्च, कर्ज काढून केलेली लग्न कार्य हे त्वरित थांबवावे, असे त्यांनी शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात अचूक भाष्य केले होते.
3. डॉक्टरांच्या नेमणुका सरकारने कराव्यात, बालविवाहावर बंदी घालावी, शेतकऱ्यांच्या आजूबाजूला वाघ्या-मुरळीच्या गाण्यावर बंदी घालावी. अशा प्रकारे नितीमत्ता प्रबळ करणारे उपाय ही महात्मा फुले सुचविताना दिसतात.
4. शेती सुधारण्यासाठी त्यांनी शेती संबंधीचे अत्याधुनिक ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. तत्संबंधिचे ग्रंथ त्यांना उपलब्ध झाले पाहिजे, उत्तम बैल त्यांना मिळाले पाहिजे, जनावरासाठी जंगले मोकळी राहिली पाहिजेत, वाहणाऱ्या पाण्याला अडवून पोलीस व सैन्यामार्फत बंधारे घातले पाहिजे, इत्यादी अनेकविध उपाय म.फुले यांनी सुचविले आहेत.
5. शेतकऱ्यांचे शोषण हे तात्काळ थाबविले पाहिजे. म.फुले यांचे शोषण विषयक विचार म्हणजे त्यांचा लुटीचा सिद्धांत होय.
6. शेतीच्या विकासासाठी खेड्यापाड्यातून "कृषी रक्षक" योजना राबविली पाहिजे.शेतकऱ्यांचे शेतीतील काम आटोपल्यानंतर त्यांनी रिकाम्या वेळामध्ये एकत्रित आले पाहिजे व शेतीमधील उत्पादनावर चर्चा

केली पाहिजे. हे करण्यासाठी गाव पातळीवर "कृषी सुरक्षा दल" किती महत्वाचे आहे हे सांगितले पाहिजे.

7. अधिक उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना नवीन माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. यंत्राद्वारे शेती करता येईल एवढे ज्ञान शेतकऱ्यांना द्यावे. शेतकरी अधिक उत्पादन काढतील अशा शेतकऱ्यांना सरकारने उत्तेजन म्हणून बक्षीस देण्यात यावे असे महात्मा फुले यांचे मत होते.

**सारांश :**

अशा प्रकारे महात्मा फुले यांनी "शेतकऱ्यांचा असूढ" आणि "ब्राम्हणांचे कसब" व इतर ग्रंथातून शेतकऱ्यांचे शोषण, सावकार, नोकरदार व इतर घटक कशा प्रकारे त्यांची सर्वांगाने लुट आणि शोषण करतात. यासंबंधी प्रखरपणे आणि मार्मिकपणे लिखाण आपल्या ग्रंथातून केले.महात्मा फुलेंनी सुचविलेल्या उपाययोजना मूलगामी होत्या आणि आजही त्या तितक्याच महत्वाच्या आहेत.शेती व शेतकरी यांचा समग्रपणे व सुसंगतपणे विचार करणारे महात्मा फुले हे पहिले एकमेव सुधारक होते.

**संदर्भ :**

1. कीर,धनंजय.१९७०. महात्मा फुले गौरव अंक. रत्नागिरी : विद्याप्रसारक सोसायटी
2. विभूते, नूतन. १९९४. म.फुले यांचे शेतीविषयक विचार. मुंबई : मनोविकास प्रकाशन
3. वैद्य, वसंत. १९८६. भारतीय सामाजिक विचारवंत. नागपूर : विश्वभारती प्रकाशन
4. रानडे, गो.मो. १९८९. महात्मा जोतीबा फुले. नागपूर : मंगल प्रकाशन

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा ज्योतीराव फुले आणि स्त्रीशिक्षण : एक अभ्यास

**प्रा. डॉ. हनुमंत तुकाराम माने**
संशोधन मार्गदर्शक व मराठी विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब
ता. कळंब, जि. उस्मानाबाद
इ-मेल : drhanumantmane@gmail.com

**प्रास्ताविक :**

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये 'सामाजिक क्रांतीचे जनक' म्हणून अग्रस्थानी ज्यांचे नाव घ्यावे लागते ते म्हणजे 'महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर' म्हणून ओळखले जाणारे महात्मा ज्योतीबा फुले हे होय. एकोणिसाव्या शतकातील एक महान समाजसुधारक व समाजचिंतक म्हणून त्यांचे नाव अग्रस्थानी आहे. महाराष्ट्रातील प्रबोधनाचे ते आद्य आणि खंदे प्रवर्तक ठरतात. त्यांचे शैक्षणिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक तसेच इतिहास यासारख्या क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असेच आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि मानवता यासाठी त्यांनी जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी केलेल्या कृतीतून खऱ्या मानवतेचे दर्शन घडते. म्हणूनच महात्मा फुले हे 'बोले तैसा चाले' या कोटातील समाजसुधारक आहेत.

आधुनिक भारताचे निर्माते, स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून ओळखले जाणारे महात्मा फुले यांच्या काळातील महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचा विचार केला तर आपणास असे दिसून येईल की, या काळामध्ये समाजामध्ये कमालीचे अज्ञान आणि अंध:श्रध्दा बोकाळली होती. अनेक अनिष्ठ चालीरीती समाजामध्ये शिगेस पोहचल्या होत्या. संपूर्ण बहुजन समाज धर्म परंपरेच्या जोखडाखाली दबून गेला होता. धर्माच्या गोंडस नावाखाली अनेक अनिष्ठ प्रथा समाजाच्या मनामध्ये घर करून बसलेल्या होत्या. ब्राम्हणाच्या सामाजिक व धार्मिक अन्यायाने बहुजन समाजाची पूर्ण माती झाली होती. आपल्या अधोगतीला कोण जबाबदार आहे हे जाणण्याएवढाही तो सज्ञानी नव्हता. अशा समाजामध्ये स्त्रियांची अवस्था तर एखाद्या थंड निर्जीव दगडाप्रमाणे झालेली होती. समाज त्यांना केवळ उपभोगाची वस्तू म्हणून वापरत होता. स्त्रियांवर अनेक बंधने घालून तिला जखडून टाकले होते. 'रांधा, वाढा, उष्टी काढा' यामध्येच त्याचे संपूर्ण आयुष्य जात होते. अशा काळामध्ये महात्मा फुले यांच्या रुपाने एक महान समाजसुधारक जन्मास आला.

महात्मा ज्योतिबा फुले यांनाही शिक्षण मिळू नये म्हणून समाजकंटकांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. असे असले तरी 'गफार बेग मुन्सी' या मुस्लीम विद्वानाच्या मि. लेजीट साहेबांच्या उपदेशावरून महात्मा फुले यांचे वडील त्यांना शिक्षण देतात. महात्मा फुले दिवसभर शालेय शिक्षण तर सांजसकाळ तालीम खाण्यात लढाईचे शिक्षण घेत. या दोन्ही शिक्षणात त्यांनी चांगली प्रगती केलेली दिसून येते. त्यांच्या जीवनातील एक घटना म्हणजे ब्राम्हणांनी केलेला अपमान त्यांना सहन झाला नाही. या अपमानातूनच त्यांनी समाज क्रांतीचा झेंडा उभारण्यासाठी कार्य करण्याचे निश्चित केले आणि आपल्या कार्याला प्रारंभ करण्याचे पक्के केले. ब्रिटीशांची राजवट असतानाही त्यांना सामाजिक गुलामगिरी अधिक बोचरी आणि

जाचक वाटली. स्त्रिया आणि शुद्र यांना ज्ञानाची बंद असलेली दारे त्यांनी खुली केली. त्यासाठी स्वत: शाळा सुरू केल्या.

महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्व जाणले होते. ते एक दृष्टे समाजसुधारक होते. बहुजन समाजाची तसेच स्त्रियांची परिस्थिती सुधारावयाची असेल तर त्यांना शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग नाही. त्यामुळे विद्येचे महत्व सांगताना ते आपल्या 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथामध्ये लिहितात की,

'विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली ।
नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले ।
वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले ।'

याप्रमाणे विद्या नसेल तर किती अनर्थ होतो हे त्यांनी समाजाला पटवून दिले.

बहुजन समाजाची अवस्था दिशाहीन झालेली होती. स्त्रियांच्या बाबतीत तर कोणी वाली नव्हता. निर्जीव वस्तूप्रमाणे त्यांचा केवळ वापर होत होता. त्यांच्यावर अनेक बंधने घालून त्यांना मोकळा श्वासही घेता येत नव्हता. त्या काळातील स्त्रियांवरील बंधनाच्या संदर्भात डॉ. यशवंत मनोहर लिहितात की, "स्त्रियांवर केवढी बंधने लादली होती ! जातीत विवाह, बालविवाह, विधवा केशवपन, सती प्रथा, पुनर्विवाहास बंदी, शिक्षणबंदी या सर्व बंधनांनी स्त्रीचे पंखच पार कापून टाकले होते. माणुसपणाशी तिचे वियोगीकरण झाले होते."(1) अशा प्रकारे अनेक बंधनात स्त्री अडकलेली होती. स्त्रियांनाही समानतेने व मानवतेच्या भूमिकेतून वागविले जावे यासाठी महात्मा फुले यांनी स्त्रियांच्या उध्दाराचे कार्य केलेले दिसून येते. अशा जोखडातून त्यांना मुक्त करण्यासाठी त्यांनी प्रथम त्यांना शिक्षणाची दारे खुली केली. समाजाने त्यांच्यावर लादलेल्या बंधनातून त्यांची मुक्तता करून त्यांना मोकळा श्वास घेण्याचे भाग्य मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य महात्मा फुले यांनी केले.

शिक्षण हेच सर्व सुधारणेचे मुळ आहे हे महात्मा फुले यांनी चांगले ओळखले होते. शिक्षणामुळेच मानवामध्ये स्वाभिमान निर्माण होऊन तो अन्यायाविरूध्द पेटून उठतो. त्यामुळेच त्यांनी आपलं सर्वस्व कुटूंबासाठी अर्पण करणाऱ्या स्त्रियांच्या शिक्षणाला महत्त्व दिले. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उध्दारी' यावर ते ठाम होते. म्हणूनच त्यांनी ऑगस्ट 1848 मध्ये पुण्यातील बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. स्त्रीशिक्षणासाठी शाळा सुरू करणारे महात्मा फुले हे भारतातील आणि आधुनिक महाराष्ट्रातील पहिले समाज सुधारक होते. ज्या काळामध्ये स्त्रीला कोणतेही अधिकार नव्हते त्याकाळामध्ये त्यांच्यासाठी शाळा काढणे खुप त्रासदायक काम होते. मुलींना शाळेत शिकविण्यासाठी शिक्षिका म्हणून आपल्या पत्नीला त्यांनी तयार केले. सावित्रीबाई फुले यांना हे कार्य करीत असताना समाजकंठकांनी दिलेला त्रास आपण जाणतोच. अशातच ब्राम्हणांच्या सांगण्यावरून महात्मा फुले यांच्या वडिलांनी त्यांना घर सोडावयास लावले. अशाही परिस्थितीमध्ये महात्मा फुले डगमगले नाहीत. तर त्यांनी अधिक जोमाने स्त्रियांच्या हक्कांसाठी, उध्दारासाठी आणि शिक्षणासाठी स्वत:स बांधून घेतले. स्त्री शिक्षणाचा पाया घालण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा फुले यांनी केले.

ज्या काळामध्ये स्त्रीला केवळ उपभोगाची वस्तू म्हणून वापरले जात होते. त्या काळामध्ये स्त्रीला पुरुषापेक्षा श्रेष्ठ मानून तिलाही पुरूषांप्रमाणे समतेचे व्यक्तिमत्व प्रदान करणारे महात्मा फुले हे आधुनिक काळातील पहिले महापूरुष होत. महात्मा फुले हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.

त्यांचा स्त्रीविषय उदार दृष्टीकोन होता. स्त्रीचे मोठेपण अभिव्यक्त करतातना ते लिहितात की, "...तीच आपल्या सर्वास जन्म देणारी होय. आपले मलमुत्रादी काढून आपल्या सर्वांचे लालनपालन करून सर्वांचा परामर्थ करणारी होय. आपण सर्व पंगू, लाचार असता सर्वकाळ आपली काळजी वाहते व तिनेच आपणा सर्वास चालावयास व बोलावयास शिकविले. यावरून एकंदर अबालवृध्दात जगप्रसिध्द म्हण पडली आहे की, "सर्वांचे उपकार फिटतील, परंतू आपल्या जन्मदात्या मातोश्रीचे उपकार फिटणार नाहीत. यास्तव नि:संशय पुरूषापेक्षा स्त्री माझ्या मते श्रेष्ठ आहे."(2) अशा श्रेष्ठ स्त्रीला शिक्षणापासून दूर ठेवणे महात्मा फुले यांना पटले नाही म्हणूनच त्यांनी आयुष्यभर स्त्री मुक्तीसाठी प्रयत्नरत राहिले आणि स्त्रीशिक्षण, विधवा विवाह, बालहत्या प्रतिबंध, केशवपन यासारख्या बंधनातून स्त्रियांची मुक्तता केली व त्यांना मोकळा श्वास घेण्याचे भाग्य मिळवून दिले. महात्मा फुले हे केवळ समाज सुधारकच होते असे नाही तर ते एक चिंतनशील साहित्यिकही होते. त्यांनी 'छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा पोवाडा', 'ब्राम्हणांचे कसब', 'गुलामगिरी', 'शेतकऱ्यांचा असूड', तृतीय रत्न', 'इशारा' व अखंडादी काव्यरचनाही केलेली आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी समाज प्रबोधनाचे महत्वाचे कार्य केले आहे. आपल्या काव्यामध्ये शिक्षणाचे महत्व पटवून देताना ते लिहीतात की,

'नित्य मुली-मुला शाळेत घालावे I अन्नदान द्यावे I विद्यार्थ्यास I'

याप्रमाणे विद्यार्थ्यांना दररोज शाळेत पाठवावे. त्यांना अन्नदान द्यावे त्यामुळे सामान्य कुटुंबातील मुली-मुले शिक्षण घेतील. त्याचप्रमाणे प्रौढ स्त्री-पुरुपांसाठी त्यांनी रात्रीच्या शाळा सुरू केल्या. हंटर शिक्षण आयोगाला दिलेल्या निवेदनात दारिद्र्यामुळे शिक्षण घेणे शक्य नसणाऱ्या मुलांना शिष्यवृत्त्या, बक्षिसे द्यावीत व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणावे असे सूचवितात. एकंदरीत विचार करता आपणास महात्मा फुले यांच्या कार्यामुळेच स्त्रीला मानव म्हणून समाजाने स्विकारले असे म्हणावयास हरकत नाही. त्यापूर्वी स्त्री केवळ उपभोगाची वस्तूच होती. स्त्रीला शिक्षणाची बंद असलेली दारे कायमची खुली झाली. त्यांच्या जीवनातील पिढयांपिढयाचा अज्ञानाचा काळाकुट्ट अंधार नष्ट करून शिक्षणाची प्रकाश किरणे त्यांच्यापर्यंत पोहचविणारे महात्मा फुले 'स्त्रीशिक्षणाचे जनक' ठरतात.

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ. बिरा पारसे, 'दलित कवयित्रींची कविता', निर्मिती विचारमंच, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, 10 सप्टेंबर 2008 , पृ.क्र. 08.
2. डॉ. ऑम्व्हेट गेल, 'जोतीबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार', लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई-25, सहावी आवृत्ती, जाने 2009, पृ.क्र. 28.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहु महाराजांचे आर्थिक विचार- एक अभ्यास

**डॉ. एन. व्ही. होदलूरकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, अंबाजोगाई, जि. बीड

**प्रस्तावना :-**

समानाधिष्ठित सामाजिक न्याय आणि समतोल आर्थिक विकासाचे तत्व घेऊन सतत 28 वर्ष शाहू महाराजांनी समाजाची उन्नती करण्याचा प्रयत्न केला. हरितक्रांतीचे जनक उद्यमशीलतेचे पुजक, सहकाराचे प्रणेते, भारतीय कल्याणकारी अर्थशास्त्राचे आद्यप्रवर्तक असे अष्टपैलू व्यक्तीमत्व शाहू महाराजांचे होते. गौतम बुध्दांच्या विचारांचा प्रसार आणि प्रसार सम्राट अशोकांनी केला. त्याच प्रमाणे महात्मा फुले यांच्या समतेच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार छत्रपती शाहू महाराजांनी केला. महात्मा जोतीबा फुले यांच्या मृत्युमुळे कांहीशी थंडावलेली सत्यशोधक चळवळ महाराजांनी शक्तीशाली बनवली. शाहू महाराजांनी शेती, व्यापार, उद्योग इत्यादी विविध क्षेत्रामध्ये यशस्वी बदल घडवून समाजाचे दारिद्रय नाहिसे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे आर्थकि विचार आज ही आपणास उपयुक्त आहेत. म्हणून त्यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत शोध निबंधात महाराजांचा आर्थिक विचारांचा अभ्यास केला जाणार आहे.

**व्याप्ती / स्वरूप :-** सदरील शोध निबंधात शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा सुक्ष्म आणि स्थुल असा अभ्यास केला जाणार आहे. एका बाजूने तो वस्तुनिष्ठ असून दुस-या बाजूने आदर्श निष्ठ आहे. सदरील निबंधाची व्याप्ती ही केवळ शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांपुरती सीमित आहे.

**उद्दिष्टे :** सदरील शोध निबंधाचे प्रमुख उद्दिष्टे शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे हे आहे. शाहू महाराजांचे शैली विषयक विचार, व्यापाराविषयक विचार, उद्योगधंदयाविषक विचार, सहकाराविषक विचार, कल्याणकारी राज्याविषयक विचार, दारिद्र्य निर्मुलन आणि रोजगाराविषयक विचारांचा सखोल अभ्यास करून त्यांच्या विचारांची सांगड सद्य परिस्थीतीतील आर्थिक प्रश्नांच्या सोडवणूकीशी घालता येईल. याचा अभ्यास केला जाणार आहे.

**मर्यादा :-** सदरील शोध निबंधात शाहू महाराजांच्या केवळ आर्थिक विचारांचाच अभ्यास करण्यात येणार असून त्यांच्या इतर विचारांचा अभ्यास (सामाजिक कामगार विषयक) करण्यात आला नाही. इतर आर्थिक सुधारणा किंवा कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रत्यक्षात आणतांना राजर्षी शाहू महाराज हे इंग्रजांच्या सत्तेमधील संस्थानिक होते ही मर्यादा लक्षात घेण्यात आली आहे.

**गृहित कृत्य :-**

1. युरोप खंडातील 18 व्या व 19 व्या शतकातील सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलांचा प्रभाव महाराजांवर पडला होता.
2. तत्कालीन समाज हा धार्मिक व सामाजिक असे परंपरेत अडकलेला होता. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेला होता.
3. महाराजांनी राबविलेल्या आर्थिक योजनांमुळे समाजाच्या कल्याणात भर पडली आहे.
4. महाराजांनी शेती, व्यापार, उद्योग, सहकार, दारिद्रय निर्मुलन यासंबंधी अनेक उपाय केल्यामुळे समाजाचा विकास झाला आहे.

5. सद्य परिस्थितीतील अनेक आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी महाराजांच्या आर्थिक विचारांचा उपयोग होऊ शकतो.

**महाराजांचे शेतीविषक विचार :-**

महात्मा फुले यांचा शेती आणि शेतकरी यांच्या संबंधी असणारा दृष्टीकोन शाहू महाराजांनी आयुष्यभर जोपासला होता. निसर्गवाद्याप्रमाणेच शाहू महाराजसुध्दा शेतीतून वाढावा निर्माण होतो या विचार सरणीचे होते. आर्थिक विकासासाठी महाराजांनी शेती क्षेत्रावर अधिक भर दिल्याचे दिसून येते. कारण शेती विषयक इतर कोणत्याच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढावा निर्माण होत नाही. एका बियापासून हजारो बिया तयार करता येतात. म्हणून शेती व्यवसाय विकासाकडे महाराजांनी जास्त लक्ष दिले. शेतीच्या मागासलेपणामुळे शेतकरी दारिद्रयात जगत असल्याचे त्यांना दिसून आले. शेतक-यांचे अज्ञान, शेतीसाठी भांडवलाची कमतरता, शेतीचा लहान आकार, विक्रीव्यवस्थेत संघटनेचा अभाव. या कारणांमुळे शेती आणि शेतकरी हे दोन्ही घटक मागासलेले आहेत. असे त्यांच्या निदर्शनास आले. शेतीच्या आणि शेतक-यांच्या विकासासाठी महाराजांनी भरीव कार्य केले आहे. सर्वात प्रथम त्यांनी जमीनीच्या अल्प उत्पादकतेच्या कारणांचा शोध घेतला व जमीनीचे तुकडे करू नयेत असा विचार मांडला. त्यासाठी त्यांनी 1913 मध्ये कायदा करून संस्थानातील सर्व इनामे अविभाज्य केली व वाटणी करता येणार नाही असे ठरविले. शेतीचा लहान आकारामुळे त्यात सुधारणा करण्यावर मर्यादा येतात. असा विचार ममहाराजांनी त्यावेळी केला होता. तो आजही मान्य केला जातो. संस्थानातील क्षेत्रीय लोक शेतीत काम करताना स्वत:ला कमी समजायचे पण याबाबत महाराज असे म्हणाले की, कृषित काम करताना / क्षात्र धर्माला बाधा येत नाही. कारण ज्यावर मनुष्य समाजाची प्रगती अवलंबून आहे ते काम करणारे शुद्र आहेत. हे म्हणणे मला पटत नाही. यातुन महाराजांची श्रमप्रतिष्ठा दिसून येते. महाराजांना शेतकरी व शेती याविषयी नितांत तळमळ वाटत होती. 1896-97 व 1899-1900 यावर्षी दुष्काळ पडला होता. त्यामुळे शेती व शेतकरी यांचे अतोनात हाल झाले होते. दुष्काळांवर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यासाठी 1902 मध्ये “सार्वजनिक पाटबंधारे धोरण” घोषित केले. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र “पाटबंधारे खाते” निर्माण केले. या धोरणांमुळे नद्यांच्या पाण्यापासून 39783 एकर जमीन, व तलावापासून 232 एकर जमीन पाणी पुरवठ्याखाली आणली होती. शेतीसाठी बारमाही पाणी उपलब्ध व्हावे. याच विचारातून महाराजांनी 1909 रोजी प्रसिध्द राधानगरी धरणाच्या बांधकामास सुरूवात केली. याच धरणामुळे आज जवळपास 22000 एकर जमीनीस पाणीपुरवठा होतो. जलविद्युत शक्ती 48000 किलोवॅट इतकी आहे. त्याचप्रमाणे दुधगंगेच्या उगमावर दुसरे धरण बांधण्याची योजना आखली त्याला काळम्मावाडी प्रकल्प असे नांव दिले आहे. ब्रिटीश सरकारने जंगला संबंधी संरक्षण कायदा तयार केला होता. त्यामुळे जंगलातून मिळणारा मध, औषधी वनस्पती, जनावरांना चारा, जळणासाठी लाकूड, विविध प्रकारची फळे-पाने इत्यादीचा उपयोग घेणे ब्रिटीश सरकारने बंद केले होते. यासर्व गोष्टींचा अभ्यास करून महाराजांनी कायद्यात फेरबदल करून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांतील लोकांना शेळया, मेंढ्या, चारण्यासाठी कांही जंगलात परवानगी दिली. महाराजांचे कृषीविषक आणि कृषी बरोबर इतर उद्योग पुरक उद्योगांना दिलेले प्रोत्साहन शेती आणि शेतक-यांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण होते.

शाहू महाराजांचे शेती विषयक कार्याचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, शेती संदर्भात शाहू महाराजांनी चिंतन व अभ्यास करून सिंचन, नवीन बियाणांचा वापर, आधुनिक पध्दतीच्या तंत्राचा शेतीमध्ये वापर, शेतीपुरक व्यवसायांना प्राधान्य अशा अनेक योजना राबवत शेती आणि शेतक-यांच्या विकासासाठी ख-या अर्थाने प्रयत्न केले. आज महाराष्ट्रातील हा शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकून आत्महत्या करत आहे. सततचा दुष्काळ, कर्जाचा डोंगर, कमी उत्पन्न यामधुन शेतक-याला सोडवायचे असेल तर शाहू महाराजांनी शेती आणि शेतक-यांच्या विकासासाठी राबविल्याल्या योजना राबविण्याची नितांत गरज आहे. महाराजांचे शेतीसंबंधीचे कार्य आजही आपणास मार्गदर्शक व उपयोगाचे ठरू शकते.

**उद्योगासंबंधी विचार:-**

आर्थिक विकासांसाठी शेती बरोबरचा उद्योग आणि व्यापारात वाढ झाली पाहिजे असे महाराजांचे मत होते. ग्रामीण भागात अनेक उद्योग स्थापन करून समतोल विकासाला महाराजांनी प्राधान्य दिल्याचे दिसून येते. महाराजांनी नवीन उद्योगधंदे सुरू करण्यासाठी सर्वेक्षण केले व त्या आधारावर अनेक उद्योगांची निर्मिती केली. संरचनातील सुगंधीत औषधी तेल उद्योग, मधुमक्षीका पालन उद्योग, काल्हार्क उद्योग, सुती कापड उद्योग या उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न केले. शेतीसोबत इतर जे जोड व्यवसाय असतात त्यांच्या विकासाला प्राधान्य दिले. औद्योगिकरणासंबंधी महाराजांची विचारसरणी अगदी स्पष्ट होती. औद्योगिकरणाशिवाय आर्थिक विकासाला गती मिळणार नाही. हे ते ओळखून होते. म्हणून म्हणतात की आर्थिक संपन्नता औद्योगिकरणावर अवलंबून आहे. लोकांनी एकत्र येवून सहकारी कारखाने, संरचना, बाजारपेठांची व्यवस्था राबवली पाहिजे. कोल्हापूर संस्थान त्याकरिता सर्व प्रकारची मदत देण्यास तयार आहे. यावरून असे स्पष्ट होते की, महाराजांना सहकाराच्या माध्यमातून औद्योगिक विकास अभिप्रेत होता कारण त्यांना मक्तेदारी व भांडवलशाहीचे दोष माहित होते. मक्तेदारी व भांडवलशाही यासंबंधी ते असे म्हणत की, "कारखानदारीच्या क्षेत्रातील मक्तेदारी भांडवलशाही आणि तिच्यावर श्रमिक व इतरजण पुर्णपणे अवलंबून राहणे रास्त नव्हे अशा प्रकारची व्यवस्था भारतात मुळीच योग्य नाही." मक्तेदारी आणि भांडवलशाहीतील दोष ओळखून त्यांनी खाजगी क्षेत्रातील लघु उद्योग, संयुक्त क्षेत्रातील मोठे उद्योग व सहकारी क्षेत्रातील उद्योगांना अर्थसहाय्य व वित्तीय प्रोत्साहन देऊन चालना देण्याचा प्रयत्न केला. उद्योगांच्या विकेंद्रीकरणाकडे लक्ष दिले. एकाचवेळी आवश्कतेनुसार सार्वजनिक, सहकारी आणि खाजगी क्षेत्रांना प्राधान्य दिले. 1906 मध्ये "दि शाहू स्पिनिंग ॲ ण्ड विव्हिंग मिल्स" ही कापड गिरणी कोल्हापूर येथे स्थापन झाली. 1912-13 मध्ये रायबाग येथे शाहू पीव्हर्स असोसिएशन ही संस्था स्थापन करून विणकर व कामगारांना संरक्षण दिले. याशिवाय रंगाचे कारखाने, सुतकापड उद्योग, तेलाचे कारखाने,कात तयार करण्याचे कारखाने इ. उद्योगांचा विकास घडवून आणण्यासाठी महाराजांनी प्रयत्नाबरोबरच बहुमोल आर्थिक सहकार्य केले.

**व्यापारविषयक विचार:-**

शाहू महाराजांचे व्यापारविषयक विचार व्यापारवादी (Merchantalism) विचारांशी सुसंगत होते. आर्य चाणक्याने सांगितलेल्या जकात नाक्यांची संकल्पना तसेच प्रगतशील वजने व मापांची संकल्पना त्यांनी संस्थानांच्या व्यापारात प्रत्यक्षात राबविली होती. शेती व उद्योगधंदे ज्याप्रमाणे विकसित होतील. त्याबरोबरच व्यापारातही वृध्दी व्हावी हा संतुलित विकासाचा विचार शाहू महाराजांनी व्यक्त केला. शाहू महाराजांच्या काळखंडात शेती आणि उद्योगांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. विविध वस्तू आणि अन्नधान्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. यातून व्यापार विषयक प्रश्न निर्माण झाले होते. व्यापारविषयक अनेक समस्यांचा अभ्यास करून महाराजांनी या समस्या यशस्वीपणे सोडविल्या "निपाणी" या ठिकाणी मोठ्या प्रमाणात व्यापार चालत होता त्यामुळे महाराजांनी निपाणीच्या व्यापा-यांना बोलावून कोल्हापूर येथे व्यापारपेठ वसविण्यासाठी प्रयत्न केले. व्यापा-यांना आवश्यक त्या सोयी सवलती जाहीर केल्या या प्रेरणेतूनच 1895 मध्ये कोल्हापूर येथे शाहूपूरी व्यापारपेठ स्थापन झाली. शाहूपूरी व्यापारपेठेतून गुळ, भुईमूग व इतर धान्यांचा व्यापार झपाट्याने वाढला. साखरेच्या निर्यातीत मोठी वाढ झाली. व्यापाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी महाराजांनी जयसिंगपूर व गडहिंग्लज येथे व्यापारपेठा स्थापन केल्या. त्यामुळे जयसिंगपूर येथे तंबाखू व गडहिंग्लज येथे गुळ, मिरची व भुईमूग यांची बाजारपेठ विकसित केली. 1918 मध्ये युवराजांना सक्रिय करून मित्राच्या मदतीने "आर.बी. ॲड. कंपनी" ही व्यापारी संस्था स्थापन केल्याचे दिसून येते. व्यापार वृध्दीसाठी महाराजांचे प्रयत्न अभ्यासल्यानंतर असे दिसून येते की, वस्तूच्या निर्मिती बरोबरच

त्या वस्तूला बाजारपेठ मिळवून देण्यावर सुध्दा त्यांचे लक्ष होते. अशाप्रकारे महाराजांनी उद्योग व व्यापाराच्या वाढीसाठी मोठे कार्य केले होते.

**सहकारासंबंधीचे विचारः-**

शाहू महाराजांच्या आर्थिक विचारातील “सहकार” हा एक महत्त्वाचा विचार होय. शंभर वर्षापूर्वी महाराजांनी सहकाराचे महत्त्व ओळखून “सहकाराच्या” वाढीसाठी जाणिवपूर्वक प्रयत्न केले. नागरिकांनी एकत्र येऊन सहकाराच्या माध्यमातून अनेक उद्योग, संस्था स्थापन कराव्यात असे महाराजांचे मत होते. 1919 मध्ये मुंबईच्या कामगार सभेत कामगारांनी सहकारी तत्वावर पतसंस्था स्थापन कराव्यात असा सल्ला दिला. सहकाराची कायदेशीर मार्गाने अंमलबजावणी करण्यासाठी महाराजांनी 1912 मध्ये “सहकारी संस्थाविषयक कायदा” संमत केला. सहकारी संस्थांची नोंदणीकरण्यासाठी “रजिस्टार” ची नेमणूक करण्यात आली. 1913 मध्ये “दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.” हि महाराष्ट्रातील पहिली सहकारी पतपेढी स्थापन केली. 1915 मध्ये बलभीम को-ऑपरेटीव्ह बँकेची स्थापना केली गेली. सहकारी चळवळीचा विकास करण्यासाठी प्रत्येकाने सहकार्य करावे, ग्राहक भांडार, सहकारी संघ, साखर कारखाने उभे करावेत म्हणून महाराजांनी प्रयत्न तर केलेच पण त्याच बरोबर मोठ्या प्रमाणात अर्थसहाय्य केल्यामुळेच 1921 पर्यंत सहकारी संस्थांची संख्या 37 पर्यंत वाढली होती.

आर्थिक दृष्ट्या दुर्बल शेतक-यांना सावकाराच्या मगरमिठीतून सोडविण्यासाठी व आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी महाराजांनी जाणिवपूर्वक सहकारी तत्वाचा स्विकार व विकास केल्याचे दिसून येते. सहकारी उद्योग, सहकारी सोसायट्या, सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेतून महाराजांनी समतोल आर्थिक विकास साध्य तर केलाच पण त्याच बरोबर शेतक-यांना सावकाराच्या पाशातून मुक्त केले. आर्थिक विषमता कमी केली, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करून सामान्य लोकांनाही आर्थिक विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील केले. मक्तेदारी व भांडवलशाहीचे दोष महाराजांना माहित असल्यामुळेच त्यांनी सहकाराच्या तत्वाचा पुरस्कार केल्याचे दिसून येते. सहकारातून समृध्दीकडे जाण्याचा मार्ग महाराजांनी शंभरवर्षापूर्वीच सांगितला होता. आज देशातील सर्वसामान्य जनतेची, कामगाराची, शेतक-यांची अवस्था अतिशय दयनीय झाली आहे. महाराजांनी सांगितलेल्या आर्थिक विचारांची अंमलबजावणी जर प्रामाणिकपणे राज्यकर्त्यांनी केली तर नक्कीच सामान्य लोकांचा विकास त्यांची प्रगती साध्य करता येईल.1991 नंतर सरकारने स्विकारलेल्या मुक्त आर्थिक धोरणाचे 20 वर्षानंतर सिंहावलोकन केले असता फारसे कांही साध्य करता आले नाही. असेच मत व्यक्त करावे लागेल. बेकारी, दारिद्रय, उपासमार, शेतक-यांच्या समस्या, प्रादेशिक असमतोल, या समस्या सोडविण्यात अपयश आले आहे. निर्यात, शेती, उद्योग, व्यापार यामध्ये प्रगती साध्य करता आली नाही. केवळ मुठभर लोकांच्या संपत्तीत वाढ होणे किंवा मोजक्यांच राज्यांचा व शहरांची प्रगती होणे म्हणजे आर्थिक विकास नव्हे. सामान्य लोकांना त्या आर्थिक विकासाचे लाभ जोपर्यंत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या प्राप्त होत नाहीत. तो पर्यंत ह्या विकासाला सार्थकता प्राप्त होणार नाही.

भांडवलशाही व बाजाराधिष्ठीत अर्थव्यवस्थेचे मुळे जगातील विकसित देशांची अवस्था डबघाईला आल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे 1991 नंतर राबविण्यात आलेल्या नविन आर्थिक धोरणांचा सावधपणे स्वीकार करणे आवश्यक आहे. भारत हा खेड्यांचा देश आहे. येथील जवळपास 65% लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून आर्थिक विकासाचे धोरण राबवावे लागेल. त्याचबरोबर दारिद्रय, बेकारी, याही समस्या अधिक उग्र रूप धारण करत आहेत. या सर्व आर्थिक व सामाजिक परिस्थितीचे परिक्षण करून त्या सामान्य लोकांच्या विकासासाठी त्यांच्या कल्याणकारी सरकारने छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करून त्यांनी सांगितलेल्या विचारांची अंमलबजावणी करावी असे वाटते. कृषी, उद्योग, व्यापार, सिंचन, सहकार, शिक्षण, रोजगार यासंबंधी महाराजांचे विचार आजही महत्त्वाचे आहेत. जागतिकीकरणात शेतीचा विकास

करण्यासाठी महाराजांनी सुचविलेल्या सुधारणा महत्त्वाच्या आहेत. उद्योग, व्यापाराच्या वाढीसाठी महाराजांनी केलेल्या कार्यातून बोध घ्यावा. दारिद्रय, बेकारी, प्रादेशिक असमतोल यासाठी महाराजांनी जे उपाय केले होते त्यांची अंमलबजावणी करावी. समतोल आर्थिक विकास, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी व सामान्य लोकांच्या विकासासाठी महाराजांच्या आर्थिक विचारांची अंमलबजावणी गरजेची आहे.

संयुक्त राष्ट्र संघाने जगातील आर्थिक परिस्थिती पाहता सामाजिक उन्नतीसाठी स्वयंनिर्भर करणारा सहकाराचा मार्ग स्वीकारण्याचा सल्ला दिला असून संयुक्त राष्ट्र संघाने 2012 हे वर्ष "आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष" म्हणून साजरे करण्याचे ठरविले आहे. सहकार क्षेत्राने गरिबी दुर करणे, रोजगार निर्मिती, सामाजिक एकता साधण्यात केलेल्या योगदानाची राष्ट्र संघानेही दखल घेतली आहे. आर्थिक उन्नतीबरोबरच सामान्य माणसांचा त्यातील सहभाग महत्त्वाचा मानला आहे. 1991 च्या वनीन आर्थिक धोरणात सहकाराला स्थान देण्यात आले नव्हते. नव्या आर्थिक धोरणाच्या विकासाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. संयुक्त राष्ट्र संघाने आजच्या जागतिक परिस्थितीत सामाजिक उत्थानाचे भान ठेवून सहकार वर्ष साजरे करण्याचे ठरविले आहे. भारतासारख्या विकसनशील व विकसित देशांनी याचा गांभीर्याने विचार करायला हवा. शाहू महाराजांबरोबरच इतर भारतीय आर्थिक विचारवंतांनी सहकाराचे महत्त्व ओळखले होते. त्यामुळे निदान आतातरी सहकार चळवळीच्या वाढीसाठी सरकारने प्रयत्न करावेत असे वाटते.

**निष्कर्ष:-** राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष स्पष्ट करता येतील.

1. निसर्गवाद्यांच्या विचारसरणी प्रमाणे शाहू महाराजांची विचारसरणी होती. शेतीक्षेत्रातून मोठ्या प्रमाणात "वाढावा" निर्माण होतो. त्यामुळे त्यांनी आर्थिक विकासासाठी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी शेतीच्या विकासाला प्राधान्य दिले.
2. शेतीच्या आधुनिकीकरणावर त्यांनी भर दिला. यासाठी शेतीत आधुनिक यंत्राचा व तंत्राचा अवलंब करावा असे सांगितले.
3. शेती सोबतच इरत पुरक उद्योगांच्या विकासासाठी महाराजांनी प्रयत्न केले आहेत.
4. शेतीसाठी बारमाही पाण्याच्या नियोजनासाठी महाराजांनी अनेक मोठे व छोटे सिंचन प्रकल्प हाती घेतले होते.
5. केवळ शेतीच नव्हे तर उद्योगांच्या विकासाला सुध्दा महाराजांनी प्राधान्य दिले होते.
6. केवळ शेतीच नव्हे तर उद्योगांच्या विकासाला सुध्दा महाराजांनी प्राधान्य दिले होते.
7. उद्योगांच्या विकासाबरोबर व्यापाराच्या वाढीसाठी महाराजांनी बाजारपेठा स्थापन केल्या होत्या.
8. सहकाराच्या तत्वाचे महत्त्व महाराजांनी ओळखून होते. त्यामुळेच त्यांनी सहकारी तत्वावर अनेक उद्योग, संस्था, पतपेढ्या स्थापन कराव्यात असे सुचविले होते. सद्य परिस्थितीत दारिद्रय, बेकारी या समस्या सोडविण्यासाठी शाहू महाराजांनी केलेल्या उपायांची योग्य अंमलबजावणी केली पाहिजे.

**शिफारशी:-**

1. शाहू महाराजांनी 100 वर्षापूर्वी शेतीचे अर्थव्यवस्थेत असणारे स्थान ओळखून शेतीच्या विकासाला प्राधान्य दिले होते. तसेच प्राधान्य सद्य परिस्थितीत देणे गरजेचे आहे.
2. सेझ प्रमाणे विशेष कृषी स्थापन करावे आणि शेतीचा विकास करावा शेतीच्या आधुनिकीकरणावर भर दिला पाहिजे त्यासाठी अर्थसंकल्पात वेगळी तरतुद करावी.
3. शेती व उद्योग यांची योग्य सांगड घालून जलद विकास साध्य करावा.
4. सहकारातुन समृध्दीकडे जाता येते याचा सहकाराने विचार करावा व त्या दृष्टीने सहकार चळवळ समृध्द व बळकट करावी.

5. सहकार चळवळीतून पश्चिम महाराष्ट्राची प्रगती झालेली आहे त्याच धरतीवर संबंध भारतात सहकार चळवळीला प्रोत्साहन द्यावे.
6. सहकार चळवळीत नवीन होऊ घातलेल्या छुप्या मक्तेदारीला आळा घालावा.
7. शाहू महाराजांनी ज्याप्रमाणे उद्योग व शेती यांची योग्य ती सांगड घालून अर्थव्यवस्था भक्कम केली होती. त्याचप्रमाणे सरकारनेही त्यांच्या विचारांचा अभ्यास करून अंमलबजावणी करावी.

**संदर्भ सूची**


1. राजर्षी शाहू महाराज –धनंजय कीर
2. लोकराजा शाहू छत्रपती – डॉ. रमेश जाधव
3. शाहू महाराज स्मारक ग्रंथ – जयसिंगराव पवार
4. लोकराज्य मासकि, योजना – 2001- 2009
5. आर्थिक विचार व विचारवंत – डॉ. डी. बी. कुलकर्णी, ढमढेरे, डायमंड प्रकाशन, पुणे.
6. विविध वर्तमानपत्रातील संबंधीत लेख.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा परामर्श

**डॉ.जाधव मीनाक्षी भास्कर**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख शि.महर्षी ज्ञानदेव मोहेकरमहाविद्यालय,कळंब ता.कळंब जि.उस्मानाबाद 413507

jadhavminakshi83@Gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलित उद्धारक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांना सुपरिचित आहेत. त्याचबरोबर त्यांनी अर्थशास्त्र म्हणून ओळखले जाते.त्यांचा मुख्य विषय अर्थशास्त्र होता.त्यांनी अर्थशास्त्रविषयी अनेक विचार मांडले, डॉ.आंबेडकर हे भारतातील श्रेष्ठ अर्थशास्त्रज्ञ होते.अर्थशास्त्रामध्ये नोबेल पारितोषिक प्राप्त अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन बाबासाहेब आंबेडकरांना गुरु मानतात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सन 1905 मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाले. जानेवारी 1908 मध्ये मुंबई विद्यापीठाच्या एलफिस्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. 1912 सली त्यांनी अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र यामध्ये पदवी मिळवली. 1913 रोजी बडोदा संस्थानाच्या अधिकाऱ्यांनी परदेशात अभ्यास करण्यासाठी फक्त चार विद्यार्थी निवडले त्यामध्ये,भीमराव आंबेडकर एक होते I.त्यांनी एकूण 32 पदव्या मिळवल्या. 1920 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुन्हा इंग्लंडला गेले. जून 1921 मध्ये लंडनविद्यापीठाने त्यांना एम.एससी अर्थशास्त्र ही पदवी प्रदान केली.मार्च 1923 मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांचा 'रुपयाची समस्या' : उगम आणि उपाय हा प्रबंध मान्य करून डी.एससी अर्थशास्त्र ही पदवी प्रदान केली ही पदवी प्राप्त करणारे आंबेडकर हे पाहिले भारतीय होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय अर्थशास्त्रज्ञ,न्यायशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ,तत्त्वज्ञ, आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित चळवळीला प्रेरणा दिली.आणि अस्पृश्य दलित लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली.तसेच माहिलांच्या आणि कामगारांच्या हक्काचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूर मंत्री,स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री,भारतीय संविधानाचे शिल्पकार ,भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवन होते.देशाच्या विविध क्षेत्रात दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार असेही म्हणतात.

**संशोधन विषयाची निवड :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अर्थशास्त्र विषयावर प्रमुख तीन पुस्तके आहेत1) अडमीनिस्टेशन फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी 2) द ईव्हॅल्युएशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया 3) दि प्रॉब्लेम ऑफ द रुपी: इट्स ओरिजिन अँड सोलुशन .यातील पहिली दोन पुस्तके सार्वजनिक वित्त व्यवस्थेवरील असून, त्यातील पहिल्या पुस्तकात ईस्ट इंडिया कंपनीच्या सन 1792 ते इसवी सन 1858 या काळातील वित्त व्यवहारावर भाष्य केले आहे. दुसरे पुस्तक ब्रिटिशांच्या आमदनी तील भारतातील वित्ीय व्यवहारांमधील केंद्र आणि राज्य संबंध यावर भाष्य करते. हा कालखंड इसवी सन 1833 ते 1921 असा आहे. तिसरे पुस्तक रुपयाची समस्या: तिचा उगम आणि उपाय चलनाविषयी अर्थशास्त्रावरील एक उत्कृष्ट ग्रंथ मानला गेला आहे. इसवीसन 1800 ते 1893 पर्यंत च्या कालखंडात विनिमयाचे माध्यम म्हणून भारतीय चलनाची कशी उत्क्रांती झाली.हे त्या प्रबंधात सांगितले आहे थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज व्यवस्थेचा अभ्यास करताना माणूस हा केंद्रबिंदू मानला, माणूस माणूस बनला पाहिजे असे त्यांना अभिप्रेत होते.राजकीय क्रांतीपेक्षा सर्वप्रथम सामाजिक व सांस्कृतिक क्रांती झाली पाहिजे असा सिद्धांत त्यांनी मांडला. या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब यांचे सामाजिक,आर्थिक,राजकीय व सांस्कृतिक

विचार आजच्या समाजव्यवस्थेत साठी अर्थ व्यवस्थेसाठी किती उपयुक्त आहेत.या विचाराने प्रेरित होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आर्थिक विचारांचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय शोधनिबंध साठी निवडण्यात आला आहे.

**संशोधन विषयाची उद्दिष्टे** :-

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचा समग्र पातळीवर सखोल अभ्यास करणे.

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चलन विषयक विचार जाणून घेणे.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार अभ्यासणे.

4) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चे कामगार विषयेक कायदे जाणून घेणे.

**संशोधन विषयाची गृहीतके** :-

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार भारतीय अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण आहेत.

2) देशांमध्ये आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चलन विषयक विचार मोलाचे आहेत.

3) देशाच्या आर्थिक विकासाला गती देण्यासाठी तसेच देशात आर्थक्रांती घडवून आणण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार दिशादर्शक ठरतात.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोधनिबंध पूर्णता दुय्यम साधनसामग्रीवर आधारित असून शोधनिबंध साठी आवश्यक माहिती पुस्तके, ग्रंथ,नियतकालिके, मासिके,शोधनिबंध तसेच इंटरनेट इत्यादी साधनाद्वारे मिळविण्यात आलेली आहे.

**संशोधन विषयाचे विश्लेषणनात्मक विवेचन:-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कारकिर्दीची सुरुवात मुळता अर्थशास्त्र पासून झाली.मूकनायक,बहिष्कृत भारत, जनता व प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांना त्यांनी जन्म दिला. मूकनायक चा पहिला अंक शनिवारी दिनांक 31 जानेवारी 1920 रोजी प्रकाशित झाला. अर्थशास्त्र या विषयावर त्यांनी वेळोवेळी घटना समिती,लोकसभा आणि भाषणाद्वारे,लेखाद्वारे राष्ट्राच्या आणि अनेक आर्थिक प्रश्नावर विचार मांडले आहेत. विशेषता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुळाशी जाऊन मानवजातीचा अभ्यास केला. तसेच जगातील सामाजिक,आर्थिक,राजकीय व सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रातील विचारांचा अभ्यास केला. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे आर्थिक विचारवंत होते त्यांच्या आर्थिक विचारा यांचा परामर्श पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**शेतीवियक विचार:-**

भारत कृषीप्रधान देश असल्यामुळे डॉ.आंबेडकरनीशेतीविषयक विकासा वर भर दिला पाहिजे. असे मत मांडले.पण त्याच बरोबर परंपरागत समाज रचनेतही बदल घडवून आणला पाहिजे असे ही त्यांनी म्हटले आहे.यंत्र प्रधान शेतीची वाढ,विस्तृत शेती,सहकारी व सामुदायिक शेती आणि किमान वेतन यांचा आग्रह धरला.'जनरल ऑल इंडियन इकॉनोमिक सोसायटी' या नियतकालिकात लहान शेतजमिनी आणि त्यावरील उपाय हा लेख प्रसिद्ध केला. त्यात त्यांनी लहान लहान तुकडे यामुळे शेतीचे नुकसान होते, म्हणून जमिनीचे एकत्रीकरण झाले पाहिजे. जमिनीवर अवलंबून असणारी अतिरिक्त लोकसंख्या कमी झाली पाहिजे, तुकड्यांचे एकीकरण झाल्यास उत्पादन वाढेल व शेतमजुरांचे जीवन सुरु सुखी होईल असे त्यांचे मत होते. भारतीय शेती संबंधी चे विचार मांडत असताना डॉ आंबेडकरांनी असे मत मांडले की,भारताच्या एकंदर अर्थव्यवस्थेमध्ये शेती विकास झाल्याशिवाय सुधारणा होणार नाही. देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणारे महत्त्वाचे घटक या अनुषंगाने जलसंपत्ती व विद्युत धोरण या विषयी डॉ आंबेडकरांनी अतिशय महत्त्वाचे विचार मांडले आणि कार्य ही केले.राष्ट्रीय दृष्टिकोनातून जलसंपत्तीचे नियोजन करण्यासाठी 1945 मध्ये डॉ. आंबेडकरांनी 'सेंट्रल वॉटर कमिशनची' स्थापना केली. त्यांच्या मते आपल्या देशातील नैसर्गिक संपत्तीचे नियोजन करून त्या संपत्तीचा योग्य उपयोग केला तर देशाचा विकास होऊ शकतो.असे

मत मांडले. तसेच मंत्रीपदावर असताना डॉ.आंबेडकर यांच्याकडे वॉटर रिसोर्सेस आणि इलेक्ट्रिक पावर या दोन कमिटयांचा त्यांच्या वर अतिरिक्त भार होता.या कमिटीचे डॉ.आंबेडकर प्रमुख होते.

**चलन विषयक विचार:-** 1947 साली 'हिस्ट्रीरी ऑफ इंडिया करन्सी' यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती ,यावर मूलगामी विचार मांडले आहेत. भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती हा वाद निर्माण झाला,त्या वेळी दोन पर्याय उपलब्ध होते. १) सुवर्ण परिम ाण :मान ज्यामध्ये सोन्याच्या नाण्यांचा वापर चलन म्हणून अभिप्रेत असतो 2) सुवर्ण विनिमय परिमाण ज्यामध्ये कागदी नोटांचा चलन म्हणून वापर होतो आणि कागदी रुपये रुपये घेऊन ठराविक दराने सोने द्यावयाची सरकारने हमी घेतलेली असते. प्रा.केन्स व इतर अर्थतज्ज्ञांनी सुवर्ण विनिमय परिमाणलवचिक असल्याने व या व्यवस्थेत चलन निर्मिती ही देशातील सोन्याच्या साठ्यावर अवलंबून नसल्याने, ही पद्धत भारतासाठी योग्य आहे.असे प्रतिपादन केले परंतु डॉ.आंबेडकरांनी याला प्रखर विरोध केला,त्यांच्या मते या व्यवस्थेचे चलन निर्मिती लवचिक असल्यामुळे ती अमर्याद होऊ शकते, यामध्ये भाववाढ निर्माण होऊन रुपयाची किंमत घसरू शकते, सुवर्ण विनिमय परिणाम असताना भारतात अशी भाव वाढ झाली,याचे विवेचन आंबेडकरांनी दिले. त्यांनी सुवर्ण परिमाण पद्धती हीच भारतासाठी योग्य असून त्यासाठी ऐतिहासिक पुरावे देऊन, सुर्णनपरिमाण पद्धतीत भारतात किमती कशा स्थिर होत्या आहे हे दाखवून दिले. चलन निर्मिती करणाऱ्या रिझर्व बँक संस्थेच्या चलन निर्मितीवर परिणामकारक अंकुश असन्याच ी आवश्यकता आहे.असा युक्तिवाद 1926 मध्ये नेमलेल्या 'हिल्टन यंग'कमिशनपुढे साक्ष देताना त्यांनी केला.आंबेडकरांच्या चलनविषयक मताचा विचार न करता भारत व इतरत्र केन्स यांच्या भूमिकेचा स्वीकार केला. परंतू आजची परिस्थिती पाहता त्यांची भूमिका निश्चित होती असे म्हणावे लागेल. कारण आज केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट वाढत असून रिझर्व बँकेला पतपुरवठा वाढवावा लागतो आहे.त्यामुळे चलनफुगवटा व त्या अनुषंगाने येणारी भाववाढीची समस्या याला तोंड द्यावे लागत आहे. चलन निर्मिती च्या क्षमतेवर अंकुश ठेवण्यास संबंधीची त्यांची भूमिका भविष्याचा वेध घेणारी होती यात शंका नाही.

**कामगार उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर** :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर थोर समाज सुधारक, विचारवंत होते.डॉ.आंबेडकर यांनी ज्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या त्यात त्यांनी ठसा उमटवला.ते 1942 ते 1946 पर्यंत केंद्रीय श्रम रोजगार ,ऊर्जा मंत्री म्हणून कार्यरत होते. डॉ.आंबेडकर 15 ऑगस्ट 1936 झाली स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. पक्षाचा जाहीरनामा 'टाईम्स ऑफ इंडिया' या इंग्रजी दैनिकात पहिल्यांदा प्रकाशित करण्यात आला. कामगार हा मनुष्य आहे व त्याला मानवाचे हक्क मिळाले पाहिजे कामगाराचे निश्चित वेतन, कामगार आणि मालक यातील चांगले संबंध, कामगारांचे राहणीमान उंचावले पाहिजे, आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे ,आर्थिक विषमतेविरुद्ध कामगारांनी लढा दिला पाहिजे तेव्हा कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील तसेच परावलंबी असण्यापेक्षा स्वावलंबी व्हा असा संदेश डॉ.आंबेडकरांनी दिला. समग्र भारतातील कामगार आणि कामगार चळवळ कामगार कायदे,स्त्ररी कामगारा बद्दलची आत्मीयता, उन्नतीचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे सुकर झाला आहे. असे म्हणता येईल तसेच त्यांनी 1) शेतमजुरांना किमान मजुरी देणे. 2) औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार व पगारी सुरक्षा 3)कामगार संघटना मान्यता मिळवून देणे.4) कामगारांना दिवसभरात केवळ आठ तास च े काम देणे.5) नोकरीत असताना जर कामगारांचा अपघात झाला,अथवा मृत्यू झाला तर मालकाकडून कामगाराला नुकसानभरपाई देणे .6) स्त्रियांना कारखान कायद्यान्वये रात्री काम करण्यास बंदी.7) स्त्रियांना प्रस्तुती काळात भर पगारी सुट्टी. इत्यादी महत्त्वपूर्ण निर्णय डॉ. आंबेडकरांनी कामगार विषय घेतले,

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रा विषयाचे विचार:-** डॉ.आंबेडकरांनी अर्थशास्त्रामध्ये केवळ संपत्तीचा व आर्थिक संबंधाचा अभ्यास व्हावा, असा त्यांचा आग्रह होता समाजामध्ये संपत्तीचे वाटप समानतेची व्हावे असे त्यांना

वाटत होते. त्याच प्रमाणे जातिव्यवस्थेचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर कसा विपरीत परिणाम होतो हे देखील त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते जातिव्यवस्थेमुळे दारिद्र्य ,आर्थिक पिळवणूक, असमानता कशी निर्माण झाली आणि त्यामध्ये कशी वाढ झाली याचे सविस्तर विवेचन डॉ.आंबेडकरांनी केले . उद्योगा संबंधी विचार मांडत असताना, डॉ.आंबेडकर औद्योगीकरणाला विरोध न करता आधुनिक औद्योगीकरणाचा पुरस्कार केला, परंतु अशा औद्योगिकीकरण यापासून विषमता,संपत्तीचे केंद्रीकरण,मक्तेदारी यांची वाढ होऊ नये असे त्यांना वाटत होते. काही मूलभूत स्वरूपाचे उद्योग, सरकारने चालवावीत असे त्यांचे मत होते. डॉ.आंबेडकरांनी हिस्ट्रीरी ऑफ इंडिया करन्सी अँड ब्रेकिंग या ग्रंथातून भारतीय अर्थव्यवस्थेच्या योग्य संतुलनासाठी बँकिंग क्षेत्राची गरज याबाबत मौल्यवान विचार मांडले,आर्थिक विकासासाठी बँकिंग क्षेत्राचे योगदान, खाजगी सावकारी पासून सामान्यांना वाचविण्यासाठी बँकेचे महत्त्व त्यांनी लक्षात घेण्याचा आग्रह केला होता.भारतीय रिझर्व बँकेच्या स्थापनेत बाबासाहेबांच्या चिंतनाचे आणि मार्गदर्शनाचे फार मोठे योगदान आहे.

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची दृष्टी अतिशय सूक्ष्म होती. त्यांचा अभ्यास सखोल होता सखोल अभ्यासामुळे ते जगाच्या आर्थिक परिवर्तनाशी अवगत होते .भारतीय समाजात असलेल्या गरीब आणि विषमता दूर करण्यासाठी त्यांनी आपले ठोस मते मांडली. शेती संदर्भातते विशेषता छोट्या धारण क्षेत्राच्या बाबतीत मांडलेले विचार आजच्या परिस्थितीत उपयुक्त ठरतात. त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांच्या आधारे जर आपण धोरणे आखली तर निश्चितपणे ग्रामीण भागातील शोषितांना त्याचा न्याय हक्क मिळेल. डॉ. आंबेडकरांच्या संपूर्ण विचारांमध्ये मानवतावादी सूत्रच सर्वत्र आढळते . कामगार मंत्री असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कारखानदार, कामगार आणि महिला न्याय मिळून दिला.खऱ्या अर्थाने आंबेडकर हे स्त्री-उद्धारक होते. एवढेच नव्हे तर आंबेडकर हे एक थोर विचारवंत होते,त्यांनी अर्थशास्त्रज्ञ,समाजशास्त्र विधीज्ञ, शिक्षणज्ञ, ,सदस्य संसद आणि या सर्वांच्या पलीकडे जाऊन त्यांनी समाज सुधारक आणि मानवाधिकाराचा रक्षक या नात्याने केलेले कार्य अतुलनीय आहे.

**सारांश:-** डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक जागतिक दर्जाचे अर्थतज्ञ, रुपयाच्या प्रश्नाची मांडणी करणारे जगातील पहिले अर्थतज्ञ, 1921 च्या काळातील भारतासमोरील आव्हाने, ब्रिटिशांनी लागू केलेल्या चलन व्यवस्थेमुळे भारतात आलेली संकटे यांची मांडणी करण्यासाठी डॉ.आंबेडकरांनी आपल्या अर्थशास्त्रीय ज्ञानाचा पुरेपूर वापर केला.डॉ.आंबेडकरांनी पतधोरण,सार्वजनिक वित्त पुरवठा, शेतीचे अर्थशास्त्र ,देशाची अर्थव्यवस्था, चलन विषयक विचार इत्यादी विषयावर चिंतन व लेखन केले या सर्व आर्थिक विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेत वापर झाला तर भारतीयअर्थव्यवस्थेत मोठी अर्थ क्रांती झाल्याशिवाय राहणार नाही

**संदर्भसूची:-**

1) maharashtratimes. com. - 14 April 2013
2) lokmat.com. - 6 Dec 2015
3) www.ibp .world. - 9June 2019
4) Maharashtra Times .com
5)www.timenowMarathi.com
6) आर्थिक विचारांचा इतिहास प्रा.रायखेलकर ,डॉ. दामजी
7) आर्थिक विचारांचा इतिहास प्रा. पी.आर. कुमानाचे , डॉ.विलास खंदारे
8) अर्थशास्त्रज्ञ :डॉ. बी.आर आंबेडकर प्रा. सोमवंशी बी.सी

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य

**प्रा.डॉ. श्रद्धानंद बा. माने[1] डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे[2]**
[1]अर्थशास्त्र विभागप्रमुख, पाटील महाविद्यालय, पालम.
[2]अर्थशास्त्र विभागप्रमुख, बी रघुनाथ महाविद्यालय, परभणी
manesharad1971@gmail.com[1] mehetresuresh@gmail.com[2]

**प्रस्तावना :**

शिक्षणाचे अर्थशास्त्र हा विषय सर्वप्रथम १९६१ च्या दरम्यान सुरु झाला. अमेरिकन इकॉनॉमिक असोशिएशनच्या अध्यक्ष पदावरुन दिलेल्या अध्यक्षीय भाषणामधून प्रोफेसर शुल्झ यांनी शिक्षणाचे अर्थशास्त्र ही संकल्पना सर्वप्रथम जनतेसमोर मांडली. प्रोफेसर शुल्झ यांच्या मते, "शिक्षणावर होणारा खर्च हा केवळ खर्च नसून ती एक दिर्घकालीन मानवी भांडवल गुंतवणूक आहे." त्यांच्या या विचारातूनच 'शिक्षणाचे अर्थशास्त्र' ही ज्ञानशाखा विकसित होत गेली. अशिक्षित आणि कमी शिकलेल्या माणसापेक्षा शिक्षणाने परिपूर्ण झालेला माणूस अधिक उत्पादक असतो. म्हणून शिक्षणावर होणाऱ्या खर्चाकडे खर्च म्हणून न पाहता त्याकडे उत्पादक मानवी भांडवल गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे हा दृष्टिकोन विकसित झाला. हीच गोष्टी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सात ते आठ दशकांआधी नेमकी ओळखली होती. म्हणूनच महाराज आपल्या एका भाषणात म्हणाले होते की, "माझ्या रयते मध्ये प्राथमिक आणि उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जारीने खटपट चालली आहे. यावरुन शक्य तितक्या लवकर रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे. माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली तर त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने दिले असते."

राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्वत: अतिशय हुशार आणि उच्चशिक्षित असे व्यक्तीमत्व होते. त्यांचे शिक्षण राजकोट आणि धारवाड येथे सर एस.एम. फ्रेजर यांच्या निगराणीत आणि उत्तम मार्गदर्शनात झालेले असल्यामुळे त्यांना शिक्षणाची उत्तम जाण होती. शिक्षणाचे अर्थशास्त्र ही शाखा विकसित होण्यापूर्वीच सात-आठ दशकांअगोदरच त्यांनी शिक्षणाचे महत्व जाणले होते. म्हणून राजांच्या शिक्षणविषयक दूरदृष्टीचा आणि त्यांच्या शिक्षणविषयक विचार आणि कार्याचा अभ्यास करण्याच्या हेतुने प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी केली आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक विचारांचा अभ्यास करणे.
2. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण कार्याचा सखोल अभ्यास करणे.
3. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शिक्षण धोरणांची आजच्या परिस्थितीतील प्रासंगिकता अभ्यासणे.

**गृहितके :**

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षणाकडे सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनाचे माध्यम म्हणून पाहिले.
2. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सर्व समावेशक शिक्षण धोरणांचा पुरस्कार केला.
3. शिक्षण ही शासन संस्थेची महत्वपूर्ण जबाबदारी आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोधनिबंध हा पूर्णपणे दुय्यम साधनांवर आधारीत असून त्यासाठी विविध संदर्भग्रंथ, गौरवग्रंथ, अहवाल, ऐतिहासिक दस्तऐवज, विविध परिषदा आणि नियतकालिकांमधून प्रकाशित झालेले लेख यांचा आधार

घेतला आहे.

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची शैक्षणिक कार्याची प्रेरणा:**

जगन्नाथ शंकरशेठ, दादोबा पांडूरंग तर्खडकर, गोपाळ हरी देशमुख, महत्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण कार्याला बहूमोल योगदान दिले होते. त्या सर्वांच्या शिक्षण कार्याची राजर्षी शाहू महाराजांनी दखल घेऊन तसेच राजर्षीवर आर्य समाजातील विचारांचा प्रभाव असल्यामुळे त्यातून शिक्षण कार्याची प्रेरणा घेऊन ज्ञानदानाचा महायज्ञ आंरभीला. त्यांच्या या मानवतावादी कार्यामुळे त्यांना राजर्षी या उपाधीने गौरविण्यात आले.

**शिक्षण विषयक कायदेशीर तरतुदी :**

राज्यारोहण झाल्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात एकूण ३४ नविन कायदे लागू केले. त्यापैकी शिक्षणविषयक कायदे परिवर्तनाचे साधन म्हणून अवलंबिण्यात आले. सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा हा त्यातीलच एक प्रमुख होय. जुलै १९१७ मध्ये प्रथम हा कायदा करण्यात आला आणि प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करुन प्राथमिक शाळांमधील फी आकारण्याची पद्धत बंद केली.

शिक्षण घेऊन सशक्त झालेल्या लोकांपेक्षा शिक्षणाच्या अभावामुळे अशक्त झालेल्या लोकांकडे अधिक लक्ष देणे शाहू महाराजांना योग्य आणि न्यायपूर्ण वाटत होते. म्हणूनच त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. पहिल्या मोफत व सक्तीच्या शाळेचे उद्घाटन ४ मार्च १९१८ रोजी चिप्री नावाच्या खेड्यात खुद्द शाहू महाराजांच्या हस्ते झाले. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रारंभानंतर प्राथमिक शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. १९१७-१८ या वर्षी अशा शाळांची संख्या २७ होती आणि त्यामधून १२९६ विद्यार्थी मोफत प्राथमिक शिक्षण घेत होते. १९१९-२० या वर्षी शाळांची संख्या १७० पर्यंत वाढून विद्यार्थी संख्या ६३६२ झाली. १९२१-२२ या वर्षी ४२० शाळांमधून २२००७ विद्यार्थी मोफत प्राथमिक शिक्षण घेत होते. अशा रितीने राजर्षींच्या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या आलेख दिवसेंदिवस वाढत गेल्याचे दिसून येते. आजच्या परिस्थितीतही समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अनेकांना शिक्षणासाठी लागणाऱ्या अमाप खर्चामुळे आपल्या पाल्याला उच्चशिक्षण तर सोडाच प्राथमिक शिक्षण सुद्धा कठीण होऊन बसले आहे. कारण खाजगीकरणाच्या नावाखाली संपूर्ण शिक्षण व्यवस्था भांडवलदारांच्या ताब्यात देऊन शासन आपल्या जबाबदारीपासून पळ काढीत आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढल्यावर सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढेल म्हणून शिक्षण हक्क नाकारणे हे योग्य नाही. अशिक्षित बेकारापेक्षा सुशिक्षित बेरोजगार केव्हाही परवडेल. कारण तो दैववादी होण्यापेक्षा सामाजिक रचनेतील दोष शोधून दोषपूर्ण समाजरचना बदलण्यासाठी प्रयत्न करेल. ही गोष्ट राजर्षी शाहू महाराजांनी नेमकी ओळखली होती.

**मागासवर्गीयांसाठी शिक्षण :**

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी यांच्यामध्ये संघर्ष चालूच आहे. प्रतिगामी शक्तींनी नेहमी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला सतत विरोध करुन सामान्यांना शिक्षण अधिकार नाकारला आणि बहूजन समाजाला शिक्षणापासून वंचीत ठेवण्याचा प्रयत्न केला. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी ही परिस्थिती बदलण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न केले. शिक्षणाच्या क्षेत्रातील मुठभर लोकांची मक्तेदारी संपूष्टात आणून शिक्षणाचे क्षेत्र सर्वांसाठी खुले केले आणि निद्रिस्त समाजाला जागे केले. राजर्षी शाहू महाराजांनी सत्ता स्वीकारण्यापूर्वी म्हणजे १८९४ साली कोल्हापूर संस्थानातील विद्यार्थी संख्या १०८४४ होती. हीच संख्या १९२१ साली २७८३० एवढी झाली. म्हणजे विद्यार्थी संख्येत बरीच वाढ झाल्याचे दिसून येते. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या संख्येत झालेली वाढ मात्र लक्षणीय होती. अस्पृश्य विद्यार्थी संख्या २३४ वरुन २१६१ म्हणजे जवळ-जवळ दहापट वाढली. म्हणजेच ब्राम्हणेत्तर विद्यार्थी संख्या ८००८ वरुन २१०२७ म्हणजे २.६ पट वाढली, तर शिक्षणावर होणारा खर्च एक लाख रुपयांवरुन तिन लाख रुपयांवर गेला. यावरुन राजर्षी शाहू महाराजांच्या शिक्षण धोरणामुळे अस्पृश्य समाजामध्ये

शिक्षणाविषयी जागृती निर्माण झाल्याचे दिसून येते.राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य, मागास लोकांच्या शिक्षणासाठी अनेक सोयी आणि सवलती दिल्या व त्याची प्रयत्नपूर्वक अंमलबजावणी केली. त्या काळात मागासवर्गीयांसाठी नोकऱ्यांमध्ये आणि वसतीगृहांमध्ये राखीव जागा ठेवल्या होत्या हे विशेष आहे. तसेच मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतीगृह चालू केली. त्यांच्यासाठी नविन शिष्यवृत्ती योजना सुरु केल्या त्यामुळे मागासवर्गीयांच्या शिक्षणाच्या प्रमाणात वाढ झाली.

**उच्च शिक्षण :**

राजर्षी शाहू महाराजांनी सत्तासूत्र हाती घेतली तेव्हा म्हणजे १८९३-९४ मध्ये राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ९०.१० टक्के विद्यार्थी ब्राम्हणेत्तर होते. म्हणजे उच्च शिक्षणात ब्राम्हणांचे वर्चस्व होते. परंतु राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण व्यवस्थेत केलेल बदल आणि राबवलेले शैक्षणिक धोरण यामुळे १९२१-२२ या वर्षी राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ब्राम्हणेत्तर विद्यार्थ्यांचे प्रमाण ५१.२० टक्क्यांपर्यंत वाढले, तर ब्राम्हण विद्यार्थ्यांचे प्रमाण ४८.८० टक्क्यापर्यंत घटल्याचे दिसून येते.

राजर्षी शाहू महाराजांनी महाराष्ट्रभर शिक्षण प्रसाराचे काम चालू ठेवले. अनेक होतकरु व गरीब विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठवण्यासाठी महाराजांनी खाजगीतून मदत केली. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या स्थापनेमागे राजर्षींची प्रेरणा आणि सहानुभूती महत्वाची होती. याशिवाय राजर्षी शाहू महाराजांनी कृषि शिक्षण व संशोधन, स्त्रियांचे शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, तांत्रिक शिक्षण या क्षेत्रातही भरीव कार्य केल्याचे दिसून येते. राजर्षींनी शिक्षण खर्चाकडे दिर्घकालीन गुंतवणूक म्हणून पाहिले हे त्यांच्या शिक्षण कार्यावरुन आणि त्यांनी राबवलेल्या शिक्षण धोरणावरुन दिसून येते. आजच्या राज्यकर्त्यांनाही राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार, कार्य आणि शैक्षणिक धोरणे मार्गदर्शक आणि प्रेरणास्त्रोत ठरावेत असेच आहेत. राजर्षींच्या अठ्ठावीस वर्षाच्या कार्यकाळातील शिक्षणावरील खर्चाचा विचार करता तो सतत वाढत ठेवला. एकूण खर्चाच्या सहा टक्के खर्च शिक्षणावर केला. याचा विचार केला तर स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत शिक्षण खर्चाचे प्रमाण गरजेच्या तुलनेत अत्यल्प राहिले आहे. वरील सर्व बाबींचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून येते की, राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य आजच्या परिस्थितीतही अनुकरणीय आहेत. म्हणून राजर्षींचे शिक्षणविषयक विचार आणि कार्याची आजच्या काळातही प्रासंगिकता आहे.

**संदर्भ :**

1. जे.एफ. पाटील, राहूल म्होपरे (२००७)- राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची आर्थिक धोरणे आणि कार्यक्रम, कोल्हापूर विद्यापीठ.
2. डॉ. व्ही.बी. घूगे (१९७५) छत्रपती शाहूंचे समाजवादी आर्थिक धोरण.
3. भगत रा.तु. (१९९९)- शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, पूणे.
4. डॉ. सूर्यवंशी जी.एस. (१९७८)- राजा शाहू आणि समाजप्रबोधन.
5. स्मरणीका (२००३) मराठी अर्थशास्त्र परिषदेचे २७ वे राज्यस्तरीय अधिवेशन.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार : एक अभ्यास

**प्रा. डॉ. अनंत नरवडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद.

**प्रस्तावना**

कोणत्याही देशाच्या विकासाचे मुळ हे सामाजीक, राजकीय आणि आर्थीक विचारवंताच्या विचारात दिसून येते. भारताच्या विकासात मोलाचे योगदान देणारे सामाजिक, राजकिय आणि आर्थिक विचारवंत म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर होत. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदेपंडीत, भारतरत्न् यासारख्या अनेक बिरुदावलीने सन्मानित झालेले एक थोर अर्थशास्तज्ञ् म्हणजे डॉ. भिमराव रामजी आंबेडकर यांनी भारतीय समाजातील वंचित, दलित, गरिब आणि उपेक्षित घटकासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत कोणती धोरणे उपयुक्त् ठरतील यांचा चिकित्सक् विचार केला. भारत हा कृषीप्रधान देश आहे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून कृषीकडे पाहिले जाते. कृषीक्षेत्राचा विकास झाल्याशिवाय भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास होणार नाही, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचारांत जाणले होते. त्यामुळे भारतीय कृषीच्या विकासासाठी कोणत्या अडचणी आहेत आणि त्या कशापध्दतीने सोडवाव्यात या विषयीचे विचार त्यांनी वेळोवेळी मांडलेले दिसून येतात. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला महत्त्वाचे स्थान आसतानाही कृषीक्षेत्र मागासलेले आहे त्यासाठी विभाजन आणि अपखंडत हे घटक कारणीभुत आहेत. त्यामुळे यात सुधारणा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषी विषयक परिस्थितीचा सविस्तर् अभ्यास करुन कृषीक्षेत्रासंमधीचे विचार मांडले आहेत त्याचा थोडक्यात आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेणार आहोत.

**शोधनिबंधाची गृहितके :-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात समता व सामान्य माणूस केंद्रस्थानी आहे.
2) कृषीक्षेत्रातील आलीकडच्या काळातील सुधारणेच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार दिसून येतात.

**शोधनिबंधाची उदिष्टये :-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक विचारांचा अभ्यास करणे.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय दारिद्रयाविषयीचे विचार जाणून घेणे.
3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारतीय शेती, शेतकरी, शेतमजुरांविषयीच्या विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :-** सदरील शोधनिबंधाचा प्रस्तुतीकरणासाठी दुय्यम साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी विविध प्रकाशने, नियतकालीके, मासिके, साप्ताहिके, विषयाशी संबंधीत संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे व इंटरनेटवरील उपलब्ध् माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कृषी व्यवस्थेची उत्त्म जाण होती, भारतीय कृषीला वीज आणि पाणी यांचा पुरवठा झाल्यास भारत एक समृध्द् देश होऊ शकेल यांची त्यांना खात्री होती, त्यांनी कृषीविषयक विचार मांडताना पुढील घटकाचा विचार केला.

**भारतीय शेतीच्या धारणक्षेत्राचा प्रश्न् :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 1918 साली 'The Gurnal of Indian Economic society' च्या अंकात (Small Holding in India and Their Ramedies) "भारतातील अल्पभुधारण क्षेत्रे व त्यावरील उपाय" या शोधनिबंधात शेतीविषयक धारणक्षेत्राचा प्रश्न् उपस्थित केला. विभाजन, अपखंडन व अल्पधारणक्षेत्र ही भारतीय शेतीची मोठी समस्या आहे.किफायतशिर धारणक्षेत्राची व्याख्या उत्पादनाचा निकष लावून केली पाहिजे असे त्यांचे मत होते. जमिन, भांडवल व श्रमिक हे उत्पादन घटक योग्य् प्रमाणात उपलब्ध् असणे आवश्यक् आहे. फक्त् धारणक्षेत्र मोठे करुन उत्पादन वाढणार नाही. भारतीय शेतीमध्ये अतिरिक्त् उत्पादन न झाल्यामुळे भांडवल तुटवडा निर्माण होत आहे. लागवडीखालील शेतजमीन कमी आणि लोकसंख्या जास्त् आसल्यामुळे बेकारांचे प्रमाण वाढत आहे. रॅग्नर् नर्क्स यांची "प्रच्छन्न् बेकारीची" संकल्पनेचे मुळ या विचारांत दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते बेकार भांडवल जर उपयोगात नसेल तर त्यावर फारसा खर्च करण्याची गरज पडत नाही. मात्र बेकार श्रम उत्पादन करो किंवा न करो त्यावर उपभोग खर्च करावाच लागतो. त्याच्या मते बेकार श्रम हे एक सामाजीक संकट आहे. त्यामुळे धारणक्षेत्र व भांडवल वाढवून बेकारीचा प्रश्न् सोडवावा लागेल. बेकारीची समस्या सोडवण्यासाठी त्यांनी ग्रामीण औद्योगिकरणाचा उपाय सुचवला. औद्योगिकीरणामुळे लहान, मोठे उद्योग निर्माण झाल्यास शेतीक्षेत्रातील अतिरीक्त् श्रमिक उद्योगक्षेत्रात समायोजीत होतील त्यामुळे शेतीवरील भार कमी होऊन बेकारीचा प्रश्न् काही प्रमाणात तरी कमी होईल.

**सामुदायीक शेती विषयी विचार :-** भारतामध्ये शेतजमिनीच्या मालकी पध्दतीत चुका आहेत असे डॉ. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. मात्र त्यांना सहकारी शेतीचा मार्ग मान्य् नव्हता. कारण सहकारी शेतील ज्यांच्याकडे जमिन आहे त्यांना फायदा होईल मात्र ज्याच्याकडे जमिन नाही आशा भूमिहिनांना काहीही फायदा होणार नाही.त्यासाठी त्यांनी सामुदायिक शेतीचा पर्याय सुचवला.सामूदायीक शेतीमध्ये राज्यानी सर्व शेतजमीन एकत्रित करुन त्यांची समान भागात विभागणी करावी आणि ती जमिन सर्व जाती धर्माच्या लोकांना कसण्यासाठी द्यावी. त्या जमीनीसाठी लागणारे बी-बीयाणे, रासायनिक खते, अवजारे यांचा पुरवठा शासनाने करावा असे त्यांचे मत होते. शेतात काम करणाऱ्या लोकांना तयार झालेल्या उत्पन्नाचा समान वाटा द्यावा. ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत उत्पादकता व कार्यक्षमता वाढून उत्पादनात वाढ होऊन गरीब आणि श्रीमंत यांच्यातील दरी कमी होण्यास मदत होईल. कारण आर्थीक आणि सामाजिक समतेशिवाय लोकशाहीला अर्थ राहणार नाही असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्पष्ट मत होते.

**शेतमजूरांविषयीचे विचार :-** भारतात शेतकरी, शेतमजूर व कामगार यांच्या खुप समस्या आहेत हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना माहित होते. त्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्यांने प्रयत्न् केल्याचे दिसते. 1937

च्या नव्या कायद्यानुसार अस्तीत्वात आलेल्या पहिल्या मंत्रीमंडळात त्यांनी लेबर मेंबर म्हणून काम केले व मजूर व कामगारांच्या हिताचे अनेक कायदे पास करुन घेतले. पुढे 1948 ला किमान वेतन कायद्यातील तरतुदीचा फायदा कामगारांना मिळवून दिला. तसेच औद्योगिक कामगारांना मिळणाऱ्या ज्या सोयी सुविधा आहेत उदा- भविष्य् निर्वाहनिधी, नुकसान भरपाई, अपघात विमा, अरोग्य् विमा या सुविधा शेतमजुरांना मिळाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता.

**जमिन महसुलविषयक विचार :-** 28 जुलै 1925 रोजी 'केसरी' पत्राने संपादकिय लेख लिहून जमिन महसुल शेतीच्या उत्पन्नावर आकारावा असे मत मांडले. आंबेडकरांनी त्या लेखाला प्रत्युत्तर म्हणून 18 ऑगस्ट् 1925 रोजी केसरी मध्ये लेख लिहून त्यांच्या मुख्य् विधानालाच जाहीर विरोध करुन जमीन महसुल हा अन्यायकारक असल्याचे सांगितले. तर सर्वांकडून सारखा कर वसूल केल्यास कमी उत्पन्न् असणाऱ्याना ते त्रासदायी होईल. त्यामुळे काही विशिष्ट् उत्पन्न् गटातील शेतकऱ्यांना जमीन महसुलातून सुट मिळाली पाहिजे. त्यासाठी जमिन महसूल संहितेचे (लॅड रिव्हेन्य् कोड) 107 वे कलम रदद् करुन जमिन महसुल प्राप्तीकराच्या कक्षेत आणावा असे त्याचे मत होते. बाबासाहेबांनी खुप वर्षापूर्वी मांडलेल्या विचारावर आजही चर्चा होताना दिसते.

**भारतातील दारीद्रयाविषयीचे विचार :-** भारतात वारसहक्कामुळे शेतजमीनेचे झालेले लहान –लहान तुकडे व त्यावर वाढत्या लोकसंख्येचा भार यामुळे शेतकऱ्याच्या दारीद्रयात वाढ झाली आहे, शेतकऱ्याना शेती सोडून इतर व्यवसायात वाव नसल्यामुळे दारीद्रय आणखी वाढत आहे त्यासाठी उद्योग धंद्याची वाढ घडवून आणणे अत्यंत आवश्यक् आहे. दिवसेंदिवस वाढत आलेल्या लोकसंख्यामुळे भूमिहिन, अस्पृश्य्, मजूराच्या बेकारीत आणखी वाढ होत आहे. त्यासाठीच सामुहिक शेतीच्या माध्यमातून जाती – पाती ,गरीब श्रीमंत याचा विचार न करता भाडेपट्यावर जमिन कसण्यास द्यावी असे आंबेडकरानी सुचवले तसेच सावकार, सराफी, पेठीवाले हे शेतकरी व शेतमजुरांची अडवणूक करुन त्यांना मोफत वेढबिगारासारखे त्याने राबवून घेतात. त्यामुळे शेतकरी व शेतमजूर यांच्या दारीद्रयात वाढ होत आहे त्यासाठी ग्रामीण औद्योगीकरण वाढवणे गरजेचे आहे असे आंबेडकरानी सांगितले.

**खोती पध्दत् :-** मुंबई इलाख्यात शेतसारा गोळा करण्यासाठी खोताची नियुक्ती केली होती. त्यावेळी भात शेतीतील अर्धे उत्पन्न् व वरकस जमिनितील पिकांच्या एक तृतीयांश भाग कुळाकडून वसूल करण्याची पध्दत् होती. खोत स्वत्:च्या जमीनिवर शेतकऱ्याना विनामोबदला राबवून घेत तसेच त्यांच्या परिसरातील फळे, भाजीपाला, कोंबड्या विनामोबदला घेऊन जात.एखादा कुणबी चांगले कपडे घालू लागला तर त्याला ही खोताच्या रोषाला बळी पडावे लागे, त्यामुळे शेतकरी आणि खोत यांच्यात संघर्ष निर्माण झाला. त्यात काही खोताना शेतकऱ्यांनी वैतागून ठार मारले त्यामुळे खोत पध्दतीत सुधारणा करण्याचे सरकारने ठरवले. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांची बाजू घेऊन खोत पध्दती नष्ट् करण्याची मागणी केली व 17 सप्टेंबर 1937 रोजी मुंबई कायदे मंडळात खोत पध्दती रदद् करण्याचे विधेयक मांडले.आंबेडकरांचे खोती अंताचे विधेयक म्हणजे आलीकडच्या काळातील भुसुधारणा कायद्याचे मुळ ठरले.

**दामोदर नदी प्रकल्प् :-**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जलनिती तयार करुन पाण्याचे राष्ट्रीय स्तरावरील नियोजन, व्यवस्थापन, वितरण, जलविद्युत निर्मिती, बहुउद्देशिय प्रकल्प् आणि आंतरराज्यीय नद्याचे प्रश्न्

सोडवण्यासाठी खोरे निहाय प्राधिकरण तयार केले. दामोदर नदीच्या पुरामुळे हाजारो लोकांचा जीव जात, शेतीचे खुप मोठे नुकसान होत असे. त्यामुळे जलसिंचन, विजनिर्मिती, पुरनियंत्रण व स्वस्त् जलमार्गाचे फायदे मिळवण्यासाठी बाबासाहेबांनी दामोदर नदी प्रकल्प् हाती घेतला. 1935 च्या कायद्यानुसार पाणी हा प्रश्न् राज्याच्या अखत्यारीत होता त्यामुळे राज्याराज्यात वेगवेगळया समस्या निर्माण होत होत्या. त्यामुळे पाणी प्रश्न् केंद्रशासनाच्या अखत्यारीत असावी असे मत त्यांनी मांडले. पाणी आणि महापूर हे विनाशकारी असतात असे ग्रहित धरण्यापेक्षा पाणी नसल्यामुळे भारतीय जनतेला जास्त् अडचणी येतात.त्यामुळे पुराच्या पाण्याचे मानवाच्या विकासासाठी नियोजन करुन धरणे बाधावित  असा सल्ला बाबासाहेबांनी दिला. त्यांच्या प्रयत्नामुळेच 1 डिसेंबर 1947 रोजी हे बिल संसदेत मांडून 18 फेब्रुवारी 1948 रोजी याला मान्यता मिळाली. व 7 जुलै 1948 रोजी 'दामोदर नदी खोरे प्राधिकरण कायदा' अस्तीत्वात आला. पुढे बाबासाहेबांच्या सुचनेनुसार पंजाब प्रातांतील चीफ इंजिनियर रायबहार, ए. एन. खोसला यांच्या नेतृत्त्वाखाली दामोदर व्हॅली प्रोजेक्ट् पुर्ण झाला.

**निष्कर्ष :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषीविषयक विचार हे वास्तववावर  आधारीत होते. त्याच्या विचारात दलित, वंचित, उपेक्षित शेतकरी व शेतमजूर केंद्रस्थानी होता. भारतीय शेतीच्या धारण क्षेत्रामुळे निर्माण झालेले प्रश्न् सोडवून सामान्य् शेतकरी व शेतमजूर यांचे दारिद्रिय दूर करण्यासाठी सामुदायीक शेतीचा उपाय त्यांनी सुचवला ज्यामुळे भूमिहिनानाही  शेत जमिन कसता आली. त्यांची उत्पादकता व कार्यक्षमता वाढून देशातील उत्पादन वाढेल यासाठी त्यानी प्रयत्न् केल्याचे दिसून येते. जमिन महसूल संहितेचे 107 वे कलम रद्द करुन जमिन महसूल प्राप्तीकरांच्या कक्षेत आणण्याच्या सुचनेमुळे लहान शेतकऱ्यांना फायदा झाला. तसेच जाचक अशी खोती पध्दती बाबासाहेबाच्या प्रयत्नामुळे नष्ट झाली. भविष्यात येणाऱ्या समस्या ओळखून दामोदर व्हॅली प्रोजेक्ट्  सारखे प्रकल्प् हाती घेतले. थोडक्यात अलीकडील काळात झालेल्या जमिन सुधारणा व शेती , शेतकरी आणि शेतमजूरांच्या प्रगतीचे मुळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषीविषयक विचारात दिसून येते.

**संदर्भ- सुची :-**

1) डॉ. वा. ना. कुबेर – डॉ. आंबेडकर : विचारमंथन सुगावा प्रकाशन, पुणे 30
2) डॉ. विजय कविमंडन – डॉ. आंबेडकरांचे आर्थीक चितन, श्री. मंगेश प्रकाशन नागपूरे
3) डॉ. दतात्र्य् गायकवाड – बहुउद्देशिय नदी खोरे विकास आणि डॉ. आंबेडकरांची जलनीती , स्वयंदीप प्रकाशन, पुणे
4) डॉ. विश्वास कदम – आर्थीक विचारांचा इतिहास, नक्षत्र प्रकाशन, औरंगाबाद.
5) प्रा. बी. सी. सोमवंशी – अर्थशास्त्रज्ञ : डॉ. बी. आर. आंबेडकर, आनंद प्रकाशन , औरंगाबाद.
6) प्रा. ए. आर. रायखेलकर – आर्थीक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स् पब्लिशर्स, औरंगाबाद, जुन 2005
7) डॉ. खंदारे , प्रा, कूमानाचे, प्रा. खरात – आर्थीक विचारांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, ऑगस्ट् 2005
8) डॉ. बी. डी. इंगळे – आर्थीक विचारांचा इतिहास, अरुणा पब्लिकेशन लातूर.
9) इंटरनेट वरील उपल्बध् माहिती

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'नदी जोड' संकल्पना व जलनिती आणि आजचे वास्तव् एक भौगोलिक दृष्टिकोन

**प्रा. कळसकर मनिषा पद्यमाकर**
भूगोल विभाग छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब जि. उस्मानाबाद

**प्रस्तावना:-**

गेल्या कित्येक वर्षापासून आपण 'नदी जोड' या संकल्पने विषयी चर्चा होताना ऐकत आहोत देशाचे 35% क्षेत्र सर्वसाधारण दूष्काळप्रवण आहे तर 33% क्षेत्रात सातत्याने तीव्र स्वरुपाचा दूष्काळ जाणवत असता. तर भारताच्या पूर्व व उत्त्र भागात महापूरासारखी आपत्ती निर्माण होते या भागात भरुन वाहणाऱ्या नद्यांचे अतिरिक्त् पाणी समुद्राला जावून मिळते. म्हणजेच भारताच्या पश्चिम व दक्षिण भागात पिण्याचे वारंवार दुर्भिक्ष्य् जाणवते. भारतातील दुष्काळ प्रवण क्षेत्राचा आणि पूरग्रस्त् प्रदेशाचा विचार केला तर 'नद्यातून अतिरिक्त् वाहणारे पाणी, पाण्याचे दूर्भिक्ष्य् असणाऱ्या भागातील नद्यातून सोडणे' हा 'नदी जोड' संकल्पनेचा मुळ अर्थ आहे.

जगात तिसरे महायुध्द् झाले तर ते पाण्यावरुन होईल असे भाकीत अनेक तज्ञानी केलेले आहे.त्यांच कारण ही तसं आहे भूजलपातळी दिवसेंदिवस कमी होत आहे. पाऊस हा लहरी झाल्यासारखा केव्हा ही पडतो किंवा पडत ही नाही आणि याचा परिणाम देशाच्या आर्थीक विकासावर झालेला दिसून येतो. याची जाणिव शासनाला खुप उशिरा म्हणजेच 2015 मध्ये झालेली दिसून आली. 'कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांना एकमेंकाशी जोडून 17 सप्टेंबर रोजी देशात 'नदी जोड' संकल्पनेचा प्रत्यक्षात मुहूर्तमेढ रोवण्यात आली. परंतू या संकल्पनेचे खरे 'महानायक' डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांनी 50 वर्षानंतर देशाची लोकसंख्या किती असेल आणि त्या लोकसंख्येला किती पाणी लागेल यांचे नियोजन भारताला स्वातंत्र्य् मिळण्यापूर्वीच केले होते. यावरुन त्यांची दूरदृष्टी व विचार करण्याची प्रगल्भता दिसून येते. शेती विषयी ही त्यांचा हेतू उदात्त् होता हे ही स्प्ष्ट् होते. परंतू त्यांनी मांडलेली ही संकल्पना खूप उशीरा पर्यंत सर्वसामान्यापर्यंत आली नाही किंवा आणल्या गेली नाही. ज्या समाजाला बाबासाहेबांनी देशवासीयांना कधीही पाण्याची कमतरता भासू नये आणि कायम वीज मिळावी यासाठी सातत्याने प्रयत्न् केले डॉ. बाबासाहेबांची 'जलनिती' समजून घेणे व त्यांनी मांडलेली 'नदीजोड' संकल्पना अमलांत आणणे हीच काळाची गरज आहे. आणि त्यांच वास्तव् समजून घेणे ही तितकच महत्त्वाचे आहे. म्हणूणच प्रस्तूत शोधनिबंधाचा "डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'नदी जोड'संकल्पना आणि आजचे वास्तव् एक भौगोलिक दृष्टिकोन" हा अभ्यास विषय निवडला आहे.

**उद्देश:-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा 'नदी जोड' संकल्पना समजून घेणे.
2) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलनिती समजून घेणे.

3) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलव्यवस्थापन समजून घेणे.

4) 'नदी जोड' प्रकल्पातील अडथळे जाणूण घेणे.

5) 'नदी जोड' प्रकल्पाचे होणारे फायदे अभ्यासणे.

**अभ्यास पध्दती:-**

डॉ. बाबासाहेबांचे पाणी या नैसर्गीक घटकांचे नियोजन त्यांचे व्यवस्थापन फारच आभ्यासपूर्ण व समाज उपयोगी होते. त्यांची 'नदी जोड' संकल्पना जलनिती या संदर्भात आजपर्यत आभ्यासाचे अवलोकन केल्यास व मागील साहित्याचा आएाव घेतल्यास विषयांची व्यापकता व त्यांची महानता लक्षात येते. प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला असून ग्रंथ, इंटरनेट या संर्दभात साहित्याचा आधार घेण्यात आला आहे.

**'नदी जोड' संकल्पनाचा अर्थ :-**

देशाच्या एकूण भूभागाच्या 35 टक्के भागात काही प्रमाणात दूष्काळ जाणवतो तर 33 टक्के भागात मात्र सातत्याने दूष्काळ जाणवतो. तर या उलट परस्थिती देशाच्या उत्त्र व पूर्व भागात पाहयला मिळते. म्हणजेच त्या भागात वारंवार पूरस्थिती निर्माण होते, तेथील नद्या ओसंडून वाहतात. म्हणजेच भारताच्या पश्चिम व दक्षिण भागात सतत दूष्काळी परिस्थिती निर्माण होवून पाण्याचे दुर्भिक्ष्य् भासते. मग अशा दूष्काळी भागातील नद्यांत पूरग्रस्त् प्रदेशातील पाणी सोडणे हा 'नदी जोड' संकल्पनेचा मूळ अर्थ आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टीने 'नदी जोड' प्रकल्पाची गरज :-**

आजच्या परिस्थित आपण पाहतो की उन्हाळयाची चालूल लागतेना लागते तोच भारताच्या पश्चिम व दक्षिण भागात पाण्याची टंचाई निर्माण होते. आणि पाण्याच्या शोधात लोकांची भटकंती सुरु होते. अलीकडच्या काही वर्षापुर्वी पाण्याच्या प्रश्नासाठी कर्नाटक विरुध्द् तामिळनाडू असा संघर्ष काही काळासाठी संघर्ष , बाभळी बंधरा प्रकरणामुळे निर्माण झालेला प्रश्न् आजपर्यंत तेवतच आहे. कोयना धरणाला 46 वर्ष पूर्ण झाले तरी देखील त्या परिसरातील 2 ते 3 हजार प्रकल्प् आजही पूर्णत्वाच्या प्रतिक्षेत आहेत.आज भारतच नाही तर संपुर्ण जग या 'पाणी प्रश्नाने चिंतेत आहे. या समस्येवरती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जलनीती, पाण्याचे व्यवस्थापन, व भविष्यकाळाची दूरदृष्टी अभेद्य होती. भारत हा एक विकसनशील व कृषिप्रधान देश आहे. त्यामुळे 80%भारतीय लोकांचे जीवन हे शेतीवर अवलंबून आहे. भारताची अर्थव्यवस्थतेचा कणा म्हणजे शेती व शेतीचा विकास जोपर्यंत होत नाही तो पर्यंत देशाचा विकास शक्य् नाही याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना होती. यासाठी शेतीला कायमस्वरुपी पाणी उपलब्ध् करण्याच्या दृष्टीने 'जलव्यवस्थापन' व शेती विकासासाठी एक आराखडा तयार केला व त्यासाठी 'नदी जोड' संकल्पना व धरण निर्मितीवर भर दिला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची 'जलनिती व नदी जोड' संकल्पना :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे पहिले नेते होते ज्यांनी 'नदी जोड' प्रकल्पाची सुरुवात केली. 1942 ते 1946 या काळात डॉ. बाबासाहेब हे व्हाईसरॉय यांच्या मंत्रिमंडळात मजूर खात्याचे मंत्री होते. या खात्याबरोबरच जलसिंचन आणि ऊर्जाविभाग सुध्दा या मंत्रालयाला जोडले गेले होते. त्याच बरोबर प्रकल्पगृस्तांच्या पुर्नवसन समितीचे अध्यक्ष म्हणून ही त्यांनी काम केले. श्रम, वीज, जल, बहुउदेशीय धरण

प्रकल्प्, नदीजोड प्रकल्पाची संकल्पना प्रथम बाबासाहेबांनी मांडली. केंद्रीय विद्युत आयोग व केंद्रीय जल आयोग यांची स्थापना बाबासाहेबांनी मंत्री असताना केली. 'हिराकुंड, दामोदर व सोन' नद्यावरील नदी खोरे प्रकल्पांची सुरुवात डॉ. बाबासाहेबांच्या काळातच झाली. 1942 ते 1946 या चार वर्षाच्या कालावधीत बाबासाहेबांनी जलव्यवस्थापन व विद्युत क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती झाल्याचे दिसुन येते ओरिसातील कटक येथे जवाहर लाल नेहरु यांच्या उपस्थितीत व डॉ. ए. एन. खोसला यांच्या अध्यक्षेखाली एका कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब मंत्री नसताना देखील हिराकुंड, दामोदर व सोन नद्यांच्या प्रकल्पा विषयी बोलताना पंडित जवाहरलाल नेहरु म्हणाले की हे धरणे म्हणजे भारताची 'आधुनिक मंदिरे आहेत' तेव्हा डॉ. खोसला म्हणाले कि 'ज्यांना नेहरु भारताची मंदिरे म्हणतात त्यांच्या पायाभरणीचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 1942 ते 1946 या काळात केले.

1945 – 47 या काळात बाबासाहेबांनी दामोदर नदी खोरे आणि महानदी खोरे यांच्या बहुउदेशीय विकासासाठी योजना तयार करुन राज्यातून वाहणाऱ्या नद्यांचे प्रकल्प् व त्यांचे व्यवस्थापन हे नदीखोरे प्राधिकरणाची स्थापना केली. यांचे सर्व श्रेय बाबासाहेबांनाच जाते. दामोदर नदी बिहार आणि बंगाल राज्यातून वाहत. त्यांचे नियोजन व व्यवस्थापन आणि जल विकास यांच्यासाठी बाबासाहेबांनी दामोदर नवीन खोरे महामंडळाची स्थापना केली. यावरुन बाबासाहेबांचे कार्य व त्यांचा समन्वयात्मक् दृष्टिकोन व्यापक होता. डॉ. बाबासाहेबांचे जलनीती , नदीजोड संकल्पना या विषयी त्यांचे कार्य महान होतेच शिवाय जलसंपत्तीचा उपयोग फक्त् जलसिंचनासाठीच नाही तर उद्योग व पर्यटनासाइी करता येवू शकतो. उदा:- नोकानयन त्यामुळे पर्यटन व्यवसायाचा विकास होवू शकतो. जलउर्जा निर्मिती करता येवू शकते या दृष्टीने प्रयत्न् करुन ते यशस्वी करुन दाखवले.नदीखोऱ्यांचा विकास करणे, बहुउदेशीय प्रकल्प् आणि त्यांची सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण विकासाची सांगड घालणे हे नदी जोड प्रकल्पामुळे शक्य् होवू शकते हे बाबासाहेबांना माहित होते. एकूण जलसंपदे पैकी 2/3 पाणीसाठा हा गंगा , ब्रम्हपुत्रा, मेघना या नद्यांच्या खोऱ्यात उपलब्ध् आहे. तर उरवरील 1/3 क्षेत्र पाण्यांच्या उपलब्धेपासून वंचित आहे. म्हणजेच एका भागात सातत्यांने उदभवणारे महापूर व दुसऱ्या भागातील पाण्याचे दुर्भिक्ष्य्, दूष्काळी परिस्थिती या दोन विरुध्द् बाबीकडे डॉ. बाबासाहेबांनी लक्ष्य् केंद्रित केले. व या समस्येवर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने 'नदीजोड' प्रकल्पाची मांडणी बाबासाहेबांनी केली. नदीजोड प्रकल्पामागील बाबासाहेबांचा उद्देशहोता औद्योगिक विकास, सिंचन, पर्यटन (नौकानयन) विकास, जलऊर्जा विकसित करणे हा होता.

**'नदीजोड' संकल्पनेचे आजचे वास्तव् :-** गेल्या काही वर्षा पासून आपण नद्याजोड प्रकल्पाची फक्त् चर्चाच होताना दिसते आहे. हि चांगली बाबा आहे. परंतु गेल्या 100 वर्षापूर्वी विधायक कल्पना डॉ. बाबासाहेबा आंबेडकरांनी मांडली होती, त्या मागे बाबासाहेबांचा हेतू उदात होता परंतु काही लोकांनी त्यांचा हा दूरदृष्टीपणा सर्वासमोर येण्यासाठी खूप कालावधी लागला असो…

आपल्या भारतात दर वर्षी 1,11,013 दशलक्ष घनमीटर पाणी समुद्रात सोडतात. या पाण्याचा वापर वीज, जलसिंचन व वाहतूकीसाठी होवू शकतो याची जाण बाबासाहेबांना होती. म्हणून त्यांनी 'नदीजोड' संकल्पना 1950 मध्ये व्यक्त् केली होती. या संकल्पनेला प्रत्यक्षात सुरु करण्यासाठी सन 2015 पर्यंत वाट पाहावी लागली 'कृष्णा आणि गोदावरी या दोन नद्यांना एकमेकांशी जोडून 17 सप्टेंबर रोजी

देशात नदीजोड प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.'नदीजोड' प्रकल्पाच्या सद्यास्थितीचा आढावा घेतला असता नदीजोड प्रकल्पासंदर्भात 27 फेब्रवारी 2015 रोजी सर्वोच्च् न्यायालयाने 'केन- बेटवा जोडनदी दमणगंगा – पिंजाळ जोडनदी, पारा – तापी – नर्मदा जोडनदी आणि इतर हिमालयन आणि बारमाही नद्यांच्या जोडणी संर्दभात मान्यता दिली. भारतामध्ये बियास – सतलज नदीजोड व पेरियार – वायगई नदीजोड प्रकल्प् पुर्ण केले आहेत जर गंगा व कावेरी नदीजोड हा प्रस्तावित असणारा प्रकल्प् पूर्ण झाला तर भूपृष्ठीय पाण्याची क्षमता 25 टक्कयांनी वाढेल परंतु या नदी जोड प्रकल्पाला विरोध होत आहे. भारत सरकार विविध नदीजोड प्रकल्पांवर 5,60,000 कोटी रुपये खर्चाच्या तयारीत आहे.

**नदीजोड प्रकल्प् यामधील अडथाळे :-**

**वन्य् पर्यावरणाला धोका :-**

नद्यांची जोडणीमुळे विविध पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहे. उदा:- मध्य् प्रदेशातील पन्नाव्याघ्र प्रकल्प् केन आणि बेतवा नद्यांच्या जोडणीमुळे या वन्य् क्षेत्रात ध्वनी प्रदूषण आणि डिझेल इंधनावर चालणाऱ्या वाहनांचे दळण – वळण यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने वन्य् पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे.

**जलप्रदूषण वाढण्याचा धोका :-**

नद्यांच्या जोडणीमुळे प्रदूषित नद्या आता प्रदुषित नसलेल्या नद्यांना मिळतील आणि त्यामुळे जलसुरक्षेचा प्रश्न् निर्माण होवू शकतो.

**जैव विविधतेला धोका :-**

प्रत्येक नदीची स्वत्:ची परिसंस्था असते त्यामध्ये असणारे जलचर हे वेगवेगळे असतात त्यांच प्रमाणे 'पाण्याचा सामू' ही वेगळा असतो. एक नदी दुसऱ्या नदीला जोडताना या घटकांचा परिणाम जैवविविधतेवर होवू शकतो. या परिणांमाचा विचार व आभ्यास करणे आवश्यक् आहे.

**प्राकृतिक संरचनेत मानवी हस्तक्षेप :-**

'नदीजोड' प्रकल्पाची अंमलबजावणी करणे म्हणजे प्राकृतिकसंरचनेत मानवाचा हस्तक्षेप असा होतो यामुळे भविष्यात मानवी अर्थातच इतर घटकांना देखील अनेक समस्यांना सामोरे जावे लागणार आहे. परंतु एकंदरीत दूरदृष्टी ठेवून भविष्यकालीन विचार केला व पाण्याचे सूयोग्य् नियोजन व व्यवस्थापन केले तर नद्यांची जोडणी ही काळाची गरज आहे हे ही तितकेच खरे आहे.

**नदीजोड प्रकल्पामुळे होणारे फायदे :-**

1. **सिंचन क्षेत्रात वाढ :-** देशातील प्रमुख नद्या एकमेकांना जोडल्या गेल्यास, शेतीचे बरेच क्षेत्र ओलीताखाली येईल सिंचनाची समस्या त्या भागातील कायमस्वरुपी मिटेल जवळ – जवळ 75 दशलक्ष हेक्टर क्षेत्र ओलीता खाली येईल त्यामुळे देशातील शेती विकासाला चालना मिळेल.
2. **जलविद्युत प्रकल्पाची निर्मिती :-** 'नदीजोड' प्रकल्प् हे जलविद्युत निर्मितीसाठी वरदान आहेत. जल विद्युत प्रकल्पाचा विकास साध्य् करता येवू शकेल.
3. उत्त्र व पूर्व भारतातील वार्षिक महापुराचे व त्यांच्या दुषपरिणांमाचे प्रश्न् सोडवणे शक्य् होईल.

4. दक्षिण व पश्चिम भारताततील पाण्याचा प्रश्न् सोडवणे शक्य् होईल शेती व घरगुती वापरासाठी पाणीसाठा उपलब्ध् होईल सततच्या दूष्काळी परिस्थितीमुळे हैराण झालेल जनजीवन सुरळीत होवून पाणी टंचाईचा प्रश्न् मार्गी लागेल.
5. शहरी पाणी पुरवठ्यांची व्यवस्था अधिक समाधानकारक करता येईल.
6. हरितक्रामी मर्यादित न राहता, प्रादेशिक व पीकरचनेच्या दृष्टीने सर्वस्पर्शी् व समावेशक होईल.
7. देशाच्या काही भागामध्ये बारमाही अंतर्गत जलवाहतुक सुरु होईल.
8. वनीकरणावर भर देता येईल त्यामुळे पर्यावरण संतुलनाची समस्या सोडवता येईल.
9. भूपृष्ठांतर्गत पाण्याच्या पातळीत वाढ होईल.

**सारांश :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलव्यवस्थापन त्यांची जलनीती पाण्या संदर्भात घेतलेले धोरणात्मक् निर्णय यामुळे कृषी विकासाला चालना मिळाली. पूरपरिस्थितीवर नियंत्रण मिळवता येईल व दूष्काळी स्थितीवर मात करता येवू शकेल. या दृष्टीने 'नदीजोड'संकल्पना मांडली 'हिराकुंड धरण'हे जगातील सर्वात मोठे धरण असून या धरणातील पाण्याचा लाभ 3,24,000 हेक्टर् क्षेत्राला झाला . शेतीचे सिंचन क्षेत्र वाढले शेती उत्पादकता वाढली व याचा परिणाम म्हणजे देशाच्या विकासाला झाला यांचे श्रेय बाबासाहेबांच्या जलनीतीलाच जाते.

पाणी व्यवस्था ,सिंचन , जलवाहतूक, नोकानयन वीजनिर्मिती आणि 'नदीजोड' प्रकल्प् इ. आंबेडकरांमुळे मार्गी लागले आहे हे कुणीही नाकारु शकणार नाही डॉ. बाबासाहेबांचे हे 'नदीजोउ संकल्पनेचे खरे जनक आहेत असेच म्हणावे लागेल. बाबासाहेबानी 1950 मध्ये नदीजोड संकल्पना व्यक्त् केली. पाण्याच्या प्रश्नावर कायमचा तोडगा हा 'नदीजोड' प्रकल्प्च आहे असे सांगणारे ते प्रथम नेते होते. ज्यांना जन्मापासून पाण्यासाठी संघर्ष करावा लागला. हजारो वर्ष पाण्यापासून दूर ठेवले त्यांच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशवासीयांन साठी कायम पाणी मिळावे यासाठी प्रयत्न् केला.आजच्या या काळात त्यांनी सांगितलेले जलनिती चे धोरण व 'नदीजोड' प्रकल्प् ही काळाची गरज आहे हेच खरे.

**संदर्भ :-**

1. www.vikaspedia.in
2. http://mowr.gov.in/schemes-projects programmes/setemes/interlinking
3. डॉ. आंबेडकरांचे जलविषयक धोरण – प्रा. डॉ. नरेश शंकरराव इंगळे
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व ऊर्जा नियोजन – तूषार ए. कांबळे
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुभव आणि आठवणी – नानक चंद दत्तु मराठी भाषांतर – भास्कर् लक्ष्मण् भोळे

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा फुले यांचे शेती व शेतकरी विषयक विचारांचे विश्लेषनात्मक अध्यन
# (Analytical Study of Mahatma Phule's Thoughts on Agriculture and Farmers)

**Dr. Subhash Taterao Pandit**
Assistant Professor, Department of Economics Swami Vivekanand Night College of Arts and Commerce, Chatrapati Bhavan, Datta Nagar, Ayre Road, Dombivli (East) – 421201 Dist. Thane
subhashpandit2011@gmail.com

**गोषवारा (Abstract):**

महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाज सुधारक, विशेषतः समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्यांची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत, आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यांचा उद्गाता, जातीभेद करणाऱ्या धर्म संस्थेवर कडाडून हल्ला चढवून मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकनेता, सामान्य लोकांच्या दुःखाला आणी अन्यायाला वाचा फोडणारा महात्मा म्हणून ज्योतीराव गोविंदराव फुले महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला परिचित आहेत. प्रस्तुत संशोधन अभ्यासात महात्मा फुले यांनी वेळोवेळी केलेल्या सामाजिक कार्यातून, लिखाणातून त्याचे जे शेती आणि शेतकरी विषयक विचार मांडले आहेत त्याचा थोडक्यात आढावा घेऊन वर्तमान समाज, अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता त्यांच्या विचारांचे महत्व स्पष्ट करण्यात आले आहे.

## प्रस्तावना (Introduction):

महात्मा फुले हे चार्वाक, बुध्द, संत कबीर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज यांची परंपरा जोपासणारे विवेकवादी समाज सुधारक, विचारवंत होते. भारतातील समाज सुधारणा, स्त्री मुक्ती, सर्वाना शिक्षणाचा मुलभूत हक्क याविषयी ते आग्रही होते. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे, हे त्यांनी 'तृतीयरत्न' या नाटकातून दाखून दिले. शिक्षणानेच मनुष्य विवेकशील व संवेदनशील बनतो असे त्यांचे मत होते. शिक्षणाभावी मानवी हक्क, प्रतिष्ठा, दर्जा समाजात मिळत नाही. समाज सुधारणेचा परीघ व्यापक होण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, याची त्यांना जाणीव होती. देशातील शेतकरी हा संपूर्ण समाजव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या उत्पादन क्षमतेवर पूर्ण अर्थव्यवस्था अवलंबून आहे. देशातील शेतकऱ्यांची अज्ञान, बेकारी, गरिबी, अंधश्रद्धा, कर्मकांड अर्थव्यवस्थेवरच नाही तर समाज व्यवस्थेवरही प्रतिकूल परिणाम करताना दिसून येते. महात्मा फुले यांनी देशातील कृषीक्षेत्राची आणि शेतकऱ्यांची दारिद्र्याचे चित्र त्यांनी अतिशय समर्पकपणे "शेतकऱ्यांचा असूड" या ग्रंथात मांडले आहे. त्यांनी शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात समाजातील विशेषतः शेतकऱ्यांच्या जीवनातील अंधश्रद्धा, प्रथा, परंपरा, रूढी चालीरीती, पुनर्जन्म, कर्मकांड या सर्व कल्पना मानवाला गुलामीत घेऊन असून यामुळे शेती मागास होऊन शेतकऱ्यांची गरिबीमुळे त्यांच्यातील नव -निर्माण शक्तीचा ऱ्हास झाला होता. म्हणूनच महात्मा फुले यांनी सर्व जाती धर्मातील मुला –मुलींसाठी सक्तीच्या व सार्वजनिक प्राथमिक शिक्षणाची निकड बोलून दाखवली आणि त्याकरिता कृतियुक्त आचरण ही केले. शिक्षणामुळेच समाजातील दरी कमी होईल. त्याचबरोबर कृषीक्षेत्राचा विकास होऊन शेतकऱ्यांची गरिबी दूर होण्यास मदत होईल यावर त्यांचा विश्वास होता.समाजातील सर्व घटकांची दुरवस्था शिक्षणामुळेच दूर होऊ शकते असा त्यांचा ठाम विश्वास होता. शेतकऱ्यांचे मागासलेपण, गरिबी, दारिद्र्य आणि गुलामी जीवन हे केवळ त्यांच्यातील शिक्षणाच्या अभावामुळेच झाली यावर त्यांचे ठाम मत असलेले आपणास त्यांच्या विचारातून लक्ष्यात येते. प्रस्तुत संशोधनात्मक अभ्यासात महात्मा फुले यांनी केलेल्या विविध लिखाणातून व भाषणातून मांडलेल्या आर्थिक विशेषतः शेती आणि शेतकऱ्यांच्या परिस्थिती विषयक विचारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## अभ्यासाची उदिष्टे (Objectives of Study):

१. महात्मा फुले यांनी शेती व शेतकऱ्या संबंधित मांडलेल्या विचारांचा आढावा घेणे.
२. महात्मा फुले यांनी समाज जागृतीसाठी मांडलेल्या विचारांचा अभ्यास करणे.
३. महात्मा फुले यांनी मांडलेल्या शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारणे व उपायांचे विश्लेषण करणे.

## संशोधन पद्धती (Research methodology)

प्रस्तुत संशोधन अभ्यास पूर्णतः संशोधनाच्या द्वितीय साधन सामुग्रीवर आधारित असून प्राप्त माहितीचे विश्लेषण वर्णनात्मक आणि विश्लेषनात्म्क पद्धतीने करण्यात आले आहे. अभ्यासाकरिता आवश्यक असलेली माहिती

महत्मा फुले यांचे समग्र साहित्ये, तसेच विविध संदर्भ पुस्तके, आणि संशोधकांचे संशोधन यातून प्राप्त करण्यात आली आहे.

**अभ्यासाच्या मर्यादा (Limitations of Study):**

1. प्रस्तुत अभ्यास केवळ महात्मा फुले यांच्या विचारावर आधारित आहे.
2. प्रस्तुत अभ्यास केवळ कृषी आणि शेतकऱ्यांच्या संबंधित महत्मा फुले यांनी मांडलेल्या विचारांचा वर्णनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.
3. महात्मा फुले यांनी मांडलेल्या शिक्षण विषयक विचारांचे अध्यन थोडक्यात करण्यात आले आहे.
4. ४. प्रस्तुत अभ्यासाचे निष्कर्ष काळानुरूप आहेत.

**महात्मा फुले यांचे शेती आणि शेतकरी वर्गाविषयक विचार (Mahatma Phule's Thoughts on Agriculture and Farmers)**

महात्मा ज्योतिबा फुले यांचे आर्थीक विचार त्यांनी केलेल्या वेळोवेळी भाषणातून आणि साहित्यातून स्पष्ट मांडलेले दिसून येतात. त्यांचे विचार पुढील साहित्यात असलेले आपणास दिसून येतात.

1. **गुलामगिरी - १८७३**
2. **दीन बंधू - १८७७**
3. **दीन मित्र – १८८१**
4. **शेतकऱ्यांचा आसूड – १८८३**

भारतातील कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमुळे बहुसंख्य समाज हा शेती व शेतीसबंधित व्यवसायावर अवलबून आहे. शेतीमध्ये अधिक परिश्रम करून ही अल्प प्रमाणात उत्पन होत असे. शेतकरी संपूर्ण जीवन गरिबी व दारिद्रयात जीवन जगत असे. देशातील शेती व्यवसाय मागास असून शेती सुधारण्यासाठी कोणताही प्रयत्न इंग्रज स्टे कडून करण्यात येत नसे. समाजातील शेतकऱ्यांची दयनीय परिस्थिती महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या असूड या ग्रंथात मांडून जनते पुढे आणली. शेतकऱ्यांचा असूड या ग्रंथात महात्मा फुले यांनी शेतीच्या मागासलेपणाचे आणि शेतकऱ्यांच्या दारिद्याचे अनेक कारणे सांगितले आहेत.

शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांना लुबाडणाऱ्या, भाकडकथा सांगून फसविणाऱ्या उच्च वर्णनियांचा बदला घेतला पाहिजे असे त्यांचे मत त्यांनी यामध्ये स्पष्ट केलेले आपणास दिसून येते. महात्मा फुले स्वतः शेतकरी कुटुंबातील असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाणीव होती. शेतकऱ्यांचे अनेक मार्गांनी होणारे आर्थिक, सामाजिक, धार्मिक शोषण त्यांना व्यतीत करत असे. त्याकरिता त्यांनी शेतीतील मागासलेपणाचा आणि शेतकऱ्यांच्या समस्यांचा गाभिर्याने विचार करून त्यामागील कारणांचा शोध घेतला व त्यावरील उपाय सुचविले.

देशातील शेतकरी एकीकडे धर्माच्या नावाखाली लुटला जात होता तर दुसरीकडे सत्ताधारी त्यांचे शोषण करत होते. समाजातील धार्मिक वर्चस्ववादी ब्राहामण, देशमुख, पाटील, वतनदार, इंग्रज अधिकारी, सावकार हे सर्व शेतकऱ्यांचे शोषण करीत असत. शेतकऱ्यांच्या शोचनीय, दयनीय परिस्थितीचे मुळ त्यांच्या अज्ञानात आहे हे त्यांनी वेगवेगळया लिखाणातून आणि भाषणातून आवर्जून सांगितले आहे. शेतकऱ्यांनी स्वतःच्या मुलांना शिक्षण द्यावे त्यांना अधुनिक ज्ञान विज्ञानाची ओळख पटल्यास ते आपल्या शेतीत नवीन तंत्राचा वापर करून शेती सुधारण्याचा प्रयत्न करतील असे त्यांना वाटत असे. देशातील सरकारने शेतीविषयक ज्ञान शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्यावे. शेतीतील नापिकी, दुष्काळ, दारिद्र्य यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. शेतीवर संपूर्ण कुटुंबाचे भरणपोषण करणे त्यास अशक्य झाले. म्हणून महात्मा फुले यांनी देशातील प्रत्येक शेतकऱ्याने शेती व्यवसाया बरोबरच जोड व्यवसाय करावा असे म्हटले आहे.

**महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांच्या दारिद्र्यविषयक विचार (Mahatma Phule's Thoughts on Poverty of Farmers)**

आज ही भारतासारख्या कृषिप्रधान देशात शेतीला महत्वाचे स्थान असून लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. त्या राष्ट्राचा विकासही शेती व शेतीसंबंधित व्यवसायावरच अवलंबून असतो. परंतु महात्मा फुले यांच्या काळातही आणि आजही जवळपास सारखेच भारतीय शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न किवा समस्या असलेल्या आपणास दिसून येतात. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून असून शेतीतील उत्पादनाचा उतारा अत्यंत अल्प आहे. ज्या उत्पादनातून शेतकरी सुखी, समाधानी जीवन जगू शकत नसून तो सातत्याने कर्जबाजारी आणि दारिद्र्यात जीवन

जगत आहे. शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन कर्ज फेडण्यात जाऊन त्यांचा अंतही दारिद्य, गरिबीतच होतो. महात्मा फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे कारणे पुढील प्रमाणे स्पष्ट केले असून आजच्या शेतकऱ्यांच्या दारिद्र्यासही जवळपास तीच कारणे कारणीभूत असलेले आपणास दिसून येतात.

१. संयुक्त कुटुंबातील जमीन वितरणामुळे जमिनीचे तुकडीकरण होऊन शेतकरी दारिद्यात गेला.

२. जमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतीतील उत्पादनाचा उतारा कमी झाला परिणामी पूर्ण उदरनिर्वाह करणे अशक्य झाले.

३. शेतकऱ्यांच्या दारिद्र्याला कारणीभूत असलेला प्रमुख घटक म्हणजे शेतकऱ्यांचे विविध सामाजिक, धार्मिक, संस्थानिक घटकांने केलेले आर्थिक शोषण होय.

४. समाजातील कर्मकांड, अंधश्रद्धा शेतकऱ्यांच्या दारिद्र्यास कारणीभूत आहेत.

५.. शेतकऱ्यांचे अज्ञान, त्यांच्यावरील शिक्षणाची बंदी, शेतकऱ्यांच्या दारिद्र्यास कारणीभूत होती.

६. धार्मिक विधी आणि कर्मकांडाच्या नावाखाली शेतकऱ्यांची करण्यात येणारी लुबाडणूक आणि फसवणूक शेतकऱ्यांचे दारिद्र्यास कारणीभूत ठरली.

7. सावकार वर्ग शेतकऱ्यांच्या दारिद्र्यास अधिक कारणीभूत असलेला आपणास दिसून येतो.

८. विदेशी वस्तू विशेषतः ब्रिटनमधून वस्तूची केली जाणारी आयात शेतकऱ्यांच्या दारिद्यास कारणीभूत ठरली.

९. भारतीय शेती संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असल्यामुळे अनेक वेळा ओला किंवा कोरडा  दुष्काळ पडत असे त्याचा परिणाम शेती व्यवसायावर होत असे.

**भारतीय शेती व शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठीचे उपाय  (Measures of improve the conditions of Indian agriculture and farmers)**

देशातील शेतकरी वर्गाचे सावकार, सरकारी अधिकारी आणि धार्मिक वर्चस्व यांच्या शोषणातून मुक्त होण्यासाठी महात्मा फुले यांनी पुढील उपाय सुचविले आहेत. जे आजच्या वर्तमान स्थितीत ही लागू होताना आपणास दिसून येतात.

१. शेतीची उत्पादकता वाढावी या उदेशाने सरकारने शेती सुधारणा कार्यक्रम राबवावेत.

२. शेतीचे उत्पादन वाढावे याकरिता पाणीपुरवठा, पाणी सिंचनाच्या सोयी कराव्यात.

३. टेकडीवर तलाव, नदीवर धरणे, बांधावेत ज्यामुळे शेतकऱ्याला पाणीपुरवठा होऊन उत्पादनात वाढ होईल.

४. सरकारने शेतकऱ्याला शेतीच्या विविध कामासाठी वेळोवेळी आर्थिक मदत करावी.

५. सरकारने शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक ज्ञान, प्रशिक्षण द्यावे.

७. शेतीसंबंधित कृषी विषयक योजना राबवाव्यात.

८. शेतकऱ्यांच्या मुला – मुलींना मोफत शिक्षण द्यावे.

९. शेतकऱ्यांच्या मुला – मुलीकरिता वसतिगृह काढावीत.

१०. मुलांना व मुलींना शिकविण्यासाठी कनिष्ठ वर्गातील शिक्षक नेमावेत.

११. शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलांना उच्च शिक्षणासाठी विदेशात सरकारने पाठवावे.

१२. शेतसाऱ्यापासून सरकारला जे उत्पन मिळेल त्याचा उपयोग शेतकऱ्यांचा मुलांच्या शिक्षणासाठी करावा.

१३. शेतकरी वर्गाला सरकारने कमी व्याजदराने कर्ज पुरवठा करावा.

१४. शेतकऱ्यांची व्यापारी, सावकार, धार्मिक वर्चस्ववादी यांच्याकडून शोषण व फसवणूक होऊ नये म्हणून त्यांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवावे.

**निष्कर्ष (Conclusion)**

महात्मा फुले यांच्या शेती व शेतकऱ्यांच्या परिस्थिती विषयक विचारांचे अध्ययन केल्यानतर आपल्या लक्ष्यात येते की, शेती सुधारण्यासाठी व शेतकऱ्याला दारिद्र्य, गुलामीतून  मुक्त करण्यासाठी सुचविलेल्या योजना, शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सुचविलेले उपाय आजही उपयुक्त आहेत. महात्मा फुले यांचा शेतीविषयक विचार हा संपूर्ण समाजाचा आणि राष्ट्राच्या अभ्युद्याचा विचार आहे. सामाजिक समता, आर्थिक सुबता, निकोप एकता यांचा विचार आहे. भूमी आणी भूमिपुत्र याशिवाय भारतासारख्या शेतीप्रधान देशाला सर्वांगीण विकास साधता येत नाही आणि त्यासाठी शेतकऱ्यांचा विकास आवश्यक आहे असे महात्मा फुले यांनी प्रतिपादन केले. आज २०२१ वर्षातही आपल्या सरकारच्या शेती विषयक, समाज सुधारणे विषयक, सिंचन विषयक योजना, शिक्षण विषयक योजना महात्मा फुले यांनी मांडलेल्या विचार आणि सुचविलेल्या उपायावरच आधारित आहेत असे वाटते. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी समाजातील शिक्षणाचे महत्व सांगितले ते आजही उपयुक्त

आहे. महात्मा फुले यांनी शेती, शिक्षण, अज्ञान, कर्मकांड, अंधश्रधा, जातीभेद, धार्मिक वर्चस्व इत्यादी बाबतीत मांडलेल्या विचारावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

**संदर्भ (References)**

1. धनंजय कीर, स. ग. मालशे (२००६), महात्मा फुले समग्र वाङःमय, प्रकाशन मराठी साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई
२. व्ही बी पाटील, के सागर, (१९९८), महराष्ट्रातील समाजसुधारक, के सागर प्रकाशन, पुणे
३. प्रा. ए. आर. राखेलकर, (२००५), आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्क प्रकाशन, ओरंगपुरा, ओरंगाबाद

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दलित कवितेवरील प्रभाव

**प्रा.दुर्गा शरद भिसे.**
मराठी विभाग , डॉ.अरविंद ब. तेलंग वरिष्ठ महविद्यालय,निगडी.

मराठी साहित्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषतः १९६०नंतर अनेक वाङ्मयप्रवाह उदयाला आले.त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य वस्त्रीवादी साहित्य हे तीनही प्रवाह समांतरपणे विकसित होत असताना दिसतात.दलित साहित्य हा ठळक प्रवाह आहे. दलित साहित्य प्रवाहाने मराठी साहित्य समृद्ध केले. मराठी वाङ्मयाच्या कक्षा रुंदावल्या .म्हणून दलित साहित्य हा मराठी वाङ्मयातील एक महात्वावाचा प्रवाह आहे. कोणत्याही साहित्याच्या निर्मितीची बीजे जीवनातील वास्तवात आढळतात .त्यामुळे जीवनाच्या जडणघडणीत साहित्याचा वाटा असतो. साहित्याचा निर्माता हा समाजातील घटक असतो. समाजातील बदलांचा, जडणघडणीचा परिणाम त्याच्यावर होत असतो.जीवन जगत असताना अनेक प्रश्न उपस्थित होतात. त्या प्रश्नांची दाहकता जाणवू लागते तेव्हा चळवळ निर्माण होते. साहित्यातील चळवळ ही दलित चळवळीचे एक अंग आहे,असे म्हणता येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान,विचार,त्यांची चळवळ ही दलित साहित्याचे प्रेरणा आहे

दलित साहित्याचे स्वरूप पाहत असताना फुले-आंबेडकरी विचारधारेतून दलित व्यक्तीला आलेले आत्मभान पाहणे गरजेचे असते.या आत्मभानामुळे तो आत्मशोध घेऊ लागतो.दलित सभोवतीचे जग न्याहाळू लागतो.त्या जगामध्ये आपले स्थान शोधू लागतो.त्यावेळी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची जाणीव त्याला होते.हे असे का व्हावे? हे कुठेतरी थांबायला हवे.त्यासाठी आपण काहीतरी करणे गरजेचे आहे.असे त्याला वाटते.या जाणीव जागृतीतून दलितांच्या नकार आणि विद्रोह याला सुरुवात होते.

दलित माणसाच्या आत्मबोधातून दलित साहित्याची निर्मिती झाली. या साहित्यामध्ये कविता,कथा,कादंबरी,आत्मकथा आणि नाटक हे सगळेच वाङ्मयप्रकार समृद्ध होत आहेत. साहित्यातील कोणतेही परिवर्तन प्रथम कवितेतून प्रकट होत गेले.त्याप्रमाणे दलित साहित्य प्रवाहात देखील कविता निर्माण झाली.दलित कविता ही वास्तव जीवनानुभव देणारी आहे. दलित संवेदना हीच खरी दलित कवितेमागील पार्श्वभूमी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे चालना घेऊन अनेक कवींनी आपल्या वेदना –व्यथा-कवितेतून परखडपणे व्यक्त केला.

ज्याकाळातजातीयता प्रखर होती आणि त्यांना तोडण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांसारखा प्रेषित दलितांना लाभला. अशा काळात दलितांच्या दुःखाची, अन्याय,अत्याचाराची भाषा बोलणारी कविता कवींनी लिहिली.या कवितेतून विद्रोह प्रकट झाला.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना तळागाळातील लोकांपर्यंत पोचविण्याचे काम केले.समग्र दलित साहित्याचे एकमेव प्रेरणास्थानडॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. त्यांनी दलितांना ‘शिकासंघटीत व्हाव संघर्ष करा ‘हा संदेश दिला .त्यामुळे दलित साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून वेदना,चीड,संताप,नकार व्यक्त केला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांचे तत्वज्ञान दीपस्तंभाप्रमाणे साहित्यिकांनामार्गदर्शक ठरले.दलितांचाउद्धार जसे स्पृश्य करू शकत नाहीत तसेच इंग्रजही करू शकणार नाही.यासाठी अस्पृश्यांनी स्वकल्याणाचे काम परक्यावर सोपविण्याऐवजी स्वतःच्या हाती घेणे आवश्यक आहे. यावर बाबासाहेबांनी भर दिला. दलित साहित्यातील प्रभावी वाङ्मयप्रकार म्हणून दलित कवितेकडे पाहिले जाते.माणूस, समाज,प्रगती, क्रांतीची भाषा या कवितेने मराठी कवितेला शिकविली आहे.यामागेडॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार असल्याचे जाणवते. समाजव्यवस्था, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था यावर कडाडून हल्ला चढविला.विद्रोहाची जाणीव करून दिली.

प्रेम, मनोरंजन यांच्या पलिकडे जाऊन एका वास्तवाचा अविष्कार अनुभव म्हणजे दलित कविता होय. दलित कवितेचे प्रेरणास्थानडॉ.बाबासाहेब आंबेडकर हे होते.त्यमुळे दलित माणसात आला.

त्यांच्याठिकाणी आत्मसन्मान, आत्मविश्वास बाबासाहेबांनी निर्माण केला.त्यांच्या मुक्तीलढ्याचा आणि दलित कवितेचा अतिशय जवळचा संबंध आहे. या मुक्तिलढ्यात जे बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली शिपाई म्हणून सामील झाले त्यांनी आपली काव्यशक्ती लढा तीव्र व्हावा, अस्पृश्यांना जागे करावे म्हणून वेचली. किसन फागुजी बनसोडे हा असाच जागाझालेला कवी. त्याला वाटते की हा देश माझा असे म्हणावे इतके या देशाने आपल्यासाठी काय केले ? ते म्हणतात –

पहा पहा सारे जन हो, हा हिंद देश माझा
दुहीचे मूलस्थान भेदाचे येथे रान
वैऱ्यास देई मान, हा हिंद देश माझा .
जगतात कोठे नाही
तो भेद येथे पाही
जन्माने वर्ण धरावी, हा हिंद देश माझा

धर्माच्या नावाखाली माणसांचा छळ होतो. जनजागृतीच्या प्र्ानेने भरलेला कवी आपली वेदना कवितेतून व्यक्त करतो.

साहू नका कुणाचा जुलूम
होऊ नका कुणाचे गुलाम
सोडूनद्यारे सारे बदकाम

किसन फागुजी बनसोडे यांचे मन अस्पृश्यांना लाचार होऊ नका असे आवाहन करते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्ररित झालेली पिढी काव्यातून आपला विद्रोह व्यक्त करत होती. बाबासाहेबांचे विचार ,ग्रंथयामुळे आपले स्वअस्तित्व कोठे आहे? देशात आज आपली स्थिती काय आहे?याची जाणीव कवींनाझाली.

एकविद्रोही व बंडखोर कवी म्हणून त्यांच्याकडेपाहिले जाते.आंबेडकरांचे कार्य, त्यांचे साहित्य याचीढसाळ यांना जाण होती. त्यामुळे त्यांची कविता परखडपणेपरिवर्तनाशी नाते सांगते.

रक्तात पेटलेल्या अगणित सुर्यांनो
किती दिवस सोसायची ही घोर नाकाबंदी
मरेपर्यंत राहायचे का असे युद्धकैदी

अशाप्रकारेत्यांची वेदना स्वतःचीन रहातासर्व दलित समाजाची बनतेआणि आपली व्यथा सांगते.

ज.वि.पवारयांच्या'आज पन्नास वर्षांनी' या कवितेत त्यांचे मन डॉ.आंबेडकरांच्या समोर नतमस्तक होतात ते म्हणतात –

तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणिजाग केलास उभा बहिष्कृत भारत

स्वातंत्र्य,समता,बंधुता व सामाजिक न्याय हीचारतत्वे दलित कवींना श्रेष्ठ वाटतात. शतकानुशतके सोसाव्या लागणाऱ्या अन्यायामुळे, समाजाच्या मनात जे प्रक्षोभक भाव उदयास आले त्या समाजाचे मन नामदेव ढसाळ यांनी अतितीव्र शब्दात व्यक्त केले आहे.या बंडखोरीचीमूळ प्रेरणाडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे आहे. दलित कविता क्रांतीसन्मुख आहे.तिने आपल्यावर वर्षानुवर्षे होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडली. अस्पृश्यांच्या मुक्तीलाध्याचे पहिले रणशिंग फुंकले गेले ते महाडच्या चवदार तळयावर.त्या लढाऊ वृत्तीचे चित्र अनेकवेळा कवितेतून रेखाटले आहे.अरविंद इंगळे म्हणतात –

आता एक घोट,पुन्हा पिऊदे
या पाण्यानचतर माझ्यात पाणी आल.

दलितांच्यावाट्याला आलेलं जिण तर महाभयंकर. गावकुसाबाहेर इकडेतिकडे झोपडया उभ्या.तिथे रोगराई, दारिद्र्य यांचा सतत वास. त्यांना मन नाही.गावकीची कामे अन परावलंबी लाजीरवाणे जिण वाट्याला आलेलं.म्हणून केशव मेश्राम म्हणतात –

आपल्या वस्तीत भांबावतो पोस्टमन
गोंधळतात संस्कार,अडथळते सभ्यता.
अंधारतो सूर्यही ,चिखलात उठावेत
गुरांच्या खुरांचे ठसे,तशीठसठसती
आमची घरे.

अशा वस्तीत वाढलेले पणडॉ.बाबासाहेबआंबेडकरांच्याविचाराने पेटलेले मन मुंबईच्या गर्दीच्या समुद्रात भांबावूनजाते. डॉ.आंबेडकर म्हटले कि या सर्व कवींचे मन ओसंडून वाहत होते. त्यांचे सामाजिक व राजकीय लढे सतत वेगाने चालू होते. त्यात यशापयश येत होते.पण त्या प्रत्येक लढ्यातून समाजाचे शक्ती वृद्धिंगत होत होती.

शतकानुशतके बसत असलेला अस्पृश्यांच्या वस्तीत चैतन्य आले. शाहीर घेगडेयांच्याप्रमाणेवामन कर्डकही आपली कविता घेऊन दलितांच्या झोपड्याझोपड्यातून गेले. त्यांचीबाबासाहेबांच्या विचारावर असीम श्रद्धा आहे..त्यांच्या नेत्तृत्वावर त्यांचा विश्वास आहे.त्यांनी या दलितांच्या मनात जळजळीत अंगार पेटवला.ते म्हणतात-

तुफानातले दिवे आम्ही तुफानातले दिवे
तुफानवारा पाऊसधारा मुळीन आम्हा शिवे

बाबसाहेब हयात होते तेव्हा त्यांच्या विचारांचे लोण समाजात पोचवावे,मुक्तिलढ्यासाठी नवजाग्रण घडवून आणावे म्हणून किसन फागुजी, शाहीर घेगडे, वामनराव कर्डक,मधु कोसारे इ. ची कविता धडपडत होती.

धर्मान्तरानंतरव त्या पाठोपाठ डॉ.बाबासाहेब यांच्यामहानिर्वाणानंतरजी परिस्थिती निर्माण झली त्यातून दलित कविता वणव्यासारखी जाळीत सुटली. नवी दलित कविता वेदना व्यक्त करीत करीत विद्रोहाच्या वाटेवर वेगाने पावले टाकू लागली. कवीदीनबंधूनी भीमजीवनाचीगाथा रचताना म्हटले आहे-

संकटाच्या नदीवर प्रयत्नाचा पूल बांधून
मार्ग आक्रमिला घनघोर याच रामजीपुत्राने

रामजीपुत्राचा वैचारिक वारसा चालवावा, त्यांच्यामुक्तीलढयाचे सतीचे वाणस्वीकारावेयातच कवींना धन्यता वाटते.

दलित साहित्य आणि लोकजीवनाच्या प्रेरणेबाबत बाबुराव बागुल डॉ.बाबासाहेब आंबेडकरयांना आपले आद्य नायक मानतात. दलित साहित्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविचारांचा वारसा दलित कवितेने पुढे चालविला आहे.कमी शब्दात भव्य आशय दलित कवींनी त्यांच्या प्रेरणेतून घेतला. आपल्या वाट्याला आलेले सर्व अनुभव सक्षमपणे मांडण्यासाठी साहित्यकांनी कवितेसारखेमर्मभेदी साधन घेतले. समग्र दलित कवितेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार,त्यांचे व्यक्तिमत्त्व पहावयास मिळतात.

शाहीर घेगडे यांची कविता अधिक प्रचारकी आहे.ते मुंबईला कामधंद्याच्या आशेने आले आणि पोटाच्या धंद्यात गुंतता गुंतता बाबासाहेबांच्या आंदोलनात सैनिक म्हणून वावरले.
बाबासाहेबांच्या मुक्तिलढ्यात सर्वांनी सामील व्हावे म्हणून आवाहन करीत राहिले. त्यांची कविता आवाहनप्रिय आहे. दुष्टविचारांना तुडवून नव्या सामाजरचनेसाठी लढा म्हणून ते सतत आवाहन करीत राहिले. बाबासाहेबांनीवतनदारीविरुद्धआवाजउठवलाकितेम्हणूलागत,

नाही नाही वतनदारी
शुद्ध आहे गुलामगिरी
तिच्या पायी झालोभिकारी
विचार करा जरा अंतरी
माणुसकी तुमची कळते जनतेला

आपला समाज विचार करून पटून उठावा म्हणून ते कवितेतून समाजाशी बोलत राहिले.अज्ञानातून, दारिद्र्यातून समाज वर यावा म्हणून त्यांची कविता गावोगाव फिरली.

आंबेडकरांनी राजकीय हक्कसाठी लढा सुरु केला घेगडयाचीकविता राजकीय उपहासाच्या रंगाने रंगू लागली. बाबासाहेबांच्याआंदोलनामागे तरुणांची प्रचंड शक्ती उभी करावी हा त्याच्या कवितेला ध्यास होता.आंबेडकर,त्यांचे कार्य व त्यांचे विचार हे त्यांच्या कवितेचे दैवत होते.त्यांच्या जीवितकथेचेपान न पानया शाहिरांनी कविताबद्ध केले. त्यांचे कौतुक करताना शाहीर घेगडे यांचे मन काठोकाठ अभिमानानेभरून जाते. ते आपल्या गाण्यात म्हणतात,

महाराच पोर बिटयालयी हुशियार
सारया जगात नाही अस होणार, अर बघ बघ बघ
अंधारात आम्हासनी वाटदाखविली
भोळी जनता त्यांनी जागृत केली

दलित कवितेची नवी रूपे सुर्वे, ढसाळ, निंबाळकर, दया पवार इ. कवींच्या कवितेतून जाणवली. माणसाने माणसावर केलेल्या अत्याचाराविरुद्ध दलित कविता आव्हान देत उभी राहिली. नामदेव ढसाळ म्हणतात –

जोस्वातंत्र्यतेकडूनस्वातंत्र्यतेकडेच जातो
असा तू एकुलता एक आमच्या रथाचा सारथी

हा देश आपला नाही.आपले असे आहे तरी काय? असा प्रश्न दलितांच्या मनात येणे स्वाभाविक आहे. मातीपासून अलगपणाची जाणीव हे एक भयाण जाणीव आहे.बाबुराव बागुल म्हणतात –

ज्यांनीचूक केली येथे जन्म घेण्याचे
त्यांनीच ती सुधारली पाहिजे
देश सोडून अथवा भीषण युद्ध करून

प्रत्येक कवी आता आव्हानाच्या,युद्धाच्या पवित्र्यात उभा आहे.क्रांतीच्या ज्वालांनी पेटलेल्या दलितांच्या वस्त्या सूर्यप्रकाशातन्हात आहेत असे भासते. दया पवार म्हणतात-

गावकुसाबाहेर उपेक्षित वस्तीत
राहुटयांचे दोर ताणले आहेत
धमनी धमनीत असंतोषाचे खोड
संतापाने कधीचे तटतटत आहेत

दलितांची कविता ही त्यांच्या वाटयाला आलेल्या जीवनाचे नुसते चित्रण करीत नाही तरती म्हणजे जीवनभाष्यच असते. फुटपाथ या कवितेत ज. वि. पवार म्हणतात-

तुक्या –
फुटपाथवरबसूनपचकनथुंकून
तू कधी जगला नाहीस
तुक्या –
आज पुन्हा अवतार तंबोरा घेऊन
तुझी रुक्माई दिसेल तुला
एखादयाफुटपाथवर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, त्यांची चळवळ ही दलित साहित्याची प्रेरणा आहे.त्यांच्या विचारांची व कार्याची प्रेरणा घेऊन अनेक कवींनी काव्य रचले आणिकाव्यातून मानव मुक्तीच्या लढ्यासाठी झुंज दिली.त्यामध्ये मुख्यत्वे करून नामदेव ढसाळ,केशव मेश्राम ,वामन निंबाळकर, दया पवार, ज.वि.पवार,अर्जुन डांगळे,हिरा बनसोडे, त्र्यंबक सपकाळे इ. कवी येतात.या कवींनी मराठी दलित कवितेचे कक्षा रुंदावल्या आणि तिला सर्वसमावेशक बनवले.आंबेडकरी चळवळीतून तयार झालेले, आत्मभान

आलेल्याकवींनी मराठी दलित कवितेला एक वेगळी दिशा दाखविली.नकार,विद्रोह,मानवतायाचा स्वीकार करून दलित कवितेचा प्रवाह अत्यंत प्रखरतेच्या रूपाने वाटचाल करताना दिसतो आहे.

**संदर्भ ग्रंथ –**

1. दलित साहित्य –वेदना आणि विद्रोह --- भालचंद्र फडके.
2. इंटरनेट

# सशक्त समाज निर्मितीसाठी राजर्षी शाहू महारांजाचे कार्य

**प्रा. डॉ. पडवळ व्ही. के.**
क्रिडा विभाग छ.शिवाजी महाविद्यालय, कळंब ता.कळंब, जि. उस्मानाबाद
इ मेल : padwalvijayjay7195@gmail.com

**प्रस्तावना**

2 एप्रिल 1894 रोजी शाहू महारांजाचा राज्यरोहन समारंभ झाला छ. शाहू महाराज हे वयाच्या 20 व्या वर्षी कोल्हापूर संस्थानचे राजे झाले. त्याचे शिक्षण राजकोट व धारवाड येथे झाले विद्यार्थी दशेत असताना त्यांनी इंग्रजी, संस्कृत व इतिहास या विषयाचा अभ्यास केला. सर फ्रेजर व रघुनाथराव सबणीस यांच्यासारखे गुरू त्यांना मिळाले.

छ. शाहू महाराजानी समाजाच्या सर्वांगीन विकासाठी प्रयत्न केले त्यांनी समाजामधे शिक्षणाचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला. कोल्हापूर संस्थानचे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी राजाज्ञा काढली. पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रति महिणा एक रूपये दंड आकारण्याची तरतूद केली. मागासलेल्या लोंकाना प्रगतीच्या प्रवाहात आणा वयाचे असेल तर त्यांच्यासाठी राखीव जागाची तरतूद केली पाहिजे हा व्यापक दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून त्यांनी कोल्हापूर संस्थानात 6 जुलै 1902 रोजी मागासवर्गीयांना 50% जागा राखीव राहतील अशी घोषणा केली व त्वरीत अम्मल बजावणी करण्यात आली. लोंकाना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठी ब्रिटीशकालीन हजेरी पद्दत बंद करून त्यांना कोल्हापूर संस्थानात नौकऱ्या दिल्या, त्यांना घरे बांधून दिली.

छ. शाहू महाराजानी सामाजिक कार्याबरोबरच कला, साहित्य आणि क्रीडा या गोष्टींना विशेष महत्व दिले. त्या मध्ये व्यायाम आणि कुस्तीला विशेष प्राधान्य दिले. म्हणून कोल्हापूरला जसे कलावंतांची “जननी” तसेच कुस्तीची पंढरी म्हणतात. आरोग्य आणि शरीरसंवर्धन यासाठी व्यायामाची गरज असते यासाठी मल्लविद्येची आवड असणाऱ्या महारांजानी या क्रीडा प्रकारास उत्तेजन दिले 18 जूलै 1902 ला इंग्लंडच्या दौऱ्यावर असताना तेथे त्यांना भव्य गोलाकार आखाडा दिसला. याच पध्दतीचा भव्य गोलाकार आखाडा महाराजांनी कोल्हापूर येथील खासबाग येथे तयार केला. याची फलश्रुती म्हणून कोल्हापूर पासून तर दिल्लीपर्यंत महाराजांनी तयार केलेले मल्ल गाजले. म्हणजे समाज विकासात सशक्त समाज घडविण्याची दूरदृष्टी महाराजांना होती. शरीर ही जीवनाची खरी संपत्ती आहे. “शरीर हे धर्माचे” साधन मानले जाते. “सुदृढ शरीरातच सुदृढ मन वास करीत असते. म्हणून शाळा हे शरीर संवर्धनात महत्वाचे साधन असले तरी पुस्तकी शिक्षणामुळे बुध्दीला चालना मिळत असली तरी खेळाच्या मैदानावर आत्मज्ञान वाढते. संघशक्ती बळावते. सशक्त मुले मैदानावरच घडतात. म्हणूनच राजर्षी शाहू महाराजानी कोल्हापूरला करवीर संस्थानात सामाजिक कार्य करताना शारीरिक शिक्षणाला आधिक महत्व दिले. व्यक्तीमध्ये केवळ शारीरिक विकास न करता त्याचा मानसिक भावनात्मक व सामाजिक विकास करणे हे खरे शिक्षणाचे ध्येय असते. क्रीडांगणे ही समाजजीवनाला, राष्ट्रीयत्वाला व आंतराष्ट्रीय संबंधाना आकार देणारी उत्तम ठिकाणे आहेत.

**राजर्षी शाहू महाराजांचे क्रिडाविषयक कार्य**

पहिली शरीर संपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती आणि तिसरी धनसंपत्ती असेल तोच पुण्यवान ही महाराजांची धारणा होती. आजही कोल्हापूरच्या मोतीबाग तालमीच्या दर्शनी दरवाज्यावर हे वाक्य झळकतांना दिसते. राजर्षी शाहू महाराज एक उत्कृष्ट “मल्ल” होते. बलउपासक होते आणि समाजातील तरुणाना बलउपासनेसाठी प्रोत्साहन

देणारे होते. महाराजानी तालमी जशा उभ्या केल्या तसेच खुराकासाठी लाखो रूपये खर्च करून जंगी “खासबाग” मैदान उभे केले. म्हणूनच कोल्हापूरला मल्ल विद्येचे विद्यापीठ मानले जाते. सामान्यपणे युवकाने तालीम केली पाहिजे तालीम म्हणजे शौर्य, शक्ती, धाडस, चपळता, कुशलता, निर्भयता इ. अशा विचाराची उपासना करण्यासाठी महाराजानी जनसामान्यांना उत्तेजन दिले.मल्ल एकदा कुस्तीतून निवृत्त झाला की, त्याला आर्थिक संघर्षाला सामोरे जावे लागते. वार्धक्यात कधी कधी पोटभर अन्न देखील मिळण्याची अडचण होते. याची जाण महाराजाना येताच ही अडचण दूर करण्यासाठी महाराजानी “हजारी फंडा” ची स्थापणा करून त्याशिवाय त्यांना सर्व तऱ्हेने मदत पण करावयास सुरूवात केली त्यामध्ये प्रामुख्याने पेन्शन, नौकरी, राहण्यासाठी घरे, कसण्यासाठी जमीन, व्यावसायासाठी जागा, आणि आर्थिक मदत ही केली.

या निमित्ताने महाराजांनी शारीरिक शिक्षणाचे व बलोपासनेचे महत्व पटवून दिले. राजर्षीनी मल्लांना मान सन्मान दिला याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराजानी उत्तरेकडील व दक्षिणेकडील मल्लांच्या झुंझी लावल्या व त्यांना बीदागी दिली त्यांना मोठी बक्षिसे देवून खुश केले. जसा राजर्षीनी मल्लांचा खेळांडूचा गौरव केला तसा आजच्या परिस्थितीत खेळाडूच्या संदर्भात शासन दरबारी मानसन्मान असणे गरजेचे आहे. कारण आज खेळाची मैदाने ओस पडू लागली आहेत. त्याचे कारण शासनाची शारिरिक शिक्षणाविषयीची उदासिनता होय. भारतात ब्रिटीश राजवट असताना सुध्दा महाराजांनी आपल्या संस्थानात दूध व खुराकासाठी आर्थिक मदत केली कारण समाजातील तरुण तंदुरुस्त राहीला पाहिजे हाच महारांजाचा उद्देश होता. म्हणून शसक्त व सामर्थ्यवान समाज घडविण्यास शाहू महाराजांचे शारीरिक शिक्षण विषयक विचार अधिक महत्वाचे ठरतात. शाहू महाराजांचे क्रीडा व खेळासंभदातील काही उदाहरणे मोतीबाग या ठिकाणी दत्तोबा शिंदे, पांडोबा भोसले, बालेखान पठाण या वस्तादांच्या मार्गदर्शनाखाली मल्लविद्येचे शिक्षण समाजात चालू ठेवले. महाराजांनी मल्ल विद्येस राजाश्रय दिला. जुन्या तालीमांना अनुदान सुरू केले. व खेळाडूंना मार्गदर्शनाची सोय उपलब्ध करून दिली. त्यामुळे संपूर्ण संस्थानात खेळाची व कुस्तीची आवड  निर्मान झाली.

**खेळाडूंना राजाश्रय**

शाहू महाराजांनी दिलेल्या राजाश्रयामुळे मल्लांच्या पिढीच्या पिढी निर्माण झाल्या शिवाप्पा बरडे, व्यंकांप्पा बुरूड, गणपत शिंदे, गोविंद कसबेकर, नारायन कसबेकर, गणू भोसले, देवाप्पा धनगर, ज्ञानू माने, अशा विविध जातीधर्मातील व गरीब समाजातील मुले महारांजानी घडविली हा सर्व खर्च महाराजानी आपल्या वयक्तीक व खाजगीतून केला यावरून महारांजाचे समाजसुधारणेचे व क्रिडाविषयक धोरण दिसून येते. भटक्या जातीजमाती तून मल्ल घडविल्याची उदाहरणे आहेत. महाराज खेळाडूवर किती प्रेम करत होते याचे उदाहरण म्हणजे देवाप्पा धनगर कॉलराच्या आजाराने मृत्यूशी झुंझत असताना महाराज डॉक्टरांना म्हणाले “साहेब याला वाचव मी तुम्हाला याचा भाराभर सोन देतो” यावरुन महारांजाचे शा. शिक्षण व क्रिडाविषयक प्रेम दिसून येते तसे आजच्या राजकीय धोरणात दिसून येत नाही. म्हणून सशक्त बलवान देश घडवायाचा असेल तर शासनाने शारीरिक शिक्षण, क्रिडा यावर खर्च होणे व खेळाडूनासोयी व सुविधा पुरविणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष**

1. राजर्षी शाहू महाराजांनी  शसक्त समाज घडविण्यात शा. शिक्षण व क्रिडा या गोष्टीसाठी महाराजांनी वयक्तीक खर्च करून खेळाडू घडविले.
2. खेळाडूंच्या वृध्दपकाळासाठी पेन्शन व उदारनिर्वाहासाठी जमिनी दिल्या.
3. समाजामध्ये ‘शरीर हीच खरी संपत्ती आहे’ या विषयी जनजागृती करून बलोपासनेची आवड तरुणांमधे निर्मान केली.

4. सशक्त व सुदृढ पिढी निर्मान करावयाची असेल तर शा. शिक्षणाला महत्व देवून प्राथमिक शिक्षणापासून शालेय शिक्षणातही या विषयाचाही समावेश करावा. हे पटवून दिले.
5. युवक हाच देशाचा आधारस्तंभ आहे हे त्यांनी जाणले होते. शासनाने शा. शिक्षण व क्रिडा यासाठी भरपूर सुविधा देण्याची गरज वाटते.

**संदर्भ-**

1. शाहूंच्या आठवणी – प्रा. नानासाहेब सांळूके – वृषाली प्रकाशन कोल्हापूर, चौथी आवृत्ती पान 15 25 एप्रिल 2008
2. शिक्षणातील थोर विचारवंत – प्राचार्य, रा. तु. भगत
3. शाहू छत्रपती यांचे चारित्र-लठ्ठे आ. बा पा 431
4. शाहू महाराज आणि कायदे- कानुन बागडे द.रा
5. शारीरिक शिक्षणाचे स्वरूप- प्रा. श्रीपाद गर्दे व सुनिता गर्दे चंद्रमा प्रकाशन कोल्हापूर.

# महिला सक्षमीकरण या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य : १४ एप्रिल १८९१ — १९५६

**प्रा.गुट्टे शिवकांता वैजनाथ**
एम.ए. इतिहास,नेट, सेट संशोधक जवाहरलाल नेहरू वरिष्ठ महाविद्यालय, परळी वै

**प्रस्तावना :—**

महिला सक्षमीकरणामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान फार मोठे आहे. मनुस्मृती सारख्या प्राचिन ग्रंथामध्ये ''यत्र नार्यस्तू पुज्यप्ते रमन्ते तत्रदेवता'' अर्थात जिथे नारिची पूजा केली जाते, तेथे देवाचे स्थान असते. असे म्हटले असले तरी स्त्रियांची स्थिती फारशी चांगली नव्हती. स्त्रियांवर अनेक बंधने लादली होती. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. स्त्री म्हणजे एक उपभोगाची वस्त असून, चुल आणि मुल ऐवढया पुरतेच तिचे क्षेत्र मर्यादित होते. भारतीय स्त्रिया या पिढयानपिढया कधी वडिल, कधी पतीवर तर कधी मुलांवर अवलंबून होतया आर्थिक दृष्टया भारतीय स्त्रियांफारच परावलंबून होत्या. पतिच्या मृत्यनंतर तर स्त्रियांची अवस्था फारच वाईट होती. या सर्व परिस्थितीतून स्त्रियांनरा बाहेर काडण्याचे काम हिंदू कोडबिलाच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

हिंदूकोडबिलामुळे स्त्रियांच्या बाबतित केल्या जाणाऱ्या अन्याय आत्याचाराला आळा बसला. आजच्या आधुनिक काळात स्त्रिया पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून काम करतांना दिसून येतात. आजची स्त्री कुठलयाच क्षेत्रात मागे नाही. यशाची अनेक शिखरे तिने गाठली आहेत. याचे सर्व श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, राजर्षी शाहुमहाराज, यांना जाते. महिला सक्षमीकरणाचा अर्थ महिलांना कोणाची दया नको भिक नको तर तयांना पुरूषा प्रमाणे समान संधी हवी आहे. कोणतयाही भेदभावाशिवाय महिलांना प्रगती करण्याची संधी देणे म्हणजेच महलिा सक्षमिकरण होय. याच दृष्टीकोणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या प्रगतीसाठी जे प्रयत्न केले त्या प्रयत्नास महिला सक्षमिकरण असे म्हणता येईल.

**प्रकरणाची रूपरेषा**

**डॉ.बाबसाहेब आंबेडकर व हिंदू कोडबिल —**

**हिंदू कोड बिल कायदा :**

हिंदू कोड बिलाचे चार.. भाग करून चारही कायदे १९५५ — १९५६ मध्ये पं. नेहरूनी पास करून घेतले. हे चार कायदे म्हणजे कायदयाच्या इतिहासातील एक क्रांतीकारक घटना होय. या चार कायदयामुळे स्त्री जीवनात मोठी क्रांती घडून आली. स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीचे हक्क मिळाले. हिंदू स्त्रियांवर होत असलेला अन्याय या कायदयांने दूर केला. हिंदू कोडबील ही भारतीय स्त्रीवर्गाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली महान देनगीच आहे.

**हिंदू स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत अधिकार :—**

स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी हिंदू कोडबील संसदेत मांडले हे बील मंजूर व्हावे म्हणून बाबासाहेबानी खूप प्रयत्न केले. खुप कष्ट घेतली. यामुळे हिंदू स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत अधीकार मिळाला. त्यामुळे स्त्रिया आर्थिक दृष्टया सक्षम झाल्या.

**हिंदू विवाह कायदा — १९५५ :**

१९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयामुळे पुरूषांना अनेक विवाह करण्यास प्रतिबंध घातला गेला.

**हिंदू दत्तक व पोटगीचा कायदा १६५६ :**

या कायदयामुळे स्त्रियांना घटस्फोटापूर्वी किंवा नंतर आर्थिक साहय देणे तिच्या पतीवर बंधनकरक झाले. स्त्रियांना मुल दत्तक घेण्याचा अधिकर या कायदयाने मिळाला.

**हिंदू अज्ञान व पालकात्वाचा कायदा :**

हा कायदा १६५६ मध्ये पास झाला या कायदयाने कोण, केव्हा व कुणाचे पालक ठरते याा संबंधीत नियम केले आहेत. मुलांच्या बाबतित पालकांचे हक्क पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना मिळाले.

हे कायदे मुजूर होणे म्हणजे कायदयाच्या इतिहासातील क्रांतीकारक घटना होय. या कायदयानी भारतीय स्त्रियांच्या जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडण्यास सुरूवात झाली. या कायदयांनी स्त्री — पुरूषांच्या दर्जात कायदयाने समानता प्रस्थापित केली.

**डॉ. बासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे सर्मथक :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते कोणत्याही समाजाचे मुल्यामापन त्या समाजाल्या स्त्रियांची स्थिती कशी आहे. यावरून करता येते. समाजाने स्त्रियांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आसल्याची तयांची आग्रही भूमिका होती. प्रगती केवळ पुरूषांचीच नव्हे, तर स्त्रियांची देखील होणे गरजेचे आहे. असे तयांना वाटत होते.

**अखिल भारतीय अस्पृश्य महिला परिषद, नागपूर १९४२**

या परिषदमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील विचार मांडले.

१. खाण कामगार स्त्रीला प्रसुती भत्ता
२. कोळसा खाणीत काम करण्याऱ्या स्त्री काम गारांना पुरूषांइतकीच मजूरी.
३. बहुपत्नीतवाच्या प्रथेला पायबंद
४. मजूर व कष्टकरी स्त्रियासाठी २१ दिवसांची किरकोळ रजा, एका महिण्याची हक्काची रजा.
५. दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि २० वर्षाची सेवा झझलयावर निवृत्तीवेतनाची तरतुद या सारख्या महत्वाच्या तरतुदी करण्यात आलया. कामगार किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रीला प्रसूती रजा मिळवून देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील पहिले व्यक्ती आहेत. भारतानंतरच अनेक वर्षानी इतर देशातील महिलांना प्रसुती रजा मंजुर झाल्या आहेत.

**बाबासाहेबांनी आपल्या चळवळीत स्त्रियांना आवर्जुन सहभागी करून घेतले :—**

१९२७ च्या महाडचा चवदार तळयाचा सत्यागृह १९३० चा नाशिकचा काळाराम मंदिर सत्यागृह व १९४२ नागपूरातलया महिला परिषदत स्त्रिया मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या बायको कशी असावी. याबाबत पुरूषाचे मत घेतले जाते. तसे स्त्रियांचे ही नवऱ्याविषयीच`मत, आवडी— निवडी विचारात घतलया पाहिजेत. डॉ.बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियासाठी अनेक कार्य आहेत.

**३. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षणा संबंधीचे विचार :—**

शिक्षण हे सर्व विकासाची गुरू किल्ली आहे. शिक्षणा शिवाय स्त्रियांची प्रगती होणार नाही. स्त्रियांच्या प्रगतिसाठी तयांना शिक्षण दिले पाहिजे तरच स्त्री आणि पुरूष यांच्यात समानता निर्माण होईल. स्त्री शिक्षणाने कुटुंब पुढे जाते घरातील स्त्री अडाणी असली तर कुटुबाची प्रगती होणार नाही. असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे होते. या साठी त्यांनी पुढील बाबी सांगितल्या :

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्री पुरूष भेद मान्य नव्हाता सामाजिक आर्थिक राजकिय शैक्षणिक इत्यादी सर्वच क्षेत्रात ते स्त्री पुरूष समानतेला प्राधन्य देतात.

**२. स्त्रीयांचे कार्यक्षेत्र व्यापक :—**

स्त्रियांचे क्षेत्र फक्त चुल आणि मुल ऐवढयापुरते मर्यादित नसावे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे योगदान असावे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांचे योगदान असावे. प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपला ठसा उमठवावा असे त्यांचे मत होते.

**३. स्त्री शिक्षणाने राष्ट्राचा विकास :—**

स्त्रियांजर साक्षर व सुशिक्षित झालयातर कुटुंबात व समाजात नित्तीमत्ता वाढेल तसेच सेवा, सदाचार, प्रेम आशा सदगुणाची वाढ होउन समाज व राष्ट्राचा विकास होईल.

४. **स्त्रियांना उपदेश** :—

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना असा उपदेश केला की, भारतीय स्त्रियांनी आपल्या श्रीमंती व सौदर्याचे प्रदर्शन न करता सुशिक्षित होउन आपली गुणवत्ता वाढवावी.

५. **अनिष्ठ प्रथेला विरोध** :—

डॉ. आबेडकरांनी बाल विवाह, बहुपत्नी विवाह, हुंडा पध्दती, सतीची चाल अशा अनिष्ठ प्रथा सतत विरोध केला.

६. **स्त्रियांच्या प्रगतीबाबत प्रयत्न** :—

सत्तर वर्षा पूर्वी कायदे मंडळाचे सदस्य असतांना लोकसंख्यावाढ व कुटुंबनियोजन संबंधी आपल विचार मांडले होते. तयाकाळी या विषयावर जाहिर बोलणे हे धाडसाचे काम होते.

अशा प्रकारे डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांच्या शिक्षणावर व सक्षमीकरणावर भर देण्याचा प्रयत्न केला.

**मुल्यमापण**

असे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरूषांच्या पाठीमागे एका स्त्री चा हात असतो, परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगतीमागे फक्त एकाच महापुरूषाचा हात आहे, आणि ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज स्वतंत्र भारतात कित्येक अधिकार महिलांना बाबासाहेबांमुळे मिळाले आहेत. आज मुली शिकतात, नोकऱ्या करतात अर्थार्जन करतात हे फक्त आणि फक्त बाबासाहेबांनी दिलेल्या कायदयामुळेच सर्व जाती धर्माच्या स्त्रियांनी बाबासाहेंबाना आपला उधाद करता मानलेच पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीसक्षमीकरणासाठी जे अलौकिक कार्य केले आहे. ते पाहता भारतीय स्त्रियांना सैदैव तयांच ऋणात रहावे लागेल. हिंदू कोडबिल सारख्याा क्रांतीकारी कायदा मांडणाऱ्या या महामानवास संपूर्ण स्त्रीवर्गाच्या वतिने कोटी कोटी प्रणाम.

**संदर्भ ग्रंथ :—**

**1.** आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास १८१८ — १९६० — डॉ.दिनेश मोरे
**2.** भारतीय इतिहासतील स्त्रिया व स्त्री जीवन — प्राचार्य डॉ.एस.एस.गाठाळ
**3.** आंबेडकरी चळवळीचा इतिहास — प्राचार्य डॉ.एस.एस.गाठाळ
**4.** राजकिय विचारवंत — डॉ. शुभांगी राठी
**5.** इनटनेट वरून घतलेली संकलित माहिती.

# “राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य”

**प्रा. डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**
समाजशास्त्र विभागप्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा ता.जि. बीड

**प्रस्तावना :**

राजर्षी शाहु महाराज यांचे पूर्वीचे नाव हे यशवंत आबासाहेब हे असून ते घाडगे घराण्यातून दत्तक गेलेले होते.त्यांचा जन्म २६ जून १८७४ मध्ये घाडगे कुटुंबात कागल जहागीरीत झााला. कोल्हापूर संस्थानचे चौथे शिवाजी मृत्यू पावल्यानंतर महाराणी आनंदीबाईने १८८४ मध्ये यशवंत (शाहू) यांना दत्कक घेतले होते. त्यांचे शिक्षण राजकोट व धारवाड येथे झाले असून त्यांचा विवाह ०२ एप्रिल १८९४ मध्ये बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई यांच्या बरोबर झाला होता. तर त्यांचा राज्याभिषेकाचा विधी हा ०६ मे १९२२ मध्ये झाला होता.

शाहु महाराज हे अत्यंत कल्पक बुध्दीचे, पुरोगामी विचारांचे, आणि समतावादी विचारांचे होते. शिक्षण, विवाह झाल्यानंतर त्यांनी राजकारभाराची सूत्रे हाती घेतली होती. त्यांच्या शिक्षण विषयक तळमळीने कोल्हापूरात मलविद्या आणि सामान्यजनांना शिक्षणाची गंगा आणली. सर्व सामान्यांना शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. सर्वसामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहचवण्याचा राजराम महाराज यांचा विचार शाहू महाराजांनी प्रत्यक्षात उतरवला.

शाहु महाराज यांचे शिक्षण विषयक विचार खऱ्या अर्थाने शाहु महाराजांची शिक्षण विषयक विचारांची बैठक ही महात्मा जोतीबा फुले यांच्या विचारावर आधारलेली होती. शाहु महाराजांनी विशिष्ट जातीच्या हाती असलेली शिक्षणाची मक्तेदारी मोडून ते शिक्षण सर्वांपर्यंत पोहचविले. त्यासाठी त्यांनी सक्तीची शिक्षण पध्दती आमलात आणली. समाजामध्ये जातिनिहाय वस्तीगृहाची स्थापना केली. शिक्षणातून नव्या समाजाची निर्मिती करण्याचा महाराजांचा प्रयत्न होता. समाजातील कोणत्याही जातीतील मुलांना शिक्षण मिळावे व त्यांचा विकास व्हावा हे महाराजांचे ध्येय होते. शेतकऱ्यांची मुले शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आली पाहिजेत असे महाराजांना सतत वाटत होते. शाहु महाराजांनी भाषणातून जे शिक्षण विषयक विचार मांडले त्यातूनच त्यांची सार्वत्रिक शिक्षणाची तळमळ आपणाला स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे शैक्षणिक भाषणे पाहणे महत्वाचे ठरते.

**राजर्षी शाहु महाराजांची शैक्षणिक भाषणे :**

शाहु महाराजांनी वेळोवेळी वेगवेगळ्या ठिकाणी जी भाषणे दिली. त्यातूनच त्यांचे शिक्षण विषयक विचार स्पष्ट होतात. खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या ११ व्या अधिवेशनातील भाषण यामध्ये त्यांनी “शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही” शिक्षण हे अविभाज्य भाग समजून ते प्रत्येकांनी घ्यावे असे ठणकावून सांगितले. त्याशिवाय पुढील भाषणात, आज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये, वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत गरज असून याबाबतीत आमचा गतकाळ म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे.” आणि याच अंधाऱ्या रात्रीचे विश्लेषण महाराजांनी मनूच्या जाचक रुढी परंपरेतून, धर्म बंधनातून सर्व सामान्यांना शिक्षणाची दारे बंद झाली होती. त्यासंदर्भात परामर्ष घेवून ब्रिटीश सरकारच्या आगमनामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खूली आहेत. हा महत्वाचा मुद्दा प्रतिपादन करुन ब्रिटीशांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे शाहु महाराजांची त्यांचे गुण व्यक्त केले आहे. ज्या—ज्या वेळी शाहु महाराजांच्या भाषणात शिक्षण विषयक विचार येत असत तेव्हा त्यांनी व्यापक समाज शिक्षणामागील भूमिका स्पष्ट करून, इंग्रजी राजवटी मुळे सर्व सामान्यांना शिक्षणाची दारे खूली झालेली आहेत व त्याचा फायदा सर्वांनी घेतला पाहिजे अशी भूमिका शाहु महाराज सतत आपल्या भाषणात मांडत असत.

**शाहु महाराजांची सक्तीची सार्वजनिक शिक्षण विषयक योजना :**

शिक्षण घेवून रयत सुधारली पाहिजे व तीने लोकशाहीचा पुरस्कार केला पाहिजे. समाज सुशिक्षित/साक्षर झाला तरच लोकशाही यशस्वीपणे राबवली जावू शकते व यशस्वी लोकशाहीच देशाला चांगले दिवस आणू शकते. यासाठी त्यांनी लोकांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. निरक्षर लोक आपणापर्यंत आले नाहीतर आपण त्यांच्यापर्यंत गेले पाहिजे व त्यांना शिक्षणाचे महत्व तळमळीने पटवून दिले पाहिजे. ज्ञानाचे अभिसरण सर्व समाजात व्हावे या अभिसरणासाठीच शाहुंनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची गरज वाटत होती. लोकांमध्ये अज्ञान असल्यामुळे शिक्षणाला सुरुवात होऊन सुध्दा शाळेतील पटसंख्या वाढत नव्हती. त्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षकांच्या पगारात सात रुपयावरुन नऊ रुपये वाढ केली. त्यामुळे शिक्षणातही उत्साह व नवचैतन्य निर्माण झाले.

३० सप्टेंबर १९१७ रोजी गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर सक्तीचे शिक्षण या मोहिमेचा नारळ फुटला. ३० सप्टेंबर १९१७ ते ३१ मार्च १९१८ या काळात जवळपास २७ सक्ती शाळा सुरु केल्या. पहिली शाळा चिखली, पेढा, करवीर येथे काढण्यात आली. राज्यातील सर्व जनतेला शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी वेगवेगळ्या शाळा उघडल्या. पुरोहीत शाळा, युवराज शाळा, आश्रमशाळा, उद्योग शाळा, कला शाळा, सैनिकी शाळा, सुसंस्कृत शाळा अशा प्रकारे आपापल्या आवडीनुसार उद्योग व व्यवसाय शिक्षण घेण्याची सोय शाहु महाराजांनी केली होती. या

शाहुच्या अनुकूल विचाराचा समाजावर प्रभाव झाला. त्यामुळे सर्व जातीतील मुलांना शिक्षण घेता आले व लोकशाही बळकट होण्यास मदत झाली. या शाहुंच्या शैक्षणिक विचारांनी, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोगाने शिक्षण क्षेत्राला जी गती प्राप्त झाली. तिचेच चांगले परिणाम पुढे आपणाला शिक्षण क्षेत्राच्या विकासाच्या रुपाने पाहवयास मिळत आहेत.

**उद्दिष्टे :**

डॉ. एस.एम. भोसले यांनी शाहु महाराजांची शिक्षण विषयक चळवळ खालील तीन पायावर उभी होती असे प्रतिपादन केले.

१) शिक्षण विषयक सोयी सवलती, शिक्षण संस्थेची निर्मिती शिक्षण संस्थांना मदत शिक्षणविषयक वेगवेगळ्या उपक्रमांचे संयोजन इत्यादी सोयी उपलब्ध करुन देणे.

२) सामान्य माणसाच्या मनामध्ये शिक्षणाविषयी अभूतपूर्व लालसा निर्माण करुन त्यांच्या अनेकविध मागासलेपणाला सुरुंग लावणे.

३) विविध जाती जमातीसाठी विद्यार्थी वस्तीगृहाची सोय करुन शिक्षणाच्या प्राप्तीचे मार्ग सोयीस्कर करणे, वस्तीगृह युक्त शिक्षणाला उत्तेजन देवून जातीभेद नाहीसा करणे.

वरील तीन पायावर शाहुंनी राज्यात शिक्षणविषयक क्रांती घडवून आणली. व्यापक समाज शिक्षण, विविध शिक्षणविषयक प्रयोग करुन विविध स्वरुपाचे शिक्षण देणाऱ्या या शाळा उघडून समाजमनाला शिक्षणाची गोडी लावण्याचे महत्वाचे कार्य शाहु महाराजांनी करुन शैक्षणिक चळवळीला व्यापक स्वरुप खऱ्या अर्थाने दिले असल्याचे आपणाला दिसून येते.

**निष्कर्ष :**

१) राजश्री शाहु महाराजांनी अनेक कष्टकरी, सर्वसामान्य व गरीब लोकांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात आणले.

२) शिक्षणामुळे लोकांचे आज्ञान नाहीसे होवून लोक ज्ञानी झाल्यामुळे समाजाचा राहण्याचा स्तर उंचावण्यास मदत झाली.

३) शिक्षणामुळे लोकशाही प्रबळ झाली.

४) शिक्षणामुळे अस्पृश्यता व जातीयवाद कमी झाला.

५) वाढत्या शिक्षणामुळे आरक्षणाचे महत्व समाजाला दिसू लागले.

**संदर्भ ग्रंथ :**

१) भगत रा.तु., राजर्षी शाहु छत्रपतींचे जीवन व शिक्षण.

२) धनंजय कीर, राजर्षी शाहु छत्रपती.

३) अशोक नाईकवाडे, राजर्षी छत्रपती शाहु महाराज : गौरव ग्रंथ, पृष्ठ ९.

४) प्रशासकीय अहवाल, १९१८—१९१९, पृष्ठ ४५.

५) डॉ. भोसले एस.एस., महाराष्ट्राचे शिक्षण : प्रयोग व परंपरा—शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे, षष्ठाब्दपूर्ती समोती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८०.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा फुले,छत्रपती शाहू महाराज यांचे शिक्षणविषयक विचार:

**प्रा.कविता किसनराव काटे**
शिक्षण प्रसारक संस्थेचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय संगमनेर, ता.संगमनेर जि.अहमदनगर
KavitaKate27482@gmail.com

**सारांश:**

सदर लेखात क्रांतीपुरुष महात्मा ज्योतिबा फुले,लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केलेल्या क्रांतिकारी कार्याविषयी सविस्तर चर्चा केलेली आहे.मानवी महत्वकांक्षा ही सर्व सुधारणांचे मूळ आहे. आणि अशी महत्वकांक्षा असणारी माणसे एखाद्या राष्ट्रात जन्माला येतात हे खरेच त्या राष्ट्राचे सदभाग्य आहे.

क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, घटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे तिघेही बहुजन समाजातील ब्राह्मणेतर समाज सुधारक नेतृत्व होय. महात्मा फुले अतिशय क्रांतिकारी विचारांचे, लोकराजा राजर्षी शाहू महाराज सतत लोकसुधारणेचा विचार करणारे दृष्टे राजे तर भारतरत्न डॉ.आंबेडकर दीन दलित यांना तळागाळातून वरती काढण्यासाठी रात्रंदिन प्रयत्न करणारे असे सर्व असूनही सनातनी लोकांनी यांचे महान कार्य झाकण्याचा प्रयत्न केला.निंदकाचे घर असावे शेजारी याप्रमाणे अत्यंत परखडपणे निंदा करणाऱ्या लोकांना सामोरे जाऊन समाजाच्या प्रगतीचा कार्यदीप सातत्याने तेवत ठेवून पुढील समाजास अन्यायाविरुद्ध लढण्याची, स्वतःमधील क्षमता ओळखण्याची, क्षमतेनुसार काम करण्याची ताकद, शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनी कायम जिवंत ठेवली.या समाज उद्धरक त्रिकुटाने महाराष्ट्राच्या नव्हे नव्हे देशाच्या इतिहासात एक शैक्षणिक सुवर्णपान नोंदवले आहे.

## महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार:

### शेतकरी व कामकरी यांचे शिक्षण:

समतेच्या पायावर आधारित शोषणरहित समाज रचनेसाठी फुले यांनी अपार प्रयत्न केले.त्यांनी आपल्या ' शेतकऱ्यांचा आसूड ' या ग्रंथाच्या सुरुवातीलाच शिक्षणाच्या अभावामुळे सर्व समाजामध्ये होणारी हानीकडे लक्ष वेधले.ते म्हणतात -

**'विद्येविना मति गेली ;मतीविना निति गेली; नीतीविना गति गेली!गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले,इतके अनर्थ एका अविद्येने केले.'**

त्यामुळेच स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा फुले यांना फक्त प्रचलित शिक्षण अपेक्षित नव्हते तर सद्सद्विवेकबुद्धी,सारासार विचार करण्याची क्षमता इतरांचे दुःख जाणण्याचे साधन आणि दुःख दूर करण्याचा प्रयत्न करण्यासाठीचे हत्यार म्हणजे शिक्षण होय असा त्यांचा ठाम विश्वास होता.ज्या काळामध्ये स्त्रियांकडून फक्त चूल आणि मूल एवढीच अपेक्षा होती.त्या काळात स्वतःच्या पत्नीस प्रथम शिक्षित करून स्त्री शिक्षणाची चळवळ उभी केली. स्वतःच्या घरापासूनच सुधारणा करणारा फुले यांच्यासारखा समाज सुधारक दुसरा कोणीही सापडणार नाही. स्त्रिया, शूद्र लोकांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांच्यात स्वतंत्र विचार निर्माण होणे हे महत्वाचे आहे हे त्यांनी जाणले. फक्त शैक्षणिक समतेच्या अमृतातूनचा तथाकथित सनातनी लोकांच्या मगरमिठीतून सामान्य जनतेला सोडवता येईल.प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण असे फुले यांचे ठाम मत होते.'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता,

आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता.स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मार्टिन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते.

**आधी केले मग सांगितले:**

इ.स. १८४८ साली पुण्यामध्ये बुधवार पेठेतील भिडे यांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपविली. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची ही मुहूर्तमेढ ठरली.स्वतःच्या पत्नीस आधी शिकविले व त्यानंतर इतर स्त्रियां पुढे आदर्श उभा केला.कारण आदर्श हा नेहमी कामातूनच उभा केला पाहिजे.

**प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केले:**

**Jyotiba Fule was the first of all indians to demand free and Compulsory Education**

प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा मूलभूत हक्क आहे.आणि त्याला तो मिळालाच पाहिजे याबाबत म.फुले आग्रही होते.त्यामुळेच जर गरीब लोकांकडून शासन टॅक्स वसूल करत असेल तर त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी देखील शासनाने घ्यावी आणि बारा वर्षाखालील सर्व मुलांना सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य आहे.अशी जोरदार मागणी फुल्यांनी केली. 19 ऑक्टोबर 1882 मध्ये त्यांनी सरकारला एका निवेदनाद्वारे स्पष्ट सांगितले की, " सरकार जर जनतेच्या शिक्षणावर जर अधिक भर देईल तर नीति आणि सद्वर्तनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण पडणार नाही"

**ग्रामीण भागातील मुला मुलींच्या शिक्षणाची तरतूद करणे** :बहुजन समाज हा ग्रामीण भागात राहतो त्यामुळे त्या सर्व बहुजनांच्या शिक्षणाची विशेष काळजी महात्मा फुले यांना वाटत असल्याकारणाने 2 मार्च 1888 रोजी पुणे येथील ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या मेजवानी प्रसंगी खऱ्या देशाची ओळख करून देताना म.फुले म्हटले की, खरा हिंदुस्थान खेड्यात राहतो खेड्यातील लोक भुकेकंगाल बेघर असतात अशी गरीब जनता दारिद्र्यात पिचत असून त्यांना शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे हे त्यांनी स्पष्टपणे मांडले

**शिक्षण प्रणालीत अमुलाग्र बदल करणे आवश्यक:**

महात्मा फुले यांच्या काळात जी शिक्षणाची पद्धती सुरू होती ती त्यांना मान्य नव्हती त्यावर त्यांनी कडाडून हल्ला केला. त्यांच्या मते प्रचलित शिक्षण पद्धतीत फक्त कारकून व शिक्षण निर्माण करणार आहे कारखाना आहे यातून विद्यार्थी जरी मॅट्रिक पास झाले तरी ते नोकरीसाठी वणवण भटकत आहेत. महात्मा फुले यांचे विचार आजही लागू पडतात. खूप साऱ्या शिक्षण पद्धती महाविद्यालय सुरू झाली असली तरी त्यातून सर्वांनाच रोजगार उपलब्ध होत नाही. एक चांगले संतुलित राष्ट्र निर्माण करण्यासाठी भिल्ल कोळी, अतिशूद्र यांना शिक्षण दिले गेले पाहिजे. महात्मा फुले यांच्या मते ज्या देशात सामाजिक व आर्थिक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही सर्व भारतीय एक ग्रुप आहोत याची जाणीव निर्माण करण्यासाठी व समाजात समानता आणण्यासाठी सर्वांना शिक्षणाची दारे खुली केली पाहिजेत.

**व्यावसायिक व औद्योगिक शिक्षणासाठी तांत्रिक शाळांची स्थापना करणे** :

भारतातील बहुसंख्य लोक खेडोपाडी राहत असल्याकारणाने ग्रामीण भागात शेती हा मुख्य काम धंदा आहे.त्यामुळे या भागात शेती विषय व्यावसायिक शिक्षण व शहरी भागात व्यवसायिक शिक्षण देण्यासाठी तांत्रिक शाळा सुरू केल्या पाहिजेत.

**शिक्षणात त्रिभाषा सूत्राचा अवलंब करणे** :

स्वतंत्र भारतात 1947 नंतर अनेक शिक्षण आयोग स्थापन झाले. यामध्ये 1964-66 सालच्या डॉक्टर डी.एस.कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्राचा वापर करण्याची शिफारस केली होती.

म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याची मातृभाषा ही प्रथम भाषा,दुसरी भाषा इंग्रजी आणि तिसरी राष्ट्रभाषा म्हणून हिंदी शिकण्याची संधी देण्यात आली.परंतु याच्या खूप अनेक वर्ष म्हणजे 77 वर्षे आधी 'अखंडादी काव्यरचना' या फुले यांच्या रचनेत त्यांनी त्रिभाषा सूत्राचा पुरस्कार केला होता.

स्वभाव लिहावी भाषण करावे ||सदगुणी असावे|| स्वभावात||
इंग्रजी लिहावे भाषण करावे||जगात त्यागावे||व्यसनास||
हिंदी लिहावे भाषण करावे|| सर्वस्वी त्यागावे|| व्यसनास||
तीन भाषेमध्ये सध्या जे निपुण||सद्गुणी संपन्न||मानवांत||4||

शिक्षणाच्या आकृतिबंधात या तीनही भाषांचा विचार करणे गरजेचे होते असे महात्मा फुले यांचे मत होते.

**शिक्षण म्हणजे माणसाचा तिसरा डोळा आहे:**

महात्मा फुले यांनी तृतीय रत्न शीर्षक असलेल्या नाटकात अशिक्षित शूद्रांना पंडित धर्माच्या नावाखाली कसे फसवतात आणि ख्रिश्चन पादरी निष्पक्ष धर्माच्या आधारावर अशिक्षित शूद्रांना खरे ज्ञान देऊन योग्य मार्ग दाखवतात हे या दर्शविलेले आहे.यात ' रत्न 'चा वापर ' नेत्र ' म्हणजेच डोळा या अर्थाने केला आह. शिक्षणरूपी तिसरा डोळा आयुष्यात खूप महत्वाचा आहे. शिक्षणासाठी वस्तीग्रह व शिष्यवृत्ती यांची सोय वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे या लॉर्ड मेकॉले यांच्या शिफारशीला महात्मा फुले यांनी कडाडून विरोध केला. कारण वरच्या वर्गातील लोक खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देण्यास तयार नव्हते यासाठी दलित वंचित या शूद्र जातीच्या लोकांना शिक्षण देण्याची व्यवस्था ब्रिटिश शासनाने करावी असे महात्मा फुले यांचे म्हणणे होते म्हणून त्यांनी हंटर आयोगाला देखील विरोध दर्शविला होता.

**सत्यशोधक समाजाची स्थापना**:

सत्यशोधक समाजाने अज्ञानी अशिक्षित समाजाचे जागृती करण्याचे कार्य केले. धनंजय कीर यांच्या मते, महाराष्ट्रातील ग्रामीण भागात राहणाऱ्या मागासवर्गीय आणि वंचित घटकांना शिक्षण देणारी सत्यशोधक समाज ही पहिली संस्था आहे. 24 सप्टेंबर 1873 रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. सत्यशोधक समाजाने सर्व जाती-जमातीचे लोकांसाठी एक सामान्य व्यासपीठ तयार केले या व्यासपीठावरून आधुनिक भारतात सामाजिक पुनःघटनेसाठी चळवळ सुरू झाली.

**अनाथ बालक गृहाची स्थापना**:

महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या बालगृहातील काशीबाई या ब्राह्मण विधवेचा मुलगा यशवंत यास 1879 साली दत्तक घेतले. त्याला डॉक्टर बनविले व त्याचे लग्न ज्ञानोबा ससाने यांच्या कन्येशी लावले. एवढे क्रांतिकारी विचार असणारे महात्मा फुले हे खरंच एकमेवाद्वितीय आहेत. या सर्व गोष्टी आज सुद्धा घडून येत नाहीत किंवा स्वीकारण्याची लोकांची मानसिकता नाही.

**देशी शाळा:**

देशी भाषेतील सहावी इयत्ता उत्तीर्ण शाळेला शिक्षक वर्ग किंवा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमल्याशिवाय शिक्षक क्षेत्रात भरीव कार्य होणार नाही.म्हणून फुले यांनी देशी शाळांचा आग्रह धरला.

**हंटर आयोगासमोर ज्योतिबा फुले यांनी केलेले निवेदन:**

प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी प्राथमिक शाळांना प्रांतिक सरकारने अधिक अनुदान द्यावे. नगरपालिकांनी शाळावर येणाऱ्या खर्चाची जबाबदारी घ्यावी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व वार्षिक बक्षिसांची विशेष प्रलोभने ठेवावीत.अस्पृश्य वस्तीच्या ठिकाणी स्वतंत्र शाळा उघडावी.अज्ञानी लोकांत विद्येची आवड निर्माण होण्यास सरकारी शाळा उघडून खास प्रलोभन ठेवावे.

**14) उच्च शिक्षण:**

गुलामगिरी या ग्रंथात महात्मा फुले यांनी नमूद केले की, सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे.

**राजर्षी शाहू छत्रपती यांचे शिक्षणविषयक सर्वासमावेशक विचार :**

शाहू महाराज मानवतावादी विचारवंत होते.त्यांचे मानवतावादी धोरण पाहून कुर्मी क्षत्रिय अधिवेशनात त्यांना ' राजर्षी ' ही पदवी देण्यात आली. राजर्षीनी शिक्षणाचा दीप प्रज्वलित करून उभ्या महाराष्ट्राला ज्ञानाच्या प्रकाशाने न्हाऊन उजळवून टाकले.

**सर्वांसाठी शिक्षणाची पाणपोई:**

गतकालीन शिक्षण विषयक परिस्थितीचे चित्र रेखाटताना राजर्षी शाहू म्हणाले होते की, शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. आणि याच मुळे स्वतःच्या कार्यकाळात महाराजांनी सार्वत्रिक आणि सक्तीच्या शिक्षणाचा पुकारा केला. महाराजांचे विचार अत्यंत मौलिक आणि क्रांतिकारक होते. समाजातील दुर्लक्षित दुर्बल दुःखी दलित लोकांना वरती आणायचे असेल, सर्व मानवांचे सर्वार्थाने आधुनिकीकरण करावयाचे असल्यास शैक्षणिक विचार त्यांच्या दृष्टीने रुजणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळेच सर्वांसाठी शिक्षण या बिरुदावली च्या सावलीचा सर्वांना लाभ व्हावा, यासाठी राजर्षींनी शिक्षणाचा कर्म यज्ञ आरंभिला होता.

**सर्वांच्या विकासासाठी शिक्षण:**

महात्मा फुले यांच्यानंतर सामान्य माणसाच्या शिक्षणासाठी महाराजांनी कार्य केले. ब्राह्मणेतर चळवळीमध्ये महात्मा फुले यांच्या नंतर शाहू महाराजांनी मोलाची कामगिरी केली. खामगाव येथील शिक्षण परिषदेमध्ये बोलताना महाराज म्हणाले फक्त शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे. असे माझे ठाम मत आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निर्माण होणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची आवश्यकता आहे.

**लोकशाहीसाठी शिक्षण:**

राजर्षी शाहू महाराज लोकशाही या तत्त्वावर प्रेम करत होते कोल्हापूर संस्थानचे अध्यक्ष आहोत अशी त्यांची भूमिका होती. महाराजांनी शहरातील कामगारांना शिकण्याचा उपदेश केला कारण शिकलेले लोक लवकर एकत्र येतात त्यांचे ऐक्य होते आणि शिक्षण हे ऐक्याकडे घेऊन जाते आणि ऐक्य लोकशाही कडे घेऊन जाते.एकंदरीत समग्र क्रांतीतून समग्र लोकशाही निर्माण झाली पाहिजे त्यामुळेच लोकशाही अधिक काळ टिकेल.

**मोफत आणि सक्तीचे शिक्षण:**

ज्या लोकांनी अजूनही शिक्षण घेतले नाही. अशा अशक्त लोकांकडे अधिक लक्ष देणे महाराजांना योग्य वाटत होते म्हणूनच राजर्षींनी मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. आपल्या देशाला या शिक्षणाची फार मोठी गरज आहे हे त्यांना मनोमन वाटले आणि म्हणूनच महात्मा फुले यांचा वारसा त्यांनी पुढे जपला. सन 1882 मध्ये महात्मा फुले यांनी पाहिलेले मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचे स्वप्न महाराजांनी 1913 मध्ये खरे करून दाखवले. शाहू महाराजांना जातिभेदाच्या भिंती पाडून शिक्षणासाठी एकच व्यापक व्यासपीठ तयार करायचे असल्यामुळे सर्व जातीच्या मुलांनी एकत्र बसून शिक्षण घेतले पाहिजे या गोष्टीवर महाराजांचा कटाक्ष होता व त्यांनी त्यासाठी स्वराज यामध्ये विशेष हुकूम काढले.

**दुर्बल लोकांसाठी शिक्षण:**

1918 मध्ये आपले सर्व आर्थिक सामर्थ्य प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करावे असे ठरवले. उच्च शिक्षणावर खर्च करण्यापेक्षा तो प्राथमिक शिक्षणावर करावा असे त्यांचे मत होते. दुर्बलांना सफल बनण्यासाठी शिक्षणाची गोडी लावली पाहिजे.

**प्राथमिक शिक्षण**

महाराजांनी पायाभूत शिक्षण म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार प्रभावीपणे व्हावा यासाठी 24 जुलै 1917 रोजी एक हुकुम काढून प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले व या हुकुमाप्रमाणे 15 ऑगस्ट 1917 रोजी ग्रामीण भागाची पाहणी करून तसा हुजराकडे अहवाल देण्याचा आदेश निघाला. याप्रमाणे पाचशे लोकवस्ती आणि पाचशे ते हजार लोक वस्ती गावात त्वरित शाळा सुरू करण्याचे ठरले ज्या गावी शाळा भरण्यासाठी जागा नाही तेथे चावडी देऊळ धर्मशाळा यांचा उपयोग केला गेला. प्राथमिक शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यासंबंधी आदेश देण्यात आले 11 सप्टेंबर 1917 रोजी महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले असे एका जाहीरनामा द्वारे स्पष्ट केले याची पहिली कार्यवाही 4 मार्च 1918 रोजी झाली.या योजनेसाठी त्या काळात महाराजांनी सुमारे पाऊण लाख रुपये खर्च केले. 4630 मुले शाळेत शिकत होती त्यानंतर 1922 साली या योजनेसाठी तीन लाख रुपये खर्च केले यावरून महाराजांच्या मनामध्ये समाजमनात शिक्षणाविषयीची तीव्र लालसा याविषयी कळकळ उघड होती

**पुरोहित शाळा:** वेदोक्त प्रकरणातून पुरोहित शाळेचा जन्म झाला.यामुळे आपल्या देशातील कोणत्याही धर्माचा आणि जातीचा मनुष्य पुरोहित होऊ शकतो.म्हणूनच ज्याला पुरोहित काम करायचे त्यासाठी पुरोहित शाळा सुरू केल्या.1913 साली पुरोहित शाळा सुरू केल्या या शाळेत तयार झालेल्या पुरोहितांकडून सुमारे पाच हजार धार्मिक कृत्य करण्यात आली या प्रमाणे संपूर्ण महाराष्ट्रभर या चळवळ उभी करण्यासाठी प्रयत्न केले गेले. 1920 साली श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय कोल्हापूर येथे सुरू करण्यात आले या पुरोहित शाळांमधून महाराजांना समाजाला धार्मिक खर्च द्यायचे होते. माणसाच्या जन्मावरून उच्चनीचता आणि अस्पृश्यता नष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे असे राजर्षी शाहू महाराज यांना मनोमन वाटत होते.

**युवराज शाळा :**

कोणत्याही राजपुत्राचे शिक्षण त्याच्या संस्थानात प्रजेमध्ये झाले पाहिजे. प्रजाहितदक्ष राजा तयार करण्यासाठी युवराजाच्या शिक्षण संस्थान झाल्या पाहिजे.राजा अनेकांचा पोशिंदा असतो त्याला प्रजेच्या अडचणी माहित असाव्यात म्हणूनच स्वराज्य निर्मितीचे आणि संरक्षणाचे आदर्श शिक्षण मिळावे यासाठी सरदार शाळा म्हणजे युवराज शाळा सुरू केल्या. यामध्ये सरदार जहागीरदार राजेरजवाडे या राजघराण्यातील मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले गेले.

**पाटील शाळा :**

बहुजन हिताय, बहुजन सुखाय या मंत्राप्रमाणे कोणत्याही सुधारणेचा प्रारंभ प्रथम खेड्यापासून केला पाहिजे असे शाहू महाराजांचे मत होते.त्यामुळे त्यांनी गावातील कुलकर्णी वतनदारी नष्ट करून पाटील शाळा सुरू केल्या.यामध्ये सन 1913 साली राजर्षींनी पाटील शाळा सुरू केली कारण पाटील हा गावातील लोकांचा नैसर्गिक आदरस्थानी नेता समजला जातो. आणि हा पाटील डाणी तर गाव अडाणी अशी स्थिती राहू नये यासाठी दिल्ली दरबार पाटील स्कूल सुरू केले. या पाटील शाळेत फौजदारी काम गावचे हिशोब गावचे आरोग्य हे विषय शिकवण्यात येत असत. याव्यतिरिक्त सत्यशोधक शाळा, सैनिक शाळा बालवीर शाळा, डोंबारी मुलांची शाळा कला शाळा जातवार वसतिगृह राजर्षी शाहू यांनी सुरू केले तसेच संस्थेबाहेरील शिक्षण कार्य देखील सुरू ठेवले. पुणे, नाशिक, पंढरपूर, अहमदनगर, अमरावती, सातारा, नागपूर या ठिकाणी शैक्षणिक कार्य केले.

**समारोप**: क्रांतीपुरूष महात्मा फुले,लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू यांचे कार्य समाजाला देशाला कायमच प्रेरणादायी असे होते, आहे आणि यापुढेही राहणार आहे.

झाले बहु, होतिल बहु, आहेतहि बहु, परंतु यासम हा। असे महान समाजसुधारक कायम राष्ट्राला दिशादर्शक आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

1. घोरमोडे,के. यु आणि घोरमोडे कला (२००६). शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य. नागपूर: विद्या प्रकाशन. पृ -१-१६, १७-३८
2. पेंडके, प्र. सु. (२०१०). जागतिक शिक्षणतज्ञ. नागपूर: विद्या प्रकाशन. पृ -१८-२३,
3. पृ -१०७-११५
4. पवार,ना.ग. (२००५). शिक्षणक्षेत्रातील विचारवंत (भारतीय व पाश्चात्य).
5. पुणे: नित्यनूतन प्रकाशन.
6. राजमाने,क.च (२०११). शिक्षणातील थोर विचारवंत. नाशिक: इनसाईट पब्लिकेशन्स. पृ -२-१३,६०-७७
7. भगत,रा.तु. (२००५). शिक्षणातील थोर विचारवंत.कोल्हापूर: चैतन्य प्रकाशन.
8. तांबोळी, शमसुद्दीन ,तांबोळी बेनझीर (२०११). प्रभावशाली शिक्षणतज्ञ. पुणे: डायमंड पब्लिकेशन्स. पृ-७-११,४७-५१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री सबलीकरण विषयक दृष्टिकोन - एक नवा दृष्टिक्षेप

**डॉ. संतोष बाबरे**
प्रमुख, इतिहास विभाग श्री. रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय सावळज, ता. तासगाव, जि.सांगली.

आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ दलितांचे पुढारी नव्हते तर सखल मानवाच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित करणारे महामानव होते. त्यांचे कार्य केवळ दलित उद्धारक आणि घटना निर्मिती इतकेच नव्हते तर हजारो वर्षापासून गुलामगिरीच्या साखळदंडात अडकलेल्या व आत्मसन्मान हरवून बसलेल्या समाजाला एक नवा चेहरा त्यांनी दिला. स्त्री उद्धारासाठीही त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. . बाबासाहेबांच्या मते एखाद्या समाजाची प्रगती अथवा अधोगती हे मोजण्याचे मापक हे त्या समाजाने त्या स्त्रीला दिलेल्या दर्जा वरून लक्षात ठरते. प्राचीन काळात भारतामध्ये विशेषत: वैदिक कालखंडात स्त्रियांना समानतेचे अधिकार होते. स्त्रियांचा सन्मान केला जात असे तिला शिक्षण घेण्याचा अधिकार होता. उत्तरवेद काळामध्ये स्त्रियांच्या हक्क अधिकारावर अनेक निर्बंध निर्माण झाली आणि स्त्रीही आपल्या हक्क अधिकारापासून वंचित राहिली. परंतु अ. ह. साळुंखे सरांच्या मते वेदकाळात देखील ठरावीक वर्गातील स्त्रियांनाच स्वातंत्र्य होते इसवी सन पूर्व सहाव्या शतकामध्ये जैन आणि बौद्ध धर्माचा उदय झाला या धर्माने पुन्हा स्त्रियांना समानतेचा हक्क दिला. गौतम बुद्धांनी तर आपल्या धर्मात स्त्रियांना प्रवेश देऊन स्त्री समतेचा पुरस्कार केला, ही गोष्ट म्हणजे तत्कालीन स्त्री स्वातंत्र्य आणि हक्क अधिकाराच्या दृष्टीने क्रांतीचे पाऊल होते. फुले, कबीर आणि गौतम बुद्धांना गुरु मानणाऱ्या डॉ.आंबेडकरनी हिंदू कोड बिलाच्या आधारे स्त्री समतेचा पुरस्कार केला. सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपातील प्रबोधनाचे वारे भारतात येऊन पोहोचले आणि भारतीयांची संकुचित विचारसरणी हळूहळू क्षीन होत गेली. त्यावेळी भारतातील अनेक संत व समाजसुधारकांनी येथील स्त्रीयांच्या उद्धारासाठी प्रयत्न केला. त्यामध्ये अग्रस्थानी महात्मा फुले, आगरकर, धोंडो केशव कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नावे घ्यावी लागतील. डॉ. आंबेडकरनी स्त्री समतेसाठी स्त्रीयांचा राजकीय सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक दर्जा उंचावण्याचा प्रयत्न केला.डॉ.आंबेडकरांनी त्याकाळात स्त्री समतेसाठी मांडलेले विचार आजच्या आधुनिक काळातही लागू पडतात हे विशेष.

**स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोन:**

इसवी सन पूर्व सहाव्या शतकात गौतम बुद्धाने स्त्रियांना आपल्या संघात प्रवेश देऊन स्त्रियांचा सन्मान केला बाबासाहेबांचे गुरु महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा भारतात प्रथम पुरस्कार केला याच विचारधारेने डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडले व पिपल एज्युकेशन सोसायटी ची स्थापना करून सिद्धार्थ व मिलिंद महाविद्यालयांची स्थापना केली. परिणामी या कार्यामुळे जाईबाई चौधरी या स्त्रीने इसवी सन 1925 मध्ये संत चोखामेळा ही मुलींकरीता शाळा सुरू केली. जनाबाई देशभ्रातर यांनी मुलींच्या वस्तीग्रह कार्यात आपल्या पतीला मोलाची साथ दिली. शांताबाई दाणी यांनी बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याला पाठिंबा दिला. बाबासाहेबांच्या मते स्त्री शिक्षणाने कुटुंब, समाज आणि राष्ट्राची उन्नती होते. बाबासाहेब हे कर्ते सुधारक होते म्हणून त्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्व अधोरेखित करताना त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली आपली पत्नी रमाबाईना स्वतः शिकून साक्षर केले हे विशेष

**कुटुंब नियोजनाचे महत्त्व :**

आज संपूर्ण जगात लोकसंख्या वृद्धि एक प्रमुख समस्या बनली आहे, याची जाणीव दूरदृष्टीच्या डॉ. बाबासाहेबांना कित्येक वर्षांपूर्वी झाली होती. म्हणून त्यांनी महिला परिषदेमध्ये आपल्या भाषणात छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटवून दिले होते. त्यामध्ये त्यांनी मोठ्या कुटुंबामध्ये आर्थिक आणि मानसिक समस्या निर्माण होऊन कुटुंबाची प्रगती खुंटते. मोठं कुटुंब असल्याने सकस आहार, योग्य शिक्षण व संस्कार मिळत नसतात परिणामी अनैतिकता, गुन्हेगारी समाजामध्ये बळावते. स्त्रियांचे आरोग्य धोक्यात येते. म्हणून छोटं कुटुंब म्हणजे सुखी कुटुंब असतं यातच स्त्री,समाज आणि राष्ट्राचा विकास होतो असे परखड मत त्यांनी व्यक्त केलं होतं ते आज देखील राष्ट्राला मार्गदर्शक ठरते.

**स्त्रियांना मार्गदर्शन:**

डॉ.बाबासाहेबांनी स्त्रीयांच्या आत्मसन्मानासाठी महाड येथे 25 डिसेंबर 1927 राेजी महिला महिला परिषद आयोजित केली होती. त्यामध्ये स्त्रियांना मार्गदर्शन पर भाषणात ते म्हणाले होते की, स्त्रीयांनी आत्मसन्मान जपला पाहिजे व आपल्या मुलांना शिक्षण देऊन सक्षम बनवलं पाहिजे. शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी म्हणून स्वतः सुद्धा स्वच्छ, निरोगी राहिलं पाहिजे. आपले वस्त्र स्वच्छ नीटनेटके ठेवावीत. लाख नकली दागिन्यान पेक्षा एखादा सोन्याचा दागिना घालावा. मुलांची लग्न वयात आल्यावरच करावी. आपल्या पतीसोबत गुलामाप्रमाणे न राहता त्याची मैत्रीण म्हणून साथ द्यावी. व्यसनी पतीचे समर्थन न करता त्याचा प्रतिकार करावा. मेलेल्या जनावरांचे मास सेवन करू नये. अशाप्रकारे डॉक्टर बाबासाहेबांनी तत्कालीन बहुजन स्त्रीयामध्ये आत्मसन्मान निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पुढील काळात दारूबंदी सारख्या चळवळी निर्माण झाल्या त्याचे श्रेय डॉ. बाबासाहेबना द्यावे लागेल.

**हिंदू कोड बिल : स्त्री मुक्तीचा मार्ग :**

मनुस्मृती या ग्रंथामध्ये स्त्रियांचे हक्क अधिकार नाकारून त्यांचे माणूसपण हिरावून घेतले होते. परंतु डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्याद्वारे स्त्रीयांचा आत्मसन्मान उंचावण्याचा प्रयत्न केला होता. ज्या छ.शिवरायांनी महाराष्ट्रात स्त्रियांचा सन्मान उंचावला होता त्या महाराष्ट्रात देखील तत्कालीन सनातन्यांनी स्त्रियांना दुय्यम लेखले होते. छ. शिवराय, महात्मा फुले,शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा घेऊन डॉ. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या द्वारे प्रथम भारताचे कायदेमंत्री असताना 5 फेब्रुवारी 1951 रोजी स्त्रियांच्या मुक्तीचा जाहीरनामा म्हणजेच हिंदू कोड बिल सादर केले, त्यामध्ये १) स्त्रिला घटस्फोटाचा अधिकार मिळावा.

२)नवऱ्याने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळायला हवी.

३) एक पत्नीत्व कायदेशीर करून स्त्रिला स्थैर्य दिले.

४) स्त्रियांना दत्तक घेण्याचा अधिकार असावा.

५) आंतरजातीय विवाहास संमती मिळावी.

६) वडिलांच्या संपत्तीत मुला'- मुलींना समान वाटा मिळावा.

७) स्वतःच्या मिळकतीवर स्त्रीचा अधिकार असावा.

८) स्त्रीला स्वतःचा वारस ठरविण्याचा अधिकार असावा.

९) स्त्रीला दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार हवा.

या देशातील तत्कालीन सनातनी, मनुवादी विचाराच्या नेत्यांनी, संघटनांनी या बिलाला विरोध केला. हे बिल पारित न झाल्याने अत्यंत दुःखी मनाने डॉ.बाबासाहेबांनी आपल्या कायदे मंत्रिपदाचा राजीनामा 27 सप्टेंबर 1951 रोजी दिला, ही गोष्ट आजच्या परिस्थितीमध्ये एक आख्यायिका वाटेल. आज आमच्या माता-भगिनी ज्या सन्मानाने उच्चपदस्थ राहूनकर्तबगारी करत आहेत, त्याचे बीजारोपण डॉ.बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या द्वारे केल्याचे दिसते.

**स्त्री कामगार विषयक भूमिका :**

सन 1942 - 46 या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार मंत्री असताना स्त्री कामगारांना न्याय मिळवून देऊन त्यांचा सन्मान उंचावण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता त्यांनी कामगार स्त्रियांना समान काम समान वेतन, कामाच्या ठिकाणी सुविधा, प्रसूती काळात रजा व आर्थिक लाभ इत्यादी गोष्टींची तरतूद करून दिली. स्त्रीयांची आर्थिक स्थिती सुधारली तर कुटुंब आणि समाजांमध्ये त्यांचा सन्मान वाढेल व खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती म्हणजेच मानव मुक्ती होईल. एवढा विशाल दृष्टीकोन स्त्रियांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेबांनी ठेवला होता.

**स्त्री- संघटना:**

डॉ.बाबासाहेबांनी स्त्री शक्ती ही राष्ट्रशक्ति आहे, हे ओळखून स्त्री संघटन संघटन कार्याला चालना दिली. त्याकरिता स्त्रियांना त्यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश दिला. बाबासाहेब हे केवळ बोलघेवडे समाज सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. म्हणून त्यांनी स्त्रियांना संघटित करण्याकरिता इ.स.१९३२-३३ मध्ये जनता पत्राच्या कार्यकारणीमध्ये सावित्रीबाई बोराडे व अंबुताई गायकवाड यांचा निवड केली होती. आज विविध राजकीय , महामंडळ समित्यांवर महिलांची लक्षणीय वृद्धी ही बाबासाहेबांच्या विचारांची फलश्रुती आहे.

**स्त्री कामगार विषयक भूमिका:**

सन 1942 - 46 या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार मंत्री असताना स्त्री कामगारांना न्याय मिळवून देऊन त्यांचा सन्मान उंचावण्याचा प्रयत्न केला. त्याकरिता त्यांनी कामगार स्त्रियांना समान काम समान वेतन, कामाच्या ठिकाणी सुविधा, प्रसूती काळात रजा व आर्थिक लाभ इत्यादी गोष्टींची तरतूद करून दिली. स्त्रीयांची आर्थिक स्थिती सुधारली तर कुटुंब आणि समाजांमध्ये त्यांचा सन्मान वाढेल व खऱ्या अर्थाने स्त्रीमुक्ती म्हणजेच मानव मुक्ती होईल. एवढा विशाल दृष्टीकोन स्त्रियांच्या उन्नतीसाठी डॉ. बाबासाहेबांनी ठेवला होता.

**शीला शिवाय जीवन व्यर्थ:**

मानवी जीवनात शील महत्वाचे आहे. म्हणून बाबासाहेब म्हणतात की, एखाद्यावेळेस तुमचे आरोग्य, संपत्ती गमवली तरी ती तुम्ही पुन्हा मिळवू शकता परंतु चरित्र्य हे एकदा गेले तर ते परत मिळवू शकणार नाही म्हणून शील मानवी जीवनातील सर्वात सुंदर दागिना आहे. 16 जून 1936 च्या मुंबईतील दामोदर हॉलमध्ये बाबासाहेबांनी देह विक्री करणाऱ्या देवदासी आणि मुरळयाना उद्देश पर भाषणात आपले शिल जपण्याचा उपदेश केला. शील गहाण ठेवून जगण्यापेक्षा कष्टपूर्वक स्वाभिमानाने जगा त्यामुळे तुम्हाला आणि समाजाला प्रतिष्ठा मिळेल. वाम मार्गाचा अनैतिक मार्गाचा त्याग करून इतर उद्योग, व्यवसाय करा आणि बुद्धांच्या पंचशीलेचा स्वीकार करा. यामुळे सर्वांचे जीवन सुखी बनेल. आज बाबासाहेबांच्या या विचारांमुळे समाज शील संपन्न बनला आहे, याचे श्रेय बाबासाहेबांच्या विचारास द्यावे लागेल. हजारो वर्षापासून समाजाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित राहिलेल्या या बहिष्कृत वर्गाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेबांनी केले. यामुळे राष्ट्र सक्षमीकरणाला एक प्रकारे चालना त्यांनी दिली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

**देवदासी प्रथेला विरोध:**

भारतीय हिंदू धर्माच्या नावाखाली अनेक अनिष्ट प्रथा समाजात प्रचलित होत्या त्यामध्ये वाघ्या, मुरळी देवदाशी या प्रथा म्हणजे स्त्री स्वातंत्र्याची गळचेपी होय. कोवळया वयाच्या मुलींना या नरकासमान प्रथांचा बळी पडावा लागत असे. या प्रथेमुळे स्त्रियांची सामाजिक, आर्थिक कुचंबणा होत असे. बाबासाहेबांनी समाजातील या प्रथेला बळी पडलेल्या स्त्रियांना उद्देश पर भाषणात या अंधश्रद्धेतून बाहेर येण्याचे आव्हान करतात या बाबासाहेबांच्या मते हिंदू धर्मा व्यतिरिक्त इतर कोणत्याही धर्मात अशी प्रथा प्रचलित नाही. ती केवळ बहुजन समाजातच अस्तित्वात आहे. यामुळे स्त्रीया अनैतिक क्षेत्रात ओढल्या जातात. त्यांचे आर्थिक सामाजिक, नैतिक अंधपतन होते. आणि स्वतःची व समाजाची मानहानी होते. बाबासाहेबांनी तत्कालीन स्त्रियांच्या परिषदेमध्ये या वाईट व अनिष्ट प्रथेचा त्याग करण्याचे आवाहन करतात. यावरून बाबासाहेबांचे बुद्धिवादी वैज्ञानिक आणि स्त्री उन्नतीचा दूर दूरदृष्टीकोण दिसून येतो.

**मनुस्मृतीचे दहन:**

मनुस्मृती या ग्रंथामध्ये स्त्रियांच्या हक्क अधिकाराची पायमल्ली केल्याचे दिसून येते स्त्रियांना विविध गुलामगिरीच्या साखळदंडमध्ये जखडून ठेवल्याने बाबासाहेबांनी 25 डिसेंबर 1927 रोजी आपले ब्राह्मण सहकारी सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते मनुस्मृतीचे दहन केले. हा दिवस खऱ्या अर्थाने भारतातील स्त्रियांच्या मुक्तीचा जाहीरनामा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरनी अनेक धर्मग्रंथाचा सखोल अभ्यास करून स्त्रियांचे स्थान काय आहे, त्यांना दुय्यम स्थान का दिले यावर सखोल चिंतन, मनन केले. आणि या देशातील स्त्रियांचा कैवार घेतला.

**जागतिकीकरणाचा प्रभाव:**

आज 21 व्या शतकामध्ये स्त्रिया विविध क्षेत्रामध्ये आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर कर्तृत्व गाजवत आहेत. तत्कालीन समाजसुधारक फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर आणि कर्वे यांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. त्यांचा आत्मसन्मान, मनोबल उंचावण्याचा प्रयत्न केला. परंतु स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. आज विविध माध्यमानद्वारे स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विपर्यास्त होताना दिसत आहे. त्यामुळे स्त्रियांच्या चारित्र्याची पायमल्ली होत आहे. समाजसुधारकांचे स्त्री स्वातंत्र्य म्हणजे स्त्रियांचे बाजारीकरण नव्हे तर तिला समाजात सन्मानाचे स्थान मिळावे हा हेतू होता. परंतु हा मूळ उद्देश आपण विसरून जात आहोत. ही समाजस्वास्थ्याच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे.

**निष्कर्ष :**

हजारो वर्षांपासून भारतीय समाजातील स्त्रियांना धर्माच्या नावाखाली, अनिष्ट प्रथा व पुरुष प्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांना हिन वागणूक मिळत गेली. त्यांचे हक्क अधिकार नाकारले. स्त्रीला फक्त भाेगवस्तू म्हणून पाहिल गेलं. तिला विविध देवतांचे रुपे दिली गेली. परंतु पुरुषाच्या बरोबरीने तिला समान हक्क, अधिकार मात्र दिला गेला नाही. ती एक कटपुटली म्हणून कुटुंब आणि समाजामध्ये राहिली. पंधराव्या शतकात युरोप मध्ये प्रबोधनाचे युग आले. भारतात ब्रिटिशांचे आगमन आणि त्यानंतर अनेक समाजसुधारक निर्माण झाले. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीच्या सबलीकरणाची भूमिका ही स्त्रियांना नवा चेहरा मिळवून दिला. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी आपले संपूर्ण जिवण समर्पण केले. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी, मुक्तीसाठी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. ही बाब आजच्या काळात दंतकथेत सारखी वाटते. बाबासाहेबांचे कार्य फक्त दलित स्त्री वर्गापुरते मर्यादित नव्हते. त्यांनी संपूर्ण समाजातील स्त्रियांचा सन्मान वाढविण्याचा प्रयत्न राज्यघटनेमध्ये केला. आज स्त्रियांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात पुरुषांच्या समान जो हक्क,आधिकार मिळत आहे, त्यांचा आत्मसन्मान उंचावला आहे त्याला काही अंशी बाबासाहेबांचे योगदान कारणीभूत आहे. कायद्यामध्ये स्त्रियांच्या हक्क, अधिकारांचे रक्षण जरी केले असले तरी जोपर्यंत पुरुषांची स्त्रियांच्याकडे पाहण्याची समतेची, आदराची मानसिकता होत नाही तोपर्यंत या देशातच नाही तर जगामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार थांबणार नाहीत.

**संदर्भ टीपा:**

१)गायधनीकर रं.ना. राहुरीकर व. ग.प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९५५.

२) पवार, जयसिंगराव, शिवाजी व शिवकाल, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९९५.

३) मोरे दिनेश: आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के. एस. पब्लिकेशन, पुणे ३००६.

४) फडके य.दि. म. फुले समग्र वांड:मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९६१.

५) मेश्राम, कल्याणकर, निंबाळकर,अ. भोसले करके संपा,डॉ. आंबेडकर गौरव ग्रंथ साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई १९६३.

६) खैरमोडे चां.भ, डॉ भीमराव रामजी आंबेडकर खंड 3 सुगावा प्रकाशन पुणे २०११.

७) गायकवाड प्रदीप, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे - खंड ४ क्षितीज पब्लिकेशन, नागपुर २००२.

८) गजेंद्रगडकर प्र.बा. समाज प्रबोधन, सुविचार पब्लिकेशन मंडळ, नागपूर, १९६६.

९)Ambedkar B.R.& the Hindi Code Bill - Ambedkar Writing & Speeches
Vol.- 14.

१०) पंडित नलिनी, आंबेडकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९६६.

११) खैरमोडे चां.भ. भीमराव रामजी आंबेडकर खंड३. सुभाष प्रकाशन, पुणे २०११.

१२) गायकवाड प्रदीप, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची समग्र भाषणे, खंड ४, क्षितिज प्रकाशन, नागपूर, २००२.

१३) गवळी, हिवराळे, गवळी पगव्हाणे ( संपा)बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर १९५१.

# महात्मा ज्योतिबा फुले : स्त्रियांचे उद्धारक

**डॉ. वर्षा तात्यासाहेब सरवदे**
शि. महर्षी ज्ञानदेव मोहेकरमहाविद्यालय, कळंब ता.कळंब जि.उस्मानाबाद

**प्रस्तावना :**
आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात समाजक्रांतीचे जनक म्हणून महात्मा फुले यांना मानाचे स्थान आहे. कारण आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण महात्मा फुले यांच्यापासून सुरू झाली. फुले यांना समाजातील चातुर वर्ण व्यवस्था समाजातील जातीपातीची प्रस्थ मान्य नव्हते .ब्राह्मणाकडे शिक्षणाची ज्ञानाची व नेतृत्वाची मक्तेदारी देऊन स्त्री , शूद्रांना हीन अवस्था व स्त्रियांची लाचारी समाजाने दिलेली होती. या सर्वा विरुद्ध फुले यांनी बंड केले होते 19 व्या शतकाच्या सुरुवातीस सामाजिक ,धार्मिक ,आर्थिक स्थिती अतिशय बिकट होती. स्त्रियांना तर कोणतेच स्थान नव्हते. स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले 'सत्यमेव जयते'या दिव्यत्वाचा त्यांनी पुरस्कार केला व एक आदर्श समाज निर्माण केला. त्यामुळे त्यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्यूथर'असे म्हणतात.

**उद्दिष्टे:-**

1) महात्मा फुले यांचे स्त्री विचार अभ्यासणे .

2) स्त्रियांची स्थिती पालटण्यासाठी जोतिबांचे प्रयत्न अभ्यासणे.

3) फुले यांनी स्त्रियांच्या बाबतीत असलेल्या अनेक कुप्रथांचा अभ्यास करणे.

4)महात्मा फुले यांच्या प्रयत्नाने समाजातील स्त्रियांचे बदललेले स्थान अभ्यासणे.

**संशोधनाची मर्यादा :-**

प्रस्तुत शोधनिबंधात फक्त महात्मा फुले यांचा स्त्रीविषयक केलेल्या कार्याचा अभ्यास येणार आहे. त्यामुळे त्यांच्या इतर कार्यांचा यामध्ये उल्लेख येणार नाही.

**संशोधन पद्धती :-**

वरील विषयाच्या संशोधनासाठी दुयम साधन सामग्रीचा वापर केला जाणार आहे.यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, साहित्य, इंटरनेट ,वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**महात्मा फुले यांचा जीवन परिचय :-**

ज्योतिराव फुले यांचे मूळ घराणे सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावची होय .त्यांचे पूर्वज कामधंद्याच्या निमित्ताने पुण्याला आले, बिकट आर्थिक परिस्थितीमुळे सुरुवातीला शेळ्या राखण्याचे काम केले, त्यांच्या मालकाने प्रामाणिकपणा, हुशारी, कष्टाळूपणा पाहून त्यांना फुलांचा व्यवसाय शिकविला व त्यांच व्यवसायात लोकिक मिळवला.त्यामुळे त्यांचे गोरे हे आडनाव मागे पडून फुले या नावानेच ओळख पडली.महात्मा फुले यांचा जन्म 11 एप्रिल 1827 रोजी गोविंदराव व चिमणाबाई यांच्या पोटी झाला. शालेय शिक्षण वयाच्या 20 व्या वर्षी संपले,तेराव्या वर्षी त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला ,तेव्हा सावित्रीबाईचे वय आठ वर्षे होते. 1888 मध्ये त्यांच्या केलेल्या सामाजिक कार्याची पावती मिळाली ,ती म्हणजे त्यांना महात्मा ही पदवी दिली गेली.1873 मध्ये गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला. 26 नोव्हेंबर 1890 मध्ये त्यांचे निधन झाले.

**स्त्रियांचे उद्धारक महात्मा फुले :-**

मध्ययुगीन काळात स्त्रियांची अत्यंत बिकट अशी परिस्थिती होती. सुधारनांना आणखी सुरुवातच झालेली नव्हती. अत्यंत कनिष्ठ दर्जा होता,काही अपवाद वगळता स्त्रियांचे कार्यक्षेत्र "चूल व मूल"एवढेच सीमित होते. तिला गृहदेवता, अर्धांगिनी, म्हटले जाईल शिक्षणाच्या अधिकारापासून ती वंचित होती. त्याचबरोबर समाजात बाल-जरठ

विवाहाची पद्धत होती. बाल-जरठ विवाहामध्ये मुलगी 7-8 वर्षाची व नवरदेव 60-65 वर्षाचा असायचा. अशा विवाहात स्त्री कमी वयात विधवा होत होती.तिच्यावर अनेक अन्याय, अत्याचार होत होते.तिचे केशवपन करणे आवश्यक होते ,कारण ती कुरूप दिसली तर समाजातील पुरुष तिच्याकडे पाहणार नाहीत. दागिने चांगले कपडे घालण्याची परवानगी नव्हती. कारण तरुण वयात तिचे वाकडे पाऊल पडेल या भीतीने मुळे तिला या सगळ्या पासून वंचित ठेवले होते.स्त्रीला माणूस न मानणाऱ्या आणि समानतेची वागणूक न देणाऱ्या समाजासाठी फुले यांचे हे विचार पटणारच नव्हते. स्त्रीविषयक जोतिबांचे विचार हे अत्यंत प्रगल्भ समतेचे आणि ममतेचे होते.

**स्त्री शिक्षणाची सुरुवात:-**

भारतीय समाजाने स्त्रियांना समानते पासून व शिक्षणापासून वंचित ठेवले होते .व्यक्तीचे जीवन सुधारण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरे प्रभावी साधनच नाही. हे ओळखून ज्योतीबांनी स्त्रियांना सुशिक्षित केले .तर सर्व सुधारणांचा पाया घातला जाईल, हे ओळखले. म्हणजे शिक्षण हे सर्व सुधारणांचे मूळ आहे. पण समाजात स्त्रियां शिकल्यास त्या विधवा होतात. असा समज होता. तेव्हा या सर्व कठीण प्रसंगातून ज्योतीबांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा विचार अंमलबजावणीत आणला.1848 मध्ये त्यांनी पुणे येथे बुधवार पेठेतील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली.स्त्री शिक्षणासाठी शाळा काढणारे भारतातील व आधुनिक महाराष्ट्रातील ते पहिले समाजसुधारक होते .अस्पृश्य मुलींना शिक्षण देणे ,म्हणजे त्याकाळी भयंकर प्रलय होता. आणि अशा शाळेत पुरुष शिक्षक म्हणजे कहरच, म्हणून जोतीरावांनी आपल्या पत्नीला सावित्रीबाईंना शिकऊन तयार केले. आणि त्यांना शाळेत शिक्षवण्या चे काम दिले.अनेक सनातनी लोकांनी त्यांना खूप त्रास दिला ,पण न डगमगता त्यांनी स्त्री शिक्षणाचे महान कार्य पुढे चालू ठेवले. त्यामुळे 1851 मध्ये दुसरी मुलींची शाळा उघडली जोतिरावांच्या या शैक्षणिक कार्याला हळूहळू प्रसिद्धी मिळाली. विशेषता इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांचे कार्य आवडले त्यांच्या या कार्याबद्दल ब्रिटिश शासनाने 200 रुपये व शालजोडी देऊन त्यांचा गौरव केला.

**बाल जरठ विवाहास विरोध :-**

त्या काळात बाल जरठ विवाहाची पद्धत होती.यामध्ये मुलींचे वय सहा ते आठ वर्षाचे व तिचा विवाह साठ ते सत्तर वर्षाच्या वृद्ध व्यक्तीशी लावून दिला जात होता. त्यामुळे ती स्त्री तरुण वयातच विधवा होत होती. विधावांची स्थिती अतिशय दयनीय होती.तेव्हा या प्रथेस ज्योतिरावांनी खूप मोठ्या प्रमाणात विरोध केला.

**केशवपन प्रथेस विरोध :-**

स्त्री विधवा झाली की तिचे केशवपन केले जाई .त्यामागचे कारण होते, स्त्री ही केस नसल्यास अत्यंत कुरूप दिसेल त्यामुळे तिच्याकडे समाजातील पुरुषाचे लक्ष तिच्या कडे जाणार नाही. त्यामुळे तिचे केशवपन केले जाई .तेव्हा ज्योतिरावांनी या प्रथेला खूप विरोध केला न्हवी लोकांची संघटना बनविली, व कोणीच विधवा स्त्रियांचे केशवपन करणार नाहीत आशी ग्वाही त्यांच्याकडून घेतली.

**बालविवाहास विरोध :-**

त्या काळात बालविवाह प्रथा मोठ्या प्रमाणात रुढ होती. बालविवाह पाळण्याला मुंडावळया बांधण्यापासून बारा ते तेरा वर्षांपर्यंत मुला मुलींचे विवाह होत होते. ज्योतिरावांचे विवाह वेळीं वय तेरा तर सावित्री चे आठ वर्ष होते .या बालविवाह मुळे बाल विधवांची समस्या मोठ्या प्रमाणात होती. कारण विदुर पुन्हा विवाह करत पण स्त्रियांचा विधवा विवाह समाजाला मान्य नव्हता, म्हणूनच जोतीरावांनी यासाठी कायद्याचा आधार घेतला ,तेव्हा मुलींचे विवाहाचे वय 11 तर मुलाचे एकोणीस वर्षे करावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

**विधवा पुनविवाहाचा कायदा पास केला :-**

1856 मध्ये विधवाविवाह पुनर्विवाहाचा कायदा पास केला. विधवा स्त्रियांचे हाल थांबावेत त्यांच्या जीवनाला वळणं मिळावे, म्हणून ज्योतिरावांनी विधवा पुनर्विवाह साठी धडाडीने प्रयत्न केले.1864 मध्ये पुण्यात अठरा वर्ष वयाच्या एका विधवेचा त्याच जातींतील विधुराशी विवाह करून दिला. हा पहिला पुनर्विवाह होता.

**बाल हत्या प्रतिबंधक गृह :-**

त्या काळात बालविवाह मोठ्या प्रमाणात होत होते.त्यातच बाल जरठ विवाहची पद्धत होतीच. त्यामुळे बालविधवा स्त्रियांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. तेंव्हा अशा तरुण विधवा कोणाच्यातरी वासनेला बळी ठरत असत. व

त्यातूनच गरोदर राहत, या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी तिच्या जवळ आत्महत्या किंवा भ्रूणहत्या हाच पर्याय होता. यातूनच बाहेर पडण्यासाठी 1863 मध्ये आपल्या घराशेजारी स्वतःच्या खर्चाने एक वाडा बांधून घेतला व घराघरावर भिंतीपत्रक लावण्यात आली 'विधवानी येथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळात व्हा,तुम्ही आपले मुल न्यावे किंवा येथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील'त्या मुलाची काळजी हा अनाथाश्रम घेईल .अशा स्वरूपाची स्त्रियांच्या उद्धाराची काळजी ज्योतिरावांनी घेतली.

**विधवेचा पुत्र दत्तक घेतला :-**

महात्मा फुले यांना स्वतःचे मूलबाळ नव्हते. त्यांच्या वडिलांनी दुसरा विवाह करण्यास ज्योतिरावांना सांगितले पण ते त्यांच्या मनाला पटत नव्हते. तशातच बालहत्या प्रतिबंध ग्रहात 1873 मध्ये काशीबाई नावाच्या एका ब्राह्मण विधवेस मुलगा झाला .जोतिरावांनी व सावित्रीबाईंनी तो मुलगा दत्तक घेतला. त्याचे नाव यशवंत ठेवले, त्याला वैद्यकीय शिक्षण देऊन नावारूपास आणले. थोडक्यात महात्मा फुले हे नुसतेच बोलके समाज सुधारक नव्हते.तर ते कृतिशील समाज सुधारक होते. हे यातून दिसून येते.

**सती प्रत्येक विरोध :-**

महात्मा फुले यांनी प्रचलित समाज व्यवस्थेला प्रश्न केला की पतीचे निधन झाल्यास पती सता जातो का, मग पत्नीस पतीच्या निधनानंतर सती का जावे या प्रश्नाने संपूर्ण समाजव्यवस्थेला धक्का बसलेला होता. त्यांनी सती प्रथेस विरोध केला.

**निष्कर्ष :-**

समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे पहिले पुरुष महाराष्ट्रत महात्मा ज्योतिराव फुले हे होते.ते केवळ विचारवंत नव्हते ,तर ते कर्ते सुधारक होते .त्यांच्या विचाराचा पाठपुरावा करण्यासाठी त्यांनी स्वतः कृती केल्या, समाजसुधारकांच्या चळवळी केल्या.स्त्रियांसाठी आणि शूद्र साठी त्यांनी विशेष असे कार्य केले. ते स्वतः स्त्री-पुरुष समानतेचे ते पुरस्कर्ते करते होते. त्यामुळे त्यांना या समाजात व्यवस्थेतील स्त्रियांची शोचनीय अवस्था पाहवली नाही. या सर्वांचे मूळ शिक्षण आहे, शिक्षणानेचे स्त्रियांची परिस्थिती बदलू शकते,म्हणून स्त्री शिक्षणास त्यांनी महत्त्व दिले व पहिली शाळा काढली, बालविवाह, सतीप्रथा, जरठ विवाह या प्रथेला विरोध केला तर विधवांच्या प्रस्तुती करता बाल हत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. तर तेथीलच ब्रम्हण विधवेचा मुलगा दत्तक घेतला.हे त्या काळात काही सोपे काम नव्हते. आणि म्हणूनच महात्मा ज्योतिराव फुले यांना स्त्रियांचा उद्धारक असे म्हणतात.हे सार्थकच आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) ज्योतिबा फुले आणि स्त्रीमुक्तीचा विचार- डॉ.गेल ऑम्व्हेट

2)युगप्रवर्तक महात्मा फुले- डॉ.अशोक नाईकवाडे

3)महात्मा फुले आणि सांस्कृतिक संघर्ष- भारत पाटणकर

4)महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांचे कार्य- विठ्ठल राव भागवत

5)महात्मा ज्योतिराव फुले यांचे चरित्र- पंढरीनाथ सिताराम पाटील

6(महात्मा फुले समग्र खंडवाङ्मय-धनंजय कीर

7)फुले-आंबेडकरी साहित्य आकलन आणि आस्वाद -मोतीराम कटारे

8)महात्मा फुले समग्रवाङ्मय - जोशी लक्ष्मणशास्त्री 1ली आवृत्ती

# महात्मा ज्योतिबा फुले समाज क्रांतीचे जनक

**डॉ. नामानंद गौतम साठे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब जि. उस्मानाबाद
ईमेल ngsathe11@gmail-com

**प्रस्तावना :** — १९ शतकाचा शेवटचा कालखंड हा धर्म सुधारक सामाजिक परिर्वतनाच्या चळवळीचा कालखंड होता या चळवळीचे नेतृत्व समाजाचे सखोल चिंतन करणाऱ्या समाजहित जपणाऱ्या व धडक कृतीशील असणाऱ्या महात्मा ज्योतीबा फुले कडे होते. आधुनिक भारताच्या इतिहासात राष्ट्रपिता महात्मा ज्योतीबा फुले यांचे नाव सामाजिक क्रांतीचे अग्रदूत म्हणूनच घेतले जाते सामाजिक क्रांतीच्या चळवळीसाठी दुरदृष्टी तसेच साहस हे दोन गुण महत्वपुर्ण असतात ते दोन्ही गुण राष्ट्रपिता ज्योतीराव फुले यांचेकडे होते. त्यांनी धर्म व्यवस्थेविरूध्दरु व जाती व्यवस्थेविरूध्द संघर्ष केला व व धर्म शास्त्राच्या सत्यतेविषयी आव्हान दिले म्हणूनच राष्ट्रपिता ज्योतिबा फुलेंच्या आंदोलनाला भारताच्या सामाजिक क्रांतीच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. बहुजन समाजाचे उद्धारकर्ते म्हणून ज्योतिरावांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

ब्राम्हणी समाज व्यवस्थेमुळे बहुजन समाज अज्ञान अंधकार,जातीय व्यवस्था अशा चारी बाजूंनी कोंडीत अडकला होता. अशा परिस्थीतीत बहुजन समाजाला जागृत करून त्यास आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्यासाठीची शिकवण ज्योतिरावांनी दिल्यामुळेच बहुजन सामाजाच्या परिवर्तनाच्या चळवळीला व्यापक स्वरूव प्राप्त झाले आहे. महात्मा ज्योतराव फुले यांच्या योगदानाची महती म्हणजे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तथागत बुध्द व संत कबीर यांच्या नंतर महात्मा ज्योतिराव फुले यांना गुरूस्थानी मानले विषेश म्हणजे १८९० साली महात्मा ज्योतिराव फुलेंचे निधन झाले आणि बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १८९१ साली झाला. या गुरू - शिष्यांनी एकमेकांना पाहिलेच नाही. समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महात्मा फुलेंनी जगाचा निरोप घेतला. तर समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारख्या महापुरूषाने महात्मा ज्योतिराव फुलेंना गुरू मानावे यात त्यांच्या महानतेची कल्पना येते.

स्त्री आणि (तत्कालीन) अस्पृश्य समाज हे या समाज व्यवस्थेतील सर्वात जास्त ऊपेक्षित घटक होते. त्यामुळेच स्त्री शिक्षण व अस्पृश्य यांचा उध्दार हे त्यांचे जणू जीवितकार्यच झाले. त्या वेळच्या स्त्रिाया या शिक्षण नसल्यामुळे स्वतःची मूळ अस्मिताच हरवून बसल्या होत्या. या परिस्थितीतून त्यांना बाहेर काढण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता होती. मुळात समाजोद्धारासाठी शिक्षण हेच प्रमुख अस्त्र आहे हे ज्योतिरावांनी ओळखले. ही सर्व प्रकारची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांनी अनेक पौराणिक ग्रंथापासून तर इंग्रज इतिहासकारांनी लिहलेल्या इतिहासाचा अभ्यास केला. जसे मनुस्मृती विवेकसिंध्दु प्राचिन संत, या बरोबर मेसर्स ग्रॅडफ, थॉमस पेन पर्यत, या सर्व गोष्टीवर चिंतन करून प्रचलित गुलामगिरी मनुष्यनिर्मित किती आणि ईश्वरनिर्मित किती याचाही त्यांनी विचार केला. सर्व वैचारिक मंथनाचा परिपाक तयार होऊन त्यांना जी स्फूर्ती झाली ते त्यांनी वाणी, लेखणी, कृतीतून आणि साहित्यातून मांडली. हे सर्व करण्यासाठी आवश्यक असणारी निर्भय मानसिक परिस्थिती महात्मा फुले यांच्या जवळ होती.

गुलामगिरी नष्ट करावी, सत्याची कास धरावी, स्वातंज्य समता, बंधुता तत्वानुसार सर्वानी वागावे हे त्यांच्या हाडी खिळलेले होते. एक स्त्री सुशिक्षित म्हणजे पुढच्या सर्व पिढ्या सुशिक्षित हे समीकरण त्यांनी जाणले व पुण्यात बुधवार पेठेतील भिडे वाड्यमध्ये वयाच्या २१ व्या वर्षी ३ जुलै १८५१- १८५२ ला मुलीसाठी शाळा काढल्यात. सुरूवातीला फुलेंना फक्त आठ मुली मिळाल्या. मुलींना शिक्षण देण्यासंदर्भात सनातन्यांचा भयंकर विरोध पत्कारावा लागला. अनेक आरोपांना सामोरे जावे लागले.पहिल्या शिक्षिका म्हणून सावित्रीबाई मुलींना शिकवत होत्या. त्यांना आतोनात त्रास सहन करावा लागला. दगड, धोंडे शेण त्यांच्यावर फेकण्यात आले.

**अभ्यासाची उद्दीष्टे**

१. महात्मा फुले यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.
२. महात्मा फुले यांची एक समाज सुधारक म्हणून भूमिका तपासणे.
३.स्त्रिया व दलित यांच्या बद्दल महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचा मागोवा घेणे.
४. महात्मा फुले यांची शेतकरी दिनदलीत श्रमीक, पीडीत, आनाथ, विधवा, यांच्या विषयीची भूमिका तपासून पाहणे.

**गृहीतके**

१. महात्मा फुले हे समाज क्रांतीचे भारतातील पहिले जनक होते.'
२. १९ व्या शतकात शेतकरी दिनदलीत श्रमीक, पीडीत, आनाथ, विधवा,यांच्या विषयी खुप महात्मा फुले यांनी कार्य केले आहे.
३. महात्मा फुले यांनी धर्म व्यवस्थेविरूध्द व जाती व्यवस्थेविरूध्द आवाज उठविला होता.
४. महात्माफुले यांनी बहुजन समाजाला अज्ञान अंधकार अस्पृषता, गुलामगिरी यांच्या विरोधात आवाज उठविण्यास प्रवृत्त केले.

**समाजिक कार्य :**१८६८ मधील घटना. उन्हाळयाच्या दिवसात ज्योतिबा घाईघाईने चालत होते. त्यांच्या कानावर पाणी वाढा पाणी वाढा घागरभर पाणी वाढा असा आवाज ऐकू आला. तेव्हाच त्यांनी त्यांना बोलावून स्वतःच्या वाड्यातील पाण्याने तुडंब भरलेला

हौद दलीतासाठी खुला केला आणि म्हटले बंधुनो हा हौद तुमचा आहे, या हौदावर वाटेल तेव्हा आणि लागेल तितके पाणी नेत जा अशा प्रकारे सर्वप्रथम स्वतःच्या वाड्यातील पाण्याचा हौद अनुसूचित जातीच्या लोकांसाठी खुला केला व सामाजिक क्रांती केली.

**१) विधवा पुनर्विवाह :** १८६४ साली पुण्याला गोखल्यांच्या बागेत शेगावी समाजात, रघुनाथ जनार्धन व नर्मदा या दोघांचा पुर्नविवाह घडवून आणला व पुढे पुनर्विवाहाची चाल चोहोकडे हळूहळू रूढ झाली. ही एक क्रांतीकारी घटना होती.

**२) विधवा केशवपन बंदी** (विधवांचे मुंडण करणे) : फुलेंनी केशवपनावर बंदी आणून नाभिकांचा संप घडवून आणला

**३) बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :** इ.स १८६३ ला आपल्या घराशेजारी एक स्वतःच्या खर्चाने वाडा तयार केला व स्वतः पत्रके छापून – कुण्या एखाद्या स्त्रीचे वाकडे पाऊल पडल्यास तिने अर्भकाची हत्या न करता गुपचूपपणे ३९५ घर नंबरला यावे व सुखरूप बाळंतीण होऊन जावे, असे पत्रक छापून रोडच्या बाजूला भिंतीला चिपकविले होते. यामुळे ३० ते ४० मुले काळाच्या दाढेतून बचावले. याच प्रतिबंधक गृहातील काशीबाई नामक विधवेचा मुलगा यशवंत याला फुल्यांनी दत्तक घेतले म्हणून धनंजय कीर लिहतातः जोतिरावांचे बालहत्या प्रतिबंधक गृह ही भारतातील अशा स्वरूपाची पहिली संस्था होती १८५५ ला प्रौढ निरक्षर लोकांसाठी रात्रीची शाळा काढली. १८६८ ला गोविंदराव वारले तेंव्हा ज्योतिबांनी १३ व्या दिवशी आधळे पांगळे, गोरगरीब, अनाथ यांना जेवण दिले. नवीन कपडे दिले, गरीब मुलांना पाट्या पेन्सील वाटून आपल्या निरर्थक चालीरीती सर्व टाकून दिल्या. यावरून सुधारणा त्यांच्या उक्तीत व कृतीत किती भरल्या होत्या हे आपणास दिसून येते.

**महात्मा फुलेंची ग्रंथसंपदा :** महात्मा फुलेंच्या ग्रंथसंपदेचा विचार करता गुलामगिरी ब्राम्हणांचे कसब, शेतकऱ्यांचा आसूड सार्वजनिक सत्य धर्म अखंडादी काव्यरचना, तृतीयरत्न नाटक इत्यादी ग्रंथ लिहून त्यांनी समाजात जागृती आणण्याचा प्रयत्न केला.

**गुलामगिरी :** हा ग्रंथ लिहून मानवाच्या गळयातील गुलामीचा पट्टा काढण्याचा पहिला प्रयत्न त्यांनी केला.

**ब्राम्हणांचे कसब :** हा ग्रंथ लिहूनन ब्राम्हणांचे कुटिल कारस्थान लक्षात आणून दिले. वेद परमेश्वरनिर्मित नाहीत, मानवनिर्मित आहेत. हे त्यांनी या ग्रंथाच्या आधारे लोकांना सांगण्याचा प्रयत्न केला

**सार्वजनिक सत्यधर्म :** धर्म म्हणजे काय त्याचे स्वरूप समजावून सांगणारा फार महत्वाचा ग्रंथ म्हणजे सार्वनिक सत्यधर्म हा त्यांचा ग्रंथ होय.

**तृतीय रत्न :** हे नाटक लोक प्रबोधनासाठी फार महत्वाचे आहे.

**शेतकऱ्यांचा आसूड :** शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे, या भूमिकेतून फुले यांनी शेतकऱ्यांचे असूड हा ग्रंथ लिहिला आणि दिडशे वर्षापुर्वीच त्यांनी शेतकऱ्याची सहकार चळवळ सुरूवात केली. शेतकऱ्यांचे असूड हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या जागृतीचे फार महत्वाचे कार्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले. म्हणून त्यांना कृषी क्रांतीचे अग्रदूत म्हणतात. कृषी औद्योगिकरण तसेच शेतकऱ्यांच्या शोषणाविषयीचे आंदोलन, मुंबईतील गिरणी कामगाराची संघटना देवदासी, परित्यक्ता यांच्या समस्या, भटक्या विमुक्त, दलितांची चळवळ, लोकसंख्या वाढीचा शेतीवर पडणारा बोजा या सर्व गोष्टींचा विचार महात्मा फुले यांनी दिडशे वर्षापूर्वीच आपल्या लेखनातून मांडला होता.

**शिवाजी महाराजांप्रती आदर :** स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची राजगडावरील समाधी ज्योतिराव फुले यांनी शोधुन काढली व १८६७ ला छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचा जीर्णोव्दार त्यांनी केला.

शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती सांगणारा पहिला मोठा पोवाडा त्यांनीच रचला त्याच प्रमाणे देशात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी केली व छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास देशाला दाखवून दिला. तसेच सरकारी शाळातून गोरगरिबांच्या मुलांसाठी राखीव जागा ठेवल्या पाहिजेत आणि प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत व्हावे असे त्या काळाच्या सरकारला पटवून देणारा हा पहिलाच भारतीय नेता होय.

**दारूबंदी :** दारूबंदीचा विचार मांडताना महात्मा ज्योतिबा फुले यांनी त्यावेळच्या पुणे नगरपालीकेला लेखी अर्ज केला होता.' पालिकेने दारूचे परवाने रद्द करावे. लोक जागृती करताना त्यांनी म्हटले आहे की, दारू न पिता दारूचे पैसे ग्रंथांसाठी उपयोगी आणून आपल्या ज्ञानात भर घालावी

**थोडे दिन तर मद्य वर्ज्य करा तोच पैसा भरा ग्रंथासाठी**

आपल्या देशात समाजातील दुर्बल घटकासाठी सामाजिक, राजकिय व आर्थिक विकासाचा कार्यक्रम आज राबविण्यात येत आहे, पण,या सर्व गोष्टी फुल्यांनी सव्वाशे वर्षापुर्वीच आपल्या शब्दात मांडून त्यासाठी संघर्ष केला होता. म्हणून महात्मा गांधी ज्योतिरावांना दलितांचे उद्धारकर्ते, स्त्री शिक्षणाचे जनक आणि स्त्री – स्वातंत्र्याचे उदगाते शेतकरी आणि कामगारांचे पुढारी चातुर्वर्ण्य जातीभेदावर हल्ला चढवीणारा लोकनेता आणि सत्यमेव जयते हा संदेश देणारा सत्यशोधक असे म्हणून भारताचा खरा महात्मा म्हणून उल्लेख करत, फुले यांची चळवळ ही जशी वैचारिक किंवा तात्विक होती तशीच तिला कृतीयुक्त आचरणाची जोड होती. त्यांच्या विचाराला कृती चा आधार होता.

सामाजिक, आर्थिक समतेवर आधारलेला शोषण विरहित असा समाज निर्माण करण्याचे फुल्यांचे स्वप्न होते. धर्माच्या आधारे निर्माण झालेली समाज व्यवस्था नष्ट झाली पाहिजे सर्व मानव एक आहेत आणि एकत्रित आहेत, श्रेष्ठ – कनिष्ठ भेदभाव, स्त्री – पुरूष हा भेदभाव देखील नाकारून फुल्यांनी समानतेची वैचारिक जाणीव लोकांत निर्माण केली आणि हे स्वप्न साकार होण्यासाठी त्यांनी एकामागून एक अशा अनेक मुलींच्या शाळा काढल्या आणखी पुढे जावून दलितासाठी, कामगारांसाठी शाळा काढल्या. शिक्षण हे समाज प्रबोधनाचे मोठे साधन आहे. शिक्षणाने जाती, धर्म, पंथ, लिंग, वर्ण, भाषा ही मानवनिर्मित बंधने शिथल होतील व केवळ मानवता हा धर्म तयार होईल, अशी फुल्यांची अपेक्षा होती. शिक्षणाची संजीवनी तळागाळातील शुद्र आणि

अतिशुद्र बहुसंख्य समाजापर्यत सहज पोहचवू शकनार नाही याची खात्री महात्मा फुलेंना होती. म्हणूनच त्यांनी तळागळातील शिक्षकांच्या नेमणुकांचा आग्रह धरला होता हे शिक्षक समाजासाठी अहोरात्र झटून ते शिक्षण सर्वसामान्य माणसांपर्यत पोहचवतील ही ज्योतिबांची अपेक्षा होती.

आज आपण पाहतो की शिक्षकी पेशात बहुजन समाजातील व इतर शिक्षक मोठ्या प्रमाणात आहेत. आज स्वातंत्र्यानंतर च्या काळात शिक्षण सर्वासाठी खुले आहे. तरी देखील खेड्यातील तळागाळातील दलित बहुसंख्य समाज शिक्षणापासून वंचित आहे. वैचारिक दृष्ट्या फुलेंचे तत्वज्ञान आपण स्वीकारले तर आहेच, पण त्याला आपण रोजच्या व्यावहारिक पातळीवर देखील आत्मसात केले पाहिजे. सुशिक्षित बहुसंख्य समाज धर्माच्या नावाखाली परंपरांच्या जोखडात अडकून न पडता प्रगल्भ झाला पाहिजे. शंभर वर्षानंतर अंधश्रद्धेच्या गुलामगिरीचे जोखड आपण फेकून दिले पाहिजे. महात्मा फुले यांच्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज, महर्षी कर्वे यांसारख्या थोर विचारवंतानी फुल्यांची सामाजिक चळवळ जागृतठेवेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर शंभर वर्षानंतर देखींल फुल्यांना आपला गुरू मानून आपल्या कृतीशील कार्याची गुरूदक्षिण दिली. आपल्या गुरूंच्या नेत्रदीपक कार्याचे वर्णन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ग्रंथातून The Greatest Shudrs Of Modren Times या शब्दात करून त्यांच्या जीवनकार्याचा गौरव केला आहे. महात्मा फुले यांच्यासारख्या थोर विचारवंताना स्वातंत्रानंतर नीट समजून घेतले असते तर वर्तमान भारताची परिस्थिती अधिक चांगली झाली असती.पण, दुर्दैवाने आपण महात्मा फुलेंच्या विचारांना आजही स्वीकारले नाही, ही शोकांतिका आहे. महापुरूष समजून घेताना विचारांची चौकट बाजूला करून विशाल दृष्टी ठेवावी लागते. मला कार्यप्रणव करणारे गुरू ज्योतिराव फुले आहेत, असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते आंबेडकर हे महात्मा फुले यांचे खरे वैचारिक वारसदार आहेत. वयाच्या २० व्या वर्षी ज्योतिरावांनी शिक्षण सुरू करण्याचा विचार करून प्रत्यक्ष कामाला सरूवात केली. आजची तरूण पिढी मात्र कुठल्या फॅक्ल्टीला ॲडमिशन घ्यायचे याचा निर्णयदेखील घेऊ शकत नाही. सर्व साधने उपलब्ध असून सुध्दा आजच्या युवा वगार्गाकडे निर्णय घेण्याची क्षमता दिसून येत नाही. महात्मा फुलेंनी अवघ्या विसाव्या वर्षी वैचारिक मांडणी कृतीत उतरवून अनेक आघाड्यावर लढा दिला. जाती, धर्म, प्रथा ब्राम्हणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण, शेतकरी, कामगार मजूर यांची पिळवणूक या सर्व आघाड्यावर त्यांनी संघर्ष केला. म्हणूनच महात्मा फुले यांना महात्मा ही उपाधी लोकांकडून मिळाली. महात्मा फुले हे भारतीय आद्य समाज क्रांतीकारक आहेत.

**संदर्भ**

1. किर धनंजय, स,ग, मालशेः (संपादीत) महात्मा फुले समग्र वाङःमय, मुंबई.
2. किर धनंजय, : महात्मा ज्योतिबा फुले आमच्या सामाजिक क्रांतीचे जनक, मुंबई.
3. चौसाळकर अशोक : महात्मा फुले आणि शेतकरी चळवळ, पुणे.
4. नरके हरी : महात्मा फुले साहित्य आणि चळवळ

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब दलित आंबेडकरांचे साहित्याला योगदान

**दर्शना आर. चावडा**
शोध विद्यार्थी समाजकार्य भवन सौराष्ट्र यूनिवर्सिटी राजकोट।
chavdadarshana1993@gmail.com

**प्रस्तावना (Introduction) :**

दलित इतिहास का वर्तमान वास्तविक स्वरूप जानने के लिए भारत की प्राचीन जाति व्यवस्था के इतिहास पर दृष्टिपात करना आवश्यक है। यद्यपि अस्पृश्य और दलित जातियां इतिहास के हर दौर में सामाजिक विषमताओं और सामाजिक बहिष्कार, अस्पृश्यता, जातिभेद और दासता का शिकार थीं, लेकिन देश की एकता, संस्कृति, कला और आर्थिक समृद्धि में उसके बहुआयामी योगदान की महत्वपूर्ण भूमिका रही। उनके उदय और विकास, अधःपतन और जीवन संघर्ष के विषय में धर्मशास्त्रों के अतिरिक्त इतिहास में अपूर्ण अथवा अतिरंजित जानकारी मिलती है। ऋग्वेद से बौद्ध काल, बौद्ध धर्म के पतन से लेकर नवजागरण काल के भारतीय समाज के लगभग5000साल के सामाजिक इतिहास में वर्ण व्यवस्था, जाति विभेद, अस्पृश्यता और पतनशील दासता के अनेक लिखित प्रमाण बिखरे पड़े हैं।

**अर्थ (Meaning) :**

महात्मा गाँधीके अनुसार,

" किसी निश्चित स्तर के परिवार में जन्म लेने वाले सदस्य के स्पर्श मात्र से अपवित्र हो जाने की स्थिति अस्पृश्यता है | "

डॉ. भीमराव अम्बेडकर के अनुसार,

“ अस्पृश्यता का आधार गंदगी, अपवित्रता तथा छूत लग जाने की कल्पना तथा उससे मुक्त होने का तरीका व साधन है । यह एक स्थायी वंशानुगत कलंक है जो किसी प्रकार मिट नहीं सकता है ।”

**विषय विवेचन (Presentation Of Subject Matter) :**

**समान नागरिकता** :

दलित वर्ग के लोग अपनी वर्तमान आनुवांशिक गुलामी की दशा में बहुसंख्यक शासन को अपनी सहमति नहीं देंगे । बहुसंख्यक शासन लागू होने से पहले दलितों को की कुरीति से पूरी तरह मुक्ति मिलनी चाहिए । इस मामले को बहुसंख्यकों की इच्छा पर नहीं छोड़ा जाना चाहिए। दलितों को अन्य नागरिकों की तरह सभी अधिकार मिलने चाहिए।

**मौलिक अधिकार :**

भारत के सभी नागरिक कानून की निगाह में एक समान हैं और सबके नागरिक अधिकार बराबर हैं । वर्तमान समय में छुआछूत के बारे में लागू कोई भी अधिनियम, कानून, आदेश, व्याख्या या रिवाज जो किसी व्यक्ति को दंडित करता है असुविधा पहुंचाता है, अयोग्य करार देता है, या पक्षपात करता है, तो उसे नए संविधान के लागू होते ही समाप्त मानाजाएगा ।

**नागरिकता हनन का अपराध :**

यदि कोई व्यक्ति किसी व्यक्ति को, सार्वजनिक वास, लाभ, सुविधा, धर्मशाला में ठहरने के अधिकार, शैक्षिक संस्थाओं में प्रवेश, सड़क, राह, गली, तालाब, कुआ व पानी के उपयोग के अन्य स्थान, सार्वजनिक वाहन, भूमि, हवा अथवा पानी, नाट्य गृहों अथवा कला, रंगकर्म से जुड़े अन्य सार्वजनिक स्थलों के उपयोग से रोकता है, तो उसे

अस्पृश्यता के बारे में पहले से चले आ रहे शर्तों पर विचार किए बिना पांच वर्ष तक की कारावास की सजा अथवा दोनों दी जाएगी।

**भेदभाव के खिलाफ संरक्षण**

दलित वर्गों को आशंका है कि भविष्य में जो भी कानून बनाए जाएंगे या सरकारी आदेश जारी होंगे, उनमें दलितों के प्रति भेदभाव बरता जा सकता है । अतः कानूनी रूप से ऐसे उपाय किए जाएं, ताकि विधान - मंडलों या कार्यपालिकाओं के लिए भेदभाव वाले कानून बनाना असंभव हो जाएगा और जब तक यह सुनिश्चित नहीं किया जाएगा, दलित वर्ग के लोग भविष्य में बहुसंख्यकों के शासन को अपनी सहमति नहीं देंगे :

**विधान - मंडल में समुचित प्रतिनिधित्व**:

दलित वर्ग अपने हितों की रक्षा के लिए विद्यायिका और कार्यपालिका पर अपना प्रभाव डाल तकें, इसके लिए उन्हें पर्याप्त राजनैतिक अधिकार मितने चाहिए। इसके लिए चुनाव कानून में निम्नांकित चीजें जोड़ी जाएं :

(1) प्रांतीय और केंद्रीय विधान - मंडलों में पर्याप्त प्रतिनिधित्व का अधिकार,

(2) अपने ही लोगों को अपना प्रतिनिधि चुनने का अधिकार ।

**नौकरियों में पर्याप्त प्रतिनिधित्व**:

सरकारी नौकरियों में ऊंची जाति के अधिकारियों ने दलितों को बहुत सताया है । अपने अधिकारों और कानून का अपनी जातियों के हितों के लिए गलत ढंग से इस्तेमाल किया हैं । न्याय, समानता और विवेक के सिद्धांत की धज्जियां उड़ाई हैं, दलितों का भयावह शोषण किया है। इसे रोकने का एक ही उपाय है, सरकारी नौकरियों पर हिंदू सवर्णों के एकाधिकार को समाप्त करना । नौकरियों में भर्ती की ऐसी पद्धति अपनाई जाए, ताकि दलित समेत समाज के अन्य अल्पसंख्यक वर्गों के लोग भी उचित हिस्सा पा सकें ।

**पक्षपात अथवा हितों की अनदेखी का निराकरण**:

दलित जानते हैं कि आजादी के बाद सत्ता बहुसंख्यक रूढ़िवादियों के हाथ में ही होगी । दलितों को आशंका है कि ये बहुसंख्यक उनके साथ न्याय नहीं करेंगे । इस तथ्य पर भी ध्यान देना चाहिए कि दलितों को चाहे जितना प्रतिनिधित्व दे दिया जाए, वे सभी विधान-मंडलों में अल्पसंख्या में ही रहेंगे । दलित चाहते हैं कि संविधान में ऐसी व्यवस्था की जाए, ताकि उनके साथ पक्षपात या उनके हितों की अनदेखी न होने पाए ।

**विशेष विभागीय देखभाल**:

दलितों की वर्तमान दुर्दशा के लिए बहुसंख्यक रूढ़िवादी ही जिम्मेदार हैं । ये किसी भी हालत में दलितों को अपने बराबर नहीं आने देंगे । यह कहना ही काफी नहीं है कि दलित बहुत गरीब हैं, भूमिहीन हैं, इस तथ्य को दृष्टिगत रखना चाहिए कि दलितों की दयनीय आर्थिक स्थिति का कारण यह है कि जीवन-यापन के सारे रास्ते उनके लिए बंद हैं और यह सब सामाजिक पूर्वाग्रहों के कारण हैं । यह एक ऐसा तथ्य है, जो दलितों को अन्य सामान्य जातियों के श्रमिकों से अलग करता है । इसके चलते कई बार दलितों और अन्य निचली जातियों के बीच संघर्ष की नौवत तक आ जाती हैं, दलितों पर तरह-तरह के भयावह अत्याचार किए जाते हैं । दलितों में इतनी क्षमता नहीं है कि वे अपने लिए बचाव का रास्ता ढूंढ सकें । पुरे भारत में दलितों पर कैसे-कैसे अत्याचार किस-किस तरह किए जाते हैं ।

**दलित वर्ग और मंत्रिमंडल**:

दलितों ने अपने हितों की रक्षा के लिए विधान - मंडल में प्रतिनिधित्व मांगा है । सरकार पर अपना प्रभाव डालने के लिए जितना जरूरी यह है, उतना ही आवश्यक है नीति - निर्धारण में उनकी हिस्सेदारी । यह तभी संभव है जब किसी दलित को मंत्रिमंडल में स्थान मिले । दलितों की मांग है कि अन्य अल्पसंख्यकों की तरह दलितों का भी मंत्रिमंडल में प्रतिनिधित्व होना चाहिए । यह दलितों का नैतिक अधिकार है । दलितों का प्रस्ताव है कि गवर्नर या गवर्नर जनरल मंत्रिमंडल में दलितों का प्रतिनिधित्व सुनिश्चित करें । यह उनकी जिम्मेदारी होगी।

**निष्कर्ष (Conclusions):**

डॉ. बाबा साहेब अम्बेडकर मौलिक अधिकार ओर समान नागरिकता का अधिकार दिलवाया। नागरिकता हनन का अपराध ओर भेदभाव के खिलाफ संरक्षण का अधिकार दिलवाया।प्रांतीय और केंद्रीय विधान - मंडलों में पर्याप्त

प्रतिनिधित्व का अधिकार, अपने ही लोगों को अपना प्रतिनिधि चुनने का अधिकार प्राप्त हुआ । द्लित के लिए नौकरियों में पर्याप्त प्रतिनिधित्व ओर पक्षपात अथवा हितों की अनदेखी का निराकरण किया ।दलित वर्ग और मंत्रिमंडल ओर विशेष विभागीय देखभाल सभी बाबत पर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित योगदानदिया है

**संदर्भ (Reference)**:


1. चंचरिक कन्हैयालाल, महात्मा ज्योतिबा फुले, भारत सरकार का प्रकाशन।
2. डॉ. सत्यनारायण, डॉ.बाबा साहिब अम्बेडकर पृ.116
3. डॉ. बाबा साहेब अम्बेडकर, स्पीन्चैज एंड राइटिंगस, वाल्यूम, पृ.126
4. डॉ. बाबा साहेब अम्बेडकर, राइटिंग्स एंड स्पीचेज, खंड - 10, पृ.11
5. डॉ. बाबा साहेब अम्बेडकर,ग्रीवेंसेज ऑफ दी शिडयूल्ड कास्ट्स - मेमोरेंडम सबमिटेड टू दि गवर्नर जनरल ऑफ इंडिया, (डॉ. बाबा साहेब अम्बेडकर राइटिंग्स एंड स्पीचेज, खंड 10, पृ. 400-442 में संदर्भ हेतु उपलब्ध)

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही . एक चिंतन

**प्रा. बैनवाड स्वाती प्रकाशराव**
राज्यशास्त्र विभाग रामकृष्ण परमहंस महाविदयालय उस्मानाबाद.

**प्रस्तावना :—**

भारतीय लोकशाही ही आज जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. जगात जवळपास सर्वच शब्दांनी लोकशाहीचा स्विकार केलेला दिसून येतो. लोकशाहीची संकल्पना जरी आधुनिक अर्थाने वापरली असली तरी त्याचा पाया अत्यंत प्राचीन आहे. इंग्लंडला संसदीय लोकशाहीची जननी म्हणून ओळखले जाते. इंग्लंडमध्ये पारीत करण्यात आलेल्या मॅग्नाचार्टा सनदेने इंग्लंडमधील लोकांना अधिकार देण्यात आले व त्यानंतर बिल ऑफ राईटस पारित करण्यात आले. बिल ऑफ राईटसला तर इंग्लंडच्या राज्यघटनेचे बायबल म्हटले जाते. १६८८ ला इंग्लंड मध्ये रक्तविहिन क्रांती झाली व लोकशाही अस्तित्वात आली. जॉन लॉक या उदारमतवादी विचारवंताने सर्वप्रथम प्रतिनिधिक शासन असावे ही संकल्पना मांडली त्याच्या आधीच्या कालखंडात ''दैवी सिध्दांत '' अस्तित्वात होता. ज्यामध्ये राजा हा जनतेला जबाबदार न राहता तो ईश्वराला जबाबदार होता परंतु लॉक ने दुहेरी करार सांगितला व राज्यकर्ता जनतेला जबाबदार असतो व त्याचबरोबर त्याने नैसर्गिक अधिकाराची संकल्पना मांडली व नैसर्गिक अधिकाराचे रक्षण करणे हे राज्यकर्ते कर्तव्ये सांगितले.

मॉटेस्क्युने ''स्पिरिट ऑफ लॉज'' या ग्रंथात सत्ताविभाजणाचा सिध्दांत मांडला व लोकशाहीला आधार मिळाला. सत्ता विभाजणाच्या तत्वात कायदेमंडळ कार्यकारीमंडळ व न्यायमंडळ यांचे अधिकार व जबाबदा—या सांगण्यात आल्या. शासनाची ही तिन्ही अंगे एकमेकापासून स्वतंत्र असली पाहिजेत आज जगातील जवळपास अनेक राष्ट्रांत हे सत्ताविभाजनाचे तत्व स्विकारलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही लोकशाही सांगताना ती जबाबदार असावी असे मत मांडले भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारतात शासनाची कोणती पध्दत असावी यावर भरपूर चर्चा झालेली आहे व त्यातुन भारतात संसदीय लोकशाही असावी से ठरवले गेले. डॉ. बाबासाहोब आंबेडकर यांनी संविधान लिहिताना देखील लोकशाहीचा विचार केला. लोकशाही ही केवळ विचार प्रणाली नसुन ती जीवन जगण्याची प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीत समानता या तत्वाला प्रथम प्राधान्य होते. लोकशाही ही संकल्पना भारतासाठी एकदम नवीन नाही प्राचीन वैदिक ग्रंथात देखील सभा आणि समित्यांचा उल्लेख आहे. वैदिक काळानंतर देखील भारतात अनेक राज्यात गणराज्ये अस्तित्वात होती. वैशाली कपिलवास्तु अशा नगरांचा कारभार देखील लोकशाही पध्दतीनेच चालत होता. चोला राजवटीत तर कांचिपुरुम जिल्हयात लिखित राज्यघटना, ग्रामसभा, निवडणुक पध्दती या बाबतचे पुरावे अस्तित्वात आहेत. जैन,बौध्द, वाडमयात देखील या पध्दतीचा उल्लेख दिसुन येतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात देखील या प्रणालीचा उल्लेख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याचा विचार करुनच लोकशाही संकल्पना स्विकारली आहे. प्रस्तुत शोध निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विषयक संकल्पनेचा विचार करण्यात येणार आहे.

**उदिदष्टये**

१) लोकशाहीची संकल्पना समजावून घेणे.
२) लोकशाहीचा समाजावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला आहे. त्यात विविध संदर्भ ग्रंथ, मासीक, वृत्तपत्रातील लेख यांचा समावेश करण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाहीची संकल्पना :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे लोकशाहीचे खंदे समर्थक होते, लोकशाही हा केवळ शासन प्रकार नसुन ती एक जीवन जगण्याची पध्दत आहे यावर त्यांचा विश्वास होता. ज्याप्रमाणे अब्राहम लिंकन यांनी लोकशाहीची व्याख्या केली, '' लोकांनी, लोकांसाठी लोकांकरिता चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय'' त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लोकशाहीची व्याख्या पुढिलप्रमाणे केलली आहे. '' लोकशाही हा शासनाचा असा प्रकार व पध्दत आहे जिथे कोणत्याही रक्तपाताशिवाय लोकांच्या जीवनात आर्थिक व सामाजिक क्रांतीकारक परिवर्तन घडून येते.''

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीत समानता या तत्त्वाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे कारण आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे लोकशाही हे साधन आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाहीच्या व्याख्येतुन ते स्पष्ट होते. त्याचबरोबर त्यांच्या व्याख्येतुन ते स्पष्ट होते. त्याचबरोबर त्यांच्या व्याख्येतुन हे ही स्पष्ट होते की ते हिंसेचे समर्थन करित नाहीत ज्याप्रमाणे मार्क्सवादी सत्तांतरासाठी हिंसेचे समर्थन करतात त्याप्रमाणे त्यांच्या दृष्टिकोन नाही. त्यांच्या मते समाजात बदल हा परिवर्तनाच्या मार्गातून होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाही स्विकारताना संसदीय लोकशाहीचा स्विकार करतात. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शासनप्रणाली ही जबाबदार हवी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा लोकशाीचा विचार करीत होते तेव्हा त्यांनी अमेरिका व इंग्लंड या दोन्ही देशाच्या लोकशाहीचा विचार केला अमेरिकन लोकशाहीतील अध्यक्षीय पध्दत व

इंग्लंडमधील संसदीय लोकशाहीची तुलना केलेली आहे. व भारतासाठी कोणता पर्याय योग्य व आवश्यक आहे याचा विचार केला. त्यातुन अमेरिकन अध्यक्ष हा संसदेला जबाबदार राहुन कार्य करीत नाही. तर या उलट इंग्लंडमधील संसदीय लोकशाही ही अधिक जबाबदार असलयाचे दिसुन येते. त्यातुन त्यांनी जबाबदार शासनाचा विचार केला. त्याचबरोबर त्यांनी लोकशाही जर यशस्वी करायची असेल तर प्रबळ व सशक्त विरोधी पक्ष असला पाहिजे यांचा सुध्दा विचार केलेला आहे. कारण शासनालाप्रश्न विचारणा करणारा वर्ग असला पाहिजे संसदीय लोकशाहीत हे गुण असल्याचे त्यांच्या लक्षात आले. भारतात लोकशाही स्विकारण्याचे असुन एक कारण म्हणजे त्यांना देशात सामाजिक समता आणायची होती कारण समानता नसेला तर कोणत्याही अधिकारांना अर्थ उरत नाही, मुलभूत हक्क सांगताना देखील त्यांनी लोकशाही शासनाची आवश्यकता सांगीतली होती कारण शासन जर लोकशाही मुल्यावर चालत असेल तर ते आपल्या नागरिकांना मुलभूत हक्क देते. म्हणूनच जेव्हा त्यांनी भारताची राज्य घटना लिहिली तेव्हा त्यात त्यांनी मूलभूत हक्कांचा अंतर्भाव केला.

लोकशाहीमध्ये न्यायालयीन स्वातंत्र्याच्या सुध्दा विचार केला. मुलभूत हक्क सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनात्मक उपायांचा अधिकार देखील सांगितला आहे ऐवढेच नाही तर घटनात्मक उपायांच्या अधिकाराला ते राज्यघटनेचा आत्मा म्हणतात. फ्रेंच राज्यक्रांती मधुन ती मुल्ये बाहेर पडली त्यात न्याय या घटकाला देखील खुप महत्त्व होते. मूलभूत हक्क सांगताना लोकशाहीमध्ये जी जनता आहे त्यांच्यासाठी मूलभूत कर्तव्ये देखील सांगितली आहेत कारण लोकशाही जर यशस्वी करायची असेल तर लोकसुध्दा तितकेच जबाबदार असले पाहिजेत त्यांच्यामते देशातील लोक हे सुजाण व जागरुक असले पाहिजे कारण लोकमताद्वारे प्रभावीपणे शासन संस्था नियंत्रीत करता येते. लोकशाही हे सामाजिक समतेबरोबरच आर्थिक समता आणण्याचे एक प्रभावी साधन आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. लोकशाही संदर्भात पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की लोकशाही हा शासनाचा असा प्रकार आहे की जिथे अल्पसंख्यांकाच्या हिताचे रक्षण केले जाते. अल्पसंख्यांक व्यक्तीला जिथे सुरक्षीत वाटले पाहिले बहुसंख्याकाकडून त्यांच्या हिताला कुठल्याही प्रकारची बाधा होणार नाही याची शाश्वती देणारे शासन म्हणजे लोकशाही होय.

लोकशाहीमध्ये राज्यकर्ता हा घटक सर्वात महत्त्वाचा आहे कारण ख—या अर्थाने राजकीय विचार राज्यशास्त्रात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्यकर्ता कसा असावा व राज्यकारभार कोणत्या सुत्राने चालावा हेच महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीकोणातून विचार केल्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील राजयकर्त्यांचा विचार केलेला दिसुन येते. त्यांचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वे होय. मार्गदर्शक तत्वे सकारात्मक आहेत कारण यामध्ये राज्याने काय करावे ते सांगितले आहे देशात सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वांचा विचार केला गेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेउत्रडकर यांनी सामाजिक लोकशाहीची संकल्पना मांडली होती. कारण सामाजिक बदला शिवाय लोकशाही यशस्वी होवु शकत नाही.

**निष्कर्ष :—**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाहीत समानतेला स्थान दिल्याचे दिसुन आले.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे हिंसेला स्थान दिलेले नाही.

३) संविधानाचे लेखन करत असतानाच त्यांचा गाभा लोकशाहीचा आहे.

४) लोकशाही स्विकारण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांना सामाजिक संस्था मध्ये समता आणावयाची असल्याचे दिसुन आले.

**सारांश :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, लोकशाही ही जीवन जगण्याची पध्दत आहे. आज जर भारतातील लोकशाही अवस्था बघितली तर ती पुर्णत : उलट झाली आहे. कारण लोकशाही यशस्वी करण्याच्या अटी त्यांनी सांगितल्या होत्या. त्या आज कुठेतरी कमी पडताना दिसुन येत आहेत. परंतु असे असले तरी आज जे राज्यकर्त्यांवर नियंत्रण व जबाबदारीची थोडीफार जाणीव उरली आहे ती त्यांनी सांगितलेल्या लोकशाही विचारांमुळे व त्यांनी लिहिलेल्या संविधानामुळे शक्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**

१) प्रा. बिराजदार दिगंबर डी, **पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत,** क्रिएटिव्ह पब्लिकेशन नांदेड प्रथमावृत्ती १ मे २०११

२) प्रा. डॉ. नांदेडकर व. गो. **राजकीय विचार आणि विचारवंत डायमंड पब्लिकेशन्स,** पुणे प्रथमावृत्ती जानेवारी २०११

३) डॉ. दाते सुनिल डॉ. ढोबळे रमेश **प्रमुख राजकीय विचार प्रणाली** विदयाबुक्स पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद दुसरी आवृत्ती जून २००९.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा ज्योतिबा फुले - सत्यशोधक चळवळ एक सामाजिक क्रांती

**डॉ. सुभाष लक्ष्मण म्हात्रे**
वसंतराव नाईककला व वाणिज्य महाविद्यालय मुरुड-जंजिरा,जि.रायगड
subhashmhatre66@gmail.com

**iLrkouk**
भारतामध्ये इंग्रजी सत्तेची झालेली स्थापना हि भारतातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण घटना होती. ब्रिटीश सत्ता विस्तार करीत असताना आपल्या शासन व्यवस्थेत नवीन सुधारणा व धोरणांचा अवलंब करण्यास सुरुवात केली होती. शिक्षण पद्धती, न्याय व्यवस्था, कर पद्धती या क्षेत्रात अभूतपूर्व बदल घडवून आणले होते. त्यामुळे मध्ययुगीन राजवटीखाली पारंपारिक जीवन जगणाऱ्या भारतीय समाजाला हा बदल सुखद वाटला. भारतीय समाजात अनेक वर्षापासून चालत आलेल्या अनिष्ट रूढी, परंपरा, धर्मभोळेपणा, यांना विरोध करण्यासाठी इंग्रजांच्या अनुकरणाची भारतीयांना आवश्यकता वाटू लागली. त्यातूनच सामाजिक व धार्मिक चळवळीना प्रारंभ झाला. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात जे मन्वतर घडून आले. त्यालाच प्रबोधन म्हणून ओळखले जाते. प्रबोधन म्हणजे वैचारिक जागृती होय. इंग्रजी शिक्षणामुळे तरुणांमध्ये जागृती निर्माण झाली होती. हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा, अंधश्रद्धा या गोष्टींमुळे हिंदू धर्माचा ऱ्हास होत आहे. याची खात्री तरुण वर्गाला पटली होती. या सुधारकांमध्ये दादोबा पांडुरंग तखर्डकर, राजाराम मोहन रॉय, न्या. रानडे, मा. ज्योतीराव फुले, बाळशास्त्री जांभेकर भाऊ महाजन अशी अनेक नवे घेता येतील. त्यांनी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध संस्था स्थापन केल्या.

**सत्यशोधक समाज**:- सत्यशोधक समाजाची स्थापना महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक क्रांतिकारक घटना मानली जाते. क्रांतीची जन्म नेहमी दारिद्र्याच्याच पोटी होत असतो. महात्मा ज्योतिबा फुले यांनी शालेय जीवनात जातीयतेचा दाहक अनुभव घेतला होता. एका ब्राम्हण मित्राने त्याच्या विवाहाचे आमंत्रण दिले. त्या आमंत्रणाला मान देवून ज्योतिबा विवाहास गेले. मिरवणुकीत चालत असताना सनातनी ब्राम्हणांनी जोतीरावांना विरोध केला. मिरवणुकीतून घरी परतल्यावर फुल्याना काटे रुतल्याच्या वेदना होत होत्याच. तसेच डोक्यात वादळ घोगावत होते. हा अपमान व अन्याय सहन करायचा कि, त्या विरुद्ध बंद करायचा या विचाराने त्यांच्या मनात एक वादळ निर्माण झाले होते. पुन्हा अपमान माझा नाही. तर वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गाचा आहे असे फुलांना वाटले. वरील प्रसंगामुळे व्यथित झालेल्या फुलांना सामाजिक विषमतेची जाणीव झाली व सामाजिक परिवर्तन चळवळी सुरुवात केली. बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज या संस्थेची पुणे येथे स्थापना केली. यावेळी ज्ञानगीरबुवा, धोंडीराम कुंभार, ग्यानोबा झगडे, रामचंद्र भालेकर, तुकाराम पिंजण यांच्यासह महाराष्ट्रातून साथ कार्यकर्ते उपस्थित होते.

**उद्देश**:-

१) शुद्र आणि अतिसुद्र यांची ब्राम्हण पुरोहितांकडून होणारी पिळवणूक बंद करणे.
२) बहुजन समाजाला मानवी हक्काची अधिकाराची शिकवणूक देणे.
३) ब्राम्हणी शास्त्रांच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे.

**तत्वज्ञान** :-

१) ईश्वर एकचअसून तो निर्गुण निरागस आहे.
२) आपण सार्वजन एकाच परमेश्वराची लेकरे आहोत.
३) परमेश्वराची भक्ती किंवा प्रार्थना करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे.
४) पुरोहित किंवा धर्मगुरूंच्या मध्यस्थीशिवाय परमेश्वराची भक्ती करता येते.
५) मनुष्य जातीने नव्हे तर गुणांनी श्रेष्ठ ठरतो.
६) कोणत्याही धर्मग्रंथ ईश्वर निर्मित नाही. सर्व धर्मग्रंथाची निर्मिती मानवानेच केली आहे.

सत्यशोधक समाजाचे सभासदत्व सर्व जाती धर्माच्या लोकांना खुले होते.

कार्ये :- महात्मा ज्योतीराव फुलेंनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाने सामाजिक जीवनात अतिशय मोलाची कामगिरी केली. समाजामध्ये अंधश्रद्धा आंनी धर्मभोळेपणा वाढलेला होता. याला पायबंध घालण्यासाठी लोकांनी धार्मिक विधी पार पडण्यासाठी ब्राम्हण, पुरोहितांना पाचारण करू नये. यासाठी चळवळी केल्या सत्यशोधक

सामाज्याने पुरोहिताशिवाय विवाह लावण्याचा सपाटा सुरु केला. कारण पूजेच्या वेळी व विवाहाच्या वेळी पुरोहित आपल्या हिताच्या दृष्टीने लागणारे साहित्य आणावयास सांगत असे. कार्यक्रम झाल्यानंतर पुरोहित हे सर्व साहित्य आपल्या घरी घेऊन जात असे. त्यामुळे बहुजन समाजाची एकप्रकारची फसवणूक केली जात असे. धर्मभोळेपणा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता.

सत्यशोधक चळवळीत शिक्षण हेच सामाजिक सुधारणांचे आणि प्रगतीचे लक्षण मानले होते. समाज समृद्ध व बलवान होण्यासाठी बहुजन समाजाला शिक्षण मिळायला पाहिजे असे. जोतीबाना वाटत होते. सत्यशोधक समाजाने शिक्षण प्रसाराचे महान कार्य केले. समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांनी बहुजन समाजाच्या मुलांपर्यंत शिक्षण पोहचवले होते. शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले होते. त्यासाठी गरजू व पात्र विद्यार्थ्यांनाशिष्यवृत्त्या देवून प्रोत्साहन दिले. खेड्यातील बहुजन समाज विशेषतः शेतकरी शिक्षण घेऊ शकत नाही. ते निरक्षर आहेत. त्यामुळे सगळया व्यवहारात त्यांची फसवणूक होते. धार्मिक भोळया स्वभावामुळे घामाने मिळवलेला पैसा अनाठाई खर्च होतो. या परिस्थितीत बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण प्रसारासचे कार्य केले होते. त्याकाळात स्त्रियांची परिस्थिती अतिशय विदारक होती. पती पत्नी हि संसार रुपी रथाची दोन चाके आहेत. तरी पण पुरुषी अहंकाराने स्त्रियांवर अनेक बंधने लादली होती. सर्व प्राण्यांत मनुष्य श्रेष्ठ आणि माणसात स्त्री श्रेष्ठ अशी ज्योतीबांची धारणा होती. म्हणून जोतिबांनी स्त्री शिक्षणाकडे लक्ष दिले जात होते. सावित्रीबाईंना शिकवून शिक्षिका म्हणून नेमले. विधवा स्त्रियांना सन्मानाने जगता यावे यासाठी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले. कोणत्याही देशाचा खरा विकास शेतकरी वर्गावर अवलंबून असतो. जर शेतकरी वर्गाचा विकास झाला तर देशाच्या विकासात भर पडते. महाराष्ट्रातील शेतकरी वर्ग अज्ञानी व कर्जबाजारी होता. महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथात शेतकऱ्यांचा दयनीय स्थितीचे वर्णन करून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडली. त्यांनी ब्रिटीश सरकारकडे शेतकऱ्यांच्या मुलांसाठी वसतिगृहे स्थापन करावी. व्यवसाईक शिक्षण सुरु करावे इत्यादी मागण्या केल्या. सावकार व जमीनदार यांच्याकडून होत असलेल्या पिळवणूकिविरुद्ध महात्मा ज्योतिबा फुलेंनी चळवळी सुरु केल्या. चळवळीच्या माध्यमातून गरीब व अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला होता.

सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते शेतकऱ्यांना जागृत करण्यासाठी शेतावर जावून शेतकऱ्यांबरोबर त्यांच्याच बोली भाषेत संवाद साधत असत. महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज रचनेत तमाशा हा लोककलेचा प्रकार लोकप्रिय होता. तमाशाच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणत असत. याशिवाय अभंग, ओव्या, पोवाडे, आरती, नाटक, यांच्याव्दारे समाज प्रबोधन करण्यात येत असे. रासेच शेतकऱ्यांचे मेळावे भरवून समाज प्रबोधन घडवून आणले होते. महात्मा फुल्यांच्या निधनानंतर (१८९०) अत्यशोधक चळवळ त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी सांभाळली होती. तरीही काही काळ सत्यशोधक समाजाच्या कार्याला आहोटी लागली. परंतु १९११ नंतर कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी चळवळीला गती आणली. शाहू महाराजांच्या प्रेरणेने कोल्हापूर, पुणे, सातारा, नाशिक, सोलापूर इत्यादी थिकनी सत्यशोधक समाजाच्या शाखा उघडून ब्राम्हण, पुरोहित, सावकार यांच्या विरोधात आवाज उठवून त्यांचे फसवणुकीचे कृत्य उजेडात आणले होते.सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन घडवून आणले होते. कृष्णाजी पांडुरंग भालेकर यांनी पुण्यात १८७७ मध्ये दीनबंधू हे पत्र सुरु केले होते. १८८० मध्ये नारायण लोखंडे यांनी दिनबंधूमुंबईहून प्रसिद्ध केले होते. भारताला स्वातंत्र्याच्या उंबरठ्यापर्यंत आणून सोडण्याचे काम वृत्तपत्रांनी केले होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत सत्यशोधक चळवळीने वृतपत्रे काढून सामाजिक व राजकीय जागृती करण्याचा प्रयत्न केला होता. महाराष्ट्रात वेगवेगळया सामाजिक चळवळी होत्या. त्यापैकीच सत्यशोधक चळवळ होती इतर चळवळीपेक्षा हि वेगळी चळवळ होती. सत्यशोधक चळवळ कोणत्याही धर्मविरुद्ध व ब्राम्हणांविरुद्ध नव्हती. तर ब्राम्हणांमधील वाईट प्रवृत्तीस विरोध केला होता. सत्यशोधक चळवळीने महाराष्ट्रातील बहुजन समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. बहुजन समाजाला अतिशय गौण स्थान होते. या समाजाच्या यांतनांचीदाखल कोणी घेतली नव्हती. अशा उपेक्षित समाजाच्या वेदना जाणून बोलक्या करण्याचे कार्य सर्व प्रथम महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले. या चळवळीने वरवरच्या सुधारणांवर समाधान न मानता महाराष्ट्रात अमुलाग्रह परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला. जोपर्यंत विषमतेवर आधारित असलेली समाज व्यवस्था बदलत नाही. तोपर्यंत उपेक्षित समाजाच्या  न्याय मिळू शकणार नाही. अशी चळवळी मागणी भूमिका होती. सत्यशोधक समाजाचे कार्यकर्ते ब्रिटीशांशी एकनिष्ठ राहण्याची जरी शपथ घेत असले तरी त्यांनी ब्रिटीशांच्या अन्यायकारक धोरणाला विरोध केला होता. ब्रिटीशांना विरोध करून राष्ट्रीय जागृतीला हरभर लावला होता. रासेच स्वाभिमान, आत्मसन्मान, निर्माण करण्याचे महान कार्ये सत्यशोधक चळवळीने केले आहे.

**संदर्भ सूची :-**

१) कीर धनंजय - महात्मा ज्योतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, १९६८ पान नं १९
२) बोरकर पप्रविण - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, १८४८ - १९६०, हिमालय पब्लिशिंग हाउस , वर्ष २०११, पान नं ३८
३) भामरे जितेंद्र - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास १८४८-१९६०, सेठ प्रकाशन, मुंबई, २०१२, पान नं ३९
४) डॉ. सावंत उत्तम - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास १८१८-१९७५, निर्मल प्रकाशन नांदेड, २००५ पान नं ७१
५) डॉ. रोडे सोमनाथ - आधुनिक भारत, १८१८ - १९७५, पिंपळपुरे अन्ड कं पब्लिशर्स, नागपूर, १९९८, पान नं १०१
६) बोरकर प्रविण - आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास १८४८ - १९६० हिमालय पब्लिशिंग हाउस, वर्ष २०११ पान नं ३९.
७) डॉ. पवार जयसिंगराव -राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर २००७ पान नं १४०
८) कीर धनंजय - महात्मा ज्योतीराव फुले, पॉप्युलर प्रकाशन मुंबई १९६८ पान नं २६३

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुलेंचे शेतीविषयक विचार

**डॉ. आढाव अनिता सदाशिव**

न्यू आर्टस, कॉमर्स & सायन्स कॉलेज, शेवगाव,ता.शेवगाव, जि.अहमदनगर.

**प्रास्ताविक :**

विसाव्या शतकातील विविध साहित्यप्रवाहांचा विचार करताना त्या प्रवाहांचा प्रारंभबिंदू म्हणून महात्मा फुले यांचा निर्देश करावा लागतो. त्यांच्या लेखनातून,कार्यातून अनेक बाबी समाजाच्या चिंतनाचा विषय झाला आहे. समाजातील अस्पृश्य वर्ग असो, शेतकरी असो; म्हणजेच शोषित आणि सामान्य माणूस महात्मा फुलेंच्या चिंतनाचा विषय होता. त्यातली त्यात दलित, शेतकरी आणि स्त्री हे महात्मा फुलेंच्या चिंतनविश्वाचे महत्त्वाचे घटक की जे नंतरच्या कालखंडातही चर्चेचे विषय ठरले आहेत. खरेतर सामान्य माणसाच्या मुक्तिसाठी जे-जे आवश्यक वाटले ते-ते त्यांनी निष्ठेने आणि झपाटून केले. महात्मा फुलेंचा जीवनपट अनेकविध घटकांनी भरलेला आहे. त्यांना ज्या गोष्टी खटकत होत्या, अन्यायकारी वाटत होत्या त्याविषयी त्यांनी आवाज उठविला. ज्या गोष्टींचा त्यांच्या मनाने ध्यास घेतला होता त्या गोष्टींसाठीच त्यांनी लेखन केलेले दिसते. त्यामुळेच त्यांचे सामाजिक कार्य आणि लेखन यात विलक्षण साम्य आहे. त्यांच्या लेखनाच्या प्रेरणाही समकालीन लेखनापेक्षा भिन्न आहेत. मराठी साहित्यातील स्त्रीवादी, दलित, ग्रामीण प्रवाहांचा विचार करता ही सुरुवातच महात्मा फुलेंनी केली असे वाटते.

'शेतकऱ्याचा असूड' मधील शेतकऱ्याची स्थिती: शेतकरी हाच या देशाचा पोशिंदा आहे या ठोस भूमिकेतून महात्मा फुलेंनी 'शेतकऱ्यांचा आसूड' लिहिला.

विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली,
नीतिविना गती गेली, गती विना वित्त गेले,
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एक अविद्येने केले.

शेतकऱ्यांची स्थिती दैन्यावस्थेला जाण्याची अनेक कारणे आहेत. त्यातील एक म्हणजे अविद्या होय. अज्ञान धर्मभोळेपणा आणि गुलामीची वृत्ती यामुळे शेतकऱ्याला अन्यायाचा प्रतिकार करण्याची जाणही येत नाही. मग अशा शेतकऱ्यांनी विद्या संपादन केल्याशिवाय त्यांच्या मुक्तीचा मार्ग खुला होणार नाही, असे महात्मा फुले प्रतिपादन करतात. त्या कालखंडामध्ये ब्राह्मण, पुरोहित, सावकार व नोकरशाही यांच्या शोषणामुळे शेतकरी जर्जर होत जात राहिला. गावामध्ये शेतकरी, बलुतेदार आणि पाटील हे सर्वच अडाणी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या हिशोबामध्ये झालेली लबाडी कोणाच्या लक्षात येत नव्हती. खरे तर शेतकऱ्यांमध्ये जागृती करण्याच्या हेतूनेच महात्मा फुलेंनी १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा असूड'चे लेखन केले. मात्र हा ग्रंथ महात्मा फुलेंच्या हयातीत प्रकाशित झाला नाही. प्रा.हरि नरके म्हणतात त्याप्रमाणे हा ग्रंथ या देशातील मध्यम आणि कनिष्ठ स्तरातील शेतकऱ्यांची असलेली पशुपेक्षाही दयनीय अवस्था, आकाशाला गवसणी घालणाऱ्या समस्या आणि त्यांची स्थिती सुधारण्यासाठी अमलांत आणणारे उपायांची 'कृषि गाथा' आहे. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात त्याप्रमाणे "'इशारा' आणि 'शेतकऱ्यांचा असूड' हे ग्रंथ म्हणजे शेतकऱ्यांच्या दु:ख स्थितीचे अत्यंत परिणामकारक चित्रण करणारे प्रदीर्घ निबंध आहेत."१

**शेतकऱ्यांच्या दु:स्थितीची कारणे**: शेतकऱ्यांच्या दु:स्थितीची कारणमीमांसा करतांना समकालीन जीवनामध्ये त्यांना काही करणे सापडतात. त्यातील अत्यंत महत्वाचे कारण म्हणजे शेतकऱ्यांची विद्याहीनता आणि याचा फायदा घेणारे ब्राह्मण होय. खरे तर कुठल्याही प्रकारची विद्या नसल्यामुळे पुरोहित सांगतील तोच आपला धर्म असे शेतकऱ्यास

वाटते. याचा फायदा पुरोहित वर्ग त्याचे वाटेल तसे शोषण करतो.'शेतकऱ्याचा असूड'च्या पहिल्या प्रकरणातच ते म्हणतात, 'सरकारी सर्व खात्यांनी ब्राह्मण कामगारांचे प्राबल्य असल्यामुळे त्यांचे स्वजातीय स्वार्थी की भट ब्राह्मण आपले मतलबी धर्माचे मिषाने अज्ञानी शेतकऱ्यांस इतकें नाडितात की, त्यांस आपली लहान चिटकुली मुलें शाळेंत पाठविण्याची साधने रहात नाहींत व एकाद्यास तसे साधन असल्यास यांच्या दूरूपदेशाने तशी इच्छा होत नाही.'२ याच प्रकरणात महात्मा फुले सांगतात की, शेतकरी जन्मास येण्यापूर्वीच म्हणजे त्याच्या आईस ऋतू प्राप्त झाल्यानंतर तिच्या गर्भधानाधी संस्कारापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत कित्येक गोष्टींनी त्याला हा पुरोहित लुटत असतो. वर्षातील चैत्र महिन्याच्या प्रतिपदेस भटब्राह्मण शेतकऱ्याकडून दक्षिणा घेण्यास सुरुवात करतात तर प्रत्येक महिन्यातील सण,उत्सव समोर ठेवून हे ब्राह्मण लोकं शेतकऱ्यांची वाटच लावतात. मग जेजुरी यात्रा असेल, आषाढी एकादशी असेल, पंढरपूरमध्ये चंद्रभागेतील स्नान असो, की नागपंचमीच्या निमित्ताने "नागदक्षिणा समर्पयामि" म्हणून दक्षिणा उकळतच असतात. बरे प्रतिवर्षी येणाऱ्या सणांशिवाय अमावस्या, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण, ग्रहांचे उलटे-पालटे संबंध अशी नानाप्रकारची दाने गोळा करत हा ब्राह्मणवर्ग शेतकऱ्यांना लुटतच असतो. यातूनही आणखी पुढे म्हणजे हे पुरोहित शेतकऱ्यांना बदरीकेदार काशीप्रयाग वगैरे तीर्थयात्रेच्या नादी लावून त्यांना हजारो रुपयास बुडवितात. शेतकऱ्याच्या मरणानंतरही त्यांच्या मुलाकडून विविध प्रकारची दाने घेतात. या सर्व अवदेशेचे मूळ कारण म्हणजे महात्मा फुले सांगतात की शेतकऱ्यांना अज्ञानी ठेवून विद्या न देणे होय. महात्मा फुले म्हणतात की ब्राह्मण वर्गापैकीच सरकारी कार्यालयामध्ये पसरलेला कर्मचारी वर्गही लुबाडतच होता. 'शेतकरी असुड'च्या दुसऱ्या प्रकरणात ते म्हणतात की, "सरकारी अधिकारी हे बहुतकरून ऐषआरामांत गुंग असल्यामुळेच शेतकऱ्यांचे वास्तविक स्थिती बद्दल माहिती करून घेण्यापुरती सवड होत नाही व या त्यांच्या गाफीलपणाने एकंदर सर्व सरकारी खात्यात ब्राह्मण कामगारांचे प्राबल्य असते. या दोन्ही कारणांमुळे शेतकरी लोक इतके लुटले जातात की, त्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्रही मिळत नाही"३ यावरून इंग्रज लोकही स्वतःच्या ख्यालीखुशालीत रमलेले,ऐषारामी जगताना दिसतात. सावकार देखील शेतकऱ्यांची पिळवणूक करताना दिसतात. या सर्वांमुळे शेतकऱ्यांचे अधिकच हाल होतात. महात्मा फुले म्हणतात, "'हल्ली कित्येक ब्राह्मण व मारवाडी, सावकार नापतीच्या अक्षर शून्य शेतकऱ्यास सांगतात की, "सरकारी कायद्यामुळे तुम्हाला गहाणावर कर्जाऊ रुपये आम्हांस देता येत नाहीत, यास्तव तुम्ही जर आपली शेते आम्हास खरेदी करून द्याल तर आम्ही तुम्हास कर्ज देऊ व तुम्ही आमचे रुपयांची फेड केल्याबरोबर आम्ही तुमची शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ," म्हणून शपथा घेऊन बोल्या मात्र करितात, परंतु या सोंवळया अहिंसक सावकारापासून कुटुंबवत्सल अज्ञानी भोळया शेतकऱ्यांची शेते क्वचितच परत मिळतात.४ म्हणजे सावकार शेतकऱ्यांस कर्ज देतांना नाना तऱ्हेचे नुकसान करतात. या सर्व प्रकारापासून न्याय मिळवण्यासाठी जेव्हा शेतकरी वकिलाकडे जातो तेव्हा तोही शेतकऱ्याला किरकोळ खर्चाकरिता रोख पैसे मागतात. कधी वकीलपत्रे तर कधी बक्षिसादाखल कर्जाऊ रोखे लिहून घेतातच. यामुळे शेतकरी भरडला जातो. शेतकऱ्यांना कोणी वालीच नव्हते अशीच परिस्थिती त्याच्यावर ओढवल्याचे चित्रण फुले करतात. सरकारची ध्येय धोरणे, इंग्रजांचा आहार-विहार, गावातील पाटील, सावकार, धनदांडगे या सर्वांमुळे शेतकऱ्याची दुःस्थिती झाली आहे. हे महात्मा फुलेंनी मांडले आहे. पूर्वीप्रमाणेच आजही शेतकरी कर्जबाजारी आहे. महात्मा फुले म्हणतात की, शुद्र शेतकऱ्याची मूळ पिटीका व हल्लीचे आमचे सरकार एकंदर सर्व आपले कामगारास मन मानेल तसे पगार व पेन्शन देण्याच्या इराद्याने नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतकऱ्याच्या डोक्यावर बसवून त्याचे द्रव्य मोठ्या हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहेत. जोतिबा म्हणतात, त्याप्रमाणे शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे त्याच्याकडे मुलाबाळांना शिकविण्यासाठी पैसा नसतो. मात्र आपल्या मुला-मुलीचे लग्न करण्यासाठी अतिरिक्त पैसा खर्च केला जातो. आजही शेतातील अधिक उत्पादनासाठी शेतीला वेळेवर वीज, पाणी, बी-बियाणे मिळणे अवघड झाले आहे. परिणामतः पुरेसे

उत्पादन होत नाही. महात्मा फुलेंचे विचार आजही लागू होतात. दुःख, दैन्य, काळजी शेतकऱ्याच्या जणू काही पाचवीलाच पुजले आहे. म्हणून कदाचित विविध विवंचनेतून शेतकरी आत्महत्येचा मार्ग निवडतो आहे.महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' या पुस्तकातून मांडलेले शेतकऱ्याविषयीचे विचार तत्कालीन शेतीची दूर्दशा, कर्जबाजारीपणा, ब्राह्मण, पुरोहित यांनी केलेली लुबाडणूक, सरकारची ध्येयधोरणे, याविषयी सत्यता पटवून देते; पण आजचा शेतकरी विचारात घेता तत्कालीन चित्र बदललेले नाही हेही स्पष्ट करते. महात्मा फुले यांनी सूचविलेले शेतीविकासाचे धोरण आजही विचार करायला भाग पाडते आहे.शेती विकासाचा विचार:-'शेतकऱ्यांचा असूड'मध्ये महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मांडली. तसेच या जीवनातून मुक्तता करण्याचे मार्गही त्यांनी सूचविले आहे. त्यात प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या मुलांना विद्या शिकविणे गरजेचे आहे असे त्यांना वाटते. दारिद्र्य आणि अज्ञानामुळे होणारे शोषण आणि पिळवणूक थांबविण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे.ज्ञानाधारित शिक्षणाबरोबरच कृषी व व्यवसायिक शिक्षणावर भर दिला. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी सरकारने आवर्जून पुढाकार घेतला पाहिजे. त्यांच्यासाठी रोजगाराभिमुख व व्यावसायिक संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. असे विचार महात्मा फुलेंनी मांडले.

भारतीय शेती ही प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाचा असमतोल आणि लहरीपणा यामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहेत. शेतकऱ्यांना अशा परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी शेतीमध्येच मूलगामी बदल करण्याची भूमिका महात्मा फुलेंनी घेतली असे दिसते. ते म्हणतात, "आमच्या दयाळू सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यांचे युरोपियन शेतकऱ्यांसारखे विद्याज्ञान देऊन, त्यांस त्यांसारखी यंत्राद्वारे शेतीं कामे करण्यापुरती समज येईतों पावेतों ."५ यावरून यंत्रशेती करण्यावर जोतिबांनी भर दिला आहे. अर्थात शेतकरी आधुनिक कसा होईल याच्यावर ते अधिक भर देतात. त्यांच्यामते शेतकऱ्यांच्या मुलाला शेतीची विद्येची अधिक गोडी लागावी यासाठी शूद्र शेतकऱ्यांच्या मुलांस विद्वान करण्याकरता त्यांच्याच जातीतील स्वतः पाभारी, कोळपी, नांगर हाकून दाखविणारे शिक्षक तयार करून, त्यांच्या शाळेत शेतकऱ्यांनी आपली मुले पाठवावी तसा कायदा करावा, तसेच प्रथम काही वर्षे त्यांच्या परीक्षा घेण्यासाठी हलक्या-हलक्या इयत्ता कराव्यात म्हणजेच शेतकऱ्यांस विद्या शिकण्याची गोडी निर्माण होइल. यातीलच सद्गुणी मुलांना पाटिलक्या द्याव्यात, असा कायदा केल्यामुळे पाटिलक्या मिळविण्याच्या चुरशीने शेतकरी आपली मुले विद्वान करण्याकरता शाळेत पाठवतील. यातून सद्गुणी पाटील गावास मिळून गावाचाही विकास होईल अशी दूरदृष्टी महात्मा फुलेंकडे असल्याचे लक्षात येते.

शेतीसाठी पाणी उपलब्ध देण्याच्या गरजेवर महात्मा फुलेंनी विशेष भर दिला आहे. ते सांगतात की आमच्या उद्योगी सरकारने पोलीसखात्यातील फालतु शिपायांकडून जागोजागी तालीवजा बंधारे बांधून, वळवाचे पाणी एकंदर शेतात मुरून नंतर नदीनाल्यास मिळावे, असे केल्याने शेती फार सुपीक होइल. पुढे ते म्हणतात की," दयाळू सरकारने एकंदर सर्व डोंगरटेकडया मधील दऱ्याखोऱ्यांनी तलावतळी, जितकी होतील तितकी सोयीसोयीनें बांधून काढावीत. म्हणजे त्यांच्या खालच्या प्रदेशांत ओढया-खोड्यांनी भर उन्हाळयात पाणी असल्यामुळे जागोजाग लहान-मोठी धरणेचालून एकंदर सर्व विहिरींस पाण्याचा पुरवठा होऊन, त्यांजपासून सर्व ठिकाणी बागायती होऊन शेतकऱ्यांसहित सरकारचा फायदा होणार आहे."५ तसेच शेतकऱ्यांनी पाणलोटाच्या बाजूने शेताच्या बांधांनी वरचेवर ताली दुरुस्त कराव्यात. ज्या ठिकाणी पाणी आहे, त्याठिकाणी धरणे बांधून, तळी व विहिरी खोदून शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होऊ शकते. असा विश्वासही ते व्यक्त करतात. डोंगरटेकड्यांवरील गवत, पालापाचोळा, मेलेले किटक,श्वापद यांच्यापासून तयार झालेले खत पावसाबरोबर वाहून जाऊ नये म्हणून पाझर तलाव बांधण्याचा उपाय ते सूचवतात.सरकारने शेतीची पहाणी करून, पाणाड्याकडून पाण्याच्या खुणा शोधून गावच्या नकाशात नमूद

करावे, तसेच पाणाड्यासह विहिरी खोडून, बांधून काढणाऱ्या शेतकऱ्यांस सरकारने बक्षिस द्यावे असे ते सूचवितात, तसेच नदीनाले,तलावांत साचलेला गाळ शेतकऱ्यांना फुकट नेऊन द्यावा.

हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेल्या निवेदनात ते म्हणतात, "विद्यार्थ्यांना शेतकीच्या पाठांच्या जोडीने प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण देता यावे म्हणून एक 'आदर्श' शेतीची छोटीशी योजना आखल्यास ती निश्चितच फायदेशीर होईल. ही योजना खऱ्या खुऱ्या कार्यक्षमतेने आमलात आणल्यास तिच्यामुळे सर्व देशाचेच कल्याण साधेल." ७ शेती आधुनिक करण्यासाठी महात्मा फुले सूचना करतात. शेतकी शाळा काढणे, शिक्षण श्रमप्रधान करणे,शेतकऱ्यांच्या मुलांना शेती शिक्षणासाठी विदेशी पाठवणे, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी शेतीसुधारणेचा विस्तार करण्याची विनंती ते करतात. ते सांगतात की, इतर देशातील नाना प्रकारच्या उत्तम-उत्तम शेळयामेंढ्या, गाईम्हशींची पैदास करणारी बेणी आणावीत अशी सूचना ते करतात. त्यामुळे शेतकऱ्यास फायदाच होईल. शेतपिकांचे प्रदर्शन भरविणे, तसेच औत हाकण्याच्या,शेतीपिकाच्या परीक्षा घेऊन उत्तम शेतकऱ्यास बक्षीस ते वहिवाट देण्याविषयीची बहिवाट ते सूचवितात शेतकऱ्यास पदव्या देण्याविषयी, शेतीशाळा पहाण्यासाठी विलायतेला पाठविण्याचा सल्लाही देतात. लोहार, सुतार कामातही परीक्षा ठेवून एकंदर शेतीस्तर कसा उंचावेल याचाच विचार महात्मा फुले मांडतात. इरिगेशन खात्यातील भ्रष्टाचार व बेजबाबदार वृत्तीला आळा घालून शेतकऱ्यांना नियमित पाणीपुरवठा केला पाहिजे. शेतीला आवश्यक तेवढेच पाणी देण्यासाठी शेतांमध्ये तोट्या बसवल्या पाहिजेत अशा विधायक सूचनाही जोतीरावांनी मांडल्या आहेत. जोतीरावांच्या या शेती सुधारणेच्या विचारातून त्यांची शेतकऱ्यांविषयीची तळमळच अधिक तीव्र जाणवते.

**निष्कर्ष:** महात्मा फुले यांच्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथाचे मराठी साहित्यातील स्थान पहाताना काही निष्कर्ष हाती आले. ते पुढीलप्रमाणे-

१. शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे चित्रण करणारा एक ग्रंथ आहे असे वाटते.
२. ब्राह्मण, पुरोहित, सावकार, नोकरदार यांच्या पिळवनुकीनेच शेतकरी कर्जबाजारी होता, आहे असे जाणवले.
३. शेतकऱ्यांच्या दु:स्थितीचे मुख्य कारण अविद्या' आहे असेप्रतिपादन महात्मा फुलेंनी केले आहे.
४. शेतकऱ्याची दु:स्थिती सांगून महात्मा फुले थांबत नाही तर शेतकऱ्याच्या विकासाचे शाश्वत उपायही महात्मा फुलेंनी सूचविले आहे.
५. शेतकऱ्याचा आसूड' मधून महात्मा फुले यांची शेतकऱ्यांविषयीची आंतरिक तळमळ दिसून येते.
६. महात्मा फुलेंनी सूचविलेले शेतीविषयक विकासाचे धोरण आजही विचार करायला भाग पाडते.

**संदर्भ:**

१.'मराठी वाङ्मयाचा इतिहास' खण्ड चौथा म.सा.प,म. जोतिबा फुले: वाङ्मय आणि कार्य, नागनाथ कोत्तापल्ले. पृ.६७१

२.'महात्मा फुले समग्र वाङ्मय', संपादक य.दि. फडके, "शेतकयाचा आसूड" पृ. २५७.

३.उनि पृ. २६८

४.तत्रैव पृ, २७५

५.तत्रैव पृ. ३२१

६.तत्रैव पृ.३२१.

७. 'महात्मा फुले ! शैक्षणिक विचार व कार्य' संपादन दिलीप सुरवाडे, पृ. १०७

**संदर्भ ग्रंथ:**

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, दुसरी आवृत्ती-१९७३.

२. महात्मा फुले समग्र वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, संपादक य.दि.फडके, सुधारित पाचवी आवृत्ती- १९९१

३. 'महात्मा' जोतीराव फुले, उमेश बगाडे. प्रकाशन – २०१०

४. 'युगपुरष' महात्मा फुले, मुरलीधर जगताप,प्रथम आवृत्ती १९९३.

५. महात्मा फुले शैक्षणिक विचार व कार्य संपादन: दिलीप सुरवाडे प्रथमावृत्ती-२००९.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# समाजक्रांतीचे जनक : महात्मा ज्योतिराव फुले

**डॉ. के. एस. खैरनार**
सहयोगी प्राध्यापक, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक
kirankhairnar.121@gmail.com

**सारांश :**

आधुनिक भारतातील स्त्रीशिक्षणाचा जनक,भारतीय स्त्रियांचे हक्क व त्यांचे स्वातंत्र्य यांचा उद्गाता, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या शुद्रांच्या मुलींसाठी शाळा काढणारा, जातिभेदावर कडाडून हल्ला चढवणारा, समानतेची घोषणा करणारा, सामान्य जनतेच्या दुःखाला वाचा फोडणारा तसेच 'सत्यमेव जयते' या तत्त्वाने भारून गेलेला सत्यशोधक म्हणजेच महात्मा ज्योतिराव फुले होय. त्यांचे आयुष्य त्यागाचे त्याबरोबरच धैर्याचे प्रतीक होते. महात्मा फुले हे पंडित नव्हते, संशोधक नव्हते, भाषाशास्त्रज्ञही नव्हते परंतू ते मूलग्राही विचारवंत होते.

**प्रस्तावना :**

महात्मा फुले यांचे तत्वज्ञान मानवाची प्रतिष्ठा, मानवी हक्क, मानवी समानता व धार्मिक सहिष्णुता यांचा संदेश देते. भारताचा एकोणिसाव्या शतकातील महान सुपुत्र आणि समाजक्रांतीचा जनक म्हणून महात्मा फुले यांना संबोधता येईल. महात्मा फुले यांचे घराणे हिंदू समाजातील क्षत्रिय माळी हे होते. पेशव्यांनी त्यांना आपल्याकडे फुले आणि फुलांच्या विविध वस्तू पुरविण्याचे सांगितले होते पेशव्यांसाठी फुलांच्या गाद्या, उश्या, चटया तयार करू लागले त्यांच्या या सेवेबद्दल खुश होऊन पेशव्यांनी त्यांना जमीन इनाम दिली तेव्हापासून त्यांनी गोऱ्हे हे नाव टाकून देऊन फुले हे आडनाव धारण केले.

**स्त्री शिक्षणाचा आद्यजनक :**

स्त्री शिक्षण आणि कनिष्ठ वर्ग यांचा कैवारी म्हणून महात्मा फुले यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्धीस पावले आहे. निराशमय अंधकारात शिक्षणाची ज्योत घेऊन महात्मा फुले कनिष्ठ दर्जाच्या वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी सतत धडपडत होते. आपल्या समाज कार्यासाठी ज्या ठिकाणाहून मदत मिळणे शक्य आहे तेथून ते मिळविण्याचा प्रयत्न करीत त्यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, सरकारी उच्चपद लाभलेल्या अधिकाऱ्यांच्या देखील भेटी घेत त्यांना शाळेला साहाय्य करण्याची विनंती करीत. महात्मा फुले हे समाजाचे महान गुरू होते. नवनवीन विचारांची बीजे समाजात रुजावी म्हणून ते समाजमनाची जोपासना करून जडण-घडण करीत. महात्मा फुले विद्यार्थ्यांना विचार करण्यास प्रेरीत करी, ग्रहणशक्ती वाढवीत. शालेय शिक्षणाचा संबंध ज्ञानसंचयाशी असून खऱ्या शिक्षणाचा संबंध मनोविकासाशी असतो असे त्यांचे मत होते. महात्मा फुले यांची अखंड उद्योगशीलता, अलोट प्रेम आणि सतत जागरूकता यामुळे शाळेची प्रतिष्ठा वाढली होती. त्यांचा परिणाम म्हणून पुण्यातील सरकारी मराठी शाळेपेक्षा महात्मा फुलेंच्या शाळांचा अधिक नावलौकिक वाढला होता. शैक्षणिक कार्यासंबंधीचा महात्मा फुले यांचा त्याग आणि कष्टदायी वृती याविषयी संपूर्ण महाराष्ट्रभर बोलबाला होत असे. ज्योतीबांच्या शैक्षणिक कार्याची माहिती लंडनमधील कंपनी सरकारला सुद्धा माहित होती. स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याचा यथोचित गौरव कंपनी सरकारकडून करण्यात आला होता. मुलींच्या शाळा काढून फुले यांनी स्त्री शिक्षण क्षेत्रात प्रचंड कार्य केले. स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील ते सुवर्ण दिन होते.

19 व्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास हा राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले यांच्या नावाची निगडित असलेला दिसून येतो. स्त्रियांच्या हक्कासाठी, त्यांच्या उद्धारासाठी, त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले हे स्त्रियांचे उद्धारकर्ते होय. त्यांच्या मते शिक्षणाचे कार्य ही अशी गोष्ट आहे की त्यासाठी सतत प्रयत्न आणि त्याबरोबर त्याग केला पाहिजे.

**समान शिक्षण व समान संधी :**

महात्मा फुले हे सामाजिक समतेच्या क्रांतीचे जनक होते. भारतामध्ये सामाजिक, आर्थिक व राष्ट्रीय क्षेत्रांत समानतेच्या विचारांचा प्रवाह हळूहळू होऊ लागला. संपूर्ण भारतात समानतेची भावना स्त्रीयांच्या व समाजातील शूद्रांच्या शिक्षणा चळवळीमधून दिसून येत होती. त्या कालखंडात कोठे मुलींच्या शाळा उघडत तेव्हा त्या बातम्या देशभर प्रसारित होत असे. समाजातील कनिष्ठ वर्गातील लोकांच्या शिक्षणाचे कैवारी त्यांच्या शिक्षणासाठी सरकारने लक्ष द्यावे म्हणून वर्तमानपत्रांद्वारे आपली मत मांडली जात होती. समाजातील शेतकरी वर्ग, गरीब जनतेच्या शिक्षणाची पर्वा कोणी करीत नाही, त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते यासाठी जमीनदार, सावकार, सरकार याला कारणीभूत आहे जर ग्रामीण भागातून शिक्षणाचा प्रसार झाला नाही आणि जनतेला तिचे अधिकार, हक्क काय आहेत हे शिकविले नाही तर समाजातील गरिबांची फसवणूक कशी थांबेल. सनातनी लोकांनी धर्माच्या नावाखाली विरोध करण्यास सुरुवात केली. जर कनिष्ठ वर्गातील लोकांना शिक्षण मिळाले तर त्यांचा विकास होईल आणि आपली मक्तेदारी धोक्यात येऊन समाजातील आपले स्थान खाली येईल. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या शाळांची प्रगती चालू होती. शाळेतील मुलांसाठी शिक्षणाची साधने तयार करण्यासाठी त्यांनी भरपूर प्रयत्न केले. त्यांना शाळेमध्ये जे यश मिळत होते त्यामध्ये त्यांचे भावी आयुष्याची बीजे रोवली होती. महात्मा फुले यांच्या शाळेत वाचन, लेखन, अनुलेखन, व्याकरण, जगाचा भूगोल, हिंदुस्थानचा भूगोल, मराठ्यांचा इतिहास हे विषय शिकवले जायचे. फुले यांनी त्यांना शाळेच्या उभारणीस मदत करणाऱ्या उदार देणगीदारांचा, वर्गणीदारांचा आपल्या भाषणात कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत असे. महात्मा फुले नेहमी म्हणायचे की समाजातील गोरगरिबांना शिक्षण देण्यासारखे अधिक महत्त्वाचे दुसरे कोणतेही काम असू शकत नाही अशी त्यांची श्रद्धा होती.

महात्मा फुले यांचे बरेच सहकारी मित्र ब्राह्मण होते ते सर्वजण उदार बुध्दीने व धैर्याने फुले यांच्या शिक्षण कार्यात सहकार्य करीत होते. परंतु महात्मा फुले हे खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीकारक होते. त्यांच्यामते कनिष्ठ वर्गातील लोकांना अशापद्धतीचे शिक्षण मिळाले पाहिजे की ते आपल्या सामाजिक समतेच्या आणि व्यक्तीस्वातंत्र्याच्या हक्कांसाठी लढण्यास तयार होतील. आपल्या हक्कासाठी त्यांनी लढण्याचीच नाही तर त्यांच्या संरक्षणाचीही तयारी केली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. महात्मा फुले यांचे काही बाबतीत मते निश्चित स्वरूपाची होती त्यांना असे वाटले असावे की हिंदू समाज जातीभेदाने विस्कळीत झाल्याने हिंदू समाजातील लोकांमध्ये एकी आणि खरा देशाभिमान निर्माण होऊ शकत नाही त्यामुळे इंग्रजांना हिंदुस्थानावर आपले राज्य स्थापन करण्यात यशस्वी झाले. इंग्रजांचे राज्य आज ना उद्या जाणार याविषयी महात्मा फुले यांना खात्री होती परंतु इंग्रज राजवटीचा काळ हा सामाजिक सुधारणेला पोषक आहे असा त्यांना विश्वास वाटत असे. महात्मा फुलेंचे लक्ष सामाजिक सुधारणांकडे गेले होते ते समाजसुधारक असल्यामुळे त्यांच्या बुद्धीला ज्या धार्मिक रूढी, परंपरा, चालीरीती पटत नव्हत्या त्यांच्यावर आघात करण्यास सुरुवात केली. सामाजिक सुधारणांचे दरवाजे उघडून समता, स्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्य यावर त्यांना समाजाची रचना करावयाची होती. महात्मा फुलेंचा 'बोले तैसा चाले' असा बाणा होता. त्यांच्या पिढीमधील सहकारी नेते त्यांच्यासारख्या उदात्त ध्येयाने कार्य करीत नसे त्यामुळे फुलेंची त्याच्या समकालीन सहकारी नेत्यांमध्ये नैतिक उंची जास्त होती. याचा परिणाम म्हणून फुलेंनी कर्मठ आणि बुरसटलेल्या विचारांना कधीच दाद दिली नाही. महात्मा फुलेंनी आपल्या वडिलांचे अंतिम

संस्कार ब्राह्मण धर्मशास्त्रात सांगितल्या प्रमाणे केले नाही. महात्मा फुलेंचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बुद्धीवादी होता त्यानुसारच त्यांनी अंत्यसंस्कार केले. कावळयांना पिंड देऊन मृतात्म्यांना सद्गती मिळते यावर त्यांचा विश्वास नव्हता. त्याऐवजी अनाथ, गरीब, अपंग लोकांना भोजन देणे, गरीब विद्यार्थ्यांना गरजेच्या वस्तू देणे, पुस्तके देणे महत्त्वाचे आहे.

सावित्रीबाई या महात्मा फुले यांच्या पत्नी होत्या. त्या बाल हत्या प्रतिबंधकगृहातील मुलांशी प्रेमाने व वात्सल्याने सेवा करीत असे, पालन पोषण करीत असे. सावित्रीबाईंना स्वतःला मूल नव्हते तरीही त्यांनी आपल्या दयाळू, उदात्तवृतीने, अत्यंत प्रेमाने, वासल्याने मुलांचे संगोपन केले. मुलांना त्या जीव की प्राण जपत असे.महात्मा फुले यांनी काढलेल्या शाळेत अनेक वर्षे काम केले होते त्यांचे काम म्हणजे हिंदुस्थानातील स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनातील एक युगप्रवर्तक अशी घटना होती. महात्मा फुले यांना जुलूम, अन्याय, अत्याचार, लाचलुचपत आणि लबाडीचे व्यवहार यांचा खूप तिटकारा असे. जो मनुष्य आचरणाने निर्मळ असेल, निर्भय असेल तोच समाजातील जुलूम, अन्याय व दुर्गुण यांच्याविरुद्ध उभा राहू शकतो. जे लोक सरकारला फसवतात, गरीब कामगारांना लुबाडतात, राष्ट्रीय कामाला अडथळा निर्माण करतात अशा अधिकाऱ्यांचे महात्मा फुले कर्दनकाळ होते.

**सत्यशोधक समाज :**

महात्मा फुलेंनी 'गुलामगिरी' हा कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी ग्रंथ लिहिल्यानंतर महाराष्ट्रातील ब्राह्मण समाजाच्या मानसिक गुलामगिरीमधून मुक्त करण्यासाठी चळवळीस सुरुवात केली. महात्मा फुले हे क्रांतिकारक नेते असल्यामुळे त्यांच्या वृत्तीशी व कार्याशी संबंधित परिस्थिती निर्माण करणे आवश्यक होते. आपल्या कार्याची चळवळ संघटित करून आपला संदेश हिंदुस्थानभर पोहचला पाहिजे या ध्येयाने त्यांनी 'सत्यशोधक समाज' ही संस्था स्थापन केली. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष म्हणून महात्मा फुले यांची निवड करण्यात आली. कनिष्ठ वर्गातील लोकांची होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्काची जाणीव करून देणे,अधिकाराची शिकवणूक देणे, धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाचे प्रमुख ध्येयधोरण होते. सत्यशोधक समाजाचे सभासदत्व सर्व समाजातील लोकांना मिळत असे. सत्यशोधक समाजाचा जातिव्यवस्थेवर विश्वास नव्हता तसेच चातुर्वण्यांवरही विश्वास नव्हता. सत्यशोधक समाजाला बुद्धिवंतांचा पाठिंबा होता असे नाही. या समाजामध्ये पुरुष हा साध्या राहणीमानाचा, प्रामाणिक शेतकरी वर्गातील होता. सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेचे स्थान हृदय होते. भाषा ही जनतेची होती तर त्याच्या प्रचाराची स्थळे, बैठक घेण्याचे स्थान शेतावरील मळणीचे ठिकाण होते. सत्यशोधक समाजातील प्रचारक धोंगडी, पागोटे,धोतर व हातामध्ये डफ घेऊन प्रचार करीत असे. आपल्या प्रचारादरम्यान शेतकऱ्यावरील कर्ज, धर्मविधी, शेतकऱ्यांचे होणारे नुकसान याकडे लक्ष वेधले जाई. आपल्या मुलांना शिक्षण देऊन चांगले काय आणि वाईट काय हे त्यांना समजेल असा दृष्टीकोन होता. अशा या सत्यशोधक समाजातील प्रचारक हे शेतकरी कुटुंबामधील लोक होते.

**संदर्भ ग्रंथ :**


1. धनंजय कीर, महात्मा ज्योतिराव फुले पॉप्युलर प्रकाशन (1889) मुंबई.
2. ना.ग. पवार, अविनाश वरोकर, भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले, पद्मगंधा प्रकाशन (2004) पुणे
3. तो.ठाले पाटील, शेतकऱ्याचा असूड, मराठवाडा पब्लिशिंग हाऊस (1988) औरंगाबाद.
4. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, जोतीचरित्र, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया (1992)
5. हरि नरके, महात्मा फुले : साहित्य और विचार, महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन (1993)
6. गंगाधर बाळकृष्ण सरदार, महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन (2005) मुंबई.

# भारतीय संविधाना समोरील आव्हाने व उपाय

**डॉ.कुंदा बाळासाहेब कवडे**

मराठी विभागप्रमुख कला , वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी. ता . पारनेर जि. अहमदनगर

ई-मेल आयडी-: kavadekunda@gmail.com

"दलितांचे ते तलवार होऊन गेले ,अन्यायाविरुद्ध प्रहार होऊन गेले.
होते ते एक गरीबच, पण या जगाचा कोहिनूर होऊन गेले.
जग खूप रडत होता त्यांना, पण ते या जगाला घडून गेले
अरे या मूर्खांना अजून कळत कसं नाही .
वर्गाच्या बाहेर बसून सुद्धा त्यांनी या भारताचे संविधान लिहून गेले . "

ज्या बाबासाहेबांना या देशात शिकण्यासाठी पुस्तक दिले जात नव्हते, त्याच बाबासाहेबांनी एकच ते पुस्तक लिहिले की ,त्याच पुस्तकावर आज आपला भारत देश चालतो....ते म्हणजे भारतीय संविधान !या पृथ्वीतलावर राम कृष्ण आले काय आणि गेले काय ?तरी जग औस पडणार नाही .परंतु भारतीय संविधाना शिवाय देश चालणार नाही .हे येथे थांबणे सांगू शकते .या देशात शिकण्यासाठी बाबासाहेबांना पुस्तक दिलं जात नव्हतं .त्याच बाबासाहेबांनी एक पुस्तक लिहिलं की त्याच पुस्तकावर आज अख्खा भारत देश चालतो आहे .तेच म्हणजे भारतीय संविधान होय . एखादा देश किंवा राष्ट्र चालवण्यासाठी दिलेले मूळ आदर्श ,पायंडे अथवा नियमांचा संच आहे. राष्ट्राचे अस्तित्व त्याच नियमांवर चालते .भारतीय संविधान हा राष्ट्राचा सर्वोच्च अथवा पायाभूत कायदा आहे. सविधान हे एखाद्या देशापुरते मर्यादित नसून ,संस्था संघटना इत्यादी देखील आपले संविधान बनवू शकतात भारतीय स्वातंत्र्याची एक महत्त्वाची घटना म्हणून २६ नोव्हेंबर हा दिवस २०१५ पासून 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो.हा दिवस साजरा करण्यामागील उद्देश म्हणजे नव्यापिढीला भारतीय संविधाशी जोडून या मधील प्रक्रिया व त्याच्या उद्दिष्टांशी जोडणे हा आहे. धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकास समता, स्वातंत्र्य आणि बंधूता त्याची शिकवण देणारे भारतीय संविधान हे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून देशाला बाबासाहेबांनी अर्पण करण्यात आले आहे . 'भारताचे संविधान' हा आपल्या भारताचा सर्वोच्च कायदा व पायाभूत कायदा आहे. पाश्चात्य संविधानांचा प्रभाव आहे . २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेचा स्वीकार केला गेला. व २६ जानेवारी१९४९ पासून भारतीय राज्यघटना अमलात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या संविधानाचे शिल्पकार झाले. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान आहे .

"स्वतंत्र भारताला मिळाला,संविधान रूपी मोलाचा ठेवा .
लोकशाहीचा राज्यकारभार,मार्गदर्शक तत्वां रूप व्हावा. "

'भारतीय संविधान' हे दूरदृष्टीच्या अभ्यासू व्यासंगी अशा लोकप्रतिनिधींनी घटना समितीत सखोल आणि सांगोपांग चर्चा करून तयार केले असून, ते स्वतंत्र भारताच्या ध्येयवादाचे निदर्शक आहे .भारताच्या इतिहासात त्यास एक अपूर्व व अनन्य साधारण घटना म्हणून महत्व आहे .भारतीय संविधानाला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे . त्यातील तरतुदी या नव्या भारताच्या जडणघडणीच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत .खरं तर भारतीय संविधानाच्या इतिहासात १७७३ साली समंत झालेल्या ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या रेगुलेटिंग अक्टने प्रारंभ होतो .भारतीय संविधानाचा खूप मोठा इतिहास असून सुद्धा भारतीय संविधाना समोर आव्हाने आवासून उभी आहेत .भारतीय घटनेचे उद्दिष्ट घटनेच्या प्रास्ताविकात स्पष्ट केलेली आहेत ."आम्ही भारताची जनता, भारताचे एक

सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक, राज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस सामाजिक ,आर्थिक व राजनैतिक, न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची आणि संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुत प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण करत आहोत . " हे आहे भारतीय सविधान. या संविधानाची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत .

1. संसदीय लोकशाही
2. मूलभूत अधिकार
3. सामाजिक न्याय
4. न्यायालयीन पुनर्विलोकन
5. संघराज्य पद्धती
6. मार्गदर्शक तत्वे इ .

भारतीय राज्यघटना ही संघराज्य पद्धतीने लोकशाही जोपासणारी आहे .संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताची ही घटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी लिहून पूर्ण केली .आणि २६ जानेवारी १९५० ला संविधान भारतात लागू करण्यात आले भारतीय राज्यघटना लिहिण्यास २ वर्ष ११ महिने आणि १७ दिवस लागले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय परिश्रमाने राज्यघटना लिहिली त्यात त्यांनी स्वातंत्र्य समता व बंधुता आणि न्याय या तत्त्वांचा समावेश केला.डॉ. बाबासाहेब या आधुनिक बुद्धाने मानवतेच्या कल्याणासाठी आपले संपूर्ण आयुष्य झिजविले आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय तसेच प्रज्ञा, शील, करुणा, व मैत्री या मूल्यांची राज्यघटनेत बीजे रोवून त्यांनी भारताच्या संविधानाची निर्मिती केली आहे . देशातील जनतेच्या हितासाठी समृद्धीसाठी विकासासाठी नवसमाज व नवभारताचे निर्मिती करण्याकरता मी प्रथमता भारतीय आणि शेवटी ही भारतीयच आहे. असा महान संदेश या देशाला बाबासाहेबांनी दिला आहे. .भारतीय राज्यघटना म्हणजे आपले संविधान हे भारत देशाचा पायाभूत कायदा आहे म्हणूनच 2015 मध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती समारंभाच्या निमित्ताने माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २६नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला सविधाना बाबत जनजागृती करण्यासाठी आणि आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने देशभरात संविधान दिन साजरा केला .भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य भारतात राहण्याचा समान अधिकार दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संविधान निर्मितीमध्ये सर्वात मोठा वाटा आहे. हे संविधान देशातील प्रत्येक नागरिकाला समजावे हे मोठे आव्हानच आहे. बाबासाहेबांना आदरांजली वाहण्याचे प्रतीक म्हणूनही संविधान दिन साजरा केला जातो. भारताचे संविधान एक हस्तलिखित दस्तऐवज आहे .हा जगातील सर्वात मोठ्या हस्तलिखित दस्तऐवजपैकी एक आहे संविधानाची मूळ हस्तलिखित प्रत आजही संसदेच्या पुस्तकालयात उपलब्ध आहे .

**भारतीय संविधानाने जी सहा मूलभूत अधिकार प्रदान केले त्यामध्ये –**

1. समानतेचा अधिकार
2. स्वातंत्र्याचा अधिकार
3. शोषणाविरोधात अधिकार
4. धार्मिक स्वातंत्र्य
5. संस्कृती आणि शिक्षण

6. घटनात्मक उपाययोजना इत्यादी .

हे अधिकार म्हणजे आपल्या संविधानाचा प्राण आहे. या अधिकाराचा वापर करुन भारतीय नागरिक आपले जीवन जगत आहे.आलेल्या संकटाचा सामना करत आहे, हे केवळ डॉ.बाबासाहेबांच्या संविधानामुळेच शक्य आहे. बाबासाहेबांच्या लोकशाहीचे ध्येय आहे. आणि आपण ते पूर्ण करायला हवे, म्हणूनच म्हणावे वाटते की,

" हे तुझं सविधान आहे , हे माझं संविधान आहे .अरे नादान माणसा,भारतीय संविधान
माणसाने फक्त माणसाच्या हितासाठी,लोकशाहीसाठी तयार केले आहे .
याचा आपल्याला अभिमान आहे."

शेती आणि शेतकऱ्यांविषयी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाकीत केले होते,ते आजही लागू पडते. किंबहुना त्याची गरज तेव्हा पेक्षा जास्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, भारतीय शेती ही आजारी पडली आहे, शेतीसाठी शासनाने पुढाकार घ्यायला हवा. शेतकऱ्यांनी शेतीवरचा भार कमी करण्यासाठी आपल्या मुलांना शिक्षण देऊन उद्योग सुरू करायला हवा .आणि सर्वात महत्त्वाचं शेतीला आपण उद्योगाचा दर्जा दिला पाहिजे. उत्पादनाला आपण उद्योगाचा भाव द्यायला हवा, नाही तर एक दिवस असा येईल की शेतकऱ्याला आत्महत्या करावी लागेल. परंपरागत शेतीची पद्धत बदलली पाहिजे आणि आज तर तेच घडत आहे. वारंवार येणारी नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकरी हा उभ्या जगाचा पोशिंदा आहे. भारतीय शेती , व शेतकरी .आत्महत्या हे सविधाना समोरील मोठे आव्हान आहे.

डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्वप्नातील भारताचे स्पष्ट चित्र आज खरोखरच साकार झाले .परंतु त्यांच्या स्वप्नातील तो भारत अजून प्रगतीपथावर देण्यासाठी भारताचा एक नागरिक म्हणून प्रत्येकाला प्रयत्न करायला हवेत, आणि भारताला प्रगतीच्या यशाच्या शिखरावर घेऊन जायला हवे. मानवाने केलेली प्रगती व आर्थिक प्रगती व त्या बदल्यात त्याने पर्यावरणाला पोहोचलेली हानी,वाढलेली लोकसंख्या व इतर सामाजिक समस्या ही एकविसाव्या शतकात वावरताना भारतासमोर आवासून उभी आहेत.आपल्या देशात कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या माणसाला स्वतःची प्रगती साधण्याचा हक्क आहे .त्याच्यात ज्ञानावर कामावर कोणाचीही मक्तेदारी नाही .लोकसंख्येच्या या विस्फोट यामुळे या सर्व मानवांना मूलभूत गरजा पुरवणे हे मोठे आव्हानच आहे. अंधश्रद्धा, अज्ञान हे फार मोठे अडथळेच आहेत. एकविसाव्या आज माणसापुढे उभा राहिलेला प्रश्न म्हणजे पर्यावरण होय .माणसाने अविचाराने जंगल तोड तोड केली .वाढते प्रदूषण यामुळे विविध आजारांना तोंड द्यावे लागते.दुष्काळ महापूर भूकंप आरोग्याच्या समस्या आणि आता तर कोरोणासारखी महामारी हे एक मोठे जीवघेणे आव्हानच आहे .परंतु एकविसाव्या शतकातील माणूस आता जागृत झाला आहे.वैद्यकीय क्षेत्रात नित्य नवे शोध लावून तो या आजारावर मात करत आहे.आता तर आपल्या संशोधकांनी माणसांच्या जनुकांचा हे अभ्यास चालवलेला आहे .त्यातून तो माणसाला त्रुटी दूर करण्यास मदत करील .भारतासारखे इतर देशात सुद्धा भ्रष्टाचाराचे एवढे साम्राज्य पसरले आहे की , शिल्लक फायद्यासाठी माणूस दुसऱ्याचे प्राण घेतो .याचे कारण म्हणजे नैतिक मूल्यांची होणारी घसरण होय . त्यामुळे . माणसांचे जगणे असह्य झाले आहे .पण काही क्षणापुरते तेच !!याचे कारण म्हणजे अनेक आपत्तीत इतर कानाकोप-यातून धावत आलेले मदतीचे हात आश्वासन देतात की ,या साऱ्या आश्वासन ना आम्ही पुरत असु . उदा .कोरोनाचे संकट

एकविसाव्या शतकात वावरत असताना जातीयता,धर्मांधता,जातिवाद, आणि द्वेष पसरवणारी विचारधारा व राजकारण वाढत आहे .उदा. नरेंद्र दाभोळकर ,गोविंद पानसरे एम.एम कुलकर्णी ,आणि गौरी लंकेश इत्यादी .आज आपला भारत देश जगातील सर्वश्रेष्ठ देश म्हणून ओळखला जातो .ते केवळ या संविधानामुळेच ... -

!ज्या धर्मांध शक्ती पहिल्यापासूनच संविधानाला विरोध करत होत्या. त्या प्रवृतीनीच महात्मा गांधीजींचा खून केला. आज ही प्रवृत्ती डोकं वर काढून समाजवादी धर्मनिरपेक्ष, लोकशाही देशाला कमकुवत करण्याचा प्रयत्न करते .आपण आपले संविधान आपण कुणा देशाला धर्माला नव्हे तर ,ते आपण अंगीकृत आणि अनियमित करून स्वतःला स्व प्रत अर्पण केलेले आहे. .व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता जपणारे हे पुस्तक नव्हे तर ,तो आपला आत्मसन्मान आहे. म्हणून म्हणावेसे वाटते की;

"संविधानाचा सन्मान,हाच आपला अभिमान .....

विवेक पसरवू जनाजनात, सविधान जागवू मनामनात .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या संविधान सभेत भाषणात म्हणाले होते की ,माझ्या मते ,संविधान कितीही चांगले असो ,ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे,ते जर प्रामाणिक असतील तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही . आणि ते जर अप्रमाणिक ...असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही ......म्हणूनच संविधान दिनाच्या निमित्ताने एकभारतीय नागरिक म्हणून आपण आपले संविधान समजून घेऊ ...ते अधिक चांगल्या पद्धतीने अमलात आणण्यासाठी आपण सारेच कृतिशील राहूया !!

"मिळून सारे देऊन ग्वाही,सक्षम बनवू लोकशाही

समाजाला जागवू या, सविधान रुजवू या ..."

सार्वत्रिक दारिद्र्यव जनसमूहाच्या वंचिततेचे वास्तव हे एक मोठे आव्हानच आहे.या आव्हानाचा सामना करण्यासाठी किती कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत, याच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे .आपल्याला हे आव्हान सामुदायिक वंचितता या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे .वंचितता म्हणजे समाजातील लोकांची मूलभूत मानवी गरज पूर्ण करण्यासाठी असलेली असमर्थता होय . भारतामध्ये आढळणारे या वंचिततेचे अनेक कंगोरे वास्तवरूप आणि परिणाम असल्याचे मुलभूत मानवी हक्काचा देखिल आभाव आहे . हे सारे महत्वाचे प्रश्न आहे तेच या आव्हानाचे स्वरूप आहे

या आव्हानाला सकारात्मक रीतीने सामोरे जाताना वाईट आतली वाईट वंचितता दूर करण्यासाठी सत्ताधाऱ्यांची गरज आहे .जे आपल्याकडे असणारे अधिकचे उत्पन्न एकत्र करून अधिकध्येयवादी पद्धतीने लक्षपूर्वक वापरू शकतील .जनमानस तयार करण्यासाठी काम करण्याची आणि नीती बदलाची जनतेकडून लोकशाहीवादी व प्रागतिक पावले उचलण्याची गरज आहे .या आव्हानाचा सामना करण्यासाठीआपल्याला किती कोटी लोक दारिद्र्यरेषेच्या खाली किंवा जवळपास आहे त याच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा आज भारतात दारिद्र्याची झगडणारा सगळ्यात मोठा समाज आहे .इतका मोठा समाज दारिद्र्यात खितपत पडणे ,हे निश्चितच अक्षम्य आहे . त्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन जनमास मानस तयार करणे गरजेचे आहे समूहाने या आव्हानाचा सामना करणे गरजेचे आहे .

' उठ , नागरिका जागे हो ,संविधानाचा धागा हो ,

वंचितांना देई उभारी ,भारतीय संविधान लयभारी '

बाबासाहेबांचे योगदान ,भारताचे संविधान.

धर्मनिरपेक्षता ,लोकशाही, व भारतीय बहुविधता हे भारतीय संविधानासमोरील मोठे आव्हानच आहे. संविधानाच्या चौकटीत बंदिस्त असलेल्या स्वातंत्र्य भारताने सातत्याने प्रयत्न करून या जातीय वादाला नष्ट करायला हवे होते तसे झाले नाही धर्मनिरपेक्षता ही कालबाह्य झाली आहे हे चुकीचे आहे या धर्मनिरपेक्षतेला वैज्ञानिक जाणिवा व विवेक वादाशिवाय विवेक वादाशिवाय विवेक वादाशिवाय जातिवाद ,धार्मिक मूलतत्त्ववाद , धर्मांधता व अतिरेकी पणायांच्या विरोधातील लढा यशस्वी होणार नाही .भारतातील धर्मनिरपेक्षता आकर्षित

होण्यासाठी सर्वधर्मसमभाव अवशक्य आहेच .धर्मनिरपेक्षता ही संकल्पना सक्रिय करण्यासाठी दोन मजबूत तत्त्वांची गरज आहे आपण धर्म जात वंश वांशिकता भाषा लिंग यावरून कुठल्याही प्रकारे भेदभाव करता कामा नये हेच आपल्या संविधानातील वेगवेगळया तरतुदीतून व्यक्त केले आहे .

"ना एक धर्म से, ना एक सोच से, ये देश चलता है संविधान से!!"

"स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय 'हात संविधानाचा हेतू हाय"

.उठ, नागरिका, जागा हो, संविधानाचा धागा हो! '

अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य याला अत्यंत महत्त्व आहे .1950 मध्ये भारतीय संविधानाचा स्वीकार केला आणि संविधानाच्या कलम १९ (१) (अ )नुसार नुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मूलभूत हक्क मान्यत आला .भारतीय संविधानामध्ये प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य सहजपणे उल्लेख केलेले नाही दुर्दैवाने अभिव्यक्ती स्वातंत्र्य मोठ्या प्रमाणावर मर्यादित केले गेले .भारतात आज प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य खरेल व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दडपणाखाली आहे .अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या कसा कसा संकोच होत आहे .अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य हे मोठे आव्हानच आहे .

एकविसाव्या शतकात चे दुसरे दशक संपत आहे भारतासमोर जनसमूह आजी वंचितता धर्म निरपेक्षता लोकशाही आणि विविधता अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि वृत्तपत्र स्वातंत्र्य या आव्हानांना परिणामकारकपणे तोंड देण्यासाठी कामाचे प्रचंड डोंगर आपल्यापुढे उभे आहेत या आव्हानांना वैज्ञानिक पद्धतीने निर्भयपणे आणि परिणामकारकतेने तोंड दिल्याशिवाय आपला देश पुढे पाऊल टाकू शकणार नाही .या आव्हानांना तोंड देण्यासाठी संघर्ष करण्यासाठी संघटित करणे हाच राष्ट्रीय प्रगतीचा खरा खरा मार्ग होय . आज आपण सविधान स्वीकारलेल्याला 72 वर्ष पूर्ण झाली आहे .आपण आपल्या अग्रणी संविधान निर्मात्यांना कृतज्ञ प्रमाण करून शांतता सदभावना आणि बंधुत्वाच्या भावनेने वर आधारित'एक भारत श्रेष्ठ भारत 'निर्माण करण्याच्या दिशेने राष्ट्राला पुढे घेऊन जाण्याचा आणि घटनात्मक तत्त्वांचे पालन करण्याविषयी स्वतःला वचनबद्ध ठेवण्याचा संकल्प करायला हवा .आपण आपले नागरिक कर्तव्य आत्मसात करू शकलो आणि त्या अनुरूप आपली कृती व्यवहार करत राहिलो तर हे शतक निश्चितपणे भारताचे शतक असेल आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की , ... .

' संविधानाची महानता,विविधतेत एकता . . . . '

भारताचे एकच विधान ,संविधान ! सविधान !सविधान ! '

सविधान दिनाच्या निमित्ताने संविधान जागृती होणे गरजेचे आहे स्वाधीनता , समानता , बंधुभाव तथा न्याय हे आपल्या संविधानाचे चार आदर्श आहेत .आमचे संविधान अनेक विकसित राष्ट्रांत पेक्षा प्रगत आहे .श्री पुरुष समानता ही आमच्या संविधानाची मुख्य धारा आहे .सरकारने महिला सुरक्षा बाल विकासाकरता आणि कडक , सुधारित कायदे बनवले ,परंतु कायद्याचे रक्षकच महिलांची सुरक्षा धोक्यात आणत आहेत .ज्यांच्यावर अनाथ शोषित बालकांना आधार देण्याचे ,सुधारण्याचे दायित्व ,त्यांच्या हाताखाली आपली मुले सुरक्षित नाही .स्वातंत्र्यानंतरही आपण गरिबी आणि बेकारी या समस्यांनी घेरले आहोत .' 'भारतीय महिलेची परिस्थिती ' हे संविधाना समोरील एक मोठे आव्हानच आहे . शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील महिलांची परिस्थिती आज एकविसाव्या शतकातही त ही केविलवाणी आहे .मग कसली समानता आणि कसले अधिकार? समाजातील बलात्कार महिलांचा विनयभंग भेदभाव हुंडाबळी ॲसिड अटॅक विवाहित महिलांचा छळ यासारख्या समस्यांचा पूरेपूर असा तोडगा अद्यापही सापडलेला नाही शंभर टक्के प्रशासनामार्फत तोडगा उपाय मिळण्याची अपेक्षा करणे ही निष्फळ ठरेल . .कारण , यासविधान त्यातील तरतुदी कायदे आपणा करता म्हणजेच भारतीय नागरिक करत आहेत त्यातील मूलभूत हक्क कर्तव्याचा आदर तसेच जोपासना करणे हा प्रत्येक भारतीय नागरिकाचा प्रथम धर्म आहे संविधानातील विचारधारेचे आकलन करणे

आणि त्याची अंमलबजावणी करणे हे भारतीय नागरिकांच्या हातात आहे . त्यामुळे समाजातील फक्त स्त्रियांचाच नव्हे तर इतरही समस्यांचे निराकरण करण्याकरिता संविधाना तसेच कायद्यात बदल घडवण्यापेक्षा नितांत आवश्यकता आहे ,भारतीयांच्या विचारधारेतील बदलांची . ! बदल हा , पण तो आपणच घडवून आणला पाहिजे .तुम्ही आणि मी आणि तोच सकारात्मक बदल भारतीय संविधानाची यशोगाथा ठरेल .

भारतीय संविधानात विशेषता महिलांच्या हक्कांचा प्रकर्षाने विचार केलेला दिसून येतो .संविधानाच्या अंमलबजावणीतु नच भारतीय स्त्रियांना समान अधिकार देण्यात आलेले आहेत .परंतु या विधीलिखीत अधिकारांचा उपयोग महिलांना किती घेता येतो हा अजूनही अनुत्तरीत प्रश्न आहे .लिखित स्वरूपात का होईना समानतेच्या तत्वांचा अंतर्भाव भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेत मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्य महिला हक्क व सशक्त करण्याच्या संदर्भात असंख्य पावले उचलली आहेत त्यासंदर्भात प्रशासनाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे .भारतीय राज्य घटनेने महिलांना समा न अधिकार दिलेले आहे.

समानता कशाची ? दर्जाची, संधीची

सर्वांना देई दर्जा समान,संविधानाचे काम महान '

संविधान दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधानाविषयी जाणीव जागृती आणि भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वांचा विद्यार्थ्यांनी जबाबदार सुजाण आणि सुसंस्कृत नागरिक होण्यासाठी आपल्या जीवनात अंगीकार करून संविधानाचा सन्मान करण्याकरता शासनाने २ 3नोव्हेंबर ते 26 नोव्हेंबर या कालावधीत माझे संविधान माझा अभिमान हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी विविध शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करुन शाळा विद्यार्थी पालक लोकप्रतिनिधी विविध क्षेत्रातील मान्यवर व समाज यांना सहभागी करून घ्यावे व सकाळी दहा वाजता एकाच वेळी भारतीय संविधानातील उद्देशिकेचे वाचन करण्यात यावे .संविधानाची माहिती व्हावी यासाठी संविधान वर आधारित प्रश्न मंजुषा संविधानिक मूल्य आणि त्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश संविधान आणि शिक्षण इत्यादी विषयावर परिसंवाद ,तज्ञांनी प्रबोधनपर व्याख्याने यांचे आयोजन करावे .एवढे जरी केले तरी संविधाना समोरील आव्हाने पेलण्यासाठी मदत होईल .स्वातंत्र्य समता बंधुता न्याय तसेच प्रज्ञा शील करुणा मैत्रीया मूल्यांची बीजराज्यघटनेत रोवून भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यात आली .देशावर जर काही संकट आले तर सारे भारतीय भेद विसरून एकत्र येतात ही ताकद भारतीय संविधानाने दिली -त्यामुळे देशाचे एकात्मता कायम टिकून आहे.भारतीय संविधानात समोरील आव्हाने पेलण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना म्हणून भारताला प्रगत राष्ट्र मिळवून द्यावयाचे असेल तर ,भारतातील प्रचंड युवाशक्ती एकदिलाने कामाला लागली पाहिजे .तरच भारतीय संविधानाला बळकटी मिळेल

"सविधान हमारी आन है। तिरंगा हमारी शान है।
हिंदुस्तान हमारी जान है। हिंदुस्तान पे जान हमारी कुर्बान है।
ऐ हम सब की पहचान है।उस को शत शत प्रणाम है।
क्योंकि यह हम सबका अभिमान है। "

धन्यवाद

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार

**डॉ.भागवत पांडुरंग ठाकूर**
सहायक प्राध्यापक न्यू आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज,अहमदनगर
bhagwatthakur12@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतात इ.स. १८९० मध्ये महात्मा फुले नावाचा एक क्रांतिसूर्य मावळला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरच्या रूपाने एक ज्ञानसूर्य उदयास आला. विसावे शतक अनेक अर्थांनी क्रांतीच्या पेटलेल्या कुशीत जन्माला आलेले शतक आहे. प्रस्थापित सामाजिक , राजकीय आणि नैतिक मुल्यव्यवस्थेवर प्रचंड आघात करणाच्या घटना या शतकामध्ये घडून आल्या. एकीकडे देश स्वातंत्र्याच्या लढयातून प्रवास करीत होता तर दुसरीकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या युगाचा प्रसार होत होता. कारण डॉ. बाबसाहेब आंबेडकरांनी देश व समाजासाठी अहोरात्र कार्य करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक थोर समाजसुधारक भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार , उत्तम पत्रकार, शिक्षणतज्ञ , राजकीय नेतृत्व व दलित्तोधारक इ. गुण त्यांच्या अंगी होते. त्यामुळे त्यांना एक बहुआयामी व्यक्तीमत्व म्हणून संपूर्ण जगात ओळखले जाते. डॉ. बाबसाहेब आंबेडकरानी अनेक क्षेत्राविषयी विचार मांडलेले आहेत. यामध्ये आर्थिक , सामाजिक, राजकिय, शैक्षणिक व भौगोलिक इ. समावेश होतो. या सर्वच विचारांना त्या काळातही व आजही अत्यंत महत्व असलेले दिसून येते. डॉ . बाबसाहेब आंबेडकर एक चिकित्सक अर्थतज्ञ होते. त्यामूळे या शोधप्रबंधामध्ये त्यांच्या वरील अनेक विचारांपैकी आर्थिक विचार यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोलंबीया विदयापीठाने १९१५ मध्ये एम.ए. अर्थशास्त्र ही पदवी प्रदान केली. तसेच १९१७ मध्ये त्यांना अर्थशास्त्र या विषयामध्ये पीएच.डी. ही पदवी मिळाली. त्यानंतर १९२१ मध्ये ' लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ' ने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्थशास्त्र या विषयामध्ये ' डॉक्टर ऑफ सायन्स ' ही सवोच्च पदवी बहाल केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्थशास्त्रीय दृष्टीकोन अतिशय सुस्पष्ट आणि भारताच्याा सर्वांगिन विकासासाठी अत्यंत महत्वाचा होता. त्यांच्या अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा केंद्रबिंदू मानव व मानवाचा आर्थिक विकासातून घडून येणारा सामाजिक विकास हा होता. भारतीय आर्थिक विकास हा समाजातील खालच्या वर्गापर्यंत पोहचला तरच आर्थिक लोकशाही नांदेल असे त्यांचे मत होते. गरीब, दीनदुबळे, मागास समाज, कामगार व स्त्रिया या घटकांना अर्थशास्त्रात सामावून घेवून त्यांच्याा उद्धारासाठी कोणकोणते प्रयत्न करावे लागतील यांसबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार समजून घेणे गरजेचे आहे. त्या विचारांचा आढावा प्रस्तुत लेखात घेण्यात आला आहे.

**मौद्रिक अर्थव्यवस्थे संबंधी विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९२३ मध्ये 'दि प्रॉब्लेम ऑफ रूपी इटस ओरिजिन अॅण्ड सोल्युशन' हा ग्रंथ प्रकाशित केला. नंतर १९४७ मध्ये या संशोधनाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली. यामध्ये भारतीय रूपयाच्या उत्क्रांतीची ऐतिहासिक मीमांसा केली. यामध्ये चलन पद्धती, ग्रामीण अर्थव्यवस्था , वस्तू विनिमय, सोन्याचांदीच्या धातूची नाणी व आजचे कागदी चलन इ. घटकांचा समावेश होता. या ग्रंथात ते असे म्हणतात की, ब्रिटीश राजवटीपूर्वी मोगल साम्राजाच्या आर्थिक व्यवस्थेचा पाया अकबराने घातला. या काळापासून भारतात प्रामुख्याने चलन म्हणून सोने, चांदी व इतर धातूचा वापर केला जात असे. ब्रिटीशपूर्व राजवटीत नोकरांना व सैनिकांना वस्तूच्या स्वरूपात पगार दिला जात असे. ब्रिटीशांनी यात बदल करून रोख पैशाच्या स्वरूपामध्ये पगार देण्यास सुरूवात केली. तसेच शेतक-याकडूनकरही पैशाच्या स्वरूपात गोळा करायला सुरूवात केली. आंबेडकरांच्या मते जोपर्यंत रूपयाच्या सामान्य क्रयशक्तीमध्ये स्थिरता येत नाही तोपर्यंत हे चलन स्थिर **होउ** शकत नाही. या व्यवस्थेमूळे मूळ कारणाचा शोध घेण्याऐवजी फक्त लक्षणेच विचारात घेवून उपाय केले जात होते असे त्यांनी स्पष्ट केले.

**सार्वजनिक वित्त :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९१७ मध्ये ' द इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हीन्सीअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया ' हा प्रबंध प्रकाशित केला. जो सार्वजनिक वित्तासंबंधीच्या संशोधनाचा उत्कृष्ट नमूना म्हणून ओळखला जातो. या प्रबंधामध्ये त्यांनी तत्कालीन ब्रिटीश केंद्रसरकार आणि घटक राज्ये यांच्यातील आर्थिक सहसंबंधाबाबत विस्तृत असे विवेचन केले आहे. सन १८३३ ते १८५१ पर्यंत भारतीय सरकारच्या वित्त व्यवस्थेचे स्वरूप संपूर्णत: केंद्रिय स्वरूपाचे असल्याचे निदर्शनास येते. कायद्याने राज्य हे केंद्र

सरकारचे परंतु कार्यकारी शासन व्यवस्था मात्र घटक राज्याची असे स्वरूप होते. प्रत्येक घटक राज्य आपल्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून केंद्र सरकारला सादर करीत असे त्यानुसार महसूल गोळा करून राज्यांना पैसा पुरविण्याची जबाबदारी केंद्र सरकारकडे होती. यात घटक राज्याच्या मागण्या योग्य की अयोग्य हे तपासले जाण्याची यंत्रणा नव्हती. यामूळे गैरवाजवी मागण्याही मान्य कराव्या लागत असे. तत्कालीन परिस्थितीमध्ये महसुल गोळा करण्यासाठी जुलूम, जबरदस्ती, मीठासारख्या आवश्यक वस्तूवर कर अशा अन्यायकारक पद्धतीच्या आधारे कर गोळा केला जात असे. या काळात अर्थसंकल्पीय तूट मोठया प्रमाणात वाढल्यामूळे व खर्च याबाबत स्वतंत्र अर्थसंकल्पाबाबतचा विचार समोर आला.

**कृषीविषयक विचार :**

भारताच्या संविधानामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना मांडली. यातूनच भारताच्या विकासाची दिशा निश्चित झाली. भारताच्या मागासलेपणाचे मुख्य कारण हे भारताने स्विकारलेले भूमी धोरण हे आहे असे त्यांचे मत होते. वारसाहक्कामुळे जमीनीचे लहान लहान होणारे तुकडीकरण, जमीनदारी आणि खोती पद्धती तसेच शेतीवर असलेला लोकसंख्येचा अतिरिक्त भार या समस्यामूळे शेतीतून फायदा मिळत नाही हे त्यांच्या लक्षात आले. या समस्यांचे निर्मूलन करून शेती व शेतीशी संबंधीत असलेल्या घटकाचा विकास करता यावा यासाठी सहकारी शेती, शेतीचे एकत्रीकरण शेतीपुरक ग्रामीण व्यवसायाचा विस्तार छोटया कुटुंबाची कल्पना असे तत्कालीन समाजव्यवस्थेनुसार क्रांतीकारक ठरणारे विचार डॉ. बाबासाहेबांनी मांडले. सन १९१८ मध्ये त्यांनी 'भारतातील लहान धारण क्षेत्र आणि त्यावरील उपाय' हा लेख प्रकाशित केला. हा लेख म्हणजे भारताच्या शेती प्रश्नावरील मुलभूत असे भाष्य आहे. त्यामूळे नंतरच्या काळात शेती क्षेत्रात अत्यंत महत्वपूर्ण व गुणात्मक असे बदल घडून आले.

**शेतमजुर व कामगारासंबंधी विचार :**

ग्रामीण भागातील शेतमजूरांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी औदयोगिक कामगारांना जे फायदे मिळतात ते शेतमजूरांनाही मिळाले पाहिजेत असे मत मांडले. यामध्ये भविष्य निर्वाह निधी, नुकसान भरपाई, आरोग्य सेवा व विमा इ. चा यामध्ये समावेश करावा अशी शिफारस केली. त्यांच्या मते भारतातील शेतमजुरांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन हे दुस-याच्या शेतीत राबणे हे होय. शेतमजुरांना कामाची वेळ कामासंबंधी नियोजन व मजुरी ठरविण्याचा अधिकार नव्हता ते गुलाम होते असे त्यांचे मत होते. वेतम कमी व काम जास्त यातून त्यांचे आर्थिक शोषण होत असे. यामूळे त्यांची परिस्थिती बिकट बनते. ही परिस्थिती घालवण्यासाठी यांच्याकडे लक्ष देउन त्यांचे कल्याण करावे अशी त्यांनी भूमिका मांडली.

**उद्योगसंबंधीचे विचार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औदयोगिकरणाला विरोध न करता आधुनिक औद्योगिकरनाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते भारताचा आर्थिक विकास करण्यासाठी औद्योगिकरणमहत्वाचे आहे. परंतु त्यातून विषमता, संपत्तीचे केंद्रिकरण व मक्तेदारी यामध्ये वाद होउनये. देशाचा समतोल विकास व्हावा यासाठी शासनाने लक्ष घालावे.तसेच उदयोगाचे राष्ट्रियीकरण करून सार्वजनिक मालकीचे मुलभूत स्वरूपाचे उद्योग शासनाने चालवावेत उद्योग चालवण्यासाठी महामंडळे निर्माण करावीत. विमा उदयोगाचेराष्ट्रियीकरणकरावे अशी त्यांची भुमिका होती. त्यांच्या मते उद्योगधंद्यावरशासनाची मालकी प्रस्थापित झाल्यामुळे लोककल्याणाचा विचार होईल. यामुळे उत्पादनात वाढ होउन कामगारांना योग्य वेतन मिळेल. यासाठी ते १९४७ मध्ये कायदामंत्री असताना औदयोगिक कलह कायदा १९४७, कारखाने अधिनियम १९४८ व किमान वेतन कायदा १९४८ इ. कायदे करून कामगार व उदयोगसंबंधी महत्वाची भूमिका बजावली.

**जलव्यवस्थापनासंबंधी विचार :**

भारतीयांचा पाण्याच्या संदर्भातील दृष्टीकोण हा पारंपारीक असल्यामुळे तो विकासाला मारक होता. जलविकासाचा प्रश्न स्थानिक पातळीवर सोडविणे महत्वाचे नाही तर हा प्रश्न देश विकासाशी संबंधीत आहे. जलविकासाची जबाबदारी केंद्रीय पातळीने घेतली पाहिजे यासाठी ते आग्रही होते. शेतीला पुरेसे पाणी मिळावे यासाठी देशातील **मोठया नद्या** जोडण्याचा विचार पुढे आणला. दामोदर महानदी,कोसानदी, गंगा व ब्रम्हपुत्रा नदीवरील धरणे आणि वीजनिर्मिती प्रकल्प हाती घेतले. देशात जलसाधना आणि उर्जा साक्षरता निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भारताच्या संविधानामध्ये डॉ. बाबासाहेबांनी केंद्रीय जल आयोगाची रचना, प्रकल्प उभारणीसाठी प्राधीकरणे व जल धोरणासंबंधीच्या तरतुदी नमुद केल्या. यांच्या या विचारामुळेच जलसिंचन विषयक नियोजन तयार झाले.

**सारांश :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हे कार्य प्रदिप्त सूर्याच्या तेजाप्रमाणे दैदिप्यमान आहे. आर्थिक मागासलेपण हा भारताला लागलेला कलंक आहे तो पुसून टाकण्यासाठी त्यांनी वेगवेगळयाप्रकारचे प्रयत्न

केले. त्यांनी कृषी, उदयोग, करपद्धती, शेतमजूर, जलसिंचन, बॅकिंग अशा बहुअंगी घटकावर प्रकाश टाकला. ज्यामध्ये भारताच्या सर्वांगिण आणि शाश्वत विकासाची दुरदृष्टी दिसून येते. या दुरदृष्टीची सफलता भारतात आज नांदत असलेली पहावयास मिळते. त्यांच्या या विचारातूनच भारत आज आर्थिक,सामाजिक, राजकीय, व शैक्षणिक दृष्टया सक्षम होत असलेला पहाण्यास मिळत आहे.

**संदर्भ :**

1. धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, साधने प्रकाशन समिती १९७६.
2. डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन , पुणे (१९९२)
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे भाग : १ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती (२००२)
4. डॉ. दत्तात्रय गायकवाड, जलतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर , डॉ.बाबासाहेब आंबेडकर नॉलेज मिशन प्रकाशन (२०१६)
5. डॉ. एस.एस. गाठाळ महाराष्ट्रातील समाजसुधारक, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद (२०१६)
6. अर्थसंवाद मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक एप्रिल,जुन (२०१६)खंड ४०.
7. दैनिक लोकसत्ता दि.१० एप्रिल २०१६.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महार वतन आणि अस्पृश्यांची गुलामगिरी

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी. ता.गगनबावडा
ईमेल: jadhavjj01@gmail.com

**प्रस्तावना:**

ब्रिटिशपूर्व भारतात गावपातळीवर प्रशासनासाठी आलुतेदार आणि बलुतेदारांची व्यवस्था होती. ते गावच्या सर्व गरजा पूर्ण करत असत. यामध्ये अठरा अलुतेदार आणि बारा बलुतेदारांचा प्रामुख्याने समावेश होता. आलुतेदार व बलुतेदार जाती व्यवस्थेशी निगडित असून त्यांना गावगाड्यातील विविध कामे पार पाडावी लागत होती. त्या बदल्यात त्यांना सेवेचा मोबदला म्हणून रयतेकडून धान्य स्वरूपात बलुते मिळत असत. पुढे पेशवाईच्या काळात त्यांची संख्या वाढत गेलेली दिसून येते. पण जेव्हा ब्रिटिश अंमल सुरु झाला तेव्हा ब्रिटिशांनी प्रशासनाच्या सोयीसाठी या आलुतेदार व बलुतेदारांची तीन वर्गात विभागणी केली. त्यानुसार १) सरकारी कामासाठी आवश्यक वतनी गावकामगार २) रयत कामासाठी आवश्यक वतनी गावकामगार आणि ३) सरकार आणि रयत दोघांच्यासाठी आवश्यक वतनी गावकामगार असे वर्गीकरण केले. वरीलपैकी दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्गातील गावकामगारांना ब्रिटिशांनी गावच्या व सरकारी कामाच्या जबाबदारीतून मुक्त केले तसेच त्यांना वतन ॲक्ट कायदा लागू केला नाही. तर सरकारला उपयोगी असणाऱ्या पहिल्या वर्गातील लोकांना इसवी सन १८७४ चा वतनी कायदा लागू करून पाटील, कुलकर्णी आणि महार अशी वतनदारांची निर्मिती केली. हे तिन्ही वतनदार सरकारी कामात महत्त्वपूर्ण भूमिका पार पडत असत. पाटील वतनदार हा गावच्या प्रशासनातील महत्त्वाचा घटक असून गावात शांतता, सुव्यवस्था राखणे, याबरोबरच गावचा महसूल गोळा करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत असे. कुलकर्णी वतनदार हे गावच्या महसुल जमाखर्चाचा हिशोब ठेवणे व गावच्या पाटलास कामात मदत करत असे. या दोन्ही वतनदारांना गावात मानसन्मान असे. त्यांचे वतन हे मानाचे तसेच प्रतिष्ठेचे समजले जाई. तर महार वतनदार हा सरकारी आणि रयत यांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाचा घटक होता. कारण तो सरकारी कामाच्या जबाबदारी बरोबरच रयतेची सेवा सुद्धा करत असे.

सरकारी अधिकारी गावात आला असता, त्याचा बंदोबस्त ठेवण्यापासून सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या तो पार पडत असे. याशिवाय रयतेची सर्व प्रकारची कामे तो करत असे. त्याला या सेवेबद्दल सरकारकडून इनामी जमीन तर रयतेकडून धान्य स्वरूपात बलुता मिळत असे. सतत २४ तास सरकार आणि रयतेसाठी राबणाऱ्या महार वतनदाराचे कामाचे स्वरूप मात्र निश्चित नव्हते. त्यामुळे महार वतनदारांची अवस्था ही सांगकाम्या सारखी झाली होती. त्याला समाजात मान-सन्मान किंवा प्रतिष्ठा नव्हती. शिवाय, महार वतनदार हा गावगाड्यातील जाती व्यवस्थेनुसार सर्वात शेवटच्या वर्गात येत असल्यामुळे तो अस्पृश्य म्हणून ओळखला जात असे. महार हा गावगाड्यातील व सरकारी व्यवस्थेतील महत्त्वाचा वतनदार असून सुद्धा त्याला गुलामगिरी करावी लागत होती.[1] यासाठी ब्रिटिश सरकारचा इसवी सन १८७४ चा वतनी कायदा आणि हिंदू धर्मातील जातीव्यवस्था कारणीभूत होती हे दिसून येते. या वतनापोटी अस्पृश्यांच्यातील महत्त्वकांक्षा नाहीशी झाली होती. तसेच वतनापेक्षा काही मोठे नाही असे त्यास वाटल्याने तो दिशाहीन झाला होता. त्यामुळे वतन बंद झाले तरच त्यांच्यातील महत्त्वकांक्षा जागी होईल.

आणि त्याच्या जगण्याच्या दिशा मोकळया होतील. म्हणून महार वतन खालसा झाले पाहिजे ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतली. व त्यातून महार वतन खालसा करण्याची प्रक्रिया सुरू झाली.

प्रस्तुत संशोधनपर निबंधात महार वतन आणि त्यामुळे महार लोकांच्या वाट्याला आलेली गुलामगिरी या अनुषंगाने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**उद्दिष्टे:**

१) महार वतन आणि अस्पृश्यांची गुलामगिरी सहसंबंध या अनुषंगाने अभ्यास करणे.

२) महार वतनाचा कायदा आणि त्याचे स्वरूप समजावून घेणे.

३) महार वतन खालसा करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शाहू महाराज यांची भूमिका समजावून घेणे.

**महत्व:**

ब्रिटिश अमदनीत सरकारची व गावची कामे करण्यासाठी वतनी इनामी जमीन दिली जात होती. ज्यांना वतन दिले जाते त्यांना वतनदार म्हटले जाई. ब्रिटिश काळात प्रामुख्याने पाटील, कुलकर्णी आणि महार अशी तीन वतने दिली गेली होती. यापैकी पाटील, कुलकर्णी वतनास समाजात मानाचे आणि प्रतिष्ठेचे समजले जात होते. पण महार वतन म्हणजे एक प्रकारची गुलामगिरी होती. या वतनाने महार लोकांचा आत्मसन्मान व माणूस म्हणून जगण्याच्या सर्व आशा संपुष्टात आणल्या होत्या. या वतनाने महारांना स्वाभिमानशून्य बनवले. तेव्हा अशा पद्धतीचे महार वतन खालसा करून त्यांना जगण्याच्या दाहीदिशा मुक्त करून देणे, त्यांची आत्उन्नती करणे यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज यांनी विशेष प्रयत्न केले. आणि महार वतन खालसा करून अस्पृश्याना सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून माणुसकी चे सर्व हक्क आणि अधिकार त्बहाल केले.

**वतन म्हणजे काय?**

वतन या शब्दाला इतिहासात फार मोठा अर्थ आहे. वतन म्हणजे मिळकत, एखादी वंशपरंपरेने चालत आलेली गोष्ट किंवा वंशपरंपरागत हुद्दा आणि त्या संबंधित असणारे सर्व प्रकारचे हक्क आणि अधिकार या सर्वांनी मिळून वतन बनत असे. वतन देण्याचीही प्रथा आणि परंपरा फार पूर्वीपासून आपल्या देशात होती. वतन हे मानाचे आणि प्रतिष्ठेचे मानले गेले होते. हे वतन ज्या व्यक्तीस मिळत असे त्या व्यक्तीस वतनदार म्हणून ओळखले जात होते. या वतनदारांच्याकडे स्वतःच्या हक्काची वतनी मिळकत असे. त्यावर त्यांचा सर्वस्वी अमंल असे. हे वतनदार त्या प्रदेशाचे स्वतःला एक प्रकारे राजाच समजत असत. पण ब्रिटिश आमदनीत १८७४ च्या वतीने कायद्यानुसार सरकारी सारावसूल करण्यासाठी किंवा कारभार पाहण्यासाठी एखादा हुद्दा देण्यात येत असे. हा हुद्दा वंशपरंपरागत चालत असे. यासाठी त्या व्यक्तीस इनामी जमीन देण्यात येत असे. ती व्यक्ती वतनदार म्हणून ओळखली जात असे. ब्रिटिश काळात प्रामुख्याने ग्रामप्रशासनासाठी पाटील, कुलकर्णी आणि महार या तीन प्रमुख वतनदारांची निर्मिती करण्यात आली होती. जे ब्रिटिश काळात प्रशासनात महत्त्वाची भूमिका पार पडत होते.[2]

**ब्रिटीशांचा वतनी कायदा आणि महार वतन:**

इसवी सन १८७४ च्या ब्रिटिश वतनी कायद्याने भारतातील अलुतेदार व बलुतेदार व्यवस्था संपुष्टात आणून त्यांनी राज्यकारभारासाठी स्वतंत्रपणे तीन वतनदारांची निर्मिती केली. त्यामध्ये पाटील, कुलकर्णी आणि महार या तीन लोकांचा प्रामुख्याने समावेश होता. यामधील पाटील, कुलकर्णी हे वतन मानाचे आणि प्रतिष्ठेचे होते. तसेच त्यांच्या कामाचे स्वरूप सुद्धा कायद्याने निश्चित करण्यात आले होते. पण महार वतन आणि त्या संबंधित कामाचे स्वरूप मात्र निश्चित नव्हते. तसेच राबणाऱ्या माणसांची संख्या सुद्धा निश्चित नव्हती. इतकेच नाही तर कामाची वेळ सुद्धा निश्चित नव्हती. त्यामुळे महार वतनदार म्हणजे २४ तास राबणारा, पडेल ते काम करणारा,

हरकाम्या होता. त्यांची कामे निश्चित करण्यात यावी म्हणून १८७४ चा वतनी कायदा कलम १८, ६९ आणि ८३ मध्ये बदल करून महार वतनदारांच्या कामाचे स्वरूप ठरवणे संदर्भात ब्रिटिश कौन्सिलमध्ये चर्चा झाली. पण ब्रिटिशांना महार लोकांच्यासारख्या सांगकामे करणाऱ्या लोकांची आवश्यकता असल्याने त्यांच्या कामाचे स्वरूप बदलण्यास नकार दिला.[3] त्याचबरोबर त्यांची कामे ठरविण्याचा सर्वस्वी अधिकार हा जिल्हा कलेक्टरना देण्यात आला. ज्यामुळे त्यांच्या कामाच्या यादीत इतर कोणतीही कामे धूसडून त्यांना वेठबिगारी करण्यास भाग पाडले जात होते. ही वेठबिगारी म्हणजे एक प्रकारची बेबंदशाही होती. यामुळे या महार लोकांची अवस्था गुलामासारखी झाली होती. यासाठी सर्वस्वी ब्रिटीशांचा वतनी कायदा जबाबदार होता असे दिसून येते.

**महार म्हणजे सांगकाम्या वतनदार:**

ब्रिटिश कौन्सिलने महार वतनदारांची कामे कायद्याने निश्चित न केल्याने महार वतनदारांची अवस्था ही सांगकाम्या किंवा हरकाम्या ची झाली होती. खरे पाहता महार वतनदार हा ग्रामप्रशासनातील एक महत्त्वाचा वतनदार असताना सुद्धा त्यांची अवस्था ही गुलामासारखी होती. तो ब्रिटिश सरकारचा वतनी कामगार होता तसेच तो रयतेचा सुद्धा सेवक होता. त्यामुळे त्यास अनेक प्रकारची कामे करावी लागत होती. सर्वसाधारणपणे सरकारी वसूल करणे, तो तालुक्याच्या कचेरीत पोहोचवणे, तालुक्याच्या ठिकाणी पत्रे पोहोचवणे, जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे, सरकारी अंमलदार यांचा बंदोबस्त ठेवणे, या सरकारी कामाव्यतिरिक्त महार वतनदारास वेठबिगार म्हणून म्हणजेच विनामोबदला रयतेची जवळजवळ ४३ प्रकारची कामे करावी लागत होती. बिगारी कामासाठी महार लोकांना एका कामासाठी मैलोनमैल प्रवास उन्हातानात करावा लागे. त्याचबरोबर गावपातळीवर मयतास जाळण्यासाठी लाकडे तयार ठेवणे, त्यांच्या नातेवाईकांना वर्दी देणे, मेलेली जनावरे ओढणे, लग्न समारंभ प्रसंगी लाकडे फोडणे, धान्य मळणीसाठी खळी तयार करणे इत्यादी.[4] वरील कामांचे स्वरूप पाहिले तर लक्षात येईल की, महार वतनदार वसुली करताना सरकारी शिपाई, जन्ममृत्यु नोंदीच्या वेळी आरोग्य खात्याचा शिपाई, जमीन मोजणीच्या वेळी सेंट्रलमेंट खात्याचा शिपाई, जंगल संबंधित फॉरेस्ट खात्याचा शिपाई म्हणजे थोडक्यात कोणतेही काम आणि कोणतेही खाते असले तरी त्या ठिकाणी महार व्यक्तीस कामासाठी धाडले जाई.[5] केवळ एका जमिनीच्या तुकड्यासाठी आणि रयतेकडून मिळणाऱ्या मूठभर बलुत्यात्साठी महार लोकांची अवस्था ही खूप दयनीय झाली होती. शिवाय मेलेली जनावरे ओढणे हे महार वतनदाराचे काम नसताना हे गलिच्छ काम त्याच्यावर लादले गेल्याने हिंदू लोक त्यांना गलिच्छ अस्पृश्य समजू लागले. त्यामुळे ही अस्पृश्यता संपवायची असेल तर महार वतनदारास रयतेच्या कामातून मुक्त करणे गरजेचे होते. आणि म्हणून महार वतन खालसा करण्यात यावे अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली दिसून येते.

**महार वतनाचे स्वरूप:**

ज्या वतनासाठी महार लोकांना गुलामगिरी करावी लागते, ज्या वतनासाठी महार स्वाभिमानशून्य झाले, ज्या वतनासाठी त्यांचे जीवन पराधीन झाले त्या वतनाचे नेमके स्वरूप काय होते? हे पाहणे गरजेचे आहे. महार वतनापोटी महार लोकांना जे उत्पन्न मिळत होते. त्यामध्ये प्रामुख्याने सरकारकडून देण्यात येणारी इनाम जमीन होती. पण ही जमीन नेहमी त्यांच्या मालकीची राहील याची खात्री नव्हती. खरे तर इसवी सन १८२७ च्या कायद्यानुसार भाऊबंदकीचा बाहेर जमीन हस्तांतरित करता येत नसताना, महार लोकांच्या अनेक जमिनी परकीयांच्या ताब्यात गेलेल्या नोंदी दिसून येतात. शिवाय या जमीनी परत मिळवण्या संदर्भात कायद्यामध्ये कोणतीही विशेष तरतूद करण्यात आलेली नव्हती. ज्यामुळे या जमिनी सरकार कधीही काढून घेत असे. अशा अस्थिर स्वरूपाच्या इनाम जमिनी साठी महार लोक लाचार आणि सांगकामे झालेले होते. या व्यतिरिक्त महार लोकांना वेठबिगारी कामासाठी रयतेकडून बलुता मिळत असे. पण तो ही मिळण्याची खात्री देता येत नव्हती. कारण तो वसूल

करण्याची कोणतीही तरतूद सरकारी कायद्यात नव्हती. शिवाय हा बलुता महार लोकांना देऊन आपण त्यांना जगवतो आहोत असा रयतेचा समज झाला होता.[6] यामुळे त्यांचा उद्दामपणा वाढला होता. खरे पाहिले तर बलूता सरकारी कामाचा मोबदला होता पण प्रत्यक्षात तशी परिस्थिती नव्हती. महागाई, दुष्काळ या काळात महाराचे काम वाढले तरी बलुता मात्र कधीच वाढत नसे. थोडक्यात, काय तर बलुते म्हणजे भीक आणि महार म्हणजे भिकारी असा समाजाचा समज झाला होता. ज्यामुळे त्यांची अवस्था ही गुलामासारखी होऊन त्यांचे जीवन स्वाभिमानशून्य झाले होते.

**महार वतन खालसा करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका:**

वतन ही अत्यंत जिव्हाळयाची गोष्ट आहे ते सोडण्यास कोणीही सहजासहजी तयार होत नाही. वतनासाठी पाटील, कुलकर्णी लोक प्राण देण्यास तयार असतात. असे असताना महारांचे वतन खालसा करावे अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेली भूमिका म्हणजे खूप विलक्षण वाटते. पण त्यास तशी कारणे सुद्धा होती. एक तर महार लोक वतानामुळे स्वाभिमानशून्य झाले होते. त्यांच्यातील महत्वकांक्षा पूर्णपणे मारली गेली होती. वतन नसेल तर आपण जगूच शकणार नाही असे त्यांना वाटत होते. त्यामुळे टीचभर तुकड्यासाठी आणि मूठभर मिळणाऱ्या बलूत्यासाठी महार लोक लाचार झाले होते. आपण मोठे व्हावे, व्यवसाय करावा, शिक्षण घेऊन बॅरिस्टर, कलेक्टर बनावे असे त्यांना कधीच वाटत नव्हते. वेसरकराचा हुद्दाच त्यांना मोठा वाटत होता आणि तेच स्वप्न ते आपल्या मुलाबाळांना सुद्धा दाखवत असत. त्यामुळे जोपर्यंत महारांचे वतन खालसा होणार नाही तोपर्यंत त्यांच्यात सुधारणा होणार नाही.[7] हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजले होते. त्यामुळे महार लोकांना वतनाच्या गुलामगिरीतून बाहेर काढून त्यांना दाहीदिशा मोकळया करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटिश सरकारला महार वतन खालसा करण्यासंदर्भात वेळोवेळी सूचना केल्या. त्याचबरोबर महार वतन खालसा झाले तरी महार लोकांना मिळालेली इनाम जमीन जाणार नाही याची खात्री सुद्धा बाबासाहेबांनी लोकांना दिली. शिवाय, बाबासाहेबांनी ब्रिटिश सरकारला हे दाखवून दिले होते की, महार लोकांना मिळणारा बलूता हा रयत कामाचा नसून तो सरकारी कामाचा असून तो वसूल करण्याचा सर्वस्वी अधिकार ब्रिटिश सरकारचा आहे.[8]

यासाठी महार लोकांना वेठीस धरता येणार नाही. तसेच सरकारी काम व रयतेचे काम या दोन्ही गोष्टी वेगवेगळया असून या दोन्ही मधील कोणते काम करावे या संदर्भातील निर्णय घेण्याचे सर्वस्वी स्वातंत्र्य महार लोकांना असले पाहिजे ही भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडली होती.[9] महार वतनाचा प्रश्न फक्त महारांच्यापुरता नसून संपूर्ण महाराष्ट्रातील अस्पृश्य जातीचा आहे. आणि त्यामुळे अस्पृश्यता निवारणासाठी महार वतन खालसा झालेच पाहिजे अशी ठाम भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतलेली होती. इतकेच नाही तर त्यांनी छत्रपती शाहू महाराजांना महार वतन आणि अस्पृश्यांची गुलामगिरी या संदर्भात माहिती देऊन आपल्या संस्थानातील महार लोकांचे वतन जबरदस्तीने खालसा करण्यासंदर्भात विनंती केली होती. त्यातूनच पुढे शाहू महाराजांनी वतनाच्या या मगरमिठीतून महार लोकांना वटहुकूम काढून मुक्त केल्याचे दिसून येते.

**छत्रपती शाहू महाराजांचे महार वतन खालसा धोरण:**

कोल्हापूर संस्थानात महार वतना संदर्भात शाहू महाराजांचे धोरण हे अत्यंत महत्त्वाचे ठरले होते. महार वतन खालसा करण्यासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी धरलेला आग्रह आणि महार वतनापायी महार लोकांची झालेली वाईट अवस्था पाहून शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून काही धोरणात्मक निर्णय घेतले होते. महार वतन खालसा झाले तरी इनाम जमीन हातून जाईल ही भीती घालवण्यासाठी शाहू महाराजांनी महार वतनाच्या जमिनीचे सर्वप्रथम रयतवा करून घेतले आणि जमिनीवर त्यांचा मालकी हक्क प्रस्थापित केला. यासाठी शाहू महाराजांनी इसवी सन २६ जून १९१८ रोजी महार लोकांचे उत्पन्न बलुते खुतातून कमी करून गाव हकदार

खुतात दाखल करण्यासंदर्भात एक वटहुकूम काढला. त्यानुसार आता महार लोकांच्या जमिनी रायतवा होऊन त्यांना इतर रयतेप्रमाणे जमीनीवरील शेतसारा भरावा लागणार होता. शाहू महाराजांच्या या निर्णयामुळे जमिनीचे वतनी स्वरूप नष्ट होऊन महार लोक सामान्य रयत झाली. याचबरोबर कोल्हापूर संस्थानांमध्ये असणारी **वेठरवळा** नावाची पद्धतसुद्धा संपुष्टात आली. ही वेठरवळा म्हणजे विनामोबदला काम करून घेण्याची पद्धत होती. म्हणजे महारकी वतनाबरोबर महारलोकांच्या पायात वेठरवळा नावाची बेडी सुद्धा घातलेली होती. ज्यामुळे महार लोक गाव सोडून बाहेर जाऊ शकत नव्हते. ही सुद्धा एक प्रकारची गुलामगिरीच होती. शाहू महाराजांनी जबरदस्तीने हे महार वतन खालसा करून लोकांच्या पायातील ही बेडी काढून टाकली व त्यांना मुक्त केले. इतकेच नाही तर कोणीही महार व्यक्तीस वेठीस धरले तर त्यास वतनामधून कमी केले जाईल आणि जर ती व्यक्ती सरकारी अधिकारी असेल तर त्यास विना पेन्शन नोकरीतून काढून टाकले जाईल असा वटहुकूम जारी केला होता. या संदर्भात शाहू महाराज म्हणतात की, माझा सर्व खजिना रिकामा झाला तरी त्याची मला परवा नाही पण माणसाला माणसापासून वंचित करणारी ही रूढी मला मोडायची आहे.[10] महार वतन खालसा करण्याची प्रक्रिया शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १९१८ साली सुरू करून १९२१ सलापर्यंत संपुष्टात आणली.[11] पुढे स्वातंत्र्यानंतर मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी शाहू, फुले आंबेडकर विचारांचा हाच धागा पकडून महाराष्ट्रातील महार वतने खालसा करून महार लोकांची गुलामगिरीतून मुक्तता केलेली दिसून येते.

**निष्कर्ष:**

१) वतन हे मानाचे प्रतिष्ठेचे मानले गेले होते पण महार वतनाने महार लोकांना स्वाभिमानशुन्य बनवून गुलामगिरी करण्यास भाग पाडल्याचे दिसून येते.

२) वतनामुळे महार लोकांची महत्त्वकांक्षा पार मारली जाऊन ते दिशाहीन झाले होते.

३) महार वतन खालसा झाल्याने महार लोकांना दाहीदिशा मोकळया झाल्या व ते आत्मनिर्भर बनले आणि इतर उद्योग व्यवसायाकडे वळाले.

४) भाकरी पेक्षा इज्जत प्यारी या आंबेडकरांच्या विचाराने प्रभावित होऊन तो वाटचाल करू लागला.

**संदर्भ:**

१) फडके भालचंद्र, डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९, पृ. २५, २७.

२) मुन वसंत(संपा.,) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत व मूकनायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजश्री शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००८, पृ. ९०.

३) तत्रैव पृ. ९०.

४) तत्रैव पृ. ९२.

५) तत्रैव पृ. ९१.

६) तत्रैव पृ. ९८, ९९.

७) डॉ. श्रीपाल सबनीस, भारतरत्न आणि बहिष्कृत भारत, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर, १९९१, पृ. ३८, ३९.

८) मुन वसंत (संपा.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारत व मूकनायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजश्री शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, २००८, पृ.१०६.

९) हरी नरके (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १९ भाग-१, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने, प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण, शिक्षण विभाग, २००५, पृ. ३०७, ३०८.

१०) पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी छत्रपती महाराज गौरव ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१, पृ. ७९.

११) तत्रैव, पृ. ८०.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# विचारवंत आणि सुधारक छत्रपती शाहू महाराज

**डॉ.खाडप संजय बाबुराव**
मराठी विभाग प्रमुख वसुंधरा महाविद्यालय, घाटनांदूर ता.अंबाजोगाई, जि.बीड

**प्रस्तावना :**

लोकहितवादी, जाणता राजा छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म कोल्हापूर संस्थानातील कागलगाव येथे घाडगे कुटुंबात झाला. त्यांचे वडील आबासाहेब व आई राधाबाई घाडगे होय. त्यांना कोल्हापूर संस्थानिकाचे राजे छत्रपती शिवाजी महाराज व महाराणी आनंदीबाई यांनी दत्तक घेतले. त्यांचा राज्यरोहण 17 मार्च 1894 रोजी झाला त्यांनी 2 एप्रिल 1894 पासून राज्याच्या कारभाराची सर्व सुत्रे आपल्या हाती घेतली.

छत्रपती शाहू महाराजांची विचार सरणी आणि कार्य प्रखड होते. त्यांनी तत्कालीन समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा आणि सामाजिक भेदभाव संपुष्टात आणण्याकरिता कठोर कायदे केले. त्याच बरोबर त्यांनी संस्थानातील कारभार पारदर्शक आणि सामान्य नागरीकांना न्याय मिळवून देण्याकरिता सर्वच जाती धर्मातील स्त्री-पुरुषांना सत्तेत सहभागी होता यावे, याकरिता आरक्षणाची सुविधा केली. शाहु महाराजांनी सर्वच जनतेच्या विकासा करिता शैक्षणिक सुविधा, शैक्षणिक कायदे, अस्पृश्यता निमुर्लन कायदे, अस्पृश्यांना राजकीय व शासकीय कार्यात सहभाग, स्त्रीयांना,-पुरुषासमान अधिकार, जातीभेद निर्मुलनाचे धोरण इत्यादीचे विचार प्रखड मांडून त्या धोरणाची अमंलबजावणी चोख व्हावी, या करिता कायदे केले. कायद्याचे पालन व्हावे, या करिता स्वत: त्यावर नियंत्रण ठेवले. अशा जनहितवादी शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा आढावा घेण्याच्या हेतूने सदरील शोध निबंधाच्या मांडणी करीता पुढील प्रमाणे संशोधनाच्या उद्दिष्टांची मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) छत्रपती शाहू महाराजांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे.
2) छत्रपती शाहू महाराजांचा वैचारीक दृष्टीकोन समजून घेणे.
3) छत्रपती शाहू महाराजांच्या सुधारणा विषयक कार्याचा अभ्यास करणे.
4) छत्रपती शाहू महाराजांच्या विचार आणि सुधारणांचा परिणाम अभ्यासणे.

प्रस्तुत संशोधनाच्या उद्दिष्टांच्या अध्ययनाकरिता पुढीलप्रमाणे गृहितकृत्यांची मांडणी करण्यात आली आहे.

**गृहीतके :**

1) छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव महाराष्ट्रातील विचारवंतावर दिसून येतो.
2) देशाच्या विकास प्रक्रियावर छत्रपती शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याचा प्रभाव आहे.
3) पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीत छत्रपती शाहू महाराजांच्या विचार आणि कार्याचे योगदान आहे.
4) सदरील गृहितकृत्यांच्या पडताळणीकरिता खालीलप्रमाणे संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनाकरिता प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात आला आहे. या मध्ये प्रामुख्याने संशोधन विषयाला अनुसरुन विविध संदर्भग्रंथ, मासिके, वृत्तपत्रातील लेख, अप्रकाशीत झालेले एम.फिल., पीएच.डी. चे प्रबंध. इत्यादींचा अवलंब करण्यात आला. त्याचबरोबर इंटरनेटचाही वापर करण्यात आला आहे. सदरील संशोधन विषयाच्या मांडणी करिता पुढील प्रमाणे संशोधन आराखडयाचा अवलंब करण्यात आला.

**संशोधन आराखडा :**

सदरील संशोधन विषयाच्या मांडणीकरिता प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा अवलंब करण्यात आला. यामध्ये दुय्यम स्त्रोतातील तथ्यांचे वर्णन शाब्दीक स्वरुपात करण्यात आले.

**विषय प्रतिपादन :**

राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील अंधश्रध्दा दुरकरण्याच्या दृष्टीने शिक्षणासंबंधी विचार मांडले. त्यांनी शिक्षणाचा विचार मांडीत असताना स्त्री-पुरुष यांना सामान अधिकार दिला. त्याचबरोबर त्यांनी सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना शिक्षण घेता यावे 28 मार्च 1884 रोजी डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना केली. तर 18 एप्रिल 1901 रोजी व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगची स्थापना केली. त्याचबरोबर त्यांनी अस्पृश्यांच्या मुला-मुलींकरिता बोर्डिंग वीरशैव लिंगायत वसतीगृह, मुस्लीम बोर्डिंग, मिस क्लार्क हॉस्टेल, पांचाळ, ब्राम्हण वसतीगृह, इंडियन ख्रिश्चन होस्टेल, इत्यादीची स्थापना केली. त्यांनी गरीबांच्या मुलांना सहज व सुखकर शिक्षण मिळावे या करिता 19 सप्टेंबर 1917 रोजी मोफत व सक्तीच्या शिक्षणाची सुविधा निर्माण केली. त्यांच्या शैक्षणिक कायार्मुळे आज सर्वत्र त्यांच्या शैक्षणिक विचार आणि कार्याचा प्रभाव दिसून येत आहे. समाजात परंपरेने चालत आलेल्या धार्मिक रुढी, परंपरा मोडण्याकरिता शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निर्मुलनावर अधिक भर दिला. त्यांनी या करिता अस्पृश्यांना शासकीय नोकरीमध्ये आरक्षण दिले. त्यामुळे ब्राम्हण, अस्पृश्य, सवर्ण इत्यादी समाजामध्ये असलेला भेदभाव संप्ुष्टात आणण्याकरिता प्रखड दिशा मिळाली. या त्यांच्या कृतीमुळे वर्तमान काळात अस्पृश्यता निर्मुलन कायदे अस्तीत्वात आलेले दिसून येत आहेत. संस्थानातील गरीब जनतेचा आर्थिक विकास घडून यावा, या करिता शाहू महाराजांनी अस्पृश्यांना लघू उद्योगाची सुविधा निर्माण करुन दिली. यामध्ये चहाचे हॉटेल, पान सेंटर, किराणा दुकान, दुग्ध व्यवसाय, इत्यादी करिता आर्थिक मदत ही केली.शाहू महाराजांचे विचार हे सर्वच क्षेत्रात प्रखडपणे दिसून येतात. त्यांनी राजकीय घटकांचा विचार करुन सर्वच स्त्री-पुरुष, जाती-धर्माच्या व्यक्तींना वेगवेगळया संघटना व मंडळावर नियुक्त करण्यात आले. त्यामुळे राजकीय क्षेत्रात सर्वांचाच सहभाग वाढला. प्रत्येकांच्या विचाराला महत्व प्राप्त झाले. त्यामुळे स्त्रीया व अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायाला पायबंद बसला. त्यांना राजकीय घटकातून राजकीय, सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, स्वातंत्र्य मिळाले. शाहू महाराजांच्या राजकीय घटकांच्या विचाराचा आणि कार्याचा परिणाम स्वातंत्र्योत्तर काळात राजकीय घटकावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

शाहू महाराजांनी समाजाच्या उपजिवीकेचे साधन शेती हे ओळखून शेती उद्योगाचा विकास करण्याकरिता सुक्ष्म स्वरुपाचे विचार मांडले. त्यांनी आपले विचार शेती करिता, पाणी व्यवस्थापन करण्याकरिता, कोल्हापूर बंधारे, शेत विहिर, बारव, शेततळे, शेत बंधारे इत्यादीची निर्मिती करुन स्पष्ट केले. त्यांनी शेती विषय केलेले कार्य आणि शेती उत्पादना संबंधीचे विचार वर्तमान काळातील राजकीय पुढारी वापरीत असलेले दिसून येत आहेत. शाहू महाराज हे कर्ते सुधार होते. त्यांचे विचार सामान्य जनतेवर पडलेले होते. शाहू महाराजांच्या विचाराचे अनुकरण जनता मोठया प्रमाणात करीत होती. त्यांनी केलेल्या कायद्याचे पालन जनता स्वइच्छेने करीत असे. यामध्ये मुलीच्या शिक्षणाला प्राधान्य, स्त्रीयांना पुरुषा समान अधिकार, बालविवाह बंदी, कुमारी जरठ विवाहाला विरोध, संमती विवाहचा पुरस्कार, विधवा पुनर्विवाहाला मान्यता, बहुपत्नी विवाहाला विरोध, मुलगा-मुलगी समानता, इत्यादी विचाराचे अनुकरण जनतेने केले आहे. म्हणूनच शाहू महाराज हे एक कर्ते सुधारक मानले जात आहेत.

शाहू महाराज कष्टकरी समाजाला दैवत मानीत होते. कारण त्यांनी श्रमाला संपत्ती मानले होते. त्यांच्या मते शेतीवरील अतिरिक्त मजुरांचे स्थलांतर होणे गरजेचे होते. त्यामुळे त्यांनी इ.स. 1918 मध्ये मजूर संघटना निर्माण करुन त्यांना श्रम विक्रीचे अधिकार दिले. त्यांच्या संघटनेची स्थापना करुन, मजुरांना योग्य रोजगार व सुविधा निर्माण करुन दिल्या आहेत.

**निष्कर्ष :**

छत्रपती शाहू महाराज यांनी मांडलेल्या विचाराचा प्रभाव आजही भारतीय व्यक्तींच्या मनावर बिंबवत आहे. त्यांचे विचाराचे अनुकरण समाज सुधारक, राजकीय नेते, शैक्षणिक संस्था आणि शासन करीत आहे. सामाजिक सुधारणा, राजकीय व्यवस्था, शैक्षणिक सुविधा, सामाजिक एकात्मता, दुर्बल घटकंाचा विकास करण्यावर भर देत आहे. शाहू महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन करीत असताना स्पष्ट होते की, शाहू महाराजांचे विचार व कार्य हे वर्तमान व भविष्यातील पिढयांना मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरणारे आहेत.

**सारांश :**

शाहू महाराज हे प्रगल्भ विचारांची शिदोरी आहे. त्यांच्या विचारात मानव आणि मानवी जीवनाचा विकास याची दिशा आहे. त्यांच्या कार्याच्या अनुकरणातून मनाला कोणत्या पध्दतीने सुखी जीवन जगता येईल, याची प्रेरणा व दिशा प्राप्त होत आहे. म्हणूनच संशोधकांनी छत्रपती शाहू महाराजांचे विचार आणि कार्य हा उदांत विषय संशोधना करिता घेतलेला दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

1) डॉ.रा.ना.घाटोळे सामजिक संशोधन पध्दती व तत्वे, मंगेश प्रकाशन नागपूर.
2) डॉ.काचोळे दा.धो. सामाजिक संशोधन पध्दती, कैलाश पब्लिकेशन्स औरंगाबाद.
3) प्राचार्य रा.तु.भगत **राजर्षी शाहू छत्रपती**, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर.
4) डॉ.करपे आर.एन. **राजर्षी शाहू महाराज आणि वर्तमानातील संदर्भ,** चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5) डॉ.रामभाऊ मुटकुळे **महाराष्ट्राचे शिल्पकार** चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
6) डॉ.आर.एस.कोडेकर रयतेचा राजा **राजर्षी शाहू महाराज** अरुणा प्रकाशन,लातूर.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले : वाङ्मय आणि कार्य

**प्रा. डॉ. देशमुख बिभीषण**
वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी. ता.जि.उस्मानाबाद.
E-mail -bndeshmukh1978@gmail.com

**प्रस्तावना :**
प्रस्तुत शोधनिबंधातून 'महात्मा फुले यांचे वाङ्मय आणि कार्य' या अनुषंगाने विवेचन करण्यात आलेले आहे. साहित्य हा समाजाचा आरसा असतो. लेखक, विचारवंत ज्या समाजामध्ये रहातो व जीवनविषयक अनुभव घेतो, त्या अनुभवाचा अविष्कार तो आपल्या साहित्यातून, कलाकृतीमधून साकार करतो. समाजातील विविध प्रश्नांच्या अनुषंगाने साहित्यात चित्रण होत असते. या अनुषंगाने महात्मा फुले यांचे वाङ्मयीन लेखन व त्याचे कार्य या उद्देशाने प्रस्तुत निबंधातून शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या दृष्टीने मांडणी करण्यात आलेली आहे.

**उद्दिष्ट्ये :**

1) महात्मा फुले यांच्या वाङ्मयीन लेखनाचा अभ्यास करणे.

2 महात्मा फुले यांनी कोणकोणत्या वाङ्मयप्रकारातून लेखन केले याचा अभ्यास करणे.

3) महात्मा फुले यांच्या कार्याचा अभ्यास करणे.

महात्मा ज्योतीबा फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील आणि दोन चुलते पुण्यात फुले पुरवण्याचे काम करीत होते त्यामुळे गोरे हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व फुले हेच नाव पुढे रूढ झाले.जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे असतांना त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२ मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. जोतीराव हे अतिशय तल्लख बुद्धीचे असल्यानेच पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. जोतीराव स्वभावाने करारी वृत्तीचे होते. त्यांना गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळाले. शाळेतील शिस्तप्रिय, हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता. महात्मा जोतीराव गोविंदराव फुले हे मराठी लेखक, विचारवंत आणि समाजसुधारक होते. शेतकरी, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या समस्यांना केंद्रस्थानी ठेवून पुरोगामी विचारांची मांडणी त्यांनी केली. तसेच त्यांनी महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवलीव व त्या दृष्टीने कार्यदेखिल केले. महाराष्ट्राला अनेक समाजसुधारकांचा वैचारिक वारसा लाभला आहे. त्यापैकी महात्मा जोतीराव फुले हे एक समाजसुधारक होत. त्यांनी आपल्या अनुयायांसह, सर्व जातीतील लोकांना समान हक्क मिळवण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी, सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यामध्ये सर्व जाती धर्मातील लोकांनीं एकत्रित येऊन शेतकरी, अस्पृश्य व बहुजन समाजांच्या उन्नतीसाठी कार्य केले. 'सार्वजनिक सत्यधर्म' हा फुले यांचा अखेरचा ग्रंथ. तत्वज्ञ म्हणून त्यांचे थोरपण या ग्रंथातून प्रत्ययास येते. 'सत्यमेव जयते' हे बीजसूत्र घेऊन साकारलेला हा ग्रंथ सत्यावर आधारलेल्या नव्या सर्वसमावेशक धर्माच्या तत्वज्ञानाची मांडणी करणारा आहे. प्रस्थापित हिंदू धर्मातील सनातनी ब्राम्हण्यावादी तत्वज्ञाने निर्माण केलेल्या शोषण व्यवस्थेने बहुजन समाज पूर्णतः नागवला गेला होता. त्याला नवा जीवनमार्ग दाखवण्यासाठीच २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक

समाजाची' स्थापना केली आणि या सत्यशोधक समाजासाठी आचारधर्म सांगण्याच्या आवश्यकतेतून 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तका' ची निर्मिती झाली आहे. या ग्रंथावर भाष्य करतांना डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, "सार्वजनिक सत्य धर्म पुस्तक म्हणजे सत्याशोधाकांचा आचारधर्मच होय. परंतु हा आचारधर्म कर्मकांडाच्या पातळीवरील नाही तर एकूण माणसाला सुखाकडे नेहरा, विचारशक्तीला प्राधान्य देणारा, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना केद्रवर्ती स्थान देणारा असा आहे. पारलौकिक विश्व फुले यांना मान्यच नाही. तेव्हा याच लौकिक जीवनाच्या सुखाचा शोध घेणारा असा हा सत्य धर्म आहे."१ त्यामुळेच माणसाच्या सुखाचे चिंतन प्रकट करणारा हा ग्रंथ मौलिक आहे.

'सारसंग्राहक' या पुस्तकात 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकाचे सार एकत्र आलेले आहे. पहिल्या प्रकरणात सार दिले असून, दुसऱ्या प्रकरणात फुले यांचे धर्मपर विचार आहेत. एकेश्वर, एकेश्वर समाजवाद, महात्मा फुले व ब्राह्मधर्म या प्रकरणांतून हे सर्व सार आलेले दिसून येते. महात्मा फुले यांचे समग्र लेखन आणि साहित्य हे समाजाला दिशादर्शक आणि प्रेरणादायी असंच आहे. लोकशाही राज्यव्यवस्थेत वर्तमानपत्र ही लोकशाही चे आधारस्तंभ मानले जातात. तत्कालीन स्थितीमध्ये हे वर्तमानपत्र लिहिणारे केवेळ उच्चवर्णीय समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडणारा होते. त्यामुळे या काळात महात्मा फुले यांनी तत्कालीन पत्रकारितेवर टीका केली. त्याचप्रमाणे पत्रकारिता कशी असावी याविषयीचा मापदंड देखील त्यांनी घालून दिला. एक मूलगामी विचारवंत म्हणून महात्मा फुले यांनी मोठी ग्रंथनिर्मिती केली. त्याचबरोबर बहुजन समाजाच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्या काळामध्ये वृत्तपत्रातून लिखाणही केले. क्रांतिकारी व सुधारणावादी लेखक म्हणून महात्मा फुले यांनी समग्र वाङ्मय लिहिले आहे. 'शेतकऱ्यांचा असूड', 'गुलामगिरी' या ग्रंथांतून सामाजिक स्थिती व त्यातून बाहेर पडण्यासाठीचा मार्ग याचे समग्र चित्रण महात्मा फुले यांनी केले आहे. त्यांच्या लिखाणात तत्कालीन निद्रिस्त, उपेक्षित समाजाला जागृत करून, त्या समाजामध्ये शोषणाविरुद्ध बंड करण्याची ताकत निर्माण करण्याची क्षमता होती. यामुळेच महात्मा फुले यांचे लिखाण क्रांतिकारी व मूलगामी असे आहे. सामाजिक कार्याची दखल घेऊन लोकांनी जोतिबा फुले यांना १८८८ मध्ये 'महात्मा' ही उपाधी दिली. त्यामुळे ज्योतिबा फुले हे महात्मा फुले या नावाने ओळखले जाऊ लागले. त्यांनी अनेक साहित्य प्रकारातून लेखन केले.

| साहित्य प्रकार | लेखनकाळ | नाव |
|---|---|---|
| नाटक | इ.स.१८५५ | तृतीय रत्न |
| पोवाडा | इ.स. १८६९ | छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा |
| पोवाडा | इ.स. १८६९ | विद्याखात्यातील ब्राह्मण पंतोजी |
| पुस्तक | इ.स.१८६९ | ब्राह्मणांचे कसब |
| पुस्तक | इ.स.१८७३ | गुलामगिरी |
| अहवाल | इ.स. १८७६ | सत्यशोधक समाजाची तिसऱ्या वार्षिक समारंभाची हकीकत |
| अहवाल | इ.स. १८७७ | पुणे सत्यशोधक समाजाचा रिपोर्ट |
| निबंध | इ.स. १८८९ | पुणे सत्यशोधक समाजाचा निबंध व वक्तृत्व समारंभ |
| पत्रक | इ.स. १८७७ | दुष्काळविषयक पत्रक |
| निवेदन | इ.स. १८८२ | हंटर शिक्षण आयोगापुढे सादर केलेले निवेदन |
| पुस्तक | इ.स. १८८३ | शेतकऱ्याचा असूड |
| निबंध | इ.स. १८८४ | महात्मा फुले यांचे मलबारींच्या दोन टिपणांविषयीचे मत |
| पत्र | इ.स. १८८५ | मराठी ग्रंथागार सभेस पत्र |

| | | |
|---|---|---|
| पुस्तक | इ.स. १८८५ | सत्सार अंक १ |
| पुस्तक | इ.स. १८८५ | सत्सार अंक २ |
| पुस्तक | इ.स. १८८५ | इशारा |
| जाहीर प्रकटन | इ.स.१८८६ | ग्रामजोश्यांसंबंधी जाहीर खबर |
| पत्र | इ.स. १८८६ | मामा परमानंद यांस पत्र |
| पुस्तक | इ.स. १८८७ | सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टकासह सर्व पूजा-विधी |
| काव्यरचना | इ.स. १८८७ | अखंडादी काव्य रचना |
| मृत्युपत्र | इ.स. १८८७ | महात्मा फुले यांचे उईलपत्र |
| पुस्तक | इ.स. १८९१ | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक |

**अखंडादि काव्यरचना –** महात्मा फुले यांनी इतर लेखनाबरोबर काव्य लेखनही केलेले आहे. त्यांनी इ.स. १८६९ - ७० च्या दरम्यान काव्यलेखन केले. महात्मा फुले यांनी 'अखंडादि' मध्ये सहा विभागातून काव्य रचना केलेली आहे. अखंड म्हणजे "अभंग यासंबंधी श्री. धनंजय कीर व डॉ. मालशे म्हणतात - "मानवता, सद्विवेक, सदाचार, समता यातून सार्वजनिक सत्य सांगणारा आपला वेगळा आशय स्पष्ट व्हावा म्हणून वेगळीक सुचविणारे "अखंड."२ महात्मा फुले यांची सर्व कविता 'अभंग' रचनेत आहे. तसेच तत्कालीन सामाजिक वास्तव प्रकट करणारी कविता आहे.

**'तृतीय रत्न' -** 'तृतीय रत्न' हे नाटक महात्मा फुले यांनी इ.स. १८५५ साली लिहिले. प्रथम इ.स. १९७९ मध्ये 'पुरोगामी सत्यशोधक'मधून एप्रिल-मे-जूनच्या अंकात हे नाटक प्रकाशित झाले. हे नाटक लिहिण्याचा हेतू स्पष्ट करतांना महात्मा फुले लिहितात, 'भट जोशी आपल्या मतलबी धर्माच्या थापा देऊन अज्ञानी शूद्रास कसकसे फसवून खातात व ख्रिस्ती उपदेशक आपल्या निःपक्षपाती धर्माच्या आधाराने अज्ञानी शूद्रास खरे ज्ञान सांगून त्यास कसकसे सत्यमार्गावर आणतात, या सर्व गोष्टीविषयी म्या एक लहानसे नाटक करून इ.स. १८५५ मध्ये दक्षिणा प्राइज कमिटीला अर्पण केले; परंतु तेथेही असल्या भिडस्त भट सभासदांच्या आग्रहामुळे युरोपियन सभासदांचे काही चालेना. तेव्हा त्या कमिटीने माझी चोपडी नापसंत केली. अखेर मी ते पुस्तक एकीकडेस टाकून, काही वर्षे लोटल्यानंतर दुसरी लहानशी ब्राह्मणांच्या कसबाविषयी नवीन चोपडी तयार करून आपल्या स्वतःच्या खर्चाने छापून प्रसिद्ध केली." यावरून असे म्हणता येते की, तत्कालीन निद्रिस्त, उपेक्षित समाजाला जागृत करून, त्या समाजामध्ये शोषणाविरुद्ध बंड करण्याची ताकत निर्माण करण्यासाठीच या नाटकाची निर्मिती त्यांनी केली. आपली परिवर्तनवादी चळवळ सशक्त आणि परिणामकारक करण्यासाठी या नाटकचा वापर करण्याचा त्यांचा हेतू होता. या नाटकाला रूढ अर्थाने कथानक नाही. त्यात एक शोषक व एक शोषित असे दोन वर्ग आहेत. अशिक्षित कुणबी, त्याची बायको, भिक्षुक जोशी, त्याचा भाऊ, त्याची पत्नी, एक ख्रिस्ती धर्मोपदेशक, एक मुसलमान आणि विदूषक अशी एकूण आठ पात्रे या नाटकात आहेत. या सर्वच पात्रांना स्वतःचे असे चेहरे नाहीत. नाटकाची संकल्पना प्रातिनिधिक पातळीवर आहे. समाजातील एक विशिष्ट वर्ग केवळ जन्माने उच्च असल्याने समाजातील दुसऱ्या एका अंधश्रद्ध, अडाणी, गरीब वर्गाला कसा लुबाडतो व नागवितो याचेच प्रातिनिधिक चित्रण या नाटकातून केलेले आहे.

'तृतीय रत्न' या नाटकाचे लेखन सलग झालेले असून, हे नाटक म्हणजे अनेक प्रवेशांची मालिका आहे. लेखकाने पात्रे, स्थळ, काळ, प्रसंग आणि संवाद यात मुक्त संचार पद्धतीचा वापर केला आहे. त्या दृष्टीने हे नाटक म्हणजे मुक्तनाट्यच आहे. उदा. दोन फेऱ्या मारल्या की, राजवाडा, आणखी दोन चकरा मारल्या की, घनदाट जंगल ही जशी लोकनाट्याची रचना असते त्याप्रमाणे 'तृतीय रत्न' या नाटकाची रचना आहे. म्हणजेच लोक जमताच कोठेही नाटक सादर करता येईल अशीच या नाटकाची रचना अत्यंत लवचीक अशी आहे.या नाटकातील 'विदूषक' हे पात्र अतिशय महत्त्वाचे आहे. विदूषक या पात्राची रचना संस्कृत नाटकातील विदूषकाप्रमाने जोतिबांनी मराठी

नाट्यरचना सुरू केलेली आहे. पण त्यांनी परंपरागत रचनेला छेद दिला. परंपरागत रूप नाकारलेळे आहे. पारंपरिक विदूषकाचे सांकेतिक रूप, त्याचा खादाडपणा, आचरट बोलणे याला पूर्णपणे फाटा दिला आणि अत्यंत वेगळाच विदूषक रंगभूमीवर साकारण्याचा प्रयत्न जोतिबांनी केलेला आहे आणि तो प्रयोग यशस्वीही झालेला आहे. हा 'विदूषक' एकाच नाटकात अनेक भूमिका साकारणारा आहे. काही प्रसंगी तो निवेदक आहे. काही प्रसंगी तो भाष्यकार आहे. काही ठिकाणी तर त्याची भाषा जहाल आणि तिखट झालेली आहे. उपहास, नेमके वर्मावर बोट ठेवणे, बिंग फोडणे आणि रहस्य उलगडून दाखविण्याचे काम तो करतो. तसेच ज्ञानाचा मार्ग धरा असा उपदेश तो करीत असतो. एकाच वेळी नाटकातील पात्रांच्या कृतीमधून प्रेक्षकांशी संवाद साधण्याचे अजब कौशल्ये ही या नाटकातून व्यक्त होते.

**संदर्भ ग्रंथसूची**

1. ग.ना. पवार : 'भारतीय समाजक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले'
2. महात्मा ज्योतिबा फुले यांचा सार्वजनिक सत्यधर्म (संपादित) प्रकाशक श्री गजानन बुक डेपो
3. विठ्ठलराव भागवत : महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांचे कार्य.
4. नागनाथ कोतापल्ले (संपा.) : महात्मा जोतीबा फुले यांचे १०१ मौलिक विचार.
5. धनजय कीर : 'महात्मा जोतीराव फुले' (चरित्र)
6. पंढरीनाथ सिताराम पाटील : 'महात्मा ज्योतीराव फुले' (चरित्र)
7. भास्कर लक्ष्मण भोळे : 'महात्मा जोतीराव फुले' (चरित्र)
8. दिलीप मढीकर : 'महात्मा जोतीराव फुले - जीवन आणि कार्य'.
9. डॉ.दादा गोरे (संपा.) : 'महात्मा फुले यांची कविता'.
10. विश्वनाथ शिंदे : 'महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक सत्यधर्म'
11. मा.प. बागडे : 'महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ'.
12. महात्मा फुले जीवन आणि कार्य (संपादित). प्रकाशक : भारतीय विचार साधना प्रकाशन पुणे
13. मा.गो. माळी : 'महात्मा फुले दुर्मिळ वाङ्मय आणि समकालीन चरित्रे'.
14. ग. बा. सरदार : 'महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार'.
15. धनंजय कीर. (संपादक) : 'महात्मा फुले समग्र वाङ्मय'

# विचारवंत आणि सुधारक छत्रपती राजर्षी शाहू महाराज

**डॉ.एस.डी. सावंत**
इतिहास विभागप्रमुख शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर
gaurisawant55@gmail.com

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला पुरोगामी विचारांचा वारसा लाभलेला आहे. महात्मा जोतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेच्या विचारांचा संदेश दिला. या महापुरूषांनी समाज एकसंघ बनविण्यासाठी अथक प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराजांचे समाजक्रांतीच्या वाटचालीतील योगदान अनन्यसाधारण आहे. सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी, साधनसंपत्तीच्या समान वाटपासाठी आणि नव्या संस्कृतीच्या निर्मितीसाठी पददलित, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अभावग्रस्त वर्ग प्रस्थापितांशी जोराने संघर्ष करीत आहे. या संघर्षांना वैचारिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी त्यांना क्रांतिकारक आणि प्रगतीशील मार्ग दाखविण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची गरज मोठ्या प्रमाणात आज समाजाला आहे. समाज आपोआप घडत नाही तो घडवावा लागतो. समाज घडवणारी माणसं कुणी वेगळी नसतात, समाजासाठी समाजातूनच आकाराला आलेल्या या माणसांना आपण सुधारक म्हणतो आणि म्हणून स्वतंत्र भारताची सामाजिक उन्नती होण्याच्या प्रवासात ज्यांनी ज्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यात राजर्षी शाहू महाराज अग्रगण्य आहेत.

समाज परिवर्तन ही केवळ भौतिक गरजांच्या पुर्ततेसाठी करावयाची चळवळ नाही. ती माणसांच्या मूलभूत प्रेरणांच्या पुर्तीसाठी त्यांच्यातील सुप्त शक्तींना मुक्त वाव देण्यासाठी, त्याला भयमुक्त करण्यासाठी, त्यांच्यामध्ये स्वातंत्र्याची ऊर्मी निर्माण करण्यासाठी, त्याला सर्व प्रकारच्या परात्मतेपासून मुक्त करण्यासाठी, त्याचे हरवलेले माणूसपण पुन्हा मिळवून देण्यासाठी समूह शक्तीच्या जोरावर मानवमुक्तीसाठी उचलावयाचे क्रांतिकारक पाऊल आहे. आज परिवर्तनवादी चळवळीला मग त्या केवळ प्रबोधन करण्याच्या असोत किंवा प्रत्यक्ष संघर्षात उतरलेल्या असोत त्या सर्वांनाच आजच्या क्रांतिकारी विकासाचे स्वरूप नीट समजून घ्यावे लागेल. आजचा हा क्रांतिकारी बदल आपोआप झालेला नाही. तो माणसांनीच घडविला आहे आणि त्या बदलाबरोबरच माणूस स्वत:ही बदललेला आहे. म्हणून आज परिवर्तन करणाऱ्या लोकांचे नव्याने प्रबोधन होण्याची गरज आहे. वास्तवातील बदल आणि माणसातील बदल यांच्यातील एकरूपतेकडे क्रांतिकारी कृती म्हणून पाहिल्याशिवाय तो नीट समजू शकणार नाही.[१] विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात राजर्षी शाहू महाराजांनी अखिल भारतातील परिवर्तनवादी चळवळींना चालना दिली, त्यांना प्रोत्साहन दिले आणि लोकांच्या मनातील लोकशाही आकांक्षा जागी केली. राजर्षी शाहू महाराज हे महाराष्ट्रातील परिवर्तनवादी विचारांचे भोक्ते होते. त्यांच्या विचारांचे सम्यक आकलन करून घेण्यासाठी व येणाऱ्या पिढ्यांना त्यांच्या कार्याचे महत्त्व अभ्यासण्यासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

धर्मसत्ता–जातसत्ता आणि पुरूषसत्ता याच्या मगरमिठीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी सातत्याने प्रयत्न केले. कारण त्यांची विचारधारा मानवमुक्तीच्या ध्येयाप्रत घेवून जाणारी होती. त्यासाठी समताधिष्ठित, शोषणमुक्त निर्भय व विवेकनिष्ठ समाजनिर्मितीचा मार्ग त्यांनी दाखविलेला होता. त्यातून त्यांना अभिप्रेत असलेलासम्यक समाज व प्रगत क्रांतिकारी तत्त्वज्ञान मांडून त्यांनी सबंध महाराष्ट्राला एक नवा विचार अस्पृश्यता निवारण्याचा दिलेला आहे. राजर्षी शाहू महाराज करवीर संस्थानाचा राजा म्हणून नाही तर भारतातील प्रगतीशील राजा म्हणून त्यांची कीर्ती जास्त महत्त्वाची आहे.[२]

कै.जयसिंगराव ऊर्फ आबासाहेब घाटगे १८७८ ला कागलचे मुखत्यारी होते. १८८२ ला कोल्हापुरचे रिजंट झाले. लोकमान्य टिळक, आगरकर, चिपळूणकर यांच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे व्हाईस प्रेसिडेंट होते. हे राजर्षी शाहू महाराजांचे वडील होते. राजर्षी शाहू महाराज १७ मार्च १८८४ रोजी दत्तक विधी पूर्ण होवून कोल्हापुरच्या गादीवर बसले. पुणे सार्वजनिक सभेसह संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला. याच काळात १८९५ साली सर जेम्स फर्ग्युसन यांच्या नावाने पहिले स्वदेशी कॉलेज उघडले गेले. त्याचे उद्‌घाटक राजर्षी शाहू महाराज होते. त्यामुळे त्या काळातील पहिल्या पिढीतील कर्त्या स्त्री–पुरुषांना शिक्षण घेता आले. राजर्षी शाहू महाराजांनी महात्मा गांधी प्रमाणे रानडे–गोखले यांना गुरू मानले होते. राजर्षी शाहू महाराजांनी जाती निर्मूलन व अस्पृश्य उद्धार केल्यामुळे फुले–लोकहितवादी–आगरकर पुरस्कारित सुधारणांचे राजकीय पुरस्कर्ते म्हणून ओळखले जातात. मागासलेल्या लोकांना शिक्षण देण्याची मूळ कल्पना राजर्षी शाहू महाराजांनी रानडे आणि गोखले यांच्याकडून घेतली होती.[३]

जुन्या बुरसटलेल्या विचारांच्या विरूद्ध जेव्हा नवीन व मूलगामी विचार संघर्षासाठी पुढे सरसावतात तेव्हा क्रांतीची पहिली ठिणगी पडते. सामाजिक क्रांतीच्या ठिणग्या महाराष्ट्रात प्रथम महात्मा फुले यांच्या कृतिशील विचारातून बाहेर पडल्या आणि अशा ठिणग्यांचे निखाऱ्यात रूपांतर झाले. राजर्षी शाहूंच्या कार्यात हजारो वर्षापासून या देशातील सर्वसामान्यांवर सत्ता गाजवणाऱ्या आणि धर्माच्या नावावर समाजात उच्च–नीचतेचे वातावरण निर्माण करणाऱ्या ब्राम्हणांवर त्यांनी कठोर असे हल्ले चढवले. धर्म आणि संस्कृती नावाच्या जेलखान्याच्या दगडी भिंती पाडल्या आणि पोलादी राजाच्या दरवाजावर आघात केले आणि या जेलखान्यातील लोकांना बाहेर काढण्यासाठी त्यांनी आपली सत्ता

वापरली. त्यांच्या पायातील बेड्या आणि हातकड्या तोडण्यासाठी शाहू महाराजांनी ऐतिहासिक प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी संबंध आयुष्यात प्रचंड लढा दिला. त्यासाठी सर्व क्षात्रतेज आणि युद्धकौशल्याचा वापर केला.[४]

राजर्षी शाहू महाराज हे खऱ्या अर्थाने अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. आधुनिक महाराष्ट्राचा भाग्यविधाता म्हणून त्याचा उल्लेख करता येईल. लोकराजा व त्यांची लोकोत्तर कार्याची भूमिका समर्थपणे पेलणारे दलित, पीडित, शोषित, दुर्लक्षित, बहुजन समाजाला एकसंघ बांधण्यासाठी त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. महात्मा गौतम बुद्धानंतर भारतात होवून गेलेला एकमेव राजा होता जो राजवाड्याच्या ऐश्वर्यात रमला नाही. सोन्याच्या ताटात जेवणाऐवजी दलित, दुर्बल, गिरीजन, आदिवासी यांच्या पंक्तीत बसून निर्भयपणे आणि जाहीरपणे जेवला.राजर्षी शाहू महाराजांच्या सुधारणा व त्यांनी संस्थान आणि संस्थानाच्या बाहेर जे कार्य केले त्याचा आढावा घेतला असता असे दिसते की, समाजाला परिवर्तनाच्या प्रवाहात आणण्यासाठी सर्व जातीभेदाच्या पलीकडे नेल्याचे दिसते. 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस'चे संपूर्ण श्रेय छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना जाते. कोल्हापुरात मराठा, जैन, पांचाळ, लोपी, सारस्वत, मुस्लीम यासारख्या समाज घटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहे महाराजांनी निर्माण केले. साधारणतः वसतिगृहे यांची संख्या कोल्हापुरात चोवीस होती. त्याचबरोबर पुणे, नाशिक, अहमदनगर, पंढरपूर, नागपूर इत्यादी ठिकाणी विद्यार्थी वसतिगृहांना त्यांनी मुक्तपणाने मदत केली.[५]

राजर्षी शाहू महाराजांनी १८५४–१९२२ या आपल्या २८ वर्षांच्या राजवटीत समाजसुधारणेसाठी व प्रशासन सुधारण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. प्रजाहितदक्ष प्रशासक असा त्यांचा नावलौकिक होता. स्त्री शिक्षणाचे, त्यातून स्त्री सक्षमीकरणाचे कार्य हे मौलिक होते. कारण ''शिक्षणाशिवाय आमचा तरणोपाय नाही असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याच देशाची प्रगती झाली नाही असा इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशाची उन्नती झाली नाही म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला नितांत आवश्यकता आहे.''[६] म्हणजे स्त्रियांच्या शिक्षणासाठी ते आग्रही होते हे मान्य करावे लागते. त्यांनी स्त्री शिक्षणासाठी काही उपाययोजना केल्या. त्यात शिक्षण कायदा, सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा, मुलींच्या शिक्षणाला उत्तेजन व विशेष प्रयत्नही त्यांनी केले. मोफत शिक्षण, विधवा पुनर्विवाहाचा कायदा, आंतरजातीय विवाह कायदा, जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य, पडदा पद्धतीस विरोध, विवाहाच्या वयाची मर्यादा वाढवली, संमती वयाचे बिल व पटेल बिल, काडीमोड व घटस्फोट कायदा, अनौरस संतती व देवदासी जोगीण या विषयीचा कायदा, शिमग्यातील शिव्यांना प्रतिबंध त्याचबरोबर ब्राम्हणेतर बहुजन स्त्री सुधारणा केल्या. कोल्हापूर संस्थानात मागास जातींना ५० टक्के आरक्षण व त्याची अंमलबजावणी याबाबतचा निर्णय घेणारे स्वातंत्र्यपूर्व काळातील एकमेव संस्थानिक होते. त्याचबरोबर कुलकर्णी वतन नष्ट केले. अस्पृश्यता निवारणाचे जाहीरनामे काढले. सत्यशोधक चळवळ व ब्राम्हणेतर चळवळ यामध्ये प्रचंड बदल व त्याच्या विचारावर ह्या दोन्ही चळवळींनी महाराष्ट्रातील ब्राम्हणांची मक्तेदारी तोडून नवीन दिशा समाज व्यवस्थेला दिली. त्याचबरोबर त्यांचे संस्थानातील शेती व सहकार व दुष्काळ याबाबत महत्त्वपूर्ण योगदान होते. भारतातील व संस्थनातील मुस्लीम समाजाच्या कल्याणासाठी शाहू महाराज हिंदू–मुस्लीम ऐक्याचे पुरस्कर्ते होते. कवी, कलाकार, गायक, पैलवान इत्यादी गुणी जनांना त्यांनी राजाश्रय दिला होता.

एकंदरीत राजर्षी शाहू महाराज एक विचारवंत, सुधारक म्हणून त्यांची महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका असून ''ब्राम्हणशाहीला शह देणारा हिंदू सुधारक'' दिन दुनियेचा वाली, सर्वांगपूर्ण राजपुरुष या अर्थाने राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य सदैव प्रेरणादायी राहील.

**संदर्भ**

1. डॉ.नारायण कांबळे व इतर (संपा.), राजर्षी शाहू नव्या दिशा–नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००८
2. कीर धनंजय, राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९२
3. डॉ.एस.एस. भोसले (संपा.), क्रांतीसुक्ते राजर्षी शाहू, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७५
4. भोसले एस.एस., अक्रोडचे झाड, पी.बी. साळुंखे (संपा.), राजर्षी शाहू गौरवग्रंथ, महाराष्ट्र राज्य, शिक्षण विभाग, मुंबई, १९७३
5. राजर्षी शाहू महाराजांचे खामगाव शिक्षण परिषदेतील भाषण, १७ डिसेंबर १९१७
6. पवार जयसिंगराव (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१
7. बी.जी. देशपांडे, करवीर सरकारचे गॅझेटिअर भाग–१, मार्च २०२१

# डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रनिर्माणातील एक अभुतपूर्व कार्य– हिंदू कोड बील

**प्रा.डॉ. श्रीमती सुनिता कुरुडे**
स्वा. सावरकर महाविद्यालय, बीड इतिहास विभाग प्रमुख
kurudesunita1970@gmail.com

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकात प्रामुख्याने भारतात स्वातंत्र्याबरोबरच अनेक सामाजिक प्रश्नही उभे होते. त्यातही भारतीय स्त्रीच्या स्वातंत्र्यांचा, अस्मितेचा प्रश्न होता. प्रारंभी राजर्षी शाहू, म. फुले, गो.ग. आगरकर, न्या. रानडे, महर्षी कर्वे इत्यादी अनेक थोर समाजसुधारकांनी स्त्रीप्रश्नांवर केवळ चर्चाच केली नाही तर त्यासाठी उपाययोजना देखील केल्या. मात्र डॉ. आंबेडकरांनी स्त्रीप्रश्नांच्या जाणिवेतून स्त्रीमुक्तीचा 'हिंदु कोड बिल' च्या आधारे कायदेशीररित्या स्त्री स्वातंत्र्य, अस्मिता, समानता या दृष्टीने प्रयत्न केले. नव्हे तर त्यासाठी आग्रह धरला.भारताच्या उज्वल परंपरेत आज ५० टक्के स्त्रीचा सहभाग आहे. हे डॉ. आंबेडकरांनी पूर्वीच जाणले होते. त्यांनी भारतातील विवाह पध्दती, घटस्फोटाच्या पध्दती, संपत्ती वारसाच्या पध्दती अशा विविध प्रश्नावर 'हिंदू कोड बील' या स्त्रीमुक्तीच्या ग्रंथमांडणीतून चिकित्सा केली. आजही देशातील स्त्रीप्रश्नांसंदर्भात असलेल्या 'हिंदू कोड बीलाचा' सर्वार्थाने आणि सखोलपणे विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**स्त्रीप्रश्न आणि कायदा :**

स्त्री प्रश्न आणि कायदा हा मुद्दा समजून घेताना असे प्रकर्षाने जाणवते की, स्वातंत्र्यपूर्ण काळात भारतीय समाजात अतिशय त्रोटक स्वरुपाचे व सुटे कायदे होते. उदा. इ.स. १८०२ चा 'बालहत्या प्रतिबंधक कायदा', इ.स. १८२९ चा 'सतीबंदीचा कायदा', इ.स. १८५६ चा विधवा विवाहाचा कायदा, इ.स. १९२० चा 'वारसा हक्क कायदा', इ.स. १९२९ चा 'बालविवाह प्रतिबंधक कायदा', इ.स. १९३७ चा 'हिंदू स्त्रीयांचा मालमत्ता कायदा' असे विविध कायदे असूनही कायद्याने दिलेल्या निकालात तफावत होती. यातून मार्ग काढण्यासाठीच हिंदू कायद्याच्या संहितीकरणाचा प्रयत्न सुरु झाला आणि 'हिंदू कोड' ही संकल्पना पुढे आली.[१] या पूर्वी २५ जानेवारी १९४१ मध्येच ब्रिटिश सरकारने 'हिंदू संहिता' तयार करण्यासाठी सर बेनेगल राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती.

**सर बेनेगल राव :**

समितीने १९ जून १९४१ रोजी अहवाल सादर केला. त्यात इ.स. १९३७ च्या हिंदू स्त्रियांच्या मालमत्ता हक्क कायद्यात सुधारणा करण्याऐवजी हिंदू कोडच तयार करावे असे सूचविले होते. विवाह व वारसा कायद्याचे बील सरकारी गॅझेटमध्ये १९४२ साली प्रसिध्द करण्यात आले. या शिवाय समितीने वेगळी समिती नेमून हिंदू कोड बीलाचा मुसदा तयार करण्याचा सल्ला दिला होता. सर बेनेगल राव यांच्या अध्यक्षतेखाली सिलेक्ट समिती स्थापन झाली. ११ एप्रिल १९४७ रोजी जोगेंद्रनाथ मंडल यांनी हे बील लोकांपुढे मांडले ३ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. आंबेडकर कायदेमंत्री म्हणून मंत्रीमंडळात आले. १७ ऑगस्ट १९४७ ला त्यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा कमिटी स्थापन करण्यात आली या समितीने १२ ऑगस्ट १९४८ रोजी 'हिंदू कोड बील' सादर केले. यात विवाह, वारसा, पोटगी, मालमत्ता, दत्तक हे महत्वाचे मुद्दे होते.[२]

**हिंदू संहिता :**

डॉ. आंबेडकरांनी ११ जून १९५० रोजीच्या भाषणातून बिला संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली होती. 'हिंदू कोड बील' म्हणजे हिंदू कायद्याच्या काही शाखांचे संहितीकरण व संशोधन करणारे बील आहे. कारण बील तयार करताना डॉ. आंबेडकरांनी सर्व स्मृती ग्रंथ, धर्मशास्त्राचा अभ्यास केला. अनेक जाणकार पंडितांशी चर्चा केली होती. त्यावर ३९ पानांची पुस्तिका तयार केली होती. मूळ 'हिंदू संहिता' विधेयकात आपण काय फरक केला आहे हे स्पष्टपणे नमूद केले होते. डॉ. आंबेडकरांनी हिंदु संहितेचे काम स्वातंत्र्य, समता याआधारे हिंदू स्त्रीला न्याय हक्क मिळावा यासाठी केले होते. मात्र त्यांनी निर्माण केलेले हिंदू कोड बील ४ निरनिराळ्या भागात निरानिराळ्यावेळी तत्कालीन प्रधानमंत्री पं. नेहरुंनी १९५५–५६ मध्ये संमत करुन घेतले. चारही हिंदू कायदे, भारतीय कायद्याच्या इतिहासातील क्रांतिकारक घटना म्हणता येईल हे चार कायदे...

१) हिंदू विवाह कायदा १९५५.
२) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६.
३) हिंदू अज्ञान पालकत्व कायदा १९५६.
४) हिंदू दत्तक व पोटगी कायदा १९५६.[३]

**हिंदू कोड बीलाची वैशिष्ट्ये :**

१) हा एकच हिंदू कायदा सर्व देशभर लागू करण्यात आला.
२) हिंदू धर्मातील सर्व जाती–जमाती, पंथ–उपपंथ, ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, लिंगायत समाज असा सर्वांचा समावेश करण्यात आला.
३) हा नवा कायदा जाती–पंथातील भेद मानत नाही.

१९४७ ते १९५१ या काळात डॉ. आंबेडकरांनी ४ वर्षे १ महिना व २६ दिवस सतत परिश्रम करुन हिंदू कोड बील तयार केले. हे स्त्रियांच्या दृष्टीने सुरक्षा आणि सुव्यवस्था होती. हिंदु कोड बीलाविषयी डॉ. आंबेडकरांचे मत, "मला वाटते हिंदू संहितेसाठी आपण आपल्या विधी मंत्री पदावर राहावे. कारण हिंदू सामाजिक सुधारणेचे ते मोठे पाऊल होय. जे भारतीय कायदेमंडळाने पहिल्यांदा उचलले."[४]

भारतीय स्त्री स्वातंत्र्याच्या इतिहासात राजा राममोहन रॉय, गोपाळ गणेश आगरकर, म.फुले, पं. रमाबाई, महर्षी कर्वे, तद्वतच डॉ. आंबेडकरांचे कार्य सुवर्णाक्षराने लिहिले गेलेय. सर्व हिंदू जातीतील स्त्रियांची कुटुंबातील स्थिती व समाजात असणारी स्त्रियांची प्रतिष्ठा याबाबत आंबेडकरांनी बारकाईने निरीक्षण व चिंतन केले होते. भारतीय स्त्रियांचे परावलंबित्व नष्ट करुन त्यांचे हक्क आणि कल्याणासाठी हिंदू कोड बिलाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. हिंदू कोड बील म्हणजे स्त्रियांना समान आर्थिक दर्जा प्राप्त करुन देणारे विधेयक होते.वेद काळात जरी स्त्रीयांचे स्वातंत्र्य अधिकार आदर्शवादी होते. परंतु उत्तर वैदिक काळात ती परावलंबी बनली. भारतीय राज्यघटना निर्माण करताना स्त्री–पुरुष समानतेवर भर दिला गेला. ही भारतीय संस्कृतीच्या आणि स्त्रीयांच्या दृष्टीने अत्यंत गौरवशाली बाब म्हणता येईल. स्त्रियांना विकास प्रवाहात आणणे, त्यांची क्रियाशक्ती देशकार्यासाठी उपयोगी ठरावी या उद्देशाने हिंदू कोड बिलाची निर्मिती केली. देशाच्या संस्कृतीचा सन्मानाचा आणि प्रगतीचा डॉ. आंबेडकरांचा दूरदृष्टीकोन अनन्यसाधारण आहे. राज्यघटनेतील कलम १४ ते १८ यात समानतेचा अधिकार समाविष्ट करण्यात आलेला आहे.[५] राष्ट्रकार्यात अतिशय मोलाची कामगिरी बजावणारी स्त्री विकास प्रवाहात येण्यासाठी डॉ. आंबेडकरांना संघर्ष करावा लागला, दु:ख सहन करावे लागले. हा इतिहास आहे तो आपण विसरता कामा नये. १९५१ ला यासाठी कायदेमंत्री पदाचा राजीनामा त्यांनी दिला आणि असे मत व्यक्त केले की, "आयुष्यात दु:ख कोणते असेल तर हिंदू कोड बील मान्य होऊ शकले नाही", त्यांनी हिंदू कोड बील मान्य करुन घेण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते.[६]

**कुटुंबातील आधारस्तंभ स्त्री :**

एक व्यक्ती म्हणून भारतीय स्त्रीचा दर्जा अभ्यासताना प्रथम ती व्यक्ती आणि व्यक्ती म्हणून तिचे कौटुंबिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य व अधिकार याचा विचार हिंदू कोड बिलात प्रकर्षाने जाणवतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री खऱ्या अर्थाने सर्वच क्षेत्रापासून कोसो दूर होती. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या लोकशाही तत्त्वाचा अंगीकार करुन स्त्रियांच्या उन्नतीसाठी विशेष तरतुदी केल्या आणि घटनात्मक संरक्षण दिले. ज्यामध्ये विवाह, वारसा हक्क, घटस्फोट इत्यादी कायद्यामुळे स्त्रीच्या सामाजिक जीवनात अनेक पटीने सकारात्मक परिवर्तन घडून येण्यास मदत झाली. भारतीय संस्कृतीमध्ये विवाह हाच स्त्रीसाठी सर्वात महत्वाचा संस्कार मानला गेलेला आहे. 'स्त्रियांचा सन्मान देशाचा सन्मान' या संदर्भात स्वामी विवेकानंद म्हणतात, "स्त्रियांना योग्य सन्मान देऊनच सारे देश उन्नत झाले आहेत. ज्या देशात, ज्या जातीत, स्त्रियांचा योग्य सन्मान होत नाही, तो देश, ती जात कधीही उन्नतावस्थेत पोहचू शकली नाही, कधी पोहचूही शकणार नाही.[७] प्राचीन हिंदू धर्म ग्रंथातून पक्षपातीपणा आणि स्त्रीवरील अन्याय हा प्रखरतेने समाजात दिसत होता. तरीही हाच हिंदूचा 'धर्मकायदा' प्रमाण मानला जात असे. मात्र ज्याप्रमाणे भारत मातेची पारतंत्र्याची बेडी स्वातंत्र्य चळवळीतून काढून स्वतंत्रता प्रदान केली. त्याचप्रमाणे या हिंदू कोड बिलाने स्त्रीयांच्या अन्यायाची बेडी काढून टाकली. हा फार मोठा सामाजिक क्रांतीकारक बदल होता.

**१) सुधारित हिंदू कोड बील:**

या बिलाने विवाहाचे दोन प्रकार अधिकृत मानण्यात आले. १) विधीपूर्वक विवाह २) नोंदणीकृत विवाह. विवाहाचे वय वरासाठी १८ व वधुसाठी १९ निश्चित करण्यात आले. या विवाह निश्चितीपर्यंत अनेक बालविवाह होत असत आणि त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न समाजात निर्माण होत असत. या निश्चितीमुळे अनेक समस्यांना आळा बसला.

**२) घटस्फोट :**

हिंदू धर्म परंपरेत विवाह हा एक धार्मिक, पवित्र संस्कार मानला जातो. मात्र विवाहात घटस्फोटाला परवानगी नव्हती. पुरुष घटस्फोट न घेता पत्नीचा त्याग करु शकत असे. परंतु हिंदू कोड बिलाने स्त्री–पुरुष दोघांनाही घटस्फोटाचा अधिकार बहाल केला. तसेच एकापेक्षा अधिक विवाह करण्यावरही बंधन घालण्यात आले. घटस्फोटाशिवाय, अधिकाधिक विवाह करण्यामुळे बहुपत्नीत्वाची प्रथा वाढण्याची शक्यता होती, ज्यामुळे समाजास यातून असंख्य समस्यांना सामोरे जावे लागले असते. शिवाय स्त्री ही अन्यायग्रस्त राहिली असती. केवळ हिंदू कोड बिलामुळे अनेक सामाजिक समस्यांना आळा बसला.

**३) वारसा हक्क :**

'मिताक्षरा' आणि 'दायभाग' या दोन पध्दती वारसा संबंधी अस्तित्वात होत्या. 'मिताक्षरा' या पध्दतीत कुटुंबातील पुरुषाची मालमत्ता कुटुंबातील पुरुषाकडेच संक्रमित होत असे. परंतू हिंदू कोड बिलानुसार वारसा हक्काबाबत 'मिताक्षरा' पध्दती ऐवजी 'दायभाग' ही पध्दती अवलंबिली गेली. यानुसार वडिलांच्या संपत्तीत मुलाइतकाच वाटा मुलीला मिळणार होता. हा अत्यंत क्रांतिकारक बदल होता. नव्या बदलाने मुलगा–मुलगी यांना समान हक्क मिळणार होता.

**दत्तक वारसा :**

डॉ. आंबेडकरांनी दत्तक वारसा संदर्भातही दोन नियम प्रस्तुत केले होते. १) पतीला दत्तक वारस घ्यावयाचा असेल तर हिंदू कोड बिलानुसार पत्नीची स्वीकृती अत्यंत आवश्यक मानली गेली. तद्वतच विधवेला दत्तक वारस घेण्यासाठी पतीचा आदेशही महत्वपूर्ण मानला गेला होता. त्यासाठी हिंदू कोड बिलानुसार दत्तक वारसाविषयी रजिस्टर्ड होणे आवश्यक होते. कारण विधवेला कुणीही काल्पनिक साक्षीदार देवून फसवत असत. त्यामुळे दत्तक वारश्याची कोर्टात नोंद असणे क्रमप्राप्त करण्यात आले होते. या निर्णयामुळे नात्यातील गोंधळ, वाद यांना आळा बसण्यास मदत झाली.[८]

उपरोक्त हिंदू कोड बिलास अनेक प्रतिगामींनी, अनेक संघटनांनी विरोध केला होता असे असले तरी अनेकांचे समर्थनही होते.

१) **आचार्य कृपलानी**, "या बिलाने कुटुंब पध्दतीची मुळीच वाताहत होणार नाही. घर व राष्ट्र या दोन्हीवरची हिंदी स्त्रीयांची श्रध्दा अटळ राहील."

२) **कमला चौधरी,** "हिंदू धर्म आणि संस्कृती यांना बाधा आणणारी एकही बाब बिलात नाही या बिलाच्या विरोधकांनी अशा बायकांची फसगत करण्यासाठी धर्मावर घाला आला आहे अशा आशयाचा अपप्रचार केला आहे."

३) **के. सन्ताराम,** "हिंदी राष्ट्राच्या नव्या घटनेला हे बील पोषक होईल, मुलींना मुलाइतके हक्क आणि अधिकार आपण समंजसपणे दिले नाहीत तर तसे करण्यास हिंदी स्त्रिया आम्हाला भाग पाडतील."[९]

हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने स्त्री प्रश्नाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला. विवाह संस्था, कुटुंब संस्था यांना महत्व देणारा धर्मही चर्चेत आला. विशेषत: स्त्री प्रश्नाला अखिल भारतीय स्तरावर स्थान मिळाले. भारतीय महिला फेडरेशन, अखिल भारतीय महिला परिषद इत्यादींनी हिंदु कोड बील पास व्हावे यासाठी देशव्यापी मोहिम हाती घेतली होती.

**निष्कर्ष :**

भारताच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक, इतिहासात डॉ. आंबेडकरांचे विचारधन दैदिप्यमान असेच आहे. भारतीय समाजव्यवस्थेत आमुलाग्र सुधारणा हे त्यांचे ध्येय तर मानवी हक्क आणि समता हे त्यांच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. आजच्या प्रगत युकात स्त्रीला समानतेचे अधिकार आहेत. त्याचे संपूर्ण श्रेय डॉ. आंबेडकरांनाच जाते. त्यांनी हिंदूकोड बिलाच्या रुपाने भारतीय स्त्रीला पारंपारिक गुलामी प्रवृत्तीच्या बंधनातून मुक्त करुन स्वाभिमानाचे जीवन बहाल केलेय.

मनुपूर्व काळात स्त्रीचा दर्जा फार उच्च होता हे त्यांनी "हिंदू स्त्रीयांची उन्नती आणि अवनती", या निबंधातून स्पष्ट केले आहे.[१०] स्त्रियांच्या उन्नतीकरीता त्यांनी हिंदू कोड बिलाच्या रुपाने स्त्री जीवनात अमुलाग्र परिवर्तन करण्याचे महनीय कार्य केले आहे. स्त्रियांचे स्वातंत्र्य, सामाजिक अस्तित्व व स्वावलंबी जीवन समाजालाही उपकारक आहे, नैतिकमूल्य, समाजस्वास्थ्य टिकविण्यासाठी स्त्रियाच अग्रेसर राहिल्या आहेत. हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. भारतीय इतिहासात स्त्रीमुक्तीचा पाऊलखुणा शोधताना १२ व्या ते १६ व्या शतकात महंदबा, मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई यांची भूमिका कणखर असल्याचे दाखले आहेत. तर १९ व्या शतकात स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय ही मूल्ये रुजविताना म.फुले सारखे अनेक समाजसुधारक दिसतात. मात्र स्त्रीमुक्तीचा प्रश्न डॉ. आंबेडकरांनी अथक परिश्रमातून सोडविला हे निर्विवाद सत्य आहे. विविध प्रकारचे शोषण, विषमता, ही भारतीय समाजाची शोकांतिका होती. अशा परिस्थितीत हिंदू कोड बिलाचे अव्हानात्मक काम त्यांनी पूर्ण केलेय. अनिष्ठ रुढी, परंपरेच्या गर्तेत अडकलेल्या स्त्रीला मुक्त करुन तिला स्वातंत्र्य, समता आणि स्वावलंबन, हक्क, अधिकार मिळवून देण्याचे अलौकिक कार्य त्यांनी केले. एक पत्नीत्व, घटस्फोट, दत्तक वारस, स्त्रियांना वारसा हक्क, स्त्रीला पालकत्व घेण्याचा अधिकार इत्यादीसाठी स्त्रीला डॉ. आंबेडकरांनी कायद्याने सन्मान प्राप्त करुन दिला. यामुळे तिच्या सुरक्षा आणि सुव्यवस्थेला महत्व प्राप्त झाले. तिच्या वरील अन्याय अत्याचाराला आळा बसला. देशाच्या इतिहासाला कलाटणी देणारी तसेच राष्ट्र विकासात हातभार लावणारी स्त्री राष्ट्राचा सन्मान आहे. म्हणूनच स्त्रीयांचा सामाजिक दर्जा उंचावण्याचा जो क्रांतिकारक बदल डॉ. आंबेडकरांनी घडवून आणला तो राष्ट्र निर्माणात अभुतपूर्व असाच ठरला आहे. यासाठी त्यांचे हिंदू कोड बील महत्वपूर्ण ठरते.

**संदर्भ सूची :**

१) परदेशी प्रतिमा, हिंदू कोड बील ते ऑनर किलिंग, पुणे–२०१३.
२) कित्ता–२०१३.
३) मेहेत्रे स्मीता, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, नागपुर–२०११.
४) कवि माधवी, स्त्री विचारधन, पुणे–२०००.
५) खडपेकर विनया, स्त्री स्वातंत्र्यवादिनी, विसाव्या शतकातील परिवर्तन, मुंबई.
६) परदेशी प्रतिमा, हिंदू कोड बील ते ऑनर किलिंग, पुणे–२०१३.
७) स्वामी विवेकानंद, नवा भारत घडवा, नागपुर –१९८२.
८) परदेशी प्रतिमा, हिंदू कोड बील ते ऑनर किलिंग, पुणे–२०१३.
९) कित्ता–२०१३.
१०) डॉ. आंबेडकर बाबासाहेब, हिंदू स्त्रीयांची उन्नती आणि अवनती, औरंगाबाद–२०१४.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# आंबेडकरवादी विचारधारा दलित विमर्श के संदर्भ में

**डॉ.दळवे सूर्यकांत माधवराव**

शोध निर्देशक शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण ता.कळंब जि.उस्मानाबाद

**iLrkouk %**

दलित एवं पीडित समाज की समस्या बहुत ही पुरानी समस्या है। दलित शब्द उस समाज के लोगों की दास्यता एंव शोषण का वर्णन करता है जिसे सदियों से अपने मूलभुत अधिकारों से वंचित किया गया है। जब वर्ण एवं जाति के बंधन कडे होकर मनुष्य के विकास मे बाधक सिद्ध होने लगते है तो वही दलित विमर्श की करुण कहानियॉं जन्म लेने लगती है। इस संदर्भ में.डॉ.सुरेशचंद्र लिखते है " किसी भी समाज में सुख और शांती के लिय लोगों के बीच समरसत्ता की स्थिति होना परम आवश्क होता है। भारतीय समाज में इस स्थिति हेतु अनेक प्रयास हुए परंतु परिणाम उनके अनुकूल नही मिल पाया है। वर्ण और जाती की कसौटियॉं मनुष्य को श्रेष्ठ और अश्रेष्ठ बनाकर उन्हें परस्पर समरस होने से रोकती है।

जातीवादी वर्णवादी और वर्गवादी व्यवस्था पर आधारीत भारतीय समाज का बहुत बडा हिस्सा दु:ख, वेदना और पीडा भोगने के लिय बाध्य किया गया है। जिसे अपने अधिकारो से वंचित रखा गया है। इसी विसंगती के कारण दलितों के लिए जाति , वर्ण और वर्ग़ की पीडा एक दिवार की तरह खडी है। । ऐसी पीडा में मानवता का कोई मूल्य नहीं होता जिसमें धनिक,विलासी लोगों की सेवा का साधन दास होता है। ऐसे दासों को अंतिम सॉंस तक गुलाम बनाने की कोशिश की जाती है। गुलामी की प्रथा और परंपरा भारत देश में नही बल्कि पुरे संसार में विद्यमान थी और है। डॉ.बाबासाहेब आंबेडकर ने तथागत गौतम बुद्ध, संत कबीर और महात्मा फुले की विचारों का अनुसरन करते हुए जातिव्यवस्था और वर्णव्यवस्था पर तिखा प्रहार किया है। उन्होने जातिव्यवस्था और वर्णव्यवस्था के खिलाफ मनुस्मृति का पर्दाफाश करते हुए मनुस्मृति का दहन किया। वही से एक क्रांती की मशाल तोजोमय हो गयी। डॉ.बाबासहब का मानना है कि जाति और वर्ग दोनो समान है। इसी जात और वर्ग ने दुर्बल, पीडित, शोषित, अस्पृश्य आदि लोगों का घात किया है और सामाजिक विषमता निर्माण करने का काम भी किया है। डॉ.बाबासाहब का यह भी कहना है कि , जाति यह मनु के बहुत पहले से ही अस्तित्व में थी। मनु उसका प्रचारक था। उसने जाति को तात्विक रुप देकर लोगों को वर्ण, वर्ग और जातियो में विभाजित कर जाति को अधिक दृढ और विश्वासार्हता प्रदान करने की कोशिश की है।दलितो को उनकी अस्मिता का अहसास सही मायनों में डॉ.बाबासाहब आंबेडकर ने कराया। उन्होंने ही दलितो को अन्याय और शोषण के खिलाफ संघर्ष करने के लिय प्रेरित किया तथा उनमे यह विश्वास पैदा किया कि वे किसी से कम नहीं है, उनमे भी उपर उठने तथा आगे बढने की सभी सम्भावनाएँ है।अंन्धविश्वास, आडम्बर और अमानवीयता पर कबीर रैदास ने अपने साहित्य के माध्यम से तीखा प्रहार किया किन्तु दलित-मानस को गहरे तक झकझोरने तथा उसकी चेतना में व्यापक स्तर पर क्रांन्तिकारी बदलाव लाने का काम सही मायनो में डॉ.आंबेडकर ने ही किया। यह अलग बात है कि अपने स्वयं के अनुभवों की आग मे तपकर कुंदन बने डॉ.आंबेडकर ही दलित चेतना के सबसे बडे संवाहक है तथा वही दलित साहित्य की प्रेरणा उर्जा के स्त्रोत भी है। दलित साहित्य पर डॉ. आंबेड्कर के विचारो का व्यापक प्रभाव है। इसलिए दलित साहित्य को समझने के लिए डॉ.आंबेडकर की वैचारिकता को समझना आवश्यक है।

डॉ.आंबेडकर का सपना एक सुदृढ और सुखी-सम्पन्न राष्ट्र एवं समाज का सपना था। जिसमें सब समान हो तथा सब परस्पर प्रेम, सहयोग और बंधुता के साथ रहे। कोई छोटा-बडा उंचा-नीचॉं या सछूत-अछूत न हो। इसके लिए उन्होने जाति-विहीन और वर्ग विहीन समाज की स्थापना की परिकल्पाना की। इस तरह के समाज की रचना कैसे हो , यही उनके समग्र चिंतन और सृजन का मूल विषय और आधार है। समाज, राजनीति, धर्म कोई क्षेत्र ऐसा नही जिसमे डॉ.आंबेडकर ने विचार एवं कार्य न किया हो। वैचारिक रुप से वह राजनीतिक क्षेत्र मे लोकतंत्र के , समाजिक क्षेत्र मे मानववाद के , आर्थिक क्षेत्र मे समाजवाद के, धार्मिक क्षेत्र मे बुद्धवाद के तथा दार्शनिक क्षेत्र मे अनित्य और अनात्मवाद के पक्षधर रहे। दलित लोग जुल्म और ज्यादती के शिकार है यह उन्होने देखा और भोगा था।

डॉ.आंबेडकर का कहना था की,अन्याय को सहना अन्याय को बढावा देना है। अधिकार कभी भी मॉंगने से नही मिलते है अधिकार छिने जाते है। संघर्ष किए बिना दलितों को उनके अधिकार मिलने की कोई संम्भावना नही है। डॉ. आंबेडकर ने दलितों को आव्हान किया था की वे अपनी हीनता को त्याग दे तथा आत्मसम्मान और स्वाभिमान के साथ जीना शुरु करे। दूसरों की दया पर जीवित रहने की बजाए वे स्वावलंबी और सक्षम बने। उन्होने दलितों की शिक्षा पर बहुत बल दिया। शिक्षा ही उन्नति और प्रगति का आधार है। दलित विमर्श मनुष्य ने मनुष्य का किया विरोध नहीं इसमे मानवता का विरोध करनेवाली प्रवृत्ति का विद्रोह किया गया है। असपृश्य कहकर समाज के एक पक्ष के अस्तित्व को नकारकर उसे हाशियें से बाहर करने वाली गैर दलितों की दुनिया बडी सफाई से विरोध करना दलित विमर्श। दलित विमर्श को हिंदी सहित्य की विधाओं में पूर्ण सम्मान के साथ अभिव्यक्ति मिली है। नितीन गायकवाड लिखते है " जब इन अस्पृश्यों ने शिक्षा हासिल की तब उन्हे उनके इन्सान होने का अहसास हुआ उन्हे उनकी गुलामी अहसास हुआ। उन्हे उनके शोषन का अहसास हुआ। उन्हें उनके मानवीय अधिकारों का अहसास हुआ। धीरे-धीरे उनके भीतर का मृत स्वाभिमान जीवित हो उठा। यही स्वाभिमान उन्हे अस्वस्थ करने लगा। उनकी उस गुलामी और जहालत भरी जिंदगी को ठुकराने के लिए उकसाता रहा। तब इन अस्वस्थ गुलामों ने गुलामी और शोषण के कारणों को खोजना शुरु किया। उन पर हुए अनगिनत जुल्मो और जख्मों पर खुलेआम चौराहे पर बोलना और लिखना शुरु किया।डॉ.बाबासाहेब ने दलित अस्पृश्य समाज को शिक्षाका सबसे बडा और महत्वपूर्ण विचार दिया । जिसे अस्पृश्यों और दलितो ने स्वीकार करके खुद को स्वयं प्रकाशित किया। "शिक्षा लो संघटित बनो और संघर्ष करो।" यह जीवन का मूल मंत्र देकर शिक्षा से ज्ञान प्राप्त करने के बाद समाज का संघटन करके अपने हक्क, अधिकार तथा अन्याय के खिलाफ लढने की बाबासाहेब आंबेडकर ने दलित समाज को प्रेरणा दी।

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ने अंधविश्वासों पर विश्वास नहीं करना चाहिए। सभी लोगों को अपनी उन्नती करनी चाहिए । सभी लोगों को समानता का दर्जा देना चाहिए। अस्पृश्य जैसे कलंक को हिंदू समाज से मुक्त करना चाहिए। डॉ.बाबासाहेब के विचारों से प्रेरित होकर दलित समाज जागृत हुआ। दलित साहित्य का स्वर सामाजिक न्याय सामाजिक न्याय का स्वर है। दलित साहित्य का तेवर कितना भी विद्रोही हो किन्तु उसकी दृष्टि रचनात्मक है। नव निर्माण के लिए कुरेदता भी है तो रचनात्मकता के बीज ढूंढने के लिए और कहने की आवश्यकता नही है कि दलित साहित्य की यह रचनात्मकता निसंदेह आंबेडकरवाद के विचार और दर्शन के प्रभाव का परिणाम है जिसे ताराचंद खांडेकर के शब्दों में - " एक व्यक्ति एक मूल्य को मानकर स्वतंत्रता, समता और सामाजिक नैतिकता को स्वीकार करते हुए व्यक्ति का पूरी तरह से कल्याण साधने का संसदीय जनतन्त्रात्मक जीवन मार्ग आंबेडकरवाद है।

**संदर्भ संकेत:-**

१) दलित विमर्श के विविध आयाम - डॉ.विरेंद्रसिंह यादव
२) २१ वी सदी में दलित आन्दोलन- डॉ.जयप्रकाश कर्दम
३) दलित साहित्य - शरणकुमार लिंबाले
४) शुद्रो की खोज - डॉ.बी.आर.आंबेडकर
५) दलित जीवन संघर्ष और स्वप्न - सं. नितीन गायकवाड
६) दलित साहित्य समग्र परिदृश्य - डॉ. मनोहर भंडारे

# राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार

**गोविंद रामराव काळे[1] प्रा डॉ. दीपक एम भारती[2]**

[1]संशोधक विद्यार्थी डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद

[2]प्राध्यापक कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किल्ले धारूर

**गोषवारा (Abstract) :**

राजर्षी शाहू महाराज हे केवळ समाजसुधारक नसून ते अर्थशास्त्रज्ञ ,शिक्षण शास्त्रज्ञ व प्रशासकीय तज्ञ होते राजर्षी शाहू महाराज यांचे आर्थिक विचार त्यांनी कृषी क्षेत्र शेतमजूर कामगार कर सामाजिक विचार शैक्षणिक विचार स्त्री विषयक विचार सामाजिक चळवळ अशा विविध अंगांनी कार्य केले त्यांच्या कार्यातूनच त्यांचे आर्थिक विचार आजही प्रेरणा देतात कृषी क्षेत्र ,उद्योग क्षेत्र आणि सेवा क्षेत्राचा विकास त्या काळी त्यांनी घडवून आणण्याचा प्रयत्न केला तो आजही आपणास मार्गदर्शक असाच ठरत आहे त्यांच्या काळी मुक्त अर्थव्यवस्था स्वीकार करणे भारतासारख्या गरीब विकसनशील शेतीप्रधान देशाला प्रतिकूल होते मात्र त्यातून प्रयत्न करून मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी यथायोग्य प्रयत्न केले या कार्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे

**प्रस्तावना :**

संपूर्ण भारतात इंग्रजांची राजवट अस्तित्वात असताना तळागाळातील कष्टकरी समाज ओ दारिद्र्यात जीवन जगत होता त्यांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते अशावेळी महात्मा फुले यांनी आपल्या कार्यातून या वर्गास न्याय देण्याचे कार्य केले समाज परिवर्तन करण्याचे कार्य त्यांनी केले महात्मा फुले यांच्या नंतर त्यांचा वसा आणि वारसा चालविण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले त्यांनी केलेल्या कार्यातून ते बहुजन समाजाचे कुलदैवत ठरले होते सामाजिक आरक्षणाचे आद्य जनक असेही शाहू महाराजांना संबोधले जाते राजर्षी शाहू महाराजांनी अवघ्या 28 वर्षाच्या कालखंडात सत्ताहीजनहितार्थ राबून कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक कायापालट घडवून आणला महाराजांचे आर्थिक धोरण हे शेती व उद्योग या दोन व्यवसायांचा कायापालट करणारे होते या दोन व्यवसायावरच संपूर्ण देशाचा आर्थिक कणा अवलंबून आहे हे त्यांनी अवगत असल्यामुळेत्यांनी या व्यवसायावर लक्ष केंद्रित केले होते ज्या सुधारणा महाराष्ट्रात चालू आहेत त्या सर्व सुधारणा त्यांनी आपल्या राजवटीत प्रत्यक्ष कृतीत आणल्या होत्या दरडोई उत्पन्न लोकांचे राहणीमान उंचावणे असेआर्थिक धोरण शाहूमहाराजांनी स्वीकारले होते महाराजांच्या आर्थिक धोरणामागे उत्पन्न व संपत्ती तील विषमता कमी करणे रोजगार हमी देणे किमान वेतन खाजगी क्षेत्रातील बाबींचा उपयोग समाजात होणे यासारख्या उद्दिष्टांचा समावेश होता शेतकरी व्यापारी कारखानदार व कारागीर यांचे उत्पन्न व उत्पादन वाढवण्यासाठी त्यांनी स्वस्त दराने कर्ज पुरवठा केला होता .

**राजर्षी शाहू महाराजांचा जीवन परिचय :**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म 26 जुलै 1874मध्ये कागलच्या घाडगे कुटुंबात झाला . त्यांचे पूर्ण नाव यशवंतराव जयसिंगराव घाटगे होते. चौथे राजे शिवाजी महाराज कोल्हापूर संस्थानाचे राजे होते त्यांना पुत्र

नसल्यामुळे त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी यशवंतराव उर्फ राजर्षी शाहू यांना17 मार्च 1884 रोजीदत्तक घेऊन संस्थानाचे वारसदार केल .राजर्षी शाहू यांचे शिक्षण राजकोट येथील कॉलेजमध्ये अठराशे 85 ते अठराशे 91 पर्यंत युरोपियन शिक्षक यांच्या मार्गदर्शना खाली इंग्रजी राज्य कारभार इतिहास या विषयाचे शिक्षण घेतले एकोणीशे दोन मध्ये केम्ब्रिज विद्यापीठाने त्यांना एल .एल.डी .ही पदवी देऊन सन्मान केला राजर्षी शाहू महाराजांनी 2 एप्रिल 1914 मध्ये कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली .या कारकीर्दीत यांनी दैदिप्यमान कार्य केले 1922 मध्ये बडोदा वरून परत येताना त्यांची प्रकृती जास्तच खालावली आणि 6 मे 1922 रोजी मुंबईत यांचे निधन झाले .

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

1.राजश्री शाहू महाराजांचे कृषी विकासाचे कार्य अभ्यासणे .

2.राजर्षी शाहू महाराजांचे सहकार धोरण आर्थिक धोरणातून अभ्यासणे .

3.राजर्षी शाहू महाराजांचे उद्योग विषयक विचार अभ्यासणे .

4.राजर्षी शाहू महाराज यांचे व्यापार विषयक विचार अभ्यासणे .

5 .राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाची प्रासंगिकता अभ्यासणे .

**संशोधन पद्धती :**

सदरील विषयावर संशोधन करण्यासाठी द्वितीयक साधनांचा वापर करण्यात आला आहे द्वितीय साधनांचा वापर केला आहे त्यात प्रकाशित ग्रंथ ,मासिके , वर्तमानपत्रे व संबंधित विषयाशी निगडित साहित्याचा वापर करून माहितीचे संकलन केले आहे

**राजर्षी शाहू महाराजांचे आर्थिक विचार :**

राजर्षी शाहू महाराजांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचा पाया हा दारिद्र्य निर्मूलन रोजगार कृषी सहकार व्यापार उद्योगआणि शिक्षण हा आहे त्यामुळे त्यांचे आर्थिक विचार मांडताना या सर्व क्षेत्रांचा विचार स्वतंत्रपणे करणे महत्त्वाचे आहे

**राजर्षी शाहू महाराजांचे कृषी विषयक विचार :**

कोल्हापूर संस्थानातील जवळ जवळ सर्वच लोक कृषीवर आपली उपजीविका करीत होते शेतकरीवर्ग दारिद्र्य, अज्ञान या गर्तेत होता अज्ञान व दारिद्र्य मुळे मागासलेपणा प्राप्त झाला होता .अशा परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांनी शेती संशोधने लागवडीचे विविध प्रयोग भांडवल पुरवठा कृषी प्रदर्शने आदर्श शेतीचे प्रयोग शेतीचे आधुनिक करण जोडव्यवसाय शेतीला पाण्याची जोड या सर्व बाबींवर भर दिला .शेत जमिनीचा आकार हा तुकडी करणामुळे लहान होता अशाच शेती करणे अडचणीचे होते हे शाहू महाराजांनी ओळखले होते त्यांच्या मते वाटणी व्यवहार आणि शेतीचे लहान लहान तुकडे होतात े किफायतशीर रहात नाहीत आणि शेतकऱ्यास तोटा होऊन तो त्या तोट्याच्या शेतीच्या व्यवसायात अडकून पडतो आणि प्रगतीला मुकतो असे त्यांचे स्पष्ट मत होते त्यातून त्यांनी 1913 मध्ये कायदा करून संस्थानातील सर्व जमिनी अविभाज्य केल्या अशा जमिनीची वाटणी करता येणार नाही या कायद्यात ठरवण्यात आले . दुष्काळावर मात करण्यासाठी अनेक लहान मोठ्या योजनाही राजर्षी शाहू महाराजांनी हाती घेतल्या आणि पूर्णत्वास नेल्या जसे की राधानगरी धरण हे आदर्श उदाहरण म्हणून सांगता येईल शेतीमध्ये पारंपरिक पिकांऐवजी नवीन पिके शेतकऱ्यांनी घ्यावी याची का शाहू महाराजांनी धरली होती . सह्याद्रीच्या पर्वतरांगा व चहाची शेती त्यांनी यशस्वी करून दाखवली होती .याच

भागात वेलदोडे ,कोको ,ताग , अंबाडी ,बटाटे, लाक ,ट्रॉफी ओका , कंबोडियन कापूस ही पिके लावण्याचा उपक्रम करून पाहिला वेगवेगळी रोपे ,झाडे यांचे प्रयोग केले त्यातून त्यांची उपक्रमशीलता कळते

सावकारी पाशातून आडाणी व निरक्षर जनतेला वाचवण्यासाठी प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केले 1915 पासून दरबारामार्फत कर्जपुरवठा करण्यावर भर दिला .

**राजर्षी शाहू महाराजांचे सहकार विषयक धोरण :**

'विना सहकार नाही उद्धार', 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ' हे सरकारचे मूलमंत्र आहेत ग्रामीण भागातील गरीब शेतकरी व दुर्बल वर्गासाठी निकोप असं अहवालाच्या शिफारशीनुसार 1904 मध्ये सहकार संबंधी कायदा करण्यात आला या कायद्यानुसार धारवाड जिल्ह्यात कणगीहल या खेड्यात पहिली सहकारी पत संस्था स्थापन करण्यात आली . महाराष्ट्र मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी सहकार चळवळीच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली राजर्षी शाहू महाराज या सहकार तत्त्वाचे पुरस्कर्ते होते.

1918 च्या मुंबई कामगारांच्या सभेत कामगार आणि सहकारी तत्त्वावर पत संस्था स्थापन कराव्यातअसा सल्ला राजर्षी शाहु महाराजांनी दिला तसेच कामगारांनी आपले परंपरागत व्यवसाय टिकविण्यासाठी नव्या युगातील सहकाराचा मंत्र स्वीकारला पाहिजे असा उपदेश दिला .राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात 1912 मध्ये सहकारी संस्था विषयक कायदा संमत केला 1913 मध्ये ' द कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड ' आणि 'बलभीम को ऑप बँक 'ही स्थापन केली 1921 पर्यंत कोल्हापूर संस्थानात 37 सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या .

**राजर्षी शाहू महाराजांचे उद्योग विषयक विचार :**

कोणत्याही देशाचा आर्थिक विकासाचा शेती ,उद्योग आणि व्यापार या तीन क्षेत्रावर अवलंबून असतो . केवळ एकाच क्षेत्रात विकास झाला तर ते राष्ट्र स्वयंपूर्ण होत नाही याची जाणीव शाहू महाराजांना होती विशेषता व्यापार-उद्योगात आपला देश मागे पडल्याने आपले प्रचंड आर्थिक शोषण झाले असे शाहू महाराजांना वाटत होते अठराशे 94 मध्ये शाहू महाराज गादीवर आले तेव्हा संपूर्ण कोल्हापूर संस्थानात एकही मोठा उद्योग नव्हता त्यांच्या कारकिर्दीत अनेक व्यवसाय उद्योग कारखाने निर्माण झाले

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात नवे उद्योग सुरू करण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण केले स्वतः नवे उद्योग सुरू केले तर काही उद्योग लोकांनी सुरु करावेत म्हणून प्रोत्साहन केले संस्थानात खाजगी सार्वजनिक व सहकारी क्षेत्रात उद्योगाची उभारणी करून मिश्र अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला 1905 पर्यंत कोल्हापूर संस्थानात सुगंधी औषधी तेल मधुमक्षिका पालन काष्टार्क उद्योग आणि सुती कापड उद्योग सुरू करण्यात आले उद्योगाच्या क्षेत्रात कोल्हापूर संस्थानात सर्वात मोठा प्रकल्प सुरू केला तो म्हणजे कापड गिरणी शाहू महाराज आणि सन 1906 मध्ये ' दि शाहू छत्रपती स्पिनिंग अँड विव्हींग मिल्स 'या गिरणी ची स्थापना केली .पाण्याचे तळे आणि पन्नास हजार भांडवल त्यांनी दिले .

1912 - 13 च्या सुमारास कोल्हापूर संस्थानात पहिली ऑइल मिल , पहिली सॉ मिल, पहिली फाउंड्री फॅक्टरी, पहिली इलेक्ट्रिक कंपनी , पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग सुरू करण्यात आले .लहान-मोठ्या व्यापाऱ्यांना व उद्योजकांना कर्ज देण्याची व्यवस्थाही त्यांनी केली कोणत्याही परिस्थितीत उद्योगाला धनिकांच्या ताब्यात जाणार नाही याची जबाबदारी कामगारांनी घ्यावी .याबाबत श्रमिकांना जागृत करण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केलेउद्योगधंदे वाढीसाठी दळणवळणाच्या साधनांची आवश्यकता

असते म्हणून शाहू महाराजांनी 185 मैल लांबीचे नवे रस्ते तयार केले .त्यामुळे खेडी शहरास तोडली गेली शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव मिळू लागला . उद्योगाबाबत शाहूमहाराजांनी विकेंद्रीकरण कल्पना मांडली .

**राजर्षी शाहू महाराजांचा व्यापार विषयक विचार**

व्यापारात वाढ झाली तर देशाचा आर्थिक विकास घडून येईल त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत असे मत शाहू महाराजांचे होते शाहू महाराजांनी व्यापाऱ्यांना कोल्हापुरात व्यापारी पेढ्या निर्माण करण्यासाठी अनेक सवलती दिल्या त्या जमिनी करात सवलत अशा सवलती दिल्या 1895 मध्ये शाहूपुरी व्यापार पेठ स्थापन करण्यात आलीजयसिंगपूर व गडिंग्लज येथेही व्यापारास उत्तेजन दिले त्यामुळे जयसिंगपूर येथे तंबाखू व गडहिंग्लज येथे गूळ मिरची भुईमूग यांची व्यापारपेठ निर्माण झाली 1900 दोन पर्यंत भरभराट होऊन लाखो रुपयांची उलाढाल झाली

1905 मध्ये संस्थानातील व्यापाऱ्यांनी जॉइंत स्टॉक कंपनी स्थापन केली व त्यामार्फत सूत गिरणी चालू केली या गिरणी 50 हजार रुपये भांडवल व पाण्याचे तळे जमीन उपलब्ध करून दिली या सूत गिरणीच्या पायाभरणीचा समारंभ शाहू महाराजांच्या हस्ते झाला त्याला 'शाहू मिल 'असे नाव देण्यात आले . 1912 - 13पर्यंत सहा जिनिंग फॅक्टऱ्या निर्माण झाल्या त्या कोल्हापूर इचलकरंजी शिरोळा गडहिंग्लज या ठिकाणी सुरू झाल्या . संस्थानातील  उत्पादित माल राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पाठविण्यात यावा यातून लोकांना वस्तू मिळाव्यात एवढाच उद्देश नव्हता तर त्यातून परकीय चलन मिळावे असे त्यांचे मत होते .

**राजर्षी शाहू महाराज यांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता :**

शाहू महाराजांनी आपल्या आर्थिक विचारांच्या जोरावर कोल्हापूर संस्थानाचा चेहरामोहरा बदललेला होता त्यांच्या आर्थिक विचारांचा आधार घेऊन कृषी उद्योग व्यापार क्षेत्रात प्रगती करणे महत्त्वाचे आहे पण आजच्या भारतातील परिस्थितीचा अभ्यास केल्यास जागतिकीकरण उदारीकरण खाजगीकरण या संकल्पना मुळे हे विचार प्रभावहीन होत आहेत आज सहकार क्षेत्र पूर्ण मोडकळीस आले आहे .सहकार हे क्षेत्र सर्वसामान्य लोकांचे हित जोपासण्या ऐवजी मोठ्या नेत्यांचेही जोपासत आहेत सहकारी बँका सहकारी कारखाने ही भ्रष्टाचाराची आड्डे झाली आहेत . सहकार क्षेत्र भ्रष्टाचाराने पोखरून टाकले आहे .त्यातून देशात आर्थिक व सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेतशेती उद्योग व्यापार सहकाऱ्यांचा विकास करायचा असेल तर राजर्षी शाहू महाराजांच्या आर्थिक विचारांचा वसा आणि वारसा प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे .

**निष्कर्ष :**

1. राजर्षी शाहू महाराज यांनी पारंपरिक शेती पद्धतीत सुधारणा करून आधुनिक शेती पद्धती कडे शेतकऱ्यांना वळविले त्यातून शेती च्या विकासाला चालना मिळाली.
2. शाहू महाराजांनी सहकार क्षेत्रा स चालना देऊन सर्वसामान्य जनतेस विकास प्रक्रियेत सहभागी करून घेतले त्यातून त्यांची आर्थिक प्रगती झाली.
3. उद्योगधंद्यात चालना देण्यासाठी अनेक सवलती संस्थांना दिल्या त्यामुळे स्थानिकांना रोजगार मिळू लागला तसेच उद्योगाचे विकेंद्रीकरण यावर भर दिल्यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात होणारे स्थलांतरण कमी झाली तसेच शेतीमालास योग्य भाव मिळू लागला.
4. आर्थिकविकास घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी 185 मैल लांबीची रस्ते बांधून खेडे शहरांना जोडली त्यातून व्यापारास वृद्धी व कृषी मालास योग्य किंमत मिळू लागली.

**संदर्भग्रंथ सूची :**

1. पाटील जे .एफ. ,आर्थिक विचारांचा इतिहास ,फडके प्रकाशन कोल्हापूर, 2005
2. पवार जे. के ., राजर्षी शाहूंची अर्थनीती, राज प्रकाशन, कोल्हापूर 2018
3. जाधव रमेश, राजर्षी शाहु गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई, आवृत्ती तिसरी 2016.
4. पवार जयसिंग, ' राजर्षी शाहु छत्रपती : जीवन व कार्य', ताराराणी बुक सर्विस, तृतीय आवृत्ती 2015
5. www.google.com

# महात्मा फुले यांच्या 'अखंड' मधील पुरोगामी विचार

**डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव**

सहयोगी प्राध्यापक, श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, माहूर जि. नांदेड

rajendrakumarlone510@gmail.com

**iLrkouk %**

महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे आणि पददलितांचे उध्दारकर्ते म्हणून महात्मा फुले यांचे नेहमीच स्मरण केले जाते. १९ व्या शतकातील बहुजन समाज अज्ञान, अंधकारात, अंधःश्रध्देमध्ये चाचपडत होता. धर्म, वर्णव्यवस्थेच्या नावावर दीन-दलिताची पिळवणूक, लुबाडणूक समाजातील वरिष्ठाकडून केली जात होती. अशा पिळवणूकी विरूध्द म. फुले यांनी बंड केले. अशा वेळी बहुजन समाजाला जागृत करून त्यास आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याची शिकवण दिली. या कार्यामुळेच त्यांना महाराष्ट्राच्या समाजसुधारणा कार्यात व्यापक अधिष्ठान प्राप्त झाले.

म. फुले यांनी आपले सर्व आयुष्य समाज सुधारणेसाठी अर्पण केले. स्वतः त्यांनी समाजात जागृती करण्यासाठी विविध सुधारणा करण्यास सुरुवात केली. पुण्यामध्ये पहिली मुलीची शाळा १८४८ साली काढली. त्यानंतरही त्यांनी शाळा काढल्या. अस्पृश्यांसाठी आपल्या घरचा हौद खुला केला. हिंदू धर्मामध्ये धर्माच्या नावावर अधःकारांचे अवडंबर माजले होते. त्याला त्यांनी आपल्या कार्यातून शह दिला. विधवा विवाहाचा प्रश्न, सतीप्रथेचा प्रश्न, बालविवाहाचा प्रश्न अशा कितीतरी प्रश्नांच्या विरोधात त्यांनी समाजात जागृती केली. समाजातील धर्माला विरोध करून त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना १८७३ साली केली. प्रचलित धर्मातील तत्त्वांना त्यांनी विरोध केला आहे. तसेच सत्यशोधक समाजाची तत्वे आणि मताचा प्रचार करण्यासाठी, समाजात जागृती करण्यासाठी त्यांनी विविध वैचारिक ग्रंथाचे लेखन केले.

आपल्या पुरोगामी विचाराप्रमाणे त्यांनी आचरण केले. 'अखंड' ही काव्यात्मक रचना परखड शब्दात पुरोगामी विचार मांडणारी रचना आहे. ही रचना अभंगाच्या स्वरूपासारखी आहे. या रचनेमधून त्यांनी धर्मांधतेवर टीका केली आहे. वर्णव्यवस्था, जाती व्यवस्था यांच्या नावावर समाजात जो अमाणूस अत्याचार वरिष्ठ वर्गातील लोकांकडून केला जात होता. याला महात्मा फुले आपल्या अखंड रचनेतून प्रखर शब्दात विरोध करतात.

"जप अनुष्ठाने पाऊस पाडीती॥ आर्य कां मरती जळावीण ॥१॥
जळांत बुडता गटांगळया खाती॥ प्राणास मुकती ॥ तळीं बसे ॥२॥
फुगुनीयां वर जळीं तरंगती॥ मजा ते दावीती ॥ मृत्युलोकीं ॥३॥
अज्ञानी शूद्रांत भुदेव बनती॥ भिक्षा का मागती॥ जोती म्हणे ॥४॥"

म. फुले यांच्या अखंड रचनेस भारतीय समाजाची पार्श्वभूमी आहे. भारतीय समाजात वर्णव्यवस्था व जातीव्यवस्थेचे अवडंबर माजले आहे. मनुच्या 'मनुस्मृतीं'चे भूत भारतीय समाजावर बसले आहे. ब्राम्हण, क्षेत्रीय, वैश्य, शुद्र हे चार वर्ण समाजात आहेत. ही व्यवस्था देवानेच निर्माण केली असे वेदाच्या आधारे काही लोकांनी आपल्या स्वार्थासाठी सांगितले. तेच आज समाजात आचरणात आहे. ब्राम्हण वर्ग यांनी खालच्या वर्गव्यवस्थेला काही जाचक नियम घालून दिले. विशेषतः शुद्र वर्णातील लोकांचे तर यामुळे खूपच हाल झाले.

ब्राम्हण समाजातील ढोंगी प्रवृत्तीवर उपरोधात्मक शैलीत महात्मा फुले टीका करतात. जप, देवपूजा, विधी, यांच्या नावावर जर सर्वच गोष्टी झाल्या असत्या तर मानवाचे नक्कीच कल्याण झाले असते. पण ही सर्व समाजात अंधःश्रध्दा निर्माण केली आहे. जप अनुष्ठानाने पाऊस पडला असता तर आर्य पाण्याविना का मरतात? असा प्रश्न महात्मा फुले उपस्थित करतात. 'जळात बुडता गटांगळ्या खाती। प्राणास का मुकती, असेही ते उपेक्षेने ब्राम्हणवर्गाला प्रश्न विचारतात. पाण्यात पडल्यानंतर आर्य गटांगळ्या का खातात. जप, मंत्र, तंत्र हे जर त्याच्या जवळ खरेच असेल तर असा प्रसंग त्यांच्यावर का येतो, याचा समाजाने विचार करावा. कोणताही मनुष्य पाण्यात पडल्यास त्याला तरंगता येत नसेल तर, तो बुडून मरणार हे सत्य आहे. पण ब्राम्हण वर्गाकडून जप, मंत्र, तंत्र, वेद यांच्या आधारावर सर्व काही शक्य आहे, असे भासवले जाते. पाण्यात आर्य बुडो की, कोणताही मनुष्य बुडो, त्याला तरंगता येत नसेल तर तो मरतोच, हे महात्मा फुले समाजाला सांगतात. आणि ब्राम्हण वर्णाला ते प्रश्न करतात, पाण्यात बुडाल्यास फुगुनी वर का तरंगता? आणि मजा का मृत्यू लोकांत दावता? असा प्रश्न ते उभा करतात. अज्ञानी शुद्र लोकांवर अन्याय करून अंधःकारात्मक लोकांत तुम्ही भूदेव बनता. आणि देव बनले तर भिक्षा का मागता. असे म. फुले या प्रवृत्तीला प्रश्न विचारतात. या अखंडातून त्यांनी समाजाला विचार प्रवृत्त होण्यास सांगितले आहे. वास्तववादी व पुरोगामी दृष्टीने विचार केल्यास म. फुले यांचे या अखंडातील विचार सत्य वाटतात. सर्व मानवाचा धर्म एकच आहे; पण काही मानवांनी आपल्या स्वार्थासाठी याचे अवडंबर माजविले आहे. याला म. फुले यांचा विरोध या अखंडातून व्यक्त होतो.

"क्षत्रियांनो, तुम्ही कष्टकरी व्हावें॥ कुटुंबा पोसावें॥ आनंदानें ॥१॥
नित्य मुलींमुलां शाळेत घालावें॥ अन्नदान द्यावे॥ विद्यार्थ्यास ॥२॥
सार्वभौम सत्य स्वतः आचरावें॥ सुखें वागवावें॥ आर्य भट्टा ॥३॥
अशा वर्तनानें सर्वा सुख द्याल॥ स्वतः सुखी व्हाल॥ जोती म्हणे ॥४॥"

म. फुले यांनी विविध धर्मातील अनिष्ठ प्रवृत्तीवर टीका केली आहे. समाजास मार्गदर्शनही केले आहे. तसेच हा अखंड महात्मा फुले यांनी क्षत्रियांना मार्गदर्शन करण्यासाठी लिहिला आहे, असे वाटते. क्षत्रियांनो, तुम्ही कष्टकरी व्हावे असे सुरूवातीला म. फुले म्हणतात. आपला विकास आपणच करू शकतो. आपल्या

श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. समाजातील ऐतखाऊ प्रवृत्ती वाढली होती. त्याला या अखंडातून विरोध दिसतो. क्षत्रियांनी स्वतः खूप कष्ट करणे आवश्यक आहे. आपल्या कुटुंबाचे पालन आनंदाने करावे, असे ते म्हणतात. त्यांनी आपल्या मुला मुलींना शाळेत घालावे. आपल्या घरातील अज्ञानपणा घालवण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता म. फुले वर्तवितात. विद्यार्थ्यांना अन्नदान करावे विद्येच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. पोटाचा प्रश्न म्हणून काही मुले शाळेत येत नाहीत; तर त्यांच्या पोटासाठी क्षत्रियांनी अन्नदान करावे. मानवी प्रवृत्तीचा विकास करायचा असेल तर साधे वर्तन करावे असेही म. फुले सांगतात. सर्व मानव प्राण्यास सुखाने वागवावे, द्वेष, मत्सर, धर्म, जात, प्रदेश यानुसार कुणाचाही भेदाभेद करू नये. आर्य भट्टास पण सुखाने वागवावे. आपल्या वर्तनाने कोणालाही दुःख पोहचणार नाही. सर्वांना सुख द्यावे. स्वतः सर्वांना बंधुभावाने समतेने वागणूक दिली, मानवतावादी तत्त्वावर प्रेम केले तर आपण सर्वांना सुख देऊ शकू. आणि यामुळे स्वतःलाही सुखप्राती मिळेल. क्षत्रियांनी या आचरणाचा स्वीकार करावा, असे म. फुले यांना वाटते. सर्व मानवांचा धर्म एकच असल्यामुळे सुख घ्या, सुख द्या या तत्त्वाचा पुरस्कार करावा. शिक्षण, कष्ट, अन्नदान, सत्य आचरण, सुखप्राप्ती या मूल्याचा उल्लेख म. फुले यांनी या अखंडात केला आहे.

"तीन भाषेमध्ये सध्या जे निपूण॥ सद्‌गुणीं संपन्न॥ मानवांत ॥१॥
चाळीशीच्यावर मुख्य दीक्षा घ्यावी॥ गादी संभाळावी॥ समाजाची ॥२॥
क्षेत्री ख्रिस्ती महंमदी आळवावे॥ सत्य वर्तवावें॥ त्यांचे हस्तें ॥३॥
सत्यावीण नाहीं जगीं अन्य धर्म॥ कळवावें वर्म॥ जोती म्हणे ॥४॥"

मानवाचा एकच धर्म हे कथन या अखंडातूनही म. फुले करतात. समाज पुरोगामी विचाराने संपन्न व्हावयाचा असेल तर शिक्षणाचा प्रसार समाजात झाला पाहिजे. शिक्षणामुळे काही भाषा अवगत झाल्या तर त्या भाषेमधील ज्ञान आपणास अवगत करता येते. काही ज्ञान हे आपल्या भाषेत नाही. म्हणून सद्‌गुणी संपन्न व्हायचे असेल तर, तीन भाषेमध्ये निपूण झालं पाहिजे. कारण भाषेमध्येच ज्ञानभांडार आहे. ते ज्ञानभांडार भाषेतून अवगत करावयाचे असेल तर, त्या भाषा व्यक्तीला आल्या पाहिजेत. असा माणूस सद्‌गुणी संपन्न होतो.

सामाजिक जीवन जगत असताना आपण समाजाचे ऋणी आहोत. यासाठी समाजकल्याण होईल असे वर्तन करावे. जीवन जगत असताना चाळीस वर्षानंतर समाज सेवेचीच मुख्य दीक्षा घ्यावी. तेच आपले व्रत मानावे, धर्म मानावा; आणि समाजाची गादी सांभाळावी. समाजातील अज्ञान, अंधःश्रद्धा, परंपरागत रूढी, अनिष्ठ प्रवृत्ती याचा नायनाट करण्याचा प्रयत्न करावा. जेणे करून समाज प्रगतीपथावर जाईल. खऱ्या धर्माचे काय तत्त्वज्ञान आहे हे समाजाला अवगत करून द्यावे. ख्रिस्ती व महंमदी धर्मातील येशू ख्रिस्त व महंमद पैगंबर याच्या सत्य तत्वाची ओळख करून द्यावी. मानवता हा एकच धर्म आहे. म्हणून सत्य वर्तन

करावे. महात्मा फुले म्हणतात, सत्यवीण नाही जगी अन्य धर्म, कळवावें वर्म।। 'जगामध्ये सत्याशिवाय दुसरा धर्म नाही, हे तत्त्व सर्वांनाच कळावे. या तत्वाचा प्रसार आणि प्रचार होणे आवश्यक आहे. यासाठीच महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाचीही स्थापना केली. या अखंडातून मानवी मूल्याची जोपासना करण्यास व खरा धर्म कोणता हे शोधण्यास मानवाला प्रवृत्त करतात. शिक्षण, समाजसेवा, सत्यधर्म याचा पुरस्कार या अखंडातून म. फुले यांनी केला आहे.

महात्मा फुले यांनी असे विविध विषय घेऊन अखंड रचना केली आहे. मानवाचा धर्म एक, मानवी स्त्री-पुरूष, आत्मपरीक्षण, नीती, धीर, समाधान, संहिष्णूता, सद् विवेक, उद्योग, स्वच्छता, गृहकार्यदक्षता अशा विषयावर अखंड रचना त्यांनी केली आहे. वरील अखंड रचना ही मानवाचा धर्म एकच या तत्त्वाचा पुरस्कार करण्यासाठी केली आहे. समाजात मानव हा एकच धर्म आहे. पण काही अपप्रवृत्तीने समाजात विषमता निर्माण केली आहे. धर्म, वर्णव्यवस्था, जात ही मनुव्यवस्थेने निर्माण करून समाजात अपप्रवृत्ती निर्माण झाल्या. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ही वर्णाची उतरंड व्यवस्था काही स्वार्थी प्रवृत्तीने निर्माण केली आहे. यामुळे हजारो वर्षापासून शुद्र, अतिशुद्र लोकांना मानवाप्रमाणेच वागणूक दिली जात नाही. समाजातील अनिष्ठ प्रवृत्ती, पूजा, अर्चा, अंधश्रध्दा याला विरोध म. फुले यांनी केला आहे. आणि समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता, मानवता या मूल्याचा प्रसार व्हावा म्हणून म.फुले यांनी अखंड रचना केली व समाजातील अपप्रवृत्तीवर त्यांनी यातून टीका केली व सत्य वर्तनाचा आग्रह त्यांनी धरला आहे. त्यामुळे त्यांच्या 'अखंडा'मधून पुरोगामी विचार व्यक्त झालेले आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

१) संपा. प्रा. पृथ्वीराज तौर प्रा. सर्जेराव रणखांब, साहित्य जागर, (प्र.आ.) प्रतिभास प्रकाशन, परभणी, २००८.

२) संपा. य. दि. फडके, महात्मा फुले समग्र वांङ् मय, (प्र.आ.) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९१.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलित साहित्याला योगदान

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख, शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर
ईमेल— bdigole007@gmail.com

**प्रस्तावना**

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्य आणि संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती होईपर्यंतच्या कालखंडात विभावरी शिरूरकर, व्यंकटेश माडगूळकर या लेखकांच्या कथात्मक साहित्यातून दलित समाजजीवनाचे अधिक प्रमाणात चित्रण आलेले आहे. त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जनमाणसातील प्रतिमा समाजसुधारक, घटनातज्ज्ञ, लोकोध्दारक आणि क्रियाशील विचारवंत अशी आहे. त्यांनी जीवनाचा सर्वांगिण विचार केलेला आहे. तत्वज्ज्ञ, विचारवंत कलेकडे आणि साहित्यकृतीकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. संत ज्ञानेश्वर, संत कबीर, महात्मा फुले, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, यशवंतराव चव्हाण आणि त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्वच क्रियाशील विचारवंत साहित्याचा आणि कलेचा आस्थेने विचार करीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमेरिकेत शिक्षण घेत असताना नव्याने प्रसिध्द झालेले राम गणेश गडकरी यांचे नाटक वाचण्यासाठी मागवून घेतले होते. भीमराव कर्डक यांच्या जलशाबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढताना म्हटले, ''माझ्या दहा सभा, मिटिंगा आणि कर्डक यांच्या मंडळीचा एक जलसा बरोबर आहे.'' त्यांच्या हयातीत बौध्द—दलित साहित्य परिषदा संपन्न झालेल्या आहेत. साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी 'फकिरा' ही कादंबरी त्यांच्या प्रभावातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली होती. प्राचार्य डॉ. म.भि. चिटणीस यांनी लिहिलेले आणि मिलींद महाविद्यालयातील बोधी मंडळाने सादर केलेले 'युगयात्रा' हे नाटक स्वत: बाबासाहेबांनी पाहून समाधान व्यक्त केले. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्नेहसंमेलन प्रसंगीसुध्दा अशी नाटके सादर करावीत. अशी अपेक्षा व्यक्त केली. नागपूर येथील विदर्भ साहित्य संघात केलेल्या एका भाषाणात साहित्यिकांना उद्देशून म्हटले, ''मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचं आहे की, उदात्त जीवनमूल्ये आपल्या साहित्यप्रकारातून आविष्कृत करा; आपलं लक्ष अंकुचीत मर्यादित ठेवू नका; तर ते विशाल करा; आपली वाणी चार भिंतीपूरती राखू नका, तर तिचा विस्तार होऊ द्या; तिचं तेज खेडयापाडयांतील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा; आपल्या देशात उपक्षितांचे, दलितांचं फार मोठं जग आहे. हे विसरू नका; त्यांचचं दु:ख, त्यांची व्यथा समजून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे.'' या उद्‌गारावरून बाबासाहेबांच्या विशाल, व्यापक आणि उदात्त दृष्टीचा, विचारांचा प्रभाव पडलेला आहे. साहित्य आणि समाजाचा जवळचा संबंध त्यांनी लेखकाला सांगितला आहे. समाजाच्या हिताचे जे साहित्य आहे त्याचे मानदंड त्यांनी ठरविलेले होते.

ऐतिहासिक आणि वस्तूनिष्ठदृष्टया विचार करता दलित साहित्याचे उर्जाकेंद्र, उगमस्थान, प्रेरणास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, त्यांची जीवनदृष्टी, समता, स्वातंत्र्य, बंधूता, न्याय, धर्मनिरपेक्षता ही मूल्य, त्यांनी केलेल्या चळवळी, सत्याग्रह, काळराम मंदिर प्रवेश, नवे विचार, वैज्ञानिक दृष्टी याचा प्रभाव स्वातंत्र्योत्तर साहित्यावर पडलेला आहे. जातिनिर्भर समाजव्यवस्था व विषमता नष्ट करून नव्या परिवर्तनवादी समाजाची निर्मिती करणे हे दलित साहित्याचा मुख्य गाभा आहे. त्याअनुषंगाने नकार, विद्रोह, बंड, विज्ञाननिष्ठा हे तत्वही साहित्यातून अभिव्यक्त होणे महत्वाचे होते. प्रस्थापित समाजव्यवस्थेने रूढी, प्रथा, परंपरेने लादलेली निकृष्ठ गावगाडयातील कामे बंद करावेत, अस्पृश्य वर्गाने शिक्षण घेऊन स्वच्छ व स्वाभिमानाने राहावे, देव धर्म, रूढी, परंपरा या रहाटगाडग्यात हिंदू समाजव्यवस्थेने अस्पृश्य समाजाला अडकवून त्याला जनावराप्रमाणे गुलामाप्रमाणे वागणूक दिली आहे. या शोषणयुक्त समाजव्यवस्थेचा त्याग करून पेटून उठावे. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी आपला हक्क यासाठी संघर्ष करून नव्या

समाजाची निर्मिती करावी. साठोत्तरी दलित साहित्याला डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाची आणि विचारांची भक्कम बैठक लाभली. त्यामुळे दलित साहित्यिक नव्या जोमाने आणि क्रांतीकारी विचारांनी लिहू लागले. या संदर्भात डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''दलित साहित्यापुरते बोलायचे झाले तर डॉ. आंबेडकर हे प्रमुख उर्जाकेंद्र आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रकाशातही नवी चळवळ, जीवनाचा एक नवा अन्वयार्थ लावू पाहते. धर्मव्यवस्थेने येथील माणसाला बंदिस्त केले आहे. म्हणून त्याच्या लौकिक जीवनाची ससेहोलपट तर होतेच; पण त्याची आत्मिक उन्नतीही होत नाही. म्हणून वर्णव्यवस्थेची अनेक मजली इमारत उद्धस्त केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे प्रमुख सूत्र आहे. या विचारांच्या प्रकाशातच जीवनाचा नवा अर्थ लावण्याचा प्रयत्न दलित साहित्यिक करू लागले आहेत. म्हणूनच त्यांचा पुर्नजन्म आणि कर्मवादाचे थोतांड कळू लागले आहे. यातून जीवनाची एक वेगळी मांडणी करणारे साहित्य निर्माण होऊ लागले.'' म्हणून भारतातील दलित समाज दु:ख, वेदना, अमानुषता या चक्रातून बाहेर येऊ शकला नाही. त्याला त्याचे अस्तित्व, सत्व, अस्मिता, आत्मप्रत्यय यांची जाणीव करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रचंड वैचारिक संघर्ष करावा लागला. एक नवे मानवतावादाचे, मानवमुक्तीचे तत्वज्ञान डॉ. बाबासाहेब यांच्या रूपाने विसाव्या शतकात उदयाला आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' आणि 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो कोणी चाखेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही.' हा महामंत्र दलितांचे पूर्वजीवन बदलून टाकण्यास हा समर्थ ठरला. याच प्रभावातून स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी साहित्यिक लिहू लागले.

विभावरी शिरूरकर यांच्या 'बळी' या कादंबरीत दलित समाजातील काही जातींना चोर जमात म्हणून इंग्रजांनी गुन्हेगार ठरविले होते. मांग, गारूडी यांना रोज अधिकाऱ्यांपूढे हजेरी द्यावी लागत असे. कुठेही चोरी किंवा डाका, गुन्हा घडला की, याच जातीच्या माणसांना जाब विचारून तुरूंगात डांबले जाई. त्यांचा अनेक प्रकारे छळ केला जात असे. वारली या आदिवासी जमातीचा वेठबिगारीमुळे होणारा छळ प.त्रि. सहस्त्रबुध्दे यांनी 'पहिली सलामी' या कादंबरीत चित्रित केला आहे. र.वा. दिघे यांनी 'आई' या कादंबरीत अल्पप्रमाणात कातकरी समाजाचे चित्रण केले आहे. बा. भ. बोरकर यांनी 'भावीण' या कादंबरीत गोठयातील भाविण (देवदासी) या समाजाच्या जीवनाचे चित्रण केलेले आहे. दलित जीवनाचे वास्तव आणि अनेकविध अंगांनी चित्रण करणारे व्यंकटेश माडगूळकर यांनी गावाशी व गावगाडयाशी संबंधीत अशा अनेक दलित जातीच्या जीवनाचे चित्रण केलेले आहे. दलितांच्या मनातील परंपरा आणि नवी परिस्थिती यातला संघर्ष 'देवा सटवा महार' या कथेत चित्रित केलेले आहे. देवा सटवा महाराच्या रूपाने जागृत होणाऱ्या दलित माणसाचे प्रतिनिधिक चित्रण केलेले आहे. माडगूळकर आपल्या कथांतून केवळ सवर्णांकडून दलितांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराचे, दलितांना दारिद्रयामुळे भोगाव्या लागणाऱ्या दु:खाचे चित्रण करीत नाहीत. तर दलित जीवनाचा अनेकविध अंगानी शोध घेतात. दलितांच्या, दारिद्रयाचे चित्रण धर्मा रामोशी, राममैलकुली व ओझं या कथेत येते. दलित व गावकरी यांच्या परस्पर संबंधाचे, त्यातील ताणतणावाचे चित्रण अखेर आकण्या घरी आला. आडीट, न्याय, गोडेपाणी या कथेत येते. दलितांबरोबर भटके, विमुक्त, फासेपारधी यांचेही चित्रण करणाऱ्या तीसच्या वर कथा आहेत. मराठी साहित्यात दलित साहित्याचा वेगळा प्रवाह निर्माण होण्यापूर्वी दलितेत्तर लेखकांच्या जोडीनेच दलितांच्या जीवनाचे चित्रण आपल्या कथा—कादंबऱ्यातून करणारे अण्णा भाऊ साठे यांच्या स्मशानातील सोनं, थडयातील हाडं, कोंबडी चोर इत्यादी कथांतून दारिद्रयाने हैराण झालेल्या दलित माणसाचे वास्तवपूर्ण चित्रण येते. 'वळण' या कथेत महारमंडळी मटणमांस खाणाऱ्या महारणीला दंड केला. तरी ती मांस खाण्याचे सोडत नाही. बंडू मांग तिला चोरून मांस पुरवतो. बळी महार व बंडू मांग यांच्या संघर्षाचे चित्रण येते. उपकाराची फेड या कथेत शंकर व मलू महार यांच्यातील संघर्षाचे चित्रण येते. अण्णा भाऊंच्या कथांतून प्रामुख्याने दलित दारिद्रयाचे व त्यांच्या पोटाच्या भूकेचे चित्रण येते. डॉ. आंबेडकर यांची विचारधारा प्रमाण मानून बंधूमाधवांनी दलितांच्या जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या 'महार जल्माची चित्तरकथा' या गावकीच्या कामात राब राबणाऱ्या दादू महाराचे चित्रण येते. 'आम्ही गगनालाही गवसणी घालू' या कथेत मेलेली ढोरं ओढण्याचे व गावकीची कामे करण्याचे महार मंडळी नाकारतात. म्हणून सवर्ण

अस्पृश्यांवर मारहाण करून बहिष्कार टाकतात. याचे चित्रण येते. 'सारं आभाळ फाटलय' या कथेत शासकीय अधिकारी दलितांवर कसा अन्याय अत्याचार करतात. तर अस्पृश्यतेच्या कायद्यातील फसवेपणा 'सव्वा रूपया कप' या कथेत चित्रित केला आहे. या कथांतून दलितांच्या जीवनाचे चित्रण आलेले आहे. त्यामुळे दलित जीवनाच्या चित्रणाचा सर्वांगिण परिणाम बंधुमाधव यांची कथा सांगत नाही. दलित दलितांमधील संबंधाचे किंवा कौटुंबिक जीवनाचेही चित्रण त्यांच्या कथातून येत नाही. शंकरराव खरातांच्या कथातून दलितांतील अनेक पोटजातीच्या जीवनाचे चित्रण आलेले पहावयास मिळते. त्यांच्या कथांतून सवर्णांकडून दलितांवर होणारा अन्याय—अत्याचार, हिंदू धर्माने लादलेल्या रूढी—परंपरांमुळे जीवनात निर्माण होणारे दु:ख, दारिद्रयामुळे होणारी दलितांची उपासमार, समाजाने त्यांना गुन्हेगार ठरविल्यामुळे त्यांची होणारी परवड, गावकीच्या कामामुळे होणाऱ्या यातना इत्यादीमुळे जेरीस आलेल्या दलित माणसाच्या जीवनाचे चित्रण तपशीलाने मांडतात. भुक आणि दारिद्रयाने त्रस्त झालेली माणसे त्यांच्या कथांमधून आढळतात. रामा महार, सांगावा, दौंडी, बहिष्कार, डोंबारी इत्यादी दलित जीवनावरील चांगल्या कथा म्हणता येतील. कुटूंबातील इतर माणसांच्या संबंधाचेही चित्रण या कथातून पहावयास मिळते. दारिद्रयामुळे होणारी भांडणे, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा अनुसरण्यातून निर्माण होणारे मतभेद त्यातून उद्‌भवणारे कौटूंबिक ताण—तणाव कसा निर्माण होतो. त्यांच्या कथांतून दलितांची होणारी चूक, दलितांचा आडमूठेपणा किंवा वैयक्तिक कारणामुळे उद्धस्त होणाऱ्या जीवनाची कारणे चित्रित होत नाहीत. ती फक्त दलित व सवर्ण यांच्यातील संघर्षावरच भर देणारी ठरते. १९२० ते १९६० या कालखंडात डॉ. आंबेडकर यांच्या व्यक्तित्वाचा, विचारांचा त्यांनी केलेल्या चळवळीचा प्रभाव फार मोठया प्रमाणात झाला नसला तरी अल्पप्रमाणात का असेना दलितेतर लेखकांवर व त्यांच्या साहित्यकृतीवर परिणाम किंवा प्रभाव दिसून येतो.

दलित जीवनाचे आत्मभान अण्णा भाऊ साठे, खरात, बंधुमाधव यांच्यानंतर बाबूराव बागूल यांच्या कथांतून दिसून येते. सामाजिक विषमता आणि आर्थिक शोषण यामुळे दलित जीवन उद्धस्त होते. अशा दृष्टिकोणातून ते दलित चित्रण करतात. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्सच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कथांवर दिसून येतो. शोषित, पिडित माणसाची संस्कृती यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. माणसाची महत्ता आणि त्याचे मोठेपण त्यांनी आपल्या कवितेत सांगितले आहे. ते म्हणतात. ''वेदा आधी तू होतास, वेदाच्या परमेश्वराआधी तू होतास, तूच सूर्याला सूर्य म्हटले आणि सूर्य, सूर्य झाला, तूच चंद्राला चंद्र म्हटले आणि चंद्र झाला, अवघ्या विश्वाचे नामकरण तू केलेस.'' अशा व्यापक मानवतावादाच्या भूमिकेतून दलितांच्या जीवनाचे ते चित्रण करतात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक परिवर्तनाला गती मिळू लागली बदलते सामाजिक व शैक्षणिक वातावरणाचा परिणाम होवून दलित वर्गातून लेखकांचा मोठा वर्ग तयार झाला. समकालीन समाजजीवनाचा वेध घेत आजच्या सामाजिक प्रश्नांना सामोरे जाणे हा विषय होता. योगिराज वाघमारे यांनी माझं चुकलय, बेगड या कथांतून आजची सुशिक्षित पिढी समाजापासून दूर कशी जाते याचे चित्रण केले. केशव मेश्राम यांनी हराममोत, पत्रावळ, खरवड या कथांतून झोपडपट्टी जीवनातील व्यभिचार अनैतिक संबंध, हिंसाचार, क्रुरपणा, फसवेगिरी इत्यादी अमानुष प्रवृत्तींनी झोपडपट्टी जीवन कसे बरबटलेले आहे. हे दाखवून दिले. वामन होवाळ यांनी उपहासात्मक व उपरोधात्मक विनोदाने ग्रामीण जीवनातही कशी अंधश्रध्दा, परंपरा, रूढी सांभाळल्या जातात. त्याची खिल्ली अंगारा, येळकोट या कथांतून उडविली आहे. आजही गावपातळीवर दलितांवर अन्याय, अत्याचार होत आहे. याविरूध्दच्या विद्रोहाचे चित्रण मजल्याचं घर आणि अर्जून डांगळे दलितांतर्गत ताणतणावाचे चित्रण आणि बुध्द मरून पडला या कथेत करतात. ग्रामीण, शहरी भागात जे स्वार्थी, ढोंगी, नेतृत्व राजकारण तयार होते. त्याचे चित्रण योगीराज वाघमारे यांची होरपळ, अमिताभ यांची साहेब, अर्जून डांगळे, दया पवार यांची फिडेल, केशव मेश्राम यांची पाठवणी इत्यादी कथांतून येते. तसेच दलित संसाराचे चित्रण अभिताभ यांची सत्यकाम वल्द जाबाली या कथेत येते. बाबासाहेबांच्या विचाराचे खरे वारसदार कोण आणि दलितांमध्ये पडलेले गट याचे चित्रण वारसदार व जयंती या कथेत वामन होवाळ करतात. आजच्या दलित कथेच्या संदर्भात गो. म. कुलकर्णी यांनी व्यक्त केलेले मत येथे नमूद करावेसे वाटते. बाबूराव बागूल यांच्यानंतरच्या दलित कथेने समाजदर्शनाबरोबर आत्मदर्शनही घडविले आहे. व्यक्तिगत आणि सामाजिक स्तरातील विविध

विसंवाद, उपरोध, कारूण्य प्रगट केलेले आहे. सवर्ण समाजातील दोषांबरोबरोच स्वसमाजातील दोषांचाही अविष्कार केलेले आहे. व्यक्ती—व्यक्ती आणि समाज, शहर आणि खेडे, आधुनिकता आणि परंपरा, हिंदूधर्म आणि बोध्द धर्म, साक्षरता आणि निरक्षरता, अभिजन—बहुजन यांच्यातील कितीतरी द्वंद्वे दलित जीवनात आजही दिसून येत आहेत. ते प्रामाणिकपणे मूखर करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावातून लिहिलेल्या साहित्यकृतीतून केले आहे.

दलित कथेनंतर दलित आत्मकथावरही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. दया पवार यांचे बलुतं, प्र.ई. सोनकांबळे आठवणीचे पक्षी, माधव कोंडविलकर उपरा, लक्ष्मण माने उपरा, शंकरराव खरात तराळ—अंतराळ, ना.स. झोडगे फांजर, रूस्तुम अचलखंब गावकी, शरणकुमार लिंबाळे अक्करमाशी इत्यादी याबरोबरच स्त्रियांनी लिहिलेली कुमुद पावडे यांचे अत:स्फोट, बेबी कांबळे जिणं आमुचं, शांताबाई कांबळे माझ्या जल्माची चित्तरकथा इत्यादी आत्मकथनांतून दलितांच्या दु:खांना, ताणतणावांना अनुभवाचे रूप धारण करतात. पिडित, शोषित जीवनचित्रण हे आत्मकथनांचे वैशिष्टये आहे. कौटुंबिक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाशिवाय आत्मकथने असू शकत नाहीत. भारतीय समाजव्यवस्थेच्या तळाशी जातिभेद, अंधश्रध्दा, अज्ञान, रूढीग्रस्तता या प्रश्नांच्या अनुषंगाने दलित आत्मकथनांमध्ये जीवनचिंतन व जीवनभाष्य केलेले आढळते. तसेच सामाजिक व धार्मिक चालीरीती इत्यादी बाबी आलेल्या आढळतात. त्यामुळे दलित आत्मकथनाचे सामाजिक व सांस्कृतिक दस्ताऐवज म्हणून फार महत्व आहे. आत्मकथन निर्मितीमागे डॉ. आबेडकरांचे विचार, प्रेरणा आहेत.दलित कादंबरीतून अंतर्मनातील द्वंद्व प्रगट झालेले आहे. अण्णा भाऊ साठे यांची फकिरा, हि. गो. बनसोडे यांची मुक्तिसंग्राम, बाबूराव गायकवाड यांची आग, भीमसेन देठे यांची इस्कोट तसेच दलित नाटकांमध्ये किसन फागोजी बनसोड संत चोखामेळा, प्रभाकर रणवीर नोकरीच्या जाळयात, गंगाधर, माणुसकीचे बंड, म.भि. चिटणीस युगयात्रा, दत्ता भगत आवर्त, वाटा—पळवाटा, प्रेमानंद गज्वी देवनगरी, तनमाजोरी, किरवंत, रामनाथ चव्हाण साक्षीपुरम इत्यादी नाटके, दलित रंगभूमीचा मुलाधार आहेत. दलित रंगभूमी एक सामाजिक आणि नव्या काळाची गरज म्हणून वावरते. दलित रंगभूमीने डॉ. बाबासाहेबांचा मानवमुक्तीचा लढा जीवंत ठेवला आहे. मुल्याधिष्ठित समाजाचे नेतृत्व दलित रंगभूमी करीत आहे. कारण तिच्या पाठीशी डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा, व्यक्तिमत्वाचा, चळवळीचा, तत्वज्ञानाचा, खूप मोठा वारसा आहे.

१९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले आणि बहुजन समाजाला तीव्र धक्का बसला. नव्या संघर्षाला वाचा फुटली. या नव्या संघर्षाला सामोरे जाण्याकरीता दलित संवेदनशील मनाने कविता हा वाड्मय प्रकार स्विकारला आणि आपल्या काव्यातून बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व, त्यांच्याविषयी आदर, आशावाद प्रगट होवू लागला. लोकशाहीर वामनदादा कर्डक यांनी डॉ. बाबासाहेबांच्या संदर्भात आपल्या अनेक काव्यातून गुणगान, त्यांची शिकवण, त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्या निधनानंतरची दलित समाजाची अवस्था या सर्वांचे चिंतन केले आहे. 'तुझे रान भिमा' या कवितेचे उदाहरण घेता येईल, ''तुवा पेरलेले ते तरारून आले, उभे शेत हिरवे नवे रूप ल्याले, तुझी आन भाकू, खडे आज ठाकू, तूझे रान राखू आणि सुख चाखू, सुखाचाच, ठेवा, मिळाला महान तुझ्या लेकरांना'' दलित विचारवंत व कवींचा लोकशाही जीवनपध्दतीवर विश्वास आहे. याचे कारण डॉ. आंबेडकरांची विचारधारा आहे. भीमजन्माची कथा, सोन्याची सकाळ, या कवितेत बाबासाहेबांविषयी भक्तिभाव व्यक्त होतो. डॉ. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर समाज दुभंगला. समतेच्या एकीच्या दोराने बाबासाहेबांनी एकजुटीने बांधलेला समाज दुहिने फाटला आणि पोखरला. त्याची व्यथा बाबासाहेबांचे विचार आठवण्यातच कवी धन्यता मानतात, ''काय सांगू तुला आता भीम माझा कसा होता, लेकराला जशी माता, भीम माझा तसा होता.'' वामन दादा कर्डक यांची कविता डॉ. आंबेकरांच्या विचाराने चिंब भिजून निघाली आहे. कवी नामदेव ढसाळ यांनी डॉ. आंबेडकर या दीर्घकवितेत सुरूवातीस मानवनिर्मित भिंती फोडून आपले व्यक्तिमत्व आंबेडकरांशी एकरूप होवू पहात आहे. समाजजीवनातले सडलेपण, मतलबीपणा, यातून डॉ. आंबेडकरांचे जीवनच कसा नवा मार्ग दाखवणारे आहे. याचे वर्णन करून शेवटी आंबेडकर व्यक्तिमत्वाला पर्यायच नाही अशी जाणीव व्यक्त करून ते म्हणतात, '' जो पाय पुसण्यावर बसत नाही, जो नूतन वर्षाच्या फुलपाखरासारखा उडतो नि प्रकाश पसरवतो. जो

रूळाबरोबर वाढत जातो, जो युनिर्व्हसिटयांचे चिरेबंद ढिले करतो, जो स्वतंत्रतेकडून स्वतंत्रतेकडे जातो असा तू एकूलता एक आमच्या रथाचा सारथी तो तू तोच तू आमचा'' 'पाईक' या कवितेतून डॉ. आंबेडकर नवी मूल्य समाजाला देत आहेत ही जाणीव व्यक्त होते. शिवाय काहीएक उध्द्वस्त करताना आपल्याला नवे भान येते असे ते नोंदवताना म्हणता, ''मी पाईक झालो ना भगवंताच्या तत्वज्ञानाचा, प्रज्ञा करूणेचा.'' यशवंत मनोहर यांनी 'भिमराव आंबेडकर' या कवितेतून स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ४० वर्षानंतरही दलित शोषितांवर होणारे अन्याय अत्याचार थांबत नाहीत तेंव्हा बाबासाहेब आढळतात. ''लक्तरलेले आयुष्य शिवणारा सुई दोरा तू कुठे ठेवलास?'' असा प्रश्न विचारून बाबासाहेबांना युगंधर संबोधून परत प्रश्न विचारतात, ''अरे या बेशरम अत्याचारांना फाडताना आम्ही, विजयी होवू असे शस्त्रसाठे कुठे ठेवलेस?'' ज. वि. पवार आज पन्नास वर्षांनी या कवितेत आपल्याला पेटविण्याची शक्ती डॉ. आंबेडकरांमध्येच आहे. यातून आज नव्या दिशा सूचित होतात. ज्योती लांजेवार आपल्या माय कवितेत म्हणतात, ''देऊ केलेलं उष्टं अन्न स्वाभिमानानं नाकारताना, तू शिकून आंबेडकरांवानी हो जा बापा!'' असा आशावाद प्रकट करते. कुटूंबातील अठराविश्व दारिद्रय आणि या दारिद्रयातही स्वतःच्या सामर्थ्यावर आंबेडकरांसारखे मोठे व्हावे असे संस्कार करणारी माय, बाप, बंधू—भगिनी दलित कवितेत सर्वत्र आढळतात. शरणकुमार लिंबाळे यांनाही बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक होण्यातच धन्यता वाटते. भगवान सवाई यांच्या 'चार किविता' विद्रोह आणि नव्या मूल्यांच्या आधारे जीवनाची पुनर्रचना करता येते. पण पुर्नरचनेची मागणी करणाऱ्या समाजघटकांनाही स्वतःचे आत्मपरिक्षण करायला हवे. अशा अवस्थेत ते डॉ. आंबेडकरांशी संवाद साधण्याशिवाय दुसरा पर्यायच नाही हे व्यक्त करतात, ''राष्ट्राच्या सदयतेतून फुलणाऱ्या आमच्यासाठीच्या योजना लिडरच्याच, देहावर तरंगून येताहेत. तरीच हे वस्तीभर वर्गणी हप्त्याचा पैसा गोळा करताहेत. बाबासाहेब की, जय म्हणत आहेत.'' अशा प्रकारे दलित कवितेतून डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाबरोबरच दलित वर्गाने नवे विचार, जीवन स्विकारावे, स्वाभिमानी बनावे याबरोबरच विद्रोह, नकार यातून आज दलित कविता गाव आणि आपण, आपले बांधव यातलं अंतर याचा वेध, आत्मशोध घेणारी कविता नरेश इंगळे, प्रल्हाद चंदवणकर, वामन निंबाळकर, उत्तम बावस्कर, दामोदर मोरे, केशव मेश्राम, अरूण काळे इत्यादी कवींनी डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने प्रभावित होऊन दलित कवितेतून समाजदर्शनाबरोबर समाजाच्या व्यथा, वेदना आणि इथल्या परंपरांना, व्यवस्थांना नकार देत ती विद्रोही बनताना दिसत आहे.

सारांश इतिहास, वर्तमान आणि प्रबोधनाचा मागोवा घेणारी दलित साहित्याची ही सर्व दालने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या प्रभावाने आणि प्रेरणेने अलंकृत झालेली आहेत. दलित साहित्याने मराठी साहित्याला अनोखे, अनुभवविश्व, नवी वाड्ग्मयीन दृष्टी, नवी अभिरूची, भाषा व शब्दसंग्रह, वाड़मयाचा समाजशास्त्रीय शोध घेण्याचे एक दालन निर्माण केलेले आहे. अवघ्या २५ ते ३० वर्षात दलित साहित्याच्या या प्रवाहाला काही मर्यादा पडल्या असल्या तरी पुढच्या काळात दलित **साहित्याचा प्रवाह उज्वल भवितव्य निर्माण करेल असा एक आशावाद बाळगता येईल.**

**संदर्भग्रंथ :—**

१) हरिश्चंद्र थोरात, 'कथनात्म साहित्य आणि समीक्षा', शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०११
२) आनंद पाटील, 'तौलनिक साहित्यः नवे सिध्दांत आणि उपयोजन', साकेत प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती १९९८
३) भालचंद्र नेमाडे, 'टीकास्वयंवर' साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती २००१
४) योगेंद्र मेश्राम, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाड्मयीनचिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००९
५) शरणकुमार लिंबाळे, 'दलित आत्मकथा एक आकलन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००९
६) विलास काळे, 'दलित कादंबरी आशय आणि अविष्कार, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०११
७) डॉ. गंगाधर पानतावणे, 'आंबेडकर जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २०१०

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य

**प्रा. डॉ. एच. टी. सातपुते**
इतिहास विभाग प्रमुख, माधवराव पाटील महाविद्यालय,  पालम,जि.परभणी
Email- drhtsatpute@gmail.com

एकोणीसाव्या शतकातील अग्रगण्य समाज सुधारक व विचारवंत म्हणून महात्मा ज्योतिबा फुले यांचा उलेख होतो. “रुसो जन्मला नसता तर फ्रेंच राज्य क्रांती झाली नसती. त्याप्रमाणे म. फुले जन्मले नसते तर स्रीयांचा उध्दार झालानसता.” असेम्हटल्यास वावगे ठरणार नाही. अशा या थोर समाजसुधारकाच्या कार्याचायालेखात थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.बुरसटलेल्या, पांरपारिक समाज व्यवस्थेविरुध्द बंड करून समाज परिवर्तनासाठी आयुष्यभर ज्यांनी लढा दिला तो क्रांतिकारी ठरतो. म्हणूनच आपण त्यांना महात्मा असेम्हणतो. न्याय, समता, स्रीस्वातंत्र्य, स्रीशिक्षण, मानवाचे मुलभूत अधिकार यासाठीचा त्यांचा संघर्षमय जीवनप्रवास पुढील अनेक शतके आणि अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायीठरला आहे. म. फुल्यांच्या शैक्षणिक, कृषिविषयक, सामाजिक विचारांची प्रासंगिकता आज पदोपदी लक्षात येते.महात्मा ज्योतीराव फुले हे बोलके सुधारक नव्हेतर कर्ते सुधारक होते,हे त्यांच्या कार्यावरून लक्षात येते. तत्कालीनसमाज अनिष्ठ रूढी, प्रथा परंपरांनी समाज ग्रासला होता. जातीप्रथा, बालविवाह, स्रीशिक्षणबंदी,शेतकऱ्यांच्या व्यथा, अशाअनेक सामाजिक समस्यानी समाजातभीषन रूप धारण केले होते. या समस्यांनावाचाफोडण्यासाठी आपली पत्नी सावित्रीबाई फुले आणि सहकाऱ्यांच्या मदतीने समाजसुधारणेचेकार्य हाती घेतले. संपूर्ण आयुष्य यासाठी खर्ची घातले. एकाचवेळी समाजप्रबोधन आणि कृती यांची सांगड घातली.

**शैक्षणिककार्य:**

१९व्याशतकातशिक्षणहीकेवळउच्चवर्गाचीमक्तेदारीहोती.ब्राम्हणेत्तर शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. आज आपण तशी कल्पनाही करू शकत नाहीत. महात्माफुलेंच्या काळात भारतात ब्रिटीशांची सत्ता होती. ब्रिटीश सरकारला भारतात आपली सत्ता स्थिर आणि द्रुढ करावयाची असल्यामुळे त्यांनी भारतातील सामाजिक-शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात शक्यतो हस्तक्षेप करण्याचे टाळले. ब्रिटीश सरकारने शिक्षणाच्या बाबतीत झीरपणीचासिद्धांत मांडला. या सिद्धांतानूसार प्रथम समाजातीलवरिष्ठ वर्गातीललोकांकडून कनिष्ट वर्गातील लोकांना शिक्षित करावयाचे. याच धोरणानुसार तेव्हाचे शैक्षणिक धोरण आखले जात होते. त्यामुळे म. फुलेंनीझीरपनीच्यासिद्धांताला सर्वप्रथम विरोध केला. शिक्षणाच्या अभावामुळे समाज नैतिक आणि बौद्धिकदृष्ट्या पंगूझाला. त्याची व्यवहारीक क्षेत्रात पीछेहाट झाली. आर्थिक शोषण झाले. हे बंद व्हायचे असेल तर शुद्रातीशुद्रांना शिक्षण देऊन सज्ञान करणे आवश्यक आहे याची जाणीव म. फुल्यांना झाली. समाजपरिवर्तनासाठी शिक्षण फार महत्वाचे आहे. हेविषदकरतांनाम. फुलेम्हणतात.

विद्येविना मती गेली,
मती विना निती गेली,
निती विना गति गेली,
गति विना वीत्त गेले,
वित्ता विनाशूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्येने केले.

**स्रियांची पहिली शाळा :**

महात्मा फुले यांनी सामाजिक समस्येचेमूळ कारण अशिक्षितपणा, दारिद्र्य होय हे लोकांच्या लक्षात आणून दिले. यासाठी त्यांनी उपाय म्हणून सामाजिक रूढी परंपरा विरुध्द बंड उभारले. त्याचे पहिले पाउलम्हणूनत्यांनीऑगस्ट १८४८ मध्ये पुण्यातील बुधवार पेठेत असलेल्या तात्यासाहेब भिडे यांच्यावाड्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. या साठी सदाशिव  गोविंद हाटे, सखाराम यशवंत परांजपे ,जगन्नाथ सदाशिव हाटे, अप्पासाहेब चिपळूणकर, सदाशिव बल्लाळ  गोवंडे आणि बापूसाहेब मांडे  यांनी सहकार्य केले. या शाळेत समाजातील सर्व घटकातील स्रियांना शिक्षण देण्यात  येऊ लागले. अशाप्रकारची  शुद्रातीशूद्रांना शिक्षण देणारी  ही पहिलीच शाळा ठरली. या कार्यामुळेच म.फुलेंना स्त्रीशिक्षणाचे जनक म्हटले जाते .

**मराठामुलांसाठी शाळा:**

महात्मा फुलेंनी केवळ स्त्रीयासाठीच शाळा काढली नाही तर मराठा जातीमधीलमुलांसाठीही पुण्यातील बुधवार पेठेत शाळा काढली याच बरोबर सर्व जातीतील मुलांना या शाळेत प्रवेश खुला केला. या बद्दल जैसा बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले असेच म्हणावे लागेल,हे सर्व कार्य करत असताना म. फुलेंना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असे. मोठ्यामुस्कीलीनेफुल्यांनी दोन पगारी शिक्षकांची नेमणूक केली. आजच्या कालखंडात महाराष्ट्रा मध्ये शिक्षण संस्थांचे जेजाळे निर्माण झाले आहे. त्याचे प्रेरणास्त्रोत म. फुले हेच आहेत.आजच्या काळातही म. फुलेचे शैक्षणिक विचार आणि कार्य किती मोलाचे ठरतात हे आपल्या निदर्शनास येते.

**अस्पृश्यांची पहिली शाळा :**

तत्कालीन भारतामध्ये अस्पृश्य जातीचीलोकसंख्यासहा कोटी पेक्षा जास्त होती. त्याचबरोबरजवळपास तीन हजार अस्पृश्य जाती समाजात होत्या. या जातीतीलमुले मुली शिक्षणापासून कोसोदूर होती. अस्पृश्य स्त्रिया आणि मुले यांना शिक्षण देणे. म्हणजे घोर महापाप समजले जाई. या परीस्थिनीने म. फुले अस्वस्थ होत असत. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी म. फुलेंनी सप्टेंबर१८५१ मध्ये पुण्यातील नानापेठेत अस्पृश्यांची पहिली शाळा काढली. शाळा काढत असताना फुल्यांना अनेक अग्नीदिव्यांना सामोरे जावे लागले. सनातनी ब्राम्हण वर्गाने ही शाळा बंद पाडण्यासाठी अनेकप्रयत्न केले. परंतु हार मानणारे फुले नव्हते हे त्यांनी समाजाला दाखवून दिले.

**रात्रीच्या शाळेची सुरुवात:**

जी मुले शाळेत जाण्याच्या वयाची असत त्यांच्यासाठी फुल्यांनी शाळा काढल्या. परंतुप्रौढ स्त्री पुरुषांचे काय ? असाप्रश्न फुल्यांना पडला.त्यांनी हे विचारकृतीत आणण्याचे ठरवले. हाप्रश्न सोडवण्यासाठी म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांनीस्वतःच्या घरीच १८५५ साली प्रौढ स्त्री-पुरुषासाठी शाळा सुरु केली. समाजातील,शूद्रातिशूद्रघटक आणि सर्व वयोगटातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटावे यासाठी फुलेंचा हा अट्टाहास होता. आज पुणे शहराला विद्येचे माहेरघर म्हणतात त्याचे श्रेयम. फुल्यांना जाते. त्यांची ही कल्पना प्रौढशिक्षण अभियान या नावाने सरकारनेअमलात आणली.

**प्राथमिक शिक्षण :**

म. फुल्यांनी आपल्याचार ओळीत शिक्षणाचे महत्त्व विषद केले आहे. (जसेविद्येविना मती गेली ) शिक्षण नसेल तर कोणकोणत्या क्षेत्रात मनुष्याची पीछेहाट होते हे त्यांनी सांगितले.दारिद्र, अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, अधोगती या सर्वाचे मूळ कारण अशिक्षितपणा होय हे आपल्या विचारातून म. फुल्यांनी समाजाला सांगीतले, लेखणीतून प्रबोधन केले. विचारांचे रुपांतर कृतीत केले. तत्कालीन इंग्रज सरकार प्राथमिक शिक्षणाविषयी उदासीन होते. ईष्ट इंडिया कंपनीने १८१३ पर्यत शिक्षणाच्या प्रसारासाठीफारसे प्रयत्न केले नाहीत. महात्मा फुल्यांनी हंटर कमिशनला सादर केलेल्या निवेदनात किमान बारा वर्ष पर्येतमुला –मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असे सुचवले होते.महात्मा फुल्यांनी केलेल्या सूचना मध्ये खालील बाबी होत्या.

१. लोकलसेन्स फंडा पैकी अर्ध्या पेक्षा अधिक भाग प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा.
२. प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी.
3. प्राथमिक शाळांना प्रांतीय सरकारने भरपूर अनुदान द्यावे.
४. प्राथमिक शाळावर होणाऱ्या खर्चाची जबाबदारी नगरपालिकांनी घ्यावी.
५. प्राथमिकशाळांच्या कारभारावर शिक्षण विभागाचे नियंत्रण असावे.
६. प्राथमिक शाळेतील शिक्षकप्रशिक्षीत असावे.

म. फुल्यांनी सुचवलेल्या सूचना हंटर कमिशनने जशास तशा स्वीकारल्या नाहीत. हंटर शिक्षण आयोगाच्या शिफारशीमुळे फुल्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे त्यांनी १८९१ मध्ये प्रसिध्द झालेल्या सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात हंटर शिक्षण आयोगावर सडकूनटीका केली.

**उच्चशिक्षण आणि तांत्रिक शिक्षण :**

म. फुल्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे असावे असा आग्रह धरला त्याबरोबरच उच्चशिक्षण हे खाजगी शिक्षणसंस्थेकडे सोपवण्याऐवजीसरकारकडे असावे असे विचार मांडले. उच्चशिक्षण सर्वांना परवडणारे आसावे, जेणेकरून कनिष्ट व गरीब वर्गातील मुलांना उच्चशिक्षण घेता येईल. आजची उच्चशिक्षणाची अवस्था बघता म. फुल्यांनी व्यक्त केलेली भिती खरी ठरत असल्याचे दिसून येते. आजउच्चशिक्षण ही श्रीमंत वर्गाची मक्तेदारी झाल्याचे दिसुन येते.

सरकारीमहाविद्यालयातून देण्यात येणाऱ्या शिक्षणामधील अभ्यासक्रमात व्यवहारिक व तांत्रिक शिक्षणाचाअंतर्भाव असावा. मागास वर्गातील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी. जेणेकरून गोरगरिबांच्या पोराबाळांना उच्च तांत्रिक व व्यवहारिक शिक्षण घेता येईल. असा विचार म. फुलेंनी व्यक्त केला. विद्यापिठाने घरबसल्या किंवा खाजगी अभ्यास करून परीक्षेस बसण्याचीमान्यता दिल्यास उच्चशिक्षणाचा प्रसार होईल असे मत मांडले,या विचारांची प्रेरणा घेऊनआजच्या केंद्र आणि राज्य सरकारने मुक्त विद्यापीठामार्फत किंवा दुरुस्थ शिक्षण व्यवस्थेमार्फत उच्चशिक्षण देण्याचे सुरु केले आहे. सांराश: महात्मा फुल्यांनी प्राथमिक शिक्षण, स्त्रीशिक्षण, प्रौढ शिक्षण , वाचनालये त्याच बरोबर शिक्षणपद्धती, शिक्षणाचे राष्ट्रीयकरण,शिक्षणाच्याखाजगी करण्यास विरोध, या संबंधी त्यावेळी घेतलेली भूमिका आजही जशास तशी लागूपडते. येणाऱ्याकाळाचीव पुढच्या पिढ्याची चिंता म. फुल्यांनाकितीहोती, हे त्यांच्या तत्कालीन शैक्षणिक विचारावरूनदिसून येते.शिक्षण क्षेत्र असोकिंवा समाजजीवनातील अन्यक्षेत्र असो या संबंधी आजचेशासनजी ध्येयधोरणे ठरवीते, योजनाची आखणी करते किंवा कार्यवाही केली जाते त्या सर्वांचा पायामा. फुल्यांनी एकोणीसाव्या शतकात घातला. अशा या दूरदृष्टी असलेल्या महामानवालाअसंख्य लोकांनी एकत्रयेवून११ मे १८८८ रोजी 'महात्मा' हीपदवीबहाल केली.म.फुलेंच्या व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची आणि त्यागाचीफळे आज आपण चाखत आहोत.

**संदर्भ:**

1] Dr. V.Y Sonawane, Femisit Hisotriogharphy And Chenging Trendrs, Souverier , Jyotichandra Publiation, Latur , 2016

2] Prof. Vinay S. Hatole Ajanta Ix ,1, Ajanta Prakashan , Aurangabad , 2020

3] प्रा. डॉ. जी.बी.माने, स्मरणिका, राज्यस्त्ररीय चर्चासत्र, श्री बंकटस्वामीमहाविद्यालय, बीड २००९.

4] प्रा. ढगे सुनिता, सावित्रीबाई फुले विचार व कार्य

5] डॉ. कठारे अनिल, महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक चळवळीचा इतिहास

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार व कार्य : एक भौगोलिक अभ्यास

**प्रा.डॉ. सुभाष दत्तू हुलपल्ले**
भूगोल विभाग श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरूम.

**प्रस्तावना :-**

आपला भारत देश हा कृषिप्रधान असून देशातील ८० टक्के लोक शेती व्यवसायावरच अवलंबून आहेत. भौगोलिक, सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या या देशात शेती व पीक पद्धती यातही विविधता दिसून येते. परंतू भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिकेंद्रिततच राहिलेली आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा भरघोस वाटा आहे. भारतीय शेतीचा विकास न होण्यामागे अनेक कारणे आहेत. 'शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे', तोच भूकेला, कंगाल व दरिद्री बनत चालला आहे. जागतिकीकरणाच्या धोरणानंतर या देशात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्याचे सत्र आजही थांबायला तयार नाही. त्यामुळेच अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविषयक विचारांचा मागोवा घेणे अधिक प्रासंगिक ठरते. त्यांच्या विचारांची, योजनांची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज बनली आहे.

**उद्देश :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या शेतीविषयक योजनांचा आढावा घेणे.

२) शेतकऱ्यांना शेती योजनांची माहिती देणे.

३) सामुदायिक शेती करणे.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा संदर्भग्रंथ म्हणून उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध पुस्तके व संशोधन पत्रिकांचा आधार घेण्यात आला आहे.

**विषय विवेचन :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार व कार्य या शोधनिबंधाचे विवेचन खालील मुद्द्यांच्या आधारे करता येते.

**भारत हा कृषिप्रधान देश आहे** ०:

अनेक वर्षापासून देशातील ८० टक्के समाज शेतीवर उपजीविका भागवत आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा फार मोठा वाटा आहे. शेतकऱ्यांचे दैन्य आणि शोषण यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपली पत्रकारिता, चळवळ आणि लेखन या माध्यमातून वाचा फोडण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांच्या, भूमिकांच्या केंद्रस्थानी छोटे शेतकरी होते. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी विविध भूमिका घेतल्या. अनेक चळवळी केल्या. हे आपणास प्रामुख्याने अधोरेखित करावे लागेल. कारण 'जगाचा पोशिंदा शेतकरी आहे'. शेतीतूनच आपणास अन्न व वस्त्रही मिळते. आपल्या मूलभूत गरजा शेतीवरच अवलंबून आहेत.

**सावकारी व खोती पद्धतीला विरोध** :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सावकारीच्या चक्रात पिढ्यानपिढ्या अडकलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा समाजासमोर व सरकारसमोर मांडण्याचे काम अत्यंत पोटतिडकीने केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, 'बहिष्कृत भारतातील', "खोती" उर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी' या अग्रलेखात खोतीचा प्रश्न आणि त्यायोगे शेतकऱ्यावर आलेली गुलामगिरीची वेळ यांचे अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. कोकणात रत्नागिरी व कुलाबा जिल्ह्यात खोती पद्धती अधिक प्रचलित आहे. खोत म्हणजे गावातील लहानसा सुलतानच. जेव्हा गावची खोती वेगवेगळ्या

घराण्यामध्ये विभागलेली असते, तेव्हा अनेक सुलतानांचा जुलुम शेतकऱ्यांना सोसावा लागतो. या जुलुमा विरुद्ध आवाज उठवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सावकारी व खोती पद्धतीलाच विरोध केला.

**पावसाचा लहरीपणाः-**

आपला देश हा मोसमी पर्जन्याचा आहे. दरवर्षी पावसाळा ऋतु सुरू झाला म्हणजे पाऊस पडतोच असे नाही. कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ पडतो. देशात एकीकडे नदीला महापूर येऊन शेतीचे अतोनात नुकसान होते, तर एकीकडे पाऊस नसल्यामुळे पिण्यासाठी पाणी मिळत नाही. या पावसाच्या लहरीपणामुळे शेतकरी वैतागला आहे. अशा संकटाच्या वेळी सरकारने आर्थिक मदत केली पाहिजे. शेतकऱ्यांना खत व बी-बीयाणांचे वाटप केले पाहिजे. शेतसारा, कर्ज माफ केले पाहिजे. तरच, शेतकरी जगू शकतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला आळा बसू शकतो. असा विचार त्यांनी मांडला.

**बहुउद्देशीय प्रकल्प योजनाः-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाचे पहिले पाटबंधारे व ऊर्जामंत्री म्हणून या देशाचे जल धोरण व ऊर्जा धोरण निश्चित करण्याचे महान कार्य केले. शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीला मुबलक पाणी व वीज मिळायला हवे, ही त्यांची भूमिका होती. त्यासाठी या दोन गोष्टी देशाच्या विषय पत्रिकेवर प्राधान्याने घेतल्या. दामोदर खोरे योजना, हिराकुड प्रकल्प, सोन नदी खोरे प्रकल्प या योजनांसह जलसंवर्धनाच्या अनेक योजनांचे ते जनक आहेत. शेतीची उत्पादनक्षमता वाढावी, म्हणून 'शेतजमिनीचे सपाटीकरण, बांधबंदिस्ती, सिंचनाची सोय, भांडवली गुंतवणूक केली, तरच शेती लाभाची ठरेल'. असे त्यांचे धोरण होते. यासाठी त्यांनी आंतरराज्य नदी जोड प्रकल्पाची ही कल्पना मांडली.

**शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करणे** :-

पारंपारिक शेती पद्धतीमुळे शेतीतून उत्पन्न कमी निघते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शास्त्रशुद्ध शेती करावी. कुशल श्रमिक आणि प्रगत तंत्रज्ञानाने शेती सुधारली जाऊ शकते. कृषी क्षेत्राचे यांत्रिकीकरण करूनच विकास साधला जाऊ शकतो. ही त्यांची मूलभूत विचारदृष्टी होती. शेतीला प्रशिक्षित श्रमिकांची आवश्यकता आहे. आधुनिक पद्धतीने शेती केली, तरच उत्पन्नात भर पडते. शेतकरी सुखी होतो. असे त्यांचे स्पष्ट मत होते.

**शेतसारा आकारणी** :-

शेतसारा आकारणीमध्ये शेतकरी वर्गावर अन्याय होतो. यातून त्यांचे शोषण होते. शेती ही सरकारी मालमत्ता आहे आणि शेतकरी हा कब्जेदार आहे. त्यामुळे शासक शेती उत्पन्नाचा विचार न करता शेतसारा वसूल करतात. ही शेतकऱ्यांची लूट आहे. त्यामुळे शेती व शेतकऱ्यांचा विकास खुंटला असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब करतात. त्यांच्या मते, 'शेतीच्या निव्वळ उत्पन्नाच्या अंदाजावरून सरसकट शेतसारा आकारणी करणे चुकीचे आहे. सर्व शेतकऱ्याकडून शेतीच्या क्षेत्रफळानुसार अंदाजे उत्पन्न गृहीत धरून शेतसारा वसूल केला जातो. हेच अन्यायकारक आहे. कर लावण्यासाठी उत्पन्नावर कर लावावा. त्यासाठी कायदा आहे. त्यानुसार शेतसारा आकारला पाहिजे.' असे केल्यास कमी ऐपतीच्या शेतकऱ्यांना करातून सूट मिळेल. आर्थिक परिस्थितीनुसार कर लावला पाहिजे. असे डॉ. बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते.

**सामुदायिक शेती :-**

"सामुदायिक शेतीकडे वळले पाहिजे" असा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला. सामुदायिक शेतीचा प्रयोग संपूर्ण भारतभर झाला पाहीजे. अशी त्यांची अपेक्षा होती. सामुदायिक शेती आणि त्यातूनच पुढे शासकीय समाजवाद विकसित झाला पाहिजे. सामुदायिक शेतीमुळे जमीनदार, कुळ व शेतमजूर असा भेद संपुष्टात येईल. ही

त्यांची धारणा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बोलके सुधारक नव्हते, तर ते करते सुधारक होते. म्हणूनच त्यांनी अन्यायाविरुद्ध लढा दिला, चळवळ उभी केली.

**निष्कर्ष :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार व कार्य मुलगामी होते. चळवळींना बळ देत असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणिवेतून ते पाहतात. शेतीची उत्पादनक्षमता वाढावी, म्हणून शेतजमिनीचे सपाटीकरण, बांधबंदिस्ती, सिंचनाची सुविधा, भांडवली गुंतवणूक केली. तरच, शेतीचा विकास होईल. अशी त्यांची धारणा होती. यासाठी त्यांनी बहुउद्देशीय प्रकल्पाची उभारणी केली. सन १९४२-१९४६ या काळात दामोदर नदी प्रकल्प, हिराकुड प्रकल्प, सोन नदी प्रकल्प यासह देशातील १५ मोठ्या धरणाची ब्लू प्रिंट त्यांनी तयार केली व प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्यांनी सामुदायिक शेती, कुशल श्रमिक, नवीन तंत्रज्ञान, सिंचन योजना यांची कास धरली. म्हणूनच आजही आपणास त्यांच्या शेतीविषयक विचारांची गरज आहे .

**संदर्भग्रंथ :-**

१) बहिष्कृत भारत, दि. ३ मे १९२९.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड १९, महाराष्ट्र शासन पृष्ठ ५७.

३) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती, गौरवग्रंथ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पृष्ठ ४२.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी साहित्याला योगदान

**श्री. दयानंद मनोहरराव राठोड**
मुख्याध्यापक वसंत आश्रम शाळा, बावी जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)
rathoddayanand@gmail.com

**प्रस्तावना :-**

साहित्य व समाज यांचा सहसंबंध परस्पर अनुरूप आहे. ते वेगवेगळे असूच शकत नाही. त्यामुळे समान घडवणा-या घटनांचे प्रतिबिंब क्रमप्राप्त समाजात उमटले जाते. समाजातील भावजीवना शिवाय साहित्यनिर्मिती होत नाही. म्हणूनच साहित्य हा समाजाचा आरसा ठरतो. साहित्य निर्मिती करणारा साहित्यिक समाजाचे प्रतिनिधित्व करत असतो , त्यातूनच तो समाजातील भावविश्व साहित्यात प्रकट करत असतो. साहित्यात भावविश्व प्रकटीकरणाकरिता तो आपल्या समाजातील होणाऱ्या अन्याय, अत्याचार, रूढी, प्रथा, परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा, वाईट चालीरीती च्या विरोधात साहित्य लेखणीतून आवाज उठवणारा घटक म्हणून समाजसुधारकांच्या विचाराकडे पाहिले जाते. असेच विचारवंत , अभ्यासक , क्रांतीसुर्य , भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार , शिक्षणतज्ञ , अर्थतज्ञ , इतिहास , राज्यशास्त्र, समाजशास्त्र , धर्मशास्त्र , नीतिशास्त्र , चिकित्सक , तत्त्वज्ञ , कृतिशील समाजसुधारक म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखले जाते.

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय व शैक्षणिक प्रवास :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मध्य प्रदेशातील महू या गावी 14 एप्रिल 1891 रोजी रामजी सपकाळ व आई भिमाबाई यांच्या पोटी झाला. त्यांचा जन्म महार जातीत झाल्यामुळे तत्कालीन समाजव्यवस्थेचे, जातीव्यवस्थेचे, अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शालेय शिक्षण दापोली , सातारा आणि मुंबई येथे झाले. इ.स. 1907 मध्ये मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले , त्यानंतर मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्यांच्या शिक्षणासाठी बडोद्याचे सयाजीराव गायकवाड यांनी शिष्यवृत्ती दिली. 1912 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पदवी घेतली. 1913 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेले होते. अमेरिकेमध्ये शिक्षण घेत असताना त्यांना सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक मदत केली होती. अमेरिकेमधील कोलंबिया विद्यापीठामध्ये समाजशास्त्र , अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयाचा अभ्यास करून सन 1915 मध्ये कोलंबिया विद्यापीठामध्ये प्राचीन भारतातील व्यापारर या विषयावर प्रबंध सादर करून एम. ए. ची पदवी संपादन केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1916 मध्ये कोलंबिया विद्यापीठामध्ये 'नॅशनल डिव्हीडंट ऑफ इंडिया ए हिस्टरिकल अॅड अनालिटिकल स्टडी' हा प्रबंध सादर करून पीएच. डी. ही पदवी संपादन केली. त्यानंतर पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले परंतु आर्थिक अडचणीमुळे शिक्षण अर्धवट सोडून भारतात आले. भारतात आल्यानंतर 10 नोव्हेंबर 1918 मध्ये सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स मुंबई येथे काही काळ अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली. नोकरी करत असताना अस्पृश्य समाजावर होणारे अन्याय अत्याचार जवळून पाहण्यात आला. त्यावेळी या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविण्यासाठी 31 जानेवारी 1920 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी uमूकनायकक हे पाक्षिक सुरू करून त्या पाक्षिकातून समाजजागृतीचे कार्य सुरू ठेवले. त्याच बरोबर आंबेडकर यांनी मानगाव आणि नागपूर येथे झालेल्या अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये सक्रीय सहभाग घेऊन आपले विचार प्रकट केले. 5 जुलै 1920 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी इंग्लंडला गेले , इंग्लंड येथे गेल्यानंतर प्रथम अर्थशास्त्र या विषयातून बी. एस्सी. पदवी संपादन केली काही कालावधीनंतर डॉक्टर आंबेडकरांनी 'दी प्रॉब्लेम ऑफ रुपी' प्रबंध इंग्लंड विद्यापीठातून सादर केला. त्याबद्दल इंग्लंड विद्यापीठाने डी. एस. सी. ही प्रदान केली. इंग्लंड येथे वास्तव्यास असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी'बार अॅड लॉ' ची पदवी घेतली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या गौरवाबाबत राजर्षी शाहू महाराज म्हणतात, " माझ्या राज्यातील बहिस्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे अंत:करणपुर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ.आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्तानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगते ." डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या गौरवशाली कार्यकर्तृत्वाचा आलेख अभ्यासला की ही भविष्यवाणी खरी ठरल्याचे दिसून येते. यामहामहीम, भारतरत्न, क्रांतिसूर्य, भारतीय संविधानाचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मराठी साहित्य निर्मितीसाठी त्याचबरोबर 1960 नंतर मराठीत आलेल्या नवप्रवाह दलित साहित्य निर्मितीसाठी अग्रदुत ठरणारे मराठी दलित साहित्याचे उदगाते म्हणून मराठी दलित साहित्याचे जनक डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रंथरूपी योगदान:-**

1960 नंतर नववाङ्मय प्रवाहात दलित साहित्याची जननी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथ लेखनाकडे पहाता येईल. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. दलित साहित्य हे मराठी साहित्यात आलेली नवीन मुल्यांकीत अशी नवीन संकल्पना रुजली आहे. त्या साहित्याकडे सामाजिक घटना म्हणून पाहिले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान लेखक आहेत. त्याचबरोबर दलित , पददलित समाज जीवनाचे प्रथम संशोधक आहेत. त्या संशोधक दृष्टीतूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ग्रंथरचना केली.

1. दि बुद्धा अंड हीज धम्मा.
2. दि कास्ट इन इंडिया.
3. दि प्रॉब्लेम ऑफ रुपी.
4. हु वेअर दी शुद्राज.
5. दि अन्ट्चेबल्स हु वेअर दि निहिलेशन ऑफ कास्ट.
6. थॉट्स ऑन पाकिस्तान.
7. स्टेटस अँड मायनॉरिटी.

यासारख्या ग्रंथाच्या देणगीतून मराठी दलित साहित्याला मूळ प्रेरणा मिळाल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या ग्रंथात तर्कशुद्ध , तात्विक , विचार तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यांनी समाजाचे धार्मिक, सामाजिक, आर्थिक, दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. ते हिंदू संस्कृतीचे विवेचन करताना म्हणतात , "मानव जातीतील एखाद्या समूहातील हीन-दीन-गुलाम करून ठेवणाऱ्या एखाद्याला रानटी दरोडेखोर बनवून मोकाट सोडण्याचा तर दुस-या समूहाला वनवाशी भटके करून ठेवणाऱ्या आणि तिस-या एका मानवसमूहाला दीन-दलित-दरिद्री करून आणि तूच्छ तिरस्करणीय पशुवत जिणे वाट्याला देऊन मानवी व्यवहारच अशक्य व्हावा असे अस्पृश्य बनवून ठेवणा-या संस्कृतीला बदफैलीपणाशिवाय दुसरे काय म्हणता येऊ शकेल?" यातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू संस्कृतीचा इतिहास मांडून त्या संस्कृतीचे रूप निदर्शनास आणल्याचे दिसते.

डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आपल्या अस्मितेकरिता दलित समाजातील नवसाहित्यकांनी हाती लेखणी घेतली. त्यातून मराठी साहित्यात दलित लेखकांचा एक वर्ग उदयास आला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वृत्तपत्रीय योगदान :-**

लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणून वर्तमानपत्राला ओळखले जाते. मानवी समाजामध्ये अन्याय अत्याचाराविरोधात आवाज उठवण्यातकरिता वृत्तपत्रीय लेखणी घेऊन आवाज उठवला जातो. तसेच समाजाला आपले हक्क, अधिकार यांची जाणीव व्हावी या उद्देशाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1920 मध्ये 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरु केले. त्याच बरोबर 1929 मध्ये 'बहिष्कृत भारत' त्यानंतर 'प्रबुद्ध भारत' यासारख्या वृत्तपत्रीय व नियतकालिकातून मराठी भाषेच्या साह्याने वैचारिक आणि सामाजिक क्रांती घडवून आणली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या वृत्तपत्रीय लेखणीच्या माध्यमातून नव दलित अभ्यासक आपला अन्याय अत्याचाराचे वर्णन मराठी साहित्यात कविता, आत्मकथन, आत्मचरित्र या साहीत्य प्रवाहातून आपल्या समाजावरील अन्याय अत्याचाराला वाट मोकळी करून देऊ लागले. त्यांना आपल्या जगण्याचा खरा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीतून मिळाल्याचे ते सांगताना म्हणतात,

"माझ्याजवळ आहेस काय वाहू भीमा तुला

तुझ्या चरणी वाहती पुष्प फोडली वाचा
दुःखाला फुल वाहते एक-एक सगळे पुलिंग दुःखाचे
डोळयातून पडते थेंब धुते ते पाय भीमा तुझे
आत्म्यातून भटकंती आग त्याचीच पिटवली ही ज्योत
धडधडत्या या ज्योतीतून बुद्ध भीमच दिसतात."

यातून डॉ. आंबेडकरांचे साहित्य लेखन कसे प्रेरक होते याची जाणीव होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्र लेखणीला मराठी साहित्याच्या निर्मिती मागील मूळ प्रेरणा म्हणून दलित साहित्याने स्वीकारले आहे. म्हणूनच 1960 नंतरच्या दलित साहित्याला आंबेडकरवादी साहित्य म्हणूनही ओळखले जाते.

**दलित साहित्यातील योगदान :-**

मराठी साहित्यविश्वाच्या वेगवेगळया साहित्य प्रवाहात जे 1960 नंतर लेखक झाले त्यातील दलित साहित्याला आंबेडकरवादी विचारांची प्रेरणा आहे. त्यांच्या विचाराने प्रभावित होऊन uशिका संघटित व्हा आणि संघर्ष कराा या घोषणेतून दलित समाजातील साहित्यकांनी शिक्षण घेऊन, लेखणी हाती घेतली. या योगदानाबद्दल दलीत कवी नामदेव ढसाळ यांनी आपल्या 'अंधाराने सूर्य पाहिला जेव्हा' कवितेत म्हणतात,

"अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा शब्द हुंकारले
नरकाच्या कोंडवाड्यात किती दिवस राहायचं आम्ही
वास घुसमटत....."

यासारखे प्रखर विचार दलित साहित्यकांनी आपल्या साहित्यात व्यक्त केले आहेत. दलित साहित्याने सर्वाधिक चोखाळलेला वाड्मयीन प्रवाह म्हणून दलित कवितेकडे पाहता येते. दलित कवितेवर अनेकांनी विविध आक्षेप घेतले ते केवळ स्वार्थी हेतूने कारण दलित कवितेचे अधिष्ठान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. डॉ. आंबेडकर हे केवळ दलित साहित्याचे प्रणेते नव्हेतर दलित साहित्यातील विचारही मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा होता. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. त्याबाबत दलित कवी नामदेव ढसाळ म्हणतात्

"असा तो एकुलता एक आमुच्या रथाचा सारथी
जो दिग्विजयी तंद्रेतून आमच्यात उतरतो
नी शेतातून, गर्दीतून, मोर्चातून नी लढ्यातून
आमच्याबरोबर असतो
तो तू तोच तू आमचा.....

नामदेव ढसाळ म्हणतात की दलित साहित्याच्या रथाचा सारथी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विचार आहे. त्यांचा विचार सर्व शोषणाविरोधात आवाज उठवण्याकरिता बळ देणार आहे. अश्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांविषयी सर्व दलित साहित्यकांची भावना नव्हे तर श्रद्धा आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

**समारोप :-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समग्र दलित , पददलित शुद्रांसाठी जे केले ते इतिहासातील मैलाचा दगड म्हणून ओळखला जातो. आपल्या दलित बांधवांना संघटीत, सुशिक्षित करून त्यांना त्यांच्यावरील होणा-या अन्याय, अत्याचाराविरोधात आवाज उठवून आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्याकरिता हाती लेखणी घेऊन आवाज उठवावे असे त्यांना अभिप्रेत होते तेच समग्र दलित साहित्यिकांनी केल्याचे दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजातील मानसिक कोंडी फोडण्याचा आमूलाग्र बदल घडवून आणला. त्यातूनच दीनदुबळया लोकांच्या अन्यायाला दलित साहित्यांने हात घातल्याचे निदर्शनात येते. दलित साहित्यातून संपूर्ण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार मांडल्याचे निदर्शनास येते.

**संदर्भसूची :-**

1. कवठेकर कृष्ण - मराठी दलित साहित्य एक आव्हान
2. लांजेवार ज्यो ती - दलित साहित्य समीक्षा
3. खरात शंकर - दलित वाड्मय प्रेरणा व स्वरूप
4. ढसाळ नामदेव - अंधाराने सूर्य पाहिला तेव्हा
5. मांडे प्रभाकर - दलित साहित्याचे निराळेपण.

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# महात्मा फुले यांचे आर्थिक विचार

**डॉ.पांडुरंग नामदेव डापके**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पंडित जवाहरलाल नेहरु महाविद्यालय, औरंगाबाद.

**प्रस्तावना :-**

महात्मा जोतीराव गोविंदराव फुले यांचा जन्म १८२७ मध्ये पुणे येथे झाला. त्यांच्या वडिलांचा व्यवसाय भाजीपाला विकणे हा होता. त्या काळात गोविंदराव फुले यांच्या घरातच नव्हे तर त्यांच्या संपूर्ण जातीत सुध्दा कोणी पुरुषांनी शिक्षण घेतलेले नव्हते. शिक्षण ब्राम्हणांखेरीज इतर जातीने संपादन करु नये अशी समजूत त्या काळात होती. तरी सुध्दा गोविंदरावांनी महात्मा फुले यांना वयाच्या ७ व्या वर्षी प्राथमिक मराठी शाळेत घातले. महात्मा फुले यांची अभ्यासात चांगली प्रगती होती. परंतु मुलगा शाळेत गेल्यामुळे तो शेतीमध्ये काम करणार नाही असे त्यांच्या वडीलांच्या कानावर आले आणि त्यांनी जोतीरावांना शाळेतून काढून घेतले. शाळा सोडल्यामुळे ज्योतीराव फावडे, कुदळ, घमेले घेऊन फळबागेत आणि दुकानात काम करु लागले. तरी देखील जोतीरावाने प्राथमिक शाळेतील अभ्यासक्रम पूर्ण केला. शाळा सोडल्यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडला होता पण शिक्षणाची त्यांची ओढ संपली नव्हती. त्यांची अभ्यासाविषयीची ही गोडी पाहून गफहार बेगम मुन्शी व लिजिट साहेब या दोघांनी गोविंदरावांना शिक्षणाचे महत्त्व पटूवन दिले. त्याचा परिणाम म्हणून जोतीरावांना पुन्हा शिक्षणाची संधी मिळाली आणि त्यांनी पुन्हा मागे वळून पाहिले नाही. पुढे हेच ज्योतीराव महाराष्ट्राचे जेष्ठ समाजसुधारक, क्रांतिकारक, आधुनिक भारतातील स्त्री शिक्षणाचे जनक, स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य यांचा पहिला लोकनेता आणि सामान्य लोकांच्या दु:खाला वाचा फोडणारे समाजसुधारक म्हणून संपूर्ण भारताला परिचित झाले. ११ मे १९८८ मध्ये महात्मा फुले यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सर्वधर्मीय मुंबापुरीने त्यांचा भव्य प्रमाणात सत्कार करुन त्यांना महात्मा ही पदवी बहाल केली असे हे महान समाजसुधारक, स्त्री शिक्षणानाचे जनक, गरिबांचे कैवारी असणारे जोतीराव गोविंदराव फुले यांचे २६ नोव्हेंबर १८९० रोजी निधन झाले.

**गुलामगिरीविरुध्द बंड :—**

सामाजिक क्रांतीचा ध्यास घेऊन समाजासाठी मोलाचे कार्य करणारे महात्मा फुले यांचे कार्य सामान्य नव्हते. समाजात परिवर्तन घडवून आणणे म्हणजेच क्रांती आणणे ही क्रांती महात्मा फुले यांनी घडवून आणली. माणसाला जनावराप्रमाणे वागणूक देणाऱ्या संकृतीला त्यांनी आव्हान दिले आणि इंग्रजांचे शासन आहे तोपर्यंतच ही संस्कृती संपविली पाहिजे असा पणच त्यांनी केला. इंग्रजांचे शासन देशात असेपर्यंतच सर्व शूद्रांनी लवकरात लवकर भटांच्या वडिलोपार्जित दास्यत्वापासून मूक्त व्हावे अशी त्यांची तीव्र इच्छा होती. याच भावनेने झपाटलेल्या महात्मा फुले यांनी अनेक सहकाऱ्यांना प्रेरित केले. तसेच सत्यशोधक संघटना स्थापन करुन अनेकांच्या जीवनात गुलामगिरीविरुध्द आपले विचार मांडले. हे महान कार्य करत असतांना त्यांनी कोणत्याही जातीचा व्देष केला नाही. परंतू आपले हक्क आणि न्यायासाठी त्यांनी कधीच तडजोड देखील केली नाही. आपल्या विचारांसाठी त्यांनी शेवटपर्यंत निष्ठापूर्वक काम केले. आयुष्यभर ते व्रत त्यांनी जपले किंबहूना या विचारांसाठी त्यांनी निस्वार्थपणे आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. (पे—१००—१०३) महात्मा फुले यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाची स्थापना करुन शेतकरी, शेतमजूर, दलित, उपेक्षित, वंचित समाजाला त्यांच्या नैसर्गिक मानवी हक्कांची जाणीव त्यांनी करुन दिली. त्यानंतर १८७३ ते १८८५ पर्यंतच्या काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सत्यशोधक समाजाचे कार्य वादळासारखे पसरले होते. ग्रामीण समाज आता जागृत होऊन आता या प्रश्नांचा विचार करु लागला होता.

**भारतातील शेतीची स्थिती :—**

महात्मा फुले यांनी शेतकरी आणि कष्टकरी यांची आर्थिक परिस्थिती प्रत्यक्षात जवळून पाहिली होती. त्याबरोबरच त्यांनी समाजाच्या आर्थिक प्रश्नांचाही अभ्यास केला होता. महात्मा फुले यांनी १८ जुलै १८८३ मध्ये शेतकऱ्यांचा आसूड हा ग्रंथ लिहिला. त्यांनी त्यांच्या या ग्रंथात शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचे, कर्जबाजारीपणाचे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे तपशीलवार वर्णन करुन त्यांच्या आर्थिक दुरावस्थेची कारणे सांगून ती कशी दूर करावी याचे उपायही सांगितलेले आहे.

इंग्रज राजवटीपूर्वी भारतातील खेडयापाडयातील जीवन आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होते. परंतू इंग्रजांनी आपल्या अमदानीत येथे नवीन धारापद्धती अंमलात आणली. त्यांनी शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क मान्य करुन जमिनीच्या प्रत्येक तुकडयाची मोजणी करुन त्याला भूमापन क्रमांक देऊन त्यावरील महसूल ठरवून दिला. तसे पाहता इंग्रजांनी सर्व बाजूंचा दूरवर विचार करुन साऱ्याचे दर हे सर्वसामान्यांना पेलवतील असेच निश्चित केले होते. परंतु त्यांची महसूल यंत्रणा पूर्वीच्या शासनापेक्षा कार्यक्षम असल्यामुळे त्यांच्या राजवटीतही शेतकऱ्यांवरील साऱ्याचा भार कमी झाला नाही. खेडे हाच मुख्य घटक मानून मध्ययुगीन राज्यकर्ते साऱ्याची

आकारणी करत असत आणि यांची संपूर्ण जबाबदारी पाटील—कुलकर्ण्योंकडे असे. परंतु इंग्रजांच्या काळात जमिनीच्या खाजगी मालकीचे तत्त्व मान्य केल्यामुळे शेतसारा भरण्याची प्रत्यक्ष जबाबदारी ही त्या—त्या शेतकऱ्यावर येऊन पडली. हा सारा न भरल्यास शेतीचा लिलाव करुन तो त्यातुन वसूल केला जाऊ लागला. त्यामुळे खेडयातील अर्थव्यवहारात मोठा बदल घडून आला आणि त्यातूनच शेतीच्या ऱ्हासाला आणि शेतकऱ्यांच्या अवनतीला सुरुवात झाली.महाराष्ट्रातील या आर्थिक घडामोडीमुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर हाल होऊ लागले. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचे हे झालेले हाल प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांनी ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा आपला ग्रंथ लिहिला. त्यांनी आपल्या या ग्रंथात मध्यम व कनिष्ठ प्रतीच्या शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीचे हुबेहुब वर्णन केले आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येत दिवसेंदिवस होत असलेली वाढ, त्यातच भाऊ हिस्स्यामुळे जमीनीचे कमी होत चाललेले प्रमाण यांचा परिणाम म्हणून शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. तर दुसरीकडे सरकारने ठरवलेले साऱ्याचे दर कायम ठेवल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढतच गेल्या. शेतीवरील ह्या असह्य भारामुळे शेतकऱ्यांची उपासमार होऊन तो दिवसेंदिवस दारिद्रयात खोल रुतत गेला. महात्मा फुले यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेतील निरनिराळया वर्गाच्या परस्परसंबंधांचा बारकाईने अभ्यास केला होता. शेतकऱ्यांकडून सावकारांकडे झपाटयाने जमिनीचे होणारे हस्तांतरण पाहून ते अस्वस्थ होत होते. शेतकऱ्यांचे हे होणारे शोषण कसे थांबवावे याचाच विचार ते सतत करत होते. त्यांच्या मते श्रमिकांचे शोषण ही एक सामाजिक विकृती असून तिची तीव्रता कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे असे प्रखर मत त्यांनी मांडले.

महात्मा फुले यांचे शेतकऱ्यांशी अगदी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या सूख—दुःखात ते नेहमीच सहभागी असायचे. सावकाराकडून अनेक शेतकऱ्यांची फसवणूक केली जात होती. ते सांगतात त्याकाळी न्यायाधीश हे बहूधा उच्चवर्णीय असायचे. त्यामुळे त्यांचे निकाल जास्तीत जास्त प्रमाणात सावकाराच्या बाजूनेच असत. सावकार शेतकऱ्यांना कर्ज देतांना कर्ज रोखे लिहून घेऊन व व्याज मजुरी कापून घेऊन उर्वरित रक्कम ते शेतकऱ्यांच्या हवाली करीत आणि ज्या शेतकऱ्यांची पत नसेल त्या शेतकऱ्यांकडून सरळ जमिनीचे खरेदीखत लिहून घेत. परंतु सावकाराच्या पाशातून क्वचितच शेतकऱ्यांना आपली शेत परत मिळत होती. हे कटू सत्य महात्मा फुलें यांनी नमूद करुन ठेवले आहे. ते आपल्या शेतकऱ्यांच्या आसूड या ग्रंथात लिहितात की, शेतकऱ्यांचे स्टोप आणल्यानंतर कुलकर्णी वगैरे लोकांकडून व्याजामध्ये नाना प्रकारच्या अटी लिहून त्यावर त्यांच्या भाऊबंदाची किंवा मुलांची सहीसाक्ष घेत असे. पुढे त्या शेतकऱ्यांने जरी व्याज परत केले तरी त्या व्याजाचे व्याज आणि त्याचे पडव्याज जुळून त्याच्या मुलाच्या लग्नाकरिता परत नव्याने थोडे पैसे देऊन परत नवीन कागद लिहून घेत असे आणि पुढे ही रक्कम अशीच फुगली की, सरकारात फिर्याद टाकून त्याच्या शेतीवर जप्ती आणत असे.

**सरकारच्या धोरणाविषयी मत :—**

सरकारचे धोरण व निर्णय हे जेव्हा शेतकऱ्यांसाठी घातक असत तेव्हा तेव्हा त्यांनी सरकारचा निसंकोचपणे निषेध केला आहे. शेतकऱ्यांकडून सरकार वेगवेगळया कर रुपाने भरपूर महसूल गोळा करते परंतु तशा प्रकारच्या सुविधा पुरवत नाही अशी त्यांची तक्रार होती. शेतकऱ्यांना शेतीसाठी भरपूर पाणी मिळावे या उद्देशाने सरकारने लाखो रुपये खर्च करुन जागोजागी कालवे बांधले होते. परंतु यामागचा हेतू सावकारांना भरपूर व्याज मिळावे तर इंग्रज इंजिनियरांना मोठया प्रमाणात पगार देता यावे असे महात्मा फुले यांच्या निदर्शनास आले होते. तसेच शेतकऱ्यांकडून मिळणारा महसूल हा शहरांमध्ये रस्ते, त्यावर कंदिलाची रोषणाई, पाण्याच्या तोटया, चिरेबंदी गटारे, कचऱ्याच्या गाडया यासारख्या सुखसोयी प्राप्त करुन देण्यासाठी खर्च केला जात होता. अशा चहूबाजूंनी शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाचे मूळ कारण हे आर्थिक विषमता आहे असे त्यांच्या लक्षात आले होते.

महात्मा फुले यांच्या काळात इंग्लंडमधील आर्थिक विचारावर अभिजात अर्थशास्त्राचा पगडा होता. त्यांनी अर्थकारणात शासकीय अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार केला होता. परंतु भारतातील राष्ट्रवादी अर्थशास्त्रज्ञांनी इंग्लंडला फायदेशीर असणारे हे आर्थिक धोरण भारतासाठी हानिकारक असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. अलिप्ततेच्या धोरणाऐवजी संरक्षणाच्या धोरणाचा आग्रह त्यांनी धरला होता. तेव्हापासून संरक्षणावर भर देणाऱ्या शासनाकडून कल्याणकारी राज्याच्या दिशेने अर्थशास्त्राची प्रगती झाली होती. त्यानंतर प्रत्येकाच्या ऐपतीप्रमाणे त्यांच्यावर कर बसवावा त्यातून राज्याचे उत्पन्न वाढवावे आणि आर्थिक विषमता दूर करावी अशा तत्त्वांना मान्यता देण्यात आली.

**शेतीविषयक विचार :—**

महात्मा फुले यांनी देशाच्या विकासाचे शेतकरी, सैनिक आणि प्रशासकीय वर्ग हे तीन आधारस्तंभ सांगितले आहे. त्यांच्यामते या तीन आधारस्तंभावरच देशाचा विकास व सुस्थिती अवलंबुन असते. परंतु या तीन आधारस्तंभापैकी सर्वात निकृष्ठ अवस्था ही शेतकरी वर्गाची तर सर्वात उत्कृष्ठ अवस्था ही प्रशासकीय वर्गाची होती. त्यांच्या मते शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन दारिद्रयात आणि कर्ज फेडीत जात असे. एवढेच नव्हे तर दारिद्रयातच त्यांचा अंत होत असे. शेतकरऱ्यांच्या या अवस्थेची त्यांनी पुढील कारणे सांगितली आहेत.

१) **संस्थानिकांचा अंत :—** ब्रिटीशपूर्व काळात संस्थानिकांकडे मोठया प्रमाणात सैन्य असे त्यांचा संपुर्ण खर्च हे संस्थानिक करत असल्यामुळे शेतकऱ्यांवर त्यांचा भार पडत नव्हता. किंबहूना बरेच शेतकरी सैन्यात

नोकरी करुन आपला उदरनिर्वाह भागवीत होते. परंतू पेशव्यांचे राज्य लयास गेल्यामुळे या सैन्याच्या नोकऱ्या गेल्या त्याचा परिणाम म्हणून शेतीवरील भार वाढला आणि लोकांच्या उत्पन्नात घट होऊन त्यांच्यावर दारिद्रयात जगण्याची वेळ आली.

२) **जमिनीचे तुकडीकरण :—** जमिनीवरच जास्त लोक अवलंबून असल्यामुळे पुढे वारसा कायद्याने जमिनीचे तुकडीकरण सुरु झाले. अशा या लहान तुकडयांवर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण झाले.

३) **वस्तुंची आयात :—** ब्रिटनमध्ये यंत्रावर तयार होणाऱ्या वस्तू भारतात आयात करुन विकल्यामुळे भारतातील सुतार, लोहार इत्यादी लोकांचे व्यवसाय बुडून ते बेरोजगार झाले. एवढेच नव्हे तर त्यांना आपल्या वस्तू सावकाराकडे गहाण ठेवून उदरनिर्वाह करावा लागला.

४) **शेतकऱ्यांचे शोषण :—** शेतकऱ्यांच्या अडचणींचा व अज्ञानाचा गैरफायदा घेवून त्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने शेत साऱ्यामधील वाढ आणि सावकारांचे कर्ज यांचा समावेश होतो.

५) **जनावरांच्या हत्या :—** महात्मा फुले यांच्या मते त्याकाळात मासांहार करणाऱ्यांची संख्या वाढल्याने ते गाई—बैलांची मोठया प्रमाणावर कत्तल करीत होते. त्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी बैलांची कमतरता जाणवत होती. बैलांअभावी बागायती पिके घेणे शक्य नसल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते.

**शेती सुधारणेविषयक विचार व उपाय :—**

सावकार, सरकारी अधिकारी आणि सवर्ण यांच्या शोषणातून मूक्त होण्यासाठी शेतकऱ्यांनी सर्वप्रथम विद्या प्राप्त केली पाहिजे. शेतकरी अज्ञान असल्यामुळेच विविध वर्गातून त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे शोषण होते असे त्यांना वाटत होते. शेतीमध्ये मोठया प्रमाणात सुधारणा करुन शेतीची उत्पादकता वाढवावी त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढून त्यांचे दारिद्रिय नाहीसे करता येईल. यासाठी त्यांनी पुढील उपाय सुचविले आहे.

१. शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी पाणी पुरवठ्याला प्रथम महत्त्व दिले. त्याचबरोबर डोंगरावरील पानाफुलांचे, कृमीकिटकांचे मासाहाडांचे सत्व पुराच्या पाण्याबरोबर वाहून जाऊ नये म्हणून सरकारने जागोजागी तालीवजा बंधारे बांधून घ्यावेत असा उपाय त्यांनी सुचविला. तसेच इतरांच्या मदतीशिवाय विहिरी खोदणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारने बक्षीस द्यावे, नदीनाले व तलाव यातील साचलेला गाळ शेतकऱ्यांना कुठलाही मोबदला न घेता मोफत नेऊ द्यावा तसेच गावाची गायराने जंगलखात्याने ताब्यात घेतलेली असतील तर ती शेतकऱ्यांना परत करावी. अशा शिफारशी महात्मा फुले यांनी केल्या होत्या.

२. सन १८७७—७८ या वर्षात दुष्काळामुळे महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर गुरांची हानी झाली होती. तेव्हा शेतीच्या कामासाठी अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे गोहत्येला कायद्याने बंदी करावी. या काळात इंग्रज व मुसलमान यांनी या गायी—बैलांऐवजी शेळया—बकरीचे मांस खावे असे सुचविले होते.

३. पीक संरक्षणासाठी शेतकऱ्यांना बंदूका जवळ बाळगण्याची परवानगी द्यावी ते शक्य नसल्यास पीक संरक्षणाची जबाबदारी सरकारने स्वीकारावी. शेतकऱ्यांसाठी विविध प्रदर्शन भरवून शेतीकामासाठी परिक्षेचे आयोजन करावे. यात ज्या शेतकऱ्यांची मूले विशेष नैपुण्य दाखवतील किंवा विशेष कल्पकता आणि कार्यक्षमता सिद्ध करतील अशा मूलांना सरकारने सरकारी खर्चाने शेती शाळा पाहण्याकरिता त्यांना विदेशात पाठवावे. अशा विविध सूचना यासंदर्भात महात्मा फुले यांनी केल्या आहे.

४. शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा करण्यासाठी व सावकाराला पर्याय म्हणून स्वतंत्र शेतकी बँकांची कल्पना त्यांनी मांडली होती. विशेष म्हणजे वेडरबर्न या इंग्रज अधिकाऱ्याने या कल्पनेला पाठिंबा दिला होता. परंतु शेती व्यवसाय जोपर्यंत किफायतशीर होणार नाही तोपर्यंत या बँका यशस्वी होणार नाही असे महात्मा फुले यांचे मत होते. म्हणून शेती व्यवसाय फायदेशीर होण्यासाठी सर्वप्रथम शेतीवरील कराचा बोजा कमी करावा यासाठी विलायतेतील सावकारांना दिले जाणारे प्रचंड व्याज कमी करुन लष्कर, पोलिस, न्याय, महसूल, शिक्षण इत्यादी विभागातील अधिकाऱ्यांना शंभर रुपयांच्यावर मिळणारे पगार व पेन्शने कमी करुन शासनाचा खर्च कमी करण्याचा मार्ग त्यांनी सुचविलेला आहे.

महात्मा फुले यांच्या ग्रंथलेखनाला जवळपास आज शंभर वर्ष होत आली. तरीही आज देखील खेडयातील सामाजिक व आर्थिक जीवनाची ज्यांना जाणीव आहे त्यांना या विचाराची आजही प्रचिती येते. खेडयातील अर्थव्यवस्था आज झपाट्याने बदलत असून बहूजन समाजातील वरिष्ठ जातींमधून एक सधन शेतकरी तर कारखानदारीमधून एक ऐपतदार वर्ग पुढे आला आहे. याचाच अर्थ आज देखील ग्रामीण भागातील लहानसहान गरीब शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस दैनिय होत असून भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत उत्तरोत्तर भरच पडत आहे. खेडयातील सावकार आणि शासन यंत्रणेतील परस्परसंबंध यांच्या कार्याविषयी महात्मा फुले यांनी रेखाटलेले चित्र कसे प्रत्यक्ष वस्तूस्थितीला धरुन आहे हे आज देखील आपल्याला शासकीय अहवालावरुन स्पष्ट होते.

थोडक्यात शेतकरी हाच समाजाचा कणा आहे. म्हणून त्यालाच केंद्रस्थानी मानून सर्व गोष्टींचे नियोजन केले पाहिजे. कारण कृषी विचार हा अवघ्या समाजाच्या आणि राज्याच्या अभ्युदयाचा विचार आहे असे महात्मा फुले यांना वाटत होते. त्यांच्या मते सामाजिक समता, आर्थिक सुबत्ता, निकोप एकता यांच्यासाठी आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी भूमी आणि भुमिपुत्राशिवाय पर्याय नाही. यासाठीच शेतकऱ्यांचा विकास आवश्यक आहे असे महात्मा फुले यांनी प्रतिपादन केले आहे.

**संदर्भ :—**

१. प्रभाकर वैद्य, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, प्रकाशक ए.बी.घाणेकर, लोक वाङ्मय गृह प्रा.लि. मुंबई, ऑक्टोबर १९७४.
२. रावसाहेब ढवळे, सत्यशोधक : वसा आणि वारसा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
३. गंगाधर बाळकृष्ण सरदार, महात्मा फुले : व्यक्तिमत्व आणि विचार, प्रकाशक ग्रंथाली वाचक चळवळ, जून १९८१.
४. रायखेलकर, दामजी, आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून २०११.
५. महात्मा जोतीराव फुले, शेतकऱ्यांचा आसूड.

# मानव प्रजातियोंका वर्गिकरण के आधार का भौगोलिक विवेचन

**डॉ. शेख ए.आय**
संशोधक शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण ता. कळंब जि. उस्मानाबाद
ई-मेल- drshaikh.ai18@gmail.com

**प्रस्तावना :-**

प्रजाति शब्द के बारे में भूवैज्ञानिको का एक मत सही है | कुछ वैज्ञानिक प्रजाति के अंर्तगत समान गुण या गुण समुहवाले लोगों को सम्मिलीत करते है | इसी के अलावा कुछ वैज्ञानिक समान भाषा बोलनेवले या एक ही स्थान पर कई पीढींयाँ से निवास करनेवाले को प्रजाति का स्वरूप मानते है | कुछ विद्वान धर्म से संबंधित या कुछ विदवान प्रजाति को राष्ट्र के रूप में लेते है | सारांश रूप से ऐसा कहा जा सकता है कि प्रजाति व्यक्तिंयों का एक ऐसा समुहे है कि, जिनमें एक से शारीरिक लक्षणों का संयोग निश्चित रूप से पाया जाता है और जिस अनुवंशिक शारिरीक लक्षणों के आधार पर पहचाना जा सकता है | मानव शास्त्रियोंने प्रजातियों का वर्गिकरण शारिरीक नाप, मानवमिती, जीवमतीती, शारिरीकमिती तथा कपालमिती आदि के आधार पर मानव की शारीरिक बनावट के विशिष्ट लक्षणों के अनुरूप किया है | विविध शास्त्रियोंने मानव प्रजातियों का वर्गिकरण त्वचा का रंग, जबडों का उभार, कपाल मिती एवं उसका घणत्व इसके आधार पर किया है | जिन शारीरिक लक्षणों के आधार पर मानव प्रातियों का अध्यन किया जाता है, उन्हे दो श्रेणीयो में बाटा जाता है |

1) बाह्य लक्षण 2) आंतरिक लक्षण

A) **बाह्य लक्षण :-** इसके अंतर्गत त्वचा का रंग, बालों की बनावट शारिरीक कद, मुखाकृति, नेत्रों का रंग और आकृती, होंट का आकार बाह्य लक्षण |

1. **त्वचा का रंग** :- त्वचा के रंग के आधार पर विश्व के प्रजातियों को तीन मोटे भागों में बाटा जाता है | श्वेत प्रजाती, पित प्रजाती एवं श्याम प्रजाती
2. **बालों का बनावट** :- बालों के बनावट के दृष्टि से पांच भागो में विभक्त किया है, सिधे या खडे बाल, चिकणे बाल, तरंगमय या लहरदार बाल, छलेदार बाल, घुंगराले बाल
3. **शरीर का कद**:- अधुनिक मानव की औसत शारीरिक उंची 5 फुट 6 इंच होती है | पुरूषों मे 4 फुट 3 इंच से लकर 6 फुट 6 इंच तथा स्त्रियों मे 3 फुट 11 इंच से लकर 6 फुट 2 इंच तक पाये जाते है |
4. **मुखाकृति**:- इस लक्षणों मे चौडे मुखवाले, मध्यम मुखवाले, लम्बे मुखवाले मुखाकृति का समावेश होता है |
5. आँखो का रंग :- कुछ मानव प्रजातियों का आँखो का रंग नीला, हरा या भूरा होता है तो कुछ की आँखे काली होती है |
6. **ओंठ के आकार** :- होठो की बनावट में भी भिन्नता पायी जाती है | कुछ के होठ बहुत ही छोटे होते है | इनमें बहुत कम स्थुलता तथा फैलाव पाया जाता है तथा बाहर को उलटे हुए या होंठ संधी कि भिन्नता बिल्कुल ही नही मिलती |

B) **आंतरिक लक्षण** :- उपर से न दिखने वाले लक्षण तथा जिन्हे मानव मापक यंत्रो से नापा जा सकता है |

**सिर की बनावट अथवा कपाल सुचकांक :-**

सिर की ज्ञात बनावट करने के लिए उसकी लंबाई चौडाई ज्ञात कर उनका पारस्परिक संबंध बताया जाता है | इसी का सुचकांक निकालकर सदैव इकाई में प्रदर्शित किया जाता है |

**शिरस्य सुचकांक** = सिर की लंबाई , सिर की चौडाई

इस इकाई से लंबे सिरवाले, मध्यम सिरवाले, छोटे सिरवाले ऐसी श्रेणी के मानव प्रजाति का वर्गिकरण किया जाता है

**कपाल की क्षमता** :- मानव खोपडी की धरिता की प्रजातियों के निर्धारिण का एक तथ्य है | विभीन्न प्रजातीयोंकी लोगों की खोपडी की धरिता 1100 सीसी से लेकर 1500 सी सी तक होती है |

**नासा सुचांक** :- नाक का आकार भी विस्तृत्त रूप से भिन्न-भिन्न प्रजातियों मे भिन्न हो जाता है | नाक चौडी या मुलरूप मे पिचकी हो सकती है | नाक का उपरी छोर उच्च, मध्यम या निम्न हो सकता है | नाक के चौडाई -लंबाई के प्रतिशत अनुपात को नासा सुचकांक कहते है |

नासा सुचकांक = नाक की चौडाई नो की लंबाई

इस सुचकांक के आधार पस संकरी पतली नासिका, मध्यम नासिका या चपटी नासिका

**रक्त समुह** :- प्रत्येक प्रजाति में एक विशिष्ट प्रकार का रक्त पाया जाता है | रक्त को महत्वपुर्ण लक्षण माना जता है | इसके आधारपर विश्व की प्रजातीयों का वर्गीकरण किया जाता है | मानव रक्त का चार भागों में वर्गिकरण किया जाता है | यह रक्त समुह A, B, AB तथा O है | समान प्रकारे के रक्तवाली प्रजाति को ही एक विशेष समुह में रखा जाता है | मानव प्रजातियों का पृथक आस्तित्व अंतयौंन संबंध, भौगोलिक विविधता आदि बातों पर निर्भर करता है | शारिरीक लक्षणो के विकासपर वातावरण, भोजन आदि का प्रभाव पडता है | मानव प्रजातियों का मिश्रण इस सिमा तक तय हो गया है कि, उसका शिरिरीक लक्षणो के आधारपर वर्गिकरण करना एक जटील कार्य बन गया है | फिर भी बर्निसर, ब्लुमैन बँक, कुवियर, हक्सले, हैकाल डकवर्थ, क्रोबर, हयुरन, ग्रिफीत टेलर आदि मानव भूगोल वेत्ताओंने कुछ अपने अपने मानव लक्षणों के आधार पर मानव प्रजातियों का वर्गिकरण करणे का प्रयास किया है, उसमे मुलत: पृथ्वी के धरातल पर तीन प्रजातियाँ मितली है |

1. श्वेत प्रजाति / कॉकेसाईड
2. पीत प्रजातियाँ/ मंगोलाईड
3. काली प्रजातीयाँ / निग्रोयड्स
4. उपयुक्त प्रजातियों का शारिरिक लक्षणों के आधारपर मानव वर्गिकरण किया जाता है| इसी प्रकार घरातल पर तीन प्रमुख प्रजातियाँ का मानवी प्रजातियों मे समावेश होता है |

**संदर्भ :-**

1. मानव भूगोल -डॉ. चतुर्भुज मामोरिया
2. मानव भूगोल -डॉ. माजिर हुसेन
3. मानव भूगोल -डॉ. नरेश कुमार
4. मानव भूगोल -डॉ. कालू रामू ज. संदीप शर्मा
5. Human Geography- www.wikipedia.org

# उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूप : एक अभ्यास (इ.स.१९९१ ते २०११)


**प्रा.डॉ.शिरमाळे महेबुबपाशा बाबूमीयाँ**
भूगोल विभाग शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण ता.कळंब जि.उस्मानाबाद
mahebubpasha1981@gmail.com

**प्रस्तावना**

भूगोलामध्ये भौगोलिक घटकांचे अभिक्षेत्रीय व कालानुसार विश्लेषण या दोन गोष्टी अतिशय महत्त्वाच्या असतात व अशा प्रकारचे विश्लेषण करण्यासाठी अनेक प्रकारच्या साधनांचा वापर केला जातो आणि या अनेक साधनांपैकी विभाग हे साधन आहे की, ज्या साधनाद्वारे आपण भौगोलिक घटकांचे काळानुसार व अभिक्षेत्रानुसार विश्लेषण करू शकतो. भूगोल अभ्यासात अनेक भूगोल तज्ञांनी कृषी प्रदेश निश्चित करून प्रदेश सीमांकीत करण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी अनेक कृषी तज्ञांनी खंड किंवा देश असे मोठे भाग घेऊन प्रादेशिकीकरण केले आहे. ज्यावेळेस लहान प्रदेश विचारात घेतला जातो त्यावेळेस त्या प्रदेशात कृषीमध्ये भिन्नता असण्याची शक्यता कमी असते. जर अशा लहान प्रदेशात भूपृष्ठीय किंवा मातीच्या संदर्भात भिन्नता असेल तर कृषीमध्ये भिन्नता आढळते. अशा विभागात पिकांच्या निवडीला व कृषी पद्धतीला अधिक शक्यता असते व अशा परिस्थितीत कृषी विभाग किंवा प्रदेश ठरविणे किंवा ते प्रदेश सीमांकित करणे शक्य असते.

**बीजसंज्ञा —** सोयाबीन पीक प्रारूप, स्थल व कालपरत्वे बदल

**अभ्यास क्षेत्र .** प्रस्तुत शोधनिबंधासाठी उस्मानाबाद जिल्ह्याची निवड केलेली आहे. उस्मानाबाद मराठवाड्यातील नैऋत्यकडील जिल्हा असून त्याचा अक्षवृत्तीय विस्तार १७°३५' ते १८°४०' उत्तर अक्षवृत्त, रेखावृत्तीय विस्तार ७५°१६' ते ७६°४०' पूर्व रेखावृत्ताच्या दरम्यान आहे. हा जिल्हा महाराष्ट्र व कर्नाटक सिमेवरील असून त्याच्या दक्षिण–पश्चिमेस सोलापूर, उत्तर–पश्चिम दिशेस अहमदनगर, उत्तरेस बीड, पुर्वेस लातूर आणि दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बीदर आणि गुलबर्गा हे जिल्हे आहेत. उस्मानाबाद जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७२१२४ चौ.कि.मी. असून त्यापैकी ७२.७१ चौ.कि.मी. क्षेत्र ग्रामीण भागाचे आहे. महाराष्ट्र राज्याच्या ३.२१ टक्के क्षेत्र या जिल्ह्याचे आहे. जिल्ह्यात उस्मानाबाद, कळंब, उमरगा, तुळजापूर, परांडा, भूम, लोहारा व वाशी या आठ तालुक्यांचा समावेश होतो.




स्रोत : भारतीय सर्वेक्षण विभाग, भूस्थलदर्शक नकाशा, उस्मानाबाद जिल्हा.

नकाशा क्र.१.१

**गृहितके**

१. सोयाबीन पीक प्रारूपात वाढ होत आहे.

२. विविध पिकाखालील क्षेत्रापैकी सोयाबीन पिकाखालील क्षेत्र अधिक आहे.

**उद्दिष्ट**

१. उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूपाचा स्थल–कालपरत्वे अभ्यास करणे.

**माहिती स्त्रोत**

उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूप या शोधनिबंधाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक स्वरूपाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. याचा अभ्यास करताना इ.स.१९९१–९२ ते २०१०–११ या कालावधीचा विचार करून सदर अभ्यासासाठी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद जिल्हा, कृषी अधिकारी अहवाल, कृषी सहसंचालक कार्यालयातील अहवाल, जिल्हा सांख्यिकीय विभाग, मुलाखत, प्रश्नावली तंत्राचा उपयोग करून माहिती संकलीत केली आहे.

**अभ्यास पद्धती**

प्रस्तुत अभ्यासासाठी सांख्यिकीय व नकाशाशास्त्रीय पद्धतीचा वापर केला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूपाचा अभ्यास करताना खालील सूत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

सूत्र :

$$CP = \frac{Ca}{N} \times 100$$

CP = पीक प्रारूप

Ca= अभ्यासक्षेत्रातील 'अ' पिकाखालील क्षेत्र

N= अभ्यासासाठी निवडलेल्या प्रदेशातील एकूण पिकाखालील क्षेत्र

**विषय विवेचन**

पिकांचे स्वरूप आणि पीक प्रारूप हे शेतकऱ्यांच्या पिकांच्या निवडीवर अवलंबून असते. त्याचबरोबर या प्रदेशात घेतल्या जाणाऱ्या इतर पिकांबरोबरच जी स्पर्धा करावी लागते त्याचाही परिणाम पिकाच्या प्रारूपावर होतो. पिकांची निवड करताना कोणत्या विशिष्ट हेतूसाठी पीक घेतले जाणार आहे हेदेखील विचारात घेतले जाते. पिकांच्या प्रारूपावर सर्वात मोठा प्रभाव भौगोलिक परिस्थितीचा पडतो आणि या खालोखाल सामाजिक, आर्थिक परिस्थितीचाही काही प्रमाणात पीक प्रारूपावर परिणाम होत असतो.

''विशिष्ट क्षेत्रात विशिष्ट वेळेला वेगवेगळ्या पिकाखाली असलेल्या क्षेत्राचे प्रमाण म्हणजे पीक प्रारूप होय.''

"Proportion of area under various crops at point of space and time."

पीक प्रारूप ही गतिमान संकल्पना असून, बदलत्या तांत्रिक घटकाच्या वापरामुळे, पीक प्रारूपात परिवर्तन होते. वास्तविक कोणतेही पीक प्रारूप सर्वकाळ आदर्श असत नाही.

**उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीन पीक प्रारूप**

उस्मानाबाद जिल्ह्यातील पीक प्रारूपात अभ्यासासाठी घेतलेल्या पिकाखालील दर हेक्टरी क्षेत्रामध्ये सोयाबीन, कापूस, ऊस, तांदूळ, गहू, ज्वारी, हरभरा, तूर, मूग आणि भुईमूग या १० पिकांच्या क्षेत्राचा अभ्यास करून यामधून प्रामुख्याने सोयाबीन पीक क्षेत्राचे पीक प्रारूप समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.सन १९९१–९२ ते १९९५–९६ या कालावधीत ०.०६ टक्केपेक्षा जास्त सोयाबीन पीक प्रारूपात भूम व तुळजापूर तालुक्यांचा समावेश होतो. ०.०५ ते ०.०६ टक्केमध्ये कळंब तालुक्याचा समावेश तर ०.०५ टक्केपेक्षा कमी मध्ये उमरगा तालुक्याचा समावेश होतो. उस्मानाबाद व परांडा तालुक्यात मात्र सोयाबीन पीक प्रारूप आढळून येत नाही. या कालावधीत सर्वाधिक पीक प्रारूप भूम तालुक्यात ०.०८ टक्के तर सर्वात कमी सोयाबीन पीक प्रारूप उमरगा तालुक्यात ०.०४ टक्के आढळून येते. (सारणी क्र.१)सन १९९६–९७ ते २०००–०१ या कालावधीत सोयाबीन पीक प्रारूपात ०.२५ टक्केपेक्षा जास्तमध्ये कळंब, तुळजापूर व उमरगा तालुक्याचा समावेश होतो. तर ०.१५ ते ०.२५ टक्के सोयाबीन पीक प्रारूपात एकाही तालुक्याचा समावेश होत नाही आणि ०.१५ टक्केपेक्षा कमी सोयाबीन पीक प्रारूपामध्ये उस्मानाबाद, परांडा व भूम तालुक्याचा समावेश होतो. तर लोहारा व वाशी तालुक्यात मात्र सोयाबीन पीक प्रारूप आढळून येत नाही. या कालावधीत सर्वाधिक सोयाबीन पीक प्रारूप तुळजापूर तालुक्यात ०.३४ टक्के तर सर्वात कमी ०.०६ टक्के परांडा व भूम तालुक्यात समान असे सोयाबीन पीक प्रारूप आढळून येते. (नकाशा क्र.१ अ) सन २००१–०२ ते २००५–०६ या कालावधीत सोयाबीन पीक प्रारूपात १.९६ टक्केपेक्षा जास्त वाशी तालुक्यात आढळून येते. तर १.०२ ते १.९६ टक्के फक्त लोहारा तालुक्यात सोयाबीनचे पीक प्रारूप असल्याचे दिसते आणि १.०२ टक्केपेक्षा कमी कळंब, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, भूम व परांडा या तालुक्यांचा समावेश सोयाबीन पीक प्रारूपात होतो. या कालावधीत सर्वाधिक २.८९ टक्के सोयाबीन पीक प्रारूप वाशी तालुक्यात असल्याचे दिसते. तर सर्वात कमी ०.०८ टक्के सोयाबीन पीक प्रारूपात परांडा तालुक्याचा समावेश होतो. (सारणी क्र.१)


सन २००६–०७ ते २०१०–११ या कालावधीत सोयाबीन पीक प्रारूपात कळंब, तुळजापूर व उस्मानाबाद तालुक्यात २.९५ टक्के पेक्षा जास्त आढळून येते. तर १.९४ ते २.९५ टक्के सोयाबीन पीक प्रारूपात उमरगा या एकाच तालुक्याचा समावेश होतो आणि १.९४ टक्केपेक्षा कमी लोहारा, परांडा, भूम व वाशी तालुक्याचा समावेश सोयाबीन पीक प्रारूपात होतो. याच कालावधीत सर्वाधिक सोयाबीन पीक प्रारूप कळंब तालुक्यात ३.९७ टक्के एवढे आढळते तर सर्वात कमी सोयाबीन पीक प्रारूप ०.९३ टक्के वाशी तालुक्यात आढळून येते. (नकाशा क्र.१ ब)

**सारणी क्र.१.१**

**उस्मानाबाद जिल्ह्यतील सोयाबीन पीक प्रारूप (क्षेत्र हेक्टरमध्ये )**


| अ. क्र. | तालुके | सन १९९१–९२ ते १९९५–९६ | | | सन १९९६–९७ ते २०००–०१ | | | सन २००१–०२ ते २००५–०६ | | | सन २००६–०७ ते २०१०–११ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकूण पिकाखालील क्षेत्र | सोयाबीन पिकाखालील क्षेत्र | सोयाबीनचे पीक प्रारूप | एकूण पिकाखालील क्षेत्र | सोयाबीन पिकाखालील क्षेत्र | सोयाबीनचे पीक प्रारूप | एकूण पिकाखालील क्षेत्र | सोयाबीन पिकाखालील क्षेत्र | सोयाबीनचे पीक प्रारूप | एकूण पिकाखालील क्षेत्र | सोयाबीन पिकाखालील क्षेत्र | सोयाबीनचे पीक प्रारूप |
| १ | उस्मानाबाद | १००३१४ | ०० | ०० | ७३०८१ | ६० | ०.०८ | ९२१२० | ४२० | ०.४५ | ८७८९३ | २६२० | २.९८ |
| २ | कळंब | ६४५८४ | ४० | ०.०६ | ५८०२४ | २०० | ०.३४ | ८०१५५ | ४०० | ०.४९ | ८०५४४ | ३२०० | ३.९७ |
| ३ | उमरगा | ९८१६५ | ४० | ०.०४ | ८८४७५ | २४० | ०.२७ | ९३७०१ | ३८० | ०.४० | ८०५८५ | १९६० | २.४३ |
| ४ | तुळजापूर | ७८४६८ | ६० | ०.०७ | ८९७०७ | २६० | ०.२९ | ७७६३५ | ३४० | ०.४३ | ८१७५० | ३१६० | ३.८६ |
| ५ | परांडा | ७९३९३ | ०० | ०० | ६५६९१ | ४० | ०.०६ | ९६००३ | ८० | ०.०८ | ५९३४६ | ६०० | १.०१ |
| ६ | भूम | ४५२५२ | ४० | ०.०८ | ६२००० | ४० | ०.०६ | ५६८७२ | १२० | ०.२१ | ६४२९७ | ९४० | १.४६ |
| ७ | लोहारा | . | . | . | . | . | . | १५८१४ | २८० | १.७७ | ६२९९४ | १०४० | १.६५ |
| ८ | वाशी | . | . | . | . | . | . | ११७६३ | ३४० | २.८९ | ५३३५१ | ५०० | ०.९३ |
| | **एकूण** | **४६६१७६** | **१८०** | **०.०३** | **४३६९७८** | **८४०** | **०.१९** | **५२४०६३** | **२३६०** | **०.४५** | **५७०७६०** | **१४०२०** | **२.४५** |

स्त्रोत : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद (१९९१ ते २०११)




स्रोत : संशोधकाने संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित.

नकाशा १ अ




स्रोत : संशोधकाने संकलित केलेल्या आकडेवारीवर आधारित.

नकाशा १ ब

**निष्कर्ष**

उस्मानाबाद जिल्ह्यातील सोयाबीनच्या पीक प्रारूपाचा अभ्यास करताना सारणी क्र.१ वरून असे दिसून येते की, सन १९९१–९२ ते १९९५–९६ या कालावधीत सोयाबीनचे पीक प्रारूप अत्यल्प होते हे दिसते तर १९९६–९७ ते २०००–०१ या कालावधीत वाढ झालेली दिसून येते. तर २००१–०२ ते २००५–०६ या कालावधीत नवनिर्मित लोहारा व वाशी तालुक्यात उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यांपेक्षा सोयाबीनचे पीक प्रारूप हे जास्त असल्याचे दिसून येते. सन २००६–०७ ते २०१०–११ या कालावधीत जिल्ह्यातील कळंब, तुळजापूर, उस्मानाबाद, उमरगा, भूम व परांडा या तालुक्यातील सोयाबीन पीक प्रारूपात झपाट्याने वाढ झालेली दिसते. यावरून असे दिसून येते की, ज्याठिकाणी सोयाबीनचे पीक प्रारूप योग्य आहे त्याठिकाणी विविध पिकाखालील असलेल्या क्षेत्रापैकी सोयाबीन पिकाखालील क्षेत्र अधिक असल्याचे आढळून येते.

**संदर्भ ग्रंथ**

१. माजिद हुसेन (२००९), कृषी भूगोल, रावत पब्लिकेशन्स, जयपूर
२. डॉ.सुरेश फुले, कृषी भूगोल, विद्याभारती प्रकाशन, लातूर
३. विवेक सौताडेकर, आपला उस्मानाबाद जिल्हा, विद्याभारती प्रकाशन, लातूर
४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, उस्मानाबाद जिल्हा (सन १९९१–९२ ते २०१०–११)
५. जिल्हा कृषी अधिकारी अहवाल, कृषी विभाग, उस्मानाबाद

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानवाद

**प्रा. अभिमान अरुण ढाणे**
राज्यशास्त्र विभाग, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब

**प्रस्तावना :-**

प्रत्येक देशाचे संविधान अत्यंत महत्त्वाचे असते हे सांगण्याची गरज नसते. भारताने संसदीय पध्दतीचा अवलंब केला असला तरी त्याचा मुळ ढाचा कायम ठेवावा लागतो. भारतीय संविधानवादाल महत्त्व् आहे भारतामध्ये संसदेला सर्व अधिकार आहेत. कायदे हे संविधानाच्या कसोटीवर तपासून पाहावे लागतात. कायदानिर्मिती करताना तज्ञांना भविष्याची जाणीव आणि वर्तमानाचे भान असणे अवश्यक् असते. तसे भारतात असणाऱ्या चालिरिती रुढी, मुल्य्, सांस्कृतिक वारसा इत्यादी ची जाणीव असणे आवश्यक् असते. संविधान निर्मिती करताना भारत पारतंत्र्यात असतानाचा इंग्रजांचा काळ आणि सध्यास्थिती याचा विचार करणे गरजेचे आहे. भारतीय संविधान निर्मितीत पटेल, नेहरु यांच्या बरोबरीने डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा मोलाचा वाटा आहे. कायद्याचे ज्ञान असणे आणि त्यावर विचारमंथन होणे या बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्य केले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हणतात. मसुदा समितित सात सदस्य् होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एन, गोपालस्वामी अयंगर, अल्लादि कृष्णस्वामी अय्यर, सईद अहमद सादुल्ला, के. एम. मुन्शी, एन माधवराव, टी.टी कृष्णमचारी हे सदस्य् होते. या समितीच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्यामुळे कधी कधी एकट्यालाच मसुदा समितीचे प्रतिनिधित्व् करावे लागत असे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संविधानाला श्रेष्ठ मानत असत. संविधानापेक्षा कोणीही श्रेष्ठ् नाही, असे त्यांना वाटत असत. भारतात अनेक प्रकारचे पंत, जाती, धर्म गट आहेत. आणि गटांनी आपला स्वार्थ न पाहता मानवतावादी धर्म अवलंबावा, आणि माणुस म्हणून आचरण करण्याची सवय लागावी यासाठीचा मार्ग म्हणजे संविधान होय. यामुळेच भारतीय संविधान लिखित विस्तृत असे बनविले गेले. कोणत्याही गट किंवा धर्म, जात, पंत धर्मानेे वाटेल तसा अर्थ काढून सत्ता उपभोगु नये व कोणताही घटक वंचित राहु नये. समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्यता, धर्म निरपेक्षता इत्यादीचा भारतीय राज्यघटनेमध्ये स्विकार केला आहे. भारतातील जनतेला आर्थिक, सामाजिक, राजकिय न्याय देण्यासाठी व्यक्तीचे विचार, अभिव्यक्ती, विश्वास , श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य् देण्यासाठी जनतेला दर्जाची व संधीची समानता देण्यासाठी व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकता व एकात्मिता घडवून आणणारी बंधुता देणारे संविधान भारताला घटनाकाराच्या विचारातून मिळाले.

**भारतीय राज्यघटना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

1946 साली ब्रिटनचे पंतप्रधान एटली यांनी भारतामध्ये कॅबिनेट मिशन एक तीन सदस्यीय शिष्ठमंळाची घोषणा केली, आणि या कॅबिनेट मिशन योजनेनुसार घटना समितीच्या अप्रत्यक्ष पध्दतीने निवडणूका घेण्यात आल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मुस्लिम लिग आणि जागेद्रनाथ मंडळ यांच्या मदतीने बंगाल प्रांतातून घटना समितीचे सदस्य् म्हणून निवडून आलेले होते. डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या 'शेड्युल्ड् कास्ट्स फेडरेशन' या पक्षाच्या माध्यमातून भारतीय संविधान कसे असावे असे स्पष्ट् केले. भारतासारख्या देशाने इतर देशाच्या राज्यघटनेच्या दोषाची नक्कल् करु नये हि वेळ घटनात्मक् विधिनियमाच्या द्वारा देशाची अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्था निश्चित करण्याची आहे. घटना समितीने 29 ऑगस्ट् 1947 रोजी सात सदस्यीय मसुदा समिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या

अध्यक्षेतेखाली निवडण्यात आली घटनेचा आराखडा तयार केला. संविधान ज्यावेळी तयार झाले त्यावेळी काही प्रश्न् उपस्थित झाले त्यावर उत्तर् देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे विचार मांडले त्याला संविधानाच्या दृष्टिकोणातून संविधानवाद असे म्हणतात.

**शोधनिबंधाची उदिष्टये :-**

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याची माहिती करुण घेणे.

2)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.

3)भारतीय राज्यघटना निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब यांनी केलेल्या योगदानाची माहिती घेणे.

4)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची संकल्पना अभ्यासणे.

**शोधनिबंधाची गृहीतके :-**

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राजकीय आणि सामाजिक क्षेत्रामध्ये बदल करण्यासाठी महत्त्वपुर्ण योगदान दिले.

2)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आदर्श ठेवणे उपयुक्त् ठरेल.

3)समाजाच्या विकासासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मोलाचे ठरतात.

**शोधनिबंधाचा उद्देश :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान विषयाचा अभ्यास करणे हा प्रस्तुत लघुशोध निबंधाचा मुख्य् उद्देश आहे.

**घटना समिती :-**

कॅबिनेट मिशन योजनेने सुचविलेल्या तरतुदीप्रमाणे घटना समितीच्या निर्मितीसाठी निवडणूक होती यामध्ये एकूण 389 सदस्य् संख्या विविध पक्षांच्या माध्यमातून घेण्यात आली होती. डॉ. सचितानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली घटना समितीची पहिली बैठक घेण्यात आली. डॉ. राजेंद्र प्रसाद यांची कायमस्वरुपी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. समितीने विविध विषयासाठी समित्या व कार्य पध्दती व इतर बाबीसाठी 8 समित्या स्थापन करण्यात आल्या. भारतीय राज्यघटनेला अंतिम रुप देण्यासाठी 2 वर्ष 11 महिने 18 दिवस लागले. 26 नोव्हेंबर 1949 ला भारतीय राज्यघटना स्विकृत झाली. 26 जानेवारी 1950 अस्तित्वात आली.

**घटनेचे स्वरुप :-**

भारतीय राज्यघटना ही अंशत: परिवर्तनीय आणि अंशत: परिदृढ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. बदलत्या परिस्थितीनुसार घटना दुरुस्ती करता यावी त्याचबरोबर दुरुस्ती प्रक्रिया सोपी असेल तर राज्यघटना कायदेमंडळाच्या हातातील बाहुले बनण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे इतर देशाच्या राज्यघटनेचा अभ्यास करुन भारतीय राज्यघटना ही अंशत: परिवर्तनीय ठेवण्यात आली.

**मूलभूत हक्क् :-**

भारतीय समाजातील लोकांत समतोल निर्माण करायचा असेल तर मूलभूत हक्क् अवश्यक् असतात. भारतात बहुसंख्य् लोक निरक्षर व राजकिय दृष्टया जागरुक नाहीत. यामुळे राज्याकडून लोकांच्या हक्कांचा संकोच होऊ नये म्हणूनच मूलभूत हक्क् राज्यघटनेत असणे आवश्यक् मानले. तसेच मूलभूत हक्कांवर गदा आल्यास न्यायालयात दाद मागता यावी .

**संघराज्य् व्यवस्था :-**

भारतीय राज्यघटनेत 395 कलमे आहेत आणि पहिल्या कलमात राज्याचा संघ असा उल्लेख आढळतो. भारतामध्ये केंद्र सरकार शक्तिशाली आहे या समिक्षेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उत्त्र देताना म्हणतात, मसुदा समितीने राज्यघटनेत संतुलन करण्याचा उद्देश केला आहे.

**राज्य् समाजवादाचा पुरस्कार :-**

बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत असे की कल्याणकारी समाज रचना न्यायावर आधारित असावी , राज्य् समाजवाद राज्याचे उद्दिष्ट असावे. सर्व नागरिकांना सर्व संस्थात आर्थिक, सामाजिक तसेच राजकीय न्याय मिळावा, त्याचप्रमाणे भौतिक साधनांची मालकी आणि नियंत्रण असे ठेवावे की ज्यामुळे जास्तीत जास्त् लोकांचे कल्याण होईल. समाजातील दुर्बल घटकाचे कल्याण होईल. त्यासाठी त्यांनी राज्य् समाजवाद आणि समाजवादी अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला होता.

**न्यायमंडळाची अवश्यकता :-**

भारताने इंग्लंड प्रमाणे संसदीय शासन पध्दतीचा अवलंब केला आहे. तसेच अमेरिके प्रमाणे संघराज्य् पध्दतीचा अवलंब केला आहे. संसदीय पध्दतीमध्ये संसद तर अध्यक्षीय पध्दतीत न्यायमंडळ श्रेष्ठ् असते. संसदेने केलेला कायदा हा जन सुसंगत नसेल तर रद्द करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. भारतामध्ये नि:पक्ष न्यायव्यवस्थेची स्थापना करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे याला समर्थन होते.

**मूल्यमापन :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वाटत असे की समाजातील तळागळा पर्यंत प्रत्येकाला विकासाच्या संधी उपलब्ध् झाल्या पाहिजेत. भारतातील सर्व स्त्री – पुरुष, गरीब श्रीमंत, जाती, उपजाती, धर्म, पंत परंपरा असणारे लोक यांना न्याय मिळावा. कायद्याचे राज्य् असावे व्यक्ती किंवा गटाचे राज्य् असु नये. संविधान यशस्वी करण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. यामध्ये त्यांनी स्वीकारलेल्या संविधान वादाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. काँग्रेस आणि गांधीनी अस्पृश्यांप्रति काय केले, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर , क्षितिज पब्लिकेशन नागपूर, आवृत्ती 15 मार्च 2009.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भारताला महासत्ताक बनविण्यासाठी वैचारिक योगदान, डॉ. डी. डी. पाटील/प्रा. एम. बी. हांडे , अर्थव पब्लिकेशन्स्, आवत्ती 17 एप्रिल 2011.
3. तैलनिक राज्यशास्त्र , डॉ. शुभदा रावळ, श्रीविद्या प्रकाशन पुणे, 2004.
4. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार : एक अभ्यास

**प्रा.डॉ.मैंद बालासाहेब वैजनाथ**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख व पीएच.डी.संशोधन मार्गदर्शक, वसंतराव काळे महाविद्यालय,ढोकी,ता.जि.उस्मानाबाद.

Email-bvmaind2@gmail. Com

**घोषवारा:**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अनेक वैचारिक विद्याशाखानी समृद्ध होते.आंतरराष्ट्रीय ख्यातीचे घटनातज्ज्ञ,मानव वंशशास्त्रज्ञ,कायदेतज्ञ, उत्कृष्ट संसदपटू ,उत्कृष्ट संपादक, धर्म आणि संस्कृतीचे चिकित्सक अभ्यासक, अर्थशास्त्रज्ञ,समाजशास्त्रज्ञ,दलितांचे कैवारी, शेतकऱ्यांचे कामगारांचे हितकर्ते अशा विविध नात्याने त्यांना जगभर ओळखले जाते.डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना शालेय जीवनापासूनच अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागल्याने त्यांच्या मनात विषमतेविरुद्ध प्रचंड चीड व घृणा निर्माण झाली होती. त्याच काळात केळुसकर गुरुजींनी भेट दिलेले बुद्ध चरित्र वाचून त्यांच्या मनातील समतेची ज्योत प्रज्वलित झाली होती.त्यांच्यावर गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्सच्या विचारांचा प्रभाव होता. त्यामुळे समता,स्वातंत्र्य, बंधुता या लोकशाही मुल्यशी निगडीत तत्त्वांचा परिपोष होत गेला. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्थशास्त्रातील विविध विषयावरील प्रबंधातून त्यांनी सामान्य माणूस व त्यांचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवून समताधिष्ठित आर्थिक विचार मांडले.

**प्रस्तावना:**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, प्रख्यात कायदे तज्ञ, नामवंत शिक्षक तज्ञ, महान समाजसुधारक ,दीन दलितांचे कैवारी आणि थोर अर्थशास्त्रज्ञ म्हणून जगमान्य आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार समजून घेताना त्यांच्या एकूण तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावा लागतो. संपूर्ण जगामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार 'आंबेडकरांचे तत्त्वज्ञान ' या नावाने प्रसिद्ध आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारावर त्यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा प्रभाव होता.आंबेडकर हे म.गांधी यांच्या विचारा विरुद्ध होते. तसेच मार्क्सचा साम्यवाद त्यांना मान्य नव्हता. तर त्यांना लोकशाही समाजवाद मान्य होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार हे त्यांच्या विविध अर्थशास्त्रीय ग्रंथातून आणि त्यांनी केलेल्या वेगवेगळया भाषणांमधून व्यक्त झालेले दिसतात.तसेच 1937 मध्ये जो त्यांनी मजूर पक्षाचा जाहीरनामा लोकांना जाहीर केला त्यातून ही त्यांच्या आर्थिक विचारांची ओळख होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून एम.ए.अर्थशास्त्राची (1915)पदवी घेतली. त्यासाठी त्यांनी प्राचीन भारताचा व्यापार हा प्रबंध सादर केला होता. त्यानंतर काही काळ त्यांनी मुंबई येथे सिडनेहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. पुढे ते 1921 मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अर्थशास्त्राचा सखोल अभ्यास करण्यासाठी गेले.तेथे त्यांनी एम.एसी. आणि डी.एसी.या सर्वोच्च पदव्या प्राप्त केल्या.त्यांना प्रसिद्ध अर्थतज्ञ प्रा.सेलिगमन आणि प्रा.कॅनन यांचे मार्गदर्शन लाभले. इंग्लंडमध्ये त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास ब्रिटिश म्युझियम लायब्ररी मध्ये बसून केला. त्यावेळी त्यांनी डॉ.कॅनन यांच्या मार्गदर्शनाखाली रुपयाचा प्रश्न ( The Problem of Rupee) हा संशोधनात्मक प्रबंध लिहिला.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

1)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

2)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेती व शेतमजूर आणि कामगार विषयक विचारांचा अभ्यास करणे .

3)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उद्योगासंबंधीच्या विचारांचा अभ्यास करणे.

4)डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजस्व व चलनविषयक विचारांचा अभ्यास करणे.

**गृहीतकृते :**

1)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक विचार मांडले आहेत.

2)डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती व शेतमजूर आणि कामगार विषयक विचार मांडले आहेत.

3)डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्योग,राजस्व ,चलनविषयक विचार मांडले आहेत.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्रामुख्याने दुतिय्य साधनसामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशनातर्फे प्रकाशित ग्रंथ,संदर्भ ग्रंथ,मासिके ,साप्ताहिके ,वर्तमानपत्रे ,वेबसाइट इत्यादीचा आधार घेण्यात आला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार** :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक कीर्तीचे एक व्यासंगी अर्थशास्त्रज्ञ होते.त्यांच्या आर्थिक विचारांचे योगदान त्यांच्या एम.एम, एस.सी, डी.एस सी ,बॅरिस्टर ऍट लॉ शिक्षणिक कारकिर्दीत केलेल्या लिखाणातून व सामाजिक आणि राजकीय जीवनकार्यात केलेल्या भाषणातून व कार्यातून दिसून येतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा आढावा पुढील प्रमाणे घेण्यात आला आहे.

**शेतीविषयक विचार:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कृषीविषयक विचार आपल्या लेखात मांडले. त्यांनी सन १९१८ मध्ये 'Small Holding in India and their Remedies' हा लेख "The Journal of Indian Economics Society' मध्ये प्रकाशित केला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते कृषी एक महान राष्ट्रीय उद्योग आहे. प्राथमिक उद्योगात कृषी महत्त्वाचा उद्योग आहे. या शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करणारा घटक म्हणजे धारणक्षेत्राचा आकार. त्याबाबत त्यांनी अभ्यास केला. याबाबत उपाययोजनेत ते कृषी धारणक्षेत्राचे एकत्रीकरण व विस्तार हे उपाय सुचवतात. कृषी धारणक्षेत्र नुसती लहानच नाही तर विखुरलेली आहेत. त्यामुळे लहान धारणक्षेत्र व अपखंडन हे शेतीचे मोठे प्रश्न आहेत. यासाठी आंबेडकरांच्या मते कृषीच्या एकत्रित धारणक्षेत्रे ही विस्तारित धारणक्षेत्रेसुद्धा असायला हवीत. छोटी आणि विखुरलेली धारणक्षेत्रे ही मुख्य समस्या आहे. त्यामुळे केवळ एकत्रीकरण करणे पुरेसे नाही तर त्याचा आकार वाढवून त्यांना किफायतशीर करणे सुद्धा महत्त्वाचे आहे. क्षेत्राचे दुष्परिणाम मात्र दूर होणार नाहीत. त्यासाठी क्षेत्राचा विस्तार करून पुन्हा तुकडीकरण होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. हिंदू व मुस्लिम वारसा हक्कामुहे शेतीचे तुकडीकरण होणार असेल तर त्याला कोर्टाने परवानगी नाकारावी. यासाठी कायद्यात बदल करावा असे सुचविले. डॉ. आंबेडकरांच्या मते शेतीचे किफायतशीर व अकिफायतशीर ही वर्गवारी आकारावरून न ठरता ती शेतीच्या उत्पादकतेवरून ठरते. यासाठी शेतीच्या किफायती ठरण्यासाठी शेतीत भांडवल व साधनांची उपलब्धता वाढवावी हे महत्त्वाचे आहे.

**उद्योगासंबधी विचार :**

आर्थिक विकासामध्ये कृषी क्षेत्राला जेवढे महत्त्व आहे तेवढेच उद्योग क्षेत्राचेही आहे. क्षेतीवरील लोकसंख्येचा वाढता ताण कमी करण्यासाठी औद्योगीकरणा शिवाय पर्याय नाही असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडले. परंतु औद्योगिकरणातून आर्थिक व सांपत्तीक विषमता, संपत्तीचे केद्रीकरण व मक्तेदारी यात वाढ होऊ नये असे त्यांना वाटत होते. त्यांचा सरकारच्या मालकीच्या उद्योगाला विरोध नव्हता. काही मूलभूत स्वरूपाचे उद्योग सरकारनेच

चालवावेत त्यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा. उद्योग चालवण्यासाठी महामंडळे निर्माण करावी. विमा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण व्हावे असे त्यांचे मत होते. उद्योगधंद्याच्या वाढीसाठी उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण आवश्यक आहे. मात्र त्यासाठी निश्चित योजना असाव्यात म्हणून बाबासाहेबांनी आयुर्विमा व मोटार वाहतुकीच्या राष्ट्रीयकरणावर विशेष भर दिला. उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणामुळे औद्योगिकरणाचा वेग वाढेल. आंबेडकरांच्या मते यंत्रे व यंत्रामुळे झालेल्या आधुनिक संस्कृतीचा मर्यादित लोकांना फायदा होतो. म्हणून यंत्राला व यंत्रामुळे निर्माण झालेल्या आधुनिक संस्कृतीला विरोध करणे योग्य नाही तर या यंत्राचा व आधुनिक संस्कृतीचा फायदा सर्व स्तरातील लोकांना कसा होईल याकडे लक्ष द्यावे. तरच उद्योगाचा विकास आणि देशाचा विकास होईल.

**आर्थिक विकास:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक विकासात शेतमजुरांचा प्रश्न, कृषिविकास, जमीनधारणा कायदा, शिक्षण, औद्योगिकीकरण, सरकारची भूमिका, बेकारी अशा विविध घटकांवर प्रकाश टाकला. जनतेचा आर्थिक विकास झाला, तरच त्यांचा सर्वांगीण विकास घडून येईल हे त्यांना माहीत होते. म्हणून त्यांनी आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न केले. वरिष्ठ वर्गाकडून कनिष्ठ वर्गाचे होणारे शोषण हे त्यांना मान्य नव्हते. या शोषणाला त्यांचा प्रचंड विरोध होता. भारतातील जातिव्यवस्था आर्थिक विकास आणि आर्थिक वृद्धीला अडथळा ठरणारी आहे. भारतीय जातिव्यवस्थेत व्यवसायातील कौशल्य स्वत:च्या जातीतील लोकांशिवाय इतरांपर्यंत जाणार नाही याची काळजी घेतली जाते. आर्थिक विकास हा समताधिष्ठित व्हावा.अशा प्रकारे त्यांनी आर्थिक विकासाबाबत आपले विचार मांडले.

**डॉ.बाबासाहेबांचे चलनविषयक विचार** :

'रुपयाची समस्या : उगम आणि उकल' हा प्रबंध आणि Royal Commission on Indian Currency and Finance यांच्यासमोर सादर केलेले पुरावे आणि विधाने यावरून त्यांच्या चलनविषयक विचारांचे भव्य दर्शन होते. हे विचार मांडत असताना त्यांनी १८०० ते १९२० या कालखंडातील चलनविषयक वास्तवतेचा अभ्यास केला. महान अर्थतज्ञ लॉर्ड किन्सच्या विचारावर बाबासाहेबांनी घणाघाती टीकेचे प्रहार करून त्यांच्या आर्थिक ज्ञानाची चुणूक दाखविली. त्यांनी सुवर्ण परिमाणाच्या सुधारित पद्धतीचा अवलंब करावा असे स्पष्ट केले. तसेच स्थिर चलन परिमाण पद्धतीचा त्यांनी आग्रह केला. अर्थशास्त्राच्या स्वरूपाबाबत ते म्हणतात की, अर्थशास्त्रात केवळ संपत्तीचा व आर्थिक संबंधाचाच विचार केला जात नसून त्यात कल्याणाचा विचार झाला पाहिजे. अशा पद्धतीने त्यांनी चलनविषयक विचार मांडून आपली दूरदृष्टी दाखवून दिली.

डॉ. आंबेडकरांनी भारतीय चलन रुपया आणि पौंड यांच्या विनिमयाबाबत सखोल अभ्यास केला. त्यांच्या मतानुसार भारतीय सुवर्ण विनिमयप्रमाणाच्या शास्त्रीय आधाराने विश्लेषण करण्याचा प्रयत्न प्रो. केन्स शिवाय अन्य व्यक्तींनी केला नाही. विनिमय प्रमाणाच्या समर्थनासाठी केन्स यांनी मांडलेल्या प्रत्येक मुद्द्याबाबत डॉ. आंबेडकरांना शंका होती. कारण केन्स यांनी आपल्या विश्लेषणात एका मूलभूत बाबीकडे दुर्लक्ष केले होते. ती म्हणजे जोपर्यंत रुपयाच्या सामान्य क्रयशक्तीत स्थिरता येत नाही तोपर्यंत हे चलन स्थिर होणे शक्य नाही. यासाठी उपाययोजना कोणती असावी याबाबत मतभेद होते. डॉ. आंबेडकरांच्या मते निर्गमनाची निश्चित मर्यादा असलेला अपरिवर्तनीय रुपया हाच स्थिर असू शकतो यावर त्यांनी भर दिला. रुपया आणि पौंडाचा संबंध भारतावर भार टाकणारा तर ब्रिटिशांच्या फायद्याचा होता. या प्रश्नांच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी अशी भूमिका घेतली की सुवर्ण हे मूल्य प्रमाण असावे व चलनाच्या पुरवठ्याची लवचिकता याच स्रोतातून यायला हवी. सुवर्णाच्या आधारामुळे चलनाच्या पुरवठ्याचा विस्तार आणि संकोच सुलभतेने होईल.

**केंद्र-राज्य संबंध :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रदीर्घ कालखंडाचा अभ्यास करून आपली मते बनविली होती. राज्य सरकार खर्चाचे अंदाजपत्रक तयार करीत असत. त्यासाठी लागणाऱ्या पैशाची जुळवाजुळव करण्याची जबाबदारी केंद्र सरकारवर असल्यामुळे राज्य सरकारच्या खर्चावर नियंत्रण करणे कठीण आहे. राज्य सरकारने स्वत:चे उत्पन्न आणि खर्च याचा समतोल साधावा असा नियम १८७१ पासून लागू करण्यात आला. बाबासाहेबांनी नवीन नियमांच्या बदलाचा परिणाम विशद केला. या पद्धतीमुळे कराचा बोजा वाढला आणि न्याय त्यात राहिली नाही, हे त्यांनी ठामपणे सांगितले. भारत सरकारने आयकर रद्द केला. ही तरतूद बराच काळापर्यंत अस्तित्वात होती. राज्यांना मिळणाऱ्या उत्पन्नाच्या स्त्रोत आटला. राज्य सरकारला वाढते खर्च भागविण्यासाठी अगोदरच कराखाली दबलेल्या लोकांवर अर्थात जमीन मालकांवर कराचा बोजा अधिक लादून जमा आणि खर्चाचा ताळमेळ लावणे भाग पाडले.

**नियोजनाचा पुरस्कार :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना नियोजनाद्वारे देशाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास हवा होता. रशियाने १९२७ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना तयार करून नियोजनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला प्राधान्य दिले. १९२९ मध्ये जगात प्रचंड महामंदीची लाट आली होती. तिची सुरूवात अमेरिकेत झाली व त्याचे संपूर्ण लोण जगात पसरले. परंतु रशियासारख्या देशावर या महामंदीचा काहीच परीणाम झाला नाही. सर्व जगाचे लक्ष रशियावर गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात आर्थिक नियोजन सुरू करण्याच्या आवश्यकतेचे १९३५ मध्ये प्रतिपादन केले. पुढे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक नियोजनाचा मार्ग स्वीकारला. १९५१ पासून पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून आर्थिक विकासाला सुरुवात केली. गेल्या अनेक वर्षाच्या नियोजनाच्या काळात भारताने आर्थिक क्षेत्रात जी भरीव प्रगती केली आहे त्याचे श्रेय आर्थिक नियोजनाला तर जातेच; पण त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान विसरता येणार नाही. ईस्ट इंडिया कंपनीने भारताचे कशा प्रकारे आर्थिक शोषण केले हे उत्तम प्रकारे त्यांनी आपल्या शोधनिबंधात दाखवून दिले. ते म्हणतात, ८०% भारतीयांच्या राहणीमानाचा दर्जा ब्रिटिशांनी खाली आणला. रूपये १२२.२४ लक्ष नफ्याद्वारे मिळविले आणि लाभांशरूपाने भारताबाहेर पाठविले. त्यामुळे देशाची आर्थिक घडी मोडकळीस आली. तसेच बाबासाहेब आंबेडकरांनी 'प्राचीन भारतातील व्यापार' या संशोधनाद्वारे असे सांगितले की, ईस्ट इंडिया कंपनीने केलेले शोषण आणि आज बहुराष्ट्रीय कंपन्या करीत असलेले शोषण सारखेच आहे असे सांगता येईल. थोडक्यात बाबासाहेबांनी देशहितासाठी ब्रिटिशांना व त्यांच्या देशघातकी कार्याला कधीही मान्यता दिली नाही. तर वेळोवेळी प्रखर विरोधच केला.

**राजस्व संबंधी विचार :**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी 1925 मध्ये प्रादेशिक वित्त हा ग्रंथ प्रकाशित केला या ग्रंथामध्ये त्यांनी राजस्वासबंधीचे विचार मांडले आहेत.1833 ते 1921 च्या कालावधीत भारतीय वित्त व्यवस्थेचा विकास कसा होत गेला याची माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली आहे.या काळामध्ये राजस्व चे संपूर्ण केंद्रीकरण झाले होते. कायद्यानुसार तत्कालीन व्यवस्थेमध्ये अर्थव्यवस्थेच्या विस्तारासाठी व विकासासाठी अनेक समस्या, दोष आहेत. हे आंबेडकरांनी दाखवून दिले.आशा व्यवस्थित सर्वांचा अर्थसंकल्प तयार करण्याचा अधिकार केवळ घटकराज्यांना होता.तर त्यासाठी लागणारा पैसा उभा करण्याची जबाबदारी मात्र केंद्र सरकारची होती.म्हणून घटक राज्यांची पैशाची मागणी वाढत गेली व ती पूर्ण करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची होती.परंतु घटक राज्यांची वित्त विषयक मागणी योग्य की अयोग्य हे ठरविण्याचा अधिकार केंद्र सरकारला नव्हता.म्हणून कधीकधी अयोग्य मागण्या देखील मंजूर करावी लागत असे , त्याचा परिणाम म्हणून केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट वाढत होती. म्हणून 1971 पासून केंद्र सरकार व घटक राज्यांसाठी वेगवेगळे अर्थसंकल्प तयार करण्याची पद्धत प्रथमच सुरू करण्यात आली.

**समारोप :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, लोकशाही समर्थक, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे एक प्रमुख प्रणेते आणि मानवी स्वातंत्र्याचे महान कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनकार्य अलौकिक, अनन्यसाधारण आहे.त्यांनी समाजशास्त्र, राज्यशास्त्र, कायदा, अर्थशास्त्र इत्यादी अनेक विषयांवर आपला ठसा उमटवला. त्यांच्या मते, "स्वाभिमान हा संघर्षाला जन्म देतो." म्हणून मानवाने स्वाभिमान बाळगला पाहिजे असे ते म्हणत. लोकशाहीवर त्यांची अपार श्रद्धा होती. त्यांचे जीवनचरित्र म्हणजे मानवी स्वातंत्र्याच्या इतिहासाचे एक सोनेरी पानच आहे. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, शिक्षण, राज्यघटना अशा विविध विषयांवर डॉ. आंबेडकर यांनी केलेले मूलगामी चिंतन, विश्लेषण आणि कार्य हे भारतीय जनतेला प्रेरक, पूरक आणि मार्गदर्शक ठरलेले आहे. कारण आंबेडकर हे एक चतुरस्त्र, विद्वान, व्यासंगी वक्ते आणि ज्ञानयोगी पंडित होते. त्यांनी जन्भर विद्याव्यासंग करून विचारधन मिळवले आणि निष्कलंक चारित्र्य प्राप्त केले.भारतामध्ये समतेवर आधारीत अर्थव्यवस्था,समाजव्यावस्था स्थापन व्हावी असे त्यांना वाटत होते.त्यांनी रज्य समाजवादाचा पुरस्कार केला.समाजवादाचा पुरस्कार करताना लोकशाही मूल्याचा बळी जाऊ नये असे त्यांना वाटत होते.शेतकरी,श्रमिक,जलसंवर्धन,व्यापार,उद्योग,राजस्व आदी.अर्थशास्त्रीय त्यांनी मांडलेले विचार आजही उपयुक्त ठरतात.

नोबेल पारितोवषीक विजेते प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ.अमर्त्य सेन म्हणता "अर्थशास्त्रात आंबेडकर हा माझा बाप आहे. विशेषाधिकार नसलेल्यांचा खरा नामांकित कैवारी आहे. त्यांनी जे मिळवले त्यापेक्षा जास्त योग्यतेचे ते हक्कदार आहेत.स्वतःच्या देशात जरी ते सर्वात वादग्रस्त ठरले असले तरी वास्तवता मात्र तशी नव्हती. त्यांचे अर्थशास्त्रातील योगदान अद्भूत असून त्यासाठी ते चिरंतन काल स्मरणात राहातील" यावरून अर्थशास्त्रातील त्यांच्या योग्यतेची यथार्थतेची पदार्थाची रास्त जाणीव स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ सूची** :

1)धनंजय कीर- डॉ बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन- 2006, मुंबई.

2)स.मा.गर्गे( संपा) भारतीय समाजविज्ञान कोश ,खंड 5 ,मेहता पब्लिकेशन हाऊस ,पुणे- डिसें.2007

3)रावसाहेब कसबे आंबेडकरवाद तत्त्व आणि व्यवहार सुगावा प्रकाशन पुणे.

4)डॉ. नरेंद्र जाधव -डॉ आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्त्वज्ञान- 1992.

5)डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई .

6)डॉ. आंबेडकर बाबासाहेब लेखन व भाषण खंड 18, भाग-3, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई- 2004.

7)डॉ.नरेंद्र जाधव- डॉ.बाबासाहेब आंबेडकर आर्थिक विचार आणि व्यवहार,सुगावा प्रकाशन, पुणे.

8) दहाट धनंजय- डॉ.आंबेडकरांची भाषणे आणि विचार, संकेत प्रकाशन, नागपूर.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# महात्मा ज्योतिबा फुले यांचा शेतकरी विषयक दृष्टीकोन

**प्रा. डॉ. महावीर गायकवाड**
इतिहास विभाग, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, कळंब
gaikwadmahavir1983@gmail.com

**प्रस्तावना:-**

19 व्या शतकात महाराष्ट्रातील बहुजन समाज अज्ञान वअंधकारातच होता. समाजात अंधश्रध्दा अस्पृश्यता,सामाजिक विषमता या वेगवेगळया चालिरिती शिगेस पोहचल्या होत्या. अशा या समाजाला शिक्षित बनवून अंधकारातून बाहेर काढण्याचे महान क्रांतीकार्य ज्योतिबा फुल्यांनी केले. म्हणून त्यांना 'समाज क्रांतीचे' जनक म्हणतात. गोविंदराव फुले व चिमणाबाई या मातापित्याच्या पोटी 11 एप्रिल 1827 रोजी ज्योतिराव फुल्यांचा जन्म् झाला. ते एक बंडखोर विचारांचे सुधारक होते. सामान्य् जनतेच्या दु:खाला त्यांनी वाचा फोडली. त्यामुळेच त्यांना 'महाराष्ट्राचे मार्टिन ल्युथर किंग' म्हणून ओळखतात. राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या विषयी म्हटले होते की, बहुजन समाजाला अज्ञानातून वर काढून त्यांना अर्वाचीन काळी जागविणारे या देशातील पहिले महापुरुष ज्योतीराव फुले होते.

**उद्दिष्टये :-**

1) महात्मा फुले यांनी उभी केलेली शेतकरी चळवळ अभ्यासणे.

2) महात्मा फुले यांच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांच्या मागासलेपणाचे कारणे शोधणे.

**गृहितके :-**

1) महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांच्या परिस्थितीचा केलेला अभ्यास करणे.

2) सरकारने शेतकऱ्यासाठी कोणकोणत्या प्रकारच्या सोई सुविधा पुरवल्या पाहिजेत त्या अभ्यासणे.

'भारतीय शेतकऱ्यांचे खरे कैवारी' या शब्दांत महात्मा फुल्यांचे वर्णन करणे उचित ठरेल. भारतीय समाजाला व ब्रिटिश सरकारला शेतकऱ्याच्या हालाखीच्या परिस्थितीचे विदारक दर्शन घडवून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य फुल्यांनीच केले. आपल्या 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथातून भारतीय शेतकऱ्यांच दु:खे वेशीवर टांगली. उच्चवर्णीय लोक, सरकारी अधिकारी शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात, हे त्यांनी जगाला दाखवून दिले. शेतकऱ्यांच्या दु:ख व दारिद्रयाचे मुळे हे त्याच्या अज्ञानात आहे, असे ते स्पष्ट करतात. भारतीय राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) नेत्यांनाही त्यांनी स्पष्ट शब्दात बजावले होते की, जोपर्यंत राष्ट्रीय सभा शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व् करीत नाही तोपर्यंत ती राष्ट्रीय सभा या नावाला मुळीच पात्र नाही.

सरकारी सर्व खात्यामध्ये ब्राम्हण् कामगारांचे प्राबल्य् असल्यामुळे त्यांचे स्वजातीय स्वार्थी भटब्राम्हण् आपल्या मतलबी धर्माचे निषान अज्ञानी शेतकऱ्यास इतके नडवितात की, त्यांना आपली लहान- लहान मुले शाळेत पाठविण्याची साधने सुध्दा राहात नाहीत. पुर्वीच्या धुर्त भटब्राम्हणांनी ग्रंथामध्ये आपले मतलबी धर्माचे पाखंड शेतकऱ्याचे मागे इतके सफाई लावले की, शेतकरी जन्मास येण्यापुर्वीच त्याचे आईस ज्या वेळेस ऋतु प्राप्त् होतो, तेव्हाच तिच्या गर्भधारनेच्या संस्कारापासून ते मरेपर्यत कित्येक गोष्टींनी लुटला जातो.(1) एवढेच नाही तर त्यांच्या मृत्यूनंतर सुध्दा त्यांच्या मुलास श्राध्द् वगैरेच्या मिषाने धर्माचे ओझे सोसावे लागते.

ब्राम्हण् लोक आपल्या संस्कृत विद्यालयात (शाळेत) शुद्र शेतकऱ्यांचे मुलास घेत नाहीत परंतु ते आपल्या प्राकृत मराठी शाळेत कामापुरते शुद्र शेतकऱ्यांचे मुले घेतात व त्यांच्यापासुन दरमहाचे पगाराशिवाय प्रत्येक पौर्णिमेस व अमावस्येस कित्येक सणास शिधा, दक्षिणा घेतात. त्याबदल्यात मुळाक्षर, अंक गणित, मोडी कागद वाचन, पुराणवाचन, प्राकृतश्लोक, भुपाळ्या शिकवुन त्यास कलगी अथवा तुऱ्याच्या लावण्या शिकवून झगडे घालण्यापुरते विद्वान करुन सोडतात. त्या विद्यार्थ्यास आपल्या घरातील हिशोबाची टाचणे ठेवण्यापुरतेदेखील ज्ञान देत नाहीत. या देशातील शेतकरी जोपर्यंत शिकून शहाणा होत नाही, आधुनिक पध्दतीने शेती करत नाही, तोपर्यंत आपल्या देशाची आर्थिक सुधारणा होणे शक्य् नाही.

हिंदू धर्मातील चैत्रमासी वर्षाप्रतिपदेस येणाऱ्या गुढीपाडव्यापासून ते फाल्गुनमासी होळीपुजा पर्यंत विविध सणामध्ये शेकऱ्याकडून अमाप असे दक्षिणा व शिधा गोळा करण्याचे काम ब्राम्हणमंडळी करित असे.प्रतिवर्षी येणाऱ्या सणाशिवाय अधुनमधून चंद्रग्रहण, सुर्यग्रहण व गृहांचे उलटापालटीचे संबंधाने ब्राम्हणलोक नानाप्रकारची दाने घेऊन , त्यांच्या मनावर हिंदूधर्माचे मजबुत वजन बसवून त्यांनी नि:संग होऊन आपल्या नादी लागावे म्हणून, श्रीमंत शेतकऱ्यांच्या घरोघरी रात्री ब्राम्हणलोक पांडवप्रताप वगैरे पुराणांची पारायणे करुन त्या शेतकऱ्यांच्या द्रव्यावर घाला घालत. सरकारी अधिकारी हे ऐषआरामतात गुंग असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांचे वास्तविक स्थितीबद्दल माहिती करुन घेण्यापुरती सवड होत नाही. त्यांच्या गाफीलपणाने सरकारी खात्यांत ब्राम्हणांचे प्राबल्य् वाढत आहे.

'शेतकरी सुखी तर देश सुखी' 'शेतकरी वाचला तर देश वाचला' असे महात्मा फुले यांचे मत होते. घरातील लग्नकार्यासाठी, चैन, दारु पिण्यासाठी, नाचगाण्यासाठी शेती विकून, सावकारी कर्ज काढून खर्च करु नका, स्वत: शेतीत भरपूर कष्ट् करा मुलांना शाळेत पाठवा असा उपदेश ते शेतकऱ्यांना करत.[2] शेतीची सुधारणा व्हावी यासाठी ते काही उपाय योजना 'शेतकऱ्याचा आसुड' या ग्रंथात मांडलेल्या आहेत. शेतकऱ्यांने चांगल्या प्रकारचे बी बियाणे, किटकनाशके, रासायनिक खते सरकारने अल्पदरात उपलब्ध् करुन द्यावीत त्याचबरोबर नदी –नाल्यांचे पाणी वाया जाऊ नये म्हणून जागोजागी बंधारे बांधावेत, चांगल्या जातीच्या गाई – बैलाची पैदास करण्यात यावी. इंग्रज सरकारने एकंदर सर्व शेतकऱ्यास युरोपियन शेतकऱ्यांसारखे विद्याज्ञान देऊन, त्यांना आधुनिक यंत्राद्वारे शेती कसण्यास शिकवावे. इतर देशातील नानाप्रकारच्या उत्तम् उत्त्म शेळया-मेंढरांची बेणी खरेदी करुन भारतात त्यांची उत्पत्ती तयार करावीत, जंगली रानटी जनावरांपासून शेतकऱ्यांच्या शेताचा बंदोबस्त् करण्यासाठी गावठी बंदूका सरकारने शेतकऱ्यास द्याव्यात. शेतकऱ्यांच्या मुलास शेतकीसंबंधी ग्रंथ अथवा नेटिव्ह् वर्तमानपत्रातील सुचनासुध्दा वाचविण्यापुरते ज्ञान द्यावे.नदी व तलावामधील साचलेला गाळ शेतकऱ्यांना मोफत नेऊ द्यावा. सरकारी खर्चाने बाहेरील देशातील शेतकी शाळा पाहण्यासाठी शेतकरी वर्गातील मुलांना पाठवावे.[3] ज्या गावची गायराणन जमीन सरकाने जंगल खात्याकडे वर्ग केली आहे. ती जमीन त्या गावास परत द्यावी. शेतकऱ्यांच्या हितासाठी ब्रिटिश सरकारने काही कायदे करुन शेतकरी वर्गामध्ये बदल घडवून आणावा असे महात्मा फुलेंना वाटत असे. त्यासाठी शेतकऱ्यांनी एकापेक्षा जास्त् बायका करु नयेत, आपल्या मुलामुलींचे बालविवाह करु नयेत यासाठी सरकारने कायदाच करावा. गावची पाटीलकी देण्यासाठी 6 वी पास ही अट ठेवावी, दारुड्या पाटलावर नजर ठेवावी. शेतकऱ्यांच्या मुलास अन्न्, वस्त्र , पुस्तके पुरवून त्याच्यासाठी बोर्डिंग शाळा काढाव्यात व सर्व लोकल फंड शेतकऱ्यांच्या मुलास शिक्षा देण्यासाठी खर्च करावा. शेतकऱ्यावरील करांचे ओझे कमी करावे सरकारने पाटील व कुलकर्णी यांच्या कामाची परीक्षा घ्यावी व ते काम एकाच जातीकडे सोपवू नये. दरवर्षी प्रदर्शने भरवून शेतपिकांच्या व औते हाकण्याच्या परीक्षा घेऊन उत्त्म शेतकऱ्यास बक्षिसे देण्याची पध्दत् सुरु करावी.

प्रस्तुत शोधनिबंधावरुन असे लक्षात येते की, महात्मा फुले हे फक्त् बोलके सुधारक नसून स्वत: कर्ते सुधारक होते. वेळप्रसंगी त्यांनी इंग्रज सरकारला सुध्दा जाब विचारले आहे. भारतीय समाजाला अज्ञानातून बाहेर काढून

त्यांना शिक्षण देऊन त्यांच्यामध्ये सामाजिक व आर्थिक सुधारणा घडवून आणल्या. त्याचाच वारसा पुढे राजर्षी शाहू महाराजानी चालवला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना आपले गुरु मानले. अशा या महान समाजसुधारकांचा 28 नोव्हेंबर 1890 रोजी पुणे येथे मृत्यु झाला.

**निष्कर्ष:-**

**1)** महात्मा फुले यांनी भारतीय शेतकरी वर्गाचा अभ्यास करुन त्यांच्यात इंग्रज सरकारच्या प्रयत्नातून सुधारणा घडवून आणल्या.

**2)** महात्मा फुले यांनी कोणत्याही विशिष्ट जातीला विरोध न करता त्या जातीच्या प्रवृत्तीला विरोध केला.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) डॉ. प्रतिभा अहिरे, “समग्रवाडमय” महात्मा फुले, प्रकाशन वैजनाथ वाघमारे प्रथमावृत्ती 28 नोव्हें 2013

2) डॉ. किशोर कुमार गव्हाणे / डॉ. एस.पी. शिंदे, “महाराष्ट्रातील समाज सुधारनेचा इतिहास”, प्रकाशक एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड् डिस्टिबुटर्स, औरंगाबाद आवृत्ती 2014

3) डॉ. एस.एस. गाठाळ, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, प्रकाशक, के. एस. अतकरे, कैलास पब्लिकेशन, तृत्तीय आवृत्ती 2013

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे कृषीसंबंधी विचार तथा धोरण.

**श्री. शरद बाबुलाल खंडारे**
मु. पोस्ट. सिरसो, जिल्हा. अकोला
sharadkhandarejnv@gmail.com

**प्रस्तावना :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेती सुधारणे विषयी जे विचार मांडले त्याच्या आधारे आज देशातील शेतीसमोरील ज्या समस्या आहेत जसेकि, शेतक–यांच्या आत्महत्या, त्यांचा कर्जबाजारीपणा, शेतमालाच्या किंमतीना असलेले अस्थैर्य, जमीन धारणा क्षेत्रामधील विषमता, वाढती महागाई, शेतीक्षेत्रामध्ये वाढत चाललेली विविध प्रकारची बेकारी, भांडवलाची समस्या, आर्थिक व सामाजिक समस्या इ. समस्यांची सोडवणूक करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेल्या सहकारी व सामुदायिक शेती किंवा शेतीचे राष्ट्रीयकरण झाले तर शेतीसमोरील समस्या सोडविणे शक्य होईल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असणारी समताधिष्टीत समाजरचना निर्माण होण्यास मोलाची भूमिका पार पडणार. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक सर्वागी प्रगल्भ असामान्य बुध्दीवंत तसेच असामान्य विचारवंत, तत्वचिंतक होते. त्यांनी राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योग, शेती अशा आर्थिक घटकावर अतिशय प्रगल्भपणे आपले विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या विचारांपैकी शेतीविषयक विचारांचा आढावा थोडक्यात घेण्यात आला आहे त्यांच्या याच विचारातून स्वातत्र्यानंतर अनेक सुधारना घडून आल्या आहेत. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या आर्थिक नियोजन आर्थिक विकासात्मक धोरणाचेही शिल्पकार होते.

शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी बाबतचे विचार राज्यकर्ते, नियोजनकार व शेतीज्ञानाच्या तज्ञांनी अभ्यासने हे आजच्या काळाची गरज आहे. दुर्दैवाने उनेकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शेतक–यांचे ख–या अर्थाने कैवारी देखिल आहेत हेच माहिती नाही. त्यांच्या विचारांच्या उर्पक्षेतून शासनकर्त्यांची उदासीनता प्रकर्षाने दिसते. या पार्श्वभूमिवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृषी विषयक सुचनांची अमलबजावणी केली तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तण घडेल यात शंका नाही. राज्यात होत असलेल्या शेतक–यांच्या आत्महत्या, शेती क्षेत्रापुढील प्रश्न याचा विचार केला तर आजच्या राज्यकर्त्यापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आदर्श आधारस्तंभ म्हणून उभे आहेत.

भारत हा कृषीनिष्ठ, कृषीजीवी आणि कृषीनिर्मित देश आहे, आजच्या परिस्थिती मध्ये भारताचे कृषीक्षेत्र अनेक पातळयांवर झगडतांना दिसत आहे. कारणमिमांसा विचार केल्यास आर्थिक विकासात शेतीक्षेत्राचे योगदान, त्याचे महत्व, कृषी क्षेत्राला पतपुरवठयाची साधने, वातावरणाचे बदलते स्वरूप, शेतक–याच्या मालाला योग्य दर यावर नेहमी देशव्यापी चर्चा झाल्या. परंतू आजही शेती व शेतकरी यांच्या समस्यात फारशी काही सुधारणा झाली नाही. आपला भारत देश हा कृषीप्रधान देश जवळपास ८० लोक शेतीवर आपली उपजिविका भागवितात. अगदी आताच्या काळात तर शेतीसारख्या महत्वपूर्ण तसेच जिव्हाळयाच्या विषयाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. तसेच दिवसेंदिवस पर्यावरणाचा समतोल बिघडत चालल्याने देशातील पाणी आणि शेतीचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे. त्यामुळे शेती क्षेत्र हे अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे, आणि म्हणूनच आधूनिक काळात निर्माण झालेल्या समस्यांवर उपाय योजना करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती क्रांतीचे विचारच शेतीक्षेत्राला तारू शकतात. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत हे सर्वपरिचीत आहेच पण ते एक कृषीतज्ञ देखील होते हे आजपावेतो जनतेसामोरे आलेले नाही म्हणून त्यांचा शेतीविशयक दृष्टीकोण सर्व जनतेपूढे यावा किंवा तो आणला जावा हेदेखील समजून घेने काळाची गरज आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या परीवर्तनासाठी केलेले योगदान अत्यंत महत्वाचे आहे. त्यांचे शेतीक्षेत्राच्या सुधारणे संबंधी विचार क्रांतीकारी स्वरूपाचे असून आजच्या जागतिकीकरणाच्या काळात देखिल त्यांचे विचार आर्थिक विचारवंतांना तसेच राज्यकर्त्याना, व नियोजनकार आणि शेत–यांसाठी दिपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरतात. परंतू आजच्या बदललेल्या अर्थकारणाच्या कसोटीवर ते कसे उपयोगी ठरतील यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवा.

प्रस्तूत शोध निबंध हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतीविशयक आर्थिक विचारांचा व विशेषत: त्यांनी आपल्या लेखनीमधून मांडलेल्या शेतीविषयक विविध विचारांचा आढावा घेण्याचा एक प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पध्दती.** हा शोधनिबंध पुर्ण करण्यासाठी प्राथमिक आणि दुयम साधनांचा वापर केला आहे. ज्यामध्ये संसेधेमधील भाषणे, त्यांची ग्रंथसंपदा, साप्ताहिके, मासिके, वर्तमान पत्रांमधिल लेख तसेच तत्सम पध्दतींचा आधार घेवून हा प्रबंध पूर्ण करन्यासाठी ऐतिहासीक, तूलनात्मक, विश्लेषनाचा वापर केलेला आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचारांची आजच्या परिस्थिती मधे आवश्यकता.**

शेती विभागणीमुळे ओढावलेल्या समस्या आणि त्यावरील उपाय :– सन. १९१८ मध्ये वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील शेतीक्षेत्रासमोरील समस्यांचे अगदी सखोल विश्लेषण 'स्मॉल होल्डींग्ज इन इंडिया ॲण्ड देअर रेमिडिज' या शोधनिबंधात केले यात त्यांनी भारतात जास्त लोकसंख्या वाढत असल्यामुळे पुढे चालून याचा परिणाम म्हणून शेतीचे होणारे विभाजन व तूकडे तसेच त्यामुळे उभे राहणारे प्रश्न याची चर्चा केली होती. यामुळे शेतीचे तुकडीकरण व विभाजन होउन एकूणच शेती धारण क्षेत्र लहान बनल्यामुळे जमिन मोठया प्रमाणात पडीक बनली आहे. याचाच परिणाम म्हणून आज भारतामध्ये बेरोजगारीचे प्रमाण तर वाढलेच पन अन्नधान्य उत्पादन सुध्दा कमी झाल्याचे दिसून येते. भारतीय शेतीच्या तुकडीकरणावर उपाय म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगीतले की, ते त्यांच्या म्हणण्यानुसार शेतक–यांनी आपली मुले शेतीवर अवलंबून न ठेवता त्यांना व्यापार, उद्योग व शिक्षण क्षेत्रात घातली पाहीजेत त्यामुळे शेतीवरील बोजा कमी होईल. असे झाले नाही तर शेतकरी संकटात सापडेल आणि त्याला जगणेही मुस्कील होईल. असा इशारा त्यांनी १०० वर्षा पूर्वी दिला होता म्हणून त्यांनी शेती विषयक उपस्थित केलेले प्रश्न त्याकाळामध्ये जेवढे मार्गदर्शक व उपयोगी होते त्यापेक्षा आज जास्तप्रमाणामध्ये उपयोगी आणि तीतकेच मार्गदर्शक आहेत असे म्हणने चूकीचे होणार नाही. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा द्रष्टेपणा दिसून येतो.

त्याचप्रमाणे ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करायचा असेल तर शेतीचे चित्र बदलले गेलेच पाहिजे याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी आग्रही होते. भारतीय शेतीची उत्पादकता किंवा त्यासंबंधी इतर देशांशी तुलणा करायची झाल्यास फ्रांन्स,

अमेरिकेच्या तूलनेमध्ये अगदिच नगन्य आहे. आणि म्हणूनच भारतीय शेतीचे उत्पादन वाढवण्याचा मार्ग हा जमिनीचे आकारमान वाढविने हा नसून उपलब्ध असलेल्या शेतजमीनीत मोठया प्रमाणात भांडवल, मनुष्यबळ व तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पन्न वाढविने हा आहे. शेतीच्या सलगीकरणासाठी तसेच उत्पादकता वाढविण्यासाठी सहकारी शेती हा सर्वोकृष्ठ पर्याय अथवा मार्ग आहे.तसेच शेतीक्षेत्रासाठी असणा—या प्रमुख लहान धारण क्षेत्र, प्रचंड लोकसंख्या, भांडवल व साधन सामुग्रीचा तुटवडा, बेकार श्रम, बेकार भांडवल या सर्वावर मात करण्याचा उपाय काय ? तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या प्रश्नाचे दिलेले संदिग्ध उत्तर म्हणजे औद्योगिकरण होय. त्यांच्या मते ओाद्योगिकरणाचे संचयी लाभ होतात. सर्वात महत्वाचा फायदा यामुळे शेतीक्षेत्रातील बेकार व अनावश्यक श्रम हे सर्व उत्पादक क्षेत्रात समावून घेतले जातात ते सर्व स्वत:च्या उपजिविकेसाठी उत्पादन करून राष्ट्राच्या उत्पादनात भर घालण्याचे काम करतील. परिणामी जमिनिचे तुकडे पडण्यास आळा बसेल, व शेवटी जमिनिवरील लोकसंख्येचा भार कमी होईल, आपोआपच धारणक्षेत्र मोठी करावी लागतील. अशा त—हेणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतातील शेती प्रश्न सोडविण्यासाठी सशक्त औद्योगिकरण हाच एक उपाय राहील.

**सार्वजनिक किंवा सामुदायीक शेती पध्दती :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शेतजमीनीच्या मालकी हक्क पध्दतीत जी काही गडबड झाली त्यामुळेच शेती ही मागासलेली राहीली आहे. म्हणून त्यांनी जमिनिच्या मालकीत बदल घडून आणण्यासाठी 'सार्वजनिक किंवा सामुदायीक शेतीचा' म्हणजेच शेतीचे राष्ट्रीयकरण करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. त्यासाठी शासनाने शेतजमीनी ताब्यात घेउन त्या विकसित कराव्या, अशा विकसीत शेतजमीनी हया भूमिहीन शेतमजूरांना काही अटीवर कसण्यासाठी द्याव्यात कारण त्यांना कुळ कायद्याचा काहिही फायदा होत नाही. केवळ सामुदायीक शेतीच त्यांना मदत करू शकते. कारण लोकशाही तत्वावर आधारलेली असते. तसेच या पध्दतीत उत्पादक्ता व कार्यक्षमता कायम राहूण ग्रामीण अर्थव्यवस्थेत परिवर्तण करणे शक्य होते. त्यामुळे होत असलेला सामाजिक अन्याय आणि सामाजिक दुरावा किंवा शोषण दूर होण्यास मदत होईल. उपलब्ध असलेल्या जमिनिचे वितरण हे सर्व भागात समान वर्गात व सर्व जाती धर्मात समान केले जाईल. शेतक—यांना शेती करण्यासाठी रासायनिक खते, बि—बियाणे, अवजारे आदीचा पुरवठा हा राज्यशासनाकडून केला जाईल तसेच या शेतीत उत्पादित होणारा माल हा काम करणा—या प्रत्येकाला समान वाटला जाईल. या पार्श्वभूमिवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतक—यांसाठी किती मोलाची आहे हे अधोरेखित होते. आणि म्हणून त्यांचे शेतीसंबंधी विचार आजही भारतीय अर्थव्यवस्थेला परिवर्तणाच्या वाटेवर घेवून जानारे आहेत. कारण आज भारताच्या ग्रामिण भागात जी आर्थिक विषमता आणि मोठया प्रमाणात दारिद्रय दिसून येतो किंवा शेतक—यांच्या ज्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत आहेत त्यावरील उपाय म्हणजेच शेती क्षेत्राचे सामुदायीकरण करणे होय.

**खोती पध्दतीवर तसेच सावकारी पध्दतीवर नियंत्रण विषयक विधेयक :—**

शेतक—याला अडचणीच्या काळात जे कर्ज घ्यावे लागल होते ते कर्ज गावांमध्ये असणारे सावकार अनियंत्रीतपणे व्याजदर आकारून शेतक—यांच्या कष्टाचा मोठा हिस्सा आपल्या पदरात पाडून घेत असत. त्यामुळे शेतकरी पुन्हा कंगालच राहत असत, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोकणातील शेतक—यांच्या समस्या आणि एकंदर देशातील शेतक—यांच्या समस्यांसंबंधी १९३७ मध्ये सावकारी नियंत्रण विधेयक विधान सभेत मांडून काही महत्वपूर्ण अशा उपाययोजना सुचविल्या त्यामध्ये

1. भारताच्या कोणत्याही प्रांतामध्ये सावकारी करणा—या सावकाराची रितसर नोंदणी करणे.
2. सावकारी व्यवसाय करण्यासाठी एक वर्ष मुदतीचे परवाने द्यावेत.
3. प्रत्येक वर्षी या परवान्याचे नुतनीकरण करणे बंधनकारक करावे.
4. सवकाराने गैरव्यवहार केल्यास त्याचा परवाना रद्द करावा.
5. लेखी व्यवहाराद्वारे धनकोने ऋणकोस या व्यवहाराच्या नोंदी असलेले खाते पुस्तीका द्याव्यात.

वरील तरतुदी करणारे विधेयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतका—यांच्या हितासाठी मांडले होते परंतु ते दूर्देवाने जसेच्या तसे स्विकारले नाही आणि म्हणुन आज शेतकरी हे सावकारी पाशाचे बळी ठरत आहेत. जर हे विधेयक स्विकारले असते तर शेतक—यांच्या कर्ज व्यवहारात नियमितता येउन शेतकरी शोषण मुक्तीच्या प्रश्नावर हा एक उपाय ठरला असता.

**जाचक खोती पध्दती नष्ट करण्यासंबंधी विधेयक :—**

शेतक—यांच्या शोषणाबाबत देखिल त्यांनी परखड असे विचार मांडले होते. शेतक—यांना शासनाकडून पुरेसे आर्थिक पाटबळ न मिळाल्यानेच त सावकाराचा आधार घेतात. त्यामध्ये ते अडकून पडतात व अंतापर्यंत त्यांची सुटका होत नाही. शेतीमध्ये असणा—या जाचक अशा 'खोती पध्दती' बद्दलही त्यांनी कडक शब्दात सुचविले होते. मुंबई इलाख्यातील काही भागात ही भु—धारणा पध्द्त प्रचलीत होती. या पध्दतीत शेतसारा गोळा करण्यासाठी शासनाने खोताची नियुक्ती केली होती. भात जमीनीतून होणा—या उत्पन्नाचा अर्धा भाग आणि वसकर जमिनीतील पिकाचा एक तृतीयांश भाग खोताने कुळाकडून वसूल करावा अशी ही पध्दत होती. याशिवाय शेतसारा गोळा करण्याचा मोबदला ही वसुल करण्याचा अधिकार त्यांना होता. म्हणजे शेतक—यांना एक प्रकारे त्रास देण्याचे काम खोतानी सुरू केले होते, कष्ट शेतक—याने करायची आणि खोतकरांनी ते फुकटचे खायचे हे त्यांना मान्य नव्हते या सावकारांना आणि खोतांना ते 'आयत्या बिळावरचे नागोबा' असे संबोधित असत. इतक्या मोजक्या आणि शेलक्या शब्दात त्यांनी खोतीव्यवस्थेचे वाभाडे काढले होते. सन १८६४ पासुन खोतांच्या हक्कांना आळा घालण्याचे प्रयत्न सरकारने चालविले होते. तरिसुध्दा या खोतांनी सर्व कायदे सर्व कायदे धाब्यावर बसवून ते बेजबाबदारपणे शेतक—यांचे शोषण करीत होते. एक प्रकारे त्यांची लूट करित होते, शेतक—यांना हे आता असाहृय झाले होते, त्या दोघांमध्ये संघर्षाची ठिणगी पडून मारामारी व खून सुध्दा होत असत. आणि म्हणून १८९३—९७ या कालावधीमध्ये शेतक—यांनी या खोतांविरूध्द आंदोलन उभे केले व ही खोत पध्दत नष्ट करण्याची मागणी जोर धरू लागली तेव्हाही खोती पध्दत नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दि. १७ सप्टेंबर १९३७ मध्ये एक विधेयक कायदेमंडळात मांडले. यामध्ये खोती पध्दतीने जमीनदाराच्या माध्यमातून शेतक—यांची होणारी पिळवणूक थांबवून शेतकरी हिताचे संरक्षण व्हावे या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे विधेयक मांडले होते. या विधेयकामुळे शासन व भु—धारक यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्तापित होणार होता. म्हणून शासनाला महसुल देणा—या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे. 'उत्तरदायित्व' या शब्दातून शासनाने शेतक—यांचे पोशिंदा म्हणून असलेले ऋण फेडावे असे त्यांना अपेक्षित होते. आणि सर्व शेतक—यांना व कुळांना संघटीत करून सरकारवर

शेतकरी हिताचे धोरण अवलंबविण्याचे तंत्र देखिल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उपयोगात आणले होते म्हणून डॉ. बाबासाहेबांनी खोती अंताचे विधेयक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात देशात करण्यात आलेल्या जमीन सुधारणा विषयक कायद्याची नांदी होय अशी आपल्याला कल्पना येईल.

**शेतक–यांचे शेतीविषयी व राज्यकर्त्यांच्या मानसिकतेमध्ये निर्माण होणारा बदल :–**

भारतासारख्या कृषीप्रधाण देशामध्ये शेती प्रश्नासंबंधी शेतकरी तसेच राज्यकर्ते यांची मानसिकता ही शेती हे केवळ एक उदरनिर्वाहाचे साधन आहे अशी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा या मानसिकतेलाच प्रकर्षाने विरोध हाता आणि म्हणून ते म्हणत असत की, शेती केवळ उपजिविकेचे साधन नसुन त एक राष्ट्रीय उत्पन्नाचे स्त्रोत आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा तसेच परिवर्तचा केंद्रबिंदू आहे शेतक–यांसह अनेक शेतमजूर, भुमिहीनांना रोजगार देण्याचे ते एक प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे शेतीकडे उद्योग म्हणून बघण्याचा दृष्टीकोण असला पाहिजे, याबाबत ते नेहमी आग्रही होते. शेतीचा सर्वांगीण विकास होवून शेतकरी आर्थिकद्रष्टया सक्षम झाला तर ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडेल. देशाची अर्थव्यवस्था ही मजबुत बनेल. रोजगाराच्या शोधासाठी होणारे एकुणच स्थलांतरे थांबली जातील इतक्या दूरद्रष्टीने व सखोलतेने त्यांनी शेतीकडे बघीतले होते व लोकांचे द्रष्टिकोन बदलण्याचा प्रयत्न केला होते.

**सामान्य दूर्बल घटकांच्या आर्थिक विकासकामाकरीता शेतजमिनिचे पुनर्वाटप :–**

भारताच्या जमिनधारनेचा प्रश्न दोन प्रकारचा आहे. एक भारतातील जमिन आकारणी संबंधातला आणि दुसरा जमीनीच्या मालकी बाबतचा. भारतातील जमीन धारना पध्दत केवळ आर्थिकद्रष्टया विचार करण्याची बाब नसुन ती सामाजिक द्रष्टयादेखील विचार करण्याची बाब आहे. समाजातिल श्रीमंत वर्गाकडे मोठया प्रमाणात जमिनी असून त्यातुलनेत खालच्या अथवा गरिब वर्गाकडे जमिनी नसल्यामुळे ते गरीब–शेतमजूर म्हणून राबतांना दिसतात. त्यामुळे समाजात गरीब–श्रीमंत अशी दरी निर्माण झाली व त्याला ही जमिन धारणा पध्दती जबाबदार आहे. त्यामुळे शोषित, दूर्बल घटकांच्या विकाससाठी जमिनीचे पुनर्वाटप होणे महत्वाचे आहे. २०११ च्या आर्थिक सामाजिक जनगणनेतील आकडेवारीवरून देशातील ग्रामिण तसेच अल्प उत्पन्न गटातील लोकांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामध्ये २५. ३४ कुटूंबापैकी १८ कुटूंबे ग्रामिण भागात राहतात. यापैकी ११ कोटी कुटूंबांना वंचीत समजन्यात येते. अनु. जाती., जमातीची ३.८६ कोटी कुटूंबे ग्रामीण भागात राहतात त्यापैकी ५६ टक्के सामान्य कुटूंबे हि अल्पभुधारक आहेत. त्यांना जमीनी नाहीत तर एकूण ग्रामीण कुटूंबापैकी ३१ टक्के लोकांची उपजिवीका हि मजुरीवर तर काही लोकांची उपजिविका हि घरकाम करूण आपले उदरनिर्वाह करतात. या सर्व आकडेवारीवरून असे दिसते की, जमिण वाटप व रोजगार यामध्ये असमानता दिसून येते. वरिलप्रकारच्या आकडेवारीवरून सर्वात मोठ्या प्रकारचा फटका हा सामान्य वर्गाला बसला आहे. म्हणून १०० वर्षापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जमीन सुधारणा, शेती हा शासणाचा उद्योग, नदीजोड प्रकल्प, सिंचन प्रकल्प, धरण बांधणी, जमिनीचे पुनर्वाटप संबंधीचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणले असते तर आज शेतीचे, रोजगाराचे चित्र असे विदारक दिसले नसते.

**शेतकरी तसेच शेतमजुराविषयी योगदान :–**

भारतातील कामगार, मजुर, शेतकरी यांच्याबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अतीव आस्था होती आणि त्यांच्याप्रती त्यांनी केलेल्या कामामुळेच त्यांना कामगारांचे नेते म्हणून ओळखले जाते. समता, स्वातंत्र्य आणि बंधूता यांच्या आधारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९४८ ला किमान वेतन कायदयातील तरतुदीचा फायदा मिळवून दिला तसेच जे फायदे औद्योगिक कामगारांना मिळतात तेच फायदे शेतमजुरांनाही मिळावयास हवे, त्यामध्ये नुकसान भरपाई, आरोग्य विमा, अपघात विमा, भविष्य निर्वाह निधी, इ. वगैरे या सर्व सोई शेतमजूरांना देखिल मिळावयास हव्या असे त्यांचे मत होते. १९३७ च्या नव्या कायद्यानुसार जे पहीले मंत्रिमंडळ अस्तित्वात आले तेव्हा त्यांनी 'लेबर मेंबर' म्हणून देशातील मजुरांविषयी अनेक कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पास करून घेतले. या व्यतिरीक्त शेतक–यांसाठी नेमके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काय केले तर सर्वप्रथम १९३७ साली डॉ. बाबासाहेबांनी शेतक–यांसाठी जाचक ठरणारी खोत पध्दती नष्ट करणारे भारतातील पहीले विधेयक मांडले तसेच त्यांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहिरणामा प्रसिध्द केला. त्यात शेतक–यांच्या हिताची काळजी वाहण्याचे कार्य या पक्षांनी अंगीकृत कार्य या पक्षाने ठरविले होते. १९३८ रोजी या पक्षाच्या वतीने जो २८ ते ३० हजार शेतक–यांचा विशाल मोर्चा असेंब्ली हॉलवर काढला होता. त्याचे नेतृत्व स्वत: डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते. त्याप्रसंगी त्यांनी शेतक–यांच्या पुढील मागण्या प्रसिध्द केल्या होत्या.

1. जमिनीची मशागत करून जगणा–या शेतक–याला योग्य न्याय द्यायचा असेल तर खोत–इनामदारी सारखे मध्यस्त जमिनदार नसले पाहिजे.
2. शेतकरी वर्गाला स्वतंत्रपणे व सुखसमाधानाने जगता यावे म्हणून जमिनीची जो प्रत्यक्ष मशागत करतो त्यालाच मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे.
3. वेठ बिगारी करून घेणे व बेकायदेशीर रीतीने पैसा उकळपणे हे फौजदारी गुन्हे ठरविले पाहिजे.
4. जमिन कसणा–या शेतक–यावर कर अगर पट्टी लावण्यापुर्वी त्याची आर्थिक स्थिती विचारात घेणे आपले कर्तव्य समजावे.
5. त्याचप्रमाणे शेतमजुरेना कायद्याने किमान मजुरी देण्याची सोय करणे व त्याचे हित जपणे हे लोकमतवादी सरकारचे कर्तव्य समजण्यात यावे.
6. अशारितीने त्यांनी स्वतंत्र मजुर पक्षाचा जो जाहिरणामा प्रसिध्द केला तो बराचसा शेतक–यांशी संबंधीत होता. यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शेंतक–यांविषयीचा दूरदृष्टीकोण कसा होता हे आपल्या लक्षात येईल.

**शेतीसाठी जल व उर्जास्त्रोत उभारणी करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान:–**

शेतीसाठी शेतक–यांना पाणी व वीज हे खुप महत्वाचे घटक आहेत. यांच्या शिवाय शेतीचा विकास घडवून आणने अशक्य गोष्ट आहे. शेतक–याला शाश्वत वीज व पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय शेतीची उत्पादकता वाढवणे आणि शेतक–यांचा आर्थिकस्तर उंचावणे शक्य नाही हे त्यांनी वेळेवर तत्कालीन सरकारच्या निदर्शनास आणुन दिले. शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजण झाले पाहिजे तसेच देशात अनेक भागात निर्माण होणारी दुष्काळजण्य परिस्थिती हे मानवनिर्मित असून हे हटवायचे असेल तर पाणी व वीजेचे नियोजन करून शेती ही जिरायती व बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत कारण शेती व शेतकरी समृध्द झाला तर देश समृध्द होईल. असे त्यांना वाटत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रथम प्रादेशिक पॉवरग्रीड ची संकल्पना मांडली त्यांच्या पुढाकारातूनच पुढे प्रादेशिक

पॉवरग्रीडचा विस्तार होउन राष्ट्रीय प्रादेशिक पॉवरग्रिड निर्मितीत प्रारंभ होवून केंद्रात उर्जा पुरवठा विभाग सुरू झाला. १९४५ मध्ये केंद्रीय विद्युत बोर्ड व केंद्रीय जल आयोगाच्या निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली भूमिका ही महत्वाची ठरलेली दिसून येते. एकुणच दुस—या महायुध्दानंतर भारतीय उपखंडात आर्थिक विकासाच्या दिर्घकालीन योजना त्यांनीच विकसीत केल्या, याची फार थोडया लोकांना जाणीव आहे. श्रमिक वर्ग, जलस्त्रोत आणि विद्युत उर्जा या क्षेत्रात आज जे यश आपणाला दिसते त्याची पायाभरणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. केंद्र सरकारने विद्युत निर्मिती आणि पुरवठा या क्षेत्रात थेट सहभागी होण्याचा पर्याय ठेवावा या बाबत ते नेहमी आग्रही असत. भारताच्या कृषी व औद्योगिक विकासासाठी स्वस्त व अमर्यादित विज पुरवठ्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती. त्यासाठी केंद्रसरकारने अनेक उर्जा प्रकल्प राबवावेत अशी भुमिका त्यांनी नेहमी आपल्या भाषनांमधून व लेखनीमधून मांडली आहे. तसेच औद्योगिक क्रांतीसाठी देखिल शेतमालाची आवश्यक्ता असते हे वास्तव आहे. त्यामुळे शासनाने कृषी विषयक धोरणाकडे विशेष लक्ष देउन स्थलांतरीतांचा प्रश्न सोडविला पाहिजे, असे त्यांनी नेहमी म्हटले आहे म्हणून त्यांचा हा विचार आजच्या ग्रामिण अर्थव्यवस्थेला दिशा देणारा आहे, यावरून त्यांच्या असामान्य, अभेद्य आणि अद्वितीय बुध्दीमत्तेचा दुरदृष्टीपणा आपणाला दिसुन येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्ञानाच्या उपयोगातून शेती विषयक विचारामुळे शेती हा राष्ट्रीय उद्योग होउन व त्यामुळे शाश्वत रोजगार निर्माण होईल. तसेच भारतासाराख्या कृषीप्रधान देशात शेतीक्षेत्रासाठी पाणी व विज यांचा समानरित्या पुरवठा झाला पाहिजे तर भारत एक समृध्द राष्ट्र म्हणून उद्यास यायला वेळ लागणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शेती सुधारणा परिवर्तणवादी विचारामुळे सामाजिक न्याय प्रस्तापित होवून येथील शेतकरी सक्षम होउन शेतीक्षेत्राला गती प्राप्त होईल.

**संदर्भ** :—


1. सुखदेव थोरात : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नियोजन, जल व उर्जा तसेच विद्युत विकास यावरिल भूमिका
2. डॉ. प्रदिप गायकवाड : डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक नवा अन्वयार्थ — लोकराज्य मासिक, लेख डिसेंबर २०११
3. भास्कर खंडागळे : शेतक—यांचे कैवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकसत्ता १४ एप्रिल २०१४
4. भारतातील लहान होल्डीग्ज आणि त्यावरील उपाय :— डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९१८
5. डॉ. आंबेडकरांचा राष्ट्रवाद:वास्तव आणि विपर्यास :— डॉ सी. एच. निकुभे
6. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर : समग्र चरित्र खंड १ ते १५ :— चांगदेव भगवानराव खैरमोडे
7. बहूआयामी डॉ बाबासाहेब आंबेडकर :— प्रा. सुभाष गवई, ऋचा प्रकाशन
8. भारतातील आर्थिक सुधारना आणि दलित एक आंबेडकरी दृष्टीकोण :— डॉ. भालचंद्र मुनगेकर
9. राष्ट्रनिर्माता बाबासाहब अम्बेडकर :— संपादक विवेक कुमार, अशोक दास

# विचारवंत आणि सुधारक छ. शाहू महाराज

**प्रा.विनोद नामदेव साळुंखे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख तुकाराम बाबुराव कदम कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स भरणे खेड
(रत्नागिरी)
salunkhevinod262@gmail.com

**प्रस्तावना :**

भारतीय समाजसुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती राजर्षी शाहू महाराज ब्रिटीश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनता व बहुजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न केले. सामाजिक परिवर्तनाला गती प्राप्त करून दिली. महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीच्या वाटचालीत राजर्षी शाहू महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे ठरते. १८९४ ते १९२२ अशी वर्षाची कारकीर्द सर्वसामान्याच्या दृष्टीने महत्वाची ठरली आहे. अशा लोकनायक राजा आजच्या राज्यकर्ते व अनेक पिढ्यांना मार्गदर्शिकाप्रमाणे मार्गदर्शन व प्रेरित करणारा ठरेल. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या वैचारिक व सामाजिक आणि विचारवंत म्हणून आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शोधनिबंध उद्दिष्टे :**

1. राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक योगदान समजून घेणे.
2. बहुजन समाजाविषयीचे सामाजिक योगदानाचा अभ्यास करणे.
3. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक व आर्थिक विचार समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

या प्रस्तुत शोधनिबंध परिपूर्ण करण्याकरिता संशोधनातील दुय्यम तथ्य संकलन या पद्धतीचा वापर केला गेला आहे. व अनेक विविध पुस्तके, संदर्भ, वर्तमानपत्रे, लेख इत्यादीचा आधार घेऊन शोधनिबंध मांडणी केलेली आहे.

**राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान :**

स्वातंत्र्यापूर्वी अनेक वर्षे आधी समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता सर्व घटकांना विकासाची समान संधी ही तत्वे शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अंमलात आणली. रयत प्रजा व उपेक्षित समाजाला त्यांचे हक्क व न्याय मिळवून देण्याचे कार्य शाहूंनी केले. आपल्या संपूर्ण जीवन कार्यामध्ये त्यांनी समाजातील बहुजन समाजाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या अधिकारांचा पूर्णपणे वापर केला.

**कलेला आश्रय :**

राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात संगीत, चित्रपट, चित्रकला, लोककला आणि कुस्ती या क्षेत्रातील कलावंतांना राजाश्रय देवून त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्वाचे कार्य केले.

**आरक्षण धोरण :**

राजर्षी शाहू महाराजांनी समता प्रस्थापित करण्यासाठी आरक्षणाचे धोरण राबविले व मागासलेल्या जातीच्या पुनर्त्थानाचा ऐतिहासिक निर्णय घेतला. राजर्षी शाहूंनी मागास लोकांना शिक्षण मिळवण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आरक्षण धोरणांचा निर्णय घेतला.

**स्वातंत्र्यलढयातीलयोगदान :**

महाराजांनी कोल्हापूर, बेळगाव या भागातील स्वातंत्र्यवीरांना वेळोवेळी आर्थिक व इतर मदत केली. शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संबंध सर्वश्रेष्ठ आहे. बालविवाह विधवा, अज्ञान, रूढी प्रथा परंपरा इत्यादीमुळे स्त्रियांचे जीवन असह्य बनले होते. हे लक्षात घेऊन साहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. आंतरजातीय विवाह कायदा देवदासी प्रथा बंदीचा कायदा केला.

अशा प्रकारे शाहू महाराज यांनी दिलेले सर्वच क्षेत्रातील योगदान समाजाला दिशादर्शक आहे.

**निष्कर्ष :**

1. राजर्षी शाहू महाराज यांचे राजकीय सामाजिक विचार दिशादर्शक आहेत.
2. सामाजिक विचार क्रांतिकारी स्वरूपाचे होते.
3. समस्त भारतीय समाजाला हे विचार महत्वाचे ठरणार आहेत.

**समारोप :**

एक थोर समाजसुधारक व भविष्याचा अचूक विचार हे समाज कार्याला महत्वाचे आहेत. कमालीचे यशस्वी कार्य केले आहे. शेती, उद्योग, सहकार या क्षेत्रात राजर्षींनी नवनवे प्रयोग केले.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. डॉ. जयसिंगराव पवार – राजर्षी शाहू, छत्रपती जीवन व कार्ये.
2. डॉ. विलास संगवे – राजर्षी शाहू महाराज कार्य व प्रभाव
3. डॉ. धनंजय कीर – राजर्षी शाहू छत्रपती
4. दै. लोकसत्ता, पुढारी, महाराष्ट्र टाईम्स.

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यतानिवारण विषयक कार्य

**प्रा. डॉ. चौधरी दत्तत्रय मल्हारी**
इतिहास विभाग कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर
chaudhridattatray@gmail.com

**प्रास्ताविकः—**
भारतीय समाजसुधारक व कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती (इ.स. १८८४ ते १९२२) होते. ब्रिटीश राजसत्तेच्या काळामध्ये सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी अविरतपणे कष्ट घेतले. बहूजन समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न केले. व सामाजिक प्रगतीला गती प्राप्त करून दिली. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक कार्याव्दिारे बहूजन समाजाला जागृत केले व त्यांची सार्वजनिक प्रगती घडवून आणली. प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजश्री छत्रपती शाहू महाराज होय. एक आदर्श राजा, बहूजन समाजाचा नेता, प्रतीगामी महाराष्ट्राला परोगामी बनविण्याचे महान कार्य केले. आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीत फुले, शाहू, आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.आधुनिक महाराष्ट्राला फुले, शाहू, आंबेडकर यांचा वैचारिक वारसा लाभला आहे

**जन्म व बालपण :—**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. त्यांच्या वडीलांचे नाव जयसिंगराव तर आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानचे राजे चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यू नंतर त्यांची पत्नी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना दत्तक घेतले. त्यांचे नामकरण विधी करून त्यांचे नाव शाहू महाराज असे ठेवले.त्यांचे शिक्षण ब्रिटीश अधिकारी फ्रेजर यांचा मार्गदर्शनाखाली झाले व पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेज मध्ये झाले. व धारवाड येथे झाले. अभ्यास व सहलीव्दारे मिळालेले व्यवहार ज्ञानया मुळे शाहू महाराजांचे व्यक्तीमत्व विकसित होत गेले.पुढे बडोदयांचे गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. विवाहाच्या वेळी शाहू महाराजांचे वय १७ वर्ष तर लक्ष्मीबाईचे वय १२ वर्षाहुन कमी होते. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. त्यांनी २८ वर्ष कोल्हापूर संस्थानाचा कारभार संभाळला. मुंबई येथे ६ मे १९२२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी आयुष्य भर मानवी समाजाच्या उन्नती साठी कार्य केले

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे अस्पृश्यतानिवारण विषयक कार्यः—**

**सामाजिक शिक्षणः—**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरूवात केले. त्यांनी शैक्षणिक कार्याव्दारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला.कनिष्ठ समाजातील मुलांना शिक्षणांची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.तर अस्पृश्यांच्या मुलाauk स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना करून दिली. समाजातील सर्व वर्गाना शिक्षण मिळाले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती.[१]

**अस्पृश्य समाजासाठी केलेले कार्य**:—

अस्पृश्यता हा मानव जातीला लागलेला कलंक आहे असे शाहू महाराजांना वाटत होते.अस्पृश्यता हा मानवतेच्या विरोधातील पघ्दत वाटत होती. जर अस्पृश्यांची स्थितीत सुधारणा घडवून आणवयाची असेल तर त्यांच्या शिक्षणावर भर दिला पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यांनी अस्पृश्यांच्या मुलासाठी कोल्हापूरात वसतिगृह निर्माण केले. त्यावेळी मुंबई इलाख्याचे दिवंगत गर्व्हनर यांची कन्या मिस क्लार्क यांचे नाव देण्यात आले. तसेच त्यांनी महार स्कूलची स्थापना केली. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना परदेशात शिक्षणासाठी आर्थिक मदत केली.[२]

**जातीभेद निर्मूलनः—**

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलनाला महत्वाचे स्थान दिले.जातीभेद निर्मूलनाचा आदर्श महत्मा फुले यांच्या कडून त्यांनी घेतलेला होता. जातीभेदाचे विषारी फळ म्हणजे अस्पृश्यता होय. त्यांनी अस्पृश्य बांधवांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या ठेवल्या. त्यांच्या साठी स्वतंत्र शाळा काढल्या तसेच वसतिगृहे काढली. त्यांना अर्थिक मदत केली. शिकलेल्या महार, मांग, चांभार, ढोर इत्यादीना वकिल्याच्या सनदा दिल्या. आपल्या संस्थानातील अस्पृश्य बांधवांसाठी सार्वजनिक तळी व विहीरी खुल्या केल्या. यातून जातीभेद निर्मुलनाला चालना दिली.[३]

**आंतरजातीय विवाहास चालना :—**

जातीभेद निर्मूलनाला चालना देण्यासाठी त्यांनी रोटी बेटी व्यवहार घडवून यावेत म्हणून पुढाकार घेतला. त्यांनी अंतरजातीय विवाहाला चालना दिली. त्यांनी आपली कन्या धनगर घरण्यातील राजपुत्रस देवून

अंतरजातीय विवाहाला प्रोत्याहन दिले. विठ्ठलदास पटेल यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात इ.स.१९१८ मध्ये आंतरजातीय विधेयक मांडले होते तेव्हा शाहू महाराजांनी या विध्येयकाला पाठिबा दिला होता.[४]

**आरक्षण धोरण:—**अस्पृश्यता निर्मूलनासाठी शाहू महाराजांनी अनेक प्रयत्न केले. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी करवीर गॅझेट मध्ये एक जाहिरनाम प्रसिध्द केला. सरकारी खात्यात नोकऱ्या देताना ५० टक्के जागा मागसवर्गीयासाठी आरक्षित ठेवल्या या पदावर मागासवर्गीय सुशिक्षित तरूणाची भरती करावी असे स्पष्ट केले.शाहू महाराजांचा जाहिरनामा म्हणजे स्वतंत्र भारताच्या आरक्षण धोरणाचा पाया ठरला.[५]

**अस्पृश्यांना सार्वजनिक जीवनात प्रवेश :—**

अस्पृश्यांना आपल्या संस्थानातील प्रशासनात नोकऱ्या दिल्या. शिक्षण घेतलेल्या अस्पृश्यांना तलाठी, शिक्षक या जागेवर नोकऱ्या दिल्या. सार्वजनिक धर्मशाळा, विहिरी, तळी, म्युनिसिपालटी, कार्यालय इत्यादी टिकाणी अस्पृश्यांना मुक्त प्रवेश दिला.६

**अस्पृश्यता विरोधी कायदे:—**

सन १९१९ मध्ये वटहुकूम काढून त्यांनी शाळा, दवाखने, सरकारी नोकरीत अस्पृश्यता पाळणे गुन्हा ठरवला. तसेच बलुतेदारी पध्दत बद केली. या कायदयाचा भंग केल्यास १०० रूपये दंड व चार दिवस कारावासाची शिक्षा देणार कायदा केला. सन १९१८ मध्ये एक वटहूकूम काढून पारधी जमातीतील लोकांना रोज पोलिस चौकीवर हजरी देण्याची पध्दत बंद केली.[७]

**अस्पृश्यांना रोजगारांच्या संधी:—**

अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितत सुधारणा करण्यासाठी त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना स्वतंत्र व्यवसाय करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. दुकाने, हॉटेल्स काढवीत म्हणून आर्थिक मदत केली. गंगाराम कांबळे नावाच्या व्यक्तीला कोल्हापूरच्या भर चौकात चहाचे दुकान काढून दिले. महार, चांभार, भंगी यांना पंडीत अशा पदव्या दिल्या. शिक्षित अस्पृश्यांना तलाठी म्हणून नेमले.[७]

**अस्पृश्यांच्या परिषदेत सहभाग :—**

अस्पृश्योध्दारासाठी ज्या निरनिराळया परिषदा भरविण्यात आल्या त्यात शाहू महाराजांनी सहभाग नोंदवून सामाजिक सुधारणेविषयी आपले विचार वारोंवार मांडले. सन १९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगाव या ठिकाणी अस्पृश्यांची परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले. दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्य परिषदचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

**सामाजिक लोकशाहीचा पाया :—**सामाजिक लोकशाहीची संकल्पना ही भारतीय विचारांच्या परंपरेत शाहू महाराजांच्या विचार परंपरेतून रूढझाली. अन्यायग्रस्त व विषमतेवर आधारलेली समाजव्यवस्थेत क्रांतीकारक परिर्वतन घडवून आणण्यासाठी शाहू महाराजांनी सामाजिक लोकशाहीचा प्रयोग साकार केला. त्यांचे कार्य कोल्हापूर संस्थाना पुरते मर्यादित असले तरी त्याची दखल तत्कालीन भारतातील बुध्दीजीवी वर्गाला घेणे भाग पडले. त्यांनी आपल्या राज्यात सामाजिक शिक्षण , समता, न्याय, विकास व चळवळीव्दारे सामाजिक लोकशाहीचा पाया घातला. त्यांना सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ म्हंटले जाते.[८]

**मुल्यमापन :—**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरूवात केलेली दिसून येते. त्यांनी शैक्षणिक कार्याव्दारे सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.अस्पृश्यांची स्थितीत सुधारणा घडवून आणवयाची असेल तर त्यांच्या शिक्षणावर भर दिला पाहिजे असे त्यांचे मत होते. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी जातीभेद निर्मूलनाला महत्वाचे स्थान दिलेले दिसून येते.जातीभेद निर्मूलनाला चालना देण्यासाठी त्यांनीअंतरजातीय विवाहाला चालना दिलेली दिसून येते. अस्पृश्यांना सार्वजनिक जीवनात महत्वाचे स्थान प्राप्त करून दिलेले दिसून येते.त्यांनी अस्पृश्यता विरोधी कायदे केलेले दिसून येते. अस्पृश्यांच्या आर्थिक स्थितत सुधारणा करण्यासाठीअस्पृश्यांना रोजगारांच्या संधी उपलब्ध करून दिलेल्या दिसून येतात.अस्पृश्योध्दारासाठी निरनिराळया परिषदा भरविण्यात आल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथसूची:—**

१) भगत रा.तू. राजर्षी शाहू छत्रपती :—जीवन व शिक्षणकार्य,कोल्हापूर रिया पब्लिकेशन्स २०१६ पृ १४२
२)स्नेहल एन सोनवणे व इतर , आधुनिक महाराष्ट्र ,सक्सेस प्रकाशन, पुणे २०१९ ,पृ ५.१५
३)जाधव नरेंद्र, महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्ट्रिक प्रकाशन पुणे १९८० पृ ११५
४) नांदेडकर व. गो., राजकिय विचार व विचारवंत , डायमंड प्रकाशन पुणे २०११पृ ६७
५)भगत रा.तू. राजर्षी शाहू छत्रपती :—जीवन व शिक्षणकार्य,कोल्हापूर रिया पब्लिकेशन्स २०१६ पृ ६९
६)स्नेहल एन सोनवणे व इतर , आधुनिक महाराष्ट्र ,सक्सेस प्रकाशन, पुणे २०१९ , पृ ५.१७
७)जाधव नरेंद्र, महाराष्ट्रातील मानचिन्हे, मॅजेस्ट्रिक प्रकाशन पुणे १९८० पृ ११८
८)नांदेडकर व. गो., राजकिय विचार व विचारवंत , डायमंड प्रकाशन पुणे २०११पृ ७०

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक लेखन .

**प्रा.तुषार भोसले**
कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे डॉ. अरविंद ब तेलंग कला,वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, निगडी पुणे

बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म मध्य प्रदेशातील 'महू' या गावी झाला.त्यांचे वडील रामजी संकपाळ हे सैन्यामध्ये सुभेदार होते. वास्तविक पाहता त्यांच्या वडीलांनी सैन्यामधील अधिकारी पाहुन, त्यांची बोलण्याची भाषा पाहून, या अधिकाऱ्यायांमध्ये एकूणच झालेला बदल केवळ शिक्षणामुळेच झाला आहे.याची त्यांना खात्री पटली,आपल्या मुलाने म्हणजेच भिवानेही त्यांचे मुळ नाव भिमराव पण त्यांना ते लाडाने भिवाच म्हणत असत.) खूप शिकावे असे त्यांना वाटत असत त्याचप्रमाणे,त्याने खुप शिकूण समाजची सेवा करावी असे त्यांना वाटत असत.कारण तत्कालीन अस्पृश्यता व उच्च नीचतेवर आधारलेली 'जातीव्यवस्था' या ठिकाणी होती.या सर्वांचे चटके स्वत: रामजी बाबांना व लहानग्या भिवास बसलेले होते.या सर्वांची जाणीव रामजीबाबा त्यांना करून देत असत.अर्थातच आपल्या वडिलांचे हे स्वप्न पूर्ण करून खरोखरच सर्व समाजाला माणसात आणण्याचे काम त्यांनी केल.स्वाभिमानाचे स्फुल्लिंग प्रत्येक माणसाच्या मनात पेरले.त्यांना शिका, संघटित व्हा, संघर्ष करा. असा संदेश दिला.म्हणूनच प्रसिध्द कवी ज.वि.पवार म्हणतात,

डॉ. " तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत.
(नाकेबंदी पृ18,19)

असे असले तरी या देशातील असणाऱ्या रूढी, परंपरा लगेच संपणाऱ्या नाहीत.माझ्यानंतर माझ्या समाजाला, देशाला काही मार्गदर्शनाची गरज लागेल. अशा वेळी ते काय करतील. त्यासाठी त्यांनी वेगवेगळया प्रकारची साहित्य निर्मिती केलेली दिसते.साहित्यनिर्मिती म्हणजे कथा, कविता कादंबरी अशी रचना त्यांनी केली नसून ती वैचारिक व तत्वचिंतक अशी निर्मिती केली.जेणेकरून त्याचा उपयोग सर्वांना होईल.थोडक्यात, साहित्याविषयी त्यांची जीवनवादी भूमिका असत. त्यांनी केलेले लिखान हे केवळ लेखनक्रीडा म्हणून केले नाही,तर ते लिखान त्यांचे प्रभावी साधन म्हणून होते.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांजवळ स्वत:च्या समाजापलीकडे पाहण्याची व व्यापक देश हिताची दृष्टी होती.त्यांच्या लेखनात समकालीन अथवा पूर्वकालीन लेखकांचे अनुसरण दिसत नाही.

त्यांनी जी भारताची राज्यघटना बनविली आहे त्यात सर्वांना समता, स्वातंत्र्य, बंधूत्व व न्याय बहाल केलेले दिसते.त्यामुळेच तर मुका (परंपरेने) झालेला माणूस बोलू लागला.न्याय हक्कासाठी झगडा देऊ लागला. समाजा समाजात चैतन्य निर्माण झाले. ही किमया आहे फक्त डा बाबासाहेबांनी लिहलेल्या घटनेची.याशिवाय समाजात असणारी स्त्री[1]पुरूष असमानता नष्ट व्हावी म्हणून व स्त्रियांना काही अधिकार मिळावेत म्हणून त्यांनी 'हिंदू कोडबील' सादर केल.त्याचप्रमाणे एवढया मोठया लोकशाही प्रधान भारत देशाला भेडसावणा[1]या अनेक प्रश्नांसंदर्भात त्यांनी लेखन केलेले दिसते. त्यातून त्यांनी मांडलेल्या प्रश्नांचा विचार केला तर असे लक्षात येते की, आज तेच प्रश्न कळीचे बनले आहेत.केवढी ही दूरदृष्टी.मग वीज,पाणी,नदीजोड प्रकल्प,समाजातील परंपरा रूढी, राजकारण, समाजकारण. धर्मकारण इ. थोडक्यात,एकही असे क्षेत्र नाही की त्यासंदर्भात डॉ बाबासाहेबांनी लिहले नाही.तसे त्यांचे जनमानसातील स्थान पाहता 'साहित्यिक' हा शब्द त्यांच्यासाठी क्षुल्लक प्रतीचा आहे.पण त्यांच्या गुणांकडे वाचकांचे

लक्ष वेधून घेण्यासाठी आपण त्यांना साहित्यिक म्हणू या. डा.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य समाजात जागृती केली.आपल्या दिवसातील 18 तास समाजकार्य, वाचन,चिंतन आणि लेखन यासाठी खर्च केला. समाजात असणाऱ्या विविध प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी वेगवेगळी वर्तमानपत्रे, पाक्षिके चालू केली.त्यातून परखडपणाने त्यांनी लेखन केले.जनता, मूकनायक, बहिष्कृत भारत मधून ते स्वत: लेखन करत असत.पण महाराष्ट्रातील प्रमुख पत्रकारांमध्ये त्यांची गणणा केली जात नाही.निबंधकारामध्ये ही त्यांचा समावेश केला जात नाही.एक प्रकारे त्यांच्या या गुणांकडे दुर्लक्ष झालेले दिसते.याचे एकच कारण म्हणजे त्यांचे असणारे उत्तुंग व्यक्तिमत्व. कारण आपण त्यांना कितीही विशेषणे लावली तरी ती खुजीच वाटतील.भारताने त्यांना मरणोत्तर भारतरत्न' ही उपाधी दिली असली तरी ती खुजीच वाटते.म्हणूनच त्यांना आपण 'विश्वरत्न' असे संबोधतो.त्यांच्या विचारांच्या ताकदीतून अनेक नविन पिढया घडल्या आणि घडत आहेत.या पिढया डॉ.बाबासाहेबांना प्रेरणा स्थानी मानून सर्व समाज स्तरापर्यंत त्यांचे सर्व विचार पोहचवत आहेत.याचे उदाहरण दयावयाचे झाले तर 'दलित साहित्य 'किंवा आंबेडकरी साहित्य याचे दयावे लागेल. वास्तविक डॉ बाबासाहेबांची जडणघडण पाहता असे लक्षात येते की मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर गुरू केळूस्कर गुरूजींनी दिलेल्या बुध्दचरित्रातून त्यांच्या वैचारिकतेची व संस्कारांची जडणघडण झाली.पुढे अभ्यासाच्या निमित्ताने वेगवेगळया देशात जाऊन त्यांनी ग्रंथांचा अभ्यास करून आपले व्यक्तीमत्व समृध्द केले.त्यातूनच मोठया प्रमाणात आपले वैचारिक लेखन केले.त्यांनी छोटया मोठया गोष्टींसाठी अनेक ग्रंथांचेही वाचनाचे संदर्भ दिले.त्यातूनच आजच्या संशोधकाना ते महत्वाचे ठरत आहे.समाजाला दिशा मिळत आहे.त्यांचे लेखन म्हणजे अमृताची धारा आहे.ते प्राशन करण्याची व पचविण्याची तयारी असेल तर बस्स झालं हो. म्हणूनच साम्यवादी विचारांनी झपाटलेल्या अण्णाभाऊ साठे यांनाही आपली 'फकीरा' कादंबरी त्यांच्या झुंजार लेखनीस अर्पण करावीशी वाटली.डॉ. बाबासाहेब 'मुकनायक' यात लिहिलेल्या लेखात आपले जाति-व्यवस्थेच्या समाजरचनेबाबत मूलगामी विचार सांगतात – "जर या हिंदुस्थान देशातील सृष्ट पदार्थाच्या व मानवजातीच्या चित्रपटाकडे प्रेक्षक या नात्याने पहिले तर हा देश केवळ विषमतेचे माहेरघर आहे . असे निःसंशय दिसेल . हिंदू धर्मीयात असलेली ही विषमता जितकी अनुपम आहे,तितकीच ती निंदास्पदहि आहे. कारण विषमतेनुरूप होणाऱ्या परस्पराच्या व्यवहाराचे स्वरूप हिंदू धर्माच्या शिलाला शोभण्यासारखे खास नाही .

हिंदू धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती उच्चनीच भावनेने प्रेरित झालेल्या आहेत , हे उघड आहे. हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय . पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की , या मनोऱ्यास शिडी नाही , आणि म्हणून एका मजल्यावरुन दुसऱ्या मजल्यावरून जाण्यास मार्ग नाही . ज्या मजल्यात त्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मारावे . खालच्या मजल्यात इसम , मग तो कितीही लायक असो , त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही . व वरच्या मजल्यातला माणूस , मग तो कितीही लायक असो , त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही . उघड भाषेत बोलावयाचे म्हणजे जातीजातीत असलेल्या या उच्चनीच भावना गुणावगुणाच्या पायावर झाल्या आहेत असे नाही . उच्च जातीत जन्मलेला , मग तो कितीही अवगुणी असो , तो उच्च म्हणावयांचा; तसेच नीच जातीत जन्मलेला , मग तो कितीही गुणी असो , तो निचच राहावयाचा! दुसरे असे की , परस्परात रोटीबेटी व्यवहार होत नसल्यामुळे दरएक जात या जिव्हाळयाच्या संबंधात तुटक आहे . काहींचा व्यवहार दारापर्यंतच होतो व काही जाती तर अस्पृश्य आहेत , म्हणजे त्या जातीतील माणसाचा स्पर्श झाला असतो इतर जातीतील माणसास विटाळ होतो . विटाळामुळे या बहिष्कृत जातीशी इतर जातीच्या लोकांना क्वचितच व्यवहार होतो. रोटीबेटी व्यवहाराच्या अभावी कायम झालेल्या परकेपणात स्पृश्यास्पृश्य भावनेने इतकी भर टाकली आहे की , या जाती हिंदू समाजाचे ब्राह्मण, ब्राह्मनेतर व बहिष्कृत असे तीन वर्ग होतात. तसेच या विषमतेच्या परिणामकडे लक्ष दिले तर असे दिसून येईल की, तिच्यापायी विविध जातीवर विविध परिणाम झालेले

आहेत . अशा रीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेच्या समाजरचनेतील वास्तवातले स्वरूप सर्व जनतेपुढे सांगण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे वेळोवेळी लोकांना जागे करण्याचा प्रयत्न केला. विविध विषयाबरोबर त्यांनी अनेक बाबी लोकांच्या लक्षात आणून दिल्या. डॉ. बाबासाहेबांनी संत साहित्याचाही अभ्यास केला. त्यातील काही गोष्टी समजावूनही सांगितल्या.त्याचप्रमाणे, काही संतवचनांचा ते आपल्या लेखनात व भाषणात वापर करीत असत.उदा.मुकनायक किंवा बहिष्कृत भारत यांच्या शिरोभागी ते तुकारामांचा अभंग किंवा ज्ञानेश्वरीतील ओव्या मुद्रित करत असत. त्यांच्या अग्रलेखांचे शिर्षकही संतवचनाचेच असत.

उदा.महापुरे झाडी जाती,तेथे लव्हाळी वाचती.याचे कारण परिवर्तनाच्या चळवळीत मांडायचा विचार हा लोकांच्याच भाषेत लोकांपर्यंत पोहचावा हाच हेतू.शिवाय इतर साहित्यिकांचे साहित्य कसे परिपूर्ण नाही त्याच्यात काय उणिवा आहेत या सर्व गोष्टी आपल्या लिखानातून दूर करत असत.त्यांनी लिहलेल्या ग्रंथाना जगप्रसिध्द प्रकाशकानी प्रसिध्दी दिली आहे. त्याचबरोबर भारतातीलही पाप्युलर, इंटरनेशनल या प्रकाशकांनी त्यांची पुस्तके वाचकांपर्यंत पोहचविली. प्राचीन भारतातील व्यापार' या विषयावर प्रबंध लिहून 1915 साली 'एमए' ही कोलंबिया विद्यापीठाची पदवी संपादन केली.भारतातील जाती संस्था तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास या विषयावर निबंध लिहून कोलंबिया विद्यापीठातील मानववंशशास्त्र विभागाच्या अभ्यास मंडळा समोर वाचला.तर 'प्रोबलाम ऑफ रूपी' हा प्रबंध लंडन विद्यापीठाला सादर करून 'डाक्टर आफ सायन्स' ही पदवी मिळविली.1935 साली 'जातीभेद निर्मुलन' हा ग्रंथ लिहला.1940 ला 'थोटस ऑन पाकिस्तान' हा ग्रंथ लिहला.तर 'रिडल्स इन हिंदुझम' हु वेअर शुद्राज , अनटचेबल इत्यादी प्रकारचे त्यांचे गाजलेले अनेक ग्रंथ आहेत. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बट्र्रीन्ड रसेल यांच्या प्रिन्सिपल ऑफ सोशल reconstruction , या जगप्रसिध्द ग्रंथाची मिमांसाही केली आहे.

ज्ञानतपस्वी, तत्वज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नाहीत तर ते या देशाचे महान नेते आहेत.आंबेडकरांनी केवळ ग्रंथालयात बसून ग्रंथलेखन केले नाही. तर, त्या ज्ञानाचा उपयोग समाज व देशातील सर्व जनतेला व्हावा. हे ठरवून त्यांनी निष्ठापूर्वक कार्य केले आहे.आपल्या लेखनातून त्यांनी राजकीय,धार्मिक,सांस्कृतीक भ्रष्ट, अनैतिक आचरण असणा-यां विरूध्दही लेखणीतून प्रहार केलेले दिसतात.त्याचप्रमाणे, त्यांनी 'भ.बुध्द आणि त्यांचा धम्म' हा ग्रंथ लिहून समाजाला संजीवनी दिली आहे. हे मात्र खरे आहे. अशा या महामानवास त्रिवार वंदन|

**संदर्भ ग्रंथ :**

1. साहित्य शोध आणि संवाद. संपादक डॉ. मनोहर जाधव
2. अनंत पैलूंचा योद्धा - डॉ. प्रल्हाद लुलेकर
3. सम्राट विशेषांक (2004)
4. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर (खंड 1)
5. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा –शंकरराव खरात

'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23
Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works

# हिन्दी कथा-साहित्य में अम्बेडकर का प्रभाव

**डॉ. दत्ता साकोळे**
प्रपाठक हिंदी विभागशि.म.ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कलम जि. उस्मानाबाद

हिन्दी कथा साहित्य में अम्बेडकर का प्रभाव जग-जाहिर है। आजादी के पूर्व के हिन्दी कथाकारों ने भारतीय समाज के विभिन्न वर्गों को केन्द्र में रखकर अपनी लेखनी चलाई थी। समाज की विभिन्न समस्याएँ यथा छुआछूत, ऊँच-नीच का भेद-भाव, छल-कपट की कपटपूर्ण राजनीति एवं साम्प्रदायिक समस्या-हिन्दी कथाकारों को विषेश रुप से प्रभावित किया था। आजादी के पूर्व सामाजिक एवं धार्मिक भेद-भाव पूरे देष में फैली-पसरी थी। लोगों का जीवन भयंकर अभाव तथा त्रासदी से ओत-प्रोत था। आर्थिक आजादी दलित वर्ग के लोगों को मय्यसर नहीं हुई थी। ऐसे भी आर्थिक लेन-देन में ये व्यक्ति चतुर नहीं थे, इनके मालिक एवं स्वामी इनका षोशण-दोहन करते थे। उदाहरणर्थ कमाने-खाने के लिए लोगों को बिहार से बाहर दिल्ली, कलकत्ता, मुंबई, राजस्थान और महाराश्ट्र आदि था। बाल-बच्चों की पढाई-लिखाई न के बराबर थी। बच्चे अधिक होते थे तथा उनकी परवरिष भी ठीक से नही हो पाती थी। इस तरह समाज की विभिन्न समस्याएँ आजादी के पूर्व भीशण रुप में फैली पसरी थीं। 'हरिजन' नामक अखबार में संविधान-निर्माता डॉ. भीमराव अम्बेडकर भी अपने स्तर से हरिजनों-दलितों को समाज में एवं संविधान में विषेश हक दिलाने की वकालत कर रहे थे। आजादी के पूर्व तथा आजादी के बाद की स्थिति पूर्णतः आन्दोलनात्मक-सी थी। पूरे देष में आजादी की लहर फैली हुई थी। ऐसे ही समय में, जब एक ओर हिन्दी कवियों का दल देषाध्दार के लिए देष भक्ति-पूर्ण कविताएँ लिख रहा था, उसी समय दूसरी ओर हिन्दी कथाकारें एवं लेखकों का विषिश्ट दल अपने-अपने स्तर से अपनी रचनाओं में देष की वर्तमान स्थिति को सामने रख रहे थे। हिन्दी कथा-साहित्य में प्रेमचन्द ने अपनी रचनाओं में दलितों की जिस स्थिति का वर्णन-चित्रण किया था, वह अम्बेडकर का प्रभाव माना जा सकता हैं हिन्दी कहानी 'पूस की रात' हो या 'गोदान' उपन्यास, कफन हो या कोई अन्य-सभी में कही न कहीं आंबेडकरवादी विचारधारा का प्रभाव है। जीवन के रंग मंच पर आसीन ये कथाएँ, उस काल में न केवल पाठकों का मनोरंजन ही नहीं कर रही थीं, बल्कि तत्कालीन सच्चाई को भी समाज के सामने पेष कर रही थी।

हिन्दुओं के अनुसार - "वेद ही धर्म का एक मात्र और अंतिम आधार है। लेकिन मनुस्मृति के अनुसार षूद्रों और दलितों की षिक्षा से वंचित रखना, षूद्र के कान में भूलसे वेद मन्त्र चला जाय तो गर्म षीषा डालना, यदि ऊँचे आसन पर बैठे तो गुप्तांग काट लेना, उपदेष रहे तो जीभ काट लेना, धन एकत्र करें तो सम्पत्ति को लूट लेना तथा अच्छे वस्त्र तथा मकान में रहने से वंचित कर देना इत्यादि व्यवस्थाएँ वर्ण-व्यवस्था के आधार पर दलितों के प्रतिकूल है।" प्रारम्भिक काल से चली आ रही वर्ण-व्यवस्था एवं जाति-भेद के संबंध में डॉ. आम्बेडकर ने अपनी पुस्तक 'जाति का उन्मूलन' में लिखा है कि "एक गरीब स्वाभिमानी बन सकता है, लेकिन एक अछूत पढ लिख कर, स्वच्छ रह कर भी सछूत नहीं बन सकता है।" उन्होंने जाति-भेद व नस्ल के संबंध में आगे लिखा है कि "जाति का परिणाम अर्थ की निपुणता में नहीं हो सकता है। जाति-नस्ल का न सुधार करती है और न ही किया है। जाति-भेद ने अलबत्ता। एक बात अवष्य की है कि इसने हिन्दुओं को पूर्णरुप से असंगठित व निरुत्साहित कर दिया है।" इसी क्रम में जाति-भेद, षोशण के संबंध में डॉ. मैनेजर पाण्डेय ने अपने लेख 'क्या अपने बृज सूची का नाम सुना है' में लिखा है कि "जाति-प्रथा षोशण, दमन और उत्पीडन की एक अमानुशिक व्यवस्था है, जो कि वर्ग ने दूसरे वर्ग के लिए उसको, उसके अधिकारों से वंचित रखने के लिए बनाई है।"

उपर्युक्त डॉ. अम्बेडकर एवं डॉ. मैनेजर पाण्डेय के कथनों से इस तथ्य की पुश्टि की जाती है कि जाति-भेद एवं वर्ण-व्यवस्था वह विभीत्सा है, जिसने दलितों की उसके वांछित अधिकारों पर कुठाराघात किया है, वहीं समाज को अन्दर से खोखला भी कर दिया है। कहने का तात्पर्य यह है कि इस वर्गीय असमानता के कारण ही दलित-वर्ग समाज में घुल-मिल नहीं पाया है जिसकी पुश्टि उपर्युक्त कथन से होती है। वर्ण व्यवस्था के पोशक जिन धर्म ग्रन्थों के आधार पर वर्ण-व्यवस्था को नियमित रुप से बनाए रखने के पक्षधर हैं तथा ऐसे पोशकों ने वर्ण-व्यवस्था की यथावत कायम रखकर दलित-वर्ग और उच्च वर्ग के बीच के बीच जो भेद उत्पन्न किया है और समाज के बीच वर्ण-व्यवस्था रुपी एक चौडी खाई बना दी। लेकिन वह लोग सब भूले हुए हैं कि जिन धर्म ग्रन्थों का हवाला देकर वह इस अमानवीय व्यवस्था को बनाए रखने के पक्षधर हैं। वे ही ग्रन्थ इस प्रकार की अमानवीय व्यवस्था को खण्डन करने के सटीक प्रमाण होंगे। अर्थात् आगे चलकर इन्हीं ग्रन्थों के तार्किक अध्ययन के आधार पर इस व्यवस्थ को चुनौती दी जा सकेगी। "वर्ण-व्यवस्था के नियामक-संचालक ब्राह्मण जात के भेद को बनाए रखने और षूद्रों पर तरह-तरह के अत्याचार करने के लिए जिन ग्रन्थों का सहारा लेते हैं, उन्हीं ग्रन्थों से वर्ण और जाति-भेद का खण्डन करने वाले कथनों को सामने लाकर अष्वघोश ने ब्राह्मणों को यह चुनौती दी कि या तो वेद-स्मृति और महाभारत के इन कथनों को प्रमाण मानते हुए वर्ग-भेद तथा जाति-भेद की तोडो या फिर इन ग्रन्थों की पवित्रता का आग्रह छोडो।" उपर्युक्त कथनों की समीक्षा के आधार पर कहा जा सकता है कि सामाजिक संरचना के अन्तर्गत निहित वर्ण-व्यवस्था ने मानव-मानव के बीच वह दूरी स्थापित कर दी है जो कि एक इंसान को अपने से निम्न,

छोटा, और घृणा की दृश्टि से देखता है। जबकि रक्त वर्ण और षारीरिक संरचना के आधार पर मानव एक जैसा है। इसमें किसी भी प्रकार का भेद दिखाई नहीं देता है। अतः हम यह कह सकते हैं कि वर्ण-व्यवस्था रुपी इस अमानवीय व्यवस्था से भाई-चारा ही खत्म नहीं अपितु राश्ट्रीय एकता और अखण्डता की बनाए रखने में व्यापक प्रभाव देखने को मिलता हैं। "अस्पृष्यता एक सामाजिक यथार्थ हैं। इसका अस्तित्व सामाजिक यथार्थ के तीन प्रमुख आयोगों-व्यक्ति समाज और संस्कृति में समान रुप से देखा जा सकता है। वैयक्तिक आधार पर आज समाज में हमें तीन प्रकार के व्यक्तित्व देखने को मिलते है। पहली श्रेणी में आधुनिक व्यक्तित्व को रखा जाता है यह आधुनिक परिस्थितियों से समायोग करने में तुलनात्मक रुप से अधिक सफल होता है। व्यवहार में आधुनिक व्यक्ति जातिगत एवं वंषगत भेदभाव का गौण तथा निहित वैयक्तिक स्वार्थ को प्राथमिकता देता है। दूसरे वैयाक्तिक योग्यता व क्षमता की तुलना में उसकी परम्परात्मक स्थिति का विषेश मूल्य नही होता। अतः दोनों तरह के व्यक्तित्व वाले व्यक्ति निजी सामाजिक संबंधों के मामलों में वह तुलनात्मक रुप से अधिक उदार भी होते हैं। किन्तु जाति-वर्ग की सीमाओं में पूर्णतः स्वतन्त्रता नही होते हैं।"

"जहाँ तक सवर्णों का अस्पृष्यों के साथ रहन-सहन का प्रष्न है अभी भी इस दिषा में कोई ठोस प्रगति नही हुई है। गांवों में हरिजनों की बस्तियाँ अभी भी सवर्णों से पृथक है। आबादी के बढने के साथ कहीं-कहीं आवासीय दूरियां कम अवष्य हुई हैं। किन्तु आवासीय दूरियां के घटने पर भी सामाजिक जन्तक्रियाओं की सीमाएँ अभी भी बनी हुई है। षहरों में भी मकान किराए पर लेते समय, षासकीय व अर्ध्दषासकीय गृहों के आवंटन के समय छात्रावासों में कमरों के चुनाव के समय कमोवेष जाति-पाति व छुआछूत की भावना काम करती है।" समान श्रेणी के अधिकारियों में भूतपूर्व अस्पृष्य जाति के लोगों को कार्यालय के बाहर समाज दर्जा नहीं दिया जाता। भारतीय प्रषासनिक सेवा जैसी उच्चस्तरीय सेवा में कार्यरत अधिकारियों में भी यह प्रवृत्ति दिखवाई पडती है। सामान्य चुनाव के चुने गए अधिकारी सुरक्षित पवदों पर चुने हुए अनुसूचित जाति के अधिकारियों से अपने को तरजीह देते हैं। आवासों के चुनाव के समय भी वे यथा संभव इन जातियों के पडोस में रहने से बचाव करते हैं यदि कहीं संयुक्त आवास में अथवा इनके पडोस में किसी सवर्ण अधिकारी को आवास मिल जाता है। तो प्रायः यह देखा जाता है कि वह अपने बच्चों को सख्त हिदायत दी जाती है कि पडोसी बच्चों के साथ मेल-जोन न रखें। दलील यह दी जाती है कि निजी परिश्रम या सरकारी संरक्षण के माध्यम से कोई नीच ऊँच भले ही न हो जाय किन्तु उसकी नीचली जल्दी नहीं जाती है। स्वभाव बदलने में कम से कम तीन पीढियाँ अवष्य लग जाती हैं। षिक्षा के क्षेत्र में अभी हाल में "एक मेडिकल कॉलेज के छात्रावास में अन्तिम वर्श के एक छात्र ने अपने साथी से यह पूछने पर कि किधर से आ रहे हो उत्तर दिया 'चमरौटी' से पता करने पर मालूम हुआ कि सुरक्षित सीटों पर प्रवेष पाए हुए नीची जाति के छात्र छात्रावास के एक भाग के कमरे में रहते हैं। हालांकि पृथक रहने के लिए अधिकारियों की तरफ से कोई दबाव नहीं दिया गया। लेकिन इस प्रकार की सोच में अब भी अस्पृष्यकता स्पश्ट भावना झलकती है।"

उपर्युक्त अस्पृष्यता के सभी तथ्यों के विवेचन से स्पश्ट है कि आज अस्पृष्यों को सबसे अधिक जरुरत इस बात की है कि वे अपने साहस धैर्य एवं बलिदान की भावना उत्पन्न करें। आगे आने वाला समाज उनका है। उन सभी षोशितों व पीडितों का युग है जो युग से बहिश्कृत एवं बेसहारा है। वास्तव में भारतीय समाज में अस्पृष्यता का रोग बहुत पुराना है। इसकी जडें, इतनी गहरी हैं कि बुध्द से लेकर गाँधी तक अनेक लोगों ने इसके निवारण के लिए समय-समय पर प्रयास किया किन्तु यह किसी रुप में अभी भी विद्यामान है।

दलितों के प्रति उनके व्यवहार में लाई गई/अपनायी गई अस्पृष्यता के संबंध में कुछ विचारकों के अनुसार जाति-भेद एवं अस्पृष्यता की अवधारणा प्रत्येक जाति में पाई जाती है। जिनमें से सामान्यतः कुछ जातियों को समाज में सामाजिक विकास की प्रक्रिया में भाग लेने से रोका जाता है। लेकिन इस स्थिति में भारत विष्व के किन्हीं देषों में अग्रणी रहा है। जहाँ अस्पृष्यता एवं जाति-भेदकी भावना कुछ ज्यादा ही देखी गई है। यहाँ पर दलितलोगों को अपने स्वार्थ के लिए प्रयुक्त तो खूब किया गया है, लेकिन उन्हें सामाजिक विकास के रास्ते से दूर ही रखा गया है। इस सन्दर्भ में कुछ विचारकों ने कहा है कि - "विष्व के किसी भी अन्य देष में जातिगत बन्धन और अस्पृष्यता की भावना इतनी बिकट रुप में नहीं देखी जितनी कि भारत में देखी गई हैं।"

जाति-भेद और वर्ण-व्यवस्था के आधार पर दलित-वर्ग से हो रहे अमानवीय व्यवहार का खुला रुप हमें 'हंस' पत्रिका में प्रकाषित कहानी 'सलाम' ओमप्रकाष वाल्मीक में देखने को मिलता है। प्रस्तुत कहानी में बताया गया है कि दलित वर्ग से संबंधित व्यक्ति रामपाल अपने किसी प्रियजन की बारात में गाँव जाता है। वहाँ यकायक उसे चाय की इच्छा महसूस होने लगती है। इस इच्छा की पूति के लिए वह ढूँढते-ढूँढते चाय की दुकान पर पहुँच जाता है। जब वह चाय मांगता है तो उससे जाति का नाम पूछकर जवाब दिया जाता है।

"ये सहर नहीं गाँव है.......... यहाँ चूहडे-चमारों को मेरी दुकान पर चाय ना मिलती............ कहीं और जाके पियो।"

इस्से स्पश्ट होता है कि आज भी दलित-वर्ग के व्यक्तियों के साथ गाँवों में जाति-भेद और वर्ण-व्यवस्था के आधार पर अमानवीय व्यवहार होता जा सकता है। भले ही युवक गाँव का निवास हो अथवा गाँव का अतिथि बनकर आया हो।

“हंस” पत्रिका के मई १९९५ के अंक में सुबोध कुमार झा द्वारा प्रकाषित कहानी “कतरनी की मेंहदी” में यह दृष्य देखने को मिलता है जिसमें सभी वर्ग के लोगों को मन्दिर में भगवान के दर्षन कराए जाते हैं। लेकिन दलित को यह कहकर लौटा दिया जाता है कि वे दीन-हीन हैं इनके प्रवेष से मन्दिर अपवित्र हो जाएगा।

“लच्छी बाबा ने तनिक गुस्से के लहजे में कहा - “क्या मैं कतरनी की समाज व समाज को जागृति करने वाली कोषिषों से डा जाऊँ। इसके इन कारनामों से डरकर क्या ऐसी जाति के लोगों को मन्दिर में प्रवेष करने दूँ और भगवान के दर्षन कर लेने दूँ जो दीन-हीन है। ना बा......... बा.......... ना मोई मन्दिर अपवित्र ना करानी।”

इस प्रकार से हिन्दी कथा साहित्य पर आम्बेडकर के विचारों का प्रभाव दलित साहित्यकारों ने कहानी, उपन्यासों में कलात्मक ढंग से चित्रित किया है।

**संदर्भ-**

१. हिन्दू वर्ण व्यवस्था में दलित, अरूणचंद्र दास, पृ.१७
२. जाति का उन्मूलन, डॉ. अम्बेडकर, पृ.१०
४. हंस मा. ;मईद्ध. १९९४
५. हंस मा. ;मईद्ध, १९९४, पृ.१३
६. हां मा. ;अगस्तद्ध, १९९४, पृ.१७

*'Journal of Research & Development' A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal, Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, December 2021, Volume-12, Issue-23*
*Mahatma Phule, Rajarshi Shahu Maharaj and Dr. B. R. Ambedkar – Thoughts and works*

# फुले दांपत्यांची प्रेरणा – सगुणाबाई क्षीरसागर

**डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे**
**इतिहास विभाग प्रमुख बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, जि. सांगली (महाराष्ट्र)**
E-mail- dattatrayakharade@gmail.com

थोर समाजसेवक महात्मा जोतीबा फुले म्हणजे परिवर्तनाची धगधगती मशाल. महात्मा फुले यांचे विचार आणि कृती आज ही अनेकांना प्रेरणा देते. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत त्यांनी केलेले काम हे इतिहासांच्या पानावर नेहमीच अतुलनीय ठरले आहे. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, त्यासोबतच त्यांनी लिहिलेले ग्रंथ आणि त्यातील विचार आज ही आपणासाठी प्रेरणादाई आहेत. गरिबी, विषमता, जातीयता महात्मा फुलेंनी लहानपणापासूनच पाहिली होती. त्यातूनच अन्याय, अत्याचाराविरूद्ध चीड निर्माण झाली. त्यामुळेच त्यांनी अस्पृश्यता दूर करण्याचा निश्चय केला. त्यासाठी सर्वसामान्य जनता आणि तळागाळातील शेवटचा माणूस डोळयासमोर ठेवून कार्याला प्रारंभ केला. त्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांचे कार्य पाहून समाजाने त्यांना महात्मा ही पदवी दिली. आज महाराष्ट्रावर ज्या तीन मोठ्या समाजसुधारकाचा पगडा आहे त्यात महात्मा फुले यांचा समावेश होतो. महाराष्ट्रातील वैचारिक परंपरांना महात्मा फुले यांचा वारसा लाभला आहे त्यामुळे महाराष्ट्राचा उल्लेख करताना फुले, शाहू, आंबेडकर यांचा महाराष्ट्र असा शब्दप्रयोग पहावयास मिळतो.

म. फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी आई चिमणाबाई व गोविंदराव यांच्या पोटी झाला. काही लोकांच्या जीवनात जन्मापासूनच अडचणी आणि संकटे येत असतात म. जोतीबा फुले त्यांच्या जीवनामध्ये असेच घडले. त्यांची आई चिमणाबाईंचे अकाली निधन झाले. जोतीबा फुले आई विना पोरके झाले. त्यावेळी जोतीबा फुल्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न केले नाही. ज्या काळात एक पत्नी जिवंत असतानाही दोन-तीन-चार विवाह करण्याची पद्धत होती. अशा काळातही गोविंदरावांनी दुसरे लग्न केले नाही यावरून त्याचे चिमणाबाईंवर असलेल्या प्रेमाची आपणास जाणीव होते. पत्नीच्या मृत्युनंतर मूलाचा सांभाळ गोविंदराव करू लागले. परंतू त्याच्या मुलांच्या संगोपनाला खरा हातभार लागला तो नात्यातील सगुणाबाई क्षीरसागर यांचा सगुणबाईंनी अगदी पोटच्या मुलाप्रमाणेच राजाराम व जोतीबा यांचा सांभाळ केला. त्यांच्या या मायेच्या छत्राखाली जोतीबांचे मन बुद्धी विकसित होऊ लागली. एक आई आपल्या मुलांसाठी जे जे करते ते सर्व सगुणाबाईंनी केले.[1] त्यामुळे जोतीबांच्या आयुष्यात सगुणाबाईंचे स्थान अनन्य साधारण आहे.सगुणाबाई ही फुले दांपत्याची प्रभावी प्रेरणा होती. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई यांच्या हातून एकोणिसाव्या शतकात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात अलौकिक असे क्रांतीकार्य घडले त्यामध्ये सगुणाबाईंचे स्थान अत्यंत महत्वाचे होते. जोतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांना घडविण्यासाठी सगुणाबाईंने जे श्रम घेतले ते पाहिल्यास एक सामान्य स्त्री एखाद्या दूरदृष्टीने पाहू शकते यांचे आश्चर्य वाटते. महात्मा फुल्यांच्या जीवनात सगुणाबाई भेटल्या नसत्या तर जोतीबा फुले हे कोण झाले असते हे सांगणे कठीण आहे म्हणूनच जोतीबा फुल्यांना महात्मपणा ज्या क्रांतीकार्यामुळे लाभली त्यामध्ये सगुणाबाईंचा वाटा विशेष असा आहे.

गोविंदराव फुल्यांची पत्नी चिमणबाई हिला धोंडाबाई नावाची एक बहीण होती. या दोघी पुण्याजवळील धनकवडीच्या पाटलांच्या मुली धोंडाबाईस हडपसर येथील क्षीरसागरांच्या घरी दिली होती. याच धोंडाबाईंची सगुणा ही मुलगी होती. पुढे सगुणाबाईंच्या माहेरी कुणीच उरले नाही तिचा नवरा ही स्वर्गवासी झाला होता. अशा कठीण परिस्थितीमध्ये तीन जॉन नावाच्या गो-या मिशन-याची पोरे सांभाळण्याची नोकरी करत होती. तिला लिहिणे-वाचणे येत नव्हते पण ती इंग्रजी बोलत होती. स्वभावाने सालस, प्रेमळ आणि दयाळू होती.[2]

बुद्धीमान जोतीबांनी खूप शिकले पाहिजे अशी सगुणाबाईंची तीव्र इच्छा होती त्यांनी इंग्रजीवर प्रभुत्व मिळवावे. खूप ग्रंथ वाचावेत, पांडित्य प्राप्त करावे आणि ख्रिस्ती फादरप्रमाणे समाजात अधिकाराचे व आदराचे स्थान प्राप्त करावे अशी तिची इच्छा होती. पण हे घडवायचे कसे, तिला एक युक्ती सुचली. त्यावेळचे लिजिट साहेब आणि गफारबेन मुन्शी यांची मैत्री होती. गफारबेन मुन्शीचे गोविंदरावांवर चांगले वजन होते. तिने या दोघांना जोतीबांच्या शिक्षणाबाबत सांगितले की, जोतीबांना पुढील शिक्षण मिळाले पाहिजे. लिजीटसाहेब यांनी गफारबेन मुन्शींना याबाबत गोविंदरावाचे मन वळविण्यासाठी पाठविले व गोविंदरावांनी त्याचे मत मान्य केले. तेथूनच जोतिबा फुले १ जानेवारी १८४३ पासून बुधवारवाड्यातील शाळेत जाऊ लागले आणि जीवनाला नवीन दिशा मिळाली.[3] यावरून

खरेतर आपणास असे दिसून येते की महात्मा फुले यांना शिक्षण देण्यात सगुणाबाई क्षीरसागर यांचे महत्त्वाचे योगदान होते. जर सगुणाबाई यांनी गफारबेन मुन्शी मार्फत गोविंदरावांना महात्मा फुलेंच्या ज्ञानाची कल्पना दिली नसती तर म. फुले यांना वडिलांची शेती करावी लागली असती.

महात्मा फुले यांच्या तीक्ष्ण बुद्धीमत्तेमुळे सगुणाबाई क्षीरसागर यांना त्याच्याकडून खूप अपेक्षा होत्या. यावेळी त्यांना आपल्या अनुभवाच्या आधारे समाजातील विषमतेची ओळख करून दिली. त्याकाळी समाजामध्ये विधा स्त्रीयांना मानसन्मान नव्हता. सगुणाबाई या विधवा असलेने त्याकाळी समाजात त्याच्याकडे पाहण्याची दृष्टी वेगळया प्रकारची होती. खरे तर सगुणाबाईंच्या जीवनामध्ये निराशामय वातावरण होते परंतु जेव्हा महात्मा फुलेचा सांभाळ करून लागल्या त्यावेळी त्याच्या जीवनात आनंद, उत्साह निर्माण झालेला दिसून येतो. ज्याप्रमाणे राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथेला तीव्र विरोध करून लॉर्ड बेटिंग यांचेकडून ४ डिसेंबर १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा केला व हजारो स्त्रियांचे प्राण वाचविले त्याप्रमाणे सगुणाबाई यांना असे वाटत होते की म. फुले यांनी शिक्षण घेऊन स्त्रीयांच्या मध्ये सामाजिक दृष्ट्या जागृती करून बाल विधवा स्त्रियांना आधार मिळवून स्त्रीयांना समाजात मान आणि हेच कार्य पुढे १८६८ म. फुले यांनी बालहत्या प्रतिबंधकगृह व विधवा पुर्नविवाह यांच्या आधारे केलेले दिसून येते.[4] यावरून आपणास सगुणाबाई यांच्या विचारांचे स्वप्न म. फुले यांनी पुढे पूर्ण केलेले दिसून येते.

महात्मा फुले यांनी सावित्रीबाई यांच्याशी विवाह केल्यानंतर त्यांना शिक्षण दिले, त्याप्रमाणे सगुणाबाई यांना ही शिक्षण दिले. ख-या अर्थाने पुढे आपणास असे दिसून येते की म. फुले यांच्या स्त्री शिक्षण चळवळी मध्ये या दोन स्त्रियांचे योगदान फार मोलाचे असलेची दिसून येते. त्याकाळी समाजामध्ये स्त्रियांना शिक्षण घेता येत नव्हते कारण मुलींनी शिक्षण घेणे हे धर्मशास्त्राच्या विरोधी आहे असे मानले जात होते. त्यावेळी अस्पृश्य समाजाला सुद्धा शिक्षणाचा अधिकार नव्हता. परंतु यावेळी सावित्रीबाई फुले व सगुणाबाई यांनी म. फुलेंच्या स्त्री शिक्षणामध्ये महत्वाचे योगदान दिले खरे तर १८४६ मध्ये सगुणबाई क्षीरसागर यांनी पुण्यामध्ये महारवाड्या मध्ये अस्पृश्यासाठी अनौपचारिक शाळा सुरू केली होती. परंतु तेथील स्थानिक लोकांच्या विरोधामुळे त्यांना ती बंद करावी लागली. यावेळी सगुणाबाईं यांच्यावर आरोप करणेत आला की स्त्री त्या शिक्षणाच्या व्दारे लोकांना ख्रिश्चन धर्माकडे ओढत आहेत. यावेळी समाजातील बहुजन वर्गाला शिक्षण मिळू न देणारे ब्राह्मण वर्गाचे कारस्थान म. फुले यांच्या लक्षात आले व त्यातून त्यांनी २५ डिसेंबर १८४६ रोजी पुणे येथे शुद्र व अतिशुद्र जातीतील लोकांची सभा घेतली यावेळी म. फुले यांना सभेतील लोकांना उपदेश करताना म्हणाले “ब्राह्मण समाजातील लोकांचे जे षडयंत्र आहे त्यातून अस्पृश्य समाजाने बाजुला व्हावे, शुद्र लोकांच्या अज्ञानामुळे तसेच शिक्षण नसलेमुळे ब्राह्मण वर्गाने आपल्या वर्चस्व निर्माण केले आहे. ब्राह्मण वर्गाला असे वाटते की शूद्र लोकांनी शिक्षण घेतले तर आपणास किंमत देणार नाही, ही बदल करणेची वेळ आहे. इंग्रजांना असे वाटते की समाजातील सर्व वर्गानी शिक्षण घ्यावे. यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे”[6] महात्मा फुले यांनी या सभेमध्ये मुलीची शाळा सुरू करणेची घोषणा केली होती. त्यावेळी या सभेमध्ये भिडे ही उपस्थित होते. आणि त्याचाच प्रत्यय म्हणून १८४८ मध्ये भिडे वाड्यात मुलीसाठी पहिली शाळा सुरू केली. आणि सगुणाबाई यांनी जे स्वप्न पाहिले होते ते पूर्ण झालेचे दिसून येते.

जोतीरावांनी थोडेफार मराठी शिक्षण घेतल्यानंतर सगुणाबाईंना त्यांनी मराठी शिकवले परंतु इंग्रजी भाषेच्या वातावरणात राहिल्याने आणि बराच कालावधी गेल्यानंतर ती मराठी विसरून गेली. सगुणाबाई ही हुशार, चाणाक्ष, चतुर होती. तिच्या ठिकाणी कल्पकता व दूरदृष्टी होती. जोतीबांनी शिकून मोठे व्हावे यासाठी ती त्यांना वारंवार उपदेश करीत होते.अनी बेझंट यांनी म्हटले आहे की, “कोणत्याही देशातील स्त्रियांच्या स्थितीवरून त्या देशाच्या एकंदर सुधारणेची किंवा उन्नतीची कल्पना करता येते.” या तत्त्वांचा महात्मा फुल्यांनी पुरस्कार केला. कोणत्याही सुधारणेचा पाया म्हणजे विद्या आहे हे त्यांनी हेरले. विद्येच्या प्रसाराशिवाय भारतासारखे मुर्दाड राष्ट्र कधी ही जागे होणार नाही. यासाठी प्रथम स्त्रीवर्गालाच शिक्षण देण्याची गरज आहे हे त्यांनी ओळखले होते. कौसल्या, देवकी, कुंती, द्रौपदी, सीता यासारख्या सुशिक्षित राष्ट्रमातांनी आपली मुले शूर वीर घडविली छत्रपती शिवाजी, जॉर्ज वॉशिंग्टन, नेपोलियन बोनापार्ट या राष्ट्रपुरूषांच्या माता ही सुशिक्षित होत्या.

“जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी”

सम्मान मिळवण्याच्या या उक्तीला अनुसरून राष्ट्राच्या भावी मातांच्या शिक्षणाला त्यांनी सर्वश्रेष्ठ स्थान दिले आणि शिक्षणकार्याची सुरूवात स्त्री शिक्षणापासून झाली ही सुरूवात करण्यात सगुणाबाई या प्रामुख्याने कारणीभूत आहेत. त्यांनी जोतिराव फुले यांना आपल्याबरोबर सावित्रीबाईसही शिकण्याचा आग्रह धरला होता. सुरूवातीला त्यांनी स्वतःच मुलींच्या शाळेत शिक्षणाचे काम केले. जसजसा व्याप वाढत गेला तशी शिक्षकेची गरज भासू लागली. त्याकाळी एकोणिसाव्या शतकात धर्मरूढींना जखडलेल्या समाजात स्त्रीने शिक्षिका होणे हे समाजाला

मान्य नव्हते. त्यावेळी सगुणाबाईंनी महात्मा फुले यांना उपयुक्त सल्ला दिला. तिने आपल्याबरोबर सावित्रीने शिकावे असा संकल्प करून त्याप्रमाणे सुरूवात केली.[7] सगुणाबाई व सावित्रीबाईंच्या शिक्षणाचा महात्मा फुल्यांनी केलेली सुरूवात म्हणजे भारतात भारतीयाने केलेला स्त्री शिक्षणातला पहिला प्रयोग होता या प्रयोगाची प्रेरणा सगुणाबाई या होत्या. महात्मा फुले आणि सावित्रीबाई यांच्या अलौकिक कार्यात सगुणाबाईंचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. महात्मा फुल्यांनी म्हटले आहे की, “आईसारखे दुसरे दैवत नाही पण जिने मला जन्म दिला ती आई आठवत नाही ही उणीव माझ्या आऊने (सगुणाबाईने) भरून काढली.”[8] तिला वाटे मी मोठा फादर व्हावा, तिने माझी लहानपणापासून काळजी केली. मला कधी ही कमी न पडणारी ज्ञानसंपत्ती दिली.

सगुणबाई आणि सावित्रीबाईंनी यांच्या शिक्षणाने स्त्री शिक्षणाच्या क्रांतिकार्याची जोतीबांनी मुहूर्तमेढ रोवली या दोघींनीही स्त्री शिक्षणास वाहून घेतले दिनांक १५ मे १८४८ रोजी पुणे येथे एक शाळा सुरू केली. या शाळेत सगुणाबाईंने आनंदानेच उत्साहाने शिक्षिकेचे काम केले. शुद्र अतिशुद्रांच्या मुलींच्या शिक्षणाबरोबर त्यांनी सेवाही त्यांनी केली. त्यांनी याबाबत कसल्याही मोबदल्याची अपेक्षा केली नाही याउलट मि. जॉन यांच्याकडे काम केल्याबद्दल जेवढे पैसे मिळत तेवढे महात्मा फुल्यांना अडीअडचणींच्या वेळी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कामगिरीसाठी स्वतःहून दिले. एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणासाठी आपली सर्व जमापुंजी मिळकत अशा या पवित्र कार्याला देते हे भारतीय संस्कृतीतील एक दुर्मिळ उदाहरण आहे.[9]

महात्मा फुले दांपत्याच्या क्रांतिकार्यात सगुणाबाई या सावलीसारख्या राहून त्यांनी आपले सर्वस्व वेचले असल्याचे स्पष्ट होते. महात्मा फुले व सावित्रीबाई या दोघांनी ही सगुणाबाईस आपल्या आईच्या ठिकाणी मानले होते. ती त्यांची शक्ती, प्रेरणा होती. तो त्यांचा एक आधार होता. त्या ख-या अर्थाने मार्गदर्शक होत्या म्हणूनच महात्मा फुल्यांनी “निर्मिकांचा शोध” हे आपले लहानसे पुस्तक सगुणाबाईस अर्पण केले आहे. अर्पण पत्रिकेतील मजकुरावरून सगुणाबाईंचे फुल्यांचा जीवनातील महत्व आपोआप स्पष्ट होते. ती अर्पण पत्रिका पुढीलप्रमाणे आहे. “सत्यस्वरूप सगुणबाई क्षीरसागर, तुम्ही मला नुसते जगविले नाहीतर माणूस म्हणून बनविले आहे. दुस-याच्या मुलांवर प्रेम कसे करावे हे मी तुमच्याकडून शिकलो. याबद्दल कृतज्ञता पूर्वक हे पुस्तक तुम्हांस ग्रंथकर्त्याने सादर केले आहे.” [10]

अशा या गुणसंपन्न स्त्रीचे ६ जुलै १८५४ रोजी फुरसुंगी जि. पुणे येथे नातेवाईकांच्या घरी कॉल-याच्या साथीत निधन झाले. जोतीराव आणि सावित्रीबाईंना तिच्या निधनाने जबर धक्का बसला. त्यांना अत्यंत दुःख झाले. महात्मा फुले व सावित्रीबाई या दोघांनाही सगुणाबाई उर्फ आऊ यांना आपल्या आईच्या ठिकाणी मानले होते. ती त्यांची शक्ती होती, ती त्यांची प्रेरणा होता. ती त्यांचा आधार होती व त्या ख-या अर्थाने महात्मा फुले दांपत्याच्या मार्गदर्शक होत्या.

सावित्रीबाईंनी आपल्या भावना खालील काव्यपंक्तीत व्यक्त केल्या आहेत. यामध्ये त्यांनी सगुणाबाई क्षीरसागर यांचे व्यक्तीमत्व आपल्या काव्यामधून मांडताना म्हणतात,

‘आमची आऊ फार कष्टाळू प्रेमळ तैसी होती दयाळू
सागर वाटे उथळ क्षणी आभाळ ठेंगणे तिच्याहुनी
आऊ आमच्या घरी आली टाक होऊनी पहा बसली
मूर्तिमंत जणू विद्यादेवी ह्रदयी आम्ही तिला साठवी.’ [11]

असे म्हटले जाते की, शिक्षणाची प्रेरणा महात्मा फुले यांना त्यांच्या मावस भगिनी सगुणाबाई क्षीरसागर यांच्याकडून मिळाली. सावित्रीबाई आणि जोतीराव यांच्या लग्नापासून तर त्यांच्या सर्व सामाजिक कार्यामध्ये साथ देणा-या सगुणाबाईच्या कार्याची दखल सावित्रीबाईंनी आपल्या कवितेतून घेतली आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या एकंदरित जडणघडणीमध्ये सगुणाबाई क्षीरसागर यांनी महत्त्वाचे योगदान दिले. यांची कल्पना आपणास फुले दापंत्याच्या ग्रंथातून तसेच काव्यातून दिसते. त्याप्रमाणे महात्मा फुले यांचे विचार व कार्याचा प्रचार व प्रसार करणारे सत्यशोधक समाजाचे खंदे कार्यकर्ते द. स. झोडगे व फुलवंताबाई झोडगे यांनी ही सगुणाबाई क्षीरसागर यांच्या कार्याची आठवण म्हणून त्यांच्या नावाने म्हणजेच सगुणाबाई महिला मंडळाची स्थापना केलेली होती.[12] यावरून आपणास असे दिसून येते की या थोर स्त्रीची योग्यता किती थोर श्रेष्ठ आहे हे स्पष्ट होते.

सगुणाबाई क्षीरसागर यांनी फुले दांपत्याला घडविलेच असे नाही. तर याकाळातील सामाजिक शैक्षणिक चळवळीला एक दिशा देण्याचे कार्य त्यांनी केलेले दिसून येते. यावरून आपणास असे म्हणता येईल सगुणाबाई उर्फ आऊ ही महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांची प्रभावी प्रेरणा होती यात शंका नाही.

**संदर्भ**

1. माळी मा. गो. क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले, मॅजेस्टिक प्रकाशन ठाणे, २०२१ पृष्ठ क्र. ३०.
2. कित्ता पृष्ठ क्र. ३४.
3. कित्ता पृष्ठ क्र. ३६.
4. डॉ. माळी मा. गो. क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले, आशा प्रकाशन, गारगोटी प्रथमावृत्ती पृष्ठ क्र. ७६.
5. उपरोक्त माळी मा. गो. क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतिराव फुले पृष्ठ क्र. ३६.
6. महाघट पाटील, क्षत्रिय मराठी शास्त्री नारो बलानी, सत्यशोधक समाजाचे चालक, ओतुर ता. जुन्नर, वत्सला छापखाना, १८९१ पृष्ठ क्र. ४६.
7. पंढरीनाथ पाटील महात्मा जोतिबा फुले यांचे चरित्र, राजेश प्रकाशन, पुणे, १९८५ पृष्ठ क्र. ९६.
8. शास्त्री ज. ल., जोती चरित्र, नॅशनल प्रकाशन, नवी दिल्ली, २००२ पृष्ठ क्र. ८७.
9. माळी (संपा.) सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११ पृष्ठ क्र. ५८.
10. फुले जोती गोविंद, निर्मिकांचा शोध भायखळा, मुंबई, १८५३ पृष्ठ क्र. ६३.
11. माळी (संपा.), सावित्रीबाई फुले समग्र वाङमय, म. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११ पृष्ठ क्र. ७३.
12. झोडगे फुलवंताबाई, गावगाडा क्रांती, विशेषांक नागेश पेठ पुणे १९७७ पृष्ठ क्र. ७८.

| Chief Editor | Editor |
| --- | --- |
| **Dr. R. V. Bhole**<br>'Ravichandram' Survey No-101/1, Plot<br>No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102 | Mr. Shashikant Jadhawar<br>I/C, Principal,<br>Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,<br>Kalamb, Dist. Osmanabad (MS) India |

**Executive Editor**
**Dr. Anant Narwade**
**Dr. Raghunath Ghadge**
**Mr. Anil Jagtap**

## Editorial Board

Prof. R. J. Varma ,Bhavnagar [Guj]
Dr. D. D. Sharma, Shimla [H.P.]
Dr. Abhinandan Nagraj, Benglore[K]
Dr. Venu Trivedi ,Indore[M.P.]
Dr. Chitra Ramanan Navi ,Mumbai[M.S]
guyen Kim Anh, [Hanoi] Virtnam
Prof. Andrew Cherepanow, Detroit, Michigan [USA]
Prof. S. N. Bharambe, Jalgaon[M.S]
Dr. C. V. Rajeshwari, Pottikona [ AP]
Dr. S. T. Bhukan, Khiroda[M.S]
Dr. R. K. Narkhede, Nanded [M.S]
Prof. B. P. Mishra, Aizawal [Mizoram]
Prin. L. N. Varma ,Raipur [ C. G.]
Prin. A. S. Kolhe Bhalod[M.S]
Prof.Kaveri Dabholkar Bilaspur [C.G]

**Address**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102